
# ॥ वंदे मातरम् ॥

(श्रीअरविंद घोष यांच्या प्रेरक लेखांचा संग्रह)



महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

# वंदे मातरम्

(श्रीअरविंद घोष यांच्या प्रेरक लेखांचा संग्रह)

# वंदे मातरम्

(श्रीअरविंद घोष यांच्या प्रेरक लेखांचा संग्रह)

**संपादक मंडळ**


डॉ. ग. मो. पाटील

डॉ. न. ब. पाटील

श्री. गो. ब. सरदेसाई

श्रीमती लता राजे

डॉ. रवींद्र रामदास (कार्यवाह)


*


महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
मुंबई

१५ ऑगस्ट १९९७

● **वंदे मातरम् :**

श्रीअरविंद घोष यांच्या प्रेरक लेखांचा संग्रह

● **प्रकाशक :**

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
१, महापालिका मार्ग, मुंबई-४०० ००१.

● **मुद्रक :**

संचालक, शासन मुद्रण व लेखन सामग्री, मुंबई यांचेद्वारे, शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार, नागपूर येथे मुद्रित.

● **प्रकाशन :**

१६ ऑगस्ट १९९७.

● **किंमत :** ९३.०० रुपये

# प्रस्तावना

महर्षी श्रीअरविंद घोषांचे ' वंदे मातरम् ' ह्या शीर्षकाचे हे विचारगर्भ लेख मराठीतून वाचकांना सादर करतांना महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाला आनंद होत आहे. महर्षींच्या ह्या १२५ व्या जयंतीचे पुण्यस्मरण ह्या निमित्ते करण्याचे भाग्य मंडळाला लाभले, मंडळ कृतार्थ झाले.

महर्षी अरविंदांनी पारतंत्र्याविरुद्ध आपल्या क्रान्तिकारक विचारांनी व आचारांनी सफल लढा दिला. मग ते पारतंत्र्य राजकीय असो वा आध्यात्मिक. दैन्य, दुःख व दारिद्र्य ह्या तापत्रयातून व्यक्तीला मुक्ती मिळावी व जगायला शक्ती प्राप्त व्हावी ह्यासाठी सक्ती न करता कोणती युक्ती वापरावी हे सांगून महर्षींनी मानवावर अमाप उपकार केलेले आहेत.

संपादक मंडळाने आजच्या परिस्थितीत उपयुक्त पडणारे महर्षींचे विचार व्यवस्थित मांडलेले आहेत. राष्ट्र निर्मितीसाठी व निर्मित राष्ट्राच्या सर्वांगीण प्रगतीसाठी उपयुक्त ठरणारी नीती प्रतिपादन करून महर्षी अरविंदांनी जगावर फार मोठे ऋण निर्माण करून ठेवलेले आहे. जग भेदाभेदरहित व्हावे. माणूस तेवढा एकत्र यावा. सगळ्यांनी जातपात, वंशवर्ण, रंगरूप वा देशवेष ह्यांचे मुखवटे दूर फेकून निखळ माणूस म्हणून परस्परांशी व्यवहार करावा ही वेदोपनिषदमूलक हिंदुधर्म संस्कृती सुगमतेने व परिणामपूर्ण पद्धतीने महर्षींनी विषद केलेली आहे.

सर्व बलांवर आध्यात्मिक बल सदैव मात करते. आत्मबल व आत्मविश्वास नसले तर ते राष्ट्रच कसले ? भारतीय स्वातंत्र्याच्या ह्या सुवर्ण महोत्सवी पर्वात महर्षींचे, एका क्रान्तिकारकाचे, हे विचार प्रवर्तित होत आहेत हा एक दुग्धशर्करा योगच होय. डॉ. ग. मो. पाटील, डॉ. न. ब. पाटील, श्री. गो. ब. सरदेसाई, श्रीमती लता राजे व डॉ. रविन्द्र रामदास ह्यांनी परिश्रमपूर्वक महर्षींचे विचारधन संकलित व मराठीत अनुवादित केले. मंडळ त्यांचे आभारी आहे.

मधुकर आष्टीकर,
अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृति मंडळ.

नागपूर :
१५ ऑगस्ट १९९७.

## आभार

या ग्रंथाची कल्पना साकार करण्यासाठी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे अध्यक्ष कै. विद्याधर गोखले यांच्या अनेकवेळा भेटी झाल्या व त्यांनी बहुमोल सूचना केल्या.

मंडळाचे अध्यक्ष डॉ. मधुकर आष्टीकर यांनी आत्मीयतेने हा प्रकल्प उचलून धरला व मार्गदर्शन केले.

या ग्रंथाच्या तयारीसाठी डॉ. रवींद्र रामदास दोनदा पाँदिचेरी व एकदा वडोदरा येथे जाऊन आले. पाँदिचेरीच्या वास्तव्यात श्रीअरविंद यांच्या दीर्घ सहवासाचा लाभ मिळालेले माननीय निरोदबरन, के. डी. सेठना या नव्वदीहून अधिक असलेल्या व्यक्तीच्या भेटीचा लाभ झाला. 'संजीवन' चे संपादक श्री. भा. वा. लिमये व श्रीमती विमलताई भिडे यांच्याशी चर्चा करता आली. अरविंद आश्रमाचे विश्वस्त माननीय हरिकांत पटेल यांनी सर्वतोपरी सहाय्य केले.

या ग्रंथात सादर करण्यात आलेल्या श्रीअरविंद यांच्या समग्र ग्रंथातील साहित्याची निवड ही डॉ. रवींद्र रामदास यांची आहे.

संपादक मंडळाच्या सदस्यांनी ज्या लेखांचा अनुवाद केला त्यांचा क्रमांक त्यांच्या नावांपुढे दिला आहे.

डॉ. ग. मो. पाटील– १, २, ३, ५, ६, ७, ८, ९, १०, २२, २३, २७, ३६.

डॉ. न. ब. पाटील– २१, २८, २९, ३०, ३१, ३२, ३७.

श्री. गो. ब. सरदेसाई– ११, १२, १३, १४, १५, १६, १७, १८, १९, २०, २४, २५, २६, ३५.

श्रीमती लता राजे– ४, ३३, ३४.

श्रीअरविंद आश्रमाच्या विश्वस्तांनी श्रीअरविंद ह्यांच्या साहित्याचा अनुवाद करण्याची अनुमती दिल्याबद्दल आम्ही आभारी आहोत.

१० मे १९९७.

**रवींद्र रामदास**

## प्रेरणा श्रीअरविंदांची . . . . . . .

श्रीअरविंद यांच्या जन्मदिनीच १५ ऑगस्टला भारत स्वतंत्र व्हावा हा एक विलक्षण योग होय. भारताच्या पहिल्या स्वातंत्र्यदिनी दिलेल्या संदेशात श्रीअरविंद यांनी या घटनेचा उल्लेख केला आहे. भारतीय स्वातंत्र्याच्या सुवर्ण-महोत्सवाच्या निमित्ताने व श्रीअरविंद ह्यांच्या १२५ व्या जयंतीस श्रीअरविंद ह्यांच्या विचारांचे नवनीत सादर करण्यात आम्हाला आनंद होत आहे.

भारताच्या राष्ट्रीय व आध्यात्मिक पुनरुत्थानास दोन विभूतींनी प्रामुख्याने हातभार लावला आहे. स्वामी विवेकानंद व श्रीअरविंद हे ते दोन महापुरुष होत. १८९३ हे वर्ष दोघांच्या वैयक्तिक त्याचप्रमाणे राष्ट्राच्या जीवनातील महत्वाचे होय. शिकागो येथील सर्वधर्मपरिषदेसाठी स्वामी विवेकानंद ह्यांचे मुंबईहून प्रयाण व १८७९ ते ९२ ह्या कालखंडात इंग्लंडमध्ये शिक्षण घेतल्यानंतर १८९३ मध्ये श्रीअरविंद ह्यांचे मुंबईत आगमन व वडोदरा संस्थानात नोकरी ह्या त्या घटना होय.

श्रीअरविंद यांच्या राजकीय विश्लेषणाचा श्रीगणेशा मुंबईत प्रकाशित होणाऱ्या इंदुप्रकाश या पत्रातील लेखाने झाला. महाराजा सयाजीराव गायकवाड ह्यांच्या नोकरीत असल्यामुळे इंदुप्रकाश या पत्रात २९ जून १८९३ रोजी सुरू झालेली New Lamps for Old ही श्रीअरविंद ह्यांची लेखमाला निनावी होती. या लेखमालेत व्यक्त झालेल्या निर्भीड विवेचनाने न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे हे हादरले व त्यांनी लेखमाला स्थगित करण्याची सूचना केली.

ह्या देशाकडे पाहाण्याचा श्रीअरविंद ह्यांचा दृष्टिकोन त्यांनी मृणालिनीस ३० ऑगस्ट १९०५ रोजी पाठविलेल्या पत्रात व्यक्त झाला आहे. " हा देश इतरांच्या दृष्टीने एक निष्क्रीय वस्तू आहे आणि पठारे, शेतीमाती, अरण्ये, पर्वत व नद्या अशी या देशाची इतरेजनांना ओळख आहे पण मी माझ्या देशाकडे माझी आई म्हणून पाहतो. माझ्या मातृभूमीची मी आई म्हणून पूजा बांधतो आणि तिची स्तुती गातो. आपल्या आईच्या छातीवर बसून एखादा दैत्य तिचे रक्त पीत असेल तर तिचा पुत्र काय करील ? समाधानाने भोजनास बसेल आणि आपल्या पत्नी-मुलांसह आनंदी जीवन जगत राहील की आईच्या रक्षणार्थ धाव घेईल. ह्या गतानुगतीक समाजास प्रगतीकडे नेण्याची शक्ती असल्याचे मला कळले आहे. "

१८९३ ते १९०६ हा श्रीअरविंद यांचा वडोदरा येथील वास्तव्याचा कालखंड होय. ह्या काळात श्रीअरविंद ह्यांच्या प्रखर राष्ट्रवादाचा पाया घातला गेला. श्रीअरविंद लोकमान्य बाळ गंगाधर टिळक ह्यांच्याकडे आकर्षिले गेले. लोकमान्यांचा श्रीअरविंद ह्यांच्यावरील प्रभाव हा टिळकांच्या लेखसंग्रहास व भाषणास लिहिलेल्या प्रस्तावनेत व मृत्युलेखात व्यक्त झाला आहे.

ह्याच काळात भवानी-मंदिर या संकल्पनेचे प्रारूप श्रीअरविंद ह्यांनी सादर केले आहे. ते केवळ भवानी मातेचे मंदीर उभारण्याचे नसून राष्ट्रमंदीर उभारण्याचे आहे. विश्वाच्या कल्याणासाठी भारताच्या पुनरुत्थानाची आवश्यकता प्रतिपादन करताना श्रीअरविंद म्हणतात, '' भारत नष्ट होणार नाही. आपला वंश समूळ नष्ट होणार नाही, कारण मानवजातीच्या अनेक विभागांपैकी भारतासाठीच सर्वोच्च आणि सर्वोत्कृष्ट नियती आरक्षित केली आहे. ती मानवजातीच्या भवितव्यासाठी परमोच्च आवश्यक आहे. संपूर्ण जगासाठी भविष्यकालीन धर्म हिच्याकडूनच पुढे आला पाहिजे. सर्वधर्म, विज्ञान आणि तत्त्वज्ञान ह्यांचा समन्वय करणारा शाश्वत धर्म तिनेच दिला पाहिजे आणि संपूर्ण मानवांचा एकच आत्मा निर्माण झाला पाहिजे. नीतिमत्तेच्या क्षेत्रात सर्व अनार्य वृत्तींना मानवतेमधून पार नष्ट करून संपूर्ण विश्वाला आर्य बनविले पाहिजे. हे करण्यासाठी भारताला प्रथम स्वतःचे पुनरार्यीकरण करावे लागेल ''.

जसजसे आपण खोलवर विचार करू तसतशी आपली खात्री पटेल की बाकी साऱ्या गोष्टींपेक्षा जी एक गोष्ट मिळविण्यासाठी आपण प्रयत्नशील राहिले पाहिजे ती म्हणजे शक्ती, शारीरिक, मानसिक आणि नैतिक आणि सर्वांहून श्रेष्ठ म्हणजे आत्मिक शक्ती, जी सर्व अन्य शक्तींचा अनंत आणि अविनाशी स्त्रोत आहे. जर आपण शक्तिमान असू तर सर्व गोष्टी आपणास सहज व निसर्गतःच प्राप्त होतील.

देशभक्तीच्या उगमाचे विवेचन करताना श्रीअरविंद म्हणतात, या देशाचे श्रेष्ठत्व आणि विचारवैभव जगात प्रस्थापित करण्याची आकांक्षाच समाजात प्रचंड पराक्रम करण्याची ईर्षा निर्माण करू शकेल. केवळ भौतिक समृद्धीची अभिलाषा नव्हे. म्हणूनच फक्त लाभासाठीच आम्ही तुम्हाला उदयुक्त करू इच्छीत नाही. आपण एक थोर व वैभवशाली राष्ट्र होतो ह्याची आपणाला प्रथम जाणीव झाली पाहिजे आणि त्याबद्दल आपणाला सार्थ अभिमान असला पाहिजे. आतापर्यंत आपल्या स्वाभिमानशून्य व शरणांगत वृत्तीचा लाभ उठवूनच अन्य राष्ट्रांनी आपणाला विनाशाच्या गर्तेत फेकून दिले आहे. केवळ भौतिकतेच्या आकांक्षा राष्ट्रनिर्मितीचे काम कधीच करू शकणार नाहीत. पण जेव्हा राष्ट्रीय स्वाभिमान जागृत होतो, तेव्हाच अधःपतित व विस्कळीत राष्ट्र पुन्हा एकजीव होते. त्यात कल्पनातीत शक्तीची नैतिक ऊर्जा निर्माण होते.

लोकमान्य टिळक ह्यांनी जातीव्यवस्थेबद्दल मांडलेल्या परखड विचारांचा पुरस्कार श्रीअरविंद ह्यांनी ' चिवट जातीव्यवस्थेतील अहिंदु प्रवृत्ती ' ह्या लेखात केला आहे. श्रीअरविंद लिहितात, '' दक्षिणेकडचा हा थोर राष्ट्रवादी विचारवंत म्हणतो की सध्या आढळणारी सामाजिक विषमता ही अत्यंत हानीकारक आहे. त्यानी असे विचार मांडणे अगदी साहाजिकच आहे कारण टिळक कट्टर व निष्ठावान हिंदु असून ते निखळ राष्ट्रवादी विचारांचे पुरस्कर्ते आहेत. मध्यंतरीच्या काळात जातीव्यवस्थेच्या आधारभूत विचारांबद्दल गैरसमजुती पसरल्या. तिचे विकृतीकरणही केले गेले. सर्व राष्ट्रवादी शक्तींनी जातीजातीतील तर्कदुष्ट भेदाभेद व विषमता ह्यांचा झपाट्याने नाश करणे आवश्यक आहे.

विश्वामध्ये आध्यात्मिकतेची शिकवण प्रसारित करणे हे भारताचे ईश्वरीय कार्य होय अशी श्रीअरविंद ह्यांची धारणा होती. '' आध्यात्मिक राष्ट्रवाद '' ह्या लेखात श्री. अरविंद सांगतात, '' भारताच्या तपश्चर्येचा प्रदीर्घ काळ आता संपुष्टात येत असल्याची स्पष्ट चिन्हे दिसू लागली आहेत. नव्या जाणिवांचा प्रकाश पूर्वेकडील देशात पसरू लागला आहे. त्या प्रकाशाच्या आगमनाची पूर्वचिन्हे पूर्वक्षितिजावर उमटू लागली आहेत. आता थोड्याच वेळात सूर्योदय होईल आणि नव्या युगाची प्रसादचिन्हे दिसू लागतील. पण गंमत अशी की ज्या रामकृष्ण परमहंसानी ह्या युगाचा श्रीगणेशा केला त्या युगप्रवर्तकालादेखील त्याचे यथातथ्य वर्णन करणे दुरापास्त आहे. हिंदु आध्यात्मिकतेची ही ऊर्जस्वल अभिव्यक्ती पूर्वेकडील राष्ट्रांच्या पुनरूत्थानाची नांदीच होय.

भारताच्या स्वातंत्र्याच्या सुवर्णमहोत्सवदिनी श्रीअरविंद ह्यांनी पन्नास वर्षापूर्वी दिलेल्या संदेशाचे स्मरण करणे उचित ठरेल. श्री. अरविंद म्हणतात, '' स्वतंत्र भारताचा १५ ऑगस्ट जन्म दिवस. '' एका जुन्या युगाचा ह्या दिवशी अंत होत आहे आणि नव्या युगाची सुरुवात होत आहे. हा दिवस आपल्याच दृष्टिने वैशिष्ट्यपूर्ण आहे, असे नाही तर तो आशिया खंडाकरिता आणि जगासाठीही वैशिष्ट्यपूर्ण आहे कारण राष्ट्रकुलामध्ये आज एका नव्या आणि प्रचंड असे सुप्त सामर्थ्य असलेल्या, तसेच मानवतेचे राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक आणि आध्यात्मिक भवितव्य घडविण्याची शक्ती असलेल्या राष्ट्राचा प्रवेश होत आहे.

भारत स्वतंत्र झाला आहे पण एकता गमावून बसला आहे. हे स्वातंत्र्य खंडीत आहे . . . . . . . . . . . . देशभंजनाची स्थिती तशीच राहीली तर त्यामुळे भारत निःसत्त्व पांगळा बनेल. येथे दंगेधोपे नेहमीच उद्भवतील. कदाचित् राष्ट्रावर परचक्र येऊ शकेल आणि भारत पुन्हा परतंत्र होईल. त्यामुळे हे विभाजन नष्ट झालेच पाहिजे . . . . . . . . . . कोणत्याही उपायाने हे विभाजन नष्ट व्हायला हवे आणि ते होईलच.

जगाला आध्यात्मिक ज्ञान देण्याचे भारताचे कार्य अगोदरच सुरू झाले आहे. भारतातील अध्यात्मविद्या आता युरोप व अमेरिकेत अधिकाधिक वेगाने पसरत आहे. हा प्रवाह असाच वाढत जाणार आहे. काळाचे हे आव्हान होत असतांना सारे जग भारताकडे मोठ्या आशेने पहात आहे. भारताच्या आध्यात्मिक शिकवणीबरोबरच येथील विकासाची आणि आत्मानुसंधानाची तंत्रे लोक स्वीकारीत आहेत.

कोणत्याही ध्येयमार्गावर अडीअडचणीचे डोंगर असतात. त्यांच्यावर मात करण्यासाठीच ते असतात आणि सर्वश्रेष्ठ शक्तीची इच्छा असेल तर आपण त्यांच्यावर मात करूच. येथे-देखील अशी उत्क्रांती होणार असेल आणि ती अध्यात्म आणिं अंतर्गत चैतन्यशक्तीच्या विकासानेच होणार असेल तर तिचीही सुरवात भारतापासूनच होईल. तिची व्याप्ती वैश्विक असली तरी तिचे प्रचलन भारतापासूनच होईल. ''

१० मे, १९९७.

**रवींद्र रामदास**

# अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १ | तेजस्वी प्रकाशाकडे, १ | ७-८-१८९३ | १ |
| २ | तेजस्वी प्रकाशाकडे, २ | २८-८-१८९३ | ५ |
| ३ | भवानी मंदीर | | ११ |
| ४ | मृणालिनीस पत्र | ३०-८-१९०५ | २३ |
| ५ | सिंहावलोकन | १६-४-१९०७ | २९ |
| ६ | अतिरेकवाद नव्हे राष्ट्रवाद | २६-४-१९०७ | ३३ |
| ७ | भारत स्वतंत्र व्हावा काय ?, १ | २७-४-१९०७ | ३७ |
| ८ | भारत स्वतंत्र व्हावा काय ?, २ | २९-४-१९०७ | ४१ |
| ९ | भारत स्वतंत्र व्हावा काय ?,३ | ३०-४-१९०७ | ४७ |
| १० | भारत स्वतंत्र व्हावा काय ?, ४ | २-५-१९०७ | ५१ |
| ११ | देशभक्तीचा उगम | १९-६-१९०७ | ५५ |
| १२ | धर्म आणि राजकारण | २-८-१९०७ | ५९ |
| १३ | राष्ट्रीयत्वाचीं मूलतत्त्वे | १७-८-१९०७ | ६३ |
| १४ | विद्यार्थ्यांना संदेश | २३-८-१९०७ | ६७ |
| १५ | चिवट जाती व्यवस्थेतील अपप्रवृत्ती | २०-९-१९०७ | ७१ |
| १६ | ' वंदे मातरम् ' वरील खटला | २५-९-१९०७ | ७५ |
| १७ | राजकारण व आध्यात्मिकता | ९-११-१९०७ | ८१ |
| १८ | राष्ट्रीय संघर्षाची वाटचाल | १६-११-१९०७ | ८५ |
| १९ | श्रीकृष्ण व अनियंत्रित राजसत्ता | २५-११-१९०७ | ९३ |
| २० | बहिष्काराची नैतिकता | . . | ९७ |
| २१ | पुणे येथील भाषण | १३-१-१९०८ | १०३ |
| २२ | नवा राष्ट्रवाद | . . | १०९ |

| | | | |
|---|---|---|---|
| २३ | सद्य:स्थिती | १९-१-१९०८ | ११३ |
| २४ | खेडे व राष्ट्र | ८-३-१९०८ | १२७ |
| २५ | आजच्या काळाची गरज | १८-३-१९०८ | १३१ |
| २६ | आध्यात्मिक राष्ट्रवाद | २८-३-१९०८ | १३५ |
| २७ | आईची मागणी | १४-४-१९०८ | १३९ |
| २८ | धर्म म्हणजे एक जीवनप्रणाली | ३०-५-१९०९ | १४३ |
| २९ | माझ्या देशबांधवांना अनावृत पत्र | जुलै, १९०९ | १५३ |
| ३० | ' कर्मयोगिन् ' चा आदर्श | . . | १६३ |
| ३१ | भारत जागा होत आहे | . . | १६९ |
| ३२ | एक नवा मंत्र | . . | १७५ |
| ३३ | बाळ गंगाधर टिळक | १९१८ | १७७ |
| ३४ | उत्तुंग व्यक्तिमत्व आणि दुर्दम्य आकांक्षा | ५-८-१९२० | १९३ |
| ३५ | डॉ. मुंजे यांस पत्र | ३०-८-१९२० | १९७ |
| ३६ | गूढवादाचा सिद्धान्त | . . | २०१ |
| ३७ | १५ ऑगस्ट, १९४७ | १५-८-१९४७ | २१५ |
| | परिशिष्ट | . . | . . |

# निवडक छायाचित्रे

# Bande Mataram

## Weekly Edition.

*PUBLISHED EVERY SUNDAY.*

Price One Anna. Price One Anna

VOL I. CALCUTTA, SUNDAY, SEPTEMBER 29, 1907. NO. 18.

OUR PICTURE GALLERY.




२९ सप्टेंबर १९०७ च्या ' वंदे मातरम् ' चे मुखपृष्ठ



श्रीअरविंद यांचे बडोदा येथील निवासस्थान
(खासेराव जाधव यांचा वाडा)




बडोदानरेश महाराजा सयाजीराव गायकवाड




श्रीअरविंद यांच्या अध्यक्षतेखाली लो. टिळक भाषण करताना



राष्ट्रीय पक्षाचे नेते, सुरत, डिसेंबर १९०७
उभे (डावीकडून) डॉ. मुंजे, रामस्वामी के. कुवरजी देसाई
सरदार अजितसिंह, श्रीअरविंद, लो. टिळक, सैय्यद हैदर रेझा,
श्री. खापर्डे व अश्विनीकुमार दत्त.



विष्णु भास्कर लेले
(श्रीअरविंद यांचे साधनेतील मार्गदर्शक)



श्रीअरविंद यांच्या साधनेचा श्रीगणेशा
(मुजुमदार यांचा वाडा, बडोदा)




श्रीअरविंद, पाँडिचेरी, १९१८

## १ तेजस्वी प्रकाशाकडे . . . . . . . १ ७-८-९३

**प्रचलित राजकीय परिस्थितीचे विवेचन करताना श्रीअरविंद ह्यानी एका अंधाने दुसऱ्या अंधाला पुढे नेले तर ते दोघे खड्ड्यात पडल्याशिवाय रहाणार नाहीत काय? असा प्रश्न विचारला आहे. राष्ट्राच्या आकांक्षेचे प्रतीक असलेल्या राष्ट्रीय सभेच्या नेतृत्त्वाची चिरफाड निर्भीडपणे केली आहे.**

एकाद्या अंधाने दुसऱ्या अंधाला पुढे नेले तर ते दोघेही खड्ड्यात पडणार नाहीत काय? ह्या पृथ्वीगोलाच्या चारी दिशाना ज्याचे नाव पसरले आहे अशा गॅलिलिओच्या संदेशवाहकाची सूत्रबद्धता तशीच, जवळजवळ तशीच चालू आहे. मानवी जीवनावरील त्याच्या भाष्यांपैकी-ज्यामुळे त्याची शिकवण प्रभावशाली झाली त्यापैकी-एक असे आहे की जे मानवी मनाला अधिक भिडते आणि ज्याचा वारंवार उपयोग होतो. पण आमच्या राष्ट्रीय सभेला ते लागू पडते हे फारच थोडे भारतीय मान्य करतील. किंबहुना दोन वर्षापूर्वी मी हे खचितच मान्य केले नसते. पण राष्ट्रीय सभेच्या कर्तृत्वाला ती म्हण पूर्णतः लागू पडते, नव्हे कोणतेहि सुविचारी मन अन्यथा निर्णय देणारच नाही, हे माझ्या ह्या लेखनाच्या अस्तित्वाला काही जास्त आहे हे मला आधी सिद्ध केले पाहिजे. मला ह्याची पूर्ण जाणीव आहे की हे करीत असताना माझा हेतू आणि सद्बुद्धी ह्याबद्दल निश्चितच शंका घेतली जाईल. आपल्या नूतन राष्ट्रीय जीवनातील एक प्रभावशाली परिणती आहे अशी ज्या संस्थेबद्दल माझ्या अनेक देशबांधवांची धारणा आहे त्या संस्थेवर मी टीकेचे प्रहार करीत आहे ह्याबद्दल मी अज्ञानी मुळीच नाही. आमच्या तेजस्वी आणि उदात्त आशांचे संरक्षण करणारा तो मौल्यवान कलश आहे अशी काहीची समजूत आहे तर अतिशय अंधूक आणि धूसर परिसरातून अतिदूर सर्वाकडे घेऊन जाणारा तो तेजस्वी तारा आहे असे काहीना वाटते. आणि आमची दृढधारणा अतिघोर परिणामाकडे नेणारा भ्रम आणि पाश आहे अशी जर माझी पूर्णतः खात्री नसती तर मी माझे स्वतःचे संदेह दाबून टाकले असते आणि स्तब्ध राहिलो असतो. पण माझी पूर्ण खात्री आहे आणि अशी आशाही आहे की मी माझ्या देशबांधवां-पैकी एक दोघांना तरी माझ्या मताकडे वळवीन आणि ते शक्यच झाले नाही तरी आतापर्यंत ते विचार करीत आले आहेत त्यापेक्षा अधिक खोल विचार करायला प्रवृत्त करीन.

मला हे पण ठाऊक आहे की आपल्या मताशी सहमत नसणारा माणूस ज्यांना आवडत नाही आणि ह्या निरीश शास्त्रसंस्थेमुळे जे मोडून गेले आहेत अशा सज्जन लोकांचे पित्त माझ्यामुळे खवळले काय? " ते म्हणतील, "तुम्ही देशभक्त असण्याचा आव आणावा आणि

देशभक्तीवाचून ज्यांच्या जिवनाला अर्थ नाही आणि देशप्रेमाचे जे सुगंधी फुलोरा, मूर्धन्य शिखर आणि आदर्श आहेत अशा देशभक्त लोकांवर अतिशय क्षुद्रपणाने टीका करता किती दुष्ट विसंगती आहे ही ? खरोखर आपण नवभारताचे स्नेही आहात तर आमची ही सुंदर एकता मोडण्याचा आपण कां प्रयत्न करता ? राष्ट्रीय सभा अद्याप दहा वर्षाचीपण झाली नाही आणि एवढ्या अल्पावधीत तिने किती आश्चर्यकारक प्रगती केली आहे. आणि जरी तिच्यात काही दोष असले-कितीही उत्कृष्ट संस्था असली तरी तिच्यात दोष असतातच–तरी भर राज-रस्त्यावर त्या आमच्या दोषांचे प्रकटन करण्यासारखे आणि त्या आमच्या रहस्यात शत्रूचा शिरकाव करून देण्यासारखे काही संयुक्तिक कारण आहे काय ? पण जर मी स्वत: बलवान आणि स्वावलंबी मनुष्य असतो तर ह्या कुरकुरणाऱ्यांकडे दुर्लक्ष करून मी निश्चितच माझ्या मार्गाने गेलो असतो. पण मी अतिशय भावनाविवश असल्यामुळे आणि इतराना दुखावण्याच्या भीतीमुळे मी ब्रिटीश शासनसंस्थेची स्तुती करणाऱ्यांबरोबर पण मी राहू इच्छितो म्हणून राष्ट्रीय सभेबाबत सर्व विचारी सुज्ञानी जी वृत्ती धारण करावी असे मला वाटते तिचे मी इथे विस्तृतपणे विवेचन करणे आवश्यक मानतो.

प्रथमत: मी हे स्पष्ट करू इच्छितो की मनाविरुद्ध जो युक्तिवाद होईल त्यामुळे मी मुळीसुद्धा विचलीत होत नाही. असे विधान करता येईल की राष्ट्रीय सभेने आश्चर्यकारक प्रगती केली आहे म्हणून कृतज्ञताबुद्धीने तिच्या विरुद्ध कोणतीही कडक आणि अपायकारक टीका करू नये. क्षणभर आपण गृहीत धरू की राष्ट्रीय सभेने आश्चर्यकारक प्रगती केली आहे. निश्चितच जर तिने हे केले असेल तर आपण निरंतर कृतज्ञताबुद्धीने तिचे स्मरण ठेवलेच पाहिजे. पण त्यापलिकडे जर आपली कृतज्ञता गेली तर मात्र अवास्तवाचा दोष पदरी येईल. व्यक्ती आणि संस्था ह्यांमध्ये हा फरक आहे. एकाद्या व्यक्तीने आपल्या देशासाठी उत्तम कार्य केले असेल तर त्याच्याबद्दल आदरभाव निश्चितच असतो आणि जर उत्तरायुष्यात त्याच्याकडून काही चुका घडल्या तरी महान आणि उदारहृदयी नसलेले राष्ट्र कधीच महान म्हटले जाणार नाही. त्याला त्याच्या हृदयसिंहासनावरून पदच्युत करण्यासाठी आपले हात पुढे करणार नाही. पण संस्था ही मुळात भिन्न वस्तू आहे. मानवानी तिची पूजा करावी ह्या हेतूने नव्हे तर ती त्याला उपयोगी पडावी म्हणून निर्माण केलेली असते आणि जोपर्यंत तिची कृत्ये ही भूतकालीन स्मृती नव्हे तर वर्तमानकालीन वस्तुस्थिती असतील तोपर्यंतच तिच्याबद्दल आदर असतो. एकाद्या संस्थेला दैवी स्थानावर बसवणे आम्हाला परवडणारे नाही. असे करणे म्हणजे केवळ आपण आपल्याच यंत्रणेचे गुलाम बनण्यासारखे आहे. तरीपण मला एकदम कबूल करणे भाग आहे की जर एकाद्या संस्थेने आमच्यासाठी आश्चर्यकारक प्रगती केली असेल आणि हे चमत्कार म्हणजे केवळ हातचलाखी नव्हे तर राष्ट्रासाठी सखोल आणि गंभीर आशय असेल आणि अजूनही ती संस्था तसेच करीत असेल आणि ह्यापुढेही आम्हासाठी काही चमत्कार करणार असेल तर मात्र नि:संशय तिला टीकेपासून संरक्षण मिळण्याचा तिचा हक्क आहे. पण राष्ट्रीय सभेबाबत हे सत्य आहे असे मान्य करण्याची माझी मनोधारणा नाही.

ह्या संस्थेला किती अंधुकपणाने आपण प्रतिष्ठा प्राप्त करून दिली, उत्साहाची लाट किती विस्मयकारक होती आणि विरोध करणाऱ्या झंझावाताविरुद्ध जे होते ते आपणांपैकी पुष्कळांच्या स्मरणात आहे. हे सर्व इतक्या आकस्मिकपणे घडले की एकाद्या बलवान माणसालापण आपले डोके तळहातावर ठेवून ओरडणाऱ्या समुदायात सामील न होणे दुष्कर, मी तर म्हणेन अशक्यच होते. त्या उषःकालीन आशांची उत्कटता, त्या आश्चर्यकारक उत्साहाची वासंतिक शोभा वर्णन करण्यास समुचित शब्द आपणास कसे मिळतील ? राष्ट्रीय सभा ही आपणा सर्वांची प्रियतम, उच्चतम आणि पवित्रतम होती, सहारापेक्षाहि रुक्ष वाळवंटात ती जिवंत पाण्याची विहीर होती, तो स्वातंत्र्य लढ्यातील अभिमानास्पद ध्वज होता, जेथे सर्व वंश एकत्र येतात आणि विसरून जातात असे सामंजस्याचे पवित्र मंदीर होते, ती आपणातील नूतन विचासरणीचा केन्द्र-बिन्दु होती किंवा अर्क होता. आणि जर ती वस्तुतः होती त्यापेक्षा आपण अधिक मानली असेल, जर आपण तिला दिवसा मेघस्तंभ आणि रात्री अग्निस्तंभ मानले असेल. जर आपण तिची स्वातंत्र्याचा उगवता तारा म्हणून पूजा केली असेल, पूर्वीच्या दंत-कथातील जेरिकोला हालवणाऱ्या तुतारीप्रमाणे मानले असेल, सर्व दुःख दूर करणाऱ्या जादूच्या सर्पाप्रमाणे मानले असेल आणि राष्ट्रीय सभा हे सर्व करील, नव्हे ह्याहून ही अधिक करील अशा लडिवाळ आणि सुप्त आशा पोसल्या असतील तर तो आपला व्यामोह अनैसर्गिक आणि गृहीतकृत्य म्हणून निंदण्याऐवजी त्या परिस्थितीत तो अपरिहार्य होता असे मानून त्याला बाजूला सारणे हेच योग्य आहे.

आणि म्हणून जर मला कोणी सांगितले की राष्ट्रीय सभा हाच एक चमत्कार आहे तर अन्य काही नसले तरी आपणा सर्वांच्या उत्साहाचा तो केन्द्रबिन्दु होता, तर मला नाही वाटत मी त्याच्याशी सहमत होण्याचे कष्ट घेईन. पण जर तो पुढे जाऊन म्हणाला की राष्ट्रीय सभेने निश्चितच चमत्कार केला आहे तर त्या विधानाची सत्यता नाकारण्याचे स्वातंत्र्य मला खासच असेल. मला वाटते की तिची लक्षणीय यशे हे चमत्कार नसून तिच्या घटनेचे आणि धोरणाचे ते नैसर्गिक परिणाम आहेत. माझी अशी धारणा आहे की प्रत्यक्ष राजकीय क्षेत्रातील तिचे सर्वोच्च यश विधिमंडळाच्या विस्तारात आहे. असो, तसे म्हटले तर तो कदाचित् तसा चमत्कार असेलही. एका टोपीखाली एक आंगठी ठेवावयाची आणि तशीच दिसणारी अगदी हुबेहुब तीच (तिच्यावरील अक्षरांखेरीज) दुसरी आंगठी खोलीच्या दुसऱ्या भागात काढावयाची हा इंग्लंडमधला मखलाशीचा खेळ आहे. अगदी तशाच प्रकारचा चमत्कार राष्ट्रीय सभेने मोठ्या यशस्वीपणे सिद्ध केला आहे. दुसरी भुलवणारी मखलाशी-हवेतर अधिक चतुराईची म्हणा-पण ती म्हणजे एकसमयी परीक्षांबद्दलचे प्रकट मतदान! पार्लमेंटच्या काही सभासदांच्या भावनाशीलतेमुळे तर इतर काहींच्या आत्मकेंद्रियतेमुळे तर इतरांच्या निष्काळजीपणामुळे, ते यशस्वी झाले. पण त्यांच्या चतुराईबद्दल आपण त्यांची कितीही स्तुती केली तरी पण पुढे मी दाखवू इच्छितो त्याप्रमाणे त्या केवळ त्यांच्या चतुर खेळी असून नवराष्ट्राच्या दृष्टीने त्यामध्ये सखोल आणि गंभीर आशय काहीही नाही. आपल्या बाकीच्या

राजकीय खेळीबाबत एकच मृत्युलेख लिहावा लागेल व तो म्हणजे '' अपयश ''. अन्य राजकीय विचारवंताचा उत्साहाचा जो पहिला उद्रेक होता तो पण राष्ट्रीय सभेबाबत पुरेसे आकलन न झाल्यामुळे काहीसा विषादमिश्रितच होता. जिला आदराने '' वृद्ध महिला '' म्हणून म्हटले जाते त्या सम्राज्ञी राणीबद्दल अल्पही भारतीयाना ज्ञान असण्याचा किंवा चिंता करण्याची सुतराम आवश्यकता नाही. आपल्या उत्साहाचे दांभिक प्रकटीकरण हे काही लाभदायक ठरण्याऐवजी आमच्या द्वेषाच्या बाहुल्याना मात्र कारणीभूत झाले. ब्रिटीश राज्याच्या वरदानाबाबत खरे म्हणजे उगाच अवास्तव बोलले गेले आणि आश्चर्य हे की दारुण नियतीने आम्हास न्यायी आणि हितकारी इंग्लंडच्या मातृह्रदयाशी-खरे तर सापत्नमातृह्रदयाशी-आणून ठेवले आहे. राष्ट्रीय सभेची सर्वसाधारण भीती, कठीण कामाबद्दलच्या तिच्या टिपणी, स्पष्ट आणि सत्य सांगण्याबद्दलची तिची नाखुशी, आणि आमच्या प्रभूना जबरदस्त दुखावण्याची आशंका हे सर्व ह्याहूनही दु:खदायक होते. परंतु त्यावेळच्या परिस्थितीत ते आपले लाडके अवगुण होते जे काळान्तराने नष्ट होणार होते. केवळ नैसर्गिक आणि उपेक्षित म्हणून आपण आणखी दोन ढोबळ दोष क्षम्य मानले. आपण श्री. ग्लॅडस्टनसारख्या केवळ तत्त्वविहीनच नव्हे तर ज्याच्यावर कधीही विश्वास ठेवता येत नाही आणि ज्याचे चर्चेतील सहभागित्व नेहमीच आपल्या कामाला अशुभकारक ठरते अशा राजकारण्याची कारण नसता प्रशंसा केली. पण जे लोक कधीही इंग्लंडला गेलेले नाहीत त्यांना अशा धूर्त आणि मधुरभाषी राजकारण्याबद्दल कसे मत बनविता येईल असा युक्तिवाद आम्ही तेव्हा केला. आपण श्री. ग्लॅडस्टनची अवाजवी प्रशंसा केलीच पण खरे म्हणजे आपण, ज्या '' जनरल '' बूथने मध्यमवर्गी इंग्रज माणसांच्या भावभावनांचा व्यापार करून माया जमविली होती आणि जो तीचा अपहर्ता आणि अपराधी तोंडपुज्या होता त्याचीपण शोभादायक स्तुती केली. पण इथेही आपण असा विचार केला की संपत्ती आणि सद्‌गुण ह्यांची गल्लत करण्याची नेहमी चूक राष्ट्रीय सभेने केली असणार व '' जनरल '' म्हणजे खरोखर सज्जन माणूस असे मानले असेल. पहिल्या उत्साहाच्या भरात, मी म्हणतो की, अशा सवयी आणि अशी सहनशीलता ही शक्य आहे, नव्हे नैसर्गिकपण आहे. ज्या क्षणी तो मोह दूर झाला त्यानंतर त्यापुढे तरी आपण आपली अशी स्तुती करणे हे सहन होणारे नाही. पण आपले लाडके अवगुण जे आपण हळवेपणाने दुर्लक्षित केले होते ते कालगतीने वाहून जातील असे समजलो होतो. ते तर गेले नाहीतच पण आता त्यांचे दृढ सवयीमध्ये परिवर्तन झाले आहे. आणि अधीक ढोबळ चुका करण्याची प्रवृत्तीची सवयीमध्ये नव्हे तर धोरणामध्ये वाढ झाली आहे. अधीक विशाल दृष्टीने राष्ट्रीय सभेचे अपयश अधीक स्पष्ट आहे, आंग्लभारतीय जेरिकोची भिंत अद्यापही अभंग उभी आहे आणि अतीव दारिद्र्याचे काळेकुट्ट भूत ह्या भूमीवरील आपला पगडा अधिकाधिक बसवीत आहे आणि अधिक विस्तार करीत आहे.

**इंदुप्रकाश, ७ ऑगस्ट १८९३.**

● ● ●

## २ तेजस्वी प्रकाशाकडे . . . . . . २

२८-८-९३

**राष्ट्रीय सभेच्या कार्याचे विवेचन सडेतोडपणे करताना श्रीअरविंद म्हणतात राष्ट्रीय सभा ही राष्ट्रीय नाही आणि राष्ट्रीय होण्याचा तिने कोणताही प्रयत्न केला नाही. तुमची इच्छा असेल तर राष्ट्रीय सभा ही राष्ट्रीय आहे असे म्हणा हवे तर पण ती सर्वजनमान्य संस्था नाही आणि सर्वसामान्य संस्था होण्याचा तिने कधी प्रयत्न पण केला नाही.**

" तुम्ही तोलले जात आहात आणि तुमच्यात खोट आहे असे आढळले आहे. "

" जेव्हा आपण पुढे पाहतो आणि अद्याप किती करावयाचे आहे हे लक्षात येते तेव्हा आपण जे अल्पस्वल्प केले आहे ते किती नगण्य आहे ह्याची जाणीव होते."

माझ्या देशबांधवांच्या पूर्वग्रहांवर सरळ धडक मारण्याचा माझा कल नसल्यामुळे मी अद्यापपर्यंत त्याच त्या वर्तुळात फिरत होतो. परंतु माझा विषय आणखी आत्मीयतेने आणि दृढ निष्ठेने हाताळणे मला भाग पडत असल्यामुळे, माझा असा विचारपूर्वक निश्चय झाला आहे की कोणीतरी आता स्पष्ट बोलणे भाग आहे. ह्या भावनेनेच हे पुढे चालू ठेवण्यास उद्युक्त केले आहे. राष्ट्रीय सभेच्या अपूर्णतेचा आरोप ज्या भूमिकेवरून मी करीत आहे तिचे प्रथमतः च स्पष्ट विवरण करणे भाग आहे. या प्रक्रियेमध्ये मला अनेक गोष्टी स्पष्टपणे सांगणे भाग पडणार आहे आणि त्यामुळे माझी निंदानालस्ती होणे अपरिहार्य आहे. मला असंभाव्य गोष्टींचा परिस्फोट करावा लागेल; अनेक अस्वीकार्य कल्पना पुढे मांडाव्या लागतील, आणि सर्वात वाईट गोष्ट म्हणजे ज्यांना निष्कलंक स्तुती आणि पुजा ह्यांच्याद्वारे भरवले जाते अशा अनेक प्रभावी व्यक्तींची कृष्णकृत्ये चव्हाट्यावर मांडणे भाग पडेल. पण कुठलाही धोका पत्करून हे केलेच पाहिजे आणि ज्याअर्थी ही निवड माझ्यावर येऊन पडली आहे त्याअर्थी माझ्या आवाक्यातील उत्कृष्ट प्रकारे आणि शक्य त्या धैर्याने मी माझ्या कामात पुढे जाणार आहे. मी राष्ट्रीय सभेबद्दल बोलत आहे ते असे की तिचे उद्देश चुकीचे आहेत, त्या उद्देशांच्या पूर्तीसाठी ज्या भावनेने ते पुढे जात आहेत ती प्रामाणिकपणाची आणि संपूर्ण अंतःकरणपूर्वक नाही, तिने स्विकारलेले हे मार्ग समुचित नाहीत आणि ज्या पुढाऱ्यांवर ती विश्वास ठेवते ते पुढारी होण्यास सुपात्र नाहीत. थोडक्यात म्हणजे सध्या आपण सर्व आंधळे आहोत आणि संपूर्ण अंध नाही तरी एकाक्ष व्यक्तीकडून आपण नेले जात आहोत.

प्रारंभ करायचा तर थोड्याच वेळापूर्वी मला विधान करण्यास कोणतीही शंका वाटली नाही की राष्ट्रीय सभा ही राष्ट्रीय नाही आणि राष्ट्रीय होण्याचा तिने कोणताही प्रयत्न केला नाही. पण ते विधान मी श्री. फिरोजशहा मेहतांच्या व्याख्यानाचा विद्यार्थी होण्यापूर्वीचे होते. आता ह्या अतिजटील प्रश्नाबद्दल म्हणायचे तर एकाद्याला ज्वलंत अंगारांवर चालावे लागेल

आणि अत्यंत काळजीपूर्वक आणि सर्वबाजूनी विचार करताना मी कोणाचीही तमा बाळगणार नाही. वादविवादाच्या इतक्या जाड थराखाली हा विषय गाडला गेला आहे आणि त्याविषयी सूक्ष्म भेद काढण्यासाठी इतकी विधिविषयक चातुरी योजिली गेली आहे की जो शब्द पूर्णतः सरळ आणि सोपा होता तो आज कायद्याइतकाच जवळजवळ कठीण झाला आहे. म्हणून ही राष्ट्रीय सभा खरोखर राष्ट्रीय नाही असे जेव्हा मी म्हणतो तेव्हा माझा आशय काय आहे हे स्पष्ट करण्याचे उत्तरदायित्व मजवर निश्चितच आहे. हिन्दू आणि मुसलमान ह्या परवलीच्या शब्दांबद्दल आंग्ल-भारतीय विधान पुन्हा उभारण्याची माझी मुळीच इच्छा नाही. इतर परवलीच्या शब्दांप्रमाणे त्यांना आता मुळीच प्रभाव उरला नाही, आणि राष्ट्रीय सभेच्या धोरणामुळे त्यांचा अर्थ आता अधिकाधिक हिरावला जात आहे. कोणत्याही समंजस समाजाला आवडेल इतक्या मोठ्या प्रमाणावर मुसलमानाना त्या संस्थेवर प्रतिनिधित्व मिळाले आहे आणि त्यांच्या कार्यक्षमतेबाबत अतिशय दक्षतेने आणि ती सत्य असल्याबद्दल तिच्याविषयी आदर दाखविला जात आहे. तेव्हा ते आंग्ल-भारतीय पालुपद उच्चारणे व्यर्थ आहे पण मी निदान इतकी तरी कल्पना करू शकतो की ज्या युगात आमच्या जिभांवरून लोकशाही आणि तत्सम मोठाले शब्द सहजपणे निसटतात तेव्हा राष्ट्रीय सभेसारख्या संस्थेला प्रामाणिकपणे राष्ट्रीय म्हणणे अशक्य आहे, कारण ती सर्वसामान्यांच्या समुदायाचे प्रतिनिधित्व करीत नसून केवळ एकाच आणि मर्यादित लोकसमूहाचे प्रतिनिधित्व करीत आहे. लोकसभा (हाऊस ऑफ कॉमन्स) ही इंग्लीश राष्ट्रांचे प्रतिनिधित्व करीत नसून केवळ इंग्लीश उच्चभ्रूवर्ग आणि मध्यम वर्गाचेच प्रतिनिधित्व करीत आहे आणि तरी ती राष्ट्रीय आहे हे सत्य आहे. पण लोकसभा ही कायद्याने सुस्थापित झालेली आणि संपूर्ण राष्ट्रासाठी बोलण्यास आणि कार्य करण्यास अधिकारित केलेली संस्था आहे. परंतु राष्ट्रीय सभा ही स्वयंनिर्मित असून केवळ एकाच आणि मर्यादित वर्गाचे प्रतिनिधित्व करीत आहे म्हणून तिला राष्ट्रीय म्हणणे न्याय्य होणार नाही. सर्वप्रकारच्या आणि सर्व स्तरांवरील लोकाना प्रवेश असतो म्हणून उदारमतवादी पक्षाने आपल्या वार्षिक सभेला इंग्लिश राष्ट्रीय सभा म्हणण्याइतके ते विक्षीप्त आहे. म्हणून जेव्हा राष्ट्रीय सभा ही राष्ट्रीय नाही असे मी म्हणतो तेव्हा माझे म्हणणे इतकेच की ती बहुसमाजाची प्रतिनिधी नाही.

परंतु श्री. फिरोजशहा मेहता ह्याना ह्या अर्थाविषयी काही कर्तव्य नाही. त्यांच्या कलकत्ता येथील लक्षणीय आणि उद्‌बोधक अध्यक्षीय भाषणात त्यानी असा युक्तीवाद केला की जरी सामान्यजनांचा पाठिंबा नसला तरी राष्ट्रीय सभेला हे बिरुद अधिकाराने मिरवता येईल. आणि एकाद्या अनुभवी वकिलाच्या अतिशय सूक्ष्मपणाला धरुन त्यानी आपल्या विधानाचे विवरण केले. '' बहुजनाना अद्याप आपल्या निश्चित राजकीय मागण्या बोलून दाखवता येत नाहीत म्हणून त्यांच्या सुशिक्षित आणि प्रबुद्ध देशबांधवांवर हे कार्य आणि कर्तव्य येऊन पडले आहे की त्यानी ह्या बहुजनांच्या तक्रारी आणि गरजा समजावून घेऊन त्याना विशद करावे आणि त्या कशा दूर करता येतील आणि त्यांचे समाधान करता येईल ते त्यानी सुचवावे आणि दाखवावे.

तसे पाहिले तर त्यातील भयानक वाक्य श्री. मेहता ह्यांच्या विशिष्ट शैलीला धरून आहे. ते त्यांच्या वक्तृत्वातील गुह्य प्रकट करते आणि अन्य इतर मोठ्या शोधाप्रमाणे अतिशय सोपे आहे ते म्हणजे तीच गोष्ट निराळ्या शब्दात पुन्हा पुन्हा सांगायची. त्यातील गर्भितार्थही लक्षणीय बाब आहे आणि ती ही की राष्ट्रीय सभा हे कर्तव्य पार पाडण्याचा आव आणते आणि राष्ट्रीय म्हणविण्याचा तिला न्याय्य हक्क आहे. पण हे येथेच संपले नाही. ज्या श्री. मनमोहन घोषानी श्री. मेहतांच्या कल्पनेची द्विरुक्ती आणि विवरण केले त्यांच्या रूपाने कलकत्ता हे मुंबईच्या मदतीस आल्याचे दिसते. राष्ट्रीय सभेच्या बहुजनांच्या वतीने बोलण्याच्या हक्काचे समर्थन करताना ते म्हणतात की राष्ट्रीय सभा ही विचारवंत भारतीयांची प्रातिनिधीक संस्था असून अज्ञजनाना मार्गदर्शन करणे हे तिचे कर्तव्य आहे. आणि म्हणून राष्ट्रीय सभेला राष्ट्रीय म्हणवून घेण्याचा पुरेसा अधिकार आहे असे त्यांचे मत आहे. अन्यथा जो एक यशस्वी बॅरीस्टर आणि नागरिक, ज्याला प्रत्येक भारतीय पदवीधराने सम्मान दिला आणि विशेष म्हणजे जो व्हाईसरायच्या कौन्सिलाचा भावी सभासद आहे अशा व्यक्तीपासून मतभिन्नता प्रदर्शित करणे माझ्यासारख्या भीरू व्यक्तीला कधीच इतके सोपे झाले नसते. परंतु जेव्हा श्री. मनमोहन घोष सारखे आदरणीय आणि वजनदार नागरिक त्याना पुष्टी देतात तेव्हा ते माझ्या सहनशक्ती पलिकडचे आहे. म्हणून मी ती अभद्रवाणी बदलतो आणि म्हणतो की तुमची इच्छाच असेल तर राष्ट्रीय सभा ही राष्ट्रीय आहे असे म्हणा हवे तर पण ती सर्वजनमान्य संस्था नाही आणि सर्वसामान्य संस्था होण्याचा तिने कधीही प्रयत्न पण केला नाही.

पण त्याक्षणी कोणी एक श्री. फिरोजशहा मेहता ह्यांच्याइतका विद्वान नसलेला माणूस मध्येच प्रश्न विचारील की राष्ट्रीय सभा ही बहूजनमान्य संस्था नाही हे कसे सत्य असू शकेल ? मी ह्यापूर्वीच केलेल्या " राष्ट्रीय सभा ही लोकसंख्येमधील लोकसमूहाची प्रतिनिधी नसून ती एकाच आणि मर्यादित समूहाचे प्रतिनिधीत्व करते " ह्या विधानाकडे त्यांचे लक्ष वेधू इच्छितो. राष्ट्रीय सभेने आपण खरोखर लोकसंख्येतील लोकसमुदायाचे प्रतिनिधी आहोत असा विश्वास ठेवण्याचा प्रारंभी फार प्रयत्न केला हे निःसंशय, पण आतापर्यंत त्या दाव्याचा त्यानी परित्याग केला नसला तरी आता मला तो सर्वथैव अयोग्य आहे म्हणून टाळलाच पाहिजे. आणि खरोखर जेव्हा श्री. फिरोजशहा मेहता आणि श्री. मनमोहन घोष ह्यानी ही वस्तुस्थिती मान्य केली आहे, केवळ संस्थेचे प्रतिनेधी म्हणून नव्हे तर राष्ट्रीय सभेचे पदाधिकारी म्हणून, आणि पुढे जाऊन वस्तुस्थिती स्वतःच विषद केली आहे, तेव्हा त्या असत्य विधानाशी सामना करण्याचे मला काही कारणच उरले नाही. पण प्रश्नकर्त्याचे एवढ्याने कदाचित समाधान झालेले नसेल आणि तो विचारील की राष्ट्रीय सभा ज्यांचे प्रतिनिधित्व करते असे आपण म्हणता तो कोणता एकच आणि मर्यादित वर्ग ? तेव्हा ह्या ठिकाणी राष्ट्रीय सभेच्या पुढाऱ्यांच्या विशेषतः ज्यांच्या भाषणांचे आता मी अवतरण दिले आहे त्या बुद्धीवान व्यक्तीच्या भाषणांचे संदर्भ देणे हे अधिक उपकारक ठरेल. श्री. मनमोहन घोष हा प्रश्न

स्वतःच विचारतात आणि स्वतःच त्याचे उत्तर देतात, की राष्ट्रीय सभा ही भारतीय जनतेतील विचारवंत गटाचे प्रतिनिधित्व करते. ते म्हणतात, " आज इथे उपस्थित असलेले प्रतिनिधी हे जे विचार करावयास शिकले आहेत अशा भारतीय जनसंख्येच्या गटातील निवडक प्रतिनिधी असून त्यांची संख्या दिवसेंदिवस विलक्षण वेगाने वाढत आहे." कदाचित " विचारवंत " ह्या शब्दाचा वापर श्री. घोष ह्यानी अधिक विनयाने केला असेल. मनुष्यजात ही सामान्यतः आपल्या प्रेरणांच्या आणि मत्सराच्या इतक्या आहारी गेली आहे की दहा हजारातील एकाद्यालाच " बुद्धिवान " म्हणतात त्याला प्रतिष्ठा देण्यास आपण चाचरतो, पण विचारवंत गट ह्या शब्दसमूहाने श्री. घोष ज्या गटाचे आहेत त्याचाच निर्देश ते करीत असावेत असे स्पष्ट दिसते. म्हणजे असे की, आपण ज्याना इंग्रजी राजकारणाच्या यंत्रणेची थोडीशी कल्पना आहे आणि जे ती यंत्रणा येथे आणण्यास उत्सूक आहेत आणि त्याच वेळी इकडच्या मूळच्या कापडधंद्याला मारून लिव्हरपूलचे रद्दड कापड आणि टाकावू लोकरीचे कपडे तसेच अन्य उपयोगी आवश्यक वस्तू आणण्यासही उतावीळ आहेत, जर त्यांच्या म्हणण्याचा हाच सत्य मथितार्थ असेल तर ते म्हणतात ते पूर्ण सत्य आहे आणि हे सर्व सत्य आहे याचे कारण राष्ट्रीय सभेची उत्पत्ती, तिचे पोषण आणि तिचे उत्साही कार्यकर्ते त्याच वर्गातून आले आहेत, आणि मला जर ह्या वर्गाचे एका शब्दात वर्णन करावयास सांगितले तर मुळीच हयगय न करता मी सांगेन की, " तो आमचा नवा मध्यम वर्ग. त्या ठिकाणी इंग्लीश वस्तूनी आमच्या मूळच्या वस्तूंची बाजारातून हाकलपट्टी केली आहे, आमच्या समाजाने पूर्वीच्या लक्षणीय वस्तूना बहिष्कृत केले आहे आणि इंग्लीश धर्तीवर त्याना बाजारातून घालवून दिले आहे. आपण आयात केलेल्या नव्या कोऱ्या वस्तूमध्ये अकल्पितपणे पत्रकार, बॅरिस्टर्स, डॉक्टर्स, अधिकारी, पदवीधर आणि व्यापारी अशाच मंडळींचा भरणा असून तो ब्रिटिश शासनाच्या संरक्षणासाठी अतिप्रचंड वेगाने वाढत आहे. ह्याच वर्गाला मी मध्यम वर्ग असे म्हणतो. कारण जेव्हा आपण आयात केलेल्या इंग्लीश वस्तूंबद्दल एवढा अभिमान बाळगतो तेव्हा त्याना नावचिठ्ठ्या लावण्यासाठी इंग्लीश नावांची आयात न करणे हे विक्षिप्तच ठरेल. शिवाय मी निवडलेले नाव, आमचा असीतगर्व आणि आत्मवंचनांचे प्रदर्शन करणाऱ्या ' विचारवंत ' आणि ' सुशिक्षित वर्ग ' ह्या नामभिधानापेक्षा अधिक सुयोग्य वर्णन होईल. कारण राष्ट्रीय सभेच्या सर्वव्यापी प्रभावाबद्दल आम्ही कितीही पोकळ शब्दभांडार वापरण्याचे ठरविले तरीपण कुणालाही चुकूनसुद्धा शंका येणार नाही की ह्याच गटाकडून राष्ट्रीय सभेला बळ मिळत आहे, त्यामध्ये एक समूह सुखवस्तू लोकांचा आहे, व त्याहूनही लहान गट धनाढ्य लोकांचा आहे. परंतु मोठ्या मध्यम वर्ग इंजनाची ती केवळ शोभेची चाके आहेत. ज्याप्रमाणे ॲंग्लोइंडियन्सनी असा हेका धरला होता की ते फक्त बंगाली बाबूंचेच प्रतिनिधित्व करतात त्याप्रमाणे भोळ्या देवपूजकांनी आपल्या तार स्वराने खुशाल बोलावे की राष्ट्रीय सभा ही सर्व प्रकारच्या आणि स्तरावरच्या लोकांची प्रतिनिधी आहे. अँग्लोइंडियन्ससाठी परिस्थिती फारच प्रभावी आहे आणि भोळ्या देवपूजकांमुळे त्या अधिक प्रभावी होतील. दोन्ही पक्षाना स्वच्छ आणि

अपरिवर्तनीय सत्य काही बदलता येणार नाही. मुंबईतील गोंधळाच्या फार पूर्वी हे शब्द कागदावर लिहिले गेले होते आणि त्यावेळी मी यावरच उच्चारलेली भविष्यवाणी इतक्या अचूक आणि परिणामकारक रितीने पुष्टीभूत होईल ह्याची यत्किंचित शंकासुद्धा नव्हती. वस्तुस्थितीच अतिशय स्पष्ट आणि बिनचूक आवाजाने बोलू लागली आहे. परस्पर प्रशंसेच्या ह्या मेजवानीत राष्ट्रीय सभा एकाद्या निष्काळजी बेल्सझारप्रमाणे किती वेळ बसून राहणार आहे ? आधीच निर्णय तिच्याविरुद्ध लागला आहे, अंधूक दिसणाऱ्या शेळ्यांना आता स्वच्छ दिसू लागले आहे. भिंतीवर हस्ताक्षरात लिहिलेला अर्थगर्भ वाक्यप्रयोग, तो रक्ताने लिहूनच त्याचा प्रारंभ झाला नाही काय ? "देवाने राज्याचे दिवस संपवले आहेत आणि ते संपले आहे " निश्चितच अशा प्राकृत पाठानंतर आम्ही आमचे डोळे उघडण्यासाठी थांबणार नाही की कानांनी ऐकण्याचे थांबवणार नाही. जोपर्यंत ते अदृश्य बोट दुसरे आणि अधिक निश्चित वाक्य लिहिणार नाही," तराजूत तुम्ही तोलले जात आहात आणि तुमच्या वजनात खोट आहे, " की आपण हात जोडून आळशासारखे स्वस्थ बसून राहणार आहोत आणि कृपेचा तो क्षण निघून गेल्यानंतर आणि राज्य आमच्यापेक्षा अधिक लायक व्यक्तीला दिल्यानंतर हालचाल करणार आहोत.

**इंदुप्रकाश, २८ ऑगस्ट, १८९३.**

● ● ●

## ३ भवानी मंदीर

**भवानी मंदीर या संकल्पनेचे जे विस्तृत विवेचन श्रीअरविंद ह्यानी सादर केले आहे ते केवळ भवानी मातेचे मंदीर नसून राष्ट्रमंदीर आहे. भवानी मंदीर निर्माण करण्याची योजना श्रीअरविंद ह्यानी राष्ट्रमतचे संपादक हरीभाऊ मोडक व वसईचे वकील काकासाहेब पाटील ह्यांच्यापुढे मांडली होती. बंगालच्या विभाजनामुळे परिस्थितीने वेग घेतला व भवानी मंदीराची संकल्पना अमूर्तच राहिली. परंतु त्यातील विचार आजही मार्गदर्शक ठरतील.**

# भवानी मंदीर

ॐ नमः चण्डिकायै ।

दूर डोंगरदरीत माता भवानीचे एक मंदीर उभारावयाचे आणि तेथे प्राणप्रतिष्ठा करावयाची आहे. ह्या पवित्र कार्यात सहाय्य करण्यासाठी मातेच्या सर्व भक्ताना आवाहन करण्यात येत आहे. भवानी माता कोण आहे ? आणि तिच्यासाठी एक मंदीर का उभारावयाचे ?

**भवानी म्हणजे अमेय ऊर्जा–**

जगताच्या अनंत फेऱ्यांमध्ये शाश्वताचे चक्र त्याच्या नित्यक्रमामध्ये प्रचंड वेगाने फिरते तेव्हा शाश्वतामधून अमेय शक्ती बाहेर पडते आणि चक्राला गती देते आणि आपल्या विविध पैलूंमध्ये आणि अनंत आकारामध्ये मानवासमोर उभी राहते. प्रत्येक पैलू निर्मिती करतो आणि एक युग निर्माण करतो. कधी ती शक्ती प्रेम असते तर कधी ज्ञान असते, केव्हा ती त्याग असते तर कधी ती दयाही असते. ही अनंत शक्ती म्हणजे भवानी. अनंत ऊर्जा म्हणजेच दुर्गा, तीच काली, तीच प्रेमळ राधा, तीच लक्ष्मी, तीच आपली आई आणि सर्वांची निर्माती.

**भवानी म्हणजे शक्ती–**

ह्या युगात ही माता बलाची माता म्हणून व्यक्त आहे. ती केवळ शक्ती आहे. ह्या सर्व जगात शक्तीच्या रूपाने माता पूर्णता भरून राहिली आहे.–

आपण आपले डोळे उघडून भोवतालच्या जगाकडे पाहू या. जेथे जेथे आपली दृष्टी जाते तेथे तेथे आपल्या डोळ्यासमोर शक्तीचे प्रचंड उसळलेले ढीग, उदंड, वेगवान आणि अनम्य बळे, शक्तीची अतिभव्य आकृती, बळांचे प्रचंड विध्वंसक स्तंभ दिसतात. सर्वच अतिप्रवळ आणि विशाल होत आहे. इतिहासाला अद्यापपर्यंत ज्ञात असलेल्यापेक्षा युद्धशक्ती, धनशक्ती आणि विज्ञानशक्ती दहापट अधिक बलवान आणि भव्य; शंभरपट अधिक भयंकर, वेगवान आणि आपल्या कामामध्ये व्यग्र; मूलभूत शस्त्रे आणि उपकरणे ह्यात हजारपट

वाढलेल्या आहेत. सर्वत्र माता कार्यरत आहे. तिच्या प्रबळ आणि आकारदायी हातामधून राक्षसांचे, असुरांचें आणि देवांचे अजस्त्र आकार ह्या जगाच्या आखाड्यात उड्या घेत आहेत. पश्चिमेकडे काही प्रबळ साम्राज्याचा संथपणे उदय झालेला आपण पाहिला आहे आणि जपानच्या जीवनातील अदम्य प्रभावशाली मर्यादा पण आपण पाहिल्या आहेत. तमोगुणाने किंवा रजोगुणाने काळ्या किंवा रक्त लाल असलेल्या काही बलवान म्लेच्छशक्ती आहेत, तर संन्याशाच्या शुद्ध ज्वालेने तेजाळलेल्या आणि स्वार्थत्यागाचा उद्घोष करणाऱ्या काही कार्यशक्ती आहेत. पण सर्व काही माताच ; तिच्या नवनव्या स्वरूपात पुन्हा आकार धरणारी आणि निर्मात्री माताच आहे. ती जीर्णामध्ये नवचैतन्य ओतीत आहे आणि नवजीवन मिरवीत आहे.

**आपण भारतीय शक्तीविना सर्वत्र अपयशी–**

परंतु भारतात श्वास अतिमंद आहे. दैवी प्रेरणेचे आगमन मंद आहे. भारत ही प्राचीन माता नवजीवनासाठी प्रयत्नशील आहे. चिंता आणि अश्रू ह्यांसह प्रयत्न करीत आहे, परंतु तिचा प्रयत्न व्यर्थ आहे. शेवटी ती इतकी विशाल आहे आणि प्रबळ आहे मग तिला कसल्या वेदना होत असतील ? आपल्यातच काहीतरी प्रचंड दोष असला पाहिजे आणि त्यावर नेमके बोट ठेवणे कठीण निश्चित नाही. आपणात इतर सर्व गोष्टी आहेत पण आपण शक्तीहीन आहोत. आपणात ऊर्जेची उणीव आहे. आपण शक्तीचा त्याग केला आहे आणि शक्तीने आपला त्याग केला आहे. आपल्या हृदयात, मेंदूत आणि बाहूत शक्ती राहिली नाही.

नवजीवनाची प्रचंड इच्छा आपणापाशी आहे. तेथे उणीव नाही. धर्म, समाज आणि राजकारण ह्यात किती प्रयत्न केले आहेत आपण, किती चळवळी आरंभिल्या आहेत, पण तेच दुर्दैव प्रभावी ठरले आहे, किंवा त्या सर्वावर मात करण्यास सिद्ध आहे. ते प्रयत्न क्षणभर जळतात आणि प्रेरणा क्षीण होते. वन्ही शांत होतो किंवा प्रयत्न टिकलेच तर ते रिकाम्या शिंपल्यासारखे, ज्यातून लक्ष निघून गेले आहेत असे आकार किंवा ज्यामध्ये तमाने आणि आलस्याने आपला प्रभाव टाकला आहे असेच. आपला प्रारंभ प्रभावी असतो पण त्याला ना परिणाम ना फळ.

आपण आता अन्य दिशेने प्रारंभ करीत आहोत. आपण महान औद्यागिक चळवळ उभी करीत आहोत. ज्यामुळे आमची गरीब भूमी श्रीमंत होईल आणि तिला नवजीवन प्राप्त होईल. आपण अनुभवाने शहाणे झालो नाही म्हणून एक अपरिहार्य गोष्ट केल्याशिवाय, आपण शक्ती मिळविल्याशिवाय इतरानी आचारलेल्या ह्या मार्गाने आपणास ही चळवळ पुढे नेता येणार नाही.

**शक्तीविना आपले ज्ञान मृत आहे–**

आपणात ज्ञानाची उणीव आहे काय ? ज्या देशात मानवाच्या प्रारंभापासून ज्ञान गोळा करून ते संचित केले आहे अशा देशात जन्म घेऊन आम्ही वाढलो असल्यामुळे हजारो वर्षांचे

ज्ञान आमच्यात अनुवंशिकतेने आलेच आहे. आमच्या ज्ञानाचे धुरंधर आजही त्या ज्ञानात भर घालीत आहेत. आमची कार्यक्षमता उणावली नाही, आमच्या बुद्धीची धार मंद किंवा बोथट झाली नाही, तिची ग्रहणक्षमता आणि लवचिकता पूर्वी इतक्याच बहुलक्षी आहेत, पण आमचे हे ज्ञान मृत आहे, आम्हाला वाकवणारे ओझे आहे, आम्हाला क्षीण करणारे विष आहे. आमच्या पायाना आधार देणारा तो दंड राहिला नाही, किंवा आमच्या हातातील शस्त्र पण राहिले नाही. कारण महान गोष्टी नीट वापरल्या नाहीत किंवा त्या अयोग्य रीतीने वापरल्या तर त्या वापरणारावरच उलटतात आणि त्याचा नाश करतात, कारण हा त्यांचा धर्म आहे.

त्यामुळे आमचे ज्ञान तमाच्या ओझ्याखाली दडपून गेले आहे आणि त्याला नपूंसकत्वाचा आणि अकर्तृत्वाचा शाप लागला आहे. आपण अलिकडे अशी कल्पना करू लागलो आहोत की, जर आपण विज्ञान प्राप्त केले तर सर्वकाही चांगले होईल. प्रथमतः आपण स्वतःला प्रश्न विचारला पाहिजे की आपणापाशी असलेल्या ज्ञानाचा आपण काय उपयोग केला आहे. किंवा ज्यानी विज्ञान प्राप्त करून घेतले आहे त्यानी भारतासाठी काय केले आहे ? केवळ अनुकरण करणारे आणि अंतःप्रेरणेबाबत अकार्यक्षम असणारे आपण केवळ इंग्लंडच्या पद्धतीचे अनुकरण करण्याचा प्रयत्न केला आहे. आपणास शक्ती मिळाली नाही, आता आपण अधिक उत्साही असणाऱ्या जपानच्या पद्धतीची नक्कल करू. पण त्यामुळे आपणाला अधिक चांगले यश प्राप्त होणार आहे काय ? युरोपीयन विज्ञान ज्ञानाची जी प्रचंड शक्ती देणार आहे ती एकाद्या हाताने पेलवेल असे शस्त्र आहे काय ? की ती एकाद्या भीमसेनाची गदा आहे ? दुबळ्याला तिचा काय उपयोग ? उलट नीट पेलली नाही तर तिच्याखाली चिरडून जाण्याचाच संभव अधिक.

**शक्तीशिवाय आपली भक्ती जगणार नाही आणि कार्य करणार नाही–**

आपणात प्रेम, उत्साह, भक्ती कमी आहे काय ? की सर्वत्र भारतीय प्रकृतीत पूर्णतः मुरलेलीच आहेत पण शक्ती विना आपण त्यांना केंद्रित करू शकत नाही, त्याना मार्गाला लावू शकत नाही किंबहूना त्यांचे संरक्षण पण करू शकत नाही. भक्ती ही उसळणारी ज्योत आहे आणि शक्ती हे इंधन आहे. जर इंधन अपुरे असेल तर भक्ती किती वेळ तग धरील ?

जेव्हा अभागी प्रकृती ज्ञानाने उजळून निघेल आणि कर्माच्या राजसी शक्तीने शिस्तबद्ध होईल आणि परमेश्वराच्या भीतीने आणि अर्चनेने उचंबळून येईल तेव्हा ती भक्ती आणि तीच दूरवर तग धरून राहते व आत्म्याला परमेश्वराशी नित्य बांधून ठेवते, आदर्श भक्तीसारख्या प्रचंड गतीचा आवेग पेलण्याला दुबळे मन अगदीच पामर ठरेल. क्षणभर ती वर उंचावेल पण नंतर भक्तीची ज्योत स्वर्गाकडे जाईल आणि पूर्वीपेक्षाही थकलेला आणि दुबळा होऊन (भक्त) खालीच राहील. उत्साह आणि भक्ती हे जिचे प्राण आहे अशी प्रत्येक शक्ती जर ती दुबळ्या मनातून आणि हलक्या सामग्रीतून निर्माण होत असेल तर ती निश्चितच अयशस्वी ठरेल आणि आपल्या जागीच जळून जाईल.

**भारताला केवळ शक्तीचीच आवश्यकता–**

जसजसे आपण खोलवर विचार करू तसतशी आपली खात्री पटेल की बाकी सगळ्या गोष्टींपेक्षा जी एक गोष्ट मिळवण्यासाठी आपण सतत प्रयत्नशील राहिले पाहिजे ती म्हणजे शक्ती–शारीरिक, मानसिक आणि नैतिक आणि सर्वांहून श्रेष्ठ म्हणजे आत्मिक शक्ती, जी सर्व अन्य शक्तींचा अनंत आणि अविनाशी स्त्रोत आहे. जर आपण शक्तीमान असू तर सर्व गोष्टी आपणास सहज आणि निसर्गतःच प्राप्त होतील. शक्तीच्या अभावी आपण हात असून पकडू न शकणाऱ्या अथवा मारू न शकणाऱ्या आणि पाय असून धावू न शकणाऱ्या स्वप्नातील माणसाप्रमाणे आहोत.

**इच्छाशक्ती वृद्ध आणि जराजर्जर झालेल्या भारताला पुनर्जन्म आवश्यक–**

आपण काहीही करावयास प्रारंभ करतो तेव्हा उत्साहाच्या प्रथम उद्रेकाच्या समाप्तीनंतर अपंग असाह्यता आपणास घेरून टाकते. आपण अनेकदा पाहतो की वयोवृद्ध आणि अनुभव-संपन्न व्यक्तीचे ज्ञानाधिक्य जणू त्यांच्या कार्यशक्तीस आणि इच्छाशक्तीला गोठवून ठेवते. जेव्हा एकादी प्रचंड जाणीव किंवा आत्यंतीक गरज त्यांच्यावर येऊन आदळते आणि जेव्हा कार्यवाही करण्याची टोचणी लागते तेव्हा ते चुळबुळ करतात, चिंतन करतात, पर्वा करतात, काही तात्पुरती हालचाल करतात आणि सोडून देतात किंवा सुरक्षिततम आणि सुलभतम उपाय सुचण्याची मार्गप्रतिक्षा करतात, आणि प्रत्यक्ष कृती मात्र करीत नाहीत. परिणामी जेव्हा कार्य करण्याची शक्यता आणि आवश्यकता होती ती संधी निघून जाते. ज्ञानसंचयामुळे त्या वृद्धासारखीच आपली अवस्था झाली आहे आणि आपली संवेदना आणि इच्छा सक्षम असूनही जराग्रस्त आळशीपणामुळे, जरानिर्मित भयामुळे आणि जराग्रस्त दुबळेपणामुळे अपंग बनली आहे. जर भारताला जगावयाचे असेल तर त्याने पुन्हा तरुण बनले पाहिजे. उर्जेचे धावणारे आणि उसळणारे स्त्रोत त्याच्यात ओतले पाहिजेत. त्याचा आत्मा पुन्हा एकदा जुन्या काळाप्रमाणे बनला पाहिजे. तो उसळणाऱ्या प्रचंड लाटेप्रमाणे विशाल, धक्का देणाऱ्या इच्छेप्रमाणे शांत किंवा रौद्र बनला पाहिजे. कार्यशक्तीचा किंवा प्रबलतेचा सागर बनला पाहिजे.

**भारताचे नवजीवन शक्य आहे–**

आपल्यापैकी पुष्कळजण तमःप्रभावाने प्रभावीत झाल्यामुळे अकर्तृत्वाच्या आहारी जाऊन हल्ली असे म्हणू लागले आहेत की हे अशक्य आहे, कारण आत्मा कुजला आहे, त्याच्यात प्राण नाही, रक्त नाही, पुन्हा न सुधारण्याइतपत दुर्बल झाला आहे, आपला वंश आता निर्वंश होणार हे नक्कीच! हे केवळ मूर्खपणाचे आणि आळसाचे बडबडणे आहे. माणसाची किंवा राष्ट्राची इच्छा असल्याखेरीज ती विधाने दुबळी होऊ शकत नाहीत आणि माणसाची किंवा राष्ट्राची नष्ट होण्याची हेतुपुरःसर पसंती असल्याखेरीज तो किंवा ते नष्ट पण होऊ शकत नाही.

**राष्ट्र म्हणजे काय ? लक्षावधींची शक्ती–**

राष्ट्र म्हणजे काय? आपली मायभूमी कोणती? तो एक भूखंड नव्हे की भाषा, अलंकार नव्हे किंवा मनाची कल्पना पण नव्हे. राष्ट्र म्हणून ओळखल्या जाणाऱ्या लक्षावधींची ती एकत्रित झालेली महाप्रचंड शक्ती आहे. तिची तुलना एकत्रित झालेल्या लक्षावधी देवांनी एकत्रित झालेल्या आणि एकसंघ शक्तीमधून निर्माण झालेल्या महिषासुरमर्दिनी भवानीशीच करता येईल. त्या शक्तीला आम्ही भारत म्हणतो, भारती भवानी म्हणतो, ती तीस कोटी लोकांच्या एकत्रित झालेल्या शक्तीचे चैतन्यमय एकीकरण आहे, पण ती आपल्या मुलांचे अज्ञान आणि स्वनिर्मित आलस्य ह्या तमोगुणाच्या मोहक वर्तुळात बंदिस्त आहे, म्हणून ती कर्तृत्वशून्य आहे. हा तमोगुण घालवण्यासाठी अंतर्यामी ब्राह्मणाला जागृत केले पाहिजे.

**आपण राष्ट्र निर्माण करावयाचे की नष्ट व्हायचे ही आपली स्वत;ची पसंती आहे–**

हजारो पवित्र माणसे, साधू आणि संन्यासी ह्यानी त्यांच्या जीवनाने मूकपणे आपणास काय शिकवले आहे ? भगवान रामकृष्णाच्या व्यक्तीमत्वामधून काय संदेश बाहेर पसरला ? जगाला हालवणाऱ्या विवेकानंदाच्या सिंहसदृश हृदयातून बाहेर पडलेल्या वक्तृत्वाचे सार काय होते ? त्याचे सार हेच होते की ह्या तीस कोटी माणसांपैकी प्रत्येकाच्या हृदयात, सिंहासनाधिष्ठित राजापासून तो हमाली करणाऱ्या मजुरापर्यंत, आपल्या संध्येमध्ये मग्न असलेल्या ब्राम्हणापासून तो सर्वांनी तिरस्कारलेल्या परत्यापर्यंत प्रत्येकाच्या हृदयात परमेश्वराचे अधिष्ठान आहे. आपण सर्व देव आणि निर्माते आहोत. कारण परमेश्वराची शक्ती आपल्यापैकी प्रत्येकामध्ये चैतन्यमय आहे. आणि जीवन म्हणजे निर्मितीच आहे. फक्त नवीन आकार निर्माण करणे म्हणजेच निर्मिती नव्हे तर परिरक्षण म्हणजे निर्मिती आहे, विनाश म्हणजे पण निर्मितीच आहे, आपण काय निर्माण करतो हे आपणावर अवलंबून आहे. कारण आपली इच्छा असल्याशिवाय आपण दैवाच्या किंवा मायेच्या हातातील बाहुली नाहीत. आम्ही सर्व शक्तीमान सत्तेचे पैलू आणि आविष्कार आहोत.

**भारताने पुनर्जन्म घेतलाच पाहिजे कारण जगाच्या भविष्याने त्या पुनर्जन्माची मागणी केली आहे–**

भारत नष्ट होणार नाही. आपला वंश समूळ नष्ट होणार नाही, कारण मानव जातीच्या अनेक विभागांपैकी भारतासाठीच सर्वोच्च आणि सर्वोत्कृष्ट नियती आरक्षित केली आहे. ती मानव जातीच्या भवितव्यासाठी परमोच्च आवश्यक आहे. संपूर्ण जगासाठी भविष्यकालीन धर्म तिच्याकडूनच पुढे आला पाहिजे. सर्व धर्म, विज्ञान आणि तत्त्वज्ञान ह्यांचा समन्वय करणारा शाश्वत धर्म तिनेच दिला पाहिजे. आणि संपूर्ण मानवांचा एकच आत्मा निर्माण झाला पाहिजे. नीतिमत्तेच्या क्षेत्रात सर्व अन्याय्य वृत्तीना मानवतेमधून पार नष्ट करून संपूर्ण विश्वाला आर्य बनविले पाहिजे. हे करण्यासाठी त्या भारताला प्रथम स्वतःचे पुनरार्यीकरण करावे लागेल.

ह्या महान कार्याला आरंभ करण्यासाठी भगवान रामकृष्ण आणि विवेकानंद ह्यानी शिकवण दिली. कोणत्याही वंशावर सोपवलेले सर्वश्रेष्ठ आणि परमविस्मयकारक असे हे कार्य आहे. हे कार्य पुढे जाईल अशी अपेक्षा होती पण जर त्या कार्याची प्रगती झाली नाही तर ते केवळ आपण आपणावर भीती, शंका, चालढकल आणि हेळसांड ह्यांचे काळाकुट्ट आवरण घालून घेतले आहे म्हणूनच होय. आपणापैकी काही जणानी एकाकडून भक्ती ग्रहण केली आहे तर दुसऱ्याकडून ज्ञान स्वीकारले आहे. पण भक्तीच्या अभावी, कर्माच्या अभावी आपण आपली भक्ती जीवंत, चेतन करू शकलो नाही, त्या कालीची, माय भवानीची, शक्तीमातेची उपासना श्रीरामकृष्णानी केली, तिच्याशी ते एकरूप झाले, ह्याचेतरी स्मरण आपणाला करता येईल ना ?

परंतु भारताची नियती अडवणाऱ्या किंवा अपयशी ठरवणाऱ्या एकाद्या व्यक्तीसाठी आता थांबणार नाही. मातेचा असा आदेश आहे की मानवानी तिची उपासना सुरू करावी आणि तिला वैश्विक रूप द्यावे.

**शक्तीप्राप्तीसाठी शक्तीमातेची उपासना अत्यावश्यक–**

आपल्या वंशाला शक्तीची, पुन:पुन्हा शक्तीची आणि अधिकाधिक शक्तीचीच आवश्यकता आहे. पण आपणाला ईप्सित असलेली शक्ती शक्तीमातेच्या उपासनेशिवाय कशी उपलब्ध होणार ? ती स्वतःसाठी उपासनेची मागणी करीत नाही, आपणाला मदत व्हावी आणि शक्ती आपणाला प्राप्त व्हावी म्हणून ही उपासना आहे. ही अफलातून कल्पना नाही किंवा हा अंधविश्वास नाही; हा विश्वाचा सामान्य न्याय आहे. देव आपण होऊन मागितल्याशिवाय कधीच काहीच दान करीत नाही. शाश्वत शक्ती पण नकळत आपणाकडे येत नाही. प्रत्येक उपासकाला अनुभवावरून हे पक्के ठाऊक आहे की आपण त्या परमेश्वराकडे वळले पाहिजे, आपली इच्छा दर्शविली पाहिजे, आणि उपासना केली पाहिजे तर दैवी शक्ती आपणावर अचिंत्य सौंदर्य आणि परमानंद ह्यांची वृष्टी करील. जे शाश्वत चैतन्याबद्दल सत्य आहे तेच त्याच्यापासून निष्पन्न होणाऱ्या शक्तीबद्दलही आहे.

**धर्म–सत्यमार्ग–**

पाश्चिमात्य विचारसरणीचे जे लोक ऊर्जाप्राप्तीच्या जुन्या स्रोताकडे विस्मयकारकपणे पाहतात त्याना काही मूलभूत गोष्टींचा विचार करणे आवश्यक आहे.

**जपानचे उदाहरण–**

(१) ˘इतिहासात एकाद्या राष्ट्राला आश्चर्यकारक रीतीने आणि एकाएकी सामर्थ्याचा उद्रेक झाल्याचे आधुनिक जपानखेरीज दुसरे उदाहरण नाही. त्या उदाहरणाबद्दल अनेक प्रकारचे सिध्दान्त पुढे आले परंतु त्या प्रभावी जागृतीचे उगमस्थान, त्या अपार शक्तीचा स्रोत जपानी बुध्दिवादी आता आपल्याला सांगत आहेत. ते सूत्र त्यांनी धर्मापासून उचलले

होते. शिंतोधर्माच्या पुनरूज्जीवनासह मिकैडोयी वैयक्तिक आणि मूर्तिरूपात जपानी राष्ट्राची शक्तिदेवता म्हणून उपासना आणि ओयोमेई ह्याची वेदातांची शिकवण ह्यामुळे ते लहानसे द्वीपराष्ट्र, अर्जुनाने लीलया गांडीवाचा उपयोग करावा त्याप्रमाणे पाश्चिमात्य ज्ञान आणि विज्ञान ह्यानी युक्त अशा प्रचंड शस्त्रांचा लीलया आणि यशस्वीपणे उपयोग करण्यात शक्तिमान बनले.

**भारताचे आध्यात्मिक पुनरुज्जीवन ही महान गरज–**

(२) जपानपेक्षाही धर्मस्रोतापासून शिकण्याची गरज भारताला अधिक आहे. कारण मूळची असलेली शक्ती अधिक चैतन्यपूर्ण आणि परिपूर्ण करणे एवढीच जपानची गरज होती. आपणाला आपल्यात मूळची नसलेली शक्ती नव्याने निर्माण करावयाची आहे, पुनः जन्मल्याप्रमाणे नवीन माणसे आणि नवीन ह्रदये निर्माण करावयाची आहेत. येथे शास्त्रीय प्रणाली नाही किंवा यंत्रणा नाही. चैतन्याच्या आंतरिक आणि अनंत भांडारातून, नवनिर्मितीचा स्रोत असलेल्या शाश्वताच्या आदिशक्तिपासून शक्ती निष्पन्न करता येते. पुनर्जन्म म्हणजे आपणातील ब्रह्म पुनरुज्जीवित करणे होय, आणि शारीरिक किंवा बौद्धिक प्रयत्नानी साध्य न होणारी ती आध्यात्मिक प्रणाली आहे.

**धर्म म्हणजे राष्ट्रीय मनाचा नैसर्गिक मार्ग–**

(३) भारतातील सर्व महान प्रबोधने ही सर्वकाळी त्यांच्या अतिप्रभाव इतकी आणि श्रेष्ठ उत्साहाचे सघन धार्मिक उद्बोधनाच्या कुठल्यातरी स्रोतापासून मिळालेल्या चैतन्यातून निष्पन्न झाली आहेत. ज्याच्या ठिकाणी धार्मिक प्रबोधन हे परिपूर्ण आणि भव्य होते तेथे तेथे त्याने निर्माण केलेली राष्ट्रीय शक्ती भव्य आणि सामर्थ्यसंपन्न होती. जेथे जेथे धार्मिक चळवळ होती आणि अपूर्ण होती तेथील राष्ट्रीय चळवळ खंडित, अपूर्ण अथवा तात्पुरती होती. ह्या घटनेची वारंवारता ही ह्या वंशातील लोकांच्या मानसिकतेत ही वृत्ती दृढमूल असल्याचा पुरावाच आहे. जर तुम्ही दुसऱ्या अथवा एकाद्या परदेशी पद्धतीचा अवलंब केलात तर एकतर आपले साध्य अत्यंत कंटाळवाण्या मंदतेने, दुःखाने आणि अपूर्णतेने साध्य होईल किंवा ते मुळीच साध्य होणार नाही. परमेश्वराने आणि मातेने तुमच्यासाठी आखून दिलेला सोपा मार्ग सोडून अस्पष्ट आणि आडवळणाच्या मार्गाला का जाता ?

**आंतरिक चैतन्य हाच खरा शक्तीचा स्त्रोत–**

(४) ब्रह्म म्हणजे एकमेव आणि अविभाज्य आध्यात्मिक बळाचा सागर. त्यापासून सर्व भौतिक आणि मानसिक जीवन उदयाला येते. पूर्वकालीन पौर्वात्य विचारवंताप्रमाणे प्रतिष्ठित पाश्चिमात्य विचारवंताना हे मान्य होण्यास प्रारंभ झाला आहे. असे असेल तर आध्यात्मिक शक्ती हीच सर्व शक्तींचा उगम आहे, असे अथांग स्रोत आणि गंभीर व अनंत उगम आहेत. उथळ पातळीच्या झऱ्याकडे जाणे सोपे असते पण ते लवकर सुकतात, वरवर खरवडण्यापेक्षा खोलात का जाऊ नये ? फळाच्या रूपाने कामाचा मोबदला मिळेलच.

**तीन गोष्टी आवश्यक–**

तीन मौलिक नियमाना अनुसरून आपणाला तीन गोष्टींची आवश्यकता आहे.

**(१) भक्ती–मातेचे मंदीर–**

शक्तीमातेचे स्मरण केल्याखेरीज आपणास शक्ती मिळणार नाही. ह्यासाठी आपण शाश्वत भक्तीचेच, शक्तीमातेचे, भारतमातेचे एक मंदीर आधुनिक शहरांच्या प्रदूषणापासून दूर, माणसांची वर्दळ नसलेल्या अशा उंच आणि चैतन्य, शांती ह्यानी परिपूर्ण अशा शुद्ध हवेच्या ठिकाणी बांधू या. हे मंदीर हे केन्द्र असेल. तेथून मातृपूजनाचा प्रवाह सर्व देशभर प्रवाहित होईल. टेकडीवर केलेली तिची पूजा तिच्या पूजकांच्या मेंदूत आणि हृदयात अग्निज्वाले-प्रमाणे पसरेल.

**(२) कर्म-ब्रह्मचारींचा नवा गण–**

कर्मामध्ये परिवर्तित झाल्याखेरीज पूजा ही मृत आणि निष्फळ असते.

ज्यानी मातेच्या कार्यासाठी सर्वस्वाचा त्याग केला आहे अशा कर्मयोगींचा एक नवा गण आपल्या मंदिराला जोडून असलेल्या मठात राहील. जर काहींची इच्छा असेल तर ते पूर्णतः संन्यासी होतील आणि पुष्कळसे ब्रह्मचारीच राहतील. त्यांचे नियतकार्य पूर्ण झाले की ते गृहस्थाश्रम स्वीकारू शकतील. पण सर्वांनी त्याग स्वीकारलाच पाहिजे.

**कां ? काही कारणे !**

(१) आपल्या शारीरिक इच्छा आणि गरजा, ऐन्द्रीय परिपूर्ती, वासना, अपेक्षा, भौतिक जीवनाची ओढ ह्यांची समाराधना होईल त्या प्रमाणातच आपण आपणातील आध्यात्मिक शक्तीच्या सागराकडे परतू.

(२) शक्तिविकासाठी संपूर्ण एकाग्रतेची आवश्यकता आहे. एकाद्या भाल्याने लक्ष्याचा वेध घ्यावा त्याप्रमाणे मन सर्वथैव ध्येयाकडेच लागलेले असले पाहिजे. जर अन्य चिंता आणि अपेक्षा मन विचलीत करीत असतील तर भाला सरळ मार्गावरून च्युत होईल आणि लक्ष्य चुकेल. अत्युच्च श्रेणीपर्यंत ज्यांच्यात शक्ती विकसीत झाली आहे, ज्यांच्यामध्ये त्यांच्या व्यक्तित्वाचा प्रत्येक कोपरा शक्तीने परिपूर्ण भरून बाहेरचे जग सुपीक करण्यासाठी वाहत आहे अशा व्यक्तींच्या एका केंद्रीभूत समूहाची आपणास जरूर आहे. भवानीचा अग्नी आपल्या मेंदूत आणि हृदयात घेऊन हे लोक देशाच्या कान्याकोपऱ्यात जातील आणि ज्योत प्रज्वलीत करतील.

**(३) ज्ञान-महासंदेश–**

ज्ञानावर आधारित असल्याखेरीज भक्ती आणि कर्म ही परिपूर्ण आणि टिकावू होत नाहीत. ह्या गणातील ब्रह्मचाऱ्यांना त्यांचे आत्मे ज्ञानपूर्ण करण्याचे शिकविले जाईल, म्हणजे

त्यांचे कर्म हे खडकावर आधारल्याप्रमाणे आधारले जाईल. त्यांच्या ज्ञानाचे मूलतत्व कोणते असेल ? त्या महान " सो ऽ हम् " शिवाय अन्य कोणते मूळतत्त्व असणार ? वेदान्तातील महान तत्त्व, जो अद्यापहि राष्ट्राच्या अंतःकरणापर्यंत पोहोचावयाचा आहे असा प्राचीन महामंत्र, जे ज्ञान, कर्म आणि भक्तीशी चैतन्यमय झालेल्या मानवाला संपूर्ण भीतीपासून आणि दुबळेपणापासून मुक्त करते.

मातृसंदेश–

" जेव्हा आपण प्रश्न विचारता की ही भवानी, ती माता कोण आहे तेव्हा ती स्वतःच त्याचे उत्तर तुम्हाला देते. " जगामध्ये आणि तुमच्यातीलहि शाश्वतापासून प्रवाहित झालेली अनंत ऊर्जा मी आहे. मी विश्वाची माता आहे. मी जगांची माता आहे आणि तुम्हा पवित्र भारतभूमीच्या लेकरांसाठी तिच्या मातीतून निर्माण झालेली आणि सूर्य-पवन ह्यांनी संगोपन केलेली मी भारती-भवानी, भारत माता आहे. "

आणि नंतर जर तुम्ही विचाराल की माता भवानीचे मंदीर आम्ही का उभारायचे, तर उत्तर ऐका.

" मी आज्ञा दिली आहे म्हणून. भावी धर्माचे केन्द्र निर्माण करून तुम्ही शाश्वत चैतन्याची तातडीची इच्छा साकार करून तुम्हाला ऐहिक जीवनात सशक्त बनवण्यासाठी आणि अन्य लोकी महान बनवण्यासाठी तुम्ही पुण्यसंग्रह करून ठेवाल. तुम्ही राष्ट्रनिर्मितीच्या कार्यास साह्य करीत आहात आणि संपूर्ण विश्वाला आर्य बनवण्यासाठी तुम्ही एका युगाची निर्मिती करीत आहात. ते राष्ट्र तुमचे स्वतःचे आहे आणि ते युग तुमचे आणि तुमच्या भावी पिढीचे आहे. ते जग म्हणजे समुद्र आणि डोंगर ह्यांचा भू-भाग नसेल तर ते लक्षावधी जनतेचे संपूर्ण विश्व असेल. "

चला तर मातेच्या हाकेला ओ द्या. ती तुमच्या हृदयात आणि मेंदूत व्यक्त होण्याची वाट पहात आहे. पूजनासाठी थांबून राहिली आहे. ती आर्यशून्य आहे कारण आपल्यातील देवाला तमाने संपूर्ण झाकले आहे. तिच्या अकर्तृत्वामुळे तिला विषाद वाटतो आहे आणि आपल्या मुलांनी मदतीसाठी आवाहन केले नाही म्हणून ती विषण्ण आहे. तिची हालचाल तुम्हाला जाणवत आहे. अंहकाराचे काळे आवरण फेकून द्या. लोभाच्या बंदिस्त करणाऱ्या भिंती तोडून टाका आणि आपापल्या परीने तिची पूजा करा आणि तुम्हाला प्रेरणा होत असेल त्याप्रमाणे कोणी शरीराने तिची पूजा करा, कोणी बुद्धीने, कोणी वाणीने, कोणी धनाने तर कोणी प्रार्थनेने तिला साह्य करा. मागे फिरू नका कारण तिने मारलेली हाक ज्यांनी ऐकली नाही त्यांना तिच्या आगमनानंतर तिच्या क्रोधाला बळी पडावे लागेल. पण ज्यांनी तिच्या आगमनप्रसंगी क्षुल्लक का होईना पण साह्य केले असेल त्यांच्यापुढे त्यांच्या आईचे मुख सौंदर्याने आणि दयेने किती तेजस्वी होईल !

संन्याशाच्या नवीन कल्पनेप्रमाणे त्याचे नियम आणि कार्य काहीसे पुढीलप्रमाणे असावे :—

**(१) सामान्य नियम–**

(१) जे मातेसाठी ब्रह्मचर्य स्वीकारतील त्याना किमानपक्षी चार वर्षे काम करण्याची शपथ घ्यावी लागेल, तद्नंतर हे कार्य ते पुढे चालू ठेवतील वा कौटुंबिक जीवन जगण्यास मोकळे राहतील.

(२) मातेच्या नावाने मिळालेला सर्व पैसा मातेच्या सेवेसाठीच खर्च होईल. त्यांच्यासाठी मात्र निवास आणि भोजन इतकाच, जेव्हा आवश्यक तेव्हा, खर्च करता येईल, अन्य नाही.

(३) त्याना ग्रंथप्रकाशन वा अन्य मार्गाने मिळणाऱ्या वैयक्तिक प्राप्तीपैकी किमान अर्धी रक्कम त्यानी मातृसेवेप्रीत्यर्थ दिली पाहिजे.

(४) त्यांच्या सेवेमध्ये अथवा त्यांच्या धार्मिक जीवनामध्ये त्यानी सर्वदा आणि सर्वथा संघप्रमुख अथवा त्यांचे एक अथवा दोन सहाय्यक ह्यांची आज्ञा पाळली पाहिजे.

(५) संघप्रमुखानी घालून दिलेले शारीरिक आणि मानसिक शुचितेचे आणि आचाराचे नियम तशीच शिस्त त्यानी पाळली पाहिजे.

(६) त्याना विश्रांतीसाठी आणि धार्मिक प्रगतीसाठी अवकाश अवश्य दिला जाईल. परंतु वर्षातील बहुतेक मोठा भाग त्याना बाहेरील कार्यासाठी द्यावा लागेल. मंदिराच्या सेवेसाठी आवश्यक काही व्यक्ती आणि कार्याच्या केंद्रीय मार्गदर्शनासाठी काही व्यक्ती ह्यांचा अपवाद करून सर्वांसाठी हे नियम लागू होतील.

(७) कार्यकर्त्यांमध्ये पदांचे स्तर असणार नाहीत आणि कोणीहि वैयक्तिक लौकिकासाठी अथवा विशेष नैपुण्यासाठी खास प्रयत्न करू नयेत, परंतु सामर्थ्यासाठी आणि स्वविलोपनासाठी प्रयत्न करावा.

**(२) समाजकार्य–**

(८) मुख्य काम समाज प्रबोधनाचे आणि गरीब तसेच अज्ञ जनाना साह्य करण्याचे राहील.

(९) हे कार्य त्याना अनेक मार्गांनी करता येईल :–

(१) अशिक्षित बुद्धीच्या लोकासाठी व्याख्याने आणि प्रात्यक्षिके.
(२) वर्ग आणि रात्रीशाळा.
(३) धार्मिक शिकवण.
(४) रुग्णशुश्रूषा.
(५) परोपकारी कामे चालविणे.
(६) त्यांच्या हाताला लागेल ते कोणतही चांगले काम परंतु संघ पुरस्कृत.

(३) **मध्यमवर्गासाठी काम–**

(१०) शिक्षण आणि धार्मिक जीवन ह्यांच्याशी संबंधीत आणि मध्यमवर्गाला उद्बोधन करण्यासाठी अशी विविध समाजोपयोगी कामे शहरातून आणि अन्यत्र, तशीच समाजाला आवश्यक अशी कामे त्यांनी हाती घ्यावीत.

(४) **धनाढ्य लोकांसाठी कामे–**

(११) त्यानी सामान्यत: जमीनदार, जमीन मालक आणि श्रीमंत लोकांना भेटावे आणि पुढीलप्रमाणे प्रयत्न करावा :–

(१) जमीनदार आणि कुळ ह्यांच्यातील संघर्ष मिटवून त्यांच्यात सहानुभूती निर्माण करणे.

(२) सर्व वर्गांमध्ये एकाच आणि जिवंत धर्मतत्त्वाचा दुवा तसेच एकाच ध्येयाबद्दल चैतन्य निर्माण करणे.

(३) फळाची आणि शासकीय प्रतिष्ठेची अपेक्षा न करता आजुबाजूच्या भागात समाजोपकारक आणि धर्मादाय कामे सुरू करण्याबद्दल श्रीमंतांची मने वळविणे.

(५) **देशासाठी सर्वसामान्य कामे–**

(१२) पैसा उपलब्ध होताच आकर्षक कला वस्तू आणि उत्पादने ह्यांचे शिक्षण घेण्यासाठी काही तरुणांना परदेशात पाठविणे.

(१३) अभ्यासकालामध्ये आपल्या शुचितेच्या आणि स्वविलोपनाच्या सवयींना हरताळ न फासता सर्वांनी संन्यासी म्हणूनच रहावे.

(१४) परदेशातून परतल्यानंतर त्यानी संघाच्या मदतीने कारखाने आणि कार्यशाळा सुरू कराव्यात. परंतु आपले संन्यासी जीवन सोडू नये. आपल्या उपयोगातील आपला सर्व लाभ परदेशात अधिकाधिक विद्यार्थी पाठविण्यासाठी उपयोगात आणावा.

(१५) बाकीच्याना पदयात्रेसाठी परदेशात पाठवण्यात येईल. तेथे त्यानी चारित्र्य, जीवन आणि संवाद याद्वारे युरोपियन देशात भारतीय जनतेसाठी प्रेम आणि सहानुभूती निर्माण करावी आणि भारतीय आदर्शांचा त्यांनी स्वीकार करावा ह्यासाठी भूमिका तयार करावी.

मंदिराची उभारणी आणि प्रतिष्ठापना झाल्यानंतर लगेच शक्य तितक्या लवकर ही संघाची कल्पना विकसीत करण्याच्या मार्गाला लागावे अथवा समाजाचा पाठिंबा आणि सहानुभूती मिळेपर्यंत थांबावे. मातेच्या आशीर्वादाने आपण ह्यात अपयशी होणार नाही.

## ४. मृणालिनीस पत्र. . . . . . . . . . . . . ३०-८-१९०५

'' तीन गोष्टींचे वेड मला लागले आहे. मला ईश्वराने जे काही गुण, प्रतिभा, उच्च शिक्षण आणि ज्ञान व संपत्ती दिली आहे त्यावर ईश्वराचीच मालकी आहे, असा माझा ठाम विश्वास आहे. काहीही करुन मला परमेश्वराची प्रत्यक्ष जाणीव अनुभवास यावी, हे माझे दुसरे वेड आहे तर माझे तिसरे वेड या देशाबाबत आहे. हा देश इतरांच्या दृष्टीने निष्क्रीय बाब आहे, पठारे, शेतीभाती, पर्वत, अरण्ये. नद्या अशी या देशाची इतरे जनाना ओळख आहे पण मी माझ्या देशाकडे माझी आई म्हणून पाहातो. ''

बडोदे. ३० ऑगस्ट १९०५.

प्रियतम मृणालिनी,

दि. २४ ऑगस्टचं तुझं पत्र हाती पडलं. पुनः एकदा तुझ्या आईवडिलांना पुत्रवियोगाचं दुःख भोगावं लागावं याचं वाईट वाटतं, पण कोठल्या भावाचे निधन झाले ते तू कळवलं नाहीस. दुःख करून काही उपयोग होत नसतो. या जगात माणूस सुखाचा शोध घेण्याचा प्रयत्न करु लागला की, त्याला त्या सुखाच्या केंद्र बिंदूपाशी दुःख आढळतं कारण सुख आणि दुःख यांची एकमेकांशी कायम अभंग युती असते. हा नियम केवळ संततिसुखाच्या आशेपुरताच लागू होतो असं नाही तर सर्वच ऐहिक आशांची अटळ परिणती दुःखद असते.

वीस रुपयांऐवजी मी दहा रुपये असा आकडा वाचला (तुझ्या पत्रात) आणि तुला दहा रुपये पाठविण्याबाबत लिहिले; तुला पंधरा रुपये हवे असतील तर मी निश्चित तेवढे पाठवीन. दार्जिलिंगमध्ये सरोजिनीने तुझ्यासाठी घेतलेल्या कपड्यांसाठी मी याच महिन्यात पैसे पाठविले आहेत. तू रक्कम उसनी घेतलीस ते मला कसे समजावे ? कपड्याची किंमत पंधरा रुपये होती. ती मी चुकती केली आहे. तीन-चार रुपये जास्त लागत असतील तर मी तुला पुढच्या महिन्यात पाठवीन. या खेपेला मी तुला वीस रुपये पाठवीन, (म्हणजे पुढच्या महिन्यात).

आता या बाबतीत मी तुला सांगतो. एव्हाना तुला कळून चुकलं असेल की, ज्या माणसाच्या नशिबाशी तुझ्या नशिबाचे धागे बांधले गेलेत तो माणूस अगदीच वेगळा आहे. या देशातल्या सर्वसाधारण माणसांचे आताच्या काळात जे दृष्टिकोन आहेत, आयुष्यातले जे ध्येय आहे आणि कार्याचे जे क्षेत्र आहे तसे विचार, त्या आकांक्षा आणि त्यांच्यासारखे मानसिक

दृष्टिकोन मी कधी बाळगलेले नाहीत. या बाबतीत मी पूर्ण वेगळा आहे, असाधारण आहे. सामान्य माणसे अशा असाधारण कल्पना, आगळी कृती आणि पूर्णतः असामान्य आकांक्षाना काय म्हणतात, तेही कदाचित् तुला ठाऊक असेल. सामान्य जन या अशा आगळ्या ध्यासास वेडेपणा म्हणतात आणि अशा कार्यास वाहून घेणारा वेडा माणूस जर त्यात यशस्वी झाला तर मात्र त्यास वेडा न म्हणता थोर, महान व्यक्ती म्हटले जाते, पण या प्रयत्नात किती जण यशस्वी होतात ? हजारांमध्ये केवळ दहा असे आगळे-वेगळे निघतात आणि या दहा जणात फक्त एखादा यशस्वी ठरतो. माझ्या अंगीकृत कार्यात यशाची सुतराम शक्यता नाही ; मला अद्याप पूर्णतः वाहून घेणे जमलेले नाही ; तेव्हा लोक मला वेड्यातच काढणार आहेत. अशा वेड्याबरोबर विवाह करायला लागावा हे अशा स्त्रीचे दुर्दैवच ; कारण स्त्रीच्या सर्व आशाआकांक्षा या कुटुंबाच्या सुखदु:खाशी एकवटलेल्या असतात. वेडा माणूस पत्नीला आनंद देऊ शकत नाही— दु:ख मात्र तिच्यावर लादत राहणार. हिंदू धर्माच्या संस्थापकांनी हे चांगले जाणले होते आणि अशा चाकोरी पलिकडच्या व्यक्तींचे त्यांना फार कौतुक होते, आगळी कृती आणि आगळ्या आकांक्षा, तसेच मुलखावेगळ्या माणसांचा त्याना फार आदर वाटे– मग ती महान असोत अगर मूर्ख ठरोत, पण या सर्वात स्त्रियांची जी भयंकर फरफट होते, त्यावर उपाय काय ? त्यावर ऋषींनी उपाय शोधून काढला ; त्यानी स्त्रीला उपदेश केला, " अन्य कोणाहीपेक्षा तुझ्यासाठी तुझा पती हाच तुला गुरुस्थानी आहे "— स्त्रीच्या दृष्टीने तोच एकमेव मंत्र आहे. धर्माचरणात पत्नी ही पतीची सहचरी असते. आपला धर्म म्हणून पतीने जे कार्य निवडलेले असते ते तडीस नेण्याकामी तिने त्याला मदत करायची असते. तिने त्याला सल्ला आणि प्रोत्साहन द्यायचे असते, तिने त्याला देव मानावे आणि त्याचा आनंद हा तिचाही आनंद व त्याचे दु:ख हे तिचेही दु:ख ठरावे. कार्याची निवड हे पुरुषाचे क्षेत्र आहे आणि त्याला मदत करणे, प्रोत्साहन देणे हा स्त्रीचा हक्क आहे. आता प्रश्न असा आहे की, तू कोठली निवड करणार, हिंदू धर्माने दिलेल्या मार्गाची की, नव्याने रुजलेल्या धर्माची ? गेल्या जन्मात केलेल्या चुकांचे फळ म्हणून तुझे माझ्यासारख्या वेडगळाशी लग्न झाले. माणसाने आपल्या दैवाशी समझोता करणे ठीक असते ; पण समझोता काय करणार ? कसा ? इतरांच्या मताने भारून जाऊन तूही तुझ्या पतीची वेड्यात गणना करशील ? हा वेडा माणूस निश्चितपणे आपल्या वेड्या मार्गाने जात राहणार आहे. तू त्याला थोपवू शकणार नाहीस ; त्याच्या वृत्तीत तुझ्यापेक्षा अधिक ठामपणा आहे. मग तू कोपऱ्यात बसून रडत राहाशील की, धृतराष्ट्र आंधळा म्हणून गांधारीनेही डोळ्यांना पट्टी बाधून अंधत्व स्वीकारले तशी तूदेखील तुझ्या पतीच्या जोडीने त्याच्या वेड्या कार्यात सहभागी होऊन आततायी पतीची वेडी पत्नी बनशील ? ब्राम्हो शाळेत तू शिकलीस आणि त्याचा प्रभाव तुझ्यावर पडूनही तू हिंदू परिवारातील कन्या आहेस ; हिंदू पूर्वजांचे रक्त तुझ्या धमन्यातून खेळत आहे, आणि तू दुसरा मार्ग निवडशील याची मला पूर्ण खात्री आहे.

तीन गोष्टींचे वेड मला लागले आहे. पहिली बाब ही की, मला ईश्वराने जे काही गुण, प्रतिभा, उच्च शिक्षण आणि ज्ञान व संपत्ती दिली आहे त्यावर ईश्वराचीच मालकी आहे, असा माझा ठाम विश्वास आहे. त्यामुळे परिवारासाठी जेवढी गरज आहे आणि जे अत्यावश्यक आहे तेवढेच व त्याचसाठी या गोष्टींचा विनियोग करण्याचा मला हक्क आहे. ते करून जे उरेल ते ईश्वराला परत द्यायला हवेच. हे ईश्वराचे दान जर मी संपूर्णपणे माझ्यासाठी, माझ्या व्यक्तिगत सौख्यासाठी, माझ्या आनंदासाठी वापरले तर मी चोर ठरेन. हिंदू धर्मग्रंथांचे म्हणणे असे आहे की, परमेश्वराकडून धन घेणाऱ्याने जर ते धन त्याला परत केले नाही, तर तो चोर ठरतो. आतापर्यंत मी माझ्याजवळील अगदी अल्प धन देवाला देत आलो आणि नऊ-दशांश भाग स्वतःच्या सुखासाठी वापरत आलो– याचा अर्थ असा की, हा माझा हिशोब पहाता मी ऐहिक सुखात बुडून राहिलो. अर्धे आयुष्य अशा तऱ्हेने वाया गेले ; स्वतःचे आणि आपल्या परिवाराचे पोट भरताना एखाद्या प्राण्याच्या ठायीही कृतज्ञता असते.

असा दीर्घकालपर्यंत मी प्राण्याचे आणि चोरांचे आयुष्य जगलो, अशी आता मला जाणीव होऊ लागली आहे. या जाणीवेने मला पश्चातापही होत आहे आणि स्वतःचाच तिरस्कार वाटू लागला आहे. यापुढे मात्र माझ्या हातून तसे घडणे नाही— हे पापाचरण मी कायमचे त्यागत आहे. परमेश्वराच्या चरणी धन अर्पिणे याचा अर्थ असा की, उचित कार्यासाठी धनाचा विनियोग करणे. सरोजिनी किंवा उषा यांना पैसे दिल्याचा मला मुळीच खेद होत नाही, कारण इतरांना मदत करणे हा धर्म आहे, आपल्यावर अवलंबून असणाऱ्याचे रक्षण करणे हा मोठाच धर्म आहे, पण कोणी फक्त आपल्या बंधू-भगिनींनाच पैसे देत असेल तर त्यामुळे हा दैवी हिशोब चुकता होत नसतो. आताच्या कठीण काळात आपला संपूर्ण देशच आपल्यावर अवलंबून दाराशी उभा राहिला आहे. या देशात मला तीस कोटी भाऊ आणि बहिणी आहेत— त्यातील कित्येक उपासमारीने मरत आहेत. त्यातील बहुसंख्य हाल अपेष्टानी खचले आहेत, त्रासाने हैराण झाले आहेत आणि कसेबसे जीवन ओढत आहेत. त्याना मदत केलीच पाहिजे. तुझे मत काय आहे, माझी पत्नी या नात्याने तू या धर्मात मला सहकार्य करशील काय ? सामान्य माणसे जे खातात ते आपण खाऊ आणि ते जी वस्त्रे लेऊ शकतात, तीच आपणही लेऊ आणि ज्याची नितांत गरज असेल, तेवढेच खरेदी करून बाकी सर्व परमेश्वरास देऊ. मी तेच करणार आहे. तुझी सहमती त्याकरिता असेल आणि त्यागाचे तत्त्व तू स्वीकारण्यास तयार असशील तर माझा निश्चय फलद्रूप होऊ शकेल. काहीच प्रगती साधली नाही, अशी तक्रार तू करीत होतीस. मी तुला प्रगतीचा मार्गही दाखवीत आहे. तो स्वीकारण्यास तू तयार आहेस काय ?

अलीकडे दुसऱ्या एका वेडाने मला झपाटले आहे ; ते असे ; काहीही करुन मला परमेश्वराची प्रत्यक्ष जाणीव घडली पाहिजे. आजच्या आपल्या धर्मात क्षणोक्षणी देवाचे नामस्मरण केले जाते, सर्वांच्या उपस्थितीत त्याची प्रार्थना केली जाते आणि आपण किती धार्मिक आहोत हे लोकांना दाखविण्यावर भर दिला जातो ; मला ते अमान्य आहे. सर्वश्रेष्ठ

परमेश्वर जर असेल, तर त्याच्या अस्तित्वाची अनुभूती घेण्याचा मार्ग निश्चितच असायला हवा, त्याच्या अस्तित्वाची जाणीव मिळायला हवीच ; तो मार्ग कितीही बिकट का असेना मी तो चोखाळण्याचा निर्णय घेतलेला आहे. हा मार्ग शोधण्यासाठी स्वतः स्वतःच्या मनाचा शोध घेण्याचे हिंदू धर्म प्रतिपादन करतो. हा मार्ग चोखाळण्याची पात्रता मिळविण्यासाठी लागणारा नियमही मला देण्यात आलेला आहे ; मी सगळे नियमाचरण पाळायला सुरुवात केली आहे आणि महिन्याभराच्या काळातच हिंदू धर्माची शिकवण खोटी नव्हे हे मी सांगू शकत आहे. धर्माने उल्लेखिलेल्या सर्व खुणांचा अनुभव मी घेतला आहे. त्याच मार्गाने, तुलाही नेण्याची माझी इच्छा आहे ; माझ्या गतीने या मार्गावर चालणे तुला जमणार नाही कारण अद्याप तुला ते ज्ञान प्राप्त करावयाचे आहे पण म्हणून माझ्या पावलावर पाऊल टाकण्यास तुला आडकाठी नाही. मात्र या पथावर येणे हे प्रत्येकाच्या इच्छेवर अवलंबून आहे. तुझी इच्छा असेल तर या विषयावर मी तुला आणखी लिहून कळवीन.

माझा तिसरा मूर्खपणा किंवा वेड सांगू ; हा देश इतरांच्या दृष्टीने एक निष्क्रीय बाब आहे आणि पठारे, शेतीभाती, अरण्ये, पर्वत व नद्या अशी या देशांची इतरेजनाना ओळख आहे पण मी माझ्या देशाकडे माझी आई म्हणून पाहातो. माझ्या मातृभूमीची मी आई म्हणून पूजा बांधतो आणि तिची स्तुती गातो. आपल्या आईच्या छातीवर बसून एखादा दैत्य तिचे रक्त पीत असेल तर तिचा पुत्र काय करील ? समाधानाने भोजनास बसेल आणि आपल्या पत्नी-मुलांसह आनंदी जीवन जगत राहील की, आईच्या रक्षणार्थ धाव घेईल ? या गतानुगतिक समाजास प्रगतीकडे नेण्याची शक्ती माझ्या ठायी असल्याचे मला कळले आहे ; ती शक्ती शारीरिक नाही, मी काही तलवार अथवा बंदूक घेऊन लढणार नाही, पण ज्ञानाच्या शक्तीच्या आधारे लढणार आहे. योध्द्याची ताकद हीच काही एकमेव प्रेरणा नसते, ज्ञानाच्या पायावर आधारीत ब्राह्मणशक्ती हीदेखील शक्तीच आहे. मला आलेली ही जाणीव नवी नाही, हे विचार काही अलीकडे उमटलेले नाहीत, ते माझ्यात जन्मजात होते, माझ्या प्रत्येक कणात ते भरून होते, हे मोठे कार्य साध्य करण्याच्या इराद्यानेच देवाने मला या जगात पाठविले आहे ; वयाच्या चौदाव्या वर्षी हे बीज प्रथम अंकुरण्यास आरंभ झाला आणि अठराव्या वर्षापर्यंत ते घट्ट रुजून आता पूर्ण स्थिर झाले आहे. आंटी एन हिने सांगितलेले तू ऐकलेस आणि कोणा दुर्गुणी माणसाने आपल्या साध्या आणि सुस्वभावी पतीला उन्मार्गाला नेले, अशी तुझी खात्री झाली. वास्तविक तुझ्या सद्‌गुणी पतीनेच त्या व्यक्तीला आणि इतरही, अनेकांना– ते भले बुरे कसेही असोत– त्या सर्वांना या सत्यमार्गाकडे वळविले आहे ; इतकेच नव्हे तर आणखी हजारोंना तुझा पती त्या मार्गाने नेणार आहे. माझ्या आयुष्यभरात हे काम पूर्ण होईल असे मी म्हणू शकत नाही, पण ते साध्य मात्र निश्चितपणे होईल. मी आता तुला काही विचारणार आहे : " या बाबतीत तुला काय करावेसे वाटते ? पत्नी ही शक्ती आहे– पतीची प्रेरणा आहे. तू उषाची शिष्या बनून युरोपियनांचा आदर्श मानणार आहेस ? तू त्रयस्थाची भूमिका घेऊन तुझ्या पतीची शक्ती कमी करणार आहेस की तू तुझ्या पतीची सहानुभूती व उत्साह द्विगुणित करणार आहेस ? " तू कदाचित उत्तरशील– " एवढ्या महान कार्यात

माझ्यासारखी सामान्य स्त्री काय करु शकणार ? माझ्यापाशी मनोबलही नाही आणि आवश्यक असलेली बुध्दिमत्ताही नाही, या सर्व गोष्टींचा विचार करायलाही मी धास्तावते. " त्यावर अगदी साधा उपाय आहे तो उपाय म्हणजे परमेश्वराला शरण जाणे, त्याच्याकडे नेणाऱ्या मार्गावर पाऊल ठेवणे. तुझ्या सर्व उणीवांवर तोच लवकरच उपाय काढील ; जी व्यक्ती त्याला शरण जाते ती हळू हळू भीतीलाही जिंकून घेते. तुझा जर माझ्यावर विश्वास असेल आणि इतरांचे न ऐकता तू माझे म्हणणे ऐकणार असशील तर मी माझी प्रेरणा तुला देईन, तशी ती दिल्याने माझी शक्ती कमी होणार नाहीच, उलटपक्षी आणखी वाढेल. पत्नी ही पतीची शक्ती आहे, असे आपण म्हणतो, याचाच अर्थ असा की, पत्नीमध्ये पती स्वतःचे प्रतिबिंब पाहातो, आपल्या उच्च ध्येयाचा प्रतिध्वनी तो तिच्यांत मिळवितो आणि त्यामुळे त्याची शक्ती दुप्पट होते. तू नेहमी अशी राहणार आहेस काय . . . . म्हणजे असेच विचार करणार– " मी सुंदर पोषाख करीन, चांगलेचुंगले अन्न खाईन, हसेन, नाचेन आणि शक्य तेवढ्या सुखांचा आस्वाद घेईन ? " मनाच्या या अवस्थेला प्रगती म्हणता येत नाही. अलीकडच्या काळात आपल्या देशांतील महिलांचे जीवन अतिशय संकुचित आणि तिटकारा वाटण्याजोगे झाले आहे. त्या सर्वांचा त्याग करुन माझ्याबरोबर ये. ह्या जगांत ईश्वराने दिलेले कर्तव्य करायला आपण आलो आहोत, आपण ते कार्य करु या.

तुझ्या स्वभावात एक दोष आहे– तू फार भोळी आहेस. कोणी काहीही सांगितले तरी तू ऐकतेस. त्यामुळे तुझे मन सदैव अस्वस्थ राहाते, आणि तुझ्या बुध्दीला त्यामुळे वाढता येत नाही, मग कोठल्याही कामात एकाग्रता आणणे जमत नाही. त्यात सुधारणा झालीच पाहिजे ; त्यासाठी एकाच व्यक्तीचे ऐकून तू ज्ञान संपादणे आवश्यक आहे, एकदा ध्येय निश्चित केल्यानंतर तुला कार्य साधलेच पाहिजे, लोकांची निंदा आणि टीका ह्यांच्याकडे तू पूर्ण दुर्लक्ष करणे आवश्यक आहे आणि तुझ्या मनातली भक्ती स्थिर आणि अढळ राहाण्याची गरज आहे.

आणखी एक दोष आहे–मात्र तो तुझ्या स्वभावाचा नसून काळाचा आहे. बंगालमधील काळ आता असा आला आहे : लोकांमध्ये गंभीर विषयाबाबत काही ऐकून घेण्याची पात्रता राहिलेली नाही ; धर्म, तत्त्वज्ञान, उच्च ध्येय, अपार त्याग, देशाचे स्वातंत्र्य अशा विषयांची ते टिंगलटवाळी करतात ; जे जे गंभीर उच्च आणि उदात्त आहे ते ते हसण्यावारी नेण्याकडे त्यांची प्रवृती झुकली आहे, ब्रालो विचारप्रणालीशी प्रदीर्घ काळ संबंध आल्याने तुझ्यात हा दोष किंचित प्रमाणात निर्माण झालेला आहे ; बरीनमध्येही तो दोष होताच, विशेषतः देवघरच्या लोकांमध्ये हा दोष आश्चर्य वाटावे एवढा वाढला आहे. आपल्या मनातून ह्या दोषाचे साफ उच्चाटन करणे अत्यावश्यक आहे ; तुला ते सहजपणे जमेल, आणि विचार करण्याची सवय एकदा मनाला लावून घेतलीस की, तुझा खरा स्वभाव फुलून येईल ; मुळात तुझ्या स्वभावातच परोपकार, मानवतावाद आणि स्वार्थत्यागाची वृत्ती आहे फक्त

मन:शक्तीचीच उणीव आहे ; ती शक्ती तुला परमेश्वरावरील श्रद्धेतून मिळेल. ईश्वरावरील तुझी निष्ठा तुला ती शक्ती प्रदान करील.

हेच माझे रहस्य होते. कोणाजवळही त्याची वाच्यता न करता शांत आणि स्थिर चित्ताने याबाबत विचार कर, त्याबाबत भीती बाळगण्याचे कारण नाही उलट विचार करण्यासारखे मात्र खूप आहे. सुरुवातीला परमेश्वरी चिंतनासाठी, ध्यानासाठी रोज अर्धा तास जरी दिलास तरी पुरेसे होईल, आणि तुझ्या उच्च आशा-आकांक्षा ईश्वरापाशी प्रार्थनेच्या रूपात पोचव. हळू हळू मनाची तयारी होत राहील. ईश्वरापाशी तू नित्य ही प्रार्थना मांडत जा–'' माझ्या पतीचे जीवन, त्याची ध्येये व आदर्श आणि परमेश्वर प्राप्तीचे त्याचे मार्ग ह्यात माझा कोठेही अडथळा होता कामा नये ; मला त्याची सहाय्यक आणि साधन बनू दे ''. हे तू करशील काय ?

तुझा

( ही पत्रे मूलतः बंगालीतून लिहिलेली होती. अलीपूर बॉम्ब खटल्याप्रकरणी श्री. अरविंदाना अटक व त्यांच्या घराची झडती पोलीसांनी घेतल्यावर ही पत्रे जप्त करण्यात आली होती. न्यायालयात पुरावे म्हणून ती सादर करण्यात आली ; त्यामुळे ही पत्रे प्रकाशित होऊ शकली. )

## ५. सिंहावलोकन !

१६-४-१९०७

**गेल्या वर्षातील सर्व क्षेत्रातील घडामोडींचा आढावा घेताना श्रीअरविंद म्हणतात, स्थिर आणि शीघ्र वृद्धीचे हे इतिवृत्त आहे आणि ते आपल्याला केवळ प्रारंभ आणि तयारीच्या अपेक्षापेक्षा खूपच पुढे घेऊन जाणारे आहे.**

जगाच्या इतिहासात असे अनेक कालखंड आहेत की जेव्हा त्याची नियती घडविणाऱ्या अव्यक्त शक्तींना नवे पोटतिडिकेने हवेसे वाटते आणि जुन्याबद्दल धीर धरवत नाही. महन्मातेने आणि शक्तीने राष्ट्राना आपल्या ताब्यात घेऊन त्याना नव्याने घडविण्याचा निर्धार केलेला दिसतो. ह्या काळात द्रुतगतीने विनाश होत असतो आणि उत्साहाने नवनिर्मिती होत असते. वातावरण लोकांच्या धूमधडाक्याने आणि सैन्याच्या जोरकस चालीने भरून गेलेले असते. मोठ्या पडझडीचे आवाज घुमत असतात आणि वेगवान तसाच प्रचंड क्रांतीचा गोंधळ उडालेला असतो. जग एका उकळत्या कढईत घातलेले असते आणि नवे आकार व नवी अंगोपांगे घेऊन बाहेर पडत असते. ह्या काळात शहाण्यांचे शहाणपण गोंधळलेले असते आणि विचारवंतांचे विचार हास्यास्पद ठरतात. कारण तो दिवस प्रेषितांचा, स्वप्नद्रष्ट्याचा, धर्मवेड्यांचा, धर्मयोध्यांचा असतो, जेव्हा अवतार जन्माला येतात आणि चमत्कार घडतात, तो दैवी चमत्काराचा दिवस असतो. अठराव्या शतकाचा अंत आणि एकोणिसाव्या शतकाचा प्रारंभ असा तो काळ होता. कारण तेव्हा विसाव्या शतकाच्या उदयात आपण वावरत होतो. आणि तेव्हा त्या बाल्यावस्थेत असे चमत्कार घडलेले आपण पाहिले आहेत. त्यापूर्वीच्या गोंधळाचा परिणाम म्हणून नव्या युरोपचा जन्म झाला आणि पश्चिम युरोपचे आधुनिकीकरण झाले. आता आपण नव्या आशियाच्या जन्माला साह्य करीत असून पूर्वेचे आधुनिकीकरण करू इच्छीत आहोत. दूरवरच्या अमेरिकेतून ह्या प्रवाहाचा प्रारंभ झाला आहे पण त्या गडबडीचा मध्यबिंदू पश्चिम आणि मध्य युरोप होता. ह्यावेळी आता येथे तीन प्रवाह चालू आहेत. दक्षिण आफ्रिकेतील बंडखोर राष्ट्रीयता, जपानपासून प्रारंभ होणारे आशियाचे पुनरुज्जीवन आणि रशियापासून सुरु झालेली पूर्वेकडील लोकशाही ; आणि ह्या सर्व गडबडीचा केन्द्रबिन्दु एक सर्व पूर्ण, दक्षिण आणि पश्चिम आशिया, उत्तर किंवा आशियालगतचा आफ्रिका आणि रशिया इतके विशाल क्षेत्र असून तो युरोपातील आशियान्तर्गत भाग आहे. क्रांतीची गती जसजशी वाढत जाईल तसे पुढील वर्ष हे मागील वर्षापेक्षा अधीक घटनायुक्त असेल आणि अंतिम ध्येयपूर्तीच्या अधीक प्रगतीने लक्षणीय ठरेल. नव्या शतकातील कोणतेही वर्ष १९०६-०७ म्हणजे आपले १३१३ ह्या वर्षापेक्षा अधीक घटनापूर्ण झाले नाही.

आपण परदेशाकडे लक्ष दिले तर संपूर्ण क्षेत्र खळबळीने आणि सर्वत्र नवनिर्मितीने व्यापून राहिले आहे. अतिपूर्वेकडे ह्या वर्षात काही नवीन विस्मयकारक घटना घडल्या नाहीत, पण एकूण परिणाम मात्र फारच आहे. गेल्या बारा महिन्यात अन्य कोणाला किंचितही कल्पना करता येणार नाही इतक्या वेगाने चीन स्वतःला शिक्षित, प्रशिक्षित आणि सेनापूर्ण करीत आहे. त्या देशाने आपली पाहणी पथके पश्चिमेकडे पाठवली असून येत्या दहा वर्षात घटनात्मक शासन विकसित करण्याचे ठरवले आहे. त्या देशाने आपली शिक्षणपद्धती क्रांतिद्वारे प्रगत करण्याचे आणि आधुनिक गरजांशी समांतर करण्याचे निश्चित केले आहे. आपल्या लोकांच्या शक्ती नष्ट करणाऱ्या अफूच्या शापातून समाजाला मुक्त करण्याचे काम त्या देशाने निर्धारपूर्वक हाती घेतले आहे. विकासाच्या कार्याला उपयोगी पडावेत म्हणून त्या देशाने आपले हजारो तरुण परदेशात विशेषतः जपानकडे प्रशिक्षणासाठी पाठवले आहेत. जपानी प्रशिक्षितांच्याद्वारे शांतपणे लढाईसाठी स्वतःला प्रशिक्षित केले आहे आणि शिस्तबद्ध सैन्य संघटित करण्यासाठी त्या देशाने प्रचंड प्रगती केली आहे आणि आता प्रभावी नौदलाचा पाया घालण्यात व्यग्र आहे. ब्रिटिश व्यापाऱ्यांच्या उर्मट निषेधाला न जुमानता त्या देशाने आपल्या राष्ट्रीय प्रयोजनासाठी प्रचंड जकात महसूल आपल्या हातात घेतला आहे. आपल्या यशस्वी धोरणाने त्याने इंग्लंडला तिबेटवर करावयाच्या अविवेकी आणि लुटारु हल्ल्याच्या कलीपासून वंचित केले आहे आणि मंगोलीयन जगताच्या पाहणी चौक्यावर आपला सक्त ताबा ठेवला आहे.

गतवर्षात जपानने स्वदेशात आणि परदेशातही आपला औद्योगिक विस्तार मोठ्या उत्साहाने पुढे नेला आहे. मांचुरियावर त्याने जवळजवळ संपूर्ण व्यापारी विजय मिळवला आहे आणि युरोपीय व्यापारावर नेटाने संघर्ष करून त्या देशाची उत्पादने आता युरोप आणि अमेरिकेवर आक्रमण करीत आहेत. त्याने आपल्या सैन्याचे पुर्नगठन इतक्या विशाल आणि परिपूर्ण रीतीने केले आहे की, ते द्वीपसाम्राज्य आपल्या कार्यक्षेत्रात अजेय बनले आहे. त्या देशात आणि अमेरिका दरम्यान एक लहानसा ढग उत्पन्न झाला आहे पण नेहमीच्याच सहजतेने त्या देशाने आपले आचरण चालू ठेवले आहे. सौम्यता आणि शांत दृढता. आणि असे संकट कितीही मोठे झाले तरीपण एक खात्री निश्चित बाळगू शकतो की त्या देशाची भौतिक आणि नैतिक हानी मुळीच होणार नाही.

अतिपूर्वेकडील भव्य भागात भावी चळवळीच्या किंचित खुणा दिसत आहेत. फिलिपाइन्समधील गडबड आता संपली असून अमेरिकेने तेथील निवासीना स्वयंशासनाचे काही हक्क दिले आहेत. ते जर फिलिपिनी लोकानी विवेकाने आणि उत्साहाने वापरले तर स्वयंपूर्ण स्वातंत्र्यांमध्ये त्यांचे परिवर्तन करणे शक्य आहे. घुसखोर फ्रान्सला बऱ्याच मोठ्या भूभागाची किंमत देऊन आंतरिक सार्वभौमत्वावरील अपमानकारक बंधनातून त्याने मुक्ती विकत घेतली आहे. त्या देशाने आपल्या नाविक आणि वैमानिक विकासाकडे अधीक लक्ष देण्यास सुरवात केली आहे आणि आपले स्वातंत्र्य अबाधित ठेवण्याचा हाच एक मार्ग आहे

असे जर त्या राष्ट्राला उमगले असेल तर ते चांगलेच म्हटले पाहिजे. मंगोलियात आशियातील समाज एवढा एकच नाजुक प्रश्न आहे. अन्यथा ह्या वर्षातील अन्य घटना असे सुचवितात की जपानने रशियाला जबरदस्त धक्का देऊन, युरोपीय देशांच्या अतिपूर्वेकडील भाग व्यापण्याच्या प्रक्रियेला बंधन घातले आहे.

पण मुस्लीम जगतातील सरशी हा गत वर्षातील सर्वात लक्षणीय भाग आहे. त्या देशाने राष्ट्रीय बृहद् योजना लागू केली आहे. आधुनिक पद्धतीवर आधारलेला आणि शास्त्रीय ज्ञान तसेच प्रशिक्षण ह्यानी युक्त असलेला राष्ट्रीयत्वाचा भरभक्कम पायाच आहे. अमीर अब्दुल रहमान ह्याने अफगाणिस्थान संघटित केला आहे. राजकारणपटुत्वामध्ये आपल्या वडिलांपेक्षा यत्किंचितही कमी नसलेल्या हबीबुल्लाचे जीवितकार्य पुढे चालवून त्या देशाला आधुनिक बनविण्याचे कार्य त्यानी सुरूच ठेवले आहे. इराणमध्ये ह्या वर्षाने शांतीपूर्ण क्रांती घडवून आणली आहे. एका आशियाई राजाने यत्किंचित विरोध सहन करून आपल्या प्रजेला संसदीय शासन बहाल केले आहे आणि इराण आपल्या राष्ट्रीय जीवनात पुन्हा चूर आहे. इजिप्तमध्ये राष्ट्रीय चळवळीचा इंग्लंडच्या सत्ताभ्रष्ट करण्याच्या भूमिकेशी संघर्ष झाला. तो अराबी पाशाने दाखवलेल्या मार्गापेक्षा केवळ प्रभावी आणि शिस्तबद्ध होता इतकेच नव्हे तर तो खुद्द देशाच्या सत्ताधारी सम्राटाकडून घडून आला. देशशाही येथील क्रूरतेचे ब्रिटीश प्रदर्शन आपला हेतू तर पूर्ण करू शकले नाहीच उलट इजिप्शियनाना भीषण शरणागती स्वीकारण्याऐवजी त्याने अधीक संघटीत आणि दृढनिश्चयी केले. अन्य मुस्लीम जगताला जागृती देऊन त्याची झळ लागणे हा केवळ आता काळाचा प्रश्न असून त्याने युरोपियन सत्ताधारकाला पूर्वेप्रमाणेच पश्चिम आशियातपण धरबंध घातला आहे.

ह्या विशाल आशियाई चळवळीत भारत कोणती भूमिका बजावणार आहे ? शके १३१३ त भारताने काय केले ? भारतानेपण प्रचंड प्रगती केली आहे आणि त्याचे फलित प्रत्यक्ष दिसल्याखेरीज त्याचे योग्य मूल्यमापन आपण करू शकणार नाही. वर्षाला आरंभ बारिसालेने झाला आणि कोमिल्लाने ते संपले. ह्या एकाच परिवर्तनाने पूर्व बंगामधील संघर्षाची वाढती उग्रता मोजता येईल आणि पृष्ठभागावर दिसतो त्यापेक्षा त्याचा अर्थ अधीक खोल आहे. त्याचा अर्थ असा आहे की भविष्यकाळात भारताचे स्वामित्व मिळविण्यासाठी ज्या दोन शक्तीनी संघर्ष केला पाहिजे त्या म्हणजे ब्रिटीश नोकरशाही आणि भारतीय जनता ह्या प्रत्यक्ष लक्ष्याला समोरासमोर उभ्या आहेत. बरिसाल म्हणजे हुतात्म्याप्रमाणे प्रतिकार, सहनशीलता ; कोमिल्ला म्हणजे प्रत्यक्ष धैर्यपूर्ण विरोध. सध्या हे युध्द फार पूर्वेकडील, ह्या विशाल देशाच्या पूर्वेकडील सरहद्दीवर चालू आहे. पण जशी त्याची तीव्रता वाढेल तसे ते पश्चिमेकडे पण फैलावले पाहिजे. वाढत्या दावानलाच्या ठिणग्या पश्चिम बंगालला आग लावतील आणि भारतहि आता इतका संघटीत झाला आहे की नोकरशाहीला हा लढा एकटा पाडणे फार कठीण जाईल.

ह्या वर्षातील दुसरी घटना म्हणजे राष्ट्रीय पक्षाची शीघ्र प्रगती. थोड्याच दिवसात त्याने पूर्व बंगाल आत्मसात केला आहे. अलाहाबाद आणि उत्तरेकडे आग लावली आहे आणि मद्रासला तळापासून ढवळून काढले आहे. बंगालमध्ये आपल्या नैतिक प्रभावाने ती इतकी स्वतंत्र आणि मान्यताप्राप्त शक्ती झाली आहे की, ह्यापुढे विनंतीअर्ज करणे जवळ जवळ मृत झाले असून संपूर्ण राष्ट्र स्वविकास आणि प्रतिकारशून्य विरोध ह्या धोरणाने बध्दपरिकर झाले आहे. मराठीतील काही साप्ताहिके, पंजाबातील एक नियतकालिक आणि कलकत्त्यामधील संध्या आणि न्यु-इंडिया खेरीज संपूर्ण वृत्तव्यवसाय काही महिन्यापूर्वी अगदी जवळ जवळ तणावपूर्ण होता. मद्रासमधील बालभारत आणि आंध्रकेसरी, उत्तरेकडील अफताब, कलकत्त्यामधील आणि, स्थानिक वृत्तपत्रात दिसून येणारे नवचैतन्य, युगान्तर सारख्या वृत्तपत्राची एकाएकी वाढणारी लोकप्रियता आणि नवीन सिध्दांत नव्हे पण नवीन कल्पनांचा वृत्तपत्रांना होणारा संसर्ग ही निश्चितच वेगाने मूळ धरणाऱ्या राष्ट्रीयतेचे आणि संपूर्ण देशाचा ताबा घेत असल्याचे निदर्शक आहेत.

राष्ट्रीय शिक्षणातील वाढ ही गतवर्षातील तिसरी सिध्दी आहे. बंगाल राष्ट्रीय महाविद्यालय हे केवळ एक सुस्थापित वस्तुस्थिती नसून त्याच्या संख्येत वेगाने वाढ होत आहे आणि चांगल्या शिक्षण पध्दतीचा पाया घालण्याचे काम त्या संस्थेने सुरू केले आहे. वर्षाच्या प्रारंभी रंगपूर आणि ढाक्का येथील विद्यालये चालूच होती पण बारिसाल येथील उद्रेकानंतर लगेच मैमनसिंग, किशोरगंज, कोमिल्ला, चांदपूर आणि दिनापूर येथे नवी विद्यालये स्थापन झाली. तेव्हापासून ह्या संस्थेत सतत वाढ होतच आहे. मामुरा विद्यालय, जेसोर जिल्ह्यातून आणखी एक. जलपैगुरी येथे एक तसेच मोग्रा येथील निःशुल्क प्राथमिक शाळा, चितागांव आणि नोआखली येथेपण लवकरच राष्ट्रीय शाळा उघडण्यात येणार आहेत असे समजते. एका वर्षासाठी हा अहवाल उपेक्षणीय मुळीच नाही. अपेक्षिल्याप्रमाणे ही विद्यालये पूर्वबंगालमध्ये म्हणजे राष्ट्रीयतेच्या मोठ्या केन्द्रातच उघडली आहेत.

शके १३१३ मधील राष्ट्रीय प्रगतीचे हे इतिवृत्त आहे. स्थिर आणि शीघ्र वृध्दीचे हे इतिवृत्त आहे आणि जो आपल्याला केवळ प्रारंभ आणि तयारीच्या अपेक्षेपेक्षा खूपच पुढे घेऊन जाणार आहे, अशा एका प्रचंड प्रश्नाने हे वर्ष संपणार आहे. फार पूर्वी आपण अशी एक भविष्यवाणी ऐकली होती की १९०७ हे वर्ष भारताच्या प्रत्यक्ष स्वातंत्र्य लढ्याचे प्रारंभवर्ष ठरणार आहे. जणू काय असे वाटते की, तिप्पेबाह येथील उलाढालीने ह्याचा पहिला धक्का दिलाच आहे.

**वंदे मातरम्, १६ एप्रिल, १९०७.**

●●●

## ६. अतिरेकवाद नव्हे राष्ट्रवाद

२६-४-१९०७

**नवीन चळवळ प्राधान्यतः दुःशासनाविरुद्ध निषेध नाही, ती ब्रिटीश नियंत्रण चालू ठेवण्याविरुद्ध निषेध आहे. भारत हे एक महान स्वतंत्र राष्ट्र आहे आणि करावे ह्या निर्धारातून हा विचार जन्मास आला आहे. तो विनाशक, नकारात्मक प्रवाह नाही, ती अभिनव भारत निर्माण करण्याची विधायक आणि रचनात्मक प्रेरणा आहे. तो बंडखोरीचा, निराशेचा आक्रोश नाही तर राष्ट्रीय विश्वासाचा आणि आशेचा वेदमंत्र आहे. त्याचे तंतोतंत वर्णन अतिरेकी नव्हे तर लोकशाही राष्ट्रवाद आहे असे विवेचन श्रीअरविंद ह्यानी केले आहे.**

नवीन राजकारणाच्या इतक्या महिन्यांच्या प्रमाणित आचारानंतर आणि अत्यंत स्पष्ट आणि निर्धारीत विधानानंतर राष्ट्रीय पक्षाची अद्यापही इतकी गोंधळलेली वृत्ती आणि त्यानी निर्माण केलेले प्राथमिक प्रश्न ह्याबद्दल अत्यंत आश्चर्य वाटते. मूळ मुद्याचा हेतुपुःरस्सर केलेला विपर्यास आणि जाणूनबुजून बगल देण्याची वृत्ती ह्यामधून हा गोंधळ काहीसा निर्माण झाला आहे. अतिराजनिष्ठ असलेले प्रकाशक विशेषतः भारतीय अथवा आंग्लभारतीय ह्याना पक्षाच्या सत्य परिस्थितीकडे दुर्लक्ष करणे भाग पडत असून ते त्याना अतिरेकी असे नामाभिधान देतात कारण त्याना प्रश्नाच्या भरदार आणि दुर्निवार तर्कशास्त्राशी आणि सामान्य विचाराशी तोंड देणे अशक्य ठरत आहे. पण बहुसंख्य भारतीय राजकारण्यांची अपसमजूत ही मौलिक आहे. नवप्रणालीची राजकीय शिकवण ही इतकी अभिनव आणि राजकीय कल्पनाना, खरे तर परंपरागत अस्पष्ट आणि हस्तांतरीत सूत्राना जे स्थान देण्यात त्याना, त्याचे खरे आकलन करणे केवळ अशक्य आहे. त्या समजून घेण्यासाठी काही वेळ दिल्याखेरीज त्या बाधक आहेत म्हणून तोंड परत फिरवणे त्याना अशक्य आहे. ह्या अपसमजुतींपैकी सर्वात दृढ-मूल झालेली अपसमजूत अशी आहे की कर्झनशाहीच्या प्रतिक्रियेमधून निष्पन्न झालेले हे नवे राजकारण म्हणजे निराशावाद आणि वेडसर क्रांतिवादी संताप होय. तरूण राजकारण्यांवर आपली प्रबुद्ध श्रेष्ठता दाखवण्यासाठी किंवा चळवळीला कलंक लावण्यासाठी मूर्ख, पूर्व-ग्रहदूषित आणि लब्धप्रतिष्ठित टीकाकारानी हा अपसमज पसरविला आहे असे जेव्हा जाणवते तेव्हा आपण त्याकडे तिरस्काराने दुर्लक्ष करू शकतो. पण जेव्हा स्वच्छ आणि विचारी विरोधक प्रामाणिकपणे राष्ट्रवाद्याना समजून घेताना अशी चूक करतो तेव्हा आपणाला त्याला उत्तर द्यावेच लागेल आणि आपली अपसमजूतरहित आणि निःसंशय बाजू पुन्हा स्पष्ट करावीच लागेल.

आमच्या काही मित्रांची अशी धारणा आहे की सर्वोच्च विधिमंडळात डॉ. राशबिहारी घोष ह्यानी केलेल्या भाषणावर आम्ही केलेली टीका कडक आणि अन्याय्य आहे. त्यांचे म्हणणे असे की अतिरेकी पक्षाची बाजू त्यानी अतिशय उत्साहाने, स्पष्टपणे आणि धैर्याने पुढे मांडली आणि पक्षाबाहेर असणारी व्यक्ती जितक्या समर्थपणे पुढे मांडील तशीच ती मांडली. आम्हाला व्यक्तिशः डॉ. राशबिहारी घोष ह्यांच्याबद्दल कमालीचा आदर आहे. ते भारतातील प्रसिद्ध कायदेपंडित आहेत, इंग्रजी भाषेचे विद्वान अधिकारी आहेत. स्वतःच्या स्वतंत्र शैलीने युक्त असलेल्या साहित्याचे ते खाण आहेत. किंबहुना विधिमंडळातील सामान्य भाषणासाठी उपयोग करावा ह्याच्याही पलिकडचे त्यांचे ऐश्वर्य आणि व्यासंग आहे. पण कायदेविषयक ज्ञानातील आणि साहित्यातील सर्वोत्कृष्टता ही त्याना राजकारणातील ग्रहणक्षमता देत नाहीत. डॉ. घोष ह्यानी अलिकडेच ह्या क्षेत्राकडे लक्ष दिले आहे आणि राजकारणातील पक्की पकड येण्यासाठी राजकारणातील वस्तुस्थितीचा स्पर्श होण्याएवढा त्यांचा दीर्घ अनुभव नाही. सामान्यतः वापरली जाणारी मवाळ आणि अतिरेकी ही चालू नावे त्या पक्षांचे खरे स्वरुप दाखवीत नाहीत. वस्तुतः त्या दोन प्रणालीतील कल्पनाभेदाबद्दल पुष्कळदा घोटाळाच निर्माण करतात. इतर अनेकाप्रमाणे डॉ. घोष पण " अतिरेकी " ह्या नावाच्या तीव्र मनोगंडाने पछाडले असावेत. त्यांची अशी कल्पना आहे की त्या उभय पक्षांमधील भेद हा केवळ मनोवृत्ती आणि भावनांची तीव्रता ह्यावरच आधारला आहे. त्यांच्या मते अतिरेकी म्हणजे ते लोक की ज्यांची मते शहाण्यालाही वेडा बनवण्याइतपत दडपशाहीने कडवट बनली आहेत. त्यांच्या मनात नोकरशाहीची प्रतिक्रिया म्हणून इजिप्शियन गुलामगिरीपेक्षाही भावनिक असंतोष, संताप निर्माण झाला आहे. ब्रिटीश सरकार किंवा ब्रिटीश राष्ट्र ह्यांच्याकडून ती गुलामगिरी नष्ट होण्याच्या निराशेने दुःसाहसी अधीरपणाने अतिरेकी वृत्ती आणि अतिरेकी मार्गांचे समर्थन करीत असतात. म्हणून अतिरेकी प्रचार म्हणजे दुःशासनाच्या विरुद्ध निषेध आणि बंडखोरीकडे निराशापूर्ण वाटचालीची चळवळ होय. राष्ट्रीय स्थितीबाबत हे विधान आम्ही स्वीकारू शकत नाही. उलट ते जे काही नाहीत त्याचे नवीन राजकारण यशस्वी प्रतिपादन करीत असून ते जे आहेत त्याचे स्पष्ट विवरण करण्याचा, आरंभ करण्याचा तो आमचा प्रयत्न आहे.

नवीन चळवळ ही प्राधान्यतः दुःशासनाविरूद्ध निषेध नाही. ते ब्रिटिश नियंत्रण चालू ठेवण्याच्या विरूद्ध निषेध आहे. ते नियंत्रण चांगले की वाईट, न्याय्य की अन्याय्य हा केवळ दुय्यम आणि अनावश्यक विचार आहे. तो ब्रिटिश नागरिकत्व मिळण्याच्या अपेक्षेच्या वैफल्यातून निर्माण झाला नाही. . तो भारत हे एक महान स्वतंत्र आणि संघटित राष्ट्र व्हावे आणि ते करावेच असा समय आला आहे, ह्या निर्धारातून जन्माला आला आहे. तो विनाशक नकारात्मक प्रवाह नाही तर तो अभिनव भारत निर्माण करण्यामागची विधायक आणि रचनात्मक प्रेरणा आहे. तो बंडखोरीचा आणि निराशेचा आक्रोश नाही, तर राष्ट्रीय

विश्वासाचा आणि आशेचा वेदमंत्र आहे. त्याचे तंतोतंत वर्णन अतिरेकी असे नाही तर लोकशाही राष्ट्रवाद असे आहे.

हे खरे प्रश्न आहेत. खरे तर आज भारतात दोन नव्हे तर तीन पक्ष आहेत. राजनिष्ठ, नेमस्त आणि राष्ट्रीय. ब्रिटीश राजकर्त्यांनी चांगले शासन दिले आणि कारभारात थोडासा हिस्सा दिला की राजनिष्ठांचे समाधान होते. नेमस्ताना ब्रिटिश साम्राज्यांतर्गत स्वयंशासन अपेक्षित आहे पण त्यासाठी अनिश्चित काळपर्यंत थांबण्याचीही त्यांची तयारी आहे. राष्ट्रीय मात्र स्वयंशासनाखेरीज समाधान पावणार नाहीत. मग ते शक्य असेल तर साम्राज्यांतर्गत किंवा बाहेरही; आणि राष्ट्र म्हणून त्याना नाश पावावयाचे नसेल तर त्यानी ताबडतोब हालचाल केली पाहिजे आणि राष्ट्राने त्यासाठी थांबण्याची शक्यता नाही किंबहुना थांबूच नये असा त्यांचा विश्वास आहे. स्वातंत्र्यासाठी आवश्यक ती क्षमता आणि ते गुण भारतीयांमध्ये नाहीत आणि जरी त्यानी आवश्यक ती पात्रता प्राप्त केली तरी पण त्यांच्या आणि मानवतेच्या हितासाठी त्यानी ब्रिटीश साम्राज्याचा एक स्रोत म्हणून राहाणे चांगले आहे असा राजनिष्ठांचा वि:श्वास आहे. स्वातंत्र्यासाठी प्रयत्न ही नियतीविरूद्ध बंडखोरी ठरेल आणि देशाचा सर्वनाश मात्र ओढवेल. राजनिष्ठांचे असे मत आहे की भारत हे कधीही स्वतंत्र, महान आणि संघटित राष्ट्र होणे शक्य नाही, होऊ नये आणि होणार नाही. स्वातंत्र्याच्या ध्येयाकडे जाण्यासाठी हे राष्ट्र अतिशय दुबळे आणि असंघटित आहे असा नेमस्तांचा विश्वास आहे. स्वातंत्र्य मिळाले तर ते त्याचे स्वागत करतील, पण स्वातंत्र्य मिळवणे आणि ते मिळवलेले स्वातंत्र्य राखून ठेवणे ह्यासाठी आवश्यक ती साधने आणि शक्ती नजिकच्या भविष्यकाळात आपणाजवळ असतील किंवा आपण मिळवू शकू ह्याबद्दल त्यांची खात्री नाही. म्हणून वसाहतीच्या स्वयंशासनाचे ध्येय ते समोर ठेवतात आणि राष्ट्राची शक्ती आणि संघटन गृहीत धरण्याच्या कुठल्याही पद्धतीच्या प्रयत्नाबद्दल ते नाखूष असतात. नेमस्तांचे मत असे आहे की भारत अंततोगत्वा संघटित होईल, काही मर्यादेपर्यंत स्वयंशासित आणि ऐश्वर्यशालीपण होईल परंतु स्वतंत्र आणि महान होणार नाही. राष्ट्रीयांची धारणा अशी आहे की भारतीय हे कुठल्याही गुलाम राष्ट्राप्रमाणे स्वतंत्र होण्यास समर्थ आहेत आणि त्यांच्यात जे दोष आहेत ते गुलामगिरीमुळे आले असून ते स्वातंत्र्याच्या संघर्षामधूनच नष्ट होतील. त्यांच्यापाशी शक्ती आहे. आणि जर त्याना इच्छा झाली तर स्वातंत्र्यासाठी लागणारी साधने त्याना नक्कीच निर्माण करता येतील. त्यांची अशीपण धारणा आहे की , एकाधिकार अथवा प्रांतिक स्वयंशासन, किंवा स्वातंत्र्य आणि पारतंत्र्य ह्यामधून निवड करण्याचा हा प्रश्नच नाही, तर तो स्वातंत्र्य आणि राष्ट्रीय अध:पात आणि विनाश ह्यामधील निवड आहे. शेवटी त्यांची अशी धारणा आहे की भारताचा पूर्वेतिहास आणि आजची परिस्थिती अशा स्थितीत आहेत की आजपर्यंतच्या दुर्लक्ष अडथळ्यानी चक्रावून सोडणाऱ्या एकीकरण प्रवृत्तींना शेवटी यशासाठी योग्य ती परिस्थिती आज निर्माण झाली आहे. त्यांची अशी श्रद्धा आहे की, भारताच्या एकीकरणाचा आणि स्वातंत्र्याचा देवाने ठरवलेला समय आला आहे. सारांश, त्यांची अशी

खात्री झाली आहे की भारताने स्वतंत्र होण्याचा प्रयत्न करावा, तो स्वतंत्र होणे शक्य आहे आणि तो स्वतंत्र होईल, कारण त्याच्या पूर्व आणि आताच्या प्रेरणांदरून प्रयत्नाकडे त्याला अपरिहार्यपणे जावेच लागेल आणि त्यातून राष्ट्रीय आत्मसाक्षात्काराची प्राप्ती होईल. श्रद्धा आणि वेदमंत्र हे राष्ट्रीय ब्रीद आहे.

वंदे मातरम्. २६ एप्रिल, १९०७

## ७. भारत स्वतंत्र व्हावा काय ? . . . . . १ २७-४-१९०७.

राजनिष्ठांचा वेदमंत्र या लेखात श्रीअरविंद म्हणतात की, ह्या देशात शहाण्यासुर्त्या लोकांचा असा एक वर्ग आहे की ब्रिटीश लोकशाहीची सत्ता हे एक वरदान असून एकता निर्माण कण्यासाठी नव्हे तर ती सुरक्षित ठेवण्यासाठी ती आवश्यक आहे अशी त्यांची समजूत आहे. परकीय सत्तेला ते परमेश्वरप्रेरीत समजतात. श्रीअरविंद सांगतात की परकीय सत्ता ही प्रतिकार करण्यासाठीच असते आणि तिला मान्यता म्हणजे निसर्गाने ज्या हेतूने ती निर्माण केली तो पराभूत करणे होय.

### राजनिष्ठांचा वेदमंत्र

राष्ट्राच्या स्वस्थ आरोग्यासाठी आणि चैतन्यपूर्ण जीवनासाठी स्वातंत्र्य ही पहिली आवश्यकता आहे. परकीय एकाधिकारशाही ही मूळातच अनैसर्गिक स्थिती आहे आणि जर ती मान्य केली तर ती प्रजेमध्ये अनारोग्यकारक आणि अनैसर्गिक स्थिती उत्पन्न करते. त्याचा परिणाम म्हणजे आत्मघातकी अधःपात आणि विघटन. परकीय शासन हे केव्हाही राष्ट्रनिर्मिती करू शकत नाही. नुसता त्याला विरोध केला तरी समाजातील विसंवादी घटकांचे अभेद्य एकात्मतेत रूपान्तर होईल. ज्याची पूर्वनियोजित एकात्मता आहे असा समाज जर आपली नियती पूर्ण करू शकला नाही तर परकीय शासन ही निसर्गाची योजना आहे की, ज्यामुळे आवश्यक असा जबरदस्त दबाव निर्माण होतो आणि एकमेकाशी संघर्ष करणारे भाग सुसंवादी होतात. अपुऱ्या एकात्मतेची अनैसर्गिक अवस्था सुधारण्यासाठी काही काळासाठी परकीय सत्तेची अनैसर्गिक परिस्थिती आवश्यकच असते. पण हे केवळ प्रजेच्या प्रतिकारानेच शक्य असते. कारण परकीय वर्चस्वामुळे मिळालेली प्रेरणा ही केवळ परकीय सत्ता घालविण्याच्या इच्छेतच असते आणि ही इच्छा जर नसेल, लोकांची परकीय सत्तेला मान्यता असेल तर कोणतीही शक्ती एकात्मता निर्माण करू शकणार नाही. म्हणून परकीय सत्ता ही प्रतिकार करण्यासाठीच असते आणि तिला मान्यता म्हणजे निसर्गाने ज्या हेतूने ती निर्माण केली आहे तो पराभूत करणे होय.

हे विचार म्हणजे केवळ कपोलकल्पित कल्पनाविलास नसून ती जगाच्या इतिहासाची न आकारलेली शिकवण आहे, जगाच्या अनुभवाचा अभिलेख आहे. ह्या अनुभवावर राष्ट्रीयत्व आधारलेले असून तो भारतीय जनतेला ह्या गुलामगिरीला मूकसंमती न देण्याबद्दल सूचवीत आहे. कारण तसे करणे म्हणजे राष्ट्रावर मृत्यूनिद्रा ओढवून घेणे होय. एक स्वतंत्र राष्ट्रीय संघटन म्हणून आत्मसंस्मरण होण्यासाठी आणि एकतेसाठी ते परकीय प्रशासन उलथवून द्यावे

म्हणून निसर्गाने त्याची योजना केली आहे हे समजण्यासाठी ते आहे. पण ह्या देशात शहाण्यासुर्त्या लोकांचा असा एक वर्ग आहे की ब्रिटिश नोकरशाहीची सत्ता हे एक वरदान असून एकता निर्माण करण्यासाठी नव्हे तर ती सुरक्षित ठेवण्यासाठी ती आवश्यक आहे अशी त्यांची समजूत आहे. म्हणून ते परदेशीयावरील विश्वास आणि स्वकीयावरील अविश्वासाचा वेदमंत्र शिकवीत असून परकीय सत्तेला ती परमेश्वर प्रेषीत समजून शांती आणि उत्कर्ष ह्यासाठी ती अपरिहार्यपणे आवश्यक आहे म्हणून तिला मूकसंमती द्यावी असे म्हणतात. अशा लाचार वृत्तीविरूद्ध ज्यांची मने बंड करतात ते सुद्धा खुल्या मनाने राष्ट्रवादाचा स्वीकार करीत नाहीत आणि जीवन व मृत्यू ह्यांच्या मध्येच एकाद्या विश्रामधामावर थांबावे त्याप्रमाणे दास्यत्व आणि स्वातंत्र्य ह्यामध्ये तडजोड करू इच्छितात. त्यांच्या कल्पकतेने त्यानी एक परिनिकेतन शोधून काढले आहे जेथे स्वातंत्र्याची शुभ फळे ही पारतंत्र्याच्या सत्परिपाकाशी सुसंगत रीतीने मिळू शकतील आणि त्याला त्यांनी नाव दिले आहे वसाहतीचे स्वयंशासन. नेमस्तांचे हे मत आणि त्यांचा पक्षस्थितिनिष्ट विचित्र भ्रम जर अस्तित्वात नसता तर मूळ मुद्यांचा विचार करण्याच्या आणि राजकीयांच्या बाबावाक्याच्या वैर्थतेचा फोलपणा दाखविण्याच्या विचारात आंम्ही पडलोच नसतो. परंतु नेमस्तांचा भ्रम हा खरोखर राजनिष्ठाच्या भ्रमाचे उपउत्पादन आहे म्हणून प्रजेचा नाश करण्यापूर्वी तिचा पितरांचा समूळ नाश केला पाहिजे. नेमस्त हे संकरीत पीक आहे. भावनेने राष्ट्रीय पण बुद्धिने राजनिष्ट.

त्यांच्या भ्रमाच्या ह्या उभय स्वरूपामुळे तो भ्रम अतिशय दुष्टपणा करण्याची शक्ती मिळवतो. लोक त्यांचे ऐकतात कारण ते स्वतःला राष्ट्रीय म्हणवितात आणि पुष्कळदा खोट्या राजनिष्ठ युक्तिवादातून राष्ट्रीयता शिकवतात. शिवाय एकाच मंचावर नेमस्तांशी समझोता केल्यामुळे राजनिष्ठ लोकावर आपली छाप पाडू शकतात, जी अन्यथा त्याना कधीच शक्य झाली नसती, श्री. गोखल्यांच्या वेदमंत्राबरोबर श्री. फिरोजशाह मेहतांचा वेदमंत्र एकच आणि तोच आहे हा मुद्दा पुढे मांडण्याची अनुमती मिळाली नसती तर त्यांचा युक्तिवाद इतका हानीकारक झाला नसता. तर मग राजनिष्ठांचा हा महामंत्र कोणत्या मुळ कल्पनांपासून उद्‌भूत झाला ? ह्याला तीन चुका पायाभूत आहेत. त्यातील पहिली गृहीतकृत्ये म्हणजे भारतीयातील मुळातील विघटन आणि दुबळेपणाच्या प्रकृती ज्यामुळे त्याना असे वाटते की, परकीय बलवान राष्ट्राच्या त्रासापासून तडजोड करण्याकरिता राष्ट्रात शांतता राखून त्याचे रक्षण करण्यासाठी एखादी परकीय शक्ती आवश्यक आहे. दुसरी धारणा पहिली मधून निष्पन्न होऊन तिला पुष्टी देते. ती म्हणजे परकीय शक्तीला विरोध करण्यापूर्वी किंबहुना तसा विचार करण्यापूर्वी भारतीयातील जमीनदार आणि शेतकरी, ब्राह्मण आणि शुद्र, पंजाबी, बंगाली आणि मराठा इत्यादी जे भेद आहेत ते संपूर्णतः नाहीसे होऊन समाज एका पातळीवर आला पाहिजे. आणि तिसरी मान्यता अशी आहे की, आपण स्वातंत्र्यांचे स्वप्न पाहण्यापूर्वी, नव्हे एक राष्ट्र म्हणून पुढे येण्यासाठी जो बळकट विकास व्हावयास पाहिजे तो केवळ परकीय सत्ते- खालीच होईल. ह्या तीन धारणा जर मान्य केल्या तर राजनिष्ठांचे मत बिनतक्रार मान्य करावे लागेल. जर ह्या तीन धारणांना भक्कम आधार नाही असे सिद्ध केले तर

राजनिष्ठांचेच मत काय पण नेमस्तांची विचारधारणा पण आधारशून्य ठरते आणि त्या केवळ हवेतील कल्पना ठरतात. राष्ट्रावाद्यांचे असे स्पष्ट मत आहे की, ह्या धारणा राजकीय अपरिपक्वतेचे फळ असून त्याना इतिहासातील अनुभवाचा, भोवतालच्या वस्तुस्थितीचा किंबहुना मुळ गोष्टींचासुद्धा मुळीच भक्कम आधार नाही. परकीय अधिराज्याच्या मूळ कल्पनेशीच त्या विसंगत आहेत. अन्य गुलाम राष्ट्रांच्या अनुभवाकडे त्या दुर्लक्ष करतात आंणि त्या मानवी स्वभावाकडे आणि समाजातील मानवी विकासाच्या पूर्णवर्ती कल्पनांकडे दुर्लक्ष करतात. राजनिष्ठांचा वेदमंत्र जितका क्षुद्र तितकाच तो असत्यपण आहे.

### मुखवटा दूर फेका--

आंग्लभारतीय वृत्तपत्रे समाजाला धीर देण्याचा असा प्रयत्न करतात की ब्रिटीश तलवारीच्या धाकाखाली जमालपूरमध्ये सर्वत्र शांतता आहे. पण अनेक भारतीय वृत्तपत्रातून येणारे वृत्त मात्र परिस्थितीचे भिन्न चित्र दाखवतात. सकृतदर्शनी असे दिसते की शांतता राखावयासाठी आणलेल्या गुंडांना स्थानिक गुंडांशी सहकार्य करून सर्व ठेचून टाकण्यासाठी सहकार्य करायला अनुज्ञा दिली आहे. मूर्तीभंगाचे प्रकरण हेतूपुरस्सर टाकले जात असून हिंदूंना जरब बसवण्याकडे सर्व नोकरशाहीची शक्ती वापरण्यात येते. जमालपूरचे अनेक वकील, मुकत्यार, रामगोपालपूरचा नायब, गौरीपूर मिळकतीचा अधीक्षक आणि अनेक अग्रणी सज्जनाना अटक केली आहे. एक बातमीदार कळवितो की, " अटक केलेल्या मुसलमानांची संख्या केवळ शून्य आहे " ह्यावर भाष्य नकोच आहे. ब्रिटीश नोकरशाहीची गुंडांशी मैत्री ही स्पष्टच आहे. मुसलमानांच्या दंग्यांचा लाभ उठवून ज्यांच्यावर हल्ला झाला आहे अशा हिंदुवर कायदेशीर कारवाई करून त्याना घाबरवून सोडणे हे स्थानिक दंडाधिकाऱ्यांचे पहिले कर्तव्य ठरले आहे. आम्ही पूर्वीच असे दाखविले आहे की एकूण स्वदेशी विरोधी शक्तीना हिंसाचारासाठी आणि लुटमार करण्यासाठी भरपूर अवधी आणि अवकाश द्यावयाचा आणि स्वदेशीवाल्याना स्वसंरक्षण केल्याबद्दल किंवा स्वतःला इजा करून घेतल्याबद्दल शिक्षा करावयाची असे हे एकूण कारस्थान आहे. म्हणजे मुखवटा दूर झालाच.

### भीतीग्रस्त राजनिष्ठ--

पंजाबातील घटनांमुळे केवळ ' इंग्लिश मन ' नव्हे तर " इंडियन मिरर ' पण गंभीरपणे भीतीग्रस्थ झाले आहे. आश्चर्य काहीच नाही. पंजाबची सिंहवृत्ती रणजितसिंहाच्या चितेवर जळून गेली नाही ; ती काही काळ निद्रीत होती आणि आता ती जालियनवालानंतर परत जागी झाली आहे. साम्राज्याच्या सुरक्षिततेसाठी ' मिरर ' अस्वस्थ आहे. पूर्व बंगालमध्ये काय घडत आहे ह्याची ' मिररला ' परवा नाही, पण असंतोष जर पंजाबमध्ये पसरला तर त्याची झळ ' मिररला ' पोहोचेल आणि मग ब्रिटिश साम्राज्याचे आणि ' इंडियन मिरर ' चे काय होईल ? आमच्या जराजीर्ण समकालिनाने सुचविलेला उपाय असा आहे की देश शांत होईपर्यंत आपण सर्व जाहीर सभा स्थगित करून संपूर्ण राजकीय आंदोलन थांबवावे आणि

बाबू बिपिनचंद्र पाल ह्यानी लोकाना ' स्वदेशी, बहिष्कार, स्वराज्य आणि अन्य गोष्टीबद्दल ' चेतवण्यासाठी दक्षिणेकडे जाऊ नये. सर डेन्सिल इव्हर्टन ह्यांनीपण ' ममतेने हा विकार दूर करावा ' असा सल्ला दिला आहे. हा शहाणपणाचा सल्ला आहे आणि निःसंशयपणे त्यांचे कनवाळू कान तो ऐकतील कारण त्याना तरी ' इंडियन मिरर ' शिवाय अन्य सदि्च्छक कुठे मिळणार ? श्री. बिपिनचंद्रांच्या सभातील भाषणांमुळे ' ही राजकीय अस्थिरता दूर होण्याची लक्षणे नसून उलट आगीत तेल ओतल्याप्रमाणे नक्कीच होणार आहे '. अहो मग त्याचे अन्य प्रयोजन काय असणार ? देशाला अंगाई गीत गाऊन पुन्हा गुलामगिरीतच पाडण्याचे ? '' मिरर '' आम्हाला एका आदरणीय वृद्धेच्या कथेचे स्मरण करून देते. त्या वृद्धेच्या घरात रात्री चोर शिरल्यामुळे ती जागी झाली आणि तिने सर्वांना सांगितले की, '' मुकाट कुशीवर वळून घर शांत होईल तोपर्यंत शांत झोपण्याचे सोंग करून रहा. '' आणि चोरांनी त्यांचे काम प्रतिकार न होता पार पाडले. आम्हाला असे वाटते की अतिरेक्यांचा एक लहानसा आणि उपेक्षणीय पक्ष असून त्याला देशात फारसे अनुयायी नाहीत असा शोध '' मिरर '' ला लागला '' मिरर '' ने उद्‌घोषित केले आहे की, देश नेमस्त पक्षाच्या पाठीमागे आहे. त्या सुखदायी विश्वासाच्या एवढ्या लवकर चिंधड्या झाल्या काय ?

**वंदे मातरम्. २७ एप्रिल, १९०७**

## ८. भारत स्वतंत्र व्हावा काय ? . . . . . २ २९-४-१९०७.

**परकीय शासनाखाली देशाचा विकास होईल, राष्ट्रीय स्वातंत्र्य क्षुल्लक आहे. निदान त्याचे महत्त्व अतिशयोक्त आहे, ह्या राजनिष्ठांच्या मताचे खंडन करताना श्रीअरविंद प्रतिपादितात की परकीय शासन हे अनैसर्गिक आणि राष्ट्राला घातक आहे. गुलाम राष्ट्र हे परावलंबी व विसंघटीत होते आणि आपल्या चैतन्याच्या सर्व शक्ती गमावून बसते. राष्ट्रीय अभिवृद्धीसाठी राष्ट्रीय स्वातंत्र्याशिवाय राष्ट्रीय विकास सुतराम् शक्य नाही.**

### राष्ट्रीय विकास आणि परदेशी शासन

राजनिष्ठांच्या मनोवृत्तीचा विचार करता ज्या धारणा भारताला विशेषेकरून लागू होतात त्यांच्याऐवजी ज्या सामान्य विचारप्रणाली आहेत त्यांचा प्रथम विचार करणे अधिक सोयीचे होईल. असा एक ग्रह आहे की, परकीय सत्तेखाली देशाचा बळकट विकास होईल. ह्या मताप्रमाणे राष्ट्रीय स्वातंत्र्य हे क्षुल्लक आहे. निदान त्याचे महत्त्व अतिशयोक्त म्हटले आहे. स्वातंत्र्याशिवाय राष्ट्रे जगू शकतात, लोकाना सुखी आणि समाधानी ठेवण्याइतपत चांगले शासन असले आणि त्याने त्याना त्यांच्या आर्थिक व्यवहाराचा तसेच नैतिक गुणांचा विकास करण्याचे स्वातंत्र्य दिले म्हणजे पुरे. त्यानी परकीय शासनाबद्दल खंत बाळगू नये. काही राष्ट्राना त्यांच्या विकासाच्या काही काळात स्वातंत्र्य हे अनर्थकारक ठरते आणि परकीय शासन हीच सुयोग्य परिस्थिती ठरते. ह्या काळात भारत हे एक त्याचे उदाहरण आहे, असा राजनिष्ठांचा युक्तीवाद. स्वतःचा व्यापार वाढवणे, शिकून सुबुद्ध होणे, आपला समाज आणि त्याच्या पद्धती सुधारणे आणि स्वंयशासनासाठी अधिक आणि अधिक सुलभ होणे हे ह्या देशातील लोकांचे पहिले कार्य आहे. जसजसे ते अधिक सुधारतील आणि अधिक सुपात्र होतील तसतसे त्यांच्या सहृदयी, न्यायी आणि विवेकी शास्त्यांकडून त्यांच्या देशाच्या शासनामध्ये त्यांना अधिकाधिक सहभाग मिळेल आणि अंती संपूर्ण सुपात्रता प्राप्त झाली की त्यांना ब्रिटिश नागरिकत्वाचा संपूर्ण दर्जा मिळेल. कल्पना अशी आहे की, परदेशी सत्ता ही सुधारणेच्या पद्धती आणि स्वयंशासनाची कला ह्यांमध्ये अकुशल लोकाना प्रशिक्षण देण्यासाठी नियतीची योजना किंवा निसर्गाची व्यवस्था आहे. हा सिद्धांत हा आधुनिक शोध आहे. प्राचीन आणि मध्ययुगीन साम्राज्यवाद्यानी उघडपणे ' बळी तो कान पिळी ' हे तत्त्व स्विकारले होते. विजेत्या राष्ट्राची सैनिकी श्रेष्ठता हीच मुळी त्यानी शासन करावे आणि गुलाम राष्ट्राने ते निमूट पाळावे याचे प्रतीक होती. गुलाम राष्ट्राला स्वातंत्र्य हे नियतीनेच

नाकारले असल्यामुळे ते त्याना पथ्यकर होणार नाही आणि शासनकर्त्यांनी ते आता किंवा नंतर त्यांचे आहे हे स्विकारण्याचा प्रश्न येत नाही. नृशंस विश्वासघात आणि क्रूर हत्या ह्यांच्याच पद्धतीने इंग्लडने आयर्लन्डला जिंकले आणि त्याच वृत्तीने त्या देशावर राज्य केले. आजच्या काळात तुर्कस्थान आणि रशियासारख्या देशात तो हुकुमशहाचा एकाधिकार समजण्यात येते. पण भारतातील आपली पकड इंग्लंडने घट्ट करीपर्यंत आधुनिक जगात फार बदल घडून आला होता. स्वातंत्र्य आणि लोकशाही ह्यांच्या परिपक्व कल्पना युरोपीय मनामध्ये खोल रुजल्या होत्या. आणि एकोणविसाव्या शतकातील युरोपवर राष्ट्रवादाचा प्रसार होऊन तो सुस्थापित झाला होता. निरंकुश सत्ता मग ती कुठल्याही प्रकारची असली तरी ती मानवतेविरुद्ध गुन्हा आहे हा विचार उत्स्फूर्त भावनेत दृढमूल झाला असून राष्ट्राने राष्ट्राला, वर्गाने वर्गाला आणि व्यक्तीने व्यक्तीला गुलाम बनविणे ह्याविरुद्ध आधुनिक नैतिकता आणि भावना ह्यानी बंड पुकारले आहे. साम्राज्यवादाला ह्या आधुनिक भावनेसमोर स्वतःची तरफदारी करावी लागली. परंतु न सुधारलेल्याना सुधारण्यासाठी आणि अप्रशिक्षिताना प्रशिक्षित करण्यासाठी आमच्यावर सोपवलेले स्वातंत्र्याचे विश्वस्त म्हणून तोपर्यंत काम करू असे दांभिकपणाने सांगूनच वेळ मारून न्यावी लागली. तोपर्यंत ह्या उपकारी नेत्याने आपले कार्य केलेले असेल आणि निःस्वार्थपणे तो निवृत्त होईल. मोगल राज्याचा हा वारसा बळकावताना इंग्लंडने स्वतःचे समर्थन केले आणि आपल्या ऋजुतेच्या आणि दानशूरतेच्या तेजाने आम्हाला चकित करून गुलामीस मूक संमती देणे भाग पाडले. ईजिप्तने सामीलीकरण करताना ह्याच दांभिकतेचा पडदा वापरला होता. ब्रिटीश साम्राज्यवादाला ही रुढीप्राप्त दांभिकता आवश्यकच होती, कारण इंग्लंडमध्ये मध्यमवर्गीय प्युरिटन सत्तेवर आले होते आणि स्वभाषेच्या पवित्र स्वयंऋजुतेचा धडा त्यानी इंग्लंडला दिला होता. त्यामुळे सद्‌गुण, परोपकार आणि परार्थवादासाठी स्वार्थात्मता ह्यांच्या बुरख्याखाली अन्याय आणि स्वार्थसाधूपणा चालू देणे शक्य नव्हते. एकोणविसाव्या शतकातील उदारमतवाद आणि ब्रिटिशातील मध्यमवर्गीय प्युरिटनांचा विचार ह्यांच्याद्वारे स्वतःच्या ब्रिटिश साम्राज्यवादाचे समर्थन करण्याच्या आवश्यकतेमध्ये राज्यनिष्ठांच्या वेद-वाक्याचा उगम सापडतो.

प्रश्न असा आहे की ह्या सिद्धांताला काही दृढ आधार आहे काय ? एक सोयीस्कर सिद्धांत ह्याखेरीज त्यात काही अधिक आहे काय ? प्रत्यक्ष वस्तुस्थिती किंवा मानवी अनुभव ह्यांच्याशी त्याचा काही संबंध आहे काय ? ह्या प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी ज्या तीन स्वातंत्र्यामध्ये गल्लत केली जाते त्यातील भिन्नता स्पष्ट करणे आवश्यक आहे, परकीय नियंत्रणापासून मुक्त असलेले राष्ट्रीय स्वातंत्र्य, व्यक्तीच्या किंवा वर्गाच्या किंवा वर्गसमूहाच्या निरंकुश सत्तेपासून मुक्तता असलेले आंतरिक स्वातंत्र्य (ह्याला स्वयंशासन असे नाव दिले जाते) आणि तिसरे वैयक्तिक स्वातंत्र्य. ह्यात व्यक्ती ज्या समाजाची घटक आहे त्या समाजाकडून किंवा राज्यशासनाकडून, ते शासन राजसत्तेचे असो, अथवा लोकसत्तांक असो वा अल्पसंख्यांक किंवा नोकरशाहीचे असो, व्यक्तीच्या स्वातंत्र्यावर अनावश्यक आणि मनमानी

बंधने लादली जातात. मग प्रश्न असा येतो की ह्या तीन प्रकारच्या स्वातंत्र्यापैकी राष्ट्रीय जीवनाच्या सुदृढ विकासासाठी जर एकादे स्वातंत्र्य आवश्यक असेल तर ते कोणते किंवा अशा कोणत्याच स्वातंत्र्याविना असा विकास शक्य आहे ?

मानवानी समूह बनवून राष्ट्रीय रूपाने राहाणे आणि शासन नावाच्या व्यवस्थेच्या एका सुधारित संस्थेद्वारे स्वतःचे शासन करवून घेण्यास मूकसंमती देणे हा व्यक्तीगत आणि समूहरूपाने होणारा मानवी विकासच आहे, अन्य काही नाही. कोणीही एक व्यक्ती एकदाच म्हणून विकास करू शकत नाही, तो ज्या गटातील आहे त्यांच्या मदतीवर आणि आधारावरच अवलंबून असतो. आंतरिक शांती आणि व्यवस्था तसेच बाहेरून होणाऱ्या हल्ल्यापासून संरक्षण ह्यांची हमी देणारी अशी एखादी संस्था असल्याखेरीज मानवी समूहपण स्वतःची प्रगती करू शकणार नाही. शिवाय त्यामुळे त्याची भौतिक, नैतिक आणि बौद्धिक शक्ती आणि चळवळीच्या विकासासाठी मोकळे वातावरण पण सुनिश्चित पद्धतीने तयार होईल. व्यक्ती आपल्या सर्व शक्ती एकाच दिशेने मार्गी लावून स्वतःचा विशिष्ट विकास करून घेतो तशी राष्ट्राची किंवा समुहाची स्थिती नाही. राष्ट्राने आपले सैनिकी आणि राजकीय मोठेपण आणि कार्यशीलता विकसीत केली पाहिजे तीच गोष्ट बौध्दिक आणि सौंदर्यविषयक महत्त्व आणि कर्तृत्व, व्यापारविषयक गौरव आणि कार्य, आणि नैतिक पावित्र्य आणि उत्साह ह्यांची आहे. संस्थेला अपरिहार्य असणाऱ्या ह्या गोष्टी जर राष्ट्राने केल्या नाहीत तर जीवनसंघर्षात अपात्र ठरण्याखेरीज आणि दुसऱ्या एकाद्या अधिक सुसंघटीत राष्ट्राच्या दडपणाखाली चिरडून नष्ट होण्याखेरीज अन्य पर्याय नाही. कार्थेजसारखे केवळ वाणिज्यप्रधान राष्ट्र सैनिकी, राष्ट्रीय तसेच व्यापारविषयक शक्तीनी विकसित राष्ट्रासमोर धक्क्याने छिन्न भिन्न झाले. केवळ सैनिकी राष्ट्र असलेले राष्ट्र हे, विकसीत विज्ञान, बौध्दिक शक्ती आणि राजकीय क्षमता ह्यासमवेत असलेल्या सैनिकी कौशल्याच्या आपल्या शत्रूसमोर उभे राहू शकत नाही. इटलीतील ग्रीक वसाहती, त्यांचे सौंदर्यविषयक आणि बौद्धिक श्रेष्ठत्त्व असले तरी किंवा नैतिक आणि आध्यात्मिक समाज असलेले पेरूचे साम्राज्य ही अधिक उग्र आणि उत्साहपूर्ण तसेच अनेक बाजूनी मुक्त असलेल्या संस्था समोरील संघर्षात नामशेष झाल्या. जे आपल्या राष्ट्राच्या कार्यप्रणाली, सामर्थ्य आणि शक्ती ह्यांच्या विकासास पूर्ण वाव देत नाही ते राष्ट्रासाठी किंवा राष्ट्राच्या जीवन आणि विकास ह्यांच्यासाठी समुचित शासन नव्हे. परकीय शासन हे त्या सर्व कार्यप्रणालीना आणि शक्तीना आपल्या स्वतःच्या कायम अस्तित्वाच्या दृष्टीने सतत चिरडण्याचा प्रयत्न करते, कारण तो त्याचा स्वभावच असतो. म्हणून परकीय शासन हे अनैसर्गिक आणि राष्ट्राला घातक असते. जरी त्याने ह्या शक्तीला हिंसकतेने चिरडले नाही तरी अप्रत्यक्षपणे त्यांच्या विकासाला ह्याच्या केवळ अस्तित्वानेच विरोध करते. गुलाम राष्ट्र हे परावलंबी आणि विसंघटित होते आणि आपल्या चैतन्याच्या सर्व शक्ती गमावून बसते. ह्या कारणांमुळेच राष्ट्रीय अभिवृद्धिसाठी राष्ट्रीय स्वातंत्र्य हे अपरिहार्य आहे. राष्ट्रीय स्वातंत्र्याशिवाय राष्ट्रीय विकास सुतराम् शक्य नाही.

राष्ट्रीय विकासासाठी व्यक्तीस्वातंत्र्य आवश्यक आहे. कारण जर व्यक्तीवर अकारण दबाव आणला तर राष्ट्रीय जीवनाच्या समृद्धीला धोका येतो आणि ती पामर होते. जर व्यक्तीला स्वप्नबोधनासाठी पूर्ण वाव दिला, त्याला त्याच्या खास शक्तींना परिपूर्ण करण्यासाठी, त्याना वैशिष्ट देण्यासाठी आणि समृद्ध करण्यासाठी मोकळीक दिली व त्यांजोगे त्याचे व्यक्तीमत्व संपूर्ण उंचावले तर राष्ट्रीय प्रगतीची विविधता आणि वेग कमालीचा वाढलेला असतो. ज्या मर्यादेपर्यंत त्याला बंधने पडतात आणि प्रगती नाकारली जाते, त्या प्रमाणात राष्ट्राचा विकास कुंठित होतो, त्याची परागती होते. जे शासन व्यक्तीला स्वातंत्र्य आणि वाव देण्याचे नाकारते–ज्याप्रमाणे परकीय शासने नेहमीच वागतात– ते राष्ट्राच्या विकासाच्या प्रगतीला नव्हे तर परागतीला साह्य करीत असते. व्यक्तीचा विकास हा अनधिकृत शक्तीला गोंधळात टाकणारा असतो आणि ठरतो. अर्थात अशा व्यक्ती सम्मान, नोकऱ्या, आणि अन्य वैयक्तिक लाभ ह्यांच्यामुळे त्या शक्तीला पाठिंबा आणि लाच देऊन मूकसंमती देण्याएवढ्या थोड्या असतील तर गोष्ट वेगळी. कारण विकासापोटी आकांक्षा जन्म घेते आणि शासित समाजातील वाढती महत्वाकांक्षाही परकीय सत्तेच्या सातत्याला मृत्यूचा मार्ग दाखवते, कारण ती सत्ता महत्त्वाकांक्षा पूर्ण करू शकत नाही. लॉर्ड कर्झन ह्यांची विद्यापीठ कायद्याच्या प्रारंभासंबंधीची घटनाही भारतातील ब्रिटिश राजसत्तेला अपरिहार्य अशी होती आणि ती आज नाउक्त करावीच लागणार होती. साम्राज्यवादी दृष्टीकोणातून तिचा एकमेव दोष म्हणजे ती फार उशिरा आली.

ज्याप्रमाणे वैयक्तिक स्वातंत्र्य हे राष्ट्रीय विकासाच्या समृद्धतेसाठी आणि वैविध्यासाठी आवश्यक आहे त्याप्रमाणे स्वयंशासन हे त्याच्या परिपूर्णतेसाठी तसेच राष्ट्रीय शक्तींच्या संपूर्ण विकासासाठीपण आवश्यक असते. जर काही वर्गांचे वर्चस्व झाले आणि अन्य दबले गेले तर त्याचा परिणाम म्हणजे एकूण राष्ट्रशक्ती ही दबलेल्या वर्गाच्या असुप्त शक्तींच्या मूल्यवान प्रभावापासून वंचित राहते. वरचढ वर्ग निःसंशय स्पृहणीय विकास करतील आणि इतिहासात आपले राष्ट्र महान आणि यशस्वी पण करतील तरीपण शेवटी राष्ट्रशक्ती म्हणजे केवळ विशिष्ट वर्गाची एकत्रित शक्ती एवढाच बोध होतो. लोकसंख्येतील बहुजन समाजाचा राजकीय दुबळेपणा आणि नगण्यता हा भारताचा मोठा दोष आहे. मोगल किंवा ब्रिटिश ह्यानी भारतीय जनतेकडून नव्हे तर एका लहानशा विशिष्ट वर्गाकडून भारत जिंकला. ह्याउलट अठराव्या शतकात शिवाजी आणि गुरु गोविंदसिंह ह्यांच्या धोरणामुळे मराठा आणि शीख समाजांतील शक्ती आणि विकास ह्याना संपूर्ण युद्धामध्ये गुंतवले होते. आपल्या राष्ट्रशक्तीला दिलेला सुसंघटितपणा मराठ्याना टिकवता आला नाही. एकादे परकीय शासन दासराष्ट्रातील स्वयंशासनाकडे जाणारे सार्वत्रिक राजकीय प्रबोधन मान्य करील किंवा ते चालू ठेवील हे विश्वसनीय तरी आहे काय ?

हिंसेने प्रतिकार करता येईल किंवा अकार्यशीलतेमुळे ते बंद पडेल इथपर्यंत राजकीय प्रबोधन परकीय सत्ता सहन करू शकते हे स्पष्टच आहे. ज्याक्षणी राष्ट्र राजकीयदृष्ट्या

स्वयंप्रबुद्ध होईल त्याचक्षणी परकीय वर्चस्वाची मृत्युघंटा वाजली ही काळ्या दगडावरील रेघ आहे. आमच्यावर शासन करणारी नोकरशाही ही केवळ जन्माने परदेशी आहे एवढेच नव्हे तर ती आम्हाला परकीपण आहे. व तिच्या जीविकेसाठी पोषण हे हजारो मैलावर दूर असलेल्या मूल संस्थेकडून शासनादेश आणि पोषणद्रव्य ह्याद्वारे करीत असते. नैसर्गिक जीवनातील तिचे स्थान हे परोपजीवी प्राण्यापेक्षा अष्टपद रसशोषकासारखे आहे. स्वयंशासन म्हटले की त्यांचे पोषणद्रव्य बंद होणार आणि त्याचवेळी आपली पकड आणि अस्तित्वपण नष्ट होणार. दासराष्ट्रात स्वतंत्र जीवनसंस्थेच्या विकासाला परकीय शासन हे निसर्गतःच विरुद्ध असते. स्वयंशासनाचे सामर्थ्य आणि आचरण ह्यांच्या वृद्धीला ते घातक असते आणि वैयक्तिक सामर्थ्य आणि महत्त्वाकांक्षा ह्यांच्या विकासालापण ते मारक असते. एकादी परकीय शासनयंत्रणा आपणाला स्वातंत्र्याकरिता हेतुपूर्वक प्रशिक्षित करील किंवा आम्हाला प्रशिक्षित होऊ देईल अशी कल्पना करणे म्हणजे निसर्गात एकादा चमत्कार घडून यावा असे समजण्यासारखे आहे.

**वंदेमातरम्, २९ एप्रिल, १९०७**

● ● ●

## ९ भारत स्वतंत्र व्हावा काय ? . . . . . . ३ ३०-४-१९०७

**रक्ताने परकीय, धर्माने परकीय आणि हितसंबंधाने परकीय असलेली विदेशी सत्ता जोपर्यंत एतद्देशीय जनतेवर लादलेली आहे तोपर्यंत ती विघटन आणि विनाश करणारच. श्रीअरविंद सांगतात की, परकीय शासनाविरुद्ध प्रतिकार केल्याशिवाय निकोप राष्ट्रीय विकास अशक्य आहे.**

परकीय शासनाच्या विरुद्ध प्रतिकार केल्याशिवाय निकोप राष्ट्रीय विकास अशक्य आहे असा आमचा दावा आहे. विकासाच्या एतद्देशीय प्रयत्नात लुडबूड करणे आणि त्याला प्रतिबंध करणे हा परकीय सत्तेचा स्वभाव आहे. ती स्वतः एक अनैसर्गिक आणि रोगट अवस्था आहे. देशीय राजकारणातील जी एक जरुरत आहे, एक रोग आहे, ज्याचा वेळीच प्रतिकार केला नाही तर ते राजकारण मृत्यूपंथाला लागून शेवटी कुजून त्याचा मृत्यू ओढवेल. जे बनवता येईल असे एकादे कृत्रिम उत्पादन असते तर एक राष्ट्र दुसरे राष्ट्र निर्माण करू शकले असते. राष्ट्रनिर्माण करता येत नाही, ते आंतरिक चैतन्यतत्त्वाच्या प्रयत्नाने एक जिवंत संस्था म्हणून विकसीत होत असते. आपण राष्ट्रनिर्माणाचा आणि राष्ट्रनिर्मात्यांचा नेहमीच उल्लेख करतो पण तो केवळ सोईस्कर शब्दालंकार आहे. कॉव्हूर किंवा बिस्मार्क, हे बदलत्या परिस्थितीच्या प्रभावाखाली जी आंतरिक इच्छा जागृत झाली होती तिला योग्य वेळ आणि उचित संधी मिळाल्यामुळे जगात आलेले तिचे अवतार होत. एकाद्या सामूहिक भावनेचा बाह्य आविष्कार म्हणजे राष्ट्र होय, प्रगती-भावना समान रक्ताची असो वा समान धर्माची असो वा समान हितसंबंधाची वा ह्यापैकी एकाचा वा सर्वांचा एकत्रित मिलाफ असो. एकदा ही भावना पुरेशी सुदृढ झाली की एकतेच्या इच्छेमध्ये विकास होणे आणि अडचणीत मात करणे आणि अनुकूल परिस्थितीचा पुरेपूर उपयोग करून घेणे त्यामधून राष्ट्राचा विकास अपरिहार्य असतो. त्याविरुद्ध अंतिम विजय मिळवील अशी शक्ती जगात नाही. पण प्रक्रिया कितीही वेगवान असली तरी शेवटी विकासाची आहे, निर्मितीची नव्हे. विकसनशील राष्ट्राचा पहिला स्पंद हा एका केन्द्रनिर्मितीमध्ये असतो. हे केन्द्र स्व-आविष्काराचे आणि संघटक क्रियांचे साधन असेल, तसेच स्वसंरक्षण ही तिची अगतिक सर्वोच्च गरज असेल तर राष्ट्राचे चैतन्य केन्द्र आणि प्रमुख साधन हे त्याच्याशी सहकार्य करणाऱ्या त्याच्या उपचाऱ्यासह असेल. एकाद्या प्रमुखाच्या हाताखाली किंवा लढाऊ शासनवर्गाच्या प्रमुखत्वाखाली असणारी अशी ही सैनिकी किंवा समसैनिकी संघटना असेल, जर बाहेरील दबाव वरचष्मा गाजवणारा नसेल किंवा आंतरिक पिळास हा अतिशय आवश्यक भासत असेल तर त्याने संपूर्ण आंशिक स्वयंशासनाचा एकादा प्रकार धारण करावा. उभयपक्षी तो समाज एकराष्ट्र किंवा संघटीत राज्य बनतो.

अशा जैविक विकासामध्ये परकीय शासनाचे स्थान काय ? परकीय राजकारणाने जर हल्ला केला तर त्याचा परिणाम म्हणून एकतर ते परकीय देशी राष्ट्रामध्ये विलीन होतील किंवा ते एतद्देयांपेक्षा वरचढ झालेच तर त्याचा गंभीर परिणाम असा होईल की त्याला बळजोरीने स्वतःचे अस्तित्व टिकवावे लागेल, किंवा गुलाम प्रजेला मोहित करण्याइतके संमोहित करावे लागेल. जर ते परकीय आणि मूळची प्रजा एकाच रक्ताचे आणि एकाच धर्माचे असतील तर विलीनीकरण सोपे असते. जर ते तसे नसले तरी जरी विदेशी जित देशामध्ये राहू लागले आणि त्यानी तो देश आपली मातृभूमी केली तर हितसंबंधातील समानता अपरिहार्यतेने त्यामध्ये एकी घडवून आणते. परदेशीय हे दत्तक त्यामुळे ह्या देशाचे संतान बनतात आणि समान वंशभावनेइतकीच समान मातृभूमी भावनापण पुरेशी पर्याय आहे. धर्माबाबतची अडचण परदेशीयांनी त्यानी जिंकलेल्या देशातील लोकांच्या धर्मात सामील होऊन सोडवता येईल. प्राचीन भारतीय आक्रमकांबाबत हे घडले आहे किंवा पर्शियामध्ये किंवा अरबांनी जिंकलेल्या प्रदेशामध्ये घडले त्याप्रमाणे जित लोकानी जेत्या लोकांच्या धर्मामध्ये समाविष्ट होऊन हा प्रश्न सुटेल. श्रध्दांबद्दल हा सामान्य बदल घडून आला नाही तरी दोन्ही धर्म परस्पर परिचित होऊन परस्पर सहिष्णू बनतील किंवा समानहित संबंधाची भावना आणि एकाच मातृभूमीच्या समान संतानत्वाची भावना ही धार्मिक भेदाच्या जणिवेला पराभूत करील. ह्या सर्व घटनांमध्ये आंशिक किंवा संपूर्ण मिलाप आहे. आणि राष्ट्र बऱ्याकरिता किंवा वाईटाकरिता प्रगाढ परिणाम घडत असला तरी, विघटित होण्याची किंवा विकास शक्ती नष्ट होण्याची संभावना नाही. मुसलमानी अंमलाखाली भारतात जरी प्रचंड गोंधळ होता आणि सतत ढवळाढवळ क्रांती होत होती तरी भारताने आपली जैविक पुनर्रचनेची आणि विकासाची शक्ती घालवली नव्हती. ब्रिटीश सत्तेपूर्वी माजलेल्या अंतिम अराजकतेच्या वेळी पण विघटनेची प्रक्रिया न घडता ते एक तीव्र गंडांतर होते, राजकीय पुनर्रचनेचा तो निसर्गमय प्रयत्न होता. रक्ताने परकीय, धर्माने परकीय आणि हितसंबधांनी परकीय अशा एका परकीय सत्तेच्या उपस्थितीमुळे आणि अंतिम वर्चस्वामुळे दुर्दैवाने हे गंडांतर विचित्र बनले. ह्या जमिनीशी नाते नसलेली अशी ही परकीय सत्ता एतद्देशीय जनतेवर लादलेली आहे. जोपर्यंत ही सत्ता ह्या राष्ट्रात एकजीव झाली नाही किंवा तिला उधळून लावले नाही तोपर्यंत ती दासजनतेमध्ये विघटना आणि विनाश करणारच. रक्ताने, धर्माने आणि हितसंबंधाने भिन्न असलेल्या परकीय सत्तेला देशी प्रजेशी मिसळून जाणे केवळ दोन परिस्थितीतच शक्य आहे. एक म्हणजे त्या सत्तेने मूळच्या सत्तेशी असलेले आपले नाते तोडून जित देश हाच आपला देश मानला पाहिजे, जे सद्यःस्थितीत केवळ अशक्य आहे. किंवा सर्व प्रकारच्या मतभेदाना, विषमतेला आणि परस्परविरोधी हितसंबंधाना दूर करून दासराज्याला सार्वभौम राज्यात विलीन करून घेतले पाहिजे. एकाचवेळी ब्रिटीश अधिसत्ता कायम राहील आणि भारतीय राष्ट्रीय विकासाला भरपूर वाव मिळेल अशा प्रकारची व्यवस्था करण्यामागील अनुल्लंघनीय अडचणी आम्ही पुढे दाखवीत आहोतच. असे विलीनीकरण होण्यासाठी होणाऱ्या प्रचंड त्यागापुढे अनधिकृत

शक्ती शरण येणे सध्याच्या परिस्थितीत तरी शक्य दिसत नाही. जरी असे विलीनीकरण घडून आले नाही तर भारतातील ब्रिटीश नोकरशाहीची अवस्था, बाल्कनराष्ट्रे स्वतंत्र होण्यापूर्वी तुर्की जुलूमशाहीखाली तेथील ख्रिस्ती जनतेची जी अवस्था होती किंवा इटालियन राज्यक्रांतीपूर्वी लोम्बार्डीतील आस्ट्रियनांची जी अवस्था होती त्यापेक्षा भिन्न असणार नाही. अशा स्थितीत ऑस्ट्रिया किंवा तुर्कस्थान ज्याप्रमाणे नीतिभ्रष्ट आणि दुबळे झाले त्याप्रमाणे शासक राष्ट्राला भीती निर्माण होते, ते नीतिभ्रष्ट होते आणि शेवटी दुबळे होते. शिवाय शासित जनता विघटीत होऊन तिचा अधःपात होतो. भारतातील ब्रिटीश सत्तेच्या परिणामांचा थोडक्यात विचार केला असता ह्याची सत्यता पटेल.

**वन्दे मातरम्, ३० एप्रिल, १९०७**

● ● ●

**परकीय ब्रिटीश शासन हे राष्ट्राच्या ऐक्याला कसे विघातक आहे हे श्रीअरविंद स्पष्ट करतात. राजकीय विघटनाची प्रक्रिया हा परकीय नोकरशाहीच्या हेतुपुरस्सर धोरणाचा भाग नसतो, तर ते केल्याशिवाय त्याना उपायच नसतो. ती उपजत प्रेरणाच असते. शासितांची संघटना खालसा करुन त्याना एक विस्कळीत समाज बनविणे हा परकीय हुकुमशाहीचा अपरिहार्य कार्यभाग असतो.**

## ऐक्य आणि ब्रिटीश सत्ता

आपण स्वतंत्र होण्याचा प्रयत्न करण्यापूर्वी ह्या देशातील लोकानी ऐक्य प्रस्थापित करावे अशी सर्वत्र मागणी आहे. वरवर खरी भासणारी परंतु आतून पोकळ असणारी ह्यापेक्षा अधिक दुसरी ओरड नसेल, आपण ज़्यावेळी एकीच्या आवश्यकतेची गोष्ट बोलतो तेव्हा आपण नेमके काय बोलतो ? ऐक्य म्हणजे समानता आणि भेदभावांचे समीकरण नव्हे. काही लोकांचे म्हणणे असे की जणूकाही धार्मिक ऐक्य हे एकरूपतेशिवाय अशक्य आहे. परंतु मानवी मन लक्षात घेता धार्मिक एकरूपता ही निसर्गतःच मानसिक आहे. जोपर्यंत माणसाची बुद्धी, प्रवृत्ती आणि आध्यात्मिक विकास ह्यात भेद आहेत तोपर्यंत विभिन्न धर्म आणि एकाच धर्मातील विविध पंथ राहणारच. आपल्यात भेद निर्माण करणाऱ्या असंख्य आध्यात्मिक जाणिवाना एकत्र करून त्या ठिकाणी भारतासाठी एकच धर्म निष्पन्न व्हावा अशा विश्वासाने राममोहन रॉय ह्यानी ब्राह्मोसमाज प्रचलित केला. पण लौकरच एकता निर्माण करणाऱ्या ह्या धर्माचे परस्पर विसंगतवादी तीन पंथात तुकडे झाले. त्यांपैकी दोन त्यांच्या मर्यादित क्षेत्रातही आंतरिक भेद दर्शवितात. आणि हे तीनहि भेद काही आवश्यक मुद्यावर झाले नाहीत तर बौद्धिक बैठक, प्रवृत्तीतील भिन्नता आणि आध्यात्मिक विकासाच्या मार्गावरील विभिन्नता ह्यांच्यामुळे झाले आहेत. प्रचलीत असलेल्या पंथांच्या नाशाने आणि हिंदूधर्मातील समान सत्यांवर आधारलेल्या एकाद्या धर्माने हिंदूधर्मातील ऐक्य साध्य होणार नाही. ते ऐक्य केवळ दोन गोष्टीमुळेच शक्य आहे. पहिले, अन्य धर्मातील आध्यात्मिक सत्ये आणि शिस्त ह्यांची तुलना करता हिंदुधर्मातील सत्ये आणि शिस्त ही एकदम भिन्न असून त्यांच्या मानाने सांप्रदायिक भेद हे दुय्यम आहेत ही प्रबळ समान भावना सर्वांमध्ये उत्पन्न झाली पाहिजे. दुसरे, हिंदुधर्माचा साकल्याने विचार केला असता तो आपला पवित्र आणि असंक्राम्य वारसा आहे असे त्याच्याबद्दलचे मूल्यमापन आणि गौरव ह्यांबद्दल एकवाक्यता असली पाहिजे. ऐक्याच्या भावनेतील हा मौलिक घटक आहे. मग ते ऐक्य धार्मिक, राजकीय किंवा सामाजिक

असो. इतरांच्या जवळ नसलेले असे काहीतरी लाडके आणि मौल्यवान आमच्याकडे आहे ही सामूहिक भावना अत्यावश्यक आहे. आमच्या ह्या समान वारशामध्ये अन्य कोणताही समाज भागीदार होऊ शकणार नाही ही भिन्नतेची तीव्र भावना जागृत झाली पाहिजे. आमचा हा समान वारसा कोणत्याहि प्रकारे कमी लेखला जाणार नाही, आणि त्याची हानी होणार नाही ह्यासाठी त्याची जोपासना करणे, त्याचे मग प्रतिपादन करणे आणि तो जतन करणे ह्यासाठी सर्वश्रेष्ठ निर्धार असला पाहिजे. ऐक्याची भावना निर्माण करण्याने ऐक्य निर्माण होत नाही, ते प्रत्यक्षात करावे लागते. जेथे फक्त ऐक्य भावना आहे पण आचरण नाही तेथे ते एकादे महान, समान आणि सर्वंकष ध्येय साध्य करणाऱ्या प्रयत्नातून साधावे लागते.

पहिला प्रश्न आपणास सोडवावयाचा आहे तो म्हणजे परकीय सत्तेला मूकसंमती देऊन हे व्यावहारिक ऐक्य साध्य करता येईल काय ? परकीय सत्तेखाली एका विशिष्ट प्रकारची परिस्थितीची एकरूपता साध्य करता येईल, हे खास. सत्ताधारी वर्गाच्या सापेक्षतेने ब्राह्मण व शुद्र, जमीनदार आणि शेतकरी, हिंदु आणि मुसलमान ह्याना समानतेच्या भावनेने काही समानता निर्माण करता येईल. ते सर्व आणि शिखरावरील ध्येय, वंश ह्यामध्ये इतका प्रचंड भेद आहे की त्यामानाने त्यांच्या परस्परातील भेद हा केवळ नगण्यच होय. पण राष्ट्रीय ऐक्याला ह्या एकरूपतेचा काहीही उपयोग नाही. केवळ समान नीचतेची भावना ही त्या सत्तेविरुद्ध बंड करून ती फेकून देण्याच्या समान इच्छा चेतवील, परकीय वर्चस्वाला मूक संमती दिली तर क्षुल्लक भेदानी मन गुंतून जाते आणि ऐक्याच्या जवळ जाण्याऐवजी भिन्नतेची भावना बळावते, ब्रिटिश सत्तेखाली भारतामध्ये नेमकी हीच गोष्ट घडून आली आहे. ऐक्याची भावना वाढली आहे पण ब्रिटिशांनी सत्ता काबीज करण्यापूर्वी आपण होतो त्यापेक्षा आता सामाजिक आणि राजकीयदृष्ट्या वेगळे आणि विघटित झालो आहोत. मोगल सत्तेच्या पाडावानंतर जे अराजक निर्माण झाले त्यावेळी विविध प्रदेशांमध्ये आणि लोकांमध्ये अकबर आणि शहाजहान ह्यांचा वारसा चालवण्याबद्दल संघर्ष झाला. पण आजची विघटना ही आंतरिक आहे व म्हणून समाजाच्या मर्मापर्यंत पोहोचण्याची शक्यता आहे.

ही विघटना हा परकीय सत्तेचा नैसर्गिक आणि अपरिहार्य परिणाम आहे. सत्य वा मानवी समान वंश, समान धर्म किंवा समान हितसंबंध ह्यामुळे मानवसमूह किंवा अनेक व्यक्ती एकत्र येऊन राज्य निर्माण करतात तेव्हा नैसर्गिक जैविक रचना असते, आणि जोपर्यंत ती जीवंत असते तोपर्यंत निसर्गतःच तिच्यामध्ये पुनरुत्थानाची आणि विकासाची शक्ती असते. पण राज्य शासनाने असे दाखवून दिले आहे की जित प्रजेमध्ये जेत्या वंशानी ठाण मांडून निर्माण केलेले आणि अंतिमतः प्रजेतील घटनानी नव्हे तर बाह्य शक्तीनी आधार दिलेले राज्य हे जड राज्य असते. असे म्हटले आहे की शापित प्रजा ही अपरिहार्यपणे गोंधळलेल्या जमावाप्रमाणे असते. राष्ट्रीय जीवनातील घटकांची मोडतोड करणे आणि सर्व सत्ता स्वकेंद्रित करणे ही सत्तेची जाणता अथवा अजाणता प्रवृत्ती असते. मोगल सत्तेमध्ये ही प्रवृत्ती नव्हती कारण लगेच त्यानी भारत ही स्वतःची भूमी केली. ब्रिटिश सत्तेमध्ये ही प्रवृत्ती आहे

ह्याचे कारण आपण ह्या देशाचे नसून बाहेरचे आहोत आणि ह्या देशात आक्रमण करून वसाहत करीत आहोत हे त्याना चालू ठेवावयाचे आहे. इतिहासात ब्रिटीश नोकरशाहीशिवाय अन्य उदाहरण मिळेल काय ? अशी शंका येते की जेथे परकीय भूमीवरील शक्ती केन्द्राबद्दल वर्चस्व, छळ आणि असहिष्णुतेची वृत्ती आढळून येते. ब्रिटीशपूर्व काळात भारतात प्रत्यक्ष तीन केन्द्रे होती, (१) सर्वश्रेष्ठ राजा, जमीनदार किंवा जहागीरदार, त्याची शक्ती चालवणारे पेशवा राजा किंवा नबाब आणि (२) जमीनदार जे आपल्या परीने आपल्या शक्तीवर अवलंबून असणारी प्रजा आणि कुळे. (३) आणि स्वतंत्र आणि स्वयंपूर्ण असणारी ग्रामसंस्था. ब्रिटिश राजवटीचे पहिले फळ म्हणजे सर्वश्रेष्ठ राजे नामशेष झाले. आणि पुष्ळकदा बंगालमध्ये घडले त्याप्रमाणे जमीनदारांच्या साह्याने हे घडवून आणले. दुसरा परिणाम म्हणजे ग्रामसंस्थेचे विघटन. पुढील परिणाम म्हणजे जमीनदारांच्या शक्तीचे उच्चाटन. हे कार्य त्यानी आपल्या स्वार्थासाठी निर्माण केलेल्या ऊर्जा किंवा मध्यम वर्गामार्फत केले. पण ह्या मध्यमवर्गाचे साह्य आणि पाठिंबा मिळवण्यासाठी दुर्दैवाने ह्या ब्रिटीश नोकरशाहीला त्या वर्गाचे वृत्तपत्र, वकीलवर्ग, विद्यापीठ, नगरपालिका, जिल्हापरिषदा आणि अन्य प्रकारचे लाड पुरवावे लागले व त्यामधून त्यांची शक्ती आणि संस्था विकसीत करण्यास आणि वाढण्यास संमती दिली. शेवटी राजकारण धुरंधराना ज्या परिस्थितीशी मुकाबला करावा लागला ती अशी :– त्या भूमीवरील स्वभावसिद्ध जमीनमालक असहाय आणि विघटित, उच्चवर्ण असहाय आणि विघटित, शेतकरीवर्ग असहाय आणि विघटित पण मध्यमवर्ग मात्र आपल्या शक्तीने, औदार्याने आणि संघटनेने वाढत आहे. ब्रिटीश राजकारणपटुत्वाने, परकीय अधिसत्तेच्या प्रेरक आणि अपरिहार्य ऐक्याला अनुसरुन आपण निर्माण केलेली, प्रस्थापित केलेली शक्ती मोडून काढण्यास सुरुवात केली. हेतू हा की, उरलेली राष्ट्रीय शक्ती आणि शक्य असलेले पुनरुत्थान नामशेष करावे. जर हे शक्य झाले, मध्यमवर्ग नमवता आला, लाच देऊन वळवता आला किंवा त्याची वाढ मर्यादित करता आली तर विघटन संपूर्ण होईल. शक्ति केन्द्र नसलेल्या प्रतिकाराचे, साधन नसलेल्या भारतीय प्रजेचे, एक विस्कळीत जमाव, ह्याखेरीज काहीही उरणार नाही.

बंगालमध्ये मध्यमवर्ग सर्वात विकसीत आणि सचेतन होता, आणि म्हणून बंगालमध्ये एकावेळी उपयुक्त परंतु आता उपद्रवी वर्गाविरुद्ध एकापाठोपाठ चतूर आणि भेदक ठोसे लगावले गेले. त्याना शांत करण्यासाठीच लाचलुचपतीचा शेवटचा प्रसंग म्हणजे लॉर्ड रिपनची राज्यव्यवस्था. ज्या घटकांच्या द्वारे ही शक्ती आपले चैतन्यमय जीवन हळू हळू विकसीत करण्याचा प्रयत्न करीत होती ते घटकच आता पंगू करण्याचा प्रयत्न केला जात होता. वृत्तपत्रांना जरब बसविण्यात आली, नगरपालिकांवर प्रशासक नेमले गेले आणि विद्यापींठावरपण एकूण विस्तार मर्यादित केला गेला. शेवटी फाळणीद्वारा जमीनदारांच्या सत्तेचा पामर अंश ठार मारण्याचा प्रयत्न झाला. आणि बंगालच्या लोकांची विभागणी करुन मध्यमवर्गावर जरब बसविण्याचा आणि त्यांना दुबळे करण्याचा प्रयत्न झाला. मध्यम वर्गाची

गळचेपी हा लॉर्ड कर्झनच्या धोरणाचा कणा होता. जेव्हा श्री. मोर्ले सत्तेवर आले तेव्हा अशी कल्पना आहे की, राष्ट्रीय सभेला मान्यता देण्याचा आणि शक्य झाले तर तिच्यावर प्रशासक नेमण्याचा प्रयत्न झाला. बंगाल आणि पंजाबमध्ये चाललेल्या घालमेलीवर अशी प्रातिनिधिक गट अंतर्भूत असलेली विधानसभेची कल्पना करता येईल. परंतु वस्तुतः शासकीय नियंत्रण हे सवलत म्हणून नव्हे तर तंत्राचा एक भाग म्हणून ठेवले जाईल. मध्यमवर्गीय राजकीय जीवनाचे घटक जोपर्यंत ते स्वतंत्र आहेत तोपर्यंत भयावह होऊ शकतात. त्यांचे स्वातंत्र्य हिरावून घेतले म्हणजे ते शासनाचे नवे शक्तीदाते बनतात. जो वर्ग त्यांच्याद्वारा आपली वृद्धी आणि स्वप्रकाशन करण्याचा प्रयत्न करतो तोच दुबळा होतो.

भयग्रस्त झालेल्या वर्गाला, आपणावर झालेला हल्ला समजून त्याचे डोळे उघडले आणि परिणामी बंगालपासून पंजाबपर्यंत एकच विस्तृत आणि भावनाविवश बंड निर्माण झाले आणि आता ते सर्व भारतभर पसरू पहात आहे. हा संघर्ष आता जीवन मरणाचा संघर्ष आहे. जर नोकरशाही विजयी झाली तर मध्यमवर्ग भंग पावेल, त्याच्या चिंधड्या होतील आणि कदाचित अस्तित्वातून नष्टपण होईल. जर मध्यमवर्ग जिंकला तर नोकरशाहीचे ह्या देशातील दिवस भरलेच. सर्वांच्या समान मुक्तीसाठी मध्यमवर्ग अन्य प्रजेचा सहभाग कसा मिळवतो ह्यावर यशापयश अवलंबून आहे. ते ह्या राष्ट्राचे उद्‌गाते आणि नेते आहेत अशा भावनेने त्याना पाठिंबा मिळेल. ज्या उत्साहाने आणि यशाने ते ह्या नोकरशाहीशी टक्कर देतात त्यामुळेच त्याना पाठिंबा मिळेल. पूर्व बंगालमध्ये उदाहरणार्थ, नोकरशाही काही वजनदार मुस्लीम व्यक्तींच्या मदतीने बऱ्याच मोठ्या मुसलमान समाजाला हिंदू मध्यम वर्गीयांच्या विरुद्ध फितविण्यात यशस्वी झाली आहे. आणि सुशिक्षित समाज भिंतीला पाठ टेकून स्वतःचे अस्तित्व टिकविण्यासाठी लढाई देत आहे. तर ह्या साहसी प्रयत्नात मध्यमवर्ग यशस्वी झाला तर फार मोठा मुसलमान समाजपण त्यांचे नेतृत्व स्वीकारील.

राजकीय विघटनाची प्रक्रिया हा परकीय नोकरशाहीच्या हेतुपुरस्सर धोरणाचा भाग नसतो, तर ज्याप्रमाणे सागराला हालत राहण्याखेरीज गत्यंतरच नसते त्याप्रमाणे ते केल्याशिवाय त्याना उपायच नसतो. ती उपजत प्रेरणाच असते. शासितांची संघटना खालसा करून त्याना एक विस्कळीत समाज बनवणे हा परकीय हुकुमशाहीचा अपरिहार्य कार्यभाग असतो.

**वंदे मातरम् २ मे, १९०७**

## ११. देशभक्तीचा उगम . . . . . . . . १९-६-१९०७

**या देशाचे श्रेष्ठत्व आणि विचारवैभव जगात प्रस्थापित करण्याची आकांक्षा समाजात प्रचंड पराक्रमाची ईर्षा निर्माण करू शकेल. स्वामी विवेकानंदानी त्यासाठी एक सर्वकष योजना आखली होती. आध्यात्मिक क्षेत्रातील भारताच्या निर्विवाद श्रेष्ठत्वाची जाणीवच देशभक्तीचा मूळ स्त्रोत आहे असे विवेचन श्रीअरविंद यांनी केले आहे.**

**पौर्वात्य संस्कृतीची** थोरवी मान्य करणारे आपल्या देशात पुष्कळ जण आहेत. त्या संस्कृतीचा मानवताधिष्ठित आणि समाजवादी दृष्टिकोनही ते जाणतात. आध्यात्मवाद हे तिचे प्रभावशाली वैशिष्ट्य आहे, ही वस्तुस्थिती देखील ते दृष्टिआड करू शकत नाहीत. त्या संस्कृतीला आक्रमक भौतिकवादाने ग्रासलेले नाही हेही त्याना मान्य आहे, समाजातील सर्व वर्गांच्या हितसंबंधाचा समतोल साधण्याचे कौशल्य तिच्यात आहे, याबद्दलही त्यांच्यात दुमत नाही. त्याचबरोबर मानवतेच्या विशाल आणि उच्च आकांक्षा ती कटाक्षाने जोपासते, हेही ते पुरेपूर ओळखतात. इतके सर्व असून देखील तिच्यात एक अक्षम्य उणीव आहे. ती म्हणजे त्या संस्कृतीत जित्या जागत्या, प्रखर व प्रेरक देशभक्तीच्या भावनेचा आढळ होत नाही. प्रत्येकाला आपल्या देशाबद्दल, साहित्याबद्दल व चालिरितीबद्दल आत्मीयता वाटणे हे सहाजिकच आहे. परंतु देशभक्तीच्या या संवेदनात त्याहीपलीकडे आणखी एका चैतन्यदायी प्रेरणेचा अंतर्भाव असतो. ती म्हणजे आपल्या राष्ट्रीय संस्कृतीच्या श्रेष्ठतेची प्रत्ययकारी अनुभूती. जर ब्रिटिश माणूस इंग्लंडच्या सर्व दोषांसहित इंग्लंडवर प्रेम करू शकतो, तर आम्ही आपल्या भारत देशावरही तशी भक्ती कां करू शकत नाही ? उलट परकीय आक्रमणामुळे आपल्या समाजाची घडी उध्वस्त होण्यापूर्वी, आपल्या देशाचे सर्व दोष आपण जवळजवळ नाहिसे करीत आणले होते. पण आपल्या अशा अत्यंत प्रगत संस्कृतीची प्रसादचिन्हे सर्व जगात उमटविण्याची आकांक्षा धरण्याचे तर सोडूनच द्या, पण खुद्द आपल्या देशाचीही अखंडता आपण शाबूत ठेवू शकलो नाही. हा आपल्या पूर्वजांचा घोर विश्वासघात आहे. आपल्या नालायकीची ही परिसिमा आहे. आपल्यासाठी पूर्वजांनी सोडलेल्या या उज्वल वारसात आज आपण काडीचीही भर तर घालू शकलो नाहीच. उलट त्यांचा लाभ उठविण्यापासून आपल्या पिढीलाच केवळ नव्हे, तर भावी पिढ्यांनाही आपण वंचित करण्याचे करंटेपण करीत आहोत. अद्याप आपल्या संस्कृतीचा पूर्णांशाने ऱ्हास झालेला नाही हे खरे. आजही ती एक जीवंत नी प्रेरक सक्ती आहे, पण एका प्रचंड दबावाखाली ती सापडली आहे, हे कोणालाही नाकारता येणार नाही. त्याचे कारण तिच्यामधील आंतरिक व पायाभूत श्रेष्ठतेचा अभाव, हे नसून, ज्यांच्या हातात हा वारसा पडला आहे, त्यांनाच या देशाच्या

परंपरेबद्दल यत्किंचीतही आत्मीयता नाही. कठीण प्रसंगी आपल्याला मार्गदर्शन करील, स्फूर्ती देईल असा या देशाचा वैभवशाली भूतकाळ आहे, यावर त्यांचा विश्वासच नाही. आपली पाटी संपूर्णपणे कोरी आहे, असे त्यांना वाटते. एका क्षुद्र पाश्चात्य कवीने तर अलीकडेच आपल्या समाजाचे वर्णन, ' अर्धराक्षस व अर्धबालक ' (हाफ डेव्हिल, हाफ चाईल्ड) अशा अवहेलनात्मक शब्दात करून म्हटले कीं, असा रानटी समाज सुधारण्यासाठी तुमच्या (म्हणजे ब्रिटीशांच्या) हवाली आपण केला आहे. ' यापेक्षा दुसरी कोणती लांच्छनास्पद गोष्ट असू शकेल काय ? पाश्चात्यांनी आपल्याला असे हीन लेखल्यानंतर तरी आत्मसंतुष्टतेच्या घोर निद्रेतून आपण जागे होणार आहोत की नाही ?

या देशाचे श्रेष्ठत्व आणि विचारवैभव जगात प्रस्थापित करण्याची आकांक्षाच समाजात प्रचंड पराक्रम करण्याची ईर्षा निर्माण करू शकेल; केवळ भौतिक समृद्धीची अभिलाषा नव्हे. म्हणूनच फक्त लाभासाठी आम्ही तुम्हाला उद्युक्त करू इच्छित नाही. आपण एक थोर आणि वैभवशाली राष्ट्र होतो, याची आपणाला प्रथम जाणीव झाली पाहिजे ; आणि त्याबद्दल आपणाला सार्थ अभिमान वाटला पाहिजे. आतापर्यंत आपल्या स्वाभिमानशून्य व शरणागत वृत्तीचा लाभ उठवूनच अन्य राष्ट्रांनी आपणाला विनाशाच्या गर्तेत फेकून दिले आहे. केवळ भौतिकतेच्या आकांक्षा राष्ट्र निर्मितीचे कार्य कधीच करू शकणार नाहीत. पण जेव्हा राष्ट्रीय स्वाभिमान जागृत होतो, तेव्हाच अधःपतित व विस्कळीत झालेले राष्ट्र पुन्हा एकजीव होते. त्यांत कल्पनातीत शक्तीची नैतिक ऊर्जा निर्माण होते. राजकीय विचारवंतांच्या मते अनन्यसाधारण विजय संपादन करण्याच्या प्रेरणेमागचे गमक काय आहे ? प्रत्येक इंग्लिश माणसाच्या अंतःकरणात दुसऱ्यावर वर्चस्व गाजविण्याची जी अनिवार्य इच्छा आढळते त्यामागचे रहस्य कोणते ? एका इंग्लिश लेखकानेच या प्रश्नांची उत्तरे दिली आहेत. तो म्हणतो, " आपल्या साम्राज्याचा प्रचंड विस्तार पाहून अभिमानाने आपला ऊर भरून का येतो ? असा प्रश्न आपण आपल्यालाच जर गंभीरपणे विचारला तर त्याला निरनिराळ्या प्रकारांनी उत्तर देता येईल. एक : त्यामुळे आमच्या संपत्तीत भर पडते. दोन : दुसऱ्यावर अधिसत्ता गाजविण्याची आमची इच्छा सफल होते, व तीन : आमच्या प्राचीन परंपरा त्यामुळे दृढ होतात. शिवाय मुख्य म्हणजे, आमच्या गौरवशाली इतिहासाचे आम्हाला विस्मरण होत नाही. पण या सर्व साफल्याच्या भावनांपेक्षाही त्याला आणखी एक महत्त्वाचे कारण आहे. ते असे की राजसत्ता व धर्मसत्ता यांच्याशी प्रदीर्घ संवैधानिक संघर्ष करून न्याय, व्यक्तिस्वातंत्र्य व धार्मिक सहिष्णुता यासारख्या ज्या उदात्त संकल्पना आम्ही जगात प्रसारीत केल्या, त्या सर्वच्या सर्व आम्ही आमच्या साम्राज्यात रुजविल्या इतकेच नव्हे तर त्या आम्ही तिथे प्रत्यक्ष अंमलात आणल्या. " ब्रिटीश साम्राज्यवाद्यांच्या या कल्पना किती खऱ्या आणि किती खोट्या याचा खल करीत बसण्याचे हे स्थळ नव्हे. पण एक मात्र खरे की अशा रास्त किंवा चुकीच्या मनोगंडाने त्यांना भारून टाकले आहे ; आणि त्यामुळेच ते जगांत आज अजिंक्य ठरत आहेत. दुसरा एक विचारवंत मिल यानेही अशाच अर्थाचे विचार मांडले आहेत. तीच

नस पकडून त्यावर भर देत आणखी एक लेखक श्री. सिजव्हिक आपल्या, " एलिमेंट्स ऑफ पॉलिटिक्स " या ग्रंथात म्हणतो, " साम्राज्यापासून आपल्याला भरपूर व्यावहारिक लाभ मिळतात हे तर खरच. पण त्याहीपेक्षा ते जिकण्यात आपण जे न्याय्य भावनिक समाधान अनुभवितो, त्याचाही विचार या संबंधात करणे आवश्यक आहे. उदाहरणार्थ, आपण जिंकलेल्या प्रदेशावर राज्य करीत असतांनाच, आपल्या थोर, उदात्त व अत्यंत प्रगल्भ संस्कृतीचा प्रचार व प्रसार करण्यात आपले राष्ट्र प्रभावी होत आहे, याचा प्रगत इंग्लिश समाजाला सार्थ अभिमान वाटतो. त्यामुळे आपण संपूर्ण मानव जातीचे कल्याण साधीत असल्याचे समाधानही त्याला मिळते. शिवाय देशभक्तीची एक प्रखर भावना या सर्व घटनेशी निगडीत आहे. ती अशी की इंग्रजी भाषा, साहित्य, विचार व वाङ्मय यांचा प्रसार या अंकित देशात जितका अधिक होईल, तितक्या प्रमाणात सहाजिकच तेथील जनता आपल्या आचार विचारांकडे, आवडीनिवडीकडे व जीवन शैलीकडे आकृष्ट होईल व त्यांचे ती अनुकरण करू लागेल. त्याचा परिणाम म्हणून आपली वैशिष्ट्यपूर्ण इंग्रजी संस्कृती व सभ्यता त्या ठिकाणी दृढमूल होईल व त्यामुळे तिथे आपली सत्ता अधिक काळपर्यंत अबाधित राहील. "

थोडक्यात सिजव्हिकच्या म्हणण्याप्रमाणे प्रादेशिक विस्तारवादाच्या मुळाशी सांस्कृतिक विस्तारवादाची आकांक्षाच असते. इतिहासातही त्याचे अनेक दाखले मिळतात. हे जर खर तर भारत हेच जगातील सर्वशक्तिमान राष्ट्र कां बनू नये ? कारण सर्व जगभर आध्यात्मिक विचाराचा प्रचार करण्याची निर्विवाद क्षमता अन्य कोणत्या राष्ट्रांत असू शकते ? म्हणूनच स्वामी विवेकानंदांनी त्यासाठी एक सर्वंकष योजना आखली होती. आध्यात्मिक क्षेत्रांतील भारताच्या निर्विवाद श्रेष्ठतेची जाणीव आपल्या समाजाला नव्याने करून देण्याची आज आत्यंतिक आवश्यकता आहे. ही जाणीवच देशभक्तीचा मूळ स्त्रोत आहे. मग आपोआपच आजची आत्मदूषणाची व हीनगंडाची भावना नष्ट होईल व आपले गत वैभव पुन्हा संपादन करण्याची अदम्य इच्छा आपल्या समाजात पुन्हा प्रज्वलीत होईल.

**वंदे मातरम् १९-६-१९०७**

●●●

## १२. धर्म आणि राजकारण . . . . . . . . २-८-१९०७

**ज्या भारतभूमित बुद्धिनिष्ठ धार्मिक सिद्धान्त मांडले गेले तेथे धर्म राजकारणापासून विभक्त आहे असे म्हणणे हास्यास्पद आहे असे सांगून श्रीअरविंद म्हणतात, परकीय राजवटीचे दुष्परिणाम आपण रोज प्रत्यक्ष अनुभवत आहोत. धार्मिक नेत्यांनी आपल्या कार्यकक्षेत राजकीय क्षेत्र आणण्याची आवश्यकता आहे.**

**ब्रिटीश नोकरशाहीचे** रखवालदार सध्या अनेक शोध लावण्यात गुंतलेले दिसतात. हिंदुस्थानातील काही धार्मिक संस्थात राजकीय प्रवृत्ती बळावत चालल्याचा त्यांनी निष्कर्ष काढला आहे. त्यांच्या या प्रतिपादनात सत्य आहे किंवा नाही यावर इथे आम्हाला विचार करावयाचा नाही. परंतु खरोखरच कांही धार्मिक संस्था राजकीय कामाकडे वळल्या असतील तर ते योग्यच आहे, असे आमचे स्पष्ट मत आहे. डॉ. जॉनसनने राजकारण्यांची व्याख्या केली होती. तिच्याशी इथले अँग्लोइंडियन पत्रकार बहुधा सहमत नसावेत. लोकशाही प्रधान युरोपही ती मानत नाही, अर्थात् इथली अँग्लोइंडियन पत्रकारिता सुसंस्कृत, लोकांच्या हातात असल्याचे ऐकिवांत नाही. परंतु कॉन्स्टंटाईन या रोमन सम्राटाच्या काळापासून ख्रिश्चन धर्माने लोकशाही विचारांचा प्रसार करण्यात फारच मोलाची कामगिरी बजावली आहे, हे त्यांच्या कानावर गेले असावे. मॅकॉलेने तर एके ठिकाणी म्हटले आहे की, ख्रिश्चन धर्म म्हणजे सुराज्याची एक योजनाच आहे.

पण ख्रिश्चन धर्म व राजकारण यामधील अन्योन्य संबंधांचा मुद्दा जरी क्षणभर बाजूला ठेवला तरी, ज्या भरत भूमीत बुद्धीनिष्ठ धार्मिक सिद्धांत मांडले गेले, तिथे धर्म राजकारणापासून विभक्त आहे, असे म्हणणे, हा एक मोठाच विनोद आहे. कारण धर्माची अनुज्ञा असल्याशिवाय इथे कोणताही विचार मान्यताप्राप्त होऊच शकत नाही. शिवाय आपल्या धर्माने अन्य सर्व प्रश्नापेक्षाही राजकारण या विषयाला अव्वल प्राधान्य दिले आहे. आध्यात्मिक प्रवृत्तीच्या लोकांना त्यांच्या धार्मिक आन्हिकांत संपूर्ण संरक्षणाची हमी हे तर आमच्या धर्माप्रमाणे राजाचे प्रधान कर्तव्य मानले गेले आहे. तो या देशातील आध्यात्मिक विचारसंपदेचा रखवालदार मानला जात असे. म्हणूनच राजकीय स्वातंत्र्याशिवाय आध्यात्मिक उन्नती केवळ अशक्य आहे अशी खात्री पटल्यामुळे तिथल्या धार्मिक संस्थांनी तद्नुषंगाने आपल्या कार्यप्रणालीत काही बदल घडवून आणले असले तर त्यांच्या या चातुर्याबद्दल त्या अभिनंदनास पात्र आहेत. आमच्या हिंदु तत्त्वज्ञानाप्रमाणे आत्मज्ञान व आत्मप्रतीती हीच धर्माची प्रमुख उद्दिष्टे आहेत. म्हणून बाह्यशक्ती आमचा समाज विस्कळीत करून त्याच्या प्रगतीला खीळ

घालू पाहतील तर ही दोन्ही उद्दिष्टे साध्य कशी होणार ? ब्रिटनचा राजकीय विस्तारवाद म्हणजे मूलतः त्यांच्या आध्यात्मिक विचारांचाच प्रसार होय, असे प्रतिपादन मिल व सिजव्हिक या दोन इंग्लिश विचारवंतांनी केल्याचा उल्लेख आम्ही यापूर्वीच केला आहे. ते जर अशा तऱ्हेने इंग्लंडच्या साम्राज्यवादाचे समर्थन करू पाहतील, तर मग त्याच न्यायाने आमचेही धर्म प्रचारक आमच्या आध्यात्मिक विचारांच्या प्रसारासाठी राजकीय स्वातंत्र्य आवश्यक असल्याचा दावा करीत असतील तर त्यांच्या नावाने बोटे मोडण्याचा तुम्हाला काय अधिकार आहे ? जगातील इतर राष्ट्रांना मागे टाकून आपल्या पूर्वजांनी आध्यात्मिक क्षेत्रात असामान्य प्रगती केली. त्याबद्दल त्यांना सार्थ अभिमान वाटणे सहाजीक आहे. हे जर मान्य केले तर मग त्याच भारतीयांनी त्यांच्या आध्यात्मिक विकासाच्या आड येण्याऱ्या शक्तीविरुद्ध संघर्ष मांडला तर तो वाजवी कां ठरू नये. आपण राजकीयदृष्ट्या कमकुवत असून देखील आध्यात्मिक क्षेत्रांत पराक्रम गाजवू शकू, हे म्हणणे निखालस चुकीचे आहे. गतकाळात भारतीय हा जितका स्वार्थत्यागी, पराक्रमी व उदात्त होता, तितका तो आज राहिला नाही. ही वस्तुस्थिती आहे. राजकीय स्वातंत्र्य गमावल्यामुळेच तो मनाने दुबळा व क्षीण बनला, हे त्याचे एक प्रमुख कारण आहे. भोवतालच्या वातावरणाचा उपयोग करून आत्मोन्नती घडवून आणण्याची त्याची क्षमताही कमी झाली आहे. आलेल्या संधीचा पुरेपूर लाभ उठवून त्याच्या आंतरिक शक्ती अधिक बळकट करण्यास आज तो असमर्थ ठरत आहे. त्यांचे जीवन सकुंचित झाले आहे. पूर्वीचा त्याचा विशाल दृष्टिकोन तो गमावून बसला आहे. आपल्या स्वतःच्या हिताची सांगड तो राष्ट्रहिताशी घालू शकत नाही. स्वतःला विश्वरूपांत विलीन करण्याचे साधनच तो हरवून बसला आहे. आपल्या व्यक्तिगत इच्छा, आकांक्षा, किंबहुना, आपले सर्वस्वच विशाल राष्ट्रीय अस्मितेत एकरूप करून टाकणे ही एक आध्यात्मिक प्रक्रीया आहे. मानवी मन त्यादृष्टीने तयार करण्याचे सामर्थ्य आध्यात्मिक मार्गाशिवाय दुसऱ्या कुठल्याही कृत्रीम दिखाऊ व औपचारिक मार्गात नाही. श्रीकृष्णाने अर्जुनाला जो उपदेश केला तेच गीतेचे सार आहे. तो अर्जुनाला म्हणाला, " अंतिम कल्याणासाठी तू मोहादि क्षुद्र भावनांचा त्याग कर. स्वतंत्र नागरिकांच्या समाजाभिमुख कार्याखेरीज आध्यात्मिक उन्नतीची कोणतीही योजना परिणामकारक होऊच शकणार नाही. त्यासाठी त्याच्या जीवनाची जडणघडण करतांना त्याला केवळ स्वतःचा वा त्याच्या कुटुंबाचा विचार करून चालणार नाही, तर देश व देंशवासियांचाही विचार त्यावेळी करावा लागेल. इतकेच नव्हे तर आंतरराष्ट्रीय प्रश्नांचाही विचार करणे त्याला भाग आहे. अखेर मानवजातीशी एकरूप होण्याखेरीज त्याला गत्यंतर नाही. "

मानवजातीच्या कल्याणासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवर होणाऱ्या विचारविनिमयांतून गुलाम राष्ट्रांना नेहमीच वगळण्यात येते. ज्या तऱ्हेने हेग परिषदेत भाग घेण्याचे कोरियाचे प्रयत्न हाणून पाडण्यात आले, त्यावरून हीच गोष्ट सिद्ध होते. युरोपच्या सर्व राष्ट्रांनी त्याच्या या आकांक्षेची खिल्ली उडवली. राजकीयदृष्ट्या मृत राष्ट्र हे जगाच्या दृष्टीने कवडीमोल असते. जे आपल्या शरीराचा ताबा दुसऱ्याला घेऊ देतात, ते कालांतराने आपल्या आत्माही

गमावून बसतात. आत्मा हा शरीरापेक्षा श्रेष्ठ असतो हे खरे. पण ते दोन्ही एकमेकांत इतके अतूटपणे गुंतलेले असतात की त्यातील जरी एकानेही शरणागती पत्करली तरी त्याचवेळी दुसऱ्याचेही अस्तित्व धोक्यात येते. म्हणूनच जे आध्यात्मिक रहस्य जाणून घेऊ इच्छितात, त्यांना त्यांच्या शारीरिक तंदुरुस्तीची काळजी घेण्यास प्रथम सांगण्यात येते. आध्यात्मिक प्रगतीसाठी उत्तम शरीरप्रकृती ही एक प्राथमिक गरज आहे. जे तत्त्वज्ञान शरीर व मन यांची फारकत करते ते तत्वज्ञानच नव्हे. त्यांतील परस्परावलंबीत्व आपण ओळखले पाहिजे. त्यापैकी एकाचे फक्त अस्तित्व मानणे व दुसऱ्याचे अमान्य करणे ही शुद्ध फसवणूक आहे. शंकराचार्यांनी वेदांताचा अर्थ सांगताना याला अर्धवट ज्ञान म्हटले आहे. शरीराच्या सदृढतेचा विचार आपण सोडल्यामुळेच आपली अशी दुर्धर अवस्था झाली आहे. आपले शरीर परकीयांच्या ताब्यात देवून आपण आध्यात्मिक प्रगतीचे शिखर गाठू शकू असे समजणे म्हणजे स्वतःची धादांत फसवणूक करण्यासारखे आहे. परिणामतः शारीरिक स्वास्थ्य बिघडते, आर्थिक उत्पात घडवून येतात व आध्यात्मिक क्षेत्रात प्रगती ऐवजी पीछेहाट होते. परकीय राजवटीचे हे दुष्परिणाम आपण रोज प्रत्यक्ष अनुभवित आहोत ; त्याचे भरपूर पुरावे रोज उपलब्ध होत आहेत. समाजातील प्रत्येक घटकापर्यंत ते पोचवले जात आहेत. म्हणून धार्मिक नेत्यांनी आपल्या कार्यकक्षेत राजकीय क्षेत्रही आणण्याची आज अत्यंत आवश्यकता आहे. तोच आजच्या घडीचा स्पष्ट संकेत आहे.

**वंदे मातरम्, २-८-१९०७**

●●●

## १३. राष्ट्रीयत्वाचीं मूलतत्त्वे . . . . . . . .

१७-८-१९०७

**एक भाषा, एक धर्म किंवा जीवनपद्धती आणि एक वंश या राष्ट्रीयत्वाच्या घटकांच्या अभावाने भारत एक राष्ट्र कसे या शंकेचे निरसन करताना श्रीअरविंद म्हणतात भौगोलिक एकसंघता, समान भूतकाळ, सर्वांना बांधू शकणारे समान हितसंबंध या सर्वांच्या एकत्रित अभिव्यक्तीतून राष्ट्रीयत्वाची संकल्पना मूळ धरते व अविरत संघर्षातून राष्ट्रीयत्वाची अदम्य शक्ती निर्माण होते.**

'**इंडियन नेशन**' या नियतकालिकाचे संपादक श्री. ए. एन. घोष हे आपण एक विद्याविभूषित व गाढे विद्वान असल्याचा लौकिक बाळगून आहेत. इतकेच नव्हे तर भारतात तसा अधिकार असलेले आपण एकमेव गृहस्थ आहोत असाही आपला एक लाडका भ्रम मधून मधून ते प्रगट करीत असतात. त्यामुळे अर्थातच राष्ट्रीयतेच्या क्षेत्रांतील इतर जनमान्य दार्शनिकांच्या विद्वतेबद्दल आणि त्यांच्या शैक्षणिक पात्रतेबद्दल ते नेहमीच शंका प्रदर्शित करतांना आढळतात. इतकेच नव्हे तर, समाजाचे राजकीय प्रबोधन करण्याची उठाठेव त्यांनी करू नये, ती त्यांची पात्रता नाही, असेही त्यांना ते ठणकावून सांगत असतात. या बाबतीत ते " वंदेमातरम् " चालविणाऱ्यांनाच तसे आव्हान देऊन थांबत नाहीत ; तर श्री. बिपिनचंद्र पाल सारख्या राजकीय विचारवंताला आणि पट्टीच्या वक्त्याला ते वेठीस धरतात. आता या बिपिनचंद्र पालांचे लेख आणि भाषणे वाचून इंग्लंड मधील आमच्या कट्टर विरोधकांना देखील नाईलाजास्तव कां होईना, स्तुतिपर उद्‌गार काढावे लागले, हे त्यांच्या गावीही नाही. आमच्या युगांतरच्या संपादकांना, तर ते, पौगंडावस्थेत नुकताच प्रवेश करू पाहणारा अर्धशिक्षित, अज्ञ माणूस, म्हणून संबोधतात. आता ' इंडियन नेशन ' च्या संपूर्ण वर्षभरातील चोपड्यांना, ' युगांतर ' मधील एका लेखाची देखील सर येणार नाही ही गोष्ट वेगळी. कारण ' युगांतर ' मधील प्रत्येक लेख, हा वैचारिक स्पष्टता, भाषिक सौष्ठव, गाढा व्यासंग आणि प्रकांड पांडित्य यांची साक्ष देणारा असतो. अलिकडे श्री. घोष यांनी ' हिंदुस्थानच्या राष्ट्रीयतेचे भवितव्य ' या विषयावर एक लेख लिहिला आहे. त्यांच्या दृष्टीने ते अंधःकारमय आहे. आपल्या या प्रमेयाच्या पुष्ट्यर्थ त्यांनी इतिहासातील काही दाखलेही वाचकांपुढे पेश केले आहेत. आणि, काय सांगू, तसं करतांना कोणालाही थक्क करून टाकणाऱ्या ढोबळ व प्राथमिक स्वरुपाच्या घोडचुका त्यांनी केल्या आहेत. त्यापाहून आतापर्यंत मेट्रोपोलिटन कॉलेजच्या प्राचार्य पदाची खुर्ची उबविण्याऱ्या पौगंडाने ' इंडियन नेशन ' च्या संपादकीय खुर्चीवर एकदम कशी उडी मारली, याचे कोणालाही बेहद्द आश्चर्य वाटेल. वानगीदाखल त्यांच्या इतिहासविषयक अज्ञानाचे कांही पुरावेच आम्ही इथे सादर करतो.

इटालियन गणराज्याचे एका राष्ट्रांत रूपांतर होणे, हा त्या देशाच्या स्वातंत्र्याचा परिणाम नसून कारण होते. त्यांचे हे विधान ऐतिहासिक सत्य घटनांवर आधारलेले नाही. पण त्याची सत्यता क्षणभर बाजूला ठेवली तरी एक प्रश्न त्या अहंगड टिकाकाराला प्रथमच विचारला पाहिजे. का हो, इटालियन गणराज्ये म्हणजे काय ? इटालीत अशी गणराज्ये अस्तित्वात होती, हे खरे. त्या काळात नेपल्स आणि सिसिलीही राजा बोंबा यांच्या अधिपत्याखाली होती ; रोम पोपच्या वर्चस्वाखाली होते ; तर टस्कनी ग्रँट ड्यूकच्या, लोंबार्डी ऑस्ट्रियनांच्या किंवा सार्डिनिया व पाईडमाँट व्हिक्टर अमडुअसच्या वंशाच्या अधिपत्याखाली होती. याचा अर्थ ती गणराज्ये नव्हती. पुढे एके ठिकाणी तर श्री. घोष साहेब शोध लावतात की, पर्शिया हा छोट्या छोट्या ग्रीक राष्ट्रांचा समान शत्रू म्हणून उदयास आल्यानंतरच त्यांचे राष्ट्रीय एकीकरण होऊ शकले. अरे वा ! आम्ही तर उगाचच समजत होतो की, ग्रीसमधील निरनिराळ्या राज्यात राष्ट्रीय ऐक्याची भावना कधीच निर्माण होऊ शकली नाही, कारण ग्रीसच्या इतिहासाचे तेच एक ठळक वैशिष्ट्य आहे. तेथील निरनिराळी नगर राज्ये आपल्यातील फुटीर, भावनेवर कधीच मात करू शकली नाहीत ; व ' एक ग्रीस ' ही भावना दृढमूल करुं शकली नाहीत, हे ऐतिहासिक सत्य आहे. घोष साहेब पुढे सांगतात, की प्राचीन इटलीतील (म्हणजे काय ?) राज्ये आणि प्रांत केवळ समान शत्रूच्या अस्तित्वामुळेच सहजगत्या एकत्र झाली ; व त्यांनी एक महान एकछत्री राज्य निर्माण केले. पण बिचारे इतिहासकार वेगळेच सांगतात. ते म्हणतात, इटलिअन राष्ट्र हे रोमच्या तरवारीच्या बळावर आपण होऊन निर्माण झाले नाही. कारण कार्थेजिनयिन आक्रमकांनी रोमन साम्राज्याची अभेद्यता त्या आधीच अनुभविली होती. म्हणजे इटालीचे राष्ट्रीय ऐक्य हे काही त्यांच्या समान शत्रूने कार्थेजिनीयनमुळे घडून आले नाही. सारांश, त्यांचा हा लेख अनेक चुकांनी इतका भरगच्च आहे की त्या सर्व शोधून काढणे हे काम मोठेच जिकिरीचे ठरेल, शेवटी ए. एन. घोष यांना आम्ही असे सुचवितो की समाज प्रबोधनात व्यग्र असलेल्या अन्य विचारवंतांच्या पात्रतेवर शिंतोडे उडवण्यापेक्षा त्या बाबतीतील खुद्द त्यांचीच योग्यता व अधिकार काय आहे, ते त्यांनी एकदा तपासून पहावे हे बरे.

वर उल्लेखिलेल्या ऐतिहासिक घोडचुकांखेरीज त्यांनी आपल्या लेखात आणखी एक सर्वत्र आढळणारा गैरसमजही उधृत केला आहे. अनेक देशभक्त मंडळी देखील या भ्रमाची शिकार झाले आहेत. त्यामुळे त्यांच्या देशभक्तीची भावना तर बोथट होतेच ; शिवाय अंततोगत्वा त्यांचा अवसानघातही होतो. घोष साहेब म्हणतात, " एक गोष्ट नेहमीच ठळकपणे ध्यानात बाळगणे आवश्यक आहे. तिचे कधीही विस्मरण होऊ देता कामा नये. ती अशी कीं राष्ट्रीय ऐक्यासाठी तीन गोष्टींची नितांत आवश्यकता असते. एकभाषा, एकधर्म किंवा एकजीवनपध्दती आणि एक वंश ". हिंदुस्थानात या प्रत्येक बाबतीत अतोनात भेद असल्यामुळे, त्यांच्या मते

इथे राष्ट्रीय ऐक्य निर्माण हे सुतराम शक्य नाही. धर्म, भाषा आणि वंश यामधील भिन्नता राष्ट्रीय ऐक्याच्या प्रक्रियेतील अडथळा समजला जातो. पण ही वस्तुस्थिती आहे काय? आम्हाला तसे वाटत नाही. उलट या तिन्ही बाबतीत भेद असून देखील अनेक देशांत अखंडता व ऐक्य अस्तित्वांत येऊ शकले आहे! खुद्द ' इंडियन नेशन ' ने देखील तशी कबुली देऊन म्हटले आहे की इंग्लिश राष्ट्र हे अनेक वंश मिळून बनले आहे. परंतु अलीकडच्या काळातही जे अन्य भाषिक लोक इंग्लंडच्या राष्ट्रीय प्रवाहांत सामील झाले, त्यांनी आपली वेगळी जीवन पध्दती व स्वतंत्र भाषा कटाक्षाने जपली आहे या गोष्टीचा उल्लेख मात्र त्यांनी हेतुतः टाळला आहे. त्याचप्रमाणे त्यांनी स्वीट्झर्लंडचे ठळक उदाहरणही गाळले आहे. त्या ठिकाणी तर वेगवेगळ्या तीन भाषा बोलणारे तीन पंथाचे लोक एकत्र राहतात. परंतु त्यांनी आपली भाषिक व वांशिक भिन्नता कायम ठेवली आहे. त्याचप्रमाणे फ्रान्समध्येही तीन भाषा बोलल्या जातात. अमेरिकेच्या व्हाईट हाऊसच्या निवडणुकीला उभे राहणारे उमेदवार राष्ट्राला उद्देशून चौदा भाषांत भाषणे करतात. ऑस्ट्रेलिया व रशिया देशांतही अनेक धर्मांचे, अनेक भाषांचे व अनेक वंशांचे मिश्रणच आढळतें. परंतु त्यांच्यातील राष्ट्रीय एकीकरणाला त्यामुळे कुठेच बाध आलेला नाही. म्हणून श्री. घोष यांचे राष्ट्रीय ऐक्यासंबंधीचे विचार वस्तुस्थितीच्या व तर्कनिष्ठतेच्या कसोटीवर टिकणारे नाहीत. वरील तिन्ही गोष्टीतील साधर्म्य हे कदाचित राष्ट्रीयत्वाच्या विकासाला पोषक ठरू शकेल. परंतु त्यासाठी असे साधर्म्य अपरिहार्य नाही. शिवाय त्यामुळे ऐक्यभावना अभंग राहील असेही नाही. रोमन साम्राज्याने एक भाषा, एक धर्म व एक जीवनशैली यांचा आग्रह धरून आपल्या केंद्रसत्ताधिष्ठित राज्यपद्धतीच्या साहाय्याने सर्व वांशिक व भाषिक भेद नष्ट करण्याचा व एक महान रोमन राष्ट्र निर्माण करण्याचा प्रचंड प्रयोग करून पाहिला. पण त्यांत ते यशस्वी झाले नाहीत.

एतद्‌र्थ, हे तिन्ही घटक राष्ट्र निर्मितीला अपरिहार्य नाहीत, हे एकदा मान्य केल्यानंतर प्रश्न निर्माण होतो तो असा की मग राष्ट्रवादाचे आवश्यक घटक तरी कोणते ? आमच्या दृष्टीने, भौगोलिक एकसंघता, समान भूतकाळ, सर्वांना एकत्र बांधू शकणारे समान हितसंबंध आणि कांही अंशी अनुकूल राजकीय परिस्थिती. या सर्वांच्या एकत्रित प्रक्रियेतून एक स्वतंत्र व सुसंघटित राज्य निर्माण करण्याची प्रेरणा निर्माण होते. अशा राज्याच्या अभिव्यक्तींतूनच राष्ट्रीयत्वाची संकल्पना मूळ धरते. अशा राष्ट्रांचे अस्तित्व चिरंतन व अखंडित राखण्यासाठी ही राष्ट्रीयत्वाची प्रेरणा पुढे अविरतपणे धडपडत रहाते. हे कार्य राष्ट्राचा एखादा भाग करील, किंवा अन्य वंशाच्या लोकांना वा जमातींना आपल्या नेतृत्वाखाली किंवा प्रभावाखाली संघटीत करू शकणाऱ्या एखाद्या पंथाचे व वंशाचे लोक करतील ; अथवा अशी एकात्मता परकीय वा अंतर्गत दबाव शक्तीशी कराव्या लागणाऱ्या संघटित प्रतिकारांतूनही निर्माण करतील. समान सामूहिक ऊर्जा व समान हितसंबंध या दोन गोष्टी जेव्हा एकजीव होतात,

तेव्हाच राष्ट्रीयत्व दृढमूल होते. आमचा असा विश्वास आहे की, हे सर्व घटक हिंदुस्थानात अस्तित्वात आहेत. आपला स्वातंत्र्य संग्राम अधिक तीव्र करण्याची वेळ आज आली आहे. परकीय शक्तीविरुद्ध आपण बहिष्कारांचे व असहकारांचे शस्त्र वापरू शकतो. पण त्यासाठी प्रथम आपणाला समान आकांक्षा व सामूहिक इर्षा आपल्या समाजात निर्माण करावी लागेल. अशा अविरत संघर्षातूनच संघटित राष्ट्रीयत्वाची अदम्य शक्ती अगदी लौकर निर्माण होईल, याची खात्री बाळगा. त्यासाठी आपल्या पूर्वजांनी अप्रतिहत प्रयत्न केले अशी साक्ष आपला इतिहास देतो. त्यांचे ते स्वप्न आपण साकार करुया.

**वंदे मातरम्, १७-८-१९०७**

## १४. विद्यार्थ्यांना संदेश

२३-८-१९०७

**नॅशनल कॉलेजच्या विद्यार्थ्यांसमोर केलेल्या भाषणात श्रीअरविंद म्हणाले, '' आपल्या मातृभूमीच्या इतिहासात असा समय आज येऊन ठेपला आहे की, तिच्या सेवेखेरीज अन्य सर्व काही दुय्यम ठरतात व सर्वांच्या शक्ती त्या एकाच ठिकाणी केंद्रित होणे आवश्यक ठरते. तुम्ही अभ्यास करीत असाल तर तो तिच्यासाठीच करा. तुमच्या सर्व शारिरीक आणि मानसिक शक्ती मातृभूमीच्या सेवेसाठी तुम्ही खर्च करा. ''**

आपणाला उद्देशून मी उपदेशात्मक चार शब्द सांगावे असे मला सांगण्यात आले आहे. परंतु मला तर अलीकडे असे वाटू लागले आहे की, आम्हा वृद्धांपेक्षा आजची तरूण पिढीच दुसऱ्याला अधिक चांगला उपदेश करू शकते. शिवाय अलीकडेच माझ्याविषयी तुम्हाला वाटणारे अपरंपार प्रेम आपल्या लहानसहान कृतींतून तुम्ही प्रकट केलेत, त्यामुळे माझ्या अंतःकरणात उठलेला भावनांचा कल्लोळ मी आपणापुढे उघड करावा असा आग्रह तुम्ही मला करू नये. कारण त्या भावना शब्दात व्यक्त करणे मला केवळ अशक्य आहे. मी ज्या अडचणींतून सध्या जात आहे, त्याबद्दल आपणाला वाटणारी सहानुभूती तुम्ही काल घेतलेल्या एका सभेत प्रगट केलीत. पण खरे म्हणाल, तर त्यांना अडचणी वा क्लेश म्हणावे, असं मला वाटत नाही. कारण माझ्या बालपणातच मी जे माझे जीवीत कार्य ठरविले त्याच्या पूर्ततेसाठी या सर्व अपरिहार्य अनुभवातून मला जावे लागणार हे ही मी त्याच वेळी ओळखले होते. त्यामुळे त्यांना समोरे जात असतांना माझ्या मनात यत्किंचीतही विषादाची भावना नाही. म्हणूनच माझ्या सध्याच्या अडचणीबद्दल तुम्हाला वाटणाऱ्या सहानुभूतिपेक्षा माझ्या अंगिकृत कार्याबद्दल तुम्ही अतीव आस्था बाळगता, अशा आश्वासनाची मी तुमच्याकडून अपेक्षा करतो. मी तुम्हाला सोडून जातो आहे हे तर खरेच. पण तसे करतांना मी माझ्यामागे एक कार्य ठेवून जात आहे. आजच्या तरूण पिढीने ते कार्य आपल्या शिरावर घेतल्याचे जर मला आढळले, तर मी कुठे का जाईना, तुमचा निरोप घेतांना मला मुळीच खेद वाटणार नाही. म्हणूनच तुम्ही जो आदर व्यक्त केलात, तो व्यक्तिशः माझ्यासाठी नव्हता ; किंवा मी या कॉलेजचा मुख्याध्यापक आहे म्हणूनही नव्हता. आपल्या देशाविषयी तुम्हाला वाटणाऱ्या आत्मीयतेचे ते एक आगळे रूप होते किंवा माझ्या मातृभूमीविषयी मला वाटणाऱ्या असीम भक्तीला तुम्ही दिलेला तो एक प्रतिसाद होता. कारण मी जे काही थोडेबहुत कार्य केले असेल ते तिच्यासाठीच केले आहे ; किंवा भविष्यात जे काही कष्ट मी उपसणार आहे तेही तिच्यासाठीच असतील. माझ्या विषयींच्या तुमच्या आत्मीयतेकडे मी जेव्हा या दृष्टिकोनातून पहातो तेव्हा माझे कार्य करण्यास मी ज्यावेळी शारिरीक दृष्ट्या असमर्थ ठरेन,

त्यावेळी ते पुढे चालू ठेवण्यास माझ्या मागे किती तरी जण असतील, असा मला विश्वास वाटतो. याक्षणी मला जो आनंद होत आहे, त्याला आणखीही एक कारण आहे. आज तुमच्या मनातील माझ्याबद्दलच्या ज्या भावना मी अनुभवीत आहे, त्याच भ्रातृभावना माझ्या असंख्य देशबांधवांच्याही अंतःकरणात त्याच कारणासाठी वसत आहेत, सर्व देशात ही भावना सार्वत्रिक आहे. समाजाच्या सर्वच स्थरांतील लोकांनी माझ्याबद्दल त्याच सद्भावना व्यक्त केल्या आहेत ; व माझ्या कसोटीच्या काळात मला सर्व प्रकारची मदत करण्याचे त्यांनी आश्वासन दिले आहे. त्याबद्दल आज मला विलक्षण आनंद होत आहे. तसे पाहिलं तर, मी कोणीच नाही. मी जे कार्य केले आहे तेही अत्यल्प आहे. वास्तविंक माझ्या बांधवांकडून हा जो भ्रातृभाव मी अनुभवीत आहे, त्याचे कारणही त्यांच्या अंतःकरणात त्यांना मनोमन पटलेले कार्यच मी करीत आहे, हेच होय.

या प्रसंगी मी आपणास एकच उपदेश करू शकतो. ज्या उद्देशाने या कॉलेजची स्थापना करण्यात आली होती, त्या कार्याच्या पुर्तीसाठी तुम्ही सतत प्रयत्नशील रहा. हे कार्य कोणते ते तुम्ही जाणताच. बाकीचे सर्व उद्योग, जीवनांतल्या सर्व संधी यांचा त्याग करून जेव्हा या कॉलेजची आम्ही स्थापना केली, तेव्हा आमचे सर्व जीवनच त्यासाठी व्यतीत करण्याचा निर्णय आम्ही घेतला. आम्ही हे सर्व कशासाठी केले ? या कॉलेजच्या स्थापनेच्या रूपाने आम्ही देशाच्या एका प्रेरणेचे बीजारोपण केले. एका नव्या राष्ट्र निर्मितीच्या कार्याची मुहूर्तमेढ त्या निमित्ताने आम्ही रोवली. प्रारंभिक अडचणींची अंधःकारमय व दुःखदायक रात्र संपून, या राष्ट्राच्या अंगभूत महानतेची जाणीव या देशाला होईल व जगाच्या उद्धारासाठी भारत पुन्हा कटिबद्ध होईल, अशी स्वप्ने आम्ही त्यावेळी पाहिली होती. तुम्हाला केवळ पुस्तकी ज्ञान देणे किंवा तुमच्या उपजीवीकेचे साधन तुम्हाला उपलब्ध करून देण्यासाठीच केवळ हे कॉलेज आम्ही सुरू केले नाही. त्याच बरोबर या मातृभूमीसाठी काबाडकष्ट करणारी व तिच्यासाठी कोणताही त्याग करायला सिद्ध असणारी एक पिढी निर्माण करणे, हाही एक प्रमुख उद्देश होता. त्यासाठीच हे कॉलेज आम्ही सुरू केले व भविष्य काळात त्याच कार्यासाठी तुम्हीही स्वतःला जुंपून घ्याल अशी मी आशा करतो. त्या बाबतीत आमच्याकडून राहून गेलेल्या त्रुटी व अपुरी राहिलेली कामे तुम्ही पूर्ण करावीत व समाजापुढे एक नवा आदर्श उभा करावा. मी परत येईन तेव्हा तुमच्यापैकी काहीजण संपत्तीमान झालेले मला दिसतील. पण त्या संपत्तीचा उपयोग तुम्ही एकट्यासाठीच न करता त्याबरोबरच तुमच्या मातृभूमीलाही समृद्ध करणे, हे तुमचे कर्तव्यच ठरते. तुमच्यापैकी काही जण मोठ्या पदालाही चढलेले असतील. पण ते मोठेपण केवळ तुमच्या पुरतेच मर्यादित राहू नये किंवा त्याला दुराभिमानाचा किंवा आढ्यतेचा दर्पहि तुम्ही येऊ देता कामा नये. तुमच्या मोठेपणाचा उपयोग अखेर मातृभूमीलाच झाला पाहिजे, इतका की त्यामुळे देश मोठा होईल. एवढा मोठा की संबंध जगातील राष्ट्रात त्याची मान सर्वात उंच राहील, व प्राचीन काळी इतर सर्व देश जसे मार्गदर्शनासाठी भारताकडेच पहात. तीच स्थिती तुम्ही त्याला प्राप्त करून दिली

पाहिजे, दुर्दैवाने तुमच्या पैकी जे गरीब रहातील किंवा मागे पडतील, त्यांनी देखील आपले दारिद्र्य व मागासलेपण मातृभूमीच्याच चरणी वहावे, राष्ट्राच्या इतिहासात केव्हातरी अशी वेळ येते की जेव्हा परमेश्वर त्याच्या पुढे असे एकच ध्येय व एकच कार्य ठेवतो, की त्यापुढे अन्य सर्व कार्ये–मग ती कितीहि उदात्त व कितीही महत्त्वाची असोत ती अशा परमेश्वरनिहित कार्यापुढे गौण ठरविणे अपरिहार्य ठरते. आपल्या मातृभूमीच्या इतिहासात असा समय आज येऊन ठेपला आहे, तिच्या सेवेखरीज अन्य सर्व कार्ये दुय्यम ठरतात ; व सर्वांच्या शक्ती त्या एकाच ठिकाणी केंद्रीत होणे आवश्यक ठरते. तुम्ही अभ्यास करीत असाल तर तो तिच्यासाठीच करा. तुमच्या सर्व शारिरीक व मानसिक शक्ती मातृभूमीच्याच सेवेसाठी तुम्ही खर्च करा. तिच्यासाठीच केवळ तुम्ही धनार्जन करा. तुम्ही परदेशात गेलात तर तिथे जे ज्ञान मिळवाल, त्याचाहि उपयोग तुम्ही देश कार्यासाठीच केला पाहिजे, तुम्ही जे काम कराल, त्यातून देश समृद्ध झाला पाहिजे. त्याच्या आनंदासाठी तुम्ही दुःख सहन करायला शिका. माझ्या या एकाच संदेशात सर्व काही सामावले आहे. आपणास माझा अखेरचा आदेश असा की माझ्याबद्दल तुमच्या ठिकाणी जी आदराची भावना आहे तीच भावना मी करीत असलेल्या कार्यावर ठेवा. त्या भावनेचे रूपांतर तुम्ही प्रत्यक्ष कार्य करण्यात घडावे. भविष्य काळात यदाकदाचित मी इथे आलो, तर त्यावेळी मी जेव्हा तुमच्या अशा उज्ज्वल कार्य कर्तृत्वाचा आलेख बघेन, तेव्हा ज्या कार्याचे बीज मी तुमच्या ठिकाणी पेरले होते, व ज्याच्यासाठी मी तुमची तयारी केली होती, त्याची मला अभिमानपूर्वक आठवण होईल.

**वंदे मातरम् २३-८-१९०७**

● ● ●

## १५. चिवट जातीव्यवस्थेतील अपप्रवृत्ती

२०-९-१९०७

**हिंदु धर्म अद्वैतावर अधिष्ठित झाला आहे. तो एकात्मिक ब्रह्मतत्त्व मानतो. तोच अपरिवर्तनीय, अभेद्य व चिरंतन परमेश्वरी अंश प्रत्येक व्यक्तीत असतो अशी त्याची श्रद्धा आहे. अशा उच्च विचारांची शिकवण देणाऱ्या हिंदू धर्माच्या तत्वाशी कोणत्याही प्रकारची विषमता पूर्णपणे विसंगत आहे असे विवेचन श्रीअरविंद यांनी केले आहे.**

श्री. बाळ गंगाधर टिळक यांनी जाति व्यवस्थेबद्दल मांडलेले परखड विचार ' बेंगाली ' या नियतकालिकाने प्रसिद्ध केले आहेत. दक्षिणेकडचा हा थोर राष्ट्रवादी विचारवंत म्हणतो की, सध्या आढळणारी सामाजिक विषमता ही अत्यंत हानीकारक आहे. त्यांनी असे विचार मांडणे हे अगदी सहाजिकच आहे ; कारण टिळक हे कट्टर व निष्ठावान हिंदू असून ते निखळ राष्ट्रवादी विचारांचे पुरस्कर्ते आहेत. मध्यंतरीच्या काळात जातिव्यवस्थेच्या आधारभूत विचारांबद्दल बऱ्याच गैरसमजुती पसरल्या. तिचे विकृतीकरणही केले गेले. काहीनीं तर तिच्या मूळ उद्देशाबद्दल अनिष्ट समजुती हेतुतः पसरविल्या. आपापल्या जातीबद्दल वृथा दुरभिमान व खोटा अहंकार निर्माण झाला. एखाद्या जातीत केवळ अपघाताने झालेल्या जन्माच्या आधारावर श्रेष्ठता व कनिष्ठतेचा विचार होऊ लागला. तीच परमेश्वरी योजना असल्याचे दांभिक तत्त्वज्ञान मांडण्यात येऊ लागले. त्यामुळे जाती-जातींत वैमनस्य, असहिष्णुता व विषमता यांचा प्रादुर्भाव होऊ लागला. पण यापैकी कोणत्याही दुष्प्रवृत्तीचे मूळ जातीव्यवस्थेच्या मूलभूत विचारांत वा उद्देशांत नव्हते, कारण हिंदूधर्म अद्वैतवादावर अधिष्ठित झाला आहे. तो एकात्मिक ब्रह्मतत्त्व मानतो. तोच अपरिवर्तनीय, अभेद्य व चिरंतन परमेश्वरी अंश प्रत्येक व्यक्तींत असतो, अशी त्याची श्रद्धा आहे. अशा उच्च विचारांची शिकवण देणाऱ्या हिंदूधर्माच्या तत्त्वांशी कोणत्याही प्रकारची विषमता पूर्णपणे विसंगत आहे. त्याच प्रमाणे या परेमश्वरी अंशाला प्रत्यक्ष पार्थिव स्वरूप देण्याच्या प्रदीर्घ प्रयत्नालाच आम्ही राष्ट्रीयता समजतो. या राष्ट्रांतील निरनिराळ्या घटक व्यक्तींची सामाजिक व आर्थिक स्तरावरील कामे व जबाबदाऱ्या, असमान, भिन्न व विविध स्वरूपाच्या असल्या तरीही त्या अंतर्यामी मूलतः समान व एकच मानणे, हाच राष्ट्रीय एकतेचा अर्थ आहे. याच स्वरूपाचा एकात्म व आदर्श राष्ट्रवाद आम्हाला जगासमोर मांडावयाचा आहे. त्यात माणसामाणसात, जातीजातींत आणि वर्गावर्गात अशी मूलगामी व अंगभूत एकता अनुभवास येईल. टिळकांनी राष्ट्राची तुलना विराट पुरूषाशी करून म्हटले आहे की अशा भिन्न जाती म्हणजे अंतर्यामी एकच असलेल्या विराट राष्ट्रपुरूषांची अंगे होत ; म्हणजेच राष्ट्र होय. आपल्या धर्माची हीच शिकवण व राष्ट्रीयतेचा हाच खरा अर्थ आहे. आपल्या तत्त्वज्ञानाचा हा मूळ संदेश प्रत्यक्ष

देशवासियापर्यंत पोचविणे, हे प्रत्येक राष्ट्रवाद्याचे आद्य कर्तव्य ठरते. आम्ही एकतंत्री राजकारणाचा धि:कार करतो, कारण राजकारणात उपरिनिर्दिष्ट आंतरिक एकता असे शासन मानीत नाही. आज भ्रष्ट बनलेल्या जातीव्यवस्थेचाहि आम्ही विरोध करतो. कारण सामाजिक समतेचा ती आदर करीत नाही. ज्या समानतेच्या व एकात्मतेच्या तत्त्वावर राजकीयदृष्ट्या आमचे राष्ट्र आम्ही पुनर्गठित करू इच्छितो, त्याच तत्त्वावर आम्ही आमच्या समाजाचीही पुनर्रचना करू इच्छितो. तूर्तास, आमचे लक्ष आणि प्रयत्न आम्ही फक्त राजकीय क्षेत्रावरच केंद्रीत केले असले व आमच्या टीकाकारांचाहि तसाच ग्रह झाला असला, तरी अंततोगत्वा, या तत्त्वाचा प्रभाव सामजिक क्षेत्रातही तितक्याच प्रमाणात पडत नाही, तो पर्यंत आम्हीं आमच्या प्रयत्नांत पूर्णांशाने यशस्वी झालेलो नाही, हे आम्हीहि जाणतो. उद्यांच्या भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी राष्ट्रवाद्यांची जी अविरत धडपड व जे अथक प्रयत्न चालू आहेत, किंवा त्यासाठी ज्या योजना त्यांनी आखल्या आहेत, त्यात वांशिक मक्तेदारीला किंवा वारसाहक्काच्या एकाधिकारशाहीला काडीमात्र थारा असणार नाही.

जातिव्यवस्था कोण्या एका काळी लाभदायक ठरली हे खर, मानवी प्रगतीच्या एका टप्यापर्यंत ती आवश्यकही वाटली असेल. त्याचप्रमाणे जागतीक राजकारणाच्या विकासात एकतंत्री राज्यपद्धतीने मोलाची भर घातली हेही नाकारता येणार नाही. त्यावेळी समाजाचे रक्षण करण्यासाठी व समाजधारणेसाठी तीच एक राजकीय शासन व्यवस्था उपलब्ध होती. राष्ट्रवाद्यांचे भूतकाळाशी भांडण नाही ; परंतु त्यात ते स्थित्यंतर करू इच्छितात. एखाद्या व्यक्तीच्या वा गटाच्या सत्तेच्या ठिकाणी ते लोकसत्तेची म्हणजे पर्यायाने स्वराज्याची स्थापना करू पहातात ; किंवा वारसा हक्काने चालणाऱ्या वा लोकशाही विरोधी किंवा जातिनिष्ठ संघटनेच्या सत्तेखाली चालणाऱ्या शासनाऐवजी, लोकाभिमुख परिवर्तनशील लोकशाहीनिष्ठ राज्यपद्धती राष्ट्रात ते सुरू करू इच्छितात. सध्याचे एकतंत्री, मनमानी व अपरिवर्तनीय राजकारण, किंवा समाजातील संकुचित व आत्मकेंद्रीत जाति व्यवस्था या दोन्हीहि गोष्टी सामाजिक समता नाकारते, समता ही तर आमच्या धर्माची शिकवण आहे. म्हणून या दोन्हीमध्येही स्थित्यंतर घडवून आणणे अपरिहार्य आहे. अशातऱ्हेने जातिव्यवस्थेच्या चौकटीत अडकलेला समाज व लोकशाही विचारावर आधारलेला धर्म आणि त्याचे तत्त्वज्ञान यादोन्ही गोष्टी एकत्र नांदू शकतील किंवा नाही, हीच आपल्याला भेडसावणारी खरी ऐतिहासिक समस्या आहे. भारतीय राष्ट्रवाद्यांनी ती आपल्यापुढे स्पष्टपणे मांडली आहे. परंतु त्यावर अधिक विस्ताराने आत्ताच न लिहिता, आंम्ही आपल्या एवढेच निदर्शनास आणून देतो, की या सर्व राष्ट्रवादी शक्तींनी जातीजातीतील हे तर्कदुष्ट भेदाभेद आणि विषमता यांचा झपाट्याने नाश करणे आवश्यक आहे. या आमच्या प्रतिपादनावर खूष होऊन एखादा इंग्लिश माणूस म्हणेल, " वा: कसं लाख बोललात. आम्ही सुद्धा गेली अनेक वर्षे कंठरवाने

तुम्हाला हेच सांगत आहोत. लोकशाही शासन व्यवस्थेची मागणी करण्याआधी तुम्ही तुमच्यातील जाति नष्ट करा." यावर आम्ही इथे स्पष्टपणे सांगू इच्छितो की आमच्या इंग्लिश उपदेशकांच्या या प्रतिपादनात एक बारीकशी त्रुटी राहून गेली आहे. त्यांचे हे म्हणणे घोड्यापुढे गाडी ठेवण्याचा प्रकार झाला. म्हणूनच त्यांचा हा सल्ला आम्ही ठुकरावून लावला व तो अमलात न आणण्याचा आमचा मनोदयही आम्ही स्पष्टपणे जाहीर केला आहे.

हे साध्य करण्यासाठी काय करावे, हे ठरविण्याकरिता विचारशक्तीला फारसा ताण देण्याची आवश्यकता नाही. वरील सर्व दोष, अपप्रवृत्ती आणि दुष्ट रूढी नष्ट करण्यासाठी जातीव्यवस्थेची नुसती चौकट मांडून भागणार नाही; तर माणसाच्या मनोवृत्तीत व विचारपद्धतीत आवश्यक तो बदल घडवून आणला पाहिजे. त्यासाठी प्रत्येक भारतीयाला, मग तो पुरूष, स्त्री वा लहान मूल असो, त्याला सुशिक्षित केला पाहिजे. प्रथम त्याला आपल्या धर्माची उदात्त उद्दिष्टे, त्याचे तत्त्वज्ञान, त्याला समजाऊन सांगितले पाहिजे. त्यांतूनच वेदप्रणित समानतेच्या तत्त्वावर आणि प्रवृत्तीवर पुर्णांशाने आधारित समाजरचना आकार घेवू शकेल. पुनरावृत्तीचा दोषारोप पत्करूनही या व्यावहारिक कल्पनेवर आम्ही आमचे विचार इथे मांडतो. राष्ट्रीय स्तरावर शिक्षणाचा प्रसार, ही सामाजिक सुधारणेची प्राथमिक गरज असते. सरकारी आर्थिक शक्तीच्या बळावरच हे शिक्षण आपण समाजाला देऊ शकतो. म्हणून कोणत्याही अन्य कारणासाठी नसले, तरी शिक्षणप्रसाराच्या एकमेव कारणासाठी, राष्ट्रवाद्यांनी राजकीय स्वातंत्र्यासाठीचा आपला लढा अधिक तीव्र करणे अत्यावश्यक आहे. कारण स्वातंत्र्याखेरीज देशातील संपत्तीच्या विनियोगाबाबतचे अधिकार आपल्याला मिळणार नाहीत. जोपर्यंत शासन परकीय नोकरशाहीच्या हातात आहे, तोपर्यंत अशा सार्वत्रिक शिक्षणासाठी लागणारा पुरेसा पैसा उपलब्ध होऊ शकणार नाही. आज जो पैसा त्यासाठी मुक्रर केला जातो, तो इतका अपुरा असतो की त्यातून समाजाला शिक्षित करणे केवळ अशक्य आहे. आजच्या अत्यल्प शिक्षणांतून माणसातल्या, हीन, स्वार्थी व अल्पसंतुष्ट प्रवृत्तीलाच प्रोत्साहन मिळत आहे. स्वातंत्र्यामुळे माणसात निर्माण होणारे सद्‌गुण व राष्ट्राला संघटित करण्याची आवश्यकता, हे दोन्ही मुद्दे क्षणभर बाजुला ठेवून जरी या समस्येकडे आपण केवळ सामाजिक दृष्टिकोनांतून पाहिले, तरी देखील राजकीय स्वराज्य ही आपली सर्वप्रथम निकडीची गरज आहे, याची आपणास खात्री पटेल.

यासाठीच टिळकांसारखा राष्ट्रवादी अन्य सर्व समस्या तूर्त बाजूला ठेवून केवळ राजकीय स्वायत्तता या एकाच उद्दिष्टावर भर देतांना आढळतो, याचा अर्थ देशाच्या आर्थिक पुनर्रचनेच्या आवश्यकतेचा किंवा समाज सुधारणेचा किंवा शिक्षणाचा त्यांना विसर पडला आहे असा नव्हे. उलट सामाजिक समानतेचे आपले उद्दिष्ट पुर्णार्थाने फलद्रुप व्हायचे असेल तर

आपल्या देशाचे स्वातंत्र्य परकीय शक्तीकडून आपण लौकरात लौकर जिंकून घेतले पाहिजे, याची त्यांना खात्री पटली, हाच त्याचा अर्थ आहे. त्यामुळेच आपण आपल्या देशाची पुनर्रचना करू शकू, अशाही निष्कर्षाप्रत ते येऊन पोचले आहेत.

**वंदे मातरम् २०-९-१९०७**

• • •

## १६. ' वंदे मातरम् ' वरील खटला २५-९-१९०७

**' वंदे मातरम् ' पत्रावर ब्रिटीश शासनाने भरलेल्या खटल्याची श्रीअरविंद यांनी जी चिरफाड केली आहे, ती कितीतरी बोलकी आहे.**

अलीकडे ब्रिटीश नोकरशाहीने वर्तमान पत्रावर घातलेल्या अनेक खटल्यांपैकी, 'वंदे मातरम् ' या पत्रावरील खटला सर्वात अधिक महत्त्वाचा आहे. तुतारीच्या कर्णकर्कश गर्जनात त्याची सुरवात झाली. देशातील यच्चयावित अँग्लोइंडियन पत्रकार त्याच्याकडे औत्सुक्यमिश्रित कौतुकाने पहात होते. पण अशा जल्लोषात सुरू झालेल्या या राजद्रोहाच्या खटल्याची अखेर मात्र सरकारचा पुरा फज्जा उडण्यात झाली. आतापर्यंतच्या राजद्रोहाच्या खटल्यात सरकारने असा दारूण अनुभव क्वचितच घेतला असेल. सरकारचे हे लाजीरवाणे अपयश दंडाधिकाऱ्यांच्या औदासिन्याचा परिणाम नव्हता; किंवा खटला चालविण्यात त्याने काही कसूर केली असेही नव्हे ; किंवा त्याने आरोप ठेवण्यात काही हयगय केली होती असेही नाही. एका विशिष्ट व्यक्तीला म्हणजे अरविंद घोष यांना या खटल्यात दोषी ठरविण्यासाठी पोलिसांनी आपली शिकस्त केली होती. सरकारच्या कायदेविषयक स्थायी सल्लागाराने देखील (स्टँडिंग कौन्सेल) आरोपीविरूद्ध सादर केलेल्या तकलादू पुराव्यावर, किंवा त्यासंबंधींच्या एखाद्या क्षुल्लक कपट्यावर, ठासून युक्तिवाद करण्याचा जोरदार प्रयत्न केला. बरं ज्या अधिकाऱ्यापुढे ही केस चालली त्याचाही सरकारकडील कल कधीच लपून राहिलेला नव्हता. याच महाशयांनी " युगांतर " च्या छापखान्याच्या मालकाला दोन वर्षाची सजा फर्मावली होती. त्यांनीच बिपिनचंद्र पालांचा खटला एका लाळघोट्या बंगाली दंडाधिकाऱ्याकडे सोपविला होता ; व तसे करताना आरोपीस जबर शिक्षा ठोठावल्याचे स्पष्ट संकेत द्यायलाही ते विसरले नव्हते. याच माणसाने सुशील कुमारांना पंधरा फटक्यांची शिक्षा ठोठावली होती. त्यांनीच बॅरिस्टरांनी पेश केलेला पुरावा बेधडकपणे बाजूला सारला होता. या खटल्यात शिक्षा देण्यायोग्य असा अल्पसा देखील पुरावा आमच्या विरूद्ध उपलब्ध झाला असता, तरी आम्हाला सक्त मजुरीची शिक्षा ठोठवायला त्यांनी कमी केले नसते. त्यांच्या निकालपत्रांतील परिच्छेदामागून परिच्छेद हेच दाखवितात. अशा खटल्यात सर्वच हुकूमाचे पत्ते नेहमी नोकरशाहीच्याच हातात असतात. कारण त्यांच्या दिमतीला देशातील श्रेष्ठ कायदे पंडित असतात ; सुसज्ज गुन्हाअन्वेषण यंत्रणा व गुप्तहेर खाते त्यांच्याच नियंत्रणाखाली असते. त्याची व्याप्ती आणि विस्तार आज रशियाच्या खालोखाल समजला जातो. अशा खटल्यांतील पंच मंडळही त्यांनाच अनुकूल असते व त्यांना हवा तो निकाल द्यायला ते एका पायावर तयार असते. खटला चालविणारे

न्यायाधीशही त्यांचेच नोकर असतात. केंव्हाही धाडी घालणे किंवा झडती घेणे यासारखे अधिकारही पोलिसांना असतात. शिवाय पोस्ट ऑफिसचे रूपांतर गुन्हा अन्वेषण खात्यात ते केव्हांही करू शकतात. साक्षीदार मिळवण्याच्या त्यांच्या तऱ्हाही अजब असतात. आश्चर्य असे की इतकी सर्व साधने त्यांच्या अखत्यारीत असून सुद्धा, ते ज्या विशिष्ट व्यक्तीच्या मागावर होते ती व्यक्तीच ' वंदे मातरम् ' चा संपादक आहे, हे सिद्ध करणाऱ्या पुराव्याचा एक कपटा देखील, ते मिळवू शकले नाहीत. सरकारच्या या दारूण अपयशापासून कोणता धडा त्यांनी घेतला ? वृत्तपत्र स्वातंत्र्यावर यापुढे कडक निर्बंध घातले पाहिजेत, असे दंडाधिकारी आपल्या निकालपत्रात म्हणाले ' फ्रेंड ऑफ इंडिया ' (हिंदुस्थानचा मित्र) म्हणून मिरविणाऱ्या चौरींघीच्या ' स्टेट्समन ' या पत्राने देखील त्याचीच री ओढली आहे. परंतु प्रसिद्धीच्या झोतात नसलेल्या एखाद्या सामान्य बुद्धीच्या माणसाने मात्र निराळाच निष्कर्ष काढला असता. राजकीय खटल्यासंबंधीच्या कामकाजाच्या आपल्या पद्धतींतच सरकारने सुधारणा करणे आवश्यक आहे, असेच त्यात सुचविले असते.

एवढे मात्र खरे की " वंदे मातरम् " च्या प्रकरणाने अशा राजकीय खटल्यामागील ब्रिटीश नोकरशाहीच्या हीन मनोवृत्तीवर झगझगीत प्रकाश टाकला आहे. किंबहुना जनतेचा असा छळवाद मांडण्यासाठीच तिचा जन्म झाला असावा, असाच कोणाचाही ग्रह होईल. अलीकडेच गाजलेल्या ' कोमिला ' खटल्याने तर सरकारचे दुष्ट हेतू उघड केले आहेत. त्या खटल्यात एका निरपराध माणसाला फाशीची शिक्षा फर्माविण्यात आली होती. पण पुढे त्यातून तो मोठ्या मुष्कीलीने कसा सुटला ती हकीगत कोणालाही थक्क करून सोडणारी आहे. ' वंदे मातरम् ' ची केस त्या मानाने कमी थरारक असली, तरी देखील सरकारच्या त्याच राक्षसी क्रूरतेचे स्पष्ट दर्शन घडवण्यास पुरेशी आहे. खरोखर या खटल्यामागील सरकारचा उद्देश व कारण काय होते ? कुणी तरी केलेल्या कायदेभंगापासून कायद्याचे रक्षण करणे एवढाच त्यामागे सरकारचा निष्पाप व प्रामाणिक हेूत होता काय ? की सार्वजनिक शांतता भंग करू पहाणाऱ्या बेजबाबदार प्रवृत्तींना केवळ आवर घालण्यासाठी सरकाने हे पाऊल उचलले होते ? तस करतांना त्यांच्या मनात कोणताही आकस वा राजकीय सूडबुद्धी नव्हती, असे ते म्हणू शकतात काय ? कारण अशा गंभीर कारणासाठीच एखाद्याविरूद्ध राजद्रोहाचा खटला भरला जाऊ शकतो. पण इथे तर वेगळाच प्रकार आढळतो. एका विशिष्ट पत्राविरूद्ध व खास करून एका विशिष्ट व्यक्तीविरूद्ध काही कारण नसता तशी कारवाई सुरू केली आहे. स्पष्टच बोलायचे तर त्यांनी ' वंदे मातरम् ' विरुद्ध उगारलेले हे हत्यार म्हणजे त्याची मुस्कटदाबी करण्याचा व त्याला खलास करण्याचा एक आश्लाघ्य व दुष्ट प्रयत्नच आहे. कारण त्या पत्राने ज्या राजकीय विचारांचा प्रचार आरंभला होता तो जनतेत प्रभावी होऊं लागला होता. त्यामुळे ' वंदे मातरम् ' हे एक शक्तीकेंद्र बनू लागले होते. त्या भोवती राष्ट्रवादी शक्ती एकवटू लागल्या होत्या. त्यामुळे नोकरशाहीच्या अबाधित व

अनियंत्रित अधिसत्तेला धोका उत्पन्न होऊ लागला. म्हणूनच या सर्व घडामोडीमागील प्रमुख व्यक्तीलाच अलग पाडावे व तिचा आवाज बंद करावा, असा विचार सरकारने केला असावा. ' स्टेट्समन ' या फ्रेंड ऑफ इंडिया ' ने तर त्या व्यक्तीचे वर्णन, ' वंदे मातरम् ' या पत्रांच्या धोरणामागील प्रेरणा स्त्रोत, अशा शब्दांत केले आहे. आम्हाला हे सिद्ध करण्यासाठी आव्हान दिलेच तर आम्ही या खटल्याच्या अथपासून इतीपर्यंतच्या सरकारी कारवाईकडे फक्त अंगुली निर्देश करू म्हणजे झाले, गेल्या एक वर्षाहून अधिक काळ ' वंदे मातरम् ' ने निर्भयपणे व कोणताहि आडपडदा न ठेवता, सरकारच्या धोरणावर व कारभारावर प्रखर हल्ला चढवला. त्यात आमूलाग्र व क्रांतीकारक परिवर्तन होणे आवश्यक आहे असा आग्रही प्रचार त्याने केला. ऐतिहासिक कालांतील अनुभव, राजकारणातील मूलतत्त्वे व राष्ट्राच्या सुरक्षिततेचा विचार या तीन मुद्यांवरच प्रामुख्याने आपला हा प्रचार त्याने केंद्रीभूत केला होता. तो करतांना त्याने कधीच गुळमुळीतपणाचा अवलंब केला नव्हता ; किंवा आपल्या क्रांतिकारक राष्ट्रीय आकांक्षा नेमस्तपणाच्या मुखवट्यामागे लपविण्याचाहि कधी प्रयत्न केला नव्हता ; किंवा त्यासाठी संदिग्ध व गुळमुळीत भाषेचा आश्रय घ्यावा असे त्याला कधीच वाटले नाही. सध्याची नोकरशाही आपले स्वरूप बदलेल यावरही त्याने कधी विश्वास ठेवला नाही ; व आपले हे मत त्याने राजरोसपणे मांडले होते. अखेर या देशाचे भवितव्य हिंदुस्थानची जनताच ठरविणार आहे ; ब्रिटनची जनता नव्हे. कधी काळी ब्रिटीश सत्ता दान म्हणून राष्ट्रीय स्वातंत्र्याचे उदक आपल्या हातावर सोडील अशा भ्रमात तिने राहू नये. उलट तिच्या हातातून ते आपल्याला हिसकावून घ्यावे लागेल, याची खात्री बाळगावी.

आमचे हेही विचार आम्ही परखडपणे आणि निर्भिडपणे ' वंदे मातरम् ' च्या स्तंभातून वारंवार मांडले होते. त्यातून कोणत्याही लेखाची निवड ते करू शकले असते व त्यावर बोट ठेवू शकले असते. पण त्यापैकी एकाही लेखाविरूद्ध त्यांनी आक्षेप घेतला नाही ; किंवा राजद्रोहाची चिथावणी देणारा एकही लेख त्यांचा कायद्याचा सल्लागार उधृत करू शकला नाही. कारण आपला अनियंत्रित व बेजबाबदार राज्यकारभार या देशात अनिर्बंधपणे चालू ठेऊ इच्छिणाऱ्या काही मोजक्या अधिकाऱ्यांना असा प्रक्षोभक प्रचार, कितीही धोकादायक वाटला तरी त्याचा आधार घेणे हे त्यांना अखेर महागात पडले असते. त्यांनी तसा अविचार केलाच असता तर त्यामुळे त्यांच्या सरकारच्या आधुनिकतेचा व सुसंस्कृतपणाचा मुखवटा आपोआप गळून पडला असता ; आणि जागतिक राजकारणांतील त्यांच्याबद्दलचा उरलासुरला आदरही लिलावात निघाला असता. त्यामुळे सरकार एका विचित्र कोंडीत सापडले होते, एका बाजूला त्यांना ' वंदे मातरम् ' ला देशद्रोही ठरविता येत नव्हते ; तर दुसऱ्या बाजूने ते त्यांना अडचणीचेही ठरत होते. त्यामुळे त्या पत्राविरूद्ध केवळ भारतातच ओरडा वादू लागला असे नव्हे तर त्याचे पडसाद इंग्लंडच्या धूसर हवेतही उमटू लागले होते. तेथील

' थंडर ' या पत्राने तर त्याच्यावर खटला भरण्याचा व शक्य झाल्यास त्यावर बंदी घालण्याचा आग्रह धरायलाही सुरूवात केली. म्हणून त्यावर सक्त नजर ठेवण्यात येत आहे. एका फालतू मुद्यावर का होईना पण त्याला अडचणीत आणून कसे संपुष्टात आणता येईल, यावर कसून शोध घेणे जारी आहे. इतके झाल्यावर सरकारने कोणत्या मुद्यावर त्याच्याविरूद्ध खटला भरला ? ते मुद्दे असे :-

(१) एका भाषिक वर्तमान पत्रातील काही लेखांचा अधिकृत अनुवाद प्रसिद्ध करणे. विशेष म्हणजे ही भाषांतरे कोर्टातील एका खटल्याचा भाग म्हणून उधृत केली गेली होती ;

(२) व (३) एक अगदी बिन महत्त्वाच्या क्षुल्लक पत्र व्यवहाराचा निर्देश करणे–ज्यात पत्राच्या ध्येय धोरणावर दुरान्वयाने देखील मत प्रदर्शन करण्यात आलेले नव्हते.

या शिवाय आणखी कोणताहि मुद्दा उपस्थित केला गेला नाही. युगांतर पत्रावर जो खटला भरण्यात आला होता, तो त्याच्या ध्येय धोरणावरील लेखाकरीता होता. काही महत्त्वाच्या विषयाबाबत मतप्रदर्शन करण्यावरून सध्या या नियतकालिकाविरूद्ध दोषारोप करण्यात आले होते. पण ' वंदे मातरम् ' वर बंदीचे शस्त्र उगारले ते अंशतः काही तांत्रिक कारणासाठी व अंशतः काही अगदीच बिनमहत्त्वाच्या क्षुल्लक मुद्यासाठी. त्याबाबतीत सरकार किती अधीर झाले होते पहा. ज्या लेखाचा आधार ते घेऊ पहात होते तो लेख मुळातून वाचण्याची जरा देखील तसदी घेण्याचा विचार संबंधित अधिकाऱ्यांना सुचला नाही. पत्राच्या उजवीकडील कोपऱ्यात प्रसिद्ध करावयाच्या जाहीरातीचा विषयहि खटला भरण्यासाठी त्यांना पुरेसा वाटला. वास्तविक संबंधित अधिकाऱ्याने दिलगिरीही प्रदर्शित केली होती ; व खटला चालू असतांना चुकीची दुरूस्ती होऊनही गेली असती. पण सरकारला विलक्षण घाई झाली होती. म्हणून संपादकाच्या नावाचा उल्लेख देखील न करता पकड हुकूम काढण्याची त्यांना ऊतावळी झाली. पोलीसही श्रीअरविंद घोषांच्या नावे तसा हुकूम काढण्यास कोर्टाला विनंती करतात. प्रत्यक्षात सुनावणीच्या वेळी असे आढळून आले की पोलिसांची कारवाई ही केवळ अफवेवरच आधारलेली होती. अशातऱ्हेने त्यांच्याकडे हाती पुराव्याचा एक कपटा देखील नसतांना, वंदे मातरम्च्या एका विशिष्ट लेखकाला पकडण्यासाठी पोलीस त्यांच्या घरी येऊन थडकले. अर्थात् कुणाच्यातरी स्पष्ट इषाऱ्याशिवाय त्यांनी असे धाडस केलेच नसते. श्रीअरविंद घोष वंदे मातरम्च्या कर्मचारी वर्गात एक कर्तुमकर्तुम शक्ती आहे, असा सार्वत्रिक समज होता. त्यात प्रसिद्ध झालेले सर्वच्या सर्व उत्कृष्ट लेख हे त्यांचेच समजले जात. त्या पत्राचा तोंडावळा व विचारधारा ठरविण्यात प्रामुख्याने तेच जबाबदार असल्याचाही प्रवाद होता. त्यामुळे श्रीघोषांना तेथून दूर केले तर ते पत्र तत्काळ बंद पडेल असेच सर्वांना वाटत असे. परंतु श्रीअरविंदंच्या विरूद्ध पकड हुकूम बरोबर घेऊन वंदे मातरम्च्या कार्यालयांत आले असतांना देखील त्यांना पकडण्याचे धाडस पोलीस अधिकारी करू शकले नाहीत, ते कां ? याचे कारण असे की झडतीत त्यांच्याविरूद्ध

ढीगभर पुरावे मिळतील, असा त्यांना विश्वास वाटत होता. पण प्रत्यक्ष धाडीत श्रीअरविंदांविरूद्ध पुराव्याचा एक तुकडा देखील मिळू शकला नाही. म्हणूनच त्यांनी अरविंदना पकडण्याचे टाळले. त्यानंतर खटल्याच्या आघाडीवर काही काळ सामसूम झालं. पुढे त्यात थोडीशी धुगधुगी आली, ती मुखर्जीसारखा एक साक्षीदार जेव्हा पोलीसांच्या हाती लागला तेव्हा. लगोलग एक अगदी तकलादू पुराव्यावर केस उभी राहिली.

पोलिसांचा हेतू खरोखरच पत्राच्या संपादकाविरूद्ध कारवाई करण्याचा असता, मग तो कोणी का असेना, त्यांना श्रीअरविंदांविरूद्धची कारवाई ताबडतोब थांबविणे भाग पडले असते. परंतु त्याना तर फक्त अरविंदच पाहिजे होते ; दुसरे कोणीही नको होते. ही गोष्ट त्यांनी कधीच लपवून ठेवली नव्हती. त्यांच्याविरूद्ध सापडलेल्या एखाद्या फुसक्या पुराव्याच्या आधारावरही त्यांनी अरविंदना जेर बंद केले असते, हेहि तितकेच खरे. खटल्याच्या कामकाजाची अखेर जवळ आली. सरकारी वकिलाचा युक्तिवाद संपला. पण आरोपीविरूद्ध ठोस पुरावा न मिळाल्यामुळे गुन्हा केल्याचे एका अंधुकसे अनुमान काढण्यापलीकडे, त्यांच्या पदरात काहीच पडू शकले नाही. परंतु सरकारचा कायदेविषयक विशेष सल्लागार पिच्छा सोडायला तयार होईना. आपल्या उच्च पदाला अनुरूप असलेले पायंडे त्यांनी गुंडाळून ठेवले ; व त्यांनी आपल्या तुफानी भाषणाची भन्नाट गोलंदाजी सुरू केली. त्यात त्यांनी फालतु मुद्यांवर भर देत गुळमुळीत व बिनबुडाच्या पुरांव्याच्या आधारावर आरोपीविरूद्ध आरोपपत्र रचण्याचा अयशस्वी प्रयत्न केला. पण पुढे तर एक नाट्यपूर्ण घटना घडली. उलट तपासणीत सरकारतर्फेचा साक्षीदार श्री. अनुकूल मुखर्जी पार ढेपाळला व सरकारी पक्षाला गोत्यात आणणारा कबुली जबाब देऊन मोकळा झाला. त्यामुळे या खटल्याचा इतका बोजवारा वाजला असतांना देखील त्यांनी दंडाधिकाऱ्याच्या निवाड्यासाठी आग्रह धरला. तो तरी बिचारा काय करणार ? सरकारतर्फे निर्णय द्यावा असे त्याला फार फार वाटत होते. परंतु नोकरशाहीतील अधिकाऱ्यापेक्षा आणि त्यांच्या सल्लागारापेक्षा कायद्याची व न्यायाची बूज राखण्याचे भान त्याच्या ठिकाणी अधिक प्रमाणात असल्यामुळे पुरेशा पुराव्या अभावी आरोपीला दोन वर्षाच्या सक्त मजुरीची शिक्षा ठोठावणे केवळ अशक्य आहे, असे त्यांचे मत झाले. अशातऱ्हेने त्याचे मुख्य लक्ष्य त्यांच्या तावडीतून निसटले. ज्या व्यवस्थापकाला पुरेसा पुरावा नसता केवळ अंदाजाच्या व संशयाच्या आधारावर पकडला होता, त्यालाही निर्दोष म्हणून सोडून द्यावे लागले. दंडाधिकाऱ्याची वक्रदृष्टी अखेर छापखानेवाल्याकडे वळली. बिचाऱ्याला इंग्रजी भाषेचा गंधही नव्हता. हा एवढा गदारोळ कशाकरीता माजविण्यात येत आहे, याची गंधवार्ताहि त्याला नव्हती. परंतु तालेवार व सर्वशक्तिमान ब्रिटीश नोकरशाहीची धुळीस मिळालेनी अब्रू कशीबशी वाचविण्यासाठी त्याला काही महिन्यांच्या कारावासाची सजा फर्मविण्यात आली.

**वंदे मातरम् २५-९-१९०७**

● ● ●

## १७. राजकारण व आध्यात्मिकता

९-११-१९०७

**राजकारण व आध्यात्मिकता यांचे संबंध स्पष्ट करताना श्रीअरविंद म्हणतात : अन्य राष्ट्रांच्या बरोबरीने आपले राजकीय स्थान जोपर्यंत आपण प्रस्थापित करू शकत नाही तोपर्यंत आपण आपले आध्यात्मिक श्रेष्ठत्व परत मिळविण्याची भाषा करणे म्हणजे केवळ दिवास्वप्नेच पहाण्यासारखे आहे. म्हणून आपले राजकीय पुनरूत्थान करणे हाच आपल्या राष्ट्रीय चळवळीचा प्राथमिक उद्देश आहे.**

राजकीयदृष्ट्या मृतप्राय झालेला समाज आपल्यांतील आध्यात्मिकता शाबूत ठेवू शकतो का, असा प्रश्न पुन्हा एकदा सार्वजनिकरीत्या निर्माण करण्यात आला आहे. हिंदू धर्माच्या आणि हिंदू तत्त्वज्ञानाच्या काही अहंगंड प्रवक्त्यांना राजकारणाचा आत्यंतीक तिरस्कार वाटतो असे दिसते. राजकारण हे भौतिक वादाचे द्योतक आहे, असा त्यावर निरर्थक दोषारोप करून प्रत्यक्षांत आपल्या आध्यात्मिकतेचे पराकोटीचें अज्ञानच ते त्यामागे झाकू पहातात. भौतिकवादाबद्दलची त्यांची ही तुच्छता म्हणजे आपणच कसे सच्चे आध्यात्मादी आहोत हे दाखवून देण्यासाठी, त्यांनी योजलेली एक बेमालूम युक्ती असते. त्यांना असे वाटते की हिंदु तत्त्वज्ञानच माणसाला ऐहिकतेबद्दल पराकोटीचे उदासीन बनायला शिकविते. परंतु त्यांचे हे मत त्या तत्त्वज्ञानाबद्दलच्या त्यांच्या तुटपुंज्या ज्ञानाचेच निदर्शक आहे. ते तत्त्वज्ञान भौतिकतेकडे पाठ फिरवायला सांगत नाही ; तर ऐहिकतेपेक्षा आणखी उन्नत विश्व आहे याची जाणीव ते करून देते. शिवाय, आपल्यातील इहवादी प्रवृत्तींना निरामय चैतन्याकडे वळविण्यातच खरे सुख साठविलेले असते, असाही एक महान विचार, त्या तत्त्वज्ञानांत अंतर्भूत आहे. ज्याच्या अंतःकरणात तो प्रकाशमान व गतिमान झाला आहे, तो वरीलप्रमाणे एखाद्या अज्ञ माणसासारखी भाषा वापरणारच नाही. परंतु तसं धाष्टर्य मद्रासमध्ये अलिकडेच झालेल्या एका सभेत एका धर्मोपदेशकाने दाखविले आहे. वास्तविक त्यांनी त्यावेळी मांडलेल्या विचारांकडे आम्ही दुर्लक्षच करणे अधिक संयुक्तिक ठरले असते. परंतु त्यात आम्हाला अशा काही अंधश्रद्धा आणि गैरसमजुती आढळल्या की त्यामुळे येथील अँग्लोइंडियन पत्रकारांच्या हातात आयते कोलीत मिळाल्यासारखे झाले असते. एखादा माणूस उठतो व इंग्लंड, अमेरिकेच्या दौऱ्यावर जातो. तिथे स्वतःला राजकीयदृष्ट्या सर्वश्रेष्ठ समजणाऱ्या ब्रिटिश श्रोतृगणासमोर हिंदुतत्त्व ज्ञानांतील काही आकर्षक शब्दप्रयोगांची पेरणी करून दिलेल्या एखाद्या व्याख्यानामुळे बहुचर्चित होतो. त्यामुळे हिंदू धर्म व हिंदू तत्त्वज्ञान यावर अधिकृतपणे बोलण्याचा आपल्याला अधिकारच प्राप्त झाला आहे, असा त्याचा व इतरांचा गैरसमज होतो. राजकीय वर्चस्वाला काहीच महत्त्व नाही असे जर त्यांना वाटते तर हे

महापुरूष स्वतःचा देश अशा प्रचारातून का वगळतात ? ज्यांना आपण जेत्यांचे जेते असल्याचा व सर्वदूर राजकीय वर्चस्व प्रस्थापित केल्याचा गर्व वाटतो, त्यांच्यापुढे त्यांनी ही व्याख्यान बाजी करावी.

अन्य राष्ट्रांच्या बरोबरीने आपले राजकीय स्थान जोपर्यंत आपण प्रस्थापित करू शकत नाही, तोपर्यंत आपण आपले आध्यात्मिक श्रेष्ठत्व परत मिळवण्याची भाषा करणे, म्हणजे केवळ दिवास्वप्नेच पहाण्यासारखे आहे. म्हणून त्याआधी आपले राजकीय पुनरूत्थान करणे हाच आपल्या राष्ट्रीय चळवळीचा प्राथमिक उद्देश आहे. प्राचीन आर्यांचे आपण वंशज आहोत हे आपण विसरलो काय ? मग आजच आपल्या समाजाच्या सांस्कृतिक अधोगतीची स्पष्ट चिन्हे का दिसू लागली आहेत ? आपल्यावर वर्चस्व गाजविणाऱ्या भौतिकवादी संस्कृतीच्या झगमगाटाने आपली विचारशक्तीच पार गोठवून टाकली आहे, हे त्याचे खरे कारण आहे. शिवाय गुलामगिरीत खितपत पडलेली जनता आपल्यांतील नैतिक व आध्यात्मिक शक्तींचा उपयोग करण्यास केवळ असमर्थ ठरते. त्यांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्नच एवढा बिकट होऊन बसतो की, त्यांची सर्व शक्ती तो सोडवण्यातच खर्ची पडते. त्यामुळे त्यांच्या जीवनाला अन्य कुठली दिशाच उरत नाही. पारतंत्र्यामुळे सर्व समाजच तामसी वृत्तीचा बनतो. एक प्रकारचा बौद्धिक, शारीरिक व नैतिक पक्षाघात झाल्यासारखी त्याची अवस्था होते. शेणामातीत वळवळ करणाऱ्या कीटकांचे गलिच्छ व ओंगळ जीवन जगण्याचे त्यांच्या नशिबी येते. अशा समाजाचे जीवन सत्त्वगुणांच्या पातळीपर्यंत उंचवावयाचे झाल्यास, त्याला रजोगुणातून जावे लागेल. आजकाल भिरूतेलाच आध्यात्मिकता समजण्याची फॅशन रूढ होत आहे. हिंदुधर्माबद्दल वरीलप्रमाणे आपले ज्ञान पाजळणाऱ्या संन्याशापैकी किती जणांना श्री. चैतन्य स्वामीची गोष्ट माहीत आहे ? त्यांच्या संकीर्तन मंडळींची एकभली मोठी मिरवणूक रस्त्यावरून निघणार होती. त्या भागातील मुस्लीम दंडाधिकारी काझीने त्या मिरवणुकीवर बंदी हुकूम काढला. तो पाहून स्वामिजींनी आपल्या अनुयायांना त्याच दिवशी सायंकाळी त्याहूनही एका प्रचंड मिरवणुकीची तयारी करण्याची आज्ञा दिली व त्यांनी लगेच जाहीर केले की त्या मिरवणुकीचे नेत्तृत्व आपण स्वतः करणार आहोत. त्यावेळी मिरवणुकीस कोणी विरोध केला तर त्याच भाषेत त्याला जबाब दिला जाईल, असा इषाराही त्यांनी दिला. सायंकाळी मुस्लीम काझीच्या घराच्या दिशेनेच मिरवणुकीने कूच करण्यास आरंभ केला. कारण तोच त्याच्या हुकुमाची अंमलबजावणी करणार होता. परिणाम काय झाला ? गौरांग महाराज श्री. चैतंन्य स्वामींच्या धाडसाचा व त्यांच्या आध्यात्मिक शक्तीचा त्या मुस्लीम दंडाधिकाऱ्याने एवढा धसका घेतला की आपला बंदी हुकूम त्याने तत्काळ मागे घेतला. इतकेच नव्हे तर स्वामीजींच्या या संकीर्तन मिरवणुकीत तो स्वतःच येऊन दाखल झाला.

आपल्याकडे विशेषतः काही सुशिक्षित व शहाण्यासुरत्या लोकांत एक विचित्र फॅशनच निघाली आहे. कोणत्याही प्रकारच्या संघर्षाला भोंगळ व तात्त्विक दृष्टिकोनातून ते निषेधार्ह समजतात. धाडसाने केलेल्या अन्यायाच्या प्रतिकाराला ते गावंढळ, अनैतिक व धर्मबाह्य

समजतात. या नैसर्गिक सामाजिक प्रकृतीची अवहेलना करणे म्हणजे त्यांना आधुनिकतेचे, उदात्ततेचे व पुरोगामित्वाचे प्रतीक वाटते. पण त्याहीपेक्षा त्याला एक अत्यंत हास्यास्पद व लाजीरवाणा पैलू आहे. वास्तविक जेव्हा एखादा प्रश्न ऐहिक हितसंबंधाशी निगडीत असतो, तेव्हा त्याचे निराकरण प्रत्यक्ष संघर्ष छेडल्याशिवाय होऊच शकत नाही. पण हे शहाणे अशा लढयाला राजकीय लढा म्हणायलाच तयार होत नाहीत. या जगात आध्यात्मिक शक्तीपासून पार्थिव शक्ती अलग काढता येत नाहीत. किंबहुना आध्यात्मिक सामर्थ्य हाच तिचा स्रोत असतो. आजच्या या कसोटीच्या काळात जेव्हा सामर्थ्यशाली पाशवी नोकरशाहीने आपली राष्ट्रीय चळवळ सर्वशक्तीनीशी चिरडून टाकण्याचा चंग बांधला आहे, तेव्हा अशा दांभिक तत्त्वज्ञानाच्या बुरख्या आड लपून, ते जेव्हा मैदानातून पळ काढू इच्छितात तेव्हा त्यांचा तो केवळ षंढपणाच नसतो ; तर त्यामागे खऱ्या आध्यात्मिकतेचाही संपूर्ण अभाव असतो. प्राचीन भारतीय युद्धाच्या आरंभी कुरूक्षेत्रावर अर्जुनाची काय अवस्था झाली होती ? प्रथम त्याच्या ठिकाणचा आत्मविश्वास पार ढासळला. आध्यात्मिकतेचा लोप झाला. त्यामुळेच तो गलितगात्र व निष्प्रभ झाला. भगवद्‌गीतेचा प्रमुख आध्यात्मिक संदेश हाच आहे ; जेव्हा तुम्ही शारीरिक भयापोटी विहित कर्तव्याचा त्याग करता, तेव्हा तुमच्यातील आध्यात्मिक शक्तीचा ऱ्हास होतो. '' वृत्रसंहारा '' च्या उद्‌बोधक कथेतही हाच महत्त्वाचा संदेश आहे. वृत्रासुराने तिची (शची) मुक्तता केल्याचे वर्तमान जयंत आपल्या आईला म्हणजेच शचीला सांगतो तेव्हा तिने जे तेजस्वी उद्‌गार काढले, ते अत्यंत महत्त्वाचे आहेत. राक्षसाने केवळ भिक्षा म्हणून केलेली तिची सुटका ती अव्हेरते व एक अबला स्त्री असूनदेखील आपल्या पुत्राला ती म्हणते, '' तुझ्या बाहुबलावर माझे रक्षण करणें व माझा सन्मान मला परत मिळवून देणे, हे पुत्र म्हणून तुझे कर्तव्यच आहे. तुझ्या ठिकाणी जर काही पुरुषार्थ असेल, तर असामान्य पराक्रम गाजवून वृत्रासुराला ठार मारून तू माझी सुटका घडवून आण. '' या कथेतील जयंताप्रमाणे पराक्रम गाजविण्याची वेळ आज आपणावर येऊन ठेपली आहे. अशावेळी एखाद्या कफनीधारी भोंदूची पुरुषार्थाची व पराक्रमशीलतेची थट्टा उडविणारी व्याख्यानबाजी काही हिंदू जेव्हा खुशाल ऐकत बसतात, तेव्हा ते आपण होऊन चिरकालीन मानहानीच्या लाजिरवाण्या जिण्याला निमंत्रण देतात. समाजाच्या अंगभूत विस्मयकारक शक्तीवरील विश्वास हाच आपल्या राष्ट्रीय चळवळीचा पाया आहे. हे ओळखून ती शक्ती अधिकाधिक दृढ व प्रोत्साहित करणे व प्रत्येक संधीचा फायदा उठवून धाडसी कृती करीत राहणे अपरिहार्य ठरते. त्यांतूनच राष्ट्रीय चळवळीला गती व वार्धिष्णू सामर्थ्य प्राप्त होईल व अखेर विजयश्री आपणास माळ घालील. आशिया खंडाची व विशेषेकरून भारताची तीच आज निकडीची गरज आहे.

**वंदे मातरम्, ९-११-१९०७**

● ● ●

## १८. राष्ट्रीय संघर्षाची वाटचाल

१६-११-१९०७

**भारतीय राष्ट्रवादाचा निर्माता कर्झन आहे, या नेमस्तांच्या विचारसरणीचे खंडन करतांना श्रीअरविंद म्हणतात, कॉंग्रेसच्या स्थापनेपूर्वी ज्याना अत्याचारी ब्रिटिश सरकारचा कृपाप्रसाद इजिप्तमधील प्लेग इतकाच घृणास्पद वाटत होता, त्याच्या हृदयात राष्ट्रवादाचा जन्म झाला. राष्ट्रवाद हा ईश्वरप्रणित चिरंतन शक्तीचा हुंकार आहे आणि निहित कर्म पूर्ण केल्यानंतरच ती शक्ती परमेश्वराशी तादात्म्य पावेल.**

एखाद्या अलौकिक चळवळीचा किंवा दैदीप्यमान विचाराचा आविष्कार आणि विकास चार अवस्थांतून होत असतो. पहिल्या अवस्थेत ती चळवळ बहुतांशी गुप्तपणे वाढते ; किंवा तो विचार अज्ञातच रहातो. एका युग प्रवर्तक व क्रांतीकारक विचाराने केव्हाच जन्म घेतला आहे, हेही क्वचितच कोणाला माहीत असते. अनेक शतके उराशी बाळगलेल्या आपल्या श्रद्धाना लोक घट्ट चिकटून रहातात. जुनी वहिवाट तशीच चालू असते. गोकुळात कृष्णाच्या रूपाने आपला साक्षात वैरी सुखेनैव वाढतो आहे, त्याने तारुण्यात पदार्पण केले आहे, याची दुष्ट कंसाला गंधवार्ताही नसते. त्याच्या अनन्वित अत्याचारांचे बळी झालेल्या दीनदुबळ्या जनतेलाही कृष्ण जन्माची कथा अज्ञातच असते. ती अभद्र आकाशवाणी ऐकल्यापासून व अनेक भयसूचक दुश्चिन्हे पाहिल्यापासून कंस मनातून हादरला होता हे खरे. परंतु तो स्वतःला प्रचंड शक्तिशाली म्हणूनच अजिंक्य समजत होता. त्याच्या मदतीला धावून येणारा त्याचा मित्रगणही अफाट होता. या सर्व गोष्टींमुळे मनांतून तो समाधानी असे. आपणाला कुणापासून ही भय नाही व आपण अमर आहोत, अशा गंडाने तो पछाडला गेला होता. अशावेळी गोकुळांतून श्रीकृष्णाचे मथुरेत झालेले आगमन, त्याचे नाव एकदम सर्वांच्या तोंडी होणे, त्यामुळे शापित, दृष्ट पण शक्तिमान कंसाला झालेली आगामी संकटाची भयसूचक जाणीव, त्याला बसलेला धक्का ; त्याचा झालेला अनावर संताप ; त्याच्या उलट त्याच्या अत्याचारांच्या वरवंट्याखाली आतापर्यंत भरडून निघालेल्या जनतेला तिच्या मुक्तिदात्याच्या दर्शनाने झालेला अत्यानंद, त्याचबरोबर त्या नराधमाने त्याच्यावरील शाप उलटविण्यासाठी केलेली अखेरची धडपड, त्याने आरंभलेला हिंसाचार, कृष्णाचा नाश करण्यासाठी त्याने आखलेले डावपेच, त्याला ठार मारण्यासाठी त्याच्यावर केलेला प्राणघातक हल्ला, कदाचित् परमेश्वर आपले पूर्वनियोजित कार्य अर्धवट टाकून निघून जाईल, अशी त्या नराधमाला वाटलेली वेडी आशा, या सर्व घटना या उदयोन्मुख विचाराची वा संघर्षाची दुसरी अवस्था दर्शवितात. त्यात अनन्वित अत्त्याचार होतात. परंतु आश्चर्यकारक रीतीने चळवळ टिकूनच रहाते.

हळुहळू पण निश्चितपणे प्रभावशाली आकार घेणाऱ्या अशा कार्याकडे लोक प्रथम काहीशा भीतीच्या भावनेनेच पहातात. काही त्याचे उत्साहाने स्वागत करतात ; तर काही त्याची पुजाही बांधतांना आढळतात. उलट प्रस्थापित हितसंबंधाकडून त्याच्यावर कडाडून हल्ले चढविले जातात. त्याच्याविरूद्ध घणाघाती प्रचार होऊ लागतो. त्याची निर्भत्सना, हेटाळणी व धिःकार होऊ लागतो. त्याचे विरोधक त्यावर आग पाखडतात. सत्ताधीश त्याच्या समर्थकावर अत्याचार करू लागतात व प्रस्थापितांचे मित्रही त्यात सामील होतात. पण या विरोधांतून, या हौतात्म्यातून अनुयायांच्या रक्तांतून, क्वचित पराभवातूनही या प्रयत्नाची विजयी घोडदौड चालूच रहाते. तो विचार अधिक तेजस्वी, अधिक परिणामकारी व अधिक प्रलयकारी रूप धारण करतो. बघता बघता सर्व पृथ्वीलाच तो व्यापून टाकतो. अवघ्या आकाशालाच तो जणू गवसणी घालतो. असंख्य लोक त्याचा जयजयकार करू लागतात. त्या विचाराचे एका प्रचंड, दुर्दम्य व स्फोटक शक्तीत रूपांतर होते. तिच्या दडपणाखाली प्रस्थापितांच्या सत्तेच्या ठिकऱ्या उडू लागतात. त्यांचे धाबेच दणाणून जाते. ते समझोत्याला व विचारविनिमयाला तयार होतात. ' आम्हालाही सुखाने जगू द्या ', अशा आर्त विनवण्या ते करू लगतात. इथेच क्रांतिकारक चळवळीच्या तिसऱ्या पर्वाच्या अखेरीला आरंभ होतो.

खऱ्या अर्थाने ते विजयाचे पर्व असते. दोन शत्रू समोरासमोर उभे टाकतात. त्यापैकी एक असतो अत्याचारी नरराक्षस ; तर दुसरा असतो, त्याच्याच रक्तामासांचा त्यानेच निर्माण केलेला त्याचा शत्रू. एकमेकांच्या गळ्याचा घोट घ्यायला ते सिद्ध होतात. त्यापैकी पहिला जेव्हा दुसऱ्यावर प्राणांतिक वार करण्यासाठी आपली तलवार उगारतो, त्याचवेळी त्याच्या लक्षात येते की शत्रूच्या समशेरीने त्याच्या हृदयाचा केव्हांच ठाव घेतला आहे. दुसऱ्याच क्षणी त्या नराधमाचे कलेवर धरणीवर कोसळते. इथे तिसरे पर्व संपते आणि चवथ्या पर्वाला आरंभ होतो. ज्यासाठी एवढा अट्टाहास केला होता, त्याच्या पूर्ततेचा समय येऊन ठेपतो. एक प्रतिभाशाली, क्रांतदर्शी विचार आपले कवच फोडून प्रकट होतो. त्याचे साम्राज्य सर्वदूर पसरते. द्वारकेत श्रीकृष्णाच्या प्रभावाखाली नव्या युगाचे राज्य अवतरते. आता तो विचार जणू काही सर्व जगाचा स्वामी झालेला असतो. एखादा कुंभार ज्याप्रमाणे आपल्या कुशल बोटांनी मातीचे रूपांतर सुरेख भांड्यात करतो, त्याप्रमाणे तो त्याला हवी तशी नवी निर्मिती करतो. जगाला तो एक नवीन तत्त्वज्ञान देतो. कालांतराने त्याच्याही अवतार-समाप्तीचा समय येऊन ठेपतो. एका यःकश्चित पारध्याचा बाण काळाचे रूप धारण करून श्रीकृष्णाच्या पायाला जखम करतो ; आणि अखेर त्यातच त्याचा अंत होतो. ज्या चैतन्य शक्तींतून त्याचा जन्म झालेला असतो त्याच उर्जेत अखेर तो विलीन होतो.

क्रांतदर्शी विचाराच्या दुसऱ्या टप्प्याला अग्निदिव्याचा किंवा छळवादाचा काळ असे म्हणता येईल. ईश्वरी अनुग्रह झालेल्यांनाच त्या सिद्धांताच्या अंतिम विजयाचा साक्षात्कार होऊ शकतो. काही लोक त्याचे कौतुक करतात ; काही त्याच्या सत्यतेबद्दल शंका प्रदर्शित

करतात ; आणि फारच थोडे त्यावर विश्वास ठेवतात. या विचाराचे विरोधक तर त्याचा तिरस्कारच करतात ; इतका की तो बहिष्कृत करण्यासाठी ते कायदेकानूनच संमत करून घेतात. त्याचा आधार घेऊन त्या विचाराचा उच्चार देखील करणाऱ्याला ते कारावासाची किंवा मृत्युदंडाची शिक्षा ठोठावतात. ते एवढ्यावरच थांबत नाहीत. त्या कायद्यात एक पोटकलम धुसडतात व असा हूकुम जारी करतात की ज्या ज्या ठिकाणी कोणाच्या हातात सत्ता असेल त्यांनी अशा विचारांच्या व्यक्तींची नवजात मुळे, किंवा लहान मुले देखील खुशाल यमसदनास पाठवावीत. ख्रिश्चन धर्म गुरूंनी आरंभी हेच केले. त्यातील नवीन विचारांचा जे कोणी स्विकार करतील त्यांना हुडकून काढण्यासाठी शाळा-शाळांतून व घराघरांतून चौकशी सत्र आरंभले जाते. चर्चचे अधिकारी दवंड्या पिटतात, " परमेश्वराच्या अनुयायांविरूद्ध बंड करणाऱ्यांना मृत्यूदंडाची सजा मिळेल. " " ते घरा-घरात घुसतात. बायकामुलांना बळजबरीने ओढून बाहेर काढतात व त्यांची तुरूंगात रवानगी करतात. " तथाकथित पाखंड्यांना ठार मारण्यासाठी चर्चच्या अडगळीत पडलेली शस्त्रे पुन्हा परजली जातात. त्यांना नव्याने धार काढली जाते. विरोधकांना सुळावर चढवण्यासाठी जागोजागी वधस्तंभ उभारले जातात. त्यांना जखडून टाकणारे लाकडी खोडे तयार केले जातात, आंगठा पिळण्याऱ्या चापासारखी माणसाचा अमानुष छळ करण्यासाठी नवनवी आयुधे सिद्ध ठेवली जातात. ज्या राष्ट्रांत एखाद्या नवीन सिद्धांताची शिकवण देण्याचा प्रयत्न होतो, तेव्हा तेथील धर्मगुरू, पंडित, गर्भश्रीमंत लोक, समाजातील वजनदार नेते, उच्चपदस्थ अधिकारी असे सर्वच लोक, त्याकडे काहीशा रागाच्या, भीतीच्या व तिरस्काराच्या भावनेतूनच पहातात. जनसामान्यात सुस्थिर झालेल्या त्यांच्या पदसिद्ध अधिकाराला त्यामुळे धोका निर्माण होतो, म्हणून राग. तो विचार अधिक वेगाने प्रभावी झाला तर त्यामुळे राज्यात बंडाळी, उत्पात व रक्तपात होईल, त्यातून निवडक सुसंस्कृतांच्या मालमत्तेला व मानसिक संतुलनाला धोका पोचेल म्हणून भीती. त्याविचारांतील ताजेपणा व तेजस्वीता केवळ भौतिक दृष्टीकोनांतून विचार करणाऱ्या लब्धप्रतिष्ठितांना आकलनच होऊ शकत नाही, म्हणून त्याबद्दल तिरस्कार. त्यांच्यामधील सावध शंकेखोरपणामुळे त्या सिद्धांतातील आश्वासकतेवर ते विश्वास ठेवू शकत नाहीत. या नवविचारांतील प्रेरणादायक शिकवण, त्यांच्या संकुचित, सोयिस्कर व प्रस्थापित व्यवस्थेला आव्हान देणारी व त्यांच्या शाळकरी पंडित्याचे धिंडवडे काढणारी वाटते. म्हणून " एक हिंसक विनाशकारी वेडाचार ", या शब्दांत तिचा ते धिःकार करू पहातात. उपद्रवकारी पण क्षुल्लक म्हणून ते तिला कमी लेखण्याचा प्रयत्न करतात. युक्तिवादाच्या व तर्काच्या आधारावर तिचे निराकरण करण्यासाठी त्यांच्यातील विद्वानांना ते आवाहन करतात ; विदुषकांना तिची टिंगल टवाळी करायला लावतात. या विचाराच्या पुरस्कर्त्यावर, ' राज्यात असंतोष माजविणारे देशद्रोही ', असे हीन आरोप ठेवले जातात ; व पोंटिअस, मिलेट, फेलिक्स किंवा फेस्टस अशा परकीय न्यायालयात त्यांच्यावर खटले भरले जातात. परंतु त्यांच्याकडून होणारा असा छळ, उपमर्द, अवहेलना, तुच्छता वगैरे सर्व सहन करूनही त्यांच्या विचारांचा प्रभाव, प्रसार व

व्याप्ती वाढतच जाते. लोकांचे लोंढेच्या लोंढे नवीन धर्म स्वेच्छेने स्विकारतात, जथ्थेच्या जथ्थे त्याचा संस्कार (बाप्तीस्मा) करून घेतात, तर काही हौतात्म्य पत्करतात. तथाकथित विद्वानांच्या युक्तिवादाकडे लोक ढुंकूनही पहात नाहीत. तुरूंग भरून वाहू लागतात. अगणित सूळ असंख्य कलेवरांचे ओझे उगाचच वहातात. अनेक तलवारीवरील रक्त निष्कारण निथळत रहाते. कारण तो मौलिक विचार परमेश्वरप्रणित असतो. त्याच्या पाथिकांना जन्म-मृत्यू, जय-पराजय, सुख-दुखः यामधील कोणताच भेदभाव जाणवत नाही. या दैवी संदेशाच्या पालनासाठी कोणताही असीम त्याग करायला ते सिद्ध होतात.

आपल्या राष्ट्रवादाचा प्रवास आज या दुसऱ्या टप्प्यातून सुरू आहे. त्याच्या जन्मासंबंधी आमची नेमस्त मित्रमंडळी एक मजेदार कहाणी नेहमी सांगत असतात. ते म्हणतात, लॉर्ड कर्झन हा आपल्या राष्ट्रवादाचा पिता आहे ; व नैराश्य ही त्याची जननी आहे. ते पुढे असेही सांगतात की या अपत्त्याचा जन्म सुलभपणे होण्यात सर बाम्पफील्ड यांच्या सारख्या कुशल सुईणीचें मोठेच योगदान आहे. परंतु या बाबतीत आमचे असे स्पष्ट मत आहे की, नेमस्तांनी बुद्ध्याच पसरविलेले ते एक थोतांड आहे. आपल्या राष्ट्रवादाचा उगम नैराश्यांतून मुळीच झालेला नाही. लॉर्ड कर्झनच्या अपेक्षेप्रमाणे त्याच्या दडपशाहीच्या कारभाराविरुद्ध काँग्रेस पक्षात तीव्र प्रतिक्रिया उमटली व त्याचा परिणाम म्हणून पक्षातील एका गटाचा इंग्लंडवरील विश्वास उडाला व ते जहालवादाकडे वळले, हे नेमस्तांचे प्रतिपादन वस्तुस्थितीला धरून नाही. काँग्रेस म्हणजे व्हॉईसरायच्या कौन्सिलमधील नोकरशाहीच्या तालावर नाचणारी बाहुली नव्हती. या नोकरशहांच्या कपाळावरील नापसंतीच्या एखाद्या आठीमुळे एका क्षणाला ती जहाल बनते किंवा दुसऱ्या क्षणाला त्यांच्या खुशीमुळे प्रसन्न होऊन जाते, असे नोकरशहांना सांगणे म्हणजे शुद्ध राजकीय ढोंगबाजीच आहे. परंतु या विचारवंतांनी असा एक भ्रम पक्का रुजवला होता की आपले राष्ट्रीयत्व हा जणू एक आरसा आहे. त्या आरशात ब्रिटिश नोकरशहांच्या उच्छृंखल व बदलत्या लहरींचे बदलते व अस्थिर प्रतिबिंब नेहमी उमटत असते. ते जेव्हा खुशीत असतात तेव्हा ते अगदी शांत व लोभस असते ; परंतु त्यांचा पित्तप्रकोप झाला की तेच विद्रुप व अक्राळविक्राळ दिसू लागते. एतदर्थ त्यांच्या म्हणण्याप्रमाणे आपल्या राष्ट्रीयत्वाला काही स्वतंत्र अस्तित्वच नाही. ब्रिटिश नोकरशाही वगळून त्याला स्वतःची प्रकृतीच नाही. पण हे सर्व खोटे आहे. हिंदुस्थानचे राष्ट्रीयत्व काही केवळ अत्याचारातून जन्माला आलेले नाही, की जो थांबताच ते नष्ट होईल. लॉर्ड कर्झन किंवा फुलर यांचा आपल्या राजकीय क्षितिजावर उदय होण्यापूर्वी तें अस्तित्वात होते. ब्रिटिश राज्यात जरी क्वचित दोष असले तरी बहुतांशी ते कल्याणकारी राज्य आहे असे म्हणत. काँग्रेस जेव्हा त्यांची खुशामत करीत होती व त्यांच्यावर स्तुतीसुमने उधळीत होती ; किंवा तिचे नेते त्यांच्या भोवती आरत्या ओवाळून राजनिष्ठेच्या आणाभाका घेण्यात स्वतःला धन्योऽहम समजत होते, त्याआधी कितीतरी वर्षे आपल्या राष्ट्रीयतेने जन्म घेतला होता इतकेच नव्हे तर एक वर्धिष्णु शक्ती म्हणून तिचा विकासही होऊ लागला होता. तिचा जन्म व वाढ काँग्रेस अधिवेशनाच्या भव्य मंडपांत झाली नाही ; की बॉम्बे प्रेसिडेन्सी ॲसोशिएशनच्या कार्यालयात नाही. कोणा

विद्वान अर्थशास्त्रज्ञाच्या वा समाजसुधारकांच्या कोंडाळ्यात नाही ; की गोखले-मेहतांच्या सुपीक मेंदूत नाही. सुरेंद्रनाथ-लाल मोहनांच्या भाषणात झालेली नाही ; देशाभिमानाला सोडचिट्ठी दिलेल्यांच्या कोट-टोपीत नाही, की त्यांच्या इंग्लिश बोली भाषा व शिष्टाचारांच्या भ्रष्ट नकलेत नाही.

कृष्णाप्रमाणे आपल्या राष्ट्रीयतेचा जन्म झाला होता कारागृहात. तिचा जन्म झाला होता ब्रिटिशांचे तथाकथित कल्याणकारी राज्य ही ज्यांना दुर्धर अंधारकोठडी वाटे त्यांच्या अंतःकरणात. तिचा जन्म झाला होता, ज्यांना अत्याचारी ब्रिटिश सरकारचा कृपाप्रसाद इजिप्तमधील प्लेग इतकाच घृणास्पद वाटत होता,त्यांच्या हृदयांत. तिचा जन्म झाला होता ब्रिटनच्या लांछनास्पद अटींच्या मोबदल्यात त्यांच्याकडून भिक्षा म्हणून मिळालेल्या साम्राज्यांतर्गत तथाकथित शांतता व समाधान झिडकारणाऱ्या स्वभिमानी देशभक्तांच्या अंतर्मनात. कारण ती सुबत्ता स्वतःच्या पराक्रमी मनगटाच्या ताकदीवर मिळविलेली नव्हती याची त्यांना जाणीव होती. म्हणूनच ती त्यांना मोंगलांच्या पुस्तपेक्षाही अधिक मानहानीकारक वाटत होती. ती शांतता त्यांना आपल्यातील पौरूषच हळूहळू पण निश्चितपणे हिरावून घेणारी वाटत होती. निरंकुश ब्रिटिश सत्तेने भारतीय जतनेची आर्थिक पिळवणूक चालविली होती ; तिला गुलामगिरीच्या खोड्यात अडकावून ती तिची उपासमार करीत होती, याची त्यांना खात्री पटली होती. एका बाजुने तिचा स्वभिमान व राष्ट्रीय आकांक्षा यांचे तिने खच्चीकरण चालविले होते. तर दुसऱ्या बाजुने तीच मग्रूर सत्ता त्याच्या बदल्यात कौंसिलमधील तुरळक जागा, थोड्या मुलकी नोकऱ्या व काही न्यायमूर्तींच्या जागा यांची भिक्षा काहींच्या झोळीत टाकू पहात होती. हा सर्वस्वी नामुष्कीचा सौदा ज्यांना मान्य नव्हता तेच आपल्या राष्ट्रीय भावनेचे खरे जनक होते, कारण ही तात्पुरती शांतता काही व्यापाऱ्यांना, कारकुनांना व उद्योजकांना मिळणाऱ्या संधी स्वीकारणे म्हणजे आपल्या प्राचीन वैभवशाली राष्ट्राच्या अनंत काळच्या अवनतीला व दुर्भिक्षतेला निमंत्रण देणेच होय याची त्याना खात्री पटली होती. राष्ट्रीयतेचा विचार इथे कसा उत्पन्न झाला आणि त्याचा विकास कसा झाला ? जो भगवान श्रीकृष्ण पुढे एक प्रचंड सामर्थ्यशाली व प्रतिभासंपन्न तत्त्वज्ञ म्हणून जगापुढे आला त्याचे शिक्षण राजपुत्रांच्या समवेत राजगृहात किंवा विद्वान ब्रह्मणांच्या पाठशाळेत झाले होते काय ? तो तर वाढला होता अज्ञानी, उपेक्षित व अशिक्षित गरीब गवळ्यांच्या सहवासांत. हिंदुस्थानचे राष्ट्रीयत्वही तसेच वृद्धिंगत झाले. कधी काशाय वस्त्रे व फकिराचा डगला घतलेल्या सन्याशाच्या कुटीत; तर कधी इंग्रजी भाषा माहीत नसलेल्या परंतु मातृभूमीसाठी प्रसंगी प्राणही पणाला लावायला तयार असलेल्या युवकांच्या अंतःकरणांत. या राष्ट्रीयत्वाच्या मंत्राने ज्या अनेक सुशिक्षितांची हृदये अंतर्बाह्य व्यापून टाकली; व्यक्तिगत धनधौलत व मानमरातब मिळविण्याचा स्वार्थी विचार ज्यांनी आपल्या मनांतून निर्धारपूर्वक निपटून टाकला व ज्यांनी तो एकच प्रेरणादायी विचार सर्वदूर पसरविणे हेच आपले जीवीत कार्य ठरविले, त्या सर्वांच्या भगिरथ प्रयत्नामुळेच राष्ट्रीयत्वाचा हा ओजस्वी विचार कळत न कळत अधिकाधिक बळकट होत गेला. आणि तसे विधिलिखितच होते की काय कुणास ठाऊक. पण लौकरच तो

बंगालमध्ये येऊन पोचला व तेथून तो देशभर पसरला. ठिकठिकाणी नवनवे समर्थक त्याला मिळू लागले. त्यापैकी ज्यांच्याजवळ दूरदृष्टी होती त्यांनी या चळवळीचा प्रतिरोध करण्यासाठी सरकार दमनचक्र सुरुच करील असा अंदाज बांधला. काहींनी तर देशाचे स्वातंत्र्य समीप आल्याची स्वप्ने पाहिली.

अनियंत्रित राजसत्ता आपल्या गुलाम जनतेवर कधीनाकधी अत्याचाराचें शस्त्र उगारणार व तिला आपल्या टांचेखाली रगडणार हा निसर्गाचा अटळ नेमच आहे. त्यांतून कोणाचीही सुटका नाही. एखाद्या गुलामाच्या जीवनावर व अस्तित्वावर निरंकुश अधिसत्ता भोगणारा मालक त्याला कोणत्या मर्यादेपर्यंत स्वातंत्र्य देतो ? जोपर्यंत गुलामाची त्याला भीती वाटते, तोपर्यंत तो स्वामी त्याच्यावर प्रसन्न असतो किंवा जोपर्यंत आपले दास्यत्व तो स्वखुशीने चालू ठेवतो व त्याच्या स्वातंत्र्यावर घालून दिलेल्या मर्यादा उल्लंघण्याचा तो विचार करत नाही, तोपर्यंत मालकाची तक्रार नसते. पण ज्याक्षणी तो त्यांचे स्वतंत्र अस्तित्व प्रस्थापित करू पहातो व त्याला दिलेली मोकळीक ही हक्क म्हणून तो मागू लागतो, किंवा त्याला दाखविलेल्या कठोरपणाविरुद्ध बंड करून उठतो, किंवा मालकाविरुद्ध उद्धटपणाची भाषा वापरू लागतो, किंवा त्याच्या आज्ञा मोडू पहातो, त्याचक्षणी त्याच्यावरील निर्बंध तो अधिक कडक करतो किंवा त्याला तो जबर शिक्षा ठोठावतो. मालक गुलाम यांच्यातील व्यवहार मानवी स्वभावाला धरूनच आहे. इतके करूनही जर तो गुलाम त्याचे निर्बंध झुगारून देऊ पाहील व फर्मावलेल्या शिक्षेला विरोध करील तर तो मालकाला आपल्या जीवनमरणाचा प्रश्न वाटेल व त्याची बंडाळी मोडून काढण्याचा तो प्राणपणाने प्रयत्न केल्याशिवाय रहाणार नाही. अशा स्थितीत मालकाच्या दृष्टीने अत्याचार अपरिहार्य ठरतात. तीच गोष्ट राष्ट्रीय विचाराबाबतही घडते. त्याची जनतेमधील स्वीकृती जसजशी वाढू लागते, तसतसे तिच्यावरील अत्याचारही वाढू लागतात. पण याचा अर्थ राष्ट्रवादाचा जन्म अत्याचारांतून होतो असा नव्हे. कंसाने यादवांच्या केलेल्या कत्तली व त्याने आरंभलेला त्यांचा छळ यांनी कृष्णाला जन्माला घातलेले नाही. परंतु मथुरेतील जनता त्यामुळे भगवान श्रीकृष्णाकडे आकृष्ट झाली व ती त्याच्याकडे मुक्तिदाता म्हणून पाहू लागली हे खरे आहे.

क्वचित् सरकारशी मिळते घेतल्यामुळे राष्ट्रीय विचार संपुष्टात येईल हे नेमस्तांचे प्रतिपादन, तिचा उगम प्रगती व विकास याबद्दलच्या त्यांच्या भ्रममूलक समजुतीचे द्योतक आहे, म्हणूनच गोखल्यांचे वादविवादकौशल्य व डॉ. घोषांनी सादर केलेली साहित्यांतील असंख्य उधृते व संदर्भ, कोणत्याही इंग्लिश माणसाची एक क्षणभर देखील तशी खात्री पटवून देऊ शकणार नाहीत. कारण इंग्लिश माणूस हा एक राजकीय जनावरच आहे. राजकीय क्षेत्रांतील शेकडो वर्षांचा अनुभवच जणू त्याच्या रक्तांतून वहात असतो. तर्कशुद्धतेची व शहाणपणाची त्याची शिदोरी अगदीच तुटपुंजी असली तरी त्याची राजकीय अंतःप्रेरणा नेहमीच त्या दोहोपेक्षाही अधिक बिनचूक ठरली आहे. शिवाय ज्याची जहालवाद म्हणून नेहमी हेटाळणी केली जाते ती मुळात राष्ट्रीयताच असते, हे त्यांनी पुरेपुर जाणलेले आहे. इतकेच

नव्हे तर मवाळपणाने, राष्ट्रवाद नष्ट होत नाही हे ही त्यांनी पक्के ओळखले आहे. अशा लढाईत सरकारकडून काही सवलती मिळाल्याच तर राष्ट्रवादी त्याचा जरूर स्वीकर करतील. परंतु त्या सवलती म्हणजे भावी संघर्षातील नवी हत्यारेच समजून संपूर्ण स्वातंत्र्य मिळेपर्यंत ते आपला लढा चालूच ठेवतील. आमचे जे बांधव ब्रिटिशांच्या गोटात वावरत असतात त्यांनी हा विचार आत्मसात करावा व त्यावर अढळ विश्वास ठेवावा, अशी आम्ही त्यांच्याकडून अपेक्षा करतो. काहींना अशी भीती वाटते की मिळते घेण्याच्या धोरणामुळे नवीन चळवळ विस्कळीत होईल ; तर काहींना वाटते की सरकारच्या दडपशाहीने ती नष्ट होईल. परंतु त्या सर्वांना माझे असे आवाहन आहे की, आपल्या समाजाच्या उज्वल भवितव्यावर त्यांनी अढळ निष्ठा ठेवावी. पूतना राक्षसीने आपल्या अंगावरचे विषारी दूध लहानग्या श्रीकृष्णाला पाजले म्हणून तो काही मरून पडला नाही ; किंवा मायावी राक्षस आपल्या टाचेखाली त्याला रगडू शकला नाही. या दोन्ही गोष्टी आमच्या मित्रांना माहीत नाहीत काय ? त्याचप्रमाणे रिपनचा फसवा सुधारणावाद किंवा पुण्याच्या देशभक्तावरील देशद्रोहाचे खटले, यापैकी काहीही अद्याप बाल्यावस्थेत असलेल्या आपल्या राष्ट्रवादाचा विकास थोपवू शकणार नाहीत. कंसाचे डावपेंच त्याचे मस्तवाल हत्ती, मल्लविद्येत तरबेज असलेले त्याचे कुस्तीबहाद्दर, किंवा त्याच्या विषकन्या, यापैकी कोणीच मथुरेत प्रकट झालेल्या कृष्णाला ज्याप्रमाणे ठार मारू शकले नाहीत, त्याचप्रमाणे रिपन साहेबांच्या सवलती नोकरशाहींची प्रलोभने, फुलरसाहेबांचा कावेबाजपणा, किंवा कायद्याच्या आधारे घातलेले देशद्रोहाचे खटले, यापैकी कोणतीही गोष्ट दृढमूळ होऊ पहाण्याऱ्या राष्ट्रावादाला खीळ घालू शकणार नाही. कारण स्वतः परमेश्वरच राष्ट्रीयतेचे रूप घेऊन या देशात अवतरला आहे. राष्ट्रवाद हा एक परमेश्वरप्रणीत चिरंतन शक्तीचा हुंकार आहे. त्या जगनिमंत्यानेंच या राष्ट्रीय शक्तीकरिता एक विशिष्ट कार्य निहित केले आहे. त्याची पूर्ति झाल्यानंतरच ती शक्ती जिथून जन्म पावली त्या परमेष्टीच्या उर्जेत पुन्हा प्रवेश करील.

**वंदे मातरम्, १६-११-१९०७.**

● ● ●

## १९. श्रीकृष्ण व अनियंत्रित राजसत्ता

२५-११-१९०७.

**श्रीकृष्णाच्या आदर्शाचे विवेचन करताना श्रीअरविंद सांगतात. अनेक जुलमी सत्ताधाऱ्यांचा कर्दनकाळ, असंख्य नरेशांचा सल्लागार असा श्रीकृष्ण गोपाळांच्या म्हणजे गवळ्यांच्या सहवासात वाढला. श्रीकृष्ण हा काही हानिबाल किंवा नेपोलीयन नव्हता. जेव्हा त्याने दैत्यांचा वध केला तेव्हा त्याने त्यांना बजाविले की मला कोणतीच व्यक्तिगत महात्वाकांक्षा नाही. जे राष्ट्र अशा श्रीकृष्णाला मानते ते कोणत्याही अनियंत्रित हुकुमशाहीपुढे कधीच शरणागती पत्करणार नाही.**

आपल्या अगदी निकटच्या सुह्रदाची ब्रुटसने काही निष्कारण हत्त्या केली नव्हती व आपले हात त्यांच्या रक्ताने उगाचच माखून घेतले नव्हते. आपल्या रक्तबंबाळ कृत्याचे अंशतः कां होईना, परिमार्जन करण्याच्या हेतूनेच तो म्हणाला होता, ' सीझरच्या राक्षसी महत्वाकांक्षेपायीच मला त्याची हत्त्या करावी लागली'. अतिरेकी महत्त्वाकांक्षा मानवतेला तूच्छ लेखते. महत्वाकांक्षी माणसाला वाटते कीं सर्व जग हे फक्त त्याच्या व त्याच्याच सेवेशी सदासर्व काळ तत्पर असलें पाहिजे. आपल्याजवळील सर्व शक्तींचा वापर तो नेहमी दुष्कृत्यें करण्यासाठीच करतो. अशी अमर्याद महत्वाकांक्षाच सर्व जगात जनतेचे सार्वभौमत्व प्रस्थापित करण्याच्या मार्गात नेहमीच अडथळा निर्माण करते. मग ती महत्वाकांक्षा कधी एखाद्या व्यक्तीची असेल किंवा एखाद्या राष्ट्राची. जनसामान्यात वावरतांना जो आनंद अनुभवू शकत नाही ; किंवा त्याच्या सुखदुःखांत जो सहभागी होऊ शकत नाही, असा माणूस मानवजातीचे कधीच कल्याण करू शकणार नाही. कदाचित तो प्रतिभाशाली असेलही ;परंतु अखेर त्याची ही प्रतिभा मानवाला शापच ठरते; व त्याच्या सर्व आशा-आकांक्षाचा चुराडा करून टाकते. या धरतीचें तो एका वैराण वाळवंटात रूपांतर करून टाकतो. त्या ओसाड प्रदेशात तो एकटा सर्वनाश होणारे फूल असतो. या जगात ज्या महापुरुषांनी मानवजातीची प्रगती घडवून आणली, ते सर्व लोकशाही मनोवृत्तीचे होते. स्वतः मोठे होण्यापेक्षा जनतेची उन्नती हाच त्यांचा ध्यास होता. मानवतेचा विकास घडवून आणण्यासाठींच त्यांनी आपल्यातील सर्व शक्ती खर्ची घातल्या. ते स्वतः जरी ईश्वरी वरदानाचे धनी होते, तरी सामान्य कुवतीच्या माणसांना त्यांनी कधीच क्षुद्र लेखले नाही. उलट त्यांच्यात ते मोकळेपणान मिसळले व स्वतःला त्यांच्यापैकीच एक असें समजून त्यांच्यासाठी त्यांनी पडतील ती कामे केली. मानवजातीचे कल्याण साधणाऱ्या ज्या ज्या महान विभूति होऊन गेल्या त्या सर्वांचे हेंच वैशिष्ट्य होते. मग असा माणूस द्रष्टा असो किंवा कृतीप्रधान असो.

भारताबद्दलच बोलावयाचें झाले तर आपल्या प्राचीन इतिहासांतील सामान्य माणसांतल्या त्या ईश्वराची आठवण करा. त्याच्या शिकवणुकीचा प्रभाव आपणांस अजूनही आढळून येतो. अनेक जुलमी सत्ताधाऱ्यांचा कर्दनकाळ, असंख्य नरेशांचा सल्लागार, हा गोपाळांच्या म्हणजे गवळ्यांच्या सहवासांत वाढला. ते सर्व त्याचे दोस्त व खेळगडीच होते. श्रीकृष्णाला आळवणाऱ्या प्रत्येक भजनांत त्याचा उल्लेख नंदनंदन असाच केलेला आढळतो. नंद हा गवळ्यांचा प्रमुख होता. परंतु ब्राम्हणांनाही पूजनीय असलेल्या या देवाने आपल्याला गवळीपुत्र म्हणवून घेण्यांतच धन्यता मानली. पुढे बाळपणांतल्या आपल्या सवंगड्यांच्या समवेत केलेल्या खोड्या व भटकंती या सर्व गोष्टींची त्याने मोठ्या आनंदाने व अभिमानाने आठवणी काढल्या. त्यावेळच्या त्याच्या मित्रांचा त्याला कधीच विसर पडला नाही. श्रीकृष्णाच्या केवळ अस्तीत्वाने व त्याच्या खट्याळपणाने त्या लहानशा खेड्यांतील निरागस वातावरणात आनंद भरून राहीला होता. त्या वेळच्या त्याच्या सवंगड्यांची त्याला नेहमीच आठवण येई व त्यांचे भले करण्यासाठी तो नेहमीच झटत असे. पुढे राक्षसी सत्ताधाऱ्यांच्या अनन्वीत अत्याचारापासून मानव जातीला मुक्त करणाऱ्या त्या महापुरुषाने अत्यंत साधेपणाने व नम्रतेने जीवन कंठणाऱ्या सामान्य लोकात आपला कायमचा वावर ठेवून, आपल्या अंगी लोकशाही मूल्य बाळगण्यासाठी व ती बळकट करण्यासाठी त्याने हेतुपूर्वक प्रयत्न केले. मानव जातीची सेवा करण्यात ज्याला यशस्वी व्हावयाच आहे, त्याला त्यांच्यात मिसळून त्यांच्या आशा-आकांक्षा, त्यांच्या सवयी, त्यांची जीवनशैली या सर्वांचे ज्ञान मिळविणे अत्यंत आवश्यक आहे, हीच गोष्ट श्रीकृष्णाच्या पूर्वायुष्यातून अधोरेखित होते. युधिष्ठिराने जेंव्हा राजसूय यज्ञ आरंभला तेंव्हा त्याने यज्ञासाठी जमलेल्या ब्राह्मणांचे पाय धुण्याचे काम मुद्दाम स्वत:कडे घेतले. मानवाच्या उद्धार करू पाहणाऱ्याने किती नम्रतेने व शालीनतेने वागणे कसे अपरिहार्य असते, त्याचा वस्तुपाठच त्यायोगे त्याने सर्व जगाला घालून दिला. सत्तास्थानावर असलेल्या माणसाने लोकांचा तिरस्कार करून चालणार नाही, त्यांच्या भावनांची त्याने नेहमीच कदर केली पाहिजे व त्यांच्या मताला त्याने कधीच क्षुल्लक समजून चालणार नाही. केवळ त्यांचे समाजांतील वरचे स्थान किंवा त्यांची संपत्ती याच गोष्टी त्यांचे लक्ष्य होऊन चालणार नाही. त्याने सर्व समाजात मिसळले पाहिजे. वेळोवेळी त्यांचा सल्ला त्याने घेतला पाहिजे व त्यांच्या सर्व शक्तींचा उपयोग त्यांच्या आकांक्षा पुऱ्या करण्यांत त्याने खर्ची घातल्या पाहिजेत. त्याच्याकडील प्रगल्भ ज्ञानामुळे किंवा त्यांच्या सुक्ष्म बुद्धीमत्तेमुळे जनतेच्या विचारातील प्रखरता फार तर तो सौम्य करू शकेल; परंतु त्यांच्या म्हणण्याकडे व मतांकडे तो संपूर्णपणे दुर्लक्ष करू शकणार नाही; किंवा त्यांना कमीही लेखू शकणार नाही. अंततोगत्वा ते कुणाच्याच हिताचे ठरणार नाही. एखाद्या महान विभूतींचे कार्य राष्ट्रंनिर्मितीच्या माध्यमातूनच अविरतपणे चालू राहू शकते. केवळ एकाच व्यक्तीच्या हातून, मग ती व्यक्ती प्रत्यक्ष परमेश्वर कां असेना, अशा स्वरूपाचे महान कार्य एकाच पीढीत पूरे होणे कदापि शक्य नाही. एखादा मांत्रिक आपल्या जवळील मंत्रसामर्थ्याने मृत शरीरात कदाचित् किंचित काल प्राण निर्माण करू शकेल. परंतु त्या मंत्राचा प्रभाव संपताच तो

तात्पूर्ती कृत्रीम प्राण शक्ती लोप पावेल व ते शरीर पुन्हा अचेतन व काष्टवत होऊन जाईल. त्याचप्रमाणे एखादा महान नेता आपल्या इच्छा शक्तीच्या बळावर देशात तात्पूर्ती चेतना निर्माण करीलहीं; परंतु तो पडदया-आड जाताच त्यांच्याच बरोबर ती कृत्रीम प्राण शक्तीही लुप्त होऊन जाईल.

श्रीकृष्ण हा काही हानिबाल किंवा नेपोलिअन नव्हता. जेंव्हा त्याने दैत्यांचा वध केला, तेंव्हा त्याने त्यांना स्पष्ट बजावले की मला कोणतीच व्यक्तिगत महत्वाकांक्षा नाही. जेंव्हा त्याच्या सहकाऱ्यांच्या व अनुयायांच्या मनांत त्याच्या आज्ञा पाळण्याबद्दल संदेह निर्माण झाला, तेंव्हा श्रीकृष्णाने त्यांच्याशी युक्तिवाद करून आपला उदात्त हेतू त्याने समजावून सांगितला; त्यांची आकलन शक्तीही त्याने वृद्धींगत केली; आपल्याइतकीच त्यांची इच्छाशक्ती त्याने प्रबळ केली. तेंव्हाकुठे श्रीकृष्णाच्या आज्ञा त्या सर्वांनी स्वखुशीने पाळल्या. तो जरी सर्वांपेक्षा अधिक शक्तिशाली होता, तरी तो अत्याचारी सत्तांध नव्हता, जेंव्हा विचित्र मनोगंडाने पछाडला गेलेला अर्जुन हताश व किंकर्तव्यमूढ होऊन बसला तेंव्हा त्याला परमेश्वरविहित अपरिहार्य हत्याकांड व संभाव्य रक्तपात यामागे दडलेले मानवतेचे अंतिम तत्त्व श्रीकृष्णाने विशद करून सांगितले. त्याने क्षत्रियाच्या कर्तव्याची त्याला आठवण करून दिली ; धर्म व अधर्म यांतील फरक कसा ओळखावा तेहि सांगितले ; अशा तऱ्हेने आपल्या निरपवाद युक्तीवादाने त्याचा संभ्रम दूर करून त्याची खात्री पटवल्यानंतरच समरांगणांत उडी घेण्यास त्याने अर्जुनाला उद्युक्त केले. नियतीच्या शापांतून त्याने राष्ट्राला मुक्त केले ; व त्याला महत्पदाला चढवले! त्याने समाजासाठी ज्ञानाचा दीप प्रज्वलित केला व स्वतः काळाच्या पडद्याआड गेल्यानंतरही तो सतत तेवत कसा राहील हें पाहिले. केवळ गंमत म्हणून त्यांने पांडवांना त्यांच्याच आप्तस्वकीयांबरोबर युध्द करण्यास प्रवृत्त केले नव्हते. खुद्द त्याच्या अनुयायांचा सल्ला धुडकावून लावून त्याने समझोत्याचे व शांतीचे अनेक प्रस्ताव यशस्वी करण्यासाठी अखेरपर्यंत प्रयत्न केले. आपल्या सामर्थ्याची जाणीव प्रतीपक्षाला देतच सर्व प्रस्ताव मांडण्याचे त्याचे धोरण होते. परंतु त्याचे हे सर्व प्रयत्न जेव्हां फोल ठरले, व शत्रू पक्ष आपल्या ताठर भूमिकेवर अडून बसला, तेव्हांच त्याने परिणामांची यत्किंचितहि तमा न बाळगता त्यांच्या बरोबर शक्ति परीक्षा घेण्याचा निर्णय घेतला. जे राष्ट्र अशा श्रीकृष्णाला आपला आदर पुरुष मानते ते कोणत्याही स्वरूपातील अनियंत्रित हुकुमशाहीपुढे कधीच शरणागती पत्करणार नाही, किंवा कुठल्याही बेफाम सत्ताधाऱ्यापुढे गुढघें टेकून त्यांच्यातील देवत्वाचा ते कदापि अपमान होऊ देणार नाहीत.

**वंदे मातरम्, २५-११-१९०७.**

## २०. बहिष्काराची नैतिकता

**'' वंदे मातरम् '' साठी लिहिलेला हा लेख पोलिसांनी जप्त केला होता व अलीपूर खटल्यात पुरावा म्हणून सादर केला होता. ब्रिटीश मालाची होळी करणे अनैतिक आहे या विधानाचे खंडन करताना श्रीअरविंद म्हणतात, बहिष्कार हे एक प्रकारचे युद्धच आहे. अमेरिकनानी ब्रिटीश चहाच्या पेट्या बोस्टनच्या बंदरात फेकून दिल्या तेव्हा त्यांना कोणी दोष दिला नाही. तीच कृती भारतीयांनी केली तर नैतिकतेच्या निकषावर ते दोषी ठरत नाहीत.**

कोण्या एके काळी बआल या देवतेचा एक पुजारी होऊन गेला. जो कोणी मूर्तीपुढे गुढघे टेकणार नाही, त्याला ठार मारण्याची आज्ञा खुद्द तिनेच आपल्याला दिली आहे, असा समज त्याने सर्वत्र पसरविला. त्यांच्या या अघोरी सत्तेमुळे व क्रौर्याने बिचारे लोक भयभीत झाले. ते निमुटपणे मूर्तीपुढे गुढघे टेकत व आपण पुजाऱ्याचे सेवक असल्याचा बहाणा करीत. ज्यांनी हे मान्य केले नाही, त्यांना डोंगरांचा वा बाळवंटाचा आश्रय घ्यावा लागला. परंतु अखेर एकाने या अत्याचारी पुजाऱ्याचा खून केला व त्याच्या जाचांतून सर्वांची सुटका केली. त्यामुळे सर्वत्र शांती नांदू लागली. पुढे काही महाभागांनी या शांतीलाच धर्म बनविला व पुजाऱ्याच्या मारेकऱ्यालाच दोष द्यायला सुरवात केली ; व निष्क्रीय सहनशीलता, हीच खरी आदर्श नीति होय, असे नवे तत्त्वज्ञान मांडायला त्यांनी सुरवात केली. परंतु जग मात्र त्या मारेकऱ्यालाच परमेश्वराचा अवतार मानू लागले.

आक्रमकता हे जणू एक पाप आहे, असे मानणाऱ्या भयग्रस्त लोकांचा एक वर्ग नेहमीच आढळतो. संघर्षातही आपण एक प्रकारचा आनंद अनुभवू शकतो, हे त्यांच्या मनोवृत्तीत बसतच नाही; व त्यांना ज्यांचे आकलन होऊ शकत नाही, ते सर्व राक्षसी किंवा अनैतिक असे म्हणून ते मोकळे होतात. प्रेमानेच तिरस्कारावर मात करा, न्यायानेच अन्यायाचे निराकरण करा, सात्विकतेनेच अत्याचाराशी मुकाबला करा, अशा मंत्राचा ते घोषा लावतात. प्रेम ही एक अत्यंत पवित्र संकल्पना आहे हे खरं. परंतु प्रेमावर व्याख्यानबाजी करण्यापेक्षा प्रत्यक्ष प्रेम करणे, हे अत्यंत कठीण असते, हेहि तितकेच खरे. प्रेमाने शत्रुला जिकणे हा दैवी गुण झाला; परंतु अशी दैवी गुणवत्ता असलेला माणुस हजारात एखादाच आढळतो. अखिल मानव जातीविषयी आपुलकी बाळगणाऱ्या एखाद्या संत प्रवृत्तीच्या माणसाजवळच तो गुण आढळेल. किंवा सर्व समाजाचे दु:ख व दैन्य दूर करण्याचे व्रत ज्याने अंगिकारले आहे, अशा एखाद्या भूतदयावादी साधू पुरुषाकडेच तो दिसेल. परंतु बहुतांश समाज उद्दात्ततेची एवढी उंची गाठूच शकत नाही. आणि राजकारणांचा संबंध तर बहुजन समाजाशींच येतो ; तुरळक व्यक्तीशीं नाही. म्हणूनच बहुसंख्य समाजाला एखाद्या साधुसंताप्रमाणे वागायला सांगणे ;

किंवा त्यानी दैवत्त्वाची उंची गाठून, जुलूम जबरदस्ती करणाऱ्याशी व त्याच्याशी उघडउघड वैर मांडणाऱ्याशी प्रेमाने वागावे, असा सल्ला देणे, म्हणजे मनुष्य स्वभावाबद्दल घोर अज्ञान प्रगट करण्यासारखेच आहे. याचा अर्थ अन्यायाला व हिंसेला बक्षीस बहाल करणे असा होतो व त्यामुळे दुराचाऱ्यावर प्रहार करण्यासाठी मुक्तिदात्याने उगारलेला हात लुळा पडतो. प्रतिकार म्हणजे पाप, किंवा आक्रमकता म्हणजे अनैतिकता, असे म्हणून, समरांगणातून जे पळ काढतात, त्यांना श्रीकृष्णाची गीता हे चोख उत्तर आहे.

ज्याने बंगालमध्ये मोठी जागृती घडवून आणली, व मृदुता व प्रेम यांचे जे नेहमीच गुणगान गातात, अशा एका थोर कवीने, बहिष्काराच्या चळवळीवर उपहासात्मक टीका करणारा एक लेख अलीकडेच लिहिला. त्यांच्या मते बहिष्काराचा जन्म तिरस्कारांतून होतो. त्यांना राजकारणात साधुता आणावयाची आहे. खर म्हणजे ते जी शुचिता राजकारणात आणू पहातात, ती त्यांच्याच व्यक्तिमत्त्वाचा एक पैलू असतो. राजकारणाकडे ते आदर्शवादी दृष्टीकोनातून पहात असल्यामुळे हे घडते. पण वस्तुस्थिती अशी आहे की बहिष्कार म्हणजे तिरस्कार नव्हे. ते एक आत्मसंरक्षणासाठी उचललेले पाऊल आहे. स्वतःचे अस्तित्व टिकवून धरण्यासाठी अवलंबिलेला तो एक आक्रमक पवित्रा आहे. त्याला वैरभावनेची कृती समजणे, म्हणजे संथपणे दुसऱ्याचा खून करू पहाणाऱ्यावर केलेला प्रहार हा अन्यायकारक आहे, असें समजण्यासारखेच आहे. वास्तविक अशा वेळी हाती लागेल ते शस्त्र घेऊन त्याच्यावर तुटून पडणे, हेच कायद्याला व न्यायाला धरून असते. परंतु त्याची ही कृती द्वेषभावनेची परिणिती ठरवून व त्याला प्रतिकार करण्यापासून परावृत्त करणे व बहिष्काराला तुच्छ लेखणे या दोन्ही गोष्टी सारख्याच. अर्थात् आत्मसंरक्षण करतांना तो जेंव्हा हल्लेखोरावर वार करतो, तेंव्हा तोहि काही एखाद्या पवित्र सद्‌भावनेच्या पोटी करीत नाही. आणि मानवी स्वभावाचा विचार करता, तशी अपेक्षा ठेवणे हे मुळातंच चूक आहे. काही धर्म तशी शिकवण देतात हे खरें. परंतु त्यांचे अनुयायी देखील ती शब्दशः पाळतांना कधीच आढळत नाहीत.

हिंदु धर्म मानवाचा ह्य स्वभाव पुरेपूर जाणतो. त्यामुळे त्याच्यापासून अवास्तव अपेक्षा तो कधीच करीत नाही. तो साधुसंतासमोर एक आदर्श ठेवतो ; क्षत्रीयासमोर दुसराच ठेवतो ; वैश्याकरिता निराळा आदर्श ठेवतो ; तर शूद्रासमोर त्याहीपेक्षा वेगळा. त्या सर्वांसमोर सारखाच आदर्श ठेवणे म्हणजे वर्ण संकर करण्यासारखेच आहे. त्यामुळे प्रत्येकाच्या कर्तव्यकर्तव्याच्या बाबतीत गोंधळ माजेल व सर्व समाजाची घडीच पार विस्कटून जाईल. आम्ही सर्व काळ गुलामींतच राहायचे ठरविले असले तर, एक वेळ बहिष्काराचे तत्त्व वर्ज मानणे क्षम्य ठरेल पण त्याचे कारण परस्परांतील सद्‌भावनेशी ती प्रतारणा ठरते हे नव्हे ; तर आज्ञापालन व आत्म समाधान, ही जी शूद्राची निहित कर्तव्ये, त्याला बाधा येते म्हणून. राजकारण हा क्षत्रियाचा धर्म आहे. आपले नीतिशास्त्र हे त्याच्या राजकीय कृती नियंत्रित करते. म्हणून राजकीय क्षेत्रांत केवळ साधूला साजेल अशा ब्राह्मणी सहनशीलतेचे यमनियम लागू करणे, म्हणजे एक प्रकारच्या वर्ण संकरालाच चिथाणी देणे होय.

प्रेमाला राजकारणांत स्थान आहे हे खरें. पण इथे प्रेम याचा अर्थ स्वतःच्या देशाविषयी प्रेम. स्वतःच्या देशबांधवांबद्दल प्रेम. आपल्या वंशाच्या व समाजाच्या वैभवाबद्दल, उत्कर्षाबद्दल व महानतेबद्दल प्रेम. आपल्या देशबांधवासाठी केलेल्या समर्पणाचा आनंद. त्यांचे दुःख व कष्ट दूर केल्याबद्दलचे समाधान. आपल्या देशासाठी व स्वातंत्र्यासाठी आपले रक्त सांडण्यात अनुभविलेला हर्ष. देशासाठी कवटाळलेल्या मृत्युमुळे होणाऱ्या आपल्या पूर्वजांच्या संभाव्य भेटीमुळे झालेला आनंद. धरती मातेच्या स्पर्शामुळे सर्वांगांत उठणाऱ्या सुखद लहरी, तिन्ही सागरावरून येणाऱ्या वायु लहरींच्या स्पर्शाने उठणारी तरळ स्पंदनें, डोंगर माथ्यावरून खळाळत खाली येणाऱ्या पुण्यदायिनी सरितांच्या जलस्पर्शाने पुलकित झालेले शरीर व मन, देशवासियांचे रंगीबेरंगी पोषाख, त्यांच्या हालचाली, त्यांचे हावभाव, नेहमीची अनेक सुखद दृष्यें, भिन्न भिन्न आवाज, या सर्वांच्या एकत्रित मिश्रणांतून उठणाऱ्या ध्वनिलहरी, या सर्व गोष्टी अतुलनीय व अवर्णनीय प्रेमवृक्षाच्या मुळाशी असतात, म्हणूनच त्याला एक प्रकारचे दिव्यत्व प्राप्त होते. भूतकाळाविषयी अभिमान, वर्तमान काळाविषयी चिंता, भविष्याविषयी प्रखर आशावाद, हा जणू काही त्या वृक्षांचे खोड व फांद्या. जन्मभूमीच्या ठिकाणी चिरंतन मातृत्वाचे दर्शन, मातृभूमीच्या रूपाने मूर्तिमंत जगन्मातेचा साक्षात्कार, तिचेच निरंतर चिंतन, तिच्याच विचाराने सर्व मनोकाश व्यापून जाणे, तिच्याविषयी अपरंपार भक्ति आणि तिचीच अविरत सेवा यासर्व गोष्टी म्हणजेच जणू त्या वृक्षाचा जीवनरस.

राजकीय क्षेत्रांत यापेक्षा प्रेमाचा वेगळा अर्थ असूच शकत नाही. राष्ट्रा राष्ट्रांतील संबंध फक्त न्याय, पक्षपात, कर्तव्य व दाक्षिण्य याच कल्पनाभोवती फिरत असतात. त्यांत प्रेमाला कुठेच स्थान नसते. प्रेम हे बहुधा व्यक्तिनिष्ठ असते. माणूस हा नेहमी स्वतःवर प्रेम करतो ; संपूर्ण वंशापैकी एक किंवा मानव जातीपैकी एक असे त्याचे स्वरूप फार तर भिन्न असेल. वेगवेगळ्या वंशातील व्यक्ति व्यक्तिशः एकमेकांवर प्रेम करू शकतात ; पण दोन वंशात ते असू शकत नाही, असाच अनुभव येतो. म्हणून भारतीय समाज ब्रिटीश जनतेविरुद्ध जेंव्हा बहिष्काराची चळवळ उभारतो, तेंव्हा त्यांच्यावर द्वेषभावनेचा दोषारोप करणे हे मानसशास्त्र काय किंवा नीतिशास्त्र काय, दोहोंच्याही विरुद्ध आहे. बहिष्कार हा दोन हितसंबंधांतील झगडा आहे. त्यांतील संतापाच्या भावनेचा रोख, हा ब्रिटीश जनतेविरुद्ध नसतो ; तो त्यांच्या हितसंबंधाविरुद्ध असतो. म्हणूनच भारताचे शोषण करणे ते ज्या क्षणी थांबवतील त्याक्षणी त्या समाजाविरुद्धची क्रोधाची भावना देखील नष्ट होईल. जे नाहीं ते कल्पिणाऱ्या अज्ञानी माणसाच्या दृष्टीने अल्पकाळ का होईना, प्रत्यक्ष शोषणापेक्षा, शोषण करणारेच जनतेच्या रोषास अधिक पात्र ठरतात. परंतु माया जशी शाश्वत नसते, तशी ही भावनादेखील खरी नसते व विचारवंतांना तसे कधींच वाटत नाही. सारांश, परकीयांच्याबद्दलचा रोष नव्हे ; तर त्यांनी चालविलेल्या शोषणाविरुद्धचा संतापच बहिष्काराच्या चळवळीच्या मुळाशी असतो.

सामान्यपणे द्वेष हा माणसाचा अवसानघात करणारा असतो, हे खरं. परंतु तो त्याला कार्यप्रवृत्त करणाराहि असतो हे तितकच खरं आहे. जीवनाचे जाळे हे नेहमीच सुष्ट व दुष्ट प्रवृत्तींच्या उभ्या आडव्या धाग्यांनी विणले जाते, परमेश्वरदेखील पाप-पुण्याच्या नागमोडी वळणांतूनच आपले इप्सीत नेहमी साध्य करीत असतो. म्हणूनच आपली अंतःकरणे जरूर द्वेषरहित करू या. परंतु त्याचवेळी बहिष्काराच्या या महान् व अपरिहार्य चळवळीवर विनाकारण हेत्वारोप करण्याचे टाळू या. कारण त्यातून उफाळून आलेला संताप, व द्वेषभावना ही मानवी स्वभावाच्या प्रक्रियांची एक अपरिहार्य परिणती आहे. त्यातून जशी तिरस्काराची भावना निर्माण झाली, तशी त्यामुळे जनतेत एक उत्साहाची लाटही उसळली व जागृतीही उत्पन्न झाली.

समाजात जेंव्हा तामसी वृत्तीचा प्रादुर्भाव होतो, तेंव्हा त्याला एक प्रकारचे शैथिल्य व बधिरताही येते. त्यामुळे संपूर्ण राष्ट्रच संवेदनाशून्य बनून जाते. त्यांतून बाहेर पडण्यासाठी लोकांत रजोगुणांचा प्रभाव वाढणे आवश्यक असते. त्यानंतर रजोगुणांचे सात्विक गुणांत रूपांतर घडवून आणायला, आपल्या समाजाच्या मानसीकतेला फारसा अवधी लागणार नाही. ब्रिटीश शोषणकर्त्यांविरुद्ध निर्माण झालेल्या क्रोधाची जागा देशभक्तीच्या भावनेने कधीच घेतली आहे. त्यांचे प्रतिबिंब आपल्या राजकीय क्रिया कलापात पडूही लागले आहे.

इथे आणखी एक प्रश्न निर्माण होतो. तो म्हणजे बहिष्काराच्या चळवळीतील हिंसेच्या वापराचा. आमच्या मते तो एक धोरणाचा व व्यूहरचनेचा भाग झाला. हिंसेमुळे सरकारशी प्रत्यक्ष संघर्ष पेटेल व तो आपल्या समाजाच्या आजच्या स्थितीचा विचार करता हितावह ठरणार नाही. पण यांत नैतिकतेचा प्रश्न कुठे आला ? शिवाय हिंसेचा वापर केल्यामुळे दुसऱ्याच्या व्यक्ति स्वातंत्र्याचा संकोच होतो, असे म्हणणे, हे देखील एकूणच राजकारणाबद्दल घोर अज्ञान प्रगट करणेच आहे. तसा विचार केला तर आजचे शासन हेच मुळी व्यक्तिस्वातंत्र्यावर घाला आहे. प्रचलित कायदा हा व्यक्ति स्वातंत्र्यांत हस्तक्षेप आहे; संरक्षण हाही त्यात हस्तक्षेप आहे ; आणि ज्या कायद्यान्वये बहुसंख्यांची इच्छा प्रमाण मानली जाते, तो कायदाहि व्यक्तिस्वातंत्र्याचा संकोच करतो. एतद्दर्थ जेंव्हा एखाद्या समाजाच्या हितसंबंधांत कोणाच्या व्यक्तिस्वातंत्र्यामुळे बाधा निर्माण होते, तेंव्हा त्याला विरोध करणे, हा त्या समाजाचा मूलभूत हक्क व कायदाच ठरतो. या दृष्टीकोणांतून विचार केला असतां, आपले राष्ट्र जेंव्हा एखाद्या व्यक्तिला परदेशी मालाचा वापर करण्यापासून रोखते, तेंव्हा ते राष्ट्र या मूलभूत कायद्यानुसार आपला प्राथमिक अधिकारच बजावीत असते.

इथे असा एक युक्तिवाद करण्यात येऊ शकतो, की शांततामय सक्ती ही एक गोष्ट आहे व हिंसात्मक सक्ती ही दुसरी. सामुदायिक बहिष्कार हा एक वेळ न्याय्य ठरू शकेल. पण ब्रिटीश मालाची होळी करणे किंवा तो समुद्रांत बुडवून टाकणे, नाही. यावर आमचा प्रतिवाद असा की दुसरा मार्ग हा बेकायदेशीर आहे व म्हणून तो ग्राह्य नाही. परंतु तो नैतिकदृष्ट्या

समर्थनीय नाही, हे आम्हाला मुळीच मान्य नाही–कारण युद्धात क्षत्रियाने केलेली हिंसाही न्याय्य ठरते ; आणि बहिष्कार हे देखील एक प्रकारचे युद्धच आहे. अमेरिकनांनी ब्रिटीश चहाच्या पेट्या जेव्हा बोस्टन बंदरांत फेंकून दिल्या तेंव्हा त्यांना कोणी दोष दिला नाही, त्याचप्रमाणे तशीच कृती भारतीयांनी केली तर नैतिकतेच्या निकषावर तीही दोषार्ह ठरत नाही. कदाचित् सामाजिक शांतता, कायदा व सुव्यवस्था यांचा विचार केला असता ती एक वेळ दोषास्पद ठरेल, परंतु, राजकीय नैतिकतेच्या आधारावर मुळींच नाही. म्हणून ज्या भूमिकेवरुन आम्ही युद्ध पुकारले आहे, ती आमची बाजू हिंसेमुळे लंगडी पडेल, म्हणून त्यापासून आम्ही परावृत्त झालो. आजच्या परिस्थितीत एकूणच ती भूमिका शहाणपणाची ठरणार नाही हे त्याला आणखीही एक कारण आहे. कदाचित् अन्य परिस्थितीत आम्ही अमेरिकनांनी घालून दिलेला मार्ग चोखाळलाही असता. आमच्या तशा कृतीची इतिहासकारांनी व नैतिकवाद्यांनी भलावणच केली असती ; आम्हाला दोष तर मुळींच दिला नसता.

राजकीय नैतिकतेत न्याय व सात्विकता यांना स्थान आहे हे खरं. परंतु ती नैतिकता एका योध्याची नैतिकता असते ; धर्मगुरुची नाही. अकारण केलेले आक्रमण हे अन्याय्य ठरते ; दुष्टहेतूने केलेली बेधुंद हिंसा ही देखील निषेधार्ह. पण एखादा तांत्रिक नियम सर्वच कृतींना सरसकट लावणे व ती आक्षेपार्ह ठरविणे हे तत्त्वज्ञानांचे विडंबन आहे. किंवा त्या तत्त्वज्ञानांतील एखाद्या वाक्याच्या चौकटीत संपूर्ण मानवी जीवन कोंबण्याचा प्रयत्नही अश्लाघ्यच ठरतो.

न्याय व सत्धर्म प्रस्थापित करण्यासाठी साधुपुरुषांच्या शुद्धाचरणाची जितकी आश्यकता असते, तितकीच त्यासाठी शूराच्या समशेरीचीही असते. शिवाजीशिवाय रामदास अपूर्ण आहेत. न्यायसंस्थेचे रक्षण करण्यासाठी, बलदंडापासून होणारी लुबाडणूक रोखण्यासाठी व अत्याचाऱ्यांपासून दुबळ्यांचे रक्षण करण्यासाठी, क्षत्रीय संस्थेचा जन्म झाला. म्हणून श्रीकृष्ण महाभारतांत म्हणाला, " युद्ध, कवच, खडग आणि कट्यार, ही सर्व परमेश्वरानेच निर्माण केली आहेत ".

अनेक जण समजतात तितका मानव हा केवळ एक ऐहिक वस्तु नाही. त्यांच्यांत एक परमेश्वरी अंशहि वसत असतो; परंतु राजकारणी लोक त्याकडे सतत डोळे झांक करतात! कारण तो राजकारणी केवळ तात्कालिक प्राप्त परिस्थितीचा विचार करतो. अर्थात त्यावेळी त्याला मात्र असे वाटत असते कीं सर्व गोष्टींचा त्यानें समग्रपणे विचार केला आहे. परंतु त्यावेळी त्याने फक्त वरवरच्या गोष्टी व भोवतालची परिस्थिती एवढ्याचाच अभ्यास केलेला असतो. मानवी दृष्टीच्या कक्षेत न येणाऱ्या अतीतांतील गोष्टी त्याच्या नजरेतून निसटलेल्या असतात. त्यावेळी त्याला परमेश्वरी संकेताचा व मानवांतील अतर्क्य शक्तींचा विसर पडलेला असतो. त्यामुळेंच अखेर अशा कारस्थानी राजकारण्यांचे आडाखे चुकतात व त्यांचे चातुर्य पार धुळीस मिळाल्याचे दिसून येते.

● ● ●

## २१. पुणे येथील भाषण

१३-१-१९०८.

**सुरत काँग्रेसनंतर बाबू अरविंद पुण्याला आले असतानाचे हे भाषण आहे. लॉर्ड कर्झनच्या दडपशाहीनंतर बंगाली लोकांच्या मनःस्थितीचे येथे वर्णन आहे. त्यानंतर सुरू करण्यात आलेल्या चळवळीची माहिती या भाषणात त्यांनी दिली. आत्मनिर्भर होण्याचा मंत्रही अरविंदबाबूंनी पुण्यातील या सभेत दिला.**

" वंदे मातरम् " या वृत्तपत्राचे संपादक बाबू अरविंद घोष हे खाजगी भेटीनिमित्त पुण्यास शनिवारी संध्याकाळी आले. सोमवारी संध्याकाळी त्यांना श्री. शि. म. परांजपे (' काळ ' चे) यांच्या स्वदेशी वखार येथे, त्यानंतर गोडसे यांच्या स्टेशनरीच्या दुकानावर आणि श्री. नारायण छबिलदास यांच्या दुकानावर पानसुपारीचे आमंत्रण होते. सोमवार, जानेवारी १३, १९०८ रोजी संध्याकाळी बाबू अरविंदांचे (लो. टिळकांच्या) गायकवाड वाड्यावर भाषण झाले. तेथे लोकांनी चार वाजल्यापासूनच गर्दी केली होती. श्री. एस. के. दामले, वकील यांनी पुण्याचे महर्षी डॉ. अण्णासाहेब पटवर्धन यांच्या नावाची अध्यक्ष म्हणून सूचना केली. वक्त्यांची ओळख करून देताना डॉ. पटवर्धन म्हणाले की, पुण्याच्या जनतेसमोर भाषण देणारे श्री. अरविंद बाबू हे, चौथे बंगाली नेते आहेत. प्रथम केशवचंद्र सेन आणि नंतर प्रतापचंद्र रॉय या दोघांनी नव्या ब्राह्मोसमाजाची तत्त्वे पुण्यात विशद करून सांगितली होती. तिसरे वक्ते म्हणजे १८९५ च्या अकराव्या भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे अध्यक्ष, सुरेन्द्रनाथ हे होते. आजचे चौथे वक्ते हे त्यांच्याच बंधुवर्गातील आहेत. बंगालच्या नवचैतन्याचे ते उद्गाते आहेत. त्यानंतर श्री. पटवर्धन यांनी बाबू अरविंदांना आपले भाषण देण्याची विनंती केली.

**बाबू अरविंदांचे भाषण असे :**

डॉ. पटवर्धन आणि माझ्या देशबांधवांनो, मी जेव्हा येथे आलो तेव्हा माझा शोध घेऊन भाषण देण्याची मला आज्ञा होईल याची मला कल्पना नव्हती. येथे आल्यावर माझ्या मित्रांना भेटून तडक निघून जावे असाच माझा इरादा होता. परंतु आता आपणासमोर बोलण्याची मला आज्ञा झाली आहे. भाषण करणे हा काही माझा व्यवसाय नाही, हे मला कबूल केले पाहिजे. लेखणी हेच माझे शस्त्र आहे. जिव्हा नाही. जे लोक स्वतःच पुढेपुढे करतात त्यांना कृपाळू सरकारने मोठेपणा दिला असतो. अशा लोकांना दोन आज्ञा पाळाव्या लागतात. पहिली आज्ञा ब्रिटिश साम्राज्याच्या निवासस्थानाकडून दिली जाते तर दुसरी लोकांकडून. हे लोक सांगतील तेव्हा तेव्हा त्यांना भाषणे द्यावी लागतात. आतापर्यंत मी

भाषणे देण्यापासून स्वतःला रोखत होतो. परंतु यावेळी मी माझ्या मित्रांचा आणि देशबांधवांचा आज्ञाभंग करू शकलो नाही. मी काय बोलावं याबद्दल माझा आतापर्यंत विचार सुरू होता. मी काही वक्ता नाही. त्यामुळे कदाचित मला माझे विचार व्यवस्थितपणे व्यक्त करता येणार नाहीत. परंतु आमचा बंगालमधील अनुभव मी आपल्याला सांगणार आहे. माझे विचार विस्कळित असतील तर त्याबद्दल आपण मला क्षमा करावी. मी असेही म्हणेन की, आपला जास्त वेळ घेऊन मी आपल्या सहनशीलतेची परीक्षा पाहणार नाही. हेही आपल्याला सोयीचेच होईल. १९०७ हे वर्ष घडामोडींच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरले आहे. बऱ्याच अघटित अशा दुर्दैवी घटना त्या वर्षात घडल्या. नव्या आंदोलनाला मोठ्या कठीण व बिकट परिस्थितीतून जावे लागले. बंगालमध्ये आम्हाला बऱ्याच अडचणी आल्या आणि अनेक दिव्यातून आम्हाला जावे लागले. या वर्षी सुरतेला जे वादळ उठले ते याचाच एक प्रकार. " पुढे काय ? " हा प्रश्न लोकांनी विचारला. आमचे उत्तर होते, " बघू या काय होते ते, पाहू या आणखी किती संकटांना आम्हाला तोंड द्यावे लागते ते. " परिस्थितीमुळे आणि आम्हाला मिळत असलेल्या शिक्षणामुळे आमच्यात संशय घेण्याची एक वृत्ती बळावली आहे. त्या वृत्तीचे लोक नेहमी विचारतात, " तुम्ही इतके पुढे आणि इतक्या वेगाने का जाता ? तुमच्यात असा एखादा कार्यक्रम हाती घेण्याकरिता लागणारे बळ आहे कोठे ? " आम्ही फारच श्रद्धाळू आहोत असा आमच्यावर आरोप करण्यात येतो, आणि तो मला मान्य आहे. मी स्वतःदेखील फार श्रद्धाळू आहे आणि माझी श्रद्धा अशी आहे की आमच्यात भरपूर बळ आहे. आम्ही जे काम हाती घेऊ त्यात आम्हाला यश येईलच. ' वंदे मातरम् ' पत्रातून जो विश्वास आम्ही लोकांमध्ये पेरतो, त्याबद्दल मी आपणाला सांगू इच्छितो. स्वदेशीने आणि बहिष्काराने सुरू झालेली राष्ट्रीय चळवळ नेत्यांच्या सांगण्यावरून आम्ही स्वीकारली नव्हती. बंगालमध्ये काँग्रेसची चळवळ मजबूत होती. लॉर्ड कर्झनच्या अगोदरपासून सुरू असलेल्या सरकारी दडपशाहीमुळे लोकांचा काँग्रेसवरील विश्वास उडाला. काँग्रेसला असे वाटत होते की, आपल्या मतप्रणालींचा प्रचार करून, अर्ज, विनंत्या करून आपण ब्रिटिश लोकांना, नोकरशाहीला जिंकू शकू. परंतु जेव्हा लोकांना कळून चुकले की, याचा काहीच उपयोग होत नाही, पैसा आणि श्रम वाया जातात, तेव्हा लोक काँग्रेसबद्दल निराश झालेत. स्वदेशी आंदोलन सुरू होण्याच्या तीन-चार वर्षे अगोदर लोकांमध्ये ही नैराश्याची आणि उदासीनतेची भावना वाढीस लागली. जे उपाय निष्फळ ठरलेत तेच जर पुन्हा काँग्रेसने योजावयाचे सुरू ठेवले, तर आमचे सारे प्रयत्न व्यर्थ ठरतील आणि देश रसातळास जाईल. लॉर्ड कर्झन आले आणि सरकारची प्रतिगामी पावले वेगाने पडू लागलीत. त्यांनी अनेक कायदे केलेत. बंगालच्या लेफ्टनंट गव्हर्नरने म्युनिसिपल ॲक्ट अगोदरच अंमलात आणला होता. युनिव्हर्सिटी ॲक्टही पास करण्यात आला. बंगालमध्ये खाजगी शाळा, कॉलेजे सुरू झाली होती. बंगालमध्ये या कायद्यांना तीव्र विरोध करण्यात आला, तरी ते पास करण्यात आले. त्यानंतर बंगालची फाळणी झाली. बंगाल्यांच्या राष्ट्रीय भावनेवर यामुळे फार मोठा आघात झाला. फाळणीबद्दल इतका आक्रोश का होत

आहे, हे काही भारतीयांना अगोदर समजलेच नाही. परंतु बंगाली लोक प्रतिभाशाली आणि भावनाप्रधान आहेत. त्यांच्यामध्ये प्रांतीय एकता आहे आणि त्यांना ही फाळणी पसंत नव्हती. त्यांच्या मर्मावरच जणू प्रहार करण्यात आला होता. हा त्यांना सहन करता येण्यासारखा नव्हता. त्यांनी अर्जविनंत्या केल्या आणि कानाकोपऱ्यांतून निषेधांच्या पत्रांचा सरकारवर भडीमार झाला. परंतु हे सर्व व्यर्थ ठरले. त्यानंतर मग आता काय करावे, हा प्रश्न उभा राहिला. फाळणीच्या तीन-चार वर्षे अगोदरपासून स्वदेशीची चळवळ बंगालमध्ये मूळ धरू लागली होती. परंतु नेत्यांनी ती अद्याप स्वीकारली नव्हती. बहिष्काराची पहिली आरोळी किशोरजंगने दिली. हे एक छोटसे गाव आहे आणि ते कोणत्याही चळवळीत आतापर्यंत पुढे आले नव्हते. दुसरी आरोळी मालगुरा (जेसोर) येथून आली. आणि तिसरी कलकत्त्यावरून. या अगोदर लोकांनी अमेरिकन मालावर चीनने टाकलेल्या बहिष्काराचा परिणाम पाहिला होता. म्हणून लोकांनी ही बहिष्काराची आणि स्वदेशीची कल्पना उचलून धरली. स्वदेशीची सुरुवात पुण्यापासून झाली आणि तिचे लोण बंगाली नेत्यांपर्यंत पोहोचले. परंतु त्यावेळी स्वदेशी चळवळ ही एक भ्रामक कल्पना आहे, आणि ही चळवळ कधीच यशस्वी होणार नाही असे त्यांना वाटत होते. दुसरे म्हणजे, संमतिवयाचे विधेयक पुढे आले तेव्हा सनातनी वृत्तपत्रांनी बहिष्काराचा आणि स्वदेशीचा प्रचार केला. परंतु ती चळवळ स्वीकारण्याचे बळ त्यावेळी देशात नव्हते. अलीकडे देखील स्वदेशी आणि बहिष्कार यांचा प्रचार होत होता, तेव्हा स्वदेशीची चळवळ लोकांना शक्य कोटीतील वाटत नव्हती. बहिष्काराची तर नव्हतीच नव्हती. ही चळवळ राजकीय अर्थशास्त्राला धरून नाही, असे ठासून सांगण्यात येत होते. आपल्या येथील परिस्थिती वेगळी आहे, असेही सांगितले जात होते. चारित्र्याच्या बाबतीत आम्ही उणे आहोत. आम्ही अशी चळवळ करणे हास्यास्पद ठरेल, असेही म्हटले जात होते. परंतु लोकांच्या मनात नवीन उत्साह संचरला होता. त्यांनी अशा शंका-कुशंकांना थारा दिला नाही. ते म्हणाले, "आम्ही त्या शंकेखोरांचे ऐकणार नाही. आम्हाला काहीतरी करावयाचे आहे आणि आम्ही ते करूनच दाखवू. म्हणजेच, आम्ही स्वदेशीचे आणि बहिष्काराचे शस्त्र पेलू. तुम्ही आम्हाला मार्गदर्शन करा." यावर मग नेते म्हणाले, " ठीक आहे. तात्पुरते म्हणून, आपण ही शस्त्रे वापरू आणि आपण काय करू शकतो ते पाहू." ब्रिटिश मालावर तूर्त सहा महिने बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानंतर हे पाऊल योग्य आहे असे दिसून आले, तर बहिष्कार सुरू ठेवायचा. यश मिळाले तर ठीकच. नाही मिळाले तर, हा मार्ग सोडून द्यावयाचा. आतापर्यंत आम्ही चुकीच्या मार्गावर होतो. आम्ही स्वतःला आतापर्यंत दुबळे समजत होतो. आमच्यात बरेच देशीय स्वरूपाचे दोष आहेत. आम्ही स्वतःलाच संमोहित करीत होतो किंवा दुसऱ्यांना तसे करू देत होतो. आम्ही दुबळे आहोत असे जर आम्ही समजत गेलो तर आम्ही अनंत काळापर्यंत तसेच राहू. आपला स्वतःच्या ताकदीवर विश्वास असू द्या. वेदान्ताचे अनुसरण करा. आम्ही सशक्त असून आमच्यात ईश्वरी शक्ती आहे, असा विचार मनी बाळगा. संकटांची तमा बाळगू नका. पुढे चला. बहिष्कार हे एक

तात्पुरते साधन समजू नका. ती एक धोरणात्मक पद्धती आहे हे विचारात घ्या आणि तशी ती शेवटास न्या. नेत्यांनी याला विरोध केला. त्यांनी जाहीरपणे आपला विरोध प्रकट केला. परंतु लोक त्यांचे ऐकण्याच्या मनःस्थितीत नव्हते. बहिष्कार हा एक स्थायी उपाय म्हणून वापरायचे त्यांनी ठरवले. त्यानंतर लोकांना आपले बळ जाणवले. आपण अशक्त नाही तर सशक्त आहोत, असे त्यांना जाणवले. ते हा उपाय अंमलात आणू शकतात आणि आणतील. ते तसा तो आणू शकले. बहिष्काराचे अस्त्र यशस्वी झालेले पाहून शंकेखोरांनाही नवल वाटले. बहिष्काराच्या पहिल्या वर्षानंतर, फाळणीचे दुःख नाहीसे झाले नसले, तरी बहिष्काराने मँचेस्टरच्या कापूस व्यापाराला जबरदस्त हादरा दिला. आता बहिष्कार सर्वसंमत आणि सार्वकालिक झाला आहे. लोकांची शक्ती आता दिसून आली आहे. भारतीयांना दुसरे दूषण असे देण्यात येत होते की, हे लोक त्याग करू शकत नाहीत. विशेषकरून बंगालमध्ये ही त्याग भावना नाही. बंगाली लोक शिकारीची सुरुवात करतात व अर्ध्यावरच पाठलाग सोडून देतात. बंगालमधील दुसरी गोष्ट म्हणजे स्वदेशीच्या चळवळीची. यातही काही शंकेखोर म्हणायचे की, स्वदेशी कापड हे निकृष्ट दर्जाचे आहे आणि इंग्लडमधील कापडाइतके चांगले नाही. शिवाय महागही आहे. " अशा परिस्थितीत लोक स्वदेशीचा नेहमी वापर करतील हे कसे शक्य आहे ? " लोकांनी या म्हणण्यावर विश्वास ठेवला नाही. त्यांनी स्वदेशीचा वापर सुरू केला. गरीब, सुशिक्षित, अशिक्षित, अगदीच अडाणी लोकांनीही स्वदेशी कापड विकत घेण्यास सुरुवात केली. बंगालमधील तरुण मंडळी पुढे आली आणि स्वदेशीचा प्रचार स्वयंप्रेरणेने करू लागली. पोलिसांचा जाच असतानाही ते ' पिकेटिंग ' करू लागलेत. त्यांनी चळवळीचा संदेश कानाकोपऱ्यात नेला. त्यांनी स्वदेशी कापड कोणताही नफा न घेता विकले. या तरुण स्वयंसेवकांच्या प्रयत्नांमुळे स्वदेशीची मागणी आणि पुरवठा दोन्हीही वाढलीत. सरतेशेवटी किंमती समपातळीवर आल्या आणि परदेशी कापड महाग होत गेले. आत्मनिर्भरतेमुळे आम्ही बहिष्कार आणि स्वदेशी यशस्वी करू शकलो. आम्ही तिसरे काम केले ते राष्ट्रीय शिक्षणाचे. ब्रिटिश शिक्षण पद्धतीबद्दल लोकांची फार दिवसांपासून नाराजी होती. बहिष्कार आणि स्वदेशी आंदोलन यशस्वी झाल्यावर राष्ट्रीय शाळा, कॉलेजांकरिता लोकांनी हाकाटी केली. त्यावर बरीच चर्चा झाली आणि राष्ट्रीय शिक्षण आणायचेच असा लोकांनी निश्चय केला. रंगपूरचेच विद्यार्थी सरकारी शाळेतून बाहेर पडले आणि त्यांनी राष्ट्रीय शाळेची मागणी केली. रंगपूरला पहिली राष्ट्रीय शाळा स्थापन करण्यात आली. आता राष्ट्रीय विद्यापीठाचीही गरज भासू लागली. जमीनदारांनी या कामासाठी आपणहून मोठमोठ्या रकमा दिल्या. आता राष्ट्रीय प्राथमिक शिक्षणाची योजना सुरू होत आहे.

त्यानंतर वक्त्यांनी मग, बंगाली लोकांना आपण शक्तिमान, धीट आणि कार्यक्षम आहोत याची जाणीव कशी झाली, त्याबद्दल सांगितले. त्यांनी श्रीरामकृष्ण व विवेकानंद यांच्या शिकवणींचा उल्लेख केला आणि मेंढ्याच्या कळपात वाढलेल्या सिंहाच्या छाव्याची गोष्ट सांगितली. आत्मनिर्भर होण्याचे आवाहनही वक्त्यांनी केले. त्यानंतर मग मवाळ आणि

जहाल राष्ट्रवादी यांच्यातील फरक स्पष्ट करताना ते म्हणाले, ' ज्यांना आत्मविश्वास नाही ते सारे मवाळ आणि ज्यांना आत्मविश्वास आहेत ते जहाल राष्ट्रवादी. मवाळ संघर्षाची तयारी करतील पण म्हणतील, '' नाही. आपली अजून तयारी झाली नाही. '' आणि ते कधीच तयार होणार नाहीत.

त्यानंतर त्यांनी श्रोत्यांना आवाहन केले की, त्यांनी आत्मनिर्भर व्हावे. यशस्वी व्हावे, महान व्हावे, स्वतःची भरभराट करून घ्यावी आणि मुक्त व्हावे. स्वतंत्र व्हावे.

श्री. टिळकांनी आभार प्रदर्शन करताना म्हटले की, पाण्यात उडी घेतल्याशिवाय माणसाला पोहायला येत नाही. त्यांनी बाबू अरविंदांनी वारंवार पुण्यात येऊन व्याख्याने द्यावीत, अशीही त्यांना विनंती केली. टिळकांच्या ह्या आभार प्रदर्शनाच्या भाषणाला टाळ्यांचा प्रचंड कडकडाट पडला.

श्री. अरविंद बाबूंना हार घालण्यात आला. अध्यक्षीय समारोपानंतर लोक पांगलेत. . . वातावरण ' वंदे मातरम्, ' ' छत्रपती शिवाजी महाराज की जय ', ' अरविंद बाबू की जय ' या घोषणांनी दुमदुमून गेले.

१३ जानेवारी, १९०८.

## २२. नवा राष्ट्रवाद

**नव्या राष्ट्रवादाचे स्वरुप स्पष्ट करताना श्रीअरविंद म्हणतात, प्राचीन भारतीय तत्त्वप्रणाली व कार्यपद्धती पुनरुज्जिवित करून त्यामधून नवीन भारत राष्ट्र निर्माण करणे, जुन्या आर्यावर्तातील प्रभावी, महान आणि उत्तुंग तत्त्वाना पुन्हा भट्टीत घालून त्याना नवा आकार देऊन ऐतिहासिक आणि अजरामर समाजाला स्वातंत्र्यासाठी, महानतेसाठी आणि कल्याणासाठी घडविण्याचा तो प्रयत्न आहे.**

पक्षीय युद्धामध्ये वापरण्यात येणारी टोपण नावे हीच गंभीर राजकारण्यानी वापरल्यामुळे स्वीकृत संज्ञा बनल्या असून इतिहासाने त्याना कायम स्वरूप दिले आहे आणि राष्ट्राचे मन जिंकण्यासाठी परस्पराशी स्पर्धा करणाऱ्या जहाल आणि मवाळ ह्या दोन पक्षांची नावे अजरामर बहुधा होतील असे दिसते. प्रगत पक्ष हा राष्ट्रवादी पक्ष आहे. पण राष्ट्रवाद म्हणजे काय ? " शेक्सपियरने नावात काय आहे " असे म्हटले असले तरी पण नावाला पुष्कळच महत्त्व आहे. आपल्या राजकारणात अलिकडेच ही सामान्य संज्ञा वापरण्यात आली असून तिला नव्या, पुरोगामी अथवा जहाल पक्षाने रूढ केले आहे. स्वतःचे सोयिस्कर वर्णन करण्याच्या दृष्टीने त्यानी हे नवे नाव निवडले ज्यामुळे एका शब्दांत त्यांच्या राजकीय पक्षाचे अथवा नवीन विचारधारेचे, त्यांच्या मनस्थितीचे आणि ध्येयाचे वर्णन होऊ शकेल. हे नाव ते शोधण्याची केवळ मनःस्थिती आणि दृष्टिकोन स्पष्ट करीत नसून पक्षाबद्दलच्या समकालीन कल्पनाना उन्नत करावयाचे की अवनत करावयाचे ह्याबद्दलचासुद्धा रंग त्यामध्ये भरण्याचे काम ते करते. आंग्ल भारतीय आणि मवाळ ह्यानी एकत्रितपणे ज्या प्रगत व्यक्तीना जहाल म्हटले आहे त्यानी अपसमज करणारे नाव देणाऱ्याना कधीच झिडकारले आहे. सुरुवातीला त्यानी स्वतःला ' नवीन सिद्धान्त ' असे म्हणविले पण आता ते आपणास राष्ट्रवादी म्हणवितात. पण ह्या नामकरणाला काँग्रेस पक्षाने रागाने आक्षेप घेतला आहे कारण तो पण पुरोगामी पक्षाइतकाच राष्ट्रवादी आहे.

मी " रिव्ह्यू " च्या पूर्वीच्या अंकातील लेखात म्हटल्याप्रमाणे नवा राष्ट्रवाद ही एकोणिसाव्या शतकातील बुरसटलेल्या आदर्शाना नाकारणारी संज्ञा आहे. प्रमुख कल्पना त्यांच्या जुन्या अस्पष्टतेकडे सोपविणे, जुनाट विचाराना सामुराई बनविणे आणि त्यांच्याद्वारे सामुराई तत्त्वाची अर्थप्रवणता संपूर्ण राष्ट्रात पसरविणे हा त्याचा उद्देश होता. अधिक स्पष्ट करावयाचे तर प्राचीन भारतीय प्रणालीच्या तत्त्वाना आणि कार्यपद्धतीना पुनर्जीवित करून त्यामधून नवीन भारत राष्ट्र निर्माण करणे, जुन्या आर्यावर्तातील प्रभावी, महान आणि उत्तुंग तत्त्वाना पुन्हा भट्टीत घालून आधुनिक पद्धती आणि सामग्रीना नवा आकार देऊन ऐतिहासिक आणि अजरामर समाजाला स्वातंत्र्यासाठी, महानतेसाठी आणि कल्याणासाठी घडविण्याचा

तो प्रयत्न आहे. मला ह्याची जाणीव आहे की हे काही सामान्य काँग्रेस राजकारणी आततायी जहालाना ते ज्या तऱ्हेने ओळखतात त्याचे हे वर्णन नव्हे, परंतु बंगालमधील राष्ट्रीय नियतकालिके उदाहरणार्थ, वंदेमातरम् किंवा न्यु इंडिया किंवा स्थानिक भाषेतील नियतकालिके म्हणजे युगान्तर किंवा नवशक्ती किंवा संध्या नियमित वाचणाऱ्या वाचकाना पूर्ण ठाऊक आहे. त्यांची मन:स्थिती आणि भाषण ह्यात कितीही मतभेद असोत, त्यानी वापरावयाच्या पद्धतीत तपशील कितीही भिन्न असो परंतु साधारण श्रद्धेने आणि समान तत्त्वाने ते संघटीत आहेत आणि भारतात अस्तित्वात असलेल्या आणि नंतर बंगालमध्ये कायम व फक्त राष्ट्रवादावर त्याची समान श्रद्धा आहे. परंतु बंगालनेच त्याला तत्त्वज्ञान, श्रद्धा, पद्धती आणि गर्जना दिली. भारत म्हणून ओळखू न येणारा आंग्लीभूत आणि पुर्नजीवित भारत नव्हे, तर अमर प्राचीन भारत, घनाच्छादित पण आजचा दैवाधीन भारत, भविष्यकाली साम्राज्याचा मुकुट धारण करणारा बलशाली भारत, उत्साह आणि आशा इच्छायुक्त समान तत्त्व असणारा भारत, अशा सर्व वस्तूंची मागणी की ज्यामुळे आपले, आमच्या आकांक्षांचे भवितव्य भरघोसपणे आणि त्वरित पूर्ण व्हावे. हे राष्ट्रवादाचे हृदय आहे. सामान्य काँग्रेस राजकारण्याच्या राष्ट्रवादाच्या कल्पना, समितीतील आणि काँग्रेसमधील वायफळ चर्चा, सार्वजनिक सभांमधील बाचाबाची, यशस्वी आणि अग्रगण्य मानार्ह व्यक्तींची अविरत निंदा, देशद्रोही खटले, राष्ट्रीय स्वयंसेवक, पूर्व बंगालमधील गडबड, रावळपिंडीतली दंगल ह्यांच्याशी निगडीत आहेत. त्याला राष्ट्रवादी म्हणजे जहाल, हिंसक, अविचारी आणि त्याच्या स्वराज्य आणि बहिष्कार, त्याची कायदाविहीनता आणि लाठी, त्याचा सन्मानित वर्ग आणि काँग्रेसच्या राजकारणाची सुरक्षितता ह्यात घालमेल करणारा एक अवाचनीय जंतू आहे. अत्यंत भयकारक त्वरतेने ते संख्येने आणि प्रभावाने वाढत आहेत हे त्याला आढळले आणि ते नाकारणे सोईचे असले तरी उपेक्षा करणे मात्र अशक्य आहे. त्याला जहालवादाचा प्रवाह आणि ध्येय ह्यांची स्पष्ट जाणीव नाही, पण इंग्रजाना हाकून देऊन बहिष्कार आणि लाठी ह्यांच्या साह्याने भारताला स्वतंत्र करणे हे आपले ध्येय असल्याचे तो मानतो. अशा रीतीने दगड मारण्यासाठी एक बुजगावणे निर्माण करून अर्थशून्य बडबड करणाऱ्या आणि अशक्यतांची भलावण करणाऱ्या उत्साहवादींचा एक घोळका म्हणून आपल्या मनातून नव्या पक्षाची हकालपट्टी करण्याचा त्याला अधिकारच प्राप्त होतो.

राष्ट्रवाद असा सुखासुखी नाहीसा करता येणार नाही. त्या शक्तीने संपूर्ण भारत हादरून गेला आहे., शेकडो वर्षांच्या परंपराना ओळखू येणार नाही अशा भंगारात तुडवून टाकले आहे, नव्या आणि विस्मयकारक धोक्याला सामोरे जाण्यासाठी भरभरक्कम शस्त्रे कशी मिळतील ह्या धास्तीने आजच्या बलिष्ठ साम्राज्याना चाचपडत ठेवले आहे. त्या शक्तीमध्ये काहीतरी गूढ शक्ती निश्चितच असली पाहिजे आणि म्हणून त्यात समजून घेण्याइतके सत्य जरूर असले पाहिजे. राष्ट्रवादाचे हृदय समजून घेण्यासाठी त्यातील वस्तुस्थिती झाकून टाकण्याऱ्या काही कल्पनांचे प्रथम स्पष्ट निरसन झाले पाहिजे. प्रथम राष्ट्रवाद म्हणजे काय नाही हे राष्ट्रवाद म्हणजे काय हे जाणण्यापूर्वी समजून घेतले पाहिजे.

चैतन्याची अयुक्त हिंसा आणि अतिरेकी पद्धतीना पसंती कारण ते अतिरेकी आहेत. ह्या अर्थाने जहालवाद हे राष्ट्रवादाचे ह्रदय नाही. राष्ट्रवादी हा विधीहीनतेची–तिच्या स्वतःसाठी तरफदारी करीत नाही, उलट अन्य कोणाहीपेक्षा त्याला विधीच्या सारगर्भाबद्दल अधीक प्रगल्भ आदर असतो, कारण राष्ट्रनिर्मिती त्याचे उद्दिष्ट असते आणि कायद्याबद्दल अधीक उदात्त आदर असल्याशिवाय राष्ट्रीय जीवन हे जिवंत राहू शकत नाही आणि दृढ आणि स्वास्थ्यपूर्ण विकास साधू शकत नाही. पण त्याच्या कायद्याबद्दलच्या आदराला एक अट असते आणि ती म्हणजे जो कायदा त्याने पाळावा अशी अपेक्षा असते तो कायदा राष्ट्राचा कायदा असावा, शासनाच्या सर्वांगीण अस्तित्वामधून तो उपजला पाहिजे आणि तो शासनाचा भाग असला पाहिजे. आपल्या शरीराची आणि मालमत्तेची सुरक्षितता हीच ज्यांची जीवनाबद्दलची अपेक्षा असते त्यांच्याकडूनच बाहेरून लादलेल्या कायद्याचे पालन आज्ञा म्हणून केले जाईल. किंवा कायदेभंग केल्याचे भय ज्याना माहीत आहे त्यानी अशा कायद्याचे भीतिग्रस्त पालन करावे. त्या कायद्याचा दावा उपयोगवादी आहे, नैतिक नाही. शिवाय राष्ट्रवादी ह्या सत्याला कधीही दृष्टीपासून टळू देत नाही की कायदा माणसासाठी आहे, माणूस कायद्यासाठी नाही. कायद्याचे प्रमुख कार्य आणि अस्तित्वाचा मुख्य आधार म्हणजे राष्ट्रीय जीवनशक्ती आणि स्वास्थ्य ह्यांच्या वृद्धीला आणि सुखदायक विकासाला संरक्षण देणे आणि मदत करणे हे होय. आणि जो विधी ह्या उद्देशाला पूरक ठरत नाही किंवा जो त्याला विरोध करून त्याचे हनन करतो त्याने कितीही काटेकोरपणाने शांतीची आणि व्यवस्था आणि संरक्षणाची अंमलबजावणी केली असली तरी त्या कायद्याचा आदर आणि पालनाबद्दलचा दावा नष्ट होतो. कायदा हा एक स्तोम मानायला राष्ट्रवाद तयार नसतो आणि व्यवस्था तसेच संरक्षण ह्याना स्वतंत्र अस्तित्व मानीत नाही. त्याच्या पूजेची एकमेव अद्वितीय मूर्ती म्हणजे राष्ट्रवाद हीच असते आणि जे एकमेव ध्येय तो मान्य करतो ते म्हणजे राष्ट्राचे स्वातंत्र्य, शक्ती आणि कल्याण. हिंसक आणि कष्टदायक प्रवृती त्या तशा हिंसक आणि कष्टदायक आहेत म्हणूनहि राष्ट्रवाद स्वीकारणार नाही त्याचप्रमाणे मृदू आणि शांततामय मात्र तसे मृदू आणि शांततामय आहेत म्हणून त्याना आपलेसे करणार नाही. त्याची मागणी एवढीच असते की स्वीकारलेली पद्धत ही उद्दिष्टासाठी प्रभावी असावी, जे अस्तित्व इच्छितात त्या महान लोकाना साजेशी असावी, राष्ट्राच्या सामर्थ्याला आणि हालचालीना अध्यापक असावी आणि ह्यांबद्दल खात्री पटली की तिला आणखी काहीहि नको असते. अराजकता आणि यातना ह्यांच्यावर त्यांच्यासाठी राष्ट्रीय व्यक्ती प्रेम करीत नाही तर महान कार्य सिद्धीसाठी जर मार्ग अवश्यमेव अराजकता आणि यातना ह्यामधूनच जात असेल तर तो स्वतः त्याना सहन करतो आणि ध्येय सिद्धीपर्यंत इतराना पण त्या भोगायला लावतो. तो आपल्या मुलांच्या यातनाना कवटाळील आणि एक प्रेमिक म्हणून त्याना आलिंगन देईल आणि एकाद्या विश्वासू मित्राप्रमाणे अराजकतेशी हस्तांदोलन करील. जे अपरिहार्य आहे त्याचा कुरकुरत स्वीकार करावयाचा किंवा अर्धवट अंतःकरणाने सेवा अथवा संघर्ष करावयाचा हे राष्ट्रवाद्याच्या मनःस्थितीत बसतच नाही. जर हा जहालवाद आणि अत्याग्रहीवाद असेल तर तो जहाल आणि अत्याग्रही आहे

पण त्यांच्या स्वतःसाठी नव्हे, अराजक आणि गोंधळ ह्यांच्यावरील अपप्रवृत्त प्रेमामुळे नव्हे, केवळ वेडेपणा आणि दारूण निराशा म्हणून नव्हे तर केवळ नैसर्गिक प्रेमाबद्दलच्या युक्तियुक्त निर्णयामुळेच आणि धैर्ययुक्त स्वीकारामुळेच. त्या प्रेमापोटीच दुर्घट शिखरावर पोहोचण्याची आकांक्षा बाळगणारा माणूस उभ्या चढणीचे खडक चढून जातो आणि अतिशय कष्टमय ठिकाणी आपल्या जीवाची आणि अवयवांची बाजी लावतो. कारण ही नियतीच आहे की जी माणसे स्वतंत्र देशात स्वतंत्र माणसे जगू इच्छितात त्यानी आपले आणि आपल्या मुलांचे रक्त ह्यांची स्वातंत्र्याची जकात म्हणून देण्यास नकार देऊ नये आणि ह्याहीपेक्षा जे राष्ट्र गुलामगिरीतून स्वतंत्र राष्ट्र म्हणून जगू इच्छिते त्यानेतर आपल्या महिलांचे अश्रू आणि आपल्या मुलांचे देह ह्याचे खत घालून जमिनीची मशागत करण्यात सर्वथा सिद्धच असले पाहिजे. राष्ट्रवादी आपण दैवाकडून काय मागतो ह्याची जाणीव ठेवून असतो आणि त्याच्या बदल्यात दैव काय किंमत मागेल ह्याची पण त्याला जाणीव असते. हे पूर्णतः जाणत असूनहि तो राष्ट्राला आपल्याबरोबर मृत्यूछायेच्या दरीमध्ये, जी अंधार, धुके आणि वादळ ह्यामुळे काळीकुट्ट बनली आहे, जी विचित्र राक्षसांमुळे आणि पाणथळ, अग्नि आणि पूर ह्यामुळे घनदाट आणि असंस्कृत बनली तेथे घेऊन जातो. त्याला सर्व भीती आणि दुःखे ह्यांचे काहीच वाटत नाही कारण त्या दरीच्या पलिकडे ब्युल्हाचे डोंगर आहेत अणि त्या डोंगरावरच त्याचे राष्ट्र चिरंतन आयुष्याचा आनंद उपभोगणार आहे. दूरच्या भटकन्तीच्या वाळवंटामधून निवडक लोकाचे नेतृत्व करायला तो तयार असतो. त्याला हे ठाऊक असते की यातनांच्या कटुतेमुळे ते कित्येकदा कुरकुर करतील आणि त्याच्याविरुद्ध बंड करतील, किंबहुना ह्या सगळ्या दुःखांचा जनक हाच आहे म्हणून हात उचलून धोंडे मारून ते त्याचा जीवहि घेतील तरीपण त्याला हे निश्चित ठाऊक असते की पलिकडच्या बाजूला दूध आणि मध ह्यानी भरून वाहणारी अभिवांछित भूमी आहे आणि दैवी वाणीने त्याला हे पण सांगितले आहे की जे प्रामाणिक आहेत ते तेथे पोहोचतील आणि स्वामी होतील. जर त्याने अराजकतेचा स्वीकार केला तर तो चांगल्या शासनाचा मार्ग आहे, अव्यवस्था आणि हिंसा ह्यांपासून तो माघार घेत नाही कारण त्याला हे ठाऊक आहे की अव्यवस्थेशिवाय संरक्षण नाही आणि संघर्षाशिवाय शांती नाही, अन्यथा विनाशाचे संरक्षण आणि मृत्यूची शांतता. जर त्याला मानवी कायद्याचा अवमान करावा लागलाच तर तो विवेकबुद्धीचे आदेश आणि परमेश्वरी कायदा पाळण्यासाठीच.

## २३. सद्यःस्थिती *

१९-१-१९०८

**मुंबई येथील महाजनवाडीत १९ जानेवारी, १९०८ रोजी सद्यःस्थितीचे विवेचन करताना श्रीअरविंद सांगतात, राष्ट्रवाद म्हणजे केवळ राजकीय कार्यक्रम नव्हे. राष्ट्रवाद हा ईश्वरदत्त धर्म आहे. जर तुम्ही राष्ट्रवादाचा धर्म म्हणून स्वीकार केला तर तुम्हाला उमजेल की तुम्ही जे काही करीत आहात तो केवळ राजकीय उठाव नाही तर तुम्हाला परमेश्वरी कार्य करण्यासाठी आवाहन करण्यात येत आहे.**

माझ्या देशबंधूनो, आज येथे अध्यक्ष नाहीत असे श्री. रानडे म्हणाले, परंतु प्रत्यक्ष परेश्वरच आपला अध्यक्ष आहे. मी ते विधान अत्यादरपूर्वक स्वीकारतो आणि आपणासमोर भाषण देण्यापूर्वी त्या परमेश्वराला मला स्फूर्ती देण्याबद्दल याचना करतो. " सद्यःस्थितीतील गरजा " ह्या विषयावर मी बोलावे असे मला सांगण्यात आले आहे. सद्यःस्थिती काय आहे ? आज देशातील परिस्थिती काय आहे ? मी इकडे येत होतो तेव्हा हे वृत्तपत्र (वन्देमातरम्‌चा अंक दाखवून) माझ्या हाती दिले गेले. त्याचे मुखपृष्ठ पाहता त्याच्यावरील दोन वृत्ते माझ्या अवलोकनात आली. " युगांतर खटला, निकाल जाहीर, मुद्रकाला दोषी ठरवून दोन वर्षाची सक्त मजुरीची शिक्षा " आणि दुसरे वृत्त, " दुसऱ्या वृत्तपत्रावर खटला, नवशक्ती कार्यालयावर धडक देऊन त्याचा शोध घेतला. मुद्रकाची दहा हजार रुपयांच्या जामिनावर सुटका ". ही देशाची आजची स्थिती आहे. मी काय म्हणतो हे आपल्या लक्षात आले काय ? बंगालमधून आपणांकडे आलेला आणि भारतात आज रूढ झालेला राष्ट्रवाद नावाचा एक पंथ आहे. जेव्हा आपण आपणाला राष्ट्रवादी म्हणविता तेव्हा आपण हा पंथ स्वीकारलाच आहे. ह्याचा अर्थ काय हे अद्याप तरी आपणास उमजले आहे काय ? आपण जे हाती घेतले आहे ते काय हे आपणास उमजले आहे काय ? की एका श्रेष्ठ बौद्धिक धारणेच्या अभिमानाने केवळ आपण त्याचा स्वीकार केला आहे ? तुम्ही स्वतःला राष्ट्रवादी म्हणवता. राष्ट्रवाद म्हणजे काय ? राष्ट्रवाद म्हणजे केवळ राजकीय कार्यक्रम नव्हे. राष्ट्रवाद हा ईश्वरदत्त धर्म आहे. राष्ट्रवाद म्हणजे जो आपण आचरिला पाहिजे तो पंथ. जर एकादी व्यक्ती केवळ एक प्रकारच्या बौद्धिक अभिमानापोटी स्वतःला राष्ट्रवादी म्हणवीत असेल आणि स्वतःला अधीक देशभक्त समजत असेल, आपण जे आपणाला राष्ट्रवादी म्हणवीत नाहीत त्यांच्यापेक्षा आम्ही काहीतरी वरिष्ठ आहेत असे समजत असेल तर कोणाहि व्यक्तीने आपणाला राष्ट्रवादी नाही म्हटले तरी चालेल. जर आपण राष्ट्रवादी होणार असाल, जर आपण

---

* [ महाजनवाडी, मुंबई येथे दिनांक १९ जानेवारी १९०८ (रविवार) रोजी प्रचंड जनसमुदायापुढे मुंबई नॅशनल युनियनच्या वतीने दिलेले व्याख्यान ].

राष्ट्रवादी धर्माचा स्वीकार करणार असाल तर तो तुम्हाला धार्मिक भावनेनेच आचरावा लागेल. आपण परमेश्वराच्या हातातील एक साधन आहोत, ह्याचे आपणाला स्मरण असले पाहिजे. बंगालमध्ये जे घडले ते काय आहे ? आपण स्वतःला राष्ट्रवादी म्हणविता पण जेव्हा हे आपल्या अंगाशी येईल तेव्हा तुम्ही काय कराल ? बंगालमध्ये हा प्रकार प्रतिदिन घडत आहे. कारण बंगालच्या लोकांपुढे राष्ट्रवाद हा धर्म म्हणून पुढे आला आणि लोकानी त्याचा धर्म म्हणून स्वीकार केला आहे. पण ह्या धर्माच्या विरोधात असलेल्या शक्ती ह्या धर्माची शक्तिसमृद्धि चिरडू पहात आहेत. जेव्हा नवीन धर्माचा उपदेश होतो तेव्हा नेहमीच असे घडते. जेव्हा समाजामध्ये ईश्वर अवतार घेऊ पाहतो तेव्हा अशा शक्ती आपली सर्व शस्त्रे हातात सज्ज करून त्या धर्माला चिरडण्यासाठी सिद्ध होतात. बंगालमध्ये एक नवा धर्म दैवी आणि सात्त्विक धर्म उद्देशीला जात आहे आणि हा धर्म ते आपल्या अधिकारातील सर्व शस्त्रांनिशी चिरडू पहात आहेत. आम्ही बंगालमधील लोक कोणत्या सामर्थ्यावर जगू शकणार आहोत ? राष्ट्रवादाचा उच्छेद झाला नाही. राष्ट्रवादाचा उच्छेद होणार नाही. परमेश्वरी शक्तीने राष्ट्रवाद जिवंत आहे आणि त्याच्याविरुद्ध कोणतीही शस्त्रे आणली तरी तो चिरडला जाणार नाही. राष्ट्रवाद अमर आहे, राष्ट्रवाद मरू शकणार नाही; कारण ती मानवी कृती नाही; बंगालमध्ये प्रत्यक्ष परमेश्वरच कार्य करतो आहे. परमेश्वराला मारणे शक्य नाही; परमेश्वराला तुरुंगात पाठवता येत नाही. जेव्हा तुमच्यामध्ये अशा गोष्टी घडतील, ही गंभीरपणे मी म्हणतो, तुमच्यामध्ये अशा गोष्टी घडतील तेव्हा तुम्ही काय कराल ? बंगालमधील लोक जसे करतात तसे तुम्ही कराल काय ? ('' होय, होय '' अशा गर्जना) '' होय '' असे वरवर म्हणू नका. ही गंभीर बाब आहे आणि समजा परमेश्वराने तुम्हाला असा प्रश्न विचारला तर तुम्ही काय उत्तर द्याल ? तुमची खरोखर श्रद्धा आहे काय ? की ती एक केवळ राजकीय आकांक्षा आहे ? हा विस्तृत स्वार्थाचा एक प्रकार आहे काय ? किंवा ज्याप्रमाणे तुम्ही दडपले जात आहांत त्याप्रमाणे इतराना दडपण्यासाठी तुम्ही स्वतंत्र होऊ इच्छिता ? एका उच्च उगमापासून आलेली ही राजकीय श्रद्धा आहे असे तुम्ही मानता काय ? तुमच्या अंतःकरणात परमेश्वराने जन्म घेतला आहे काय ? तुम्ही परमेश्वराची साधने आहात आणि तुमची शरीरे ही तुमची नाहीत ह्याचा साक्षात्कार तुम्हाला झाला आहे काय ? त्या सर्व शक्तिमान परमेश्वराच्या कार्यसिद्धीसाठी तुम्ही केवळ परमेश्वराची साधने आहात. तुम्हाला हे उमजले आहे काय ? जर तुम्हाला हे उमजले असेल तर आपण खरे राष्ट्रवादी आहात आणि तरच आपण ह्या राष्ट्राचा पुनरुद्धार करू शकाल. बंगालमध्ये काही जणाना हे स्पष्टपणे उमजले आहे, आणखी काहीजणाना ते अधीक स्पष्ट उमजले आहे; पण ते उमजले आहे आणि आपल्या देशाच्या ह्या भागात राहणाऱ्या तुम्हाला पण हे उमजले पाहिजे. तेव्हाच आपल्या कामाला शुभाशिष प्राप्त होतील आणि हे राष्ट्र पुन्हा उत्थापित होईल आणि त्याच्या आध्यात्मिक उत्कर्षाच्या काळात हे राष्ट्र जसे होते तसे ते पुन्हा होईल. प्रकाशाचे रक्षण करण्यासाठी तुम्ही परमेश्वराची साधने आहात, भारताचे चैतन्य कायमचे लुप्त होण्यापासून आणि लज्जास्पद स्थितीपासून रक्षण होण्यासाठी तुम्ही साधने

आहात. बंगालमध्ये जे घडले ते मी तुम्हाला सांगतो, बंगाल म्हणजे काय असावयाचे ते तुम्ही जाणता; राष्ट्रामध्ये बंगाली ही कुत्सितपणाची संज्ञा होती हे पण तुम्ही जाणता; लोक जेव्हा बंगालबद्दल बोलत तेव्हा त्यांच्या मनात काय भावना होत्या ? ती आदराची भावना होती काय ? ती प्रशंसेची भावना होती काय ? दुसऱ्या देशातील लोक बंगाली माणासाविषयी काय बोलत असत हे तुम्हाला पूर्ण ठाऊक आहे. तुम्ही स्वतः बंगाली माणसाविषयी काय बोलत असाल हे पण तुम्हाला पक्के माहीत आहे. तोच विचार आज कायम आहे काय ? तुम्हाला जर कोणी सांगितले असते की बंगाल आज भारताचा तारणहार म्हणून पुढे सरसावला आहे तर तुमच्यापैकी किती जणानी त्यावर विश्वास ठेवला असता ? तुम्ही म्हणाला असता; '' ते (शक्य) नाही. भारताचा तारणहार महाराष्ट्र असेल, किंवा पंजाब असेल, पण तो बंगाल असणे शक्यच नाही. ही कल्पनाच खुळचट आहे. '' मग काय झाले आहे तर ? हे परिवर्तन कशामुळे झाले ? पूर्वीपेक्षा बंगाली माणूस निराळा कशामुळे झाला ? बंगालमध्ये एक गोष्ट घडली आहे आणि ती म्हणजे बंगाल विश्वास ठेवायला शिकला आहे. युरोपियन सुधारणेची आणि पश्चिमेकडून आलेल्या केवळ शुद्ध बुद्धिवादाच्या शिकवणुकीची दारू एकवेळ बंगालीत होती. बुद्धीच्या अपरिपक्व साधनाद्वारे तो सर्व वस्तू पाहू लागला, सर्व वस्तूंबद्दल निर्णय घेऊ लागला. जेव्हा असे घडले तेव्हा बंगाल नास्तिक बनला, बंगाल संशयवाद्यांची आणि सर्वतुच्छवाद्यांची भूमी बनला. बंगाली माणसाने ज्यावर विश्वास ठेवला–जर त्याने विश्वास ठेवलाच–पुष्कळ विश्वासच ठेवीत नाहीत–पण जर यदा कदाचित विश्वास ठेवला तर एक गोष्ट मात्र निश्चित की बंगाली माणसाने जसा विश्वास ठेवला तसा तो जगला. जर तो ब्राह्मो समाजाचा असेल किंवा तो समाज सुधारक असेल, ज्यावर त्याने विश्वास ठेवला ते सत्य असेल वा नसेल, पण जर त्याने विश्वास ठेवला तर त्या विश्वासानुरूप जीवन जगला. जर मातृभूमीच्या मुक्तीसाठी एकादी गोष्ट आवश्यक आहे अशी त्याची श्रद्धा बसली, तर एकादी गोष्ट सत्य आहे आणि ती केली पाहिजे अशी त्याची श्रद्धा बसली की तिच्याबद्दल विचार करण्यास तो थांबत नाही. आपण श्रद्धा ठेवलेले सत्य केवळ आदर्श आहे काय ह्या बुद्धिवादाच्या दृष्टीकोणातून विचार करण्यासाठी तो थांबत नाही, आपण जी श्रद्धा ठेवतो ती प्रामाणिकपणे आपण आचरणात आणू का ह्याचा तुलनात्मक विचार त्याने केला नाही किंवा आचरिल्याखेरीज आपण एकादी श्रद्धा केवळ बुद्धिवाद म्हणून स्वीकारू का, ह्याचा आपणावर काय परिणाम होईल ह्याचा विचार न करता तो सरळ पुढे गेला आणि आपल्या श्रद्धेप्रमाणे तो वागला. जर तो ब्राह्मो समाजाचा नसेल आणि एकादा सनातनी हिंदू असेल तर हिंदू शास्त्रात सांगितलेल्या गोष्टीवर जर त्याची खरी श्रद्धा असेल तर एकाद्या आप्तेष्टाच्या दुबळेपणामुळे समाजाला भ्रष्ट करण्याऐवजी त्याला आपल्यापासून दूर करील. ज्या गोष्टीवर त्याची आत्यंतिक निष्ठा असेल, अशा गोष्टीपासून आपणावर काय परिणाम होईल ह्याची तमा न बाळगता, ती प्रत्यक्षात उतरविण्यात त्याने कधीही कुचराई केली नाही. तर, बंगाली स्वभावातील त्याला तारणारा हा एक अंश होता. श्रद्धा ठेवणे ही बंगाली माणसासाठी सहज शक्ती आहे. श्रद्धा म्हणजे केवळ एक बौद्धिक प्रतिमा नव्हे, श्रद्धा

म्हणजे केवळ मनधरणी नव्हे तर श्रद्धा म्हणजे अंतःकरणातील ठेव आहे आणि जशी तुमची श्रद्धा तसे तुमचे आचरण असलेच पाहिजे कारण श्रद्धेचा उगम परमेश्वरापासून आहे. परमेश्वर हृदयात राहतो आणि तो हृदयाशी बोलतो. ह्यामुळे बंगाली माणसाचे रक्षण झाले. ह्या श्रद्धेच्या सामर्थ्यामुळेच भारताचे रक्षण करणारे लोक म्हणून आमची निवड झाली, ह्यामुळेच आम्ही अग्रभागी राहिलो. ह्या श्रद्धेमुळेच त्याना यातना भोगणे क्रमप्राप्त झाले. परमेश्वर आमच्याबरोबर आहे ह्या श्रद्धेमुळेच आम्ही येईल त्या परिस्थितीला सामोरे जातो आणि परमेश्वर आमच्यामध्ये निवास करतो. असे लोक राजकीयदृष्ट्या सामर्थ्यसंपन्न असलेच पाहिजेत असे नव्हे; ते शरीराने धष्टपुष्ट असण्याची पण आवश्यकता नाही, त्यांची बौद्धिक जाणीव उच्च प्रकाराची पण गरज नाही. ते लोक श्रद्धापूर्ण मात्र असलेच पाहिजेत. बंगालमध्ये धार्मिक सत्याचा पूर आला. काही माणसे जन्माला आली, ज्यांच्यावर सुशिक्षित जगताने, जर त्यांची श्रद्धा नसती, त्यांच्या अंतःकरणात त्यांचे डोळे उघडणारा परमेश्वर नसता तर त्यानी मान्यता दिली नसती, ज्यांचे जीवन आपल्या शिक्षणापेक्षा, आपल्याला पाश्चिमात्य शिक्षकाने प्रशंसा करायला शिकविले त्यापेक्षा अगदीच वेगळे होते, त्यांच्यापैकी एकाला, ज्याचा प्रभाव सर्वोच्च होता आणि बंगालच्या पुनर्निर्मितीसाठी त्याने सर्वाधिक कार्य केले, त्याला एक शब्दही वाचता येत नव्हता की लिहिता येत नव्हता. ह्या जगात पूर्णतः निरुपयोगी माणूस म्हणून ज्याची गणना करता येईल असा तो माणूस होता. पण त्याच्यामध्ये हे दैवी सामर्थ्य होते, त्याच्यामध्ये श्रद्धेपेक्षाहि अधीक होते, त्याला पमेश्वराचा साक्षात्कार झाला होता. ज्याला पुष्कळ माणसे एकाद्या वेड्या माणसाचे जीवन असे संबोधितील असे जीवन तो जगत होता, त्याला बौद्धिक प्रशिक्षण नव्हते, संस्कृतीची किंवा सुधारणेची एकही बाह्यात्कारी खूण त्याच्याजवळ नव्हती, तो दुसऱ्यानी दिलेल्या भिक्षेवर जगत होता, ज्याला सामान्यतः इंग्रजी शिकलेला भारतीय माणूस समाजाला निरुपयोगी व्यक्ती असे म्हणेल असा तो होता. तो म्हणेल, हा माणूस अज्ञानी आहे, त्याला काय समजते ? पश्चिमेने जेवढे शिकवावयाचे तेवढे सगळे मला मिळाले आहे. मला तो काय शिकवणार ? पण तो जे करीत होता ते परमेश्वराला ज्ञात होते. परमेश्वराने त्याला बंगालमध्ये पाठवले आणि कलकत्याच्या दक्षिणेश्वर मंदिरात त्याला स्थिरावले आणि पूर्वेकडून पश्चिमेकडून, उत्तरेकडून आणि दक्षिणेकडून सुशिक्षित माणसे जी विद्यापीठांची भूषणे होती आणि ज्यानी युरोपने जे शिकवायाचे ते सर्व आत्मसात केले होते अशी माणसे येऊन त्या संन्याशाच्या चरणावर प्रणाम करण्यासाठी आली. मुक्तीचे कार्य, भारताला उद्धारण्याचे कार्य सुरू झाले. आजची चळवळ जे खरोखरच पुढे नेत आहेत त्यांचा विचार करा. एक गोष्ट मी आपल्या निदर्शनास आणू इच्छितो की त्या साधूच्या स्पर्शाने प्रभावित झाले नाहीत असे फारच थोडे लोक आहेत. जर बिपिनचंद्रपाल ह्याना कोणी प्रभावित केले असे तुम्ही विचाराल तर तो एक साधू होता. बंगालचे धुरीणत्व करणाऱ्यामध्ये ज्या वृत्तपत्रावर खटला भरण्यात आलेला आहे त्या वृत्तपत्राचे संस्थापक आहेत. त्याचे नाव तुम्हाला येथे समजणार नाही, पण ते बंगालमध्ये सर्व प्रसिद्ध आहेत. ही चळवळ पुढे नेण्यासाठी त्यानी पुष्कळ कार्य केले आहे. तो माणूस

एका साधूचे जीवन जगत आहे. आणि जेथून केवळ स्फूर्ती आणि शक्ती मिळते अशा स्रोतापासून त्यानी स्फूर्ती आणि शक्ती प्राप्त केली आहे. दुसऱ्या एका प्रसंगी मी आपणाला राष्ट्रीय शिक्षणाबद्दल बोललो आणि ज्यानी ह्या कार्यासाठी आपले जीवन अर्पिले आहे, ज्याने कलकत्यामध्ये राष्ट्रीय महाविद्यालय खऱ्या अर्थाने संघटित केले तो पण एका संन्याशाचाच शिष्य आहे; तो ह्या जगात जिवंत असला तरी एका संन्याशाचेच जीवन जगतो आणि बंगालमधील तरुण कार्यकर्ते पाहिलेत, जे देवाचे कार्य पुढे नेण्यासाठी अग्रेसर झाले आहेत तर तुम्हाला काय आढळेल ? त्यांची शक्ती काय आहे ? त्यांच्या मार्गात येणारे अडथळे सहन करण्यासाठी त्याना भीति दाखविण्याच्या जाचाला प्रतिकार करण्यासाठी त्याना शक्ती कुठून येते ? मी त्याबद्दल आपणाशी एक शब्द बोलू इच्छितो. राष्ट्रवाद म्हणजे एक वेड आहे असे मानणारा एक विचार प्रवाह भारतात आहे. असा विचार करणारे लोक फार थोर बुद्धिवान आहेत, त्यानी प्रगाढ अध्ययन केले आहे. त्यानी अर्थशास्त्र अभ्यासिले आहे, त्यानी इतिहासाचे अध्ययन केले आहे, ते आदरास पात्र आहेत आणि अशा लोकांकडून मिळालेले नेतृत्व आणि मार्गदर्शन आपण सहजच स्वीकारू शकाल असे लोक म्हणतात की राष्ट्रवादामुळे देशाचा विध्वंस होईल. ज्याच्यामुळे ते असे म्हणतात ते काय आहे ? त्यांच्यापैकी पुष्कळसे देशभक्त आहेत, त्यांच्यापैकी अनेक अत्यंत कळकळीचे आणि प्रामाणिक आहेत, त्यांच्यापैकी पुष्कळाना देशाचे भले व्हावे अशी इच्छा आहे. मग त्यांच्यात कमी काय आहे ? त्यांच्यातली त्रुटी ही आहे की ते केवळ बुद्धियुक्त जीवन जगतात आणि ते जगाकडे केवळ बुद्धिवादाच्या दृष्टिकोनातून पाहतात. बुद्धी कसला विचार करते ? जर केवळ बुद्धीचा सल्ला घेतला तर तिने तुम्हाला काय सांगितलेच पाहिजे ? तुम्ही जे कार्य हाती घेतले आहे ते इतके विराट आहे, इतके प्रचंड आहे, पण त्यासाठी असणारी साधने अगदीच पामर आहेत, त्याला होणारा विरोध इतका शक्तिशाली, इतका सुसंघटीत, इतका शिस्तबध्द, विज्ञानाने दिलेल्या संपूर्ण शस्त्रसंभारानिशी इतका सुसज्ज आहे आणि आपणाला शक्य असणाऱ्या शक्ती आणि अधिकाराने इतका प्रभावी आहे, अशावेळी तुमचे हे विराट कार्य सिद्धीस नेण्यासाठी तुमच्याकडे काय साधने आहेत ? जर तुम्ही बुद्धिपूर्वक पहाल आणि ही माणसे बुद्धिवादी दृष्टिकोनातूनच पाहतात, तर ते निराशाजनक आहे. ज्यांच्याविरुद्ध खटले भरण्यात आले आहेत असे हे लोक इथे आहेत. ते प्रतिकार कसा करणार आहेत ? प्रतिकार करणे त्याना अशक्यच आहे. त्यानी सरळ तुरूंगातच गेले पाहिजे. हे सज्जन लोक असा युक्तिवाद करतात आणि तो सरळ त्यांच्या बुद्धितूनच आलेला असतो. ते विचारतात, " अशा रीतीने तुम्ही कुठपर्यंत प्रतिकार कराल ? हा अहिंसात्मक प्रतिकार कुठपर्यंत चालेल ? तुमचे सर्व नेते, तुमचे सर्व सामर्थ्यसंपन्न लोक तुरुंगात जातील, आणि तुम्हाला चिरडून टाकण्यात येईल, तुम्हीच नव्हे तर हे राष्ट्र संपूर्णतः चिरडून टाकले जाईल ", जर तुम्ही बुद्धिपूर्वक असा युक्तिवाद कराल तर तो सत्य आहे. जेव्हा तुम्ही त्या राष्ट्रवादाचे जीवन जगू पाहता तेव्हा त्या राष्ट्रवाद पंथाला विरोध करण्यासाठी कटिबद्ध असलेल्या लोकाना तुम्ही कोणत्या प्रभावी शस्त्राने प्रतिकार करणार आहात ते मी सांगू शकत नाही. मला आपणाला निक्षून सांगावे लागते

की तुम्हाला प्रभावी शस्त्राचा निःसंशयपणे उपयोग होईल पण जर तुम्ही प्रभावी शस्त्रावरच सर्वस्वी विसंबून राहणार असाल तर मात्र ते म्हणतात ते सत्य आहे. की राष्ट्रवाद हा मूर्खपणा आहे. अर्थात त्याला दुसरी बाजूपण आहे. जर तुम्ही म्हणत असाल की राष्ट्रवादाचा काही उपयोग नाही तर मी ह्यांच्या बुद्धीला पुन्हा विचारीन की मग कसला उपयोग होणार आहे? ते कशावर विसंबतात ? ते देशातील परकीय शक्तीवर विसंबून आहेत. जर तुम्ही परमेश्वरावर विसंबणार नसाल, जर तुम्ही भौतिक शक्तीपेक्षा अधीक बलवान अशा शक्तीवर विसंबणार नसाल तर मग दुसरे जे काय देतील त्यावरच तुम्हाला अवलंबून राहावे लागेल. भारताच्या मुक्तीसाठी परमेश्वर जे देऊ शकणार नाही ते ब्रिटीश सरकार देईल असा विश्वास असणारी माणसे आहेत. जी तुम्ही परमेश्वराकडून अपेक्षा करीत नाही ती ब्रिटीश सरकारकडून मिळण्याची अपेक्षा तुम्ही करू पाहात आहात. आपली अपेक्षा व्यर्थ आहे. त्यांचे हितसंबंध हे तुमचे नव्हेत, त्यांचे हितसंबंध तुमच्यापेक्षा फार भिन्न आहेत आणि त्यांचे हितसंबंध जे सांगतील तेच ते करतील. तुम्ही ह्यापेक्षा अन्य अपेक्षा करू शकत नाही. मग ह्यांची ही बुद्धिप्रक्रिया तुम्हाला कुठे घेऊन जात आहे ? जर प्रामाणिकपणे वापरली आणि अखेरपर्यंत चालू ठेवली तर ही बुद्धिप्रक्रिया तुम्हाला हताशेकडे घेऊन जाते. ती तुम्हाला मृत्यूप्रत नेते. तुम्हाला साक्ष करील असे तुमच्याकडे काहीही नाही, कारण तुमच्याकडे सध्या अशी प्रभावी शक्ती नाही जिचा तुमचा प्रतिपक्षी विध्वंस करू शकणार नाही. आणि तुमचा प्रतिपक्षी इतका मूर्ख नाही की तो तुम्हाला मदत करील किंवा तुम्हाला आवश्यक ती शक्ती अप्रतिहतपणे विकसित होण्यास तुम्हाला अनुमती देईल. तर मग निर्णय काय ? निर्णय इतकाच की ह्याबाबत करण्यासारखे काहीही नाही. निर्णय हाच की ह्या देशाचा सर्वनाश आहे. ह्या निर्णयाप्रत ही बुद्धिप्रक्रिया तुम्हाला घेऊन जाईल. ह्या विषयावर मी पुण्यात बोलत होतो तेव्हा मी माझा बंगालमधील अनुभव त्यांना सांगितला. स्वदेशी चळवळीचा जन्म होण्यापूर्वी तीनचार वर्षे जेव्हा मी पुनर्जीवनाची काय आशा आहे, लोकांची राजकीय परिस्थिती आणि खऱ्या चळवळीची काही शक्यता आहे काय हे पाहण्यासाठी गेलो असता लोकांची प्रचलीत मनोवृत्ती मला आढळली ती म्हणजे उदासीनता आणि हताशा. लोकांचा असा विश्वास होता की पुनर्जीवन बाहेरूनच येऊ शकेल, परके राष्ट्र येऊन आम्हाला हाताला धरून उठवील आणि आम्हाला आपण होऊन काहीही करावयाचे नाही. आता तो विश्वास संपूर्णतः भंग पावला आहे. त्यांना आता पूर्णतः उमगले आहे की अशा रीतीने बाहेरून मदत येणे शक्य नाही आणि त्याना कोणावर विसंबून चालावयाचे नाही. अन्य कुठून मदत मिळू शकेल ह्याबद्दल त्यांची बुद्धी त्याना काही सांगेना, परिणामी उदासीनता आणि हताशा सर्वत्र पसरली आणि स्वतःशी अत्यंत प्रामाणिक असणारे कार्यकर्ते म्हणू लागले की ह्या राष्ट्राला कुठूनही साह्य नाही आणि आपला सर्वनाश ओढवला आहे. खरे म्हणजे ही हताशा अवस्था म्हणजे बंगालसाठी जे सर्वोत्कृष्ट घडण्यासारखे होते तेच झाले, म्हणजे असे की बुद्धीने आपली पराकाष्ठा केली आणि बंगालमधील असहाय बुद्धीचे कार्य संपुष्टात आले. हताशेशिवाय बुद्धीला काहीही देता येत नाही म्हटल्यावर ती चुप बसली आणि जेव्हा

बुद्धी कार्यशून्य झाली तेव्हा बंगालचे हृदय उघडले आणि ते परमेश्वर जेव्हा बोलेल तेव्हा त्याचा शब्द झेलण्यासाठी सिद्ध झाले. आणि अखेर तो संदेश आला. बंगाल तो स्वीकारण्यास सिद्ध झाला आणि एका क्षणात त्याने तो आत्मसात केला आणि एका क्षणात संपूर्ण राष्ट्र उठले आणि संपूर्ण राष्ट्राने स्वतःला व्यक्तित्वापासून आणि हताशेपासून उठून उभे केले आणि ह्या अकस्मात झालेल्या उठावापासून आणि स्वप्नातून एकदम जागे झाल्यामुळेच बंगालला मुक्तीचा मार्ग मिळाला आणि त्याने भारताला गर्जून सांगितले की शाश्वत जीवन, अमृतत्व हीच त्याची नियती आहे आणि चिरकाल मानहानी हे नव्हे. बंगाल त्या श्रद्धेवर जगला. पृथ्वीवर उपलब्ध असलेल्या कोणत्याही सत्यापेक्षी ते सत्य महान आहे अशी त्याची धारणा झाली आणि त्याला हे परमेश्वराचे सत्य आहे हे पटले म्हणून तो त्यानुरूप जगला. परमेश्वराने स्फुरवलेल्या शक्तीशी झगडण्यासाठी जेव्हा अन्य शक्ती तोच उभ्या करतो तेव्हा जे घडावयाचे तेच घडले कारण दैवाने नियत केलेली शक्ती यातनांमधून वृद्धिंगत झाली पाहिजे हे अत्यावश्यक आहे. यातनांशिवाय, निःस्वार्थ वृत्तीशिवाय, आत्मत्यागाच्या नैतिक शक्तिशिवाय आपणामधील परमेश्वर वाढत नाही. श्रीकृष्णाला इतरांसाठी कार्य करण्याकरिता आवाहन केल्याखेरीज, जगातील आसुरी शक्ती त्याच्या विरुद्ध त्याच्या भोवती गोळा होऊन त्याला आपल्या शक्तीची जाणीव करून दिल्याखेरीज तो मानवी रूपात अवतरत नाही. विजयी आशेच्या पहिल्या उद्रेकानंतर जेव्हा सर्व भौतिक शक्ती राष्ट्रवादाविरुद्ध गोळा होऊन प्रत्यक्ष कार्यरत झाल्या तेव्हा बंगालमध्ये एक क्षण आला आणि त्याला प्रश्न विचारला, " तू यातना सहन करू शकतोस काय ? तू जिवंत राहू शकतोस काय ? " त्याना मिळालेल्या नवीन धर्माज्ञेच्या स्फूर्तीने त्या पिसाटपणाच्या क्षणी ते बंगाली तरुण पुढे सरसावले होते, नवीन मिळालेल्या शक्तीच्या आनंदात त्यांच्या आड येणाऱ्या अडथळ्यांना सहन करण्याची अपेक्षा करीत पुढेच सरसावत होते आणि त्याना सर्व यातना सहन करणे भाग पडले. त्याना यशाचा नव्हे तर हौतात्म्याचा मुकूट धारण करण्यास भाग पाडले गेले. आपणाला मिळालेल्या नवीन शक्तीचे खरे रहस्य त्याना शिकावे लागले, ती त्यांची स्वतःची शक्ती नव्हती तर त्यांच्याद्वारे कार्यरत असलेली शक्ती होती आणि त्या शक्तीची आपण साधने आहोत हे त्याना शिकावे लागले. तर मग आपण काय शिकलो ? ज्या सद्यःस्थितीवद्दल मी आपणाशी बोलणार तिची कोणती गरज आहे ? ती गरज म्हणजे एकादा राजकीय कार्यक्रम नव्हे. मी आपणाशी पुष्कळच विषयांबद्दल बोललो. स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण, लवाद आणि अशाच अनेक विषयांबद्दल मी लिहिले आहे. पण एका सत्याचा मी सतत पाठपुरावा केला आणि मजबरोबर कार्य करणाऱ्या अन्यानीही ज्याची सतत कास धरली ते एक सत्य म्हणजे जो काही उपदेश करीत होतो त्याचा पाया घालून ठेवणे. एकाद्या केवळ राजकीय कार्यक्रमाद्वारे, केवळ राष्ट्रीय शिक्षणाच्या माध्यमाने, किंवा फक्त स्वदेशीमुळे किंवा केवळ बहिष्काराने ह्या राष्ट्राचे रक्षण होणार नाही. स्वदेशीमुळे काही भौतिक सुबत्ता मात्र प्राप्त होईल, आणि तसे झाले की प्राप्त झालेल्या द्रव्याच्या झगमगाटामुळे जे तुम्ही साध्य करू इच्छिता ते डोळ्याआड होईल. त्या द्रव्याच्या आकर्षणामुळे आणि ते सुरक्षित ठेवण्याच्या

इच्छेमुळे हे घडेल. अन्य दास राष्ट्रांमध्येसुद्धा भौतिक विकास झाला रोमन साम्राज्याच्या आधिपत्याखाली भौतिक विकास झाला. औद्योगिक प्रगती झाली, पण भौतिक विकास आणि औद्योगिक प्रगती ह्यामुळे राष्ट्रात चैतन्य निर्माण झाले नाही. जेव्हा कसोटीचा क्षण आला तेव्हा असे आढळले की जी राष्ट्रे औद्योगिक विकास करून राहिली आणि ज्या राष्ट्रांनी भौतिक विकास केला होता ती राष्ट्रे जिवंतच नव्हती, नव्हे. ती राष्ट्रे मृत झाली होती आणि बाह्य स्पर्श झाल्याबरोबर कोसळून त्यांचे तुकडे तुकडे झाले. तेव्हा असे समजू नका कीं एकादा विशिष्ट कार्यक्रम किंवा एकादी विशिष्ट पद्धती ही आजच्या स्थितीतील गरज आहे. हे केवळ कार्य करण्याचे विभिन्न मार्ग आहेत, ते केवळ विशिष्ट ठोस आराखडे आहेत ज्यांवर राष्ट्रात परमेश्वरी शक्ती कार्यरत असते, परंतु ते स्वतः मात्र एक आवश्यक बाब अशा नसतात. मग आवश्यक अशी एक गोष्ट कोणती. जे कारावासात गेले आहेत त्या वृद्धाना काय साह्यभूत ठरले ? त्याना अशी कोणती शक्ती होती की ज्यामुळे ते सर्व प्रलोभनाविरुद्ध आणि सर्व धोक्याविरुद्ध तसेच अडचणीविरुद्ध उभे राहण्यास समर्थ ठरले ? त्या सर्वांमध्ये एकच आणि जाणती अथवा नेणती एकमेव सर्व प्रभावशाली कल्पना सर्वांतर्यामी होती आणि ती म्हणजे कोणीही हालवू शकणार नाही अशी धारणा की भारताला साह्य करणारी एक प्रचंड शक्ती आहे आाणि ते सर्व त्या शक्तीच्या आज्ञेनुसार कार्य करीत आहेत. पुष्कळदा आपण काय करीत आहोत हे पण त्याना कळत नाही. आपणाला कोण मार्गदर्शन करतो हे पण त्याना नेहमी समजत नाही आणि तो कुठे नेणार आहे हे पण उमगत नाही, पण त्याना अंतर्यामी ही खात्री असते, बुद्धीत नव्हे तर हृदयात, की ती शक्ती अमोघ आहे. ती सर्वशक्तिमती आहे, ती अमर आणि दुर्वाद आहे आणि ती आपले कार्य करणारच त्याना काहीहि करावयाचे नाही. त्याना फक्त त्या शक्तीचे आदेश पाळावयाचे आहेत. ती शक्ती त्याना जिथे घेऊन जाईल तिथे त्यानी जायचे. ती शक्ती जे शब्द सांगेल तेच त्यानी बोलायचे आणि ती जे सांगेल ते करावयाचे. जर कारागृहाकडे अंगुलीनिर्देश केला तर तुरुंगात जायचे. ती जे त्याना सहन करावयास लावील ते आनंदाने सहन करावयाचे. हे सहन करणे आपणाला कसे साह्यभूत होईल हे पण त्याना ठाऊक नाही; आणि व्यावहारिक दृष्टीची शहाणी माणसे त्याना सांगतात, हे सर्व मूर्खपणाचे आहे. असे केल्याने देशाची शक्ती ते वाया घालवतील, ते उत्तमोत्तम कार्यकर्तें फेकून देतील ते देशाच्या सामर्थ्याचे संरक्षण करीत नाहीत. पण आपणाला हे ठाऊक आहे की देशाचे सामर्थ्य हे बाहेरील सामर्थ्यांपेक्षा भिन्न आहे. फक्त एकच सामर्थ्य आहे आणि त्याला माझी आवश्यकता नाही, तुमची आवश्यकता नाही आणि त्याचीपण आवश्यकता नाही. मी स्वतः नव्हे अथवा अन्य कोणी नव्हे की बिपिनचंद्र पाल नव्हे अथवा जे कारावासात गेले आहेत ते कार्यकर्तेपण आवश्यक नाहीत. ह्यांपैकी कोणाचीही जरूरी नाही. हा सगळा टाकाऊ कचरा आहे, त्याना फेकून दिले तरी पण राष्ट्राची काहीही हानी होणार नाही. परमेश्वर सर्व काही करीत आहे. आपण काहीही करीत नाही. जेव्हा तो आपणाला यातना भोगण्याचा आदेश देतो तेव्हा आपण यातना भोगतो कारण त्या यातना दुसऱ्यांना सामर्थ्य देण्यासाठी आवश्यक असतात. तो जेव्हा आपणास दूर फेकतो तेव्हा

आपण तसे वागतो कारण इतउपर आपली आवश्यकता नसेल. जर परिस्थिती अधीकच बिघडली तर आपणास केवळ तुरुंगातच जावे लागेल असे नव्हे आपणाला जीवपण द्यावे लागतील, आणि जे अग्रभागी असल्यासारखे वाटतात किंवा जे सर्वस्वी अपरित्याज्य आहेत त्याना जर देहार्पण करावयास सांगितले तर आपण असे समजू की ते पण आवश्यकच आहे आणि परमेश्वराने हे कार्य आपणास करावयास सांगितले आहे आणि जे फेकले गेले आहेत त्यांच्याजागी परमेश्वर अनेक जण आणून उभे करणार आहे. तो स्वतः आपल्या पाठीशी आहे. तो स्वतःच कर्ता आहे आम्ही कार्य आहे. तो सर्व लोकांच्या हृदयात अमर आहे. तर मग बंगालमध्ये आमच्याजवळ श्रद्धा आहे. आमच्यामध्ये काहीजणात ती जाणीवपूर्वक असेल, काहीजण त्या कृतीला त्या नावाने संबोधित नसतील. पूर्वी म्हटल्याप्रमाणे आम्ही बुद्धियुक्तता विकसीत केली आहे, लक्षात घेण्याइतपत ती आम्ही विकसीत केली आहे आणि आम्ही तिच्या प्रभावाखाली आहोत. आपल्या देशवासियांच्या उपयोगी पडावे ह्या इच्छेने त्या महान श्रद्धेकडे आकर्षिले गेले आहोत, आपल्या देशवासियांसाठी आपण यातना भोगाव्या असे त्याना वाटते कारण परमेश्वर हा केवळ माझ्यातच इकडे आहे असे नव्हे तर तो तुम्हा सर्वांमध्ये आहे, मी प्रेम करतो ते परमेश्वरावर आणि त्या परमेश्वरासाठीच मी यातना भोगत आहेत. अशा रीतीने परमेश्वराच्या आदेशानुसार अनेक कार्य आचरिले आहे आणि माणसाना मार्गदर्शन कसे करावे तो जाणतो. जेव्हा ही त्याची इच्छा आहे तेव्हा तो (परमेश्वर) त्याला निश्चितच समुचित मार्गाला नेतो.

दुसरी गोष्ट म्हणजे श्रद्धेचे दुसरे नाव असलेला निःस्वार्थपणा. बंगालमधील ही चळवळ, ही राष्ट्रवादाची चळवळ ही कोणत्याही स्वार्थाने प्रेरित झालेली नाही, मुळात तरी ती तशी नाही. काही लोकांच्या मनात काहीही असू दे पण मुळात ही चळवळ काही राजकीय स्वार्थाने आम्ही चालवीत नाही. आम्ही आचरणात आणण्याचा प्रयत्न करीत आहोत असा तो एक धर्म आहे. त्या धर्मामुळे आमच्या राष्ट्रात आम्ही परमेश्वर साक्षात करणार आहोत, आमच्या सहदेशवासीयात परमेश्वर उभा करणार आहोत. आमच्या तीस कोटी लोकांमध्ये त्याला साक्षात्करणाचा आम्ही प्रयत्न करीत आहोत. काही जाणतेपणे, काही जण अजाणतेपणाने आम्ही तो धर्म आमच्या स्वार्थासाठी नव्हे तर इतरांचेही कार्य करावे आणि मरावे यासाठी आचरण्याचा प्रयत्न करीत आहोत. बंगालमधील एकाद्या तरूण कार्यकर्त्याला जेव्हा तुरुंगात जावे लागते, जेव्हा त्याला यातना सहन कराव्या लागतात तेव्हा त्याला त्याबद्दल वेदना होत नाहीत. त्या यातनामुळे तो भयभीत होत नाही. तो आनंदाने सामोरा जातो. तो म्हणतो, '' माझा पवित्रीकरणाचा क्षण आला आहे. परमेश्वराच्या स्थंडिलावर स्वात्मार्पण करण्याचा क्षण आला म्हणून मी त्या परमेश्वराला धन्यवाद देतो आणि माझ्या देशबांधवांच्या कल्याणासाठी यातना भोगण्यासाठी माझी निवड केली त्याबद्दल मी आभार मानतो. माझ्या अत्यानंदाचा हा क्षण असून माझे जीवन कृतार्थ झाले आहे. '' हा आपल्या धर्माचा आणखी एक पैलू असून स्वतःच्या स्वतंत्र अस्तित्वाची कल्पना संपूर्णतः नाकारली आहे. ज्या तीस

कोटी लोकांमध्ये स्वतः परमेश्वर वास करीत आहे त्यांच्यामध्ये स्वतःचा उद्धार करणारा शाश्वत आत्मा शोधण्याचा तो प्रकार आहे.

श्रद्धा आणि निःस्वार्थपणा ह्यांचेच आणखी नामान्तर असणारी गोष्ट म्हणजे धैर्य. जेव्हा तुमचा परमेश्वरावर विश्वास आहे, जेव्हा परमेश्वर तुमचा मार्गदर्शक आहे अशी तुमची श्रद्धा आहे आणि परमेश्वरच सर्व काही करतो आणि तुम्ही काहीही करीत नाही तेव्हा घाबरायचे कशाला ? ती तुमची निष्ठा आहे तर तुम्ही भीणार कसे ? जेव्हा तुम्ही स्वतःला झोकून देता, स्वतःचे द्रव्य, स्वतःचे शरीर, स्वतःचे जीवन आणि तुम्हापाशी जे काही आहे ते इतरांसाठी अर्पण करता तेव्हा भ्यायचे कशासाठी ? तुम्ही भ्यावे असे आहेच काय ? तेथे कुणाचीही भीती नाही. ह्या जगातील न्यायमंडलापुढे जरी तुम्हाला निमंत्रित केले तरी तुम्ही धैर्याने तोंड देऊ शकता. कारण तुमच्या धर्माचा अर्थच असा की तुम्हापाशी धैर्य आहे. कारण जे काही आहे ते तुम्ही नाही, ते आंतरिक काही तरी आहे. ज्याला तलवार छेदू शकत नाही, ज्याला अग्नी जाळू शकत नाही, ज्याला पाणी बुडवू शकत नाही असे तुमच्या अंतरात असलेले अमर, अजात आणि अक्षय अशाला ही न्यायमंडळे, जगातील ह्या सर्वशक्ती काय करु शकणार आहेत ? त्याला कारागृह बंदी करू शकत नाहीत, ते फास त्याचा अंत करू शकत नाहीत. ज्याची भीती बाळगावी असे काय आहे जेव्हा तुमच्या अंतर्यामी असलेल्या शक्तीची तुम्हाला जाणीव आहे. मग धैर्य ही आवश्यक बाब आहे. धैर्य हे निसर्गसिद्ध आहे आणि धैर्य अपरिहार्य आहे. कल्पना अशी की जर तुम्ही युरोपीय अर्थाने म्हणजे केवळ जडवादी दृष्टीने राष्ट्रवादी असाल. ह्याचा अर्थ असा की जर एका परकीय सत्तेच्या जागी दुसरी एकादी सत्ता प्रस्थापित करावयाची असेल तर ते केवळ जड परिवर्तन आहे. तो धर्म नव्हे, तुमच्या तीस कोटी देशवासीयांबद्दल तुम्हाला जे वाटते, त्यांचा जो उद्धार तुम्ही करू इच्छिता ते ते नव्हे, तुम्ही त्या सर्वांना जे मुक्त आणि सुखी करू इच्छिता ते ते नव्हे. ते ते नव्हे हे खरे, पण तुमचे राष्ट्र इतर राष्ट्रांपेक्षा भिन्न आहे, आणि हे (राज्यकर्ते) परकीय आहेत आणि त्यांच्या जागी तुम्ही राज्यकर्ते असावयास हवे ह्याची तुम्हाला जाणीव आहे. तुमच्या देशवासियांसाठी तुम्हाला स्वातंत्र्य नको तर परकीय सत्तेऐवजी तुमची सत्ता हवी अशी तुमची मागणी आहे. जर तुम्ही त्या भावनेने गेलात तर कसोटीची वेळ येईल तेव्हा काय होईल ? तुम्हाला धैर्य असेल काय ? तुम्ही त्याला तोंड देऊ शकाल काय ? तुमच्याजवळ आहे ती केवळ बौद्धिक धारणा आहे. तुमच्या बाह्य मनाने सुचवलेले एक कारण आहे. जेव्हा त्याची चाचणी घेतली जाईल तेव्हा तुमचे मन तुम्हाला काय सांगेल ? तुमची बुद्धी तुम्हाला काय म्हणेल ? ती तुम्हाला सांगेल; " देशासाठी काम करणे हे सर्व ठीक आहे. परंतु दरम्यान मी मात्र मरणार आहे, निदान मला त्रास तरी फारच होईल आणि जेव्हा ह्याचे फळ मिळेल तेव्हा त्याचा उपभोग घेण्यास मी नसेनच. एका स्वप्नासाठी केवळ मी ह्या यातना कशाला सहन करू ? " तुम्हाला तुमचे स्वतःचे घर आहे, तुमची ही मालमत्ता आहे आणि इतर अनेक गोष्टी आहेत की ज्यावर हल्ला होऊ शकेल आणि

म्हणून तुम्ही म्हणता, '' तो बस्ता माझ्यासाठी नाही. '' जर श्रद्धेचे आणि निःस्वार्थपणाचे दैवी सामर्थ्य तुमच्यापाशी नसेल तर तुम्ही अन्य आसक्तीपासून सुटू शकत नाही, ज्यापासून तुम्हाला यत्किंचितहि लोभ नाही अशा यातना केवळ परिवर्तन म्हणून का होईना सहन करणे तुम्हाला आवडणार नाही. अशा ठिकाणाहून धैर्य कसे प्राप्त होणार ? जेव्हा तुमच्याकडे उच्च कल्पना असेल, जेव्हा तुमच्याकडे काहीही नाही, तुम्ही कोणीही नाही आणि ह्या देशातील तीस कोटी लोक हे ह्या राष्ट्राचे देव आहे. जे अमुक इतक्या जमिनीने मोजता येणार नाही, इतक्या द्रव्याने नाही, इतक्या जीवाने नाही. तेव्हा तुम्हाला उमजेल की ते काहीतरी अमर आहे, ज्या कल्पनेसाठी तुम्ही कार्य करीत आहात ती काहीतरी अमर आहे आणि ती एक अमर शक्ती तुमच्या ठिकाणी कार्य करीत आहे. अन्य सर्व आसक्ती ह्या कायर आहेत. तुमच्या मनातून अन्य काही विचार लुप्त होतात आणि मी म्हटल्याप्रमाणे धैर्य रुजविण्याची गरज पडत नाही. तुमची शक्ती तुम्हाला पुढे पुढे नेत असते. मृत्यूच्या ऐनक्षणीसुद्धा जो जिवंत असतो तो तुम्हाला जीवन-मरणातून संरक्षण देतो, तुमच्या कटुतम यातनांच्या क्षणीसुद्धा तुम्हाला अमृतत्वाची जाणीव होते आणि तुम्ही अजिंक्य आहात हे तुम्हाला पटते.

आजच्या परिस्थितीला अत्यावश्यक तीन गोष्टी मी आपणाला सांगितल्या आहेत कारण मी म्हटले त्याप्रमाणे सद्यःस्थिती ही अशी आहे :– जे वस्तुतः अशक्य आहे असे मानले जाते ते कार्य तुम्ही हाती घेतले आहे, तुम्ही स्वतःला त्याला जोडून घेतले आहे. तुम्ही हाती घेतलेल्या कार्यामुळे ह्या जगात शक्य होईल तितका प्रबलतम शत्रूही तुमच्यासमोर उभा राहील. पुरातनकाली जेव्हा अवतार अवतीर्ण होत असत तेव्हा तेवढेच प्रबलतम दैत्य आणि असुर त्या अवताराशी झगडण्यास सिद्ध असत; हे नेहमी असेच असते. जेव्हा तुम्ही हा राष्ट्र-वादाचा धर्म स्वीकारता तेव्हा तुम्ही मनाशी खूणगाठ बांधून ठेवता की, ज्याना भौतिक सामर्थ्य प्रतिबंध करू शकणार नाही अशा प्रचंड सैन्याशी तुम्हाला मुकाबला करावा लागणार आहे. कसोटीचा क्षण दूर नाही, कसोटीचा क्षण तुम्हाला येऊन भिडला आहे. तुमच्या बौद्धिक धारणेचा काय उपयोग होणार आहे ? तुमच्या वंदेमातरम्च्या उद्घोषांचा काय उपयोग होणार आहे ? जेव्हा कसोटीचा क्षण येतो तेव्हा केवळ बाह्य देखाव्याने काय होणार आहे ? जे आज बंगालमध्ये यातना भोगत आहेत त्यांच्या ठिकाणी स्वतःला ठेवा आणि मग विचार करा, त्याच्यांजवळ सामर्थ्य आहे काय ? आणि जर ते तुमच्या वाट्याला आले तर तुमच्याजवळ सामोरे जाण्यासाठी सामर्थ्य आहे काय ? कोणत्या सामर्थ्याने तुम्ही सामोरे जाल ? तुम्ही अजिंक्य वृत्तीने कसे कार्य कराल ? तुम्ही त्याला कसे तोंड द्याल अणि जिवंत राहाल ? तुम्ही भौतिक शक्तीने त्याला तोंड देऊ शकणार नाही हे तुम्हाला दाखवून देण्याचा प्रयत्न केला. तुमच्याकडे अन्य सामर्थ्य आहे काय ? राष्ट्रवाद म्हणजे काय हे तुम्हाला उमजले काय ? तो एक धर्म तुम्ही स्वीकारीत आहात हे तुम्हाला उमजले काय ? जर तुम्हाला उमजले नसेल तर तुम्ही आपणाला राष्ट्रवादी कसे म्हणता आणि जेव्हा तुम्ही स्वतःला राष्ट्रवादी म्हणविता तेव्हा त्याप्रमाणे आचरण करण्याचा प्रयत्न करा.

तुमच्यामधील शक्तीची जाणीव घेण्याचा प्रयत्न करा, ती बाहेर आणण्याचा प्रयत्न करा म्हणजे तुम्हाला समजेल की, काय तुम्ही करता ते, तुमचे कर्तृत्व नसून तुमच्यातील सत्याचे ते कर्तृत्व आहे. प्रयत्न करा, म्हणजे तुमचा जीवनाचा प्रत्येक क्षण त्या उपस्थितीने उजाळून निघेल आणि तुमचा प्रत्येक विचार त्या एकमेव स्फूर्तिस्त्रोतामधून उत्स्फूर्तपणे प्रकटेल, म्हणजे तुमचा प्रत्येक धर्म आणि गुण तुमच्यामधील अमर शक्तीच्या सेवेसाठी सादर केला जाईल. त्यावेळी, मी जसे तुमच्यापैकी पुष्कळांकडून ऐकले आहे, तसे तुम्ही म्हणणार नाही की, लोक ह्या विचाराशी सहमत होण्यास आळशी आहेत, लोक काम करण्यास इतकी कसूर करतात, की तुमच्याजवळ सुयोग्य नेते नाहीत आणि तुमचे सर्व मोठे लोक काही निराळेच सांगतात आणि दाखविलेल्या मार्गाने तुम्हाला मार्गदर्शन करण्यासाठी त्यांपैकी कोणीही पुढे येण्यास तयार नाही. तुम्हाला कोणाविरुद्ध तक्रार करण्याची पाळीच येणार नाही कारण त्यावेळी तुम्हाला कोणा नेत्याची गरज भासणार नाही. नेता तुमच्या स्वतःमध्येच आहे. जर तुम्हाला त्याची ओळख पटली आणि त्याचा आवाज ऐकलात तर लोक तुमचे ऐकत नाही असे घडणारच नाही कारण लोकांच्या हृदयात एक आवाज असेल आणि तो त्याना ऐकायला भाग पाडील. तो आवाज आणि ती शक्ती तुमच्यातच आहे. तुमच्या अंतर्यामी तुम्हाला त्याची जाणीव झाली, तुम्ही त्याच्या उपस्थितीत जगू शकलात, जर तुम्ही स्वतःतेच बनलात तर तुमच्या एका शब्दाला प्रतिसाद दुसऱ्यांच्या हृदयात जागा होईल, तुम्ही जो पंथ शिकवीत आहात त्याचा प्रसार होत आहे आणि स्वीकृत होत आहे असे तुम्हाला आढळेल आणि त्याला फार वर्षे लागणार नाहीत, बंगालमध्ये त्याला फार अवधी लागला नाही, त्याला एक शतक अथवा पन्नास वर्षे लागली नाहीत. संपूर्ण राष्ट्राचे परिवर्तन होण्यास फक्त तीन वर्षे लागली, त्याला नवे चैतन्य आणि नवे हृदय देऊन सर्व भारतीय वंशांच्या अग्रभागी ठेविले. बंगालपासून राष्ट्रवादाचा आदर्श पुढे आला आहे. बंगालबद्दल किमान आदर समाजामध्ये होता आणि भारतीय समाजामध्ये त्याची त्याच्या दुबळेपणामुळे अत्यंत अवहेलना होत होती, तो तीन वर्षांत संपूर्णपणे बदलून गेला आहे कारण ज्याना त्यांच्यामध्ये परमेश्वराचे अस्तित्त्व पहा असे सांगण्यात आले होते त्यानी ते तसे स्वीकारले आणि ती शक्ती धारण करणे, तिचा अनुभव घेणे आणि त्याप्रमाणे जीवन व्यतीत करणे त्याना शक्य झाले आणि त्या शक्तीमध्येच जगून त्याना ती शक्ती बाहेर प्रकट करणे शक्य झाले. आणि त्यामुळे बंगालचा सर्व समाज तीन वर्षात बदलून गेला आहे आणि विस्मयपूर्वक तुम्हाला विचारणे भाग पडत आहे की, " बंगालमध्ये काय चालले आहे ? " कोणताही प्रतिबंध जिला थांबवू शकत नाही अशी चळवळ तुम्ही पाहता, कोणत्याही शक्ती ज्याला शोधू शकत नाही असा विकास आपण पाहता, राष्ट्रात एका नव्या अवताराचा जन्म झालेला तुम्ही पाहता, आणि जर त्या परमेश्वराला तुम्ही स्वतःमध्ये स्वीकारले असेल, तुम्हाला तुमच्यामध्ये जर ती शक्ती प्राप्त झाली असेल तर, उर्वरित भारतपण ह्याहीपेक्षा कमी अवधीत परमेश्वराने बदलला आहे असे तुम्हाला आढळेल. ह्याचे कारण ती शक्ती आधीच कार्यरत झाली आहे आणि स्वतःला उद्घोषित करीत आहे, आणि एकदा उद्घोषित केल्यानंतर ती आपले कार्य अधिकाधिक वेगाने पुढे चालू ठेवील. नियतीच्या

प्रगल्भ शक्तीने ती आपले कार्य चालूच ठेवील म्हणजे सर्व जग ते पाहील म्हणजे सर्व जग तिला उमजेल, त्यावेळी जो आता गोकुळात लपला आहे, जो आता जगातील गरीब आणि तिरस्कृत जनतेमध्ये राहतो आहे, जो वृंदावनाच्या गोपाळामध्ये निवास करीत आहे तो श्रीकृष्ण आपले देवत्व उद्घोषीत करील आणि हे राष्ट्र उत्थापित होईल, ह्या महान देशातील सर्व जनता उठून उभी राहील. ते लोक दैवी शक्तीने भारलेले असतील, सर्व शक्तिमानाच्या स्फूर्तीने भरलेले असतील आणि त्यांच्या प्रगतीपथावर जगातील कोणतीही शक्ती त्याना अडवू शकणार नाही किंवा कोणतेही भय अथवा अडथळा त्याना थांबवू शकणार नाही. कारण परमेश्वर येथे आहेच व त्याचे पवित्र कार्य आहे आणि आपण पार पाडले पाहिजे असे कार्य त्याच्याकडे आहे. ह्या महान आणि प्राचीन राष्ट्रासाठी त्याने एक कार्य नियत केलेच आहे आणि ते कार्य करण्यासाठी त्याने पुन्हा जन्म घेतला आहे. आणि तो तुमच्यामध्ये प्रकट होत आहे ते केवळ तुम्ही इतर राष्ट्रांप्रमाणे व्हावे म्हणून नव्हे, गरीब दुबळ्याना मानवी शक्तीच्या जोरावर आपल्या पायदळी तुडवण्यासाठी तुमचे उत्थापन नाही, तर तुमच्याद्वारे असे काही प्रकट व्हावे की ज्यामुळे संपूर्ण जगताचे रक्षण होईल, ते जे काही आहे ते पूर्व ऋषीना ज्ञात होते आणि त्यानी प्रकट केले होते, ते आज पुन्हा जाणण्याची आणि प्रकट करण्याची आवश्यकता आहे, ते सर्व जगाला प्रकट करणे आवश्यक आहे आणि त्याने स्वतःला प्रकट करावे म्हणून प्रथम तुम्ही स्वतःमध्ये त्याला उमजले पाहिजे, तुम्ही तुमच्या जीवनाला आकार दिला पाहिजे आणि तुम्ही ह्या महान राष्ट्राच्या जीवनाला आकार दिला पाहिजे की ज्यामुळे ते त्याला प्रकट करण्यास समर्थ होईल आणि नंतर तुमचे कार्य संपूर्ण होईल. आणि मग तुम्हाला उमजेल की तुम्ही जे काही करीत आहात तो केवळ राजकीय उठाव नाही, तो केवळ राजकीय बदल नाही, तर तुम्हाला परमेश्वरी कार्य करण्यासाठी आवाहन करण्यात येत आहे.

**वंदे मातरम् १९ जानेवारी, १९०८.**

● ● ●

## २४. खेडे आणि राष्ट्र . . . . . . . . .   ८-३-१९०८

**खेडे आणि राष्ट्र यामधील संबंध विशद करताना श्रीअरविंद म्हणतात खेडे हा राष्ट्राचा मूलाधार आहे. ग्रामीण जीवनाची पुनर्रचना करणे हे अत्यंत महत्वाचे व निकडीचे काम आहे. देशातील ग्रामीण जनतेने लोकशाहीनिष्ठ सर्वशक्तीमान राष्ट्रीय प्रवाहात आपले योगदान करण्याची आवश्यकता आहे.**

बंगालच्या हिंदूला राष्ट्रजीवनातील त्याचे वेगळे स्थान अबाधित राखावयाचे असेल, आणि आपल्या भूमिपासून, म्हणजे त्याच्या मूळ जीवनधारेपासून स्वतःला अलग पाडण्याने वाट्याला येणारे दुःख टाळावयाचे असेल तर, त्याला आपल्या भूमिकडे परत वळावे लागेल, असे काल आम्ही एक ठिकाणी लिहिले होते, परंतु या सर्वच प्रश्नाला दुसरीही तितकीच एक महत्वाची बाजू आहे. आपल्या पूर्वीच्या खेड्यांची रचना ही पूर्णपणे स्वावलंबी, आत्मकेंद्रित, स्वतंत्र व वेगळी होती. त्या प्रत्येक लहान लहान घटकांचे एक स्वतंत्र जीवन होते ; त्यांचे छोटे छोटे हितसंबंध तयार होत व त्यानुसार त्यांचे कामधंदे चालत. त्यांची तुलनाच करावयाची झाल्यास ग्रहमालिकेशी करता येईल. अंतराळात एखादा ग्रह त्याच्या पुरताच केवळ स्वतंत्रपणे आपणाला फिरताना दिसतो खरा ; पण वस्तुस्थिती तशी नसते, ते सारे ग्रह तारे एका अज्ञात व अतर्क्य शक्तीने एकमेकांशी अविभक्तपणे बांधलेले असतात. तसे ग्रामीण जीवन आपल्या परीने सुंदर होते ; रेखीव, परिपूर्ण व पोषक होते ; माणसाला भुरळ पाडणारे होते ; एखाद्या भावनोत्कट कवीला आव्हान देणारे होते. मानवी जीवनातील आत्यंतिक साधेपणा ; आर्थिक अपराधीकरणाचा व नैतिक अधःपातांचा अभाव ; शहरी जीवनातले ताणतणाव, गटबाजी, दंगली, गुन्हेगारी यासर्वांपासून मुक्तता–एवढीच जर कोणत्याही समाजरचनेची उद्दिष्टें असतील तर गत काळांतील जातिनिष्ठ ग्रामीण समाजरचना ही आदर्शच म्हटली पाहिजे. आज बहुतेक जण त्या ग्रामीण जीवनपद्धतीकडे वैषम्याच्या भावनेतून पहातात. विशेष म्हणजे ज्या ब्रिटीश सरकारने ती व्यवस्था मोडकळीस आणली त्या ब्रिटिश राजवटीलाही तिचे पुनरज्जीवन करावे असे वाटू लागले आहे. आर्यांच्या काळापासून गेल्या हजारो वर्षात घडलेल्या स्थित्यंतरातून आणि क्रांत्यांमधून ही व्यवस्था तग धरून राहिली हे खरं. इतकेच नव्हे तर त्यातील समाजकल्याणाच्या संकल्पना म्हणजे या राष्ट्राला त्यांची एक मौलिक देणगीच आहे, असेही अनेकांना वाटते. त्यामुळे राष्ट्र जिवंत राहिले हेही अमान्य करता येत नाही. त्याचप्रमाणे त्यातील काही सामाजिक दोषांनी व राजकीय अपप्रवृत्तींनी या देशाचे राष्ट्रीय जीवन कांहीं प्रमाणात भ्रष्ट केले असले, तरी त्या लहान लहान घटकांनी राष्ट्रीय जीवनाला एक प्रकारची बळकटी व शुचिता प्राप्त करून दिली

. हेही नाकारता येत नाही. त्यामुळे या देशाच्या विघटन प्रक्रियेला एक प्रकारे खीळ बसली हेही खरे. परंतु काही अंशी ही वस्तुस्थिती असली तरी बव्हंशाने राष्ट्रीय ऐक्याच्या मार्गातील तो एक अडसरच ठरला आहे.

आधुनिक अर्थाने कोणतेही विशाल राष्ट्र हे त्यातील लहान लहान घटकांच्या विलीनीकरणातूनच बनत असते. त्यांच्या स्वतंत्र अस्तित्वाचा संकोच होत असला तरी त्यामुळेच एक शक्तिशाली केंद्रसत्ता स्थापन होण्यास मदत होते. किंबहुना प्रत्येक राष्ट्राचा इतिहास त्या दोन प्रवृत्तीतील प्रदीर्घ संघर्षाचीच साक्ष देतो. ग्रीसच्या प्राचीन इतिहासातही तेच आढळते. तेथील लहान लहान खेड्यांच्या विसर्जनातूनच मोठी शहर- राज्ये अस्तित्वात आली. परंतु ही प्रक्रिया तिथेच थांबली. या शहर राज्यांनी आपले स्वयंपूर्ण व स्वतंत्र अस्तित्व एका मोठ्या राष्ट्रात विलिन करण्यास नकार दिला. त्यामुळे केंद्रसत्ताधिष्ठित ग्रीक राष्ट्र उभे राहूच शकले नाही. इटलीचा इतिहासही तेच सांगतो. जेव्हा रोमन जनतेने आपल्या शहरी स्वायत्ततेला मुरड घालण्याची मानसिक तयारी दाखविली तेंव्हाच कुठे युरोपात इटलीच्या रुपाने पहिले राष्ट्र अस्तित्वात येऊ शकले. मध्ययुगीन फ्रान्स व जर्मनीत तेथील नगरपालिकांनी आपली सत्ता अबाधित ठेवण्याचा प्रयत्न केला. तेव्हा तेथील अनियंत्रित राजसत्तेने त्यांचा विरोध मोडून काढला व त्या स्वतंत्र नगर- पालिका बरखास्त करून टाकल्या. त्यानंतरच कुठे त्या दोनही देशांत राष्ट्रीय ऐक्य घडू शकले. एखादे छोटे घटक राज्य, एखादा प्रांत, किंवा एखादी धर्मसत्ता किंवा सरंजामशाही आपले स्वतंत्र अस्तित्व निग्रहाने टिकवू पहाते, तेव्हा देशीक एकतेला व अखंडतेला ती बाधक ठरते. म्हणूनच अशा स्थानिक सत्ता समूळ नष्ट करणे किंवा त्यांना केंद्र सत्तेला जबाबदार राहण्यास भाग पाडणे, हे राष्ट्रीय ऐक्याच्या संवर्धनासाठी अत्यंत आवश्यक आहे. भारताचा प्राचीन इतिहास असे सांगतो, की आपण हे केले नाही. त्यामुळे आपले एकछत्री व एकात्म राष्ट्र निर्माण करण्यात आपण अयशस्वी ठरलो. त्याची कारणमिमांसा करतांना पाश्चात्य इतिहासकार त्यासाठी आपल्या सामाजिक विषमतेकडे व जातीव्यवस्थेकडे बोट दाखवितात. परंतु ते खरे नाही. आपल्या देशात आपण एकछत्री व केंद्रीभूत राज्य निर्माण करू शकलो नाही याचे एकच कारण आहे. ते म्हणजे आपण आपल्या जुन्या राजकीय विचार प्रणालीला अनुसरून ग्राम राज्यांना, सुभेदारांना व प्रांतिक संत्तांना स्वायत्तता उपभोगू दिली. त्यामुळे ही स्वयंपूर्ण खेडी अन्य राज्यात वा प्रातांत होणाऱ्या क्रांतीपासून किंवा युद्धांपासून सर्वस्वी अलिप्त राहिली. क्षत्रीय राजघराण्यांनी आपापसांत लढाया केल्या, वेळप्रसंगी एकमेकांत सोयरीक प्रस्थापित करून तह घडवून आणले. परंतु या सर्व घडामोडी त्या त्या मुलखापुरत्याच मर्यादित राहिल्या. त्या सर्वांचे जर एकत्रीकरण झाले असते तर राष्ट्रीय ऐक्य निर्माण होऊ शकले असते. परंतु ती घराणी स्वायत्त व सार्वभौम राहिली, अखेर कुरुक्षेत्रावर घनघोर भारतीय रणसंग्राम झाला. त्यात अनेक घराण्यांचा विनाश ओढावला. त्या सर्वनाशातून एका महान

एकात्म भारतीय राष्ट्राचा उदय होईल असे वाटले. परंतु स्थानिक व वांशिक भेदावर आधारलेली अनेक लहान लहान राज्ये पुन्हा अस्तित्वात आली. पुढे परकीय टोळ्यांचे आक्रमण या देशावर होण्याआधी त्या सर्वांना राजकीय पातळीवर एकत्र आणून एक सार्वभौम केंद्रसत्ता निर्माण करण्याचे प्रयत्नही झाले. परतु अनेक कारणांमुळे त्यात यश मिळू शकले नाही. या प्रक्रियेची एकात्मतेच्या दिशेने सुरू झालेली वाटचाल प्रांत या घटकापर्यंतच थांबली. त्याचे कारण खेड्यापाड्यातील आत्मसंतुष्ट जनता देशात अन्यत्र घडणाऱ्या उत्पातापासून व संघर्षापासून पूर्णपणे उदासीन राहीली. त्यामुळे राष्ट्रीय एकात्मतेची प्रक्रीया मूळ धरूच शकली नाही. तथापि इतर देशात तसे घडले नाही. स्थानिक जनतेला राज्यकर्त्यांच्या लढायात, विजयात, पराजयात नागरिक म्हणून किंवा सैनिक म्हणून सहभागी व्हावे लागले. हिंदुस्थानात मात्र वेगळी परिस्थिती राहिली. त्यावेळच्या सत्ताधीषांना संरक्षणाच्या मोबदल्यात ठराविक कर एकदा चुकता केल्यानंतर खेडी आपल्या अलग व स्वायत्त व्यवहारात मश्गुल रहात. इतरत्र घडणाऱ्या उलाथापालथींबद्दल त्यांना सोयरसुतक नसे. त्यामुळेच या देशात सुसंघटित राष्ट्र कधी निर्माण होउ शकले नाही. त्यादृष्टिने पहिला प्रयत्न झाला तो मराठ्यांच्या काळात. खेड्यातील ग्रामराज्ये ही त्यांच्या सत्तेचे बलस्थान होते हे खरे. परंतु राष्ट्रीय स्वातंत्र संग्रामात त्यांचा सक्रीय सहभाग मिळविण्यात त्यांनी यश मिळविले व राष्ट्रीय एकीकरणाच्या प्रक्रियेस हातभार लावला. वांशिक व प्रांतिक अलगतेच्या भावनांवर जर त्यानी विजय मिळविला असता तर त्यांनी एक चिरस्थायी साम्राज्य स्थापन केले असते. मग ब्रिटिशांच्या कुठल्याच वेलस्लीला त्याच्या राजकीय डावपेचांनी रणभूमीवर त्यांचा पराजय करणे शक्य झाले नसते.

इंग्लिश इतिहासकार आपणाला सांगतात की ब्रिटिशांनी हिंदुस्थान पादाक्रांत केला तो केवळ अनवधानाने. त्याचप्रमाणे ग्रामीण जनतेचे अलग व स्वयंनिष्ठ जीवनही त्यांनी उध्वस्त केले, तेही नजरचुकीने. परंतु या त्यांच्या प्रमादातून देशाचा एक प्रकारे फायदाच झाला. त्यामुळे राष्ट्रीय एकीकरणाच्या प्रक्रियेने वेग घेतला व त्याबद्दल पश्चाताप करण्याची त्यांच्यावर पाळी आली. स्वयंपूर्ण व स्वायत्त खेडे नष्ट झाली. निरनिराळे प्रांत एका सूत्रात बांधले गेले व ते एका शासनाखाली आले. आंतरराष्ट्रीय ऐक्याचे आपले स्वप्न प्रत्यक्षात आणण्याचे केवळ जनतेच्याच हातात आहे. परंतु दुर्दैवाची गोष्ट अशी की, आपण आपल्या नजरा पुन्हा खेडयांकडे वळवू पहात आहोत. आपले अस्तित्व टिकविण्यासाठी आपण पुन्हा स्वयंपूर्ण खेड्यांची व्यवस्था बळकट करण्यामागे लागलो आहोत. स्वायत्त खेडी ही देशाच्या ऐक्य भावनेत अडसर निर्माण करतात या त्रिकालाबाधित सत्याचा आपणाला विसर पडत चालल्याचे ते लक्षण आहे. आघाडीचे काही पत्रकार तर आता राजरोसपणे असे प्रतिपादन करु लागले आहेत की राष्ट्राच्या संघटनेपेक्षांही खेड्यांच्या स्वयंपूर्णतेनेच आपला उद्धारकाल लौकर जवळ येणार आहे. स्वयंपूर्ण व स्वावलंबी ग्रामरचना पुन्हा उभी करणे म्हणजेच स्वातंत्र्य असा विचित्र अर्थ ते लावू लागले आहेत. सार्वभौम सत्तेने कर आकारावेत, कायदे पास करावेत परंतु खेडी त्यानी आमच्यावर सोपवावीत. शिवाय ब्रिटिश सरकार एवढे

शक्तिशाली आहे की, त्याचा नाश करणे हे केवळ अशक्य आहे. वास्तविक परकीय ब्रिटिश सत्ता आपल्या देशातील प्रत्येक शक्ति केंद्र, मग ते कितीही क्षुल्लक असो, उध्वस्त करण्यामागे असते. त्यातही आश्चर्य असे की ब्रिटिश सत्तेकडे दुर्लक्ष करा, असे सांगणाऱ्यांना विरोध करणारे विद्वानही आपली ग्रामीण व्यवस्था टिकवून धरण्यासाठी आग्रह धरतात आणि वर असाही सल्ला देतात की, राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठीचा आपला लढा आपण सोडून द्यावा व प्रथम आपली खेडी मुक्त करावीत. परंतु हा सल्ला पाळता येण्यासारखा असला तरी तो अत्यंत घातक आहे. म्हणूनच तो तत्काळ धुडकावून लावावा. स्वातंत्र्यसंपादनाच्या आपल्या उच्चतम उद्दिष्टापासून यत्किंचितही विचलित करणारी कोणतीच गोष्ट आपण करू नये. सार्वभौम सत्ताकेंद्र निर्माण करण्याचे आपले ध्येय कांही परकीय किंवा जगावेगळे नाही. गेल्या हजार वर्षांचा आपला इतिहास म्हणजे तेच उदात्त स्वप्न साकार करण्यासाठी आपल्या पूर्वजांनी केलेला एक हेतुपूर्वक प्रवास आहे. जे कार्य भगवान श्रींकृष्णाने सुरू केले आणि अशोक, गुप्त राजांनी नेटाने पुढे चालविले ; जे अकबराने बहुतांशाने प्रत्यक्षात आणले, ज्यासाठीच शिवाजी महाराजांनी जीवनभर आटापिटा केला, व ज्यासाठी बाजिरावानेही समशेर गाजवली, ते कार्य अर्धवट सोडून कसे चालेल ? ग्रामीण जीवनाची पुनर्रचना करणे हे अत्यंत महत्वाचे व निकडीचे काम आहे हे तर खरेच ; परंतु ते अशा पद्धतीने संघटीत करावे की त्याचवेळी तेथील जनतेला अशी स्पष्ट जाणीव द्यावी, की खेडी म्हणजे एकात्म केंद्रीय राष्ट्रशक्तीचा तो केवळ अपूर्ण व त्यावर अवलंबित भाग आहे. ती सर्वस्वी स्वतंत्र असूच शकत नाहीत. त्यांचे अस्तित्व प्रथम जिल्ह्यावर, नंतर प्रांतावर व अखेर राष्ट्रावर व परस्पर सहकार्यावर अवलंबून आहे याची जाणीव ग्रामीण जनतेने सतत आपल्या मनाशी बाळगली पाहिजे. स्वयंपूर्ण खेड्यांचा काळ केंव्हाच मागे पडला आहे. त्याची पुनरावृत्ती कधीच होऊ देता कामा नये. देशांतील यच्चयावत ग्रामीण जनतेने लोकशाहीनिष्ठ, सर्वशक्तिमान राष्ट्रीय विचारधारा निर्माण करण्याच्या महान कार्यात आपले योगदान द्यावे ; अशी स्वातंत्र्याच्या या उषःकाली आपल्या राष्ट्राची आपणांकडून मागणी आहे. स्वावलंबन, स्वयंपूर्णता व स्वायत्ता या गत काळातील त्यांच्या ध्येयाचे रुपांतर त्याच राष्ट्रीय उद्दिष्टांत झाले पाहिजे. दुसऱ्या शब्दात संपूर्ण राष्ट्रीय स्वातंत्र्य हेच आज आपल्या सर्वांचे ध्येय असले पाहिजे.

**वंदे मातरम्, ८-३-१९०८**

● ● ●

## २५. आजच्या काळाची गरज . . . . . . . . . . १८-३-१९०८

**भारताच्या स्वातंत्र्यासाठी आपल्या सर्व शक्ती वेचणाऱ्या निःस्वार्थी व अध्यात्मवादी कार्यकर्त्यांची आज नितांत आवश्यकता आहे. स्वातंत्र्य मिळविण्यासाठी संघटना हवीच ; पण मिळालेल्या स्वातंत्र्याचे जतन करण्यासाठी इटालीच्या मॅझेनीप्रमाणे आपल्या देशवासीयांच्या अंतःकरणात श्रद्धेची आणि स्वातंत्र्याकांक्षेची ज्योत पेटविणे हे आपले पहिले काम आहे.**

सर्व मानवी प्रयत्नांचा व कार्यांचा उगम हा नेहमी श्रद्धेतूनच होतो. ही श्रद्धा जेव्हा डळमळीत होते तेव्हा आपण काहीच संपादन करु शकत नाही. निष्ठा कमकुवत झाली की आपल्या प्रयत्नांतही अपरिहार्यपणे शिथिलता येते. आपण वारंवार अपयशाचे धनी बनतो. परंतु तीच निष्ठा जर बळकट असेल तर आपली सर्व कामे एकदम सुकर होतात. कोणतेही महत्कार्य हे आंतरिक धैर्याशिवाय किंवा धाडसाखेरीज यशस्वी होऊ शकत नाही, अनेक वेळा माणसामध्ये वृथा अहंकार निर्माण झाल्याचे आपण पहातो. त्यामुळे त्याचा असा समज होतो की त्याच्याच प्रयत्नांचे फळ म्हणून अनुकूल परिस्थिती निर्माण झाली. आपण कोणत्याही कार्याच्या आरंभी काही प्रश्नांचा विचार करतो. आपणाजवळ पुरेशी साधने आहेत का ? आपल्याजवळ शक्ती किती आहे ? कार्यपूर्तीसाठी आवश्यक ते गुण आपणापाशी आहेत की नाहीत ? आमच्या मते या सगळ्या बाह्य गोष्टी झाल्या. वस्तुस्थिती अशी आहे की या जगात जे जे काही घडते ते केवळ परमेश्वरी इच्छेनेच घडते. म्हणून त्या जगनियंत्यावर अपरंपार श्रद्धा ठेवून जेव्हा आपण एखादे कार्य सुरू करतो, तेव्हां त्यातील यश हे अपरिहार्यच असते. अनेक वेळा आपण एखाद्या गोष्टीची आत्यंतिक उत्कंठतेने इच्छा धरतो व ती फलद्रुपही होते. अशावेळी ही इच्छा म्हणजे मुळात एक प्रकारची प्रार्थनाच असते, आणि मनःपूर्वक केलेल्या प्रार्थनेला परमेश्वराकडून नेहमीच चांगला प्रतिसाद मिळतो. परमेश्वराला उद्देशून कदाचित ती जाणिवपूर्वक केलेली नसेलही. कारण प्रार्थना ही एक प्रकारची सुप्त आकांक्षाच असते ; आणि नेहमीच ती शब्दरुप धारण करीलच असेही नाही. परंतु अशी आकांक्षाही पूर्णतः निस्वार्थी व निर्लेप असली पाहिजे. ती यशस्वी व्हायला पाहिजे असेल तर तिला क्षुल्लक लाभेच्छेचे किंवा क्षुद्र हेतूचा लवलेशही असता कामा नये. आपल्या आकांक्षेत जेव्हा स्वार्थ निगडित होतो तेव्हा, त्या प्रमाणात आपल्या प्रार्थनेतील बळही कमी होते व यशही दुरावते.

प्रत्येक माणसांतील आत्मतत्त्व (सेल्फ) हे दोन प्रकारचे असते, एक श्रेष्ठ व दुसरे कनिष्ठ. जो परमेश्वरावर नितांत श्रद्धा ठेवतो तो त्याच्यातील कनिष्ठतेवर विजय मिळवू शकतो. कारण परमेश्वर हाच सर्व सृष्टीचे एकमेव आत्मतत्त्व (सेल्फ) आहे. सर्व जगाचा व त्यातील चराचर गोष्टींचा तोच नियंता असतो. जेव्हा आपण आपल्यातील कनिष्ठ आत्मतत्त्वावर अधिक विसंबून रहातो, तेव्हा तेच एक आपला आधार बनते व आपले यशापयश हे आपल्या पूर्वजन्मातील संचितानुसार मिळालेल्या बौद्धिक व शारीरिक शक्तिवर अवलंबून रहाते. माणसातील श्रेष्ठ व कनिष्ठ आत्मतत्त्वाबद्दलचे नियम वेगवेगळे असतात. कनिष्ठ आत्मतत्त्व हे त्याच्या भूतकाळाच्या बंधनात जखडलेले असते. परंतु उच्च आत्मतत्त्वांचे तसे नसते. ते त्याच्या भूत, वर्तमान व भविष्यकाळातील कृतींवरही नियंत्रण ठेवते. कनिष्ठ प्रवृत्तीचा जन्म अहंकारात होतो. त्यामुळे सहाजिकच तिला अहंकाराच्या मर्यादा पडतात. पण त्यांच्यातील श्रेष्ठ तत्त्व हे अहंकाराच्या पलीकडे गेलेले असते. म्हणून त्याला अहंकार नियंत्रित करूच शकत नाही ; ते सर्व शक्तिमान असते. परंतु ते जेव्हा मानवी शरिराच्या माध्यमातून काम करते, तेव्हा त्याला काळ, अवकाश व कार्यकारणभाव या सर्वांच्या नियमावली त्याला लागू पडतात. म्हणून अशा कार्यात यश मिळण्यासाठी माणसाला योग्य वेळ येईपर्यंत, किंवा अनुकुल परिस्थती निर्माण होईपर्यंत, किंवा कारणांची पूर्तता होईपर्यंत वाट पहात बसावे लागते. मात्र अशी इच्छाशक्ती एकदा कार्यप्रवृत्त झाली की ती बिनचुकपणे आवश्यक ती परिस्थिती निर्माण करतेच. म्हणूनच तिला आपले काम करू देणे एवढेच आपल्या हाती शिल्लक रहाते.

वरील मनोवैज्ञानिक नियम हिंदुस्थानांतील आजच्या परिस्थतीला लावले तर काय दिसते! अनेक देशवासियांच्या मनांत स्वातंत्र्याबद्दलची उर्मी निर्माण झाली आहे हे खरं. परंतु त्यासाठी आवश्यक असलेले वातावरण तयार करण्यासाठी ते फक्त त्यांच्यातीलच शक्तीवरच विसंबून राहिले आणि तिथेच फसले. त्यापैकी कांहीनी आपले प्रयत्न अर्ध्यावरच सोडले, कांहीनी ते चालू ठेवले तर काहीनी दैवी शक्ती प्राप्त करण्यासाठी तपश्चर्या आरंभली. योग्य वेळ येतांच अशी शक्ती देशकार्यासाठी उपयोगांत आणता येईल असे त्यांना वाटले असावे. पुढे त्यांच्या या तपश्चर्येचे त्यांनाहि अनपेक्षित असलेले परिणाम दिसू लागले. ते जणू त्यांच्यातील निरिच्छ आकांक्षाचा तेजोमय रसच पृथ्वीवर बरसत होते. त्याचा परिणाम म्हणून परिस्थती झपाट्याने अनुकूल होऊं लागली. ती पाहून वर उल्लेखिल्या दुसऱ्या श्रेणीतील नेत्यांना असे वाटू लागले की त्यांच्याच प्रयत्नांचे ते फळ आहे. अर्थात् त्यामागच्या अदृश्य शक्तींचे त्यांना कधींच आकलन होऊ शकले नाही. त्यांच्या हेही ध्यानात आले नाही कीं त्यांच्या मित्रांनी पडद्यामागे राहून केलेल्या निर्लेप तपस्येचे ते फळ होते. ते केवळ त्यांच्या माध्यमांतून दृष्यमान होत होते इतके.

अनुकूलतेच्या दिशेने होत असलेली ही वाटचाल अधिक गतिमान करण्याची गरज आहे. परंतु त्यासाठी स्वांतत्र्यप्रिय व्यक्तींनी त्यांच्यातील दुय्यम श्रेणीच्या आत्मतत्त्वाच्या

आधारे काम करणे सोडून दिले पाहिजे. तरच त्यांतून निरिच्छ व प्रभावशाली इच्छा शक्ती निर्माण होईल. ही इच्छाशक्तीच या क्षेत्रांत काम करण्यासाठी नवनवे कार्यकर्ते मिळवू शकेल, त्याचा परिणाम म्हणून हां हां म्हणता सर्व देशच स्वातंत्र्याच्या दुर्दम्य आकांक्षेने भारला जाईल. त्यातूनच या संग्रामासाठी आवश्यक असलेली भौतिक साधन-संपदाही अतिशय वेगाने व पुरेशा प्रमाणांत सहज उपलब्ध होईल.

भारताच्या स्वातंत्र्यासाठी आपल्या सर्व शक्ती वेचणाऱ्या निस्वार्थी व अध्यात्मवादी कार्यकर्त्यांच्या जथ्याची आज अत्यंत आवश्यकता आहे. सर्व मानव जातीची सेवा करण्यासाठीच आम्हांला हे स्वातंत्र्य हवे आहे. आज आपल्या देशांत बऱ्याच संस्था स्थापन झाल्याचे आपण पहातो. त्यापैकी काही विशिष्ट उद्दिष्टासाठी काम करतात ; तर काही फुटकळ स्वरुपाची कामे करतांना आढळतात. परंतु आज प्रामुख्याने गरज आहे, ती ज्या संस्थांचे नेतृत्व श्रेष्ठ, अध्यात्मिक व्यक्तींच्या हातात आहे, अशा संस्थांची. त्यांत निरनिराळ्या क्षेत्रातील कामाचे शिक्षण देण्याची सोय उपलब्ध असावी. मग ते कार्य क्षेत्र स्वरक्षणाचे असो, भांडणतंटे मिटविण्याचे असो, ग्रामीण स्वच्छेतेचे वा दुष्काळ निवारणाचे असो. अशा विविध स्वरूपाच्या कार्यांची स्वराज्यासाठीं संघटना उभारण्यासाठी नितांत आवश्यकता आहे. स्वातंत्र्य संपादनासाठी संघटना हवीच ; पण मिळालेल्या स्वातंत्र्याचे जतन करण्यासाठीही ती हवी. एकवेळ स्वातंत्र्य संपादन करणे सोपे आहे ; परंतु ते टिकविणे महाकर्मकठीण आहे. राष्ट्रातील सर्व शक्ती एकवटून एकाचवेळी जर घणाघाती प्रहार केला तर स्वातंत्र्य सहज मिळविता येईल. परंतु ते चिरकाल टिकविण्यासाठी एक चिरंतन, सुसंघटित, एकात्मिक व शिस्तबद्ध अशी संघटना लागते. या दोन गोष्टी असतील तर बाकी कशाचीही आवश्यकता नाही. मग उरतात त्या फक्त तपशीलाच्या बाबी. इटलीच्या मॅझिनीप्रमाणे आपल्या देशवासियांच्या अंतःकरणात असीम श्रद्धेची व स्वातंत्र्याकांक्षेची ज्योत पेटविणे हे आपले पहिले काम आहे. त्याचबरोबर आपल्या जवळ पिडमॉटसारखा रणधुरंधर, महापराक्रमी, वीर पुरुष नसल्याकारणाने आपल्या देशातील सर्व विस्कळीत शक्ती एकत्र करून त्यांतून एकात्मिक व अजिंक्य असे संघटन उभारणे, हे आपल्या पुढील दुसरे महत्वाचे काम ठरते.

या दोन्ही उद्दिष्टांसाठी आम्ही वर उल्लेखिलेल्या एका व्यापक संस्थेची आज नितांत गरज आहे. त्यामार्फत देशात राष्ट्रीय इच्छाशक्तीचा एक पर्वतप्राय व अप्रतिहत लोट निर्माण केला पाहिजे. मग एखाद्या महानदीला आलेल्या महापुरांत प्रचंड वृक्ष उन्मळून पडून वाहू लागावेत, किंवा मोठमोठे शिलाखंड दूरवर फेकले जावेत, त्याप्रमाणे अखील समाजाच्या एकवटलेल्या उत्तुंग इच्छाशक्तीच्या महाप्रपातांत, भिती, स्वार्थांधता, आत्मविस्मृती, संभ्रमावस्था, निरुत्साह, तेजोभंग आदि सर्व दुःष्प्रवृत्ती वाहून जातील. १९०५ साला प्रमाणे राष्ट्रीय इर्षेची एक सागर लाट देशभर पसरेल. राष्ट्राची चित्‌शक्ती विलक्षण प्रभावी बनेल. उभ्या देशाची स्वातंत्र्यांकांक्षा अधिक प्रज्वलीत होईल. अटीतटीच्या अंतिम कृतीसाठी देश सज्ज होईल.

स्वराज्यासाठी संघटना हे ज्यांनी आपले जीवितकार्य व जीवननिष्ठाच बनविली आहे, अशा निःस्वार्थी व त्यागी कार्यकर्त्यांची एक फळीच आपणाला उभारावी लागेल. जे लोक आपला बहुतांश वेळ आपल्या उदरनिर्वाहासाठी वेचतात व उरला- सुरला वेळच फक्त देशकार्यासाठी देवू पहातात त्यांच्या हातून एवढे व्यापक काम होणे नाही. या कामाचा आवाका अमर्याद आहे. वेळ अगदीच थोडा आहे ; त्यामानाने कार्यकर्तेही अल्प आहेत. शिवाय या कार्यकर्त्यांना सामाजिक कार्याची तालीम द्यावी लागेल. खेड्यापाड्यातील जनतेला साक्षर करण्याचे, त्यांच्यातील तंटे बखेडे सामोपचाराच्या, लवाद पद्धतीने मिटविण्याचे, रोगराई व दुष्काळी परिस्थितीशी मुकाबला करण्याचे, स्वदेशीच्या प्रसारांचे व ग्रामीण जीवन आमुलाग्र सुधारण्याचे अशा विविध स्वरूपाच्या कामाचे तंत्र त्यांना शिकवावे लागेल. वर म्हटल्याप्रमाणे असे कार्यकर्ते स्वार्थनिरपेक्ष तर हवेतच ; परंतु केवळ नेतृत्व गाजविण्याची अवाजवी इर्षा बाळगणारेही ते नसावेत. ते आज्ञाधारक, उमेदीने व उत्साहाने मुसमुसलेले आणि राष्ट्रकार्यालाच आपली जीवननिष्ठा मानणारे असावेत. केंद्रीय संघटनेच्या मार्गदर्शनावर त्यांची अपार श्रद्धा हवी. कार्यकर्त्यांच्या नसा-नसांतून राष्ट्रीय अस्मितेचे व निऱ्हेतुक, ज्वलंत कार्यनिष्ठेचे उर्जस्वल दर्शन सर्वांना घडावे.

अशा तऱ्हेने राष्ट्र साधनेच्या महान कार्यासाठी विपुल साधने उपलब्ध होतील. त्यांचा प्रत्यक्षात उपयोग करण्यासाठी एक प्रचंड कार्यशाळाच उभारावी लागेल. नजीकच्या काळात परमेश्वर त्याकरिता एखाद्या द्रष्ट्याची नियुक्ती करील हे नक्की. पण त्यावेळी त्याला ओळखण्याची शक्ती व पात्रता आपणास लाभो म्हणजे झाले.

**वंदे मातरम्, १८-३-१९०८**

●●●

## २६. आध्यात्मिक राष्ट्रवाद . . . . . . . २८-३-१९०८

**आध्यात्मिक राष्ट्रवादाचे स्पष्टीकरण करताना श्रीअरविंद म्हणतात, आपण हिंदू आहोत. आमच्या रोमारोमात आध्यात्मिक प्रवृत्ती आढळतात. त्यामुळे संपूर्ण मानवजातीला आध्यात्मिक बनविणे हे आमचे उद्दिष्टच ठरते. श्रीरामकृष्ण परमहंसानी त्या आध्यात्मिक शक्तीची सर्वसाक्षी एकात्मिकता सर्वव्यापी व परिपूर्ण स्वरूपात अनुभविली होती. त्यांनी या देशाला व जगाला हिंदुत्वाचा चिरंतन संदेश दिला. आज या राष्ट्रीय चळवळीचा आरंभ जरी राजकीय क्षेत्रात होत असला तरी त्याची अखेर आध्यात्मिक पूर्ततेत होणार हे निश्चित.**

विभूतीपूजा ही माणसाची सहज प्रवृत्तीच आहे. मानवी संस्कृतीच्या इतिहासात ज्या व्यक्तींनी अद्वितीय कामगिरी बजावली, त्या पुढच्या पिढ्यांना नेहमीच स्फुर्तीदायक ठरल्या आहेत. आम्ही हिंदु आहोत. आमच्या रोमरोमात आध्यात्मिक प्रवृत्ती आढळतात त्यामुळे संपूर्ण मानव जातीला आध्यात्मिक बनवणे हे तर आमचे उद्दिष्टच ठरते. हे कार्य अन्य कोणत्याही राष्ट्राच्या आवाक्या बाहेरचे आहे, हेही आम्ही जाणतो. म्हणूनच ज्यांनी आध्यात्मिक क्षेत्रात प्रगती घडवून आणली, ते ते सर्व आम्हाला वंदनीय वाटत आलेले आहेत. संशयवादाखेरीज आध्यात्मिक प्रगती होउच शकत नाही. आंधळी भक्ती ही आध्यात्मिक विकासातील अगदी पहिली पायरी आहे. जोपर्यंत परमेश्वराशी आपले स्वतःचे अव्यक्त नाते जोडून त्याच्या अस्तित्वाची आपण प्रत्यक्ष अनुभूती घेत नाही, तोपर्यंत दुसऱ्याच्या केवळ व्यक्तव्यावर विश्वास ठेवायला आपण नेहमीच कचरतो. आधुनिक बुद्धिनिष्ठांप्रमाणेच प्राचीन काळातील आपले थोर ऋषीमुनी देखील आरंभी अश्रद्धच होते. वेदप्रणित धर्मासंबधींचे सर्व पूर्वगठित विचार त्यांनी बाजूला ठेवले व अज्ञेयवादांच्या जणु अथांग विवरांत स्वतःला झोकून दिले आणि चिरंतन सत्याचा तिथे शोध घ्यायला त्यांनी आरंभ केला. प्रथम प्रथम त्यांनी प्रत्येक गोष्टीबद्दल शंका घेतली. पंचेद्रियाबद्दल, स्वतःच्या अस्तित्वाबद्दल व अखेर ईश्वराच्या अस्तित्वाबद्दल त्यानी संशय प्रकट केला. प्रत्यक्ष गौतम बुद्धाच्या शिकवणुकीतही हा संशयवाद कळसाला पोचलेला आपण पहातो. त्यांनी कोणतीच गोष्ट मान्य केली नाही, काहीच गृहीत धरले नाही, किंवा काहीच आग्रहपूर्वक ठासून प्रतिपादन केले नाही. त्यांनी फक्त नियमनाचा आग्रह धरला. स्वतःच्या आत्म्याशी संपर्क साधा, असे ते नेहमी म्हणत. केवळ आत्मानुभतीतूनच पंचेंद्रिये व बुद्धि यांच्या व्यवहारातील गुंता तुम्ही

सोडवू शकाल अशी त्यांची शिकवण होती. माणसातील अश्रद्ध प्रवृत्ती जेव्हा शिगेला पोचतात, तेव्हाच आध्यात्माचा विचार पक्का होऊ लागतो व सृष्टी हे परमेश्वराचेच प्रकटरूप आहे, हे स्पष्ट होते. त्यानंतरच पंचेद्रियात गुरफटलेला माणूस मुक्त होतो व अनिर्वचनीय ब्रम्हानंदाची अवस्था अनुभविण्याची परमोच्च संधी त्याला प्राप्त होते. आध्यात्माची शिकवण व प्रत्यक्ष अनुभूती यांच्यात सुसंवाद साधण्यासाठी गौतम बुद्धानंतर गेल्या दोन हजार वर्षात या देशात जे प्रयत्न झाले त्यांच्या पूर्ततेचा शुभारंभ दक्षिणेश्वरांनी म्हणजेच श्री. रामकृष्ण परमहंसानी केला.

भारताच्या तपश्चर्येचा प्रदीर्घकाळ आता संपुष्टात येत असल्याची स्पष्ट चिन्हे दिसू लागली आहेत. नव्या जाणिवांचा प्रकाश पूर्वेकडील देशात पसरू लागला आहे. त्या प्रकाशाच्या आगमनाची पूर्वचिन्हे पूर्वक्षितिजावर उमटू लागली आहेत. आता थोड्याच वेळात सूर्योदय होईल आणि नव्या युगाची प्रसादचिन्हे दिसू लागतील. पण गंमत अशी की ज्या रामकृष्ण परमहंसानी या युगाचा श्रीगणेशा केला त्या युगप्रवर्तकाला देखील त्याचे यथातथ्य वर्णन करणे दुरापास्त आहे. हिंदु आध्यात्मिकतेची ही ऊर्जस्वल अभिव्यक्ती म्हणजे पूर्वेकडील राष्ट्रांच्या पुनरुत्थानाची नांदीच होय. आतापर्यंत मानवाने निरनिराळ्या तत्त्वज्ञानाचे, वेगवेगळ्या नीतिशास्त्रांचे प्रयोग करून केवळ भौतिक साधनाच्या आधारे, सर्वार्थाने परिपूर्ण व सुखी मानवी जीवनाचे अशक्यप्राय सुवर्ण युग या पृथ्वीवर निर्माण करण्याची स्वप्ने पाहिली. परंतु मानवी जीवनाच्या अंतिम साफल्याचे रहस्य उलगडण्यात तो यशस्वी झाला आहे काय? मुळीच नाही. केवळ समाजकारण किंवा राजकारण यापैकी कशानेही दु:ख. दारिद्र्य, संघर्ष व असमाधान या कशांतूनही ते माणसाची सुटका करुच शकलेले नाहीत. कारण ते सर्व प्रयत्न भौतिक वादाच्या आधारेच केले गेले. त्यामुळे ते यशस्वी होणे शक्यच नव्हते. अंतिम सत्यतत्त्वाचे ज्ञान फक्त पूर्वेकडेच आहे. त्यामुळे तेच पाश्चिमात्यांन या बाबतीत कांही धडे देऊ शकतील. गेली अनेक युगे आशीयांतील सिध्द पुरुषांनी आपल्या अंतरात्म्यांतील प्रकाशाचा शोध घेण्याचा प्रयत्न चालविला आहे. त्या दिव्य-ज्योतीच्या प्रकाशाचे ओझरते कां होईना, जेव्हां जेव्हां त्यापैकी एखाद्याला दर्शन झाले, तेव्हा तेव्हा एका नवीन धर्माचा जगात उदय झाला. उदाहरणार्थ बौध्दधर्म, कन्फ्युशियन धर्म, ख्रिश्चन धर्म व इस्लाम धर्म व त्यामधील पंथोपपंथ. आतापर्यंत भारत राष्ट्रच पारलौकिक अनुभूतीच्या सर्व प्रयोगांचे माहेरघर ठरले आहे. आत्मोन्नतीची ती एक भव्य प्रयोग शाळाच बनून गेली आहे. गतकाळातील असंख्य महान विभूतींनी इथेच जन्म घेतला, आत्म्याच्या चिरंतन तत्त्वाचा व अंतिम सत्यतत्त्वाचा शोध हाच त्यांनी आपल्या जीवनाचा एकमेव ध्यास ठरविला; आणि आपल्या प्रयोगांतून मिळवलेले ज्ञान भावी पिढ्यांनी पूर्णत्वाला नेण्यासाठी त्यांनी आपल्या शिष्यांच्या हवाली केले. इतरांना धर्म परिवर्तन करण्यास त्यांनी बळजबरी केली नाही किंवा गवसलेल्या सत्याचा डिंडिम पिटण्याचा आगाऊपणा त्यांनी कधी केला नाही. आतापर्यंतच्या ज्ञानांत त्यांनी आपल्या अनुभवांची भर घातली व जिथून ते आले होते त्याच अंतरात्म्यात ते विलीन होऊन गेले.

ह्या सर्व सिध्द पुरुषांच्या अनेक वर्षांच्या आत्मसंयमातून आध्यात्मिक शक्तीचा एक प्रचंड सांठा तयार होतो व त्यातूनच कांही महान विभूती या भूतलावर अवतार घेतात. ते स्वतः त्या चित् शक्तीचे जणू प्रतिस्वरूपच बनून गेल्यामुळे, निरतिशय व शब्दातीत सच्चिदानंद त्यांच्या ठिकाणी इतका ओतप्रोत भरून जातो की ते तो पृथ्वीवर जणू ओतू लागतात. अशावेळी दुसऱ्याचे धर्म परिवर्तन घडवून आणणाऱ्यांच्या फंदात ते पडत नाहीत. परंतु पूर्वजन्मींच्या तपस्येमुळे किंवा अंतःकरणाच्या आत्यंतिक विशुद्धतेमुळे ह्या जन्मांत जे अनुग्रहक्षम बनले आहेत, अशा थोर पुण्यवंतांनाच त्यांनी अनुभविलेल्या ब्रम्हानंदाची प्रत्यक्ष प्रचीती त्यायोगे ते देतात. अशा महान विभूतीपैकी श्री. रामकृष्ण परमहंस हे शेवटचे एकमेव महापुरुष होते. कारण बाकीच्यांनी परमेश्वराला साकारलेल्या किंवा मर्यादित स्वरूपातच केवळ अनुभविले होते. श्री. रामकृष्ण परमहंसानीच काय ती त्याची सर्वसाक्षी अमर्याद एकात्मिकता, सर्वव्यापी व परिपूर्ण स्वरूपात अनुभविली होती. त्यांच्यापूर्वी होऊन गेलेल्या असंख्य संतजनांचे या क्षेत्रातील अनुभवच जणू त्यांच्या ठिकाणी पुनर्निमित व एकत्रित झाले होते. त्यानी या देशाला व जगाला हिंदुत्वाचा चिरंतन व तेजस्वी संदेश दिला. त्यांच्या जन्मापासूनच जणू एका नव्या युगाला आरंभ झाला. सर्व जगाचा उद्धार करण्यासाठी त्यानी चंग बांधला. त्याचा परमतत्त्वाशी सुसंवाद घडवून आणून नव्या आध्यात्मिक युगाचा त्यांनी शुभारंभ केला. श्री. रामकृष्ण परमहंसांच्या जीवनात हिंदु धर्माचे जणू सारच एकवटले होते. ज्या कार्यात ख्रिश्चन धर्म अपयशी ठरला, ज्यासाठी इस्लाम धर्माने प्रयत्न केला परंतु तोही अपरिपक्वच ठरला, बौद्धधर्म काही मर्यादित लोकांपर्यंत व तोही फारच थोडा काळ पोचू शकला, त्या कार्याचा जगभर प्रसार करण्याची जबाबदारी हिंदुधर्मावर येऊन पडली आहे. तेच त्यांच्या पुनरुत्थानाचे प्रयोजन आहे. त्यासाठीच परमेश्वराने त्यात पुन्हा एकदा जीवनशक्ती ओतली आहे. त्याकरिताच भारताच्या मुक्ततेसाठी देशातील महान विभूती प्रयत्नांची पराकाष्ठा करीत आहेत. त्यासाठीच त्याच्या सुपूत्रांच्या मनोवृत्तीत क्रांतीकारक बदल घडून येत असल्याचे स्पष्ट दिसून येत आहे. आज या राष्ट्रीय चळवळीचा आरंभ राजकीय क्षेत्रात होत असला तरी, त्याची अखेर आध्यात्मिक पूर्ततेतच होणार हे निश्चित.

**वंदे मातरम्, १८-३-१९०८**

● ● ●

## २७. आईची मागणी . . . . . . . ११-४-१९०८

**स्वतंत्र भारत म्हणजे एखादा लाकडाचा किंवा दगडाचा तुकडा नाही की ज्यामधून राष्ट्रासारखे काही तरी कोरता येईल. परंतु ज्यांच्या हृदयात भारताबद्दलची सदिच्छा वाहत आहे त्यांच्यात ते राष्ट्र राहते आणि त्यातूनच ते घडवावे लागते. आईने आत्मार्पण ही एकच मागणी आपल्याकडे केली आहे. श्रीअरविंद सांगतात, ती विचारत आहे, ' माझ्यासाठी किती जिवंत राहतील ? माझ्यासाठी किती मरण पावतील ? ' आणि ती उत्तरासाठी खोळंबिली आहे.**

बंगालमध्ये आम्ही धर्माभिमानाची भावना संपूर्णतः नष्ट केली आहे आणि देशाभिमानाच्या, स्वार्थत्यागाच्या, देशबांधवांच्या कष्टाच्या आणि संपूर्ण देशात विलीन होण्याच्या माध्यमातून ती पुन्हा मिळविण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहोत. एकादे राष्ट्र जेव्हा आपल्या जीवनशक्तीचा स्त्रोत हरवण्याच्या मर्यादेवर असते तेव्हा ते भोवतालच्या पर्यावरणामधून जे मिळेल त्या पहिल्या माध्यमाच्या द्वारे प्राप्त करण्याचा प्रयत्न करते मग ते पर्यावरण अनुकूल असो वा प्रतिकूल असो. बंगाल नेहमीच भावनाप्रधान राहिला आहे आणि असे म्हटले जाते की भारताचा मेंदू हा भारताचे हृदय पण आहे. भावनिक शक्ती, श्रद्धा आणि उत्साह ह्यांच्या नाशाबरोबर भारताला मिळणाऱ्या सामर्थ्याचा स्त्रोत पण सुकून जातो. न्यायशास्त्राची भूमी ही बंगालच्या बौद्धिक विकासाच्या अत्युच्च शिखरावर उगवलेल्या एका रमणीय फुलाची चैतन्यदेवांची पण भूमी आहे आणि सर्वोच्च परिपूर्ण अभिव्यक्तीपण. जर बंगाल पुन्हा आपला उत्साह आणि स्वपरित्यागाची सीमा मिळवू पहात असेल तर ते पुन्हा नव्या पर्यावरणाने प्राप्त करून दिलेल्या माध्यमातूनच मिळवावे लागेल.

हे नवे पर्यावरण बंगालच्या जीवनशक्तीचे झरे सुकवण्यास कारणीभूत ठरले आहे ' त्याने बंगाली जनतेला जे काही महान ' उदात्त आणि स्फूर्तिदायक आहे त्या सर्वांबद्दल शपथपूर्वक अविश्वास दाखवून संशयवादी बनविले होते. नव्या पर्यावरणाचा परिणाम म्हणून लोकांच्या मनात हळूहळू विकसित होत असलेल्या राजकीय ऐक्याच्या कल्पनेमधून उत्साहवादी श्रद्धा आणि आकांक्षा ह्यांच्या जुन्या चैतन्याचे पुनःप्रापण होत आहे. ज्याने विष पुरवले होते त्यानेच उतारा पण दिला. जर बंगालला आपल्या सत्य अस्तित्वाचे संपूर्ण पुनःस्थापन करावयाचे असेल तर नव्या चळवळीचा उत्साह आणि आदर्शवाद जिवंत ठेवला पाहिजे. हे प्रथम कर्तव्य. चैतन्याला हरीबद्दल जी स्वपरित्यागाची संपूर्ण भावना जाणवत होती ती बंगालला मातेबद्दल जाणवली पाहिजे. तरच बंगाल स्वतःचे स्थान मिळवील आणि अनेक शतकांच्या सिद्धतेनंतर नियतीने जे कार्य करावयास लाविले आहे ते सिद्ध होईल.

ज़गातील सर्व महान धर्मांनी स्वपरित्याग हाच मुक्तीचा मार्ग असे विदित केले आहे आणि हाच नियम आध्यात्मिक मुक्तीसाठीच नव्हे तर समाजाच्या नियतीशी पण निगडीत आहे. केवळ स्वपरित्यागच मुक्ति प्रदान करील. जो जीवन घालवतो तोच ते राखून ठेवतो आणि व्यक्तिगत जीवन हा राष्ट्रीय जीवनासाठी एक यज्ञच आहे. जेव्हा ह्या कल्पनेच्या अत्युच्च शिखरापासून तो पार रसतळापर्यंत बंगाली माणूस उठेल तेव्हाच त्याच्यापासून अद्यापपर्यंत परास्त झालेल्या यशाचे रहस्य त्याला उमगेल. केवळ राष्ट्रभक्तीपर सदिच्छानी राष्ट्राला मुक्ती मिळत नसते आणि केवळ राष्ट्रभक्तीपर कामानी राष्ट्राची उभारणी होत नसते. राष्ट्रप्रासादाच्या प्रत्येक दगडाबरोबर एकेक जीवन समर्पण करावे लागते. स्वराज्याच्या गोष्टी स्वराज्य आणीत नाहीत, परंतु आपल्यापैकी प्रत्येकाचे स्वराज्य जीवनच स्वराज्याला खेचून आणील.

स्वर्गाचे रहस्य तुमच्या हृदयात आहे. स्वतंत्र भारत म्हणजे एकादा लाकडाचा किंवा दगडाचा तुकडा नाही की ज्यामधून राष्ट्रासारखे काही तरी कोरता येईल. परंतु ज्यांच्या हृदयात भारताबद्दलची सदिच्छा आहे त्यांच्यात ते राष्ट्र राहते आणि त्यामधून ते घडवावे लागते. राष्ट्र स्वतंत्र होण्यापूर्वी आपण आपल्या हृदयात प्रथम स्वतंत्र झाले पाहिजे. " मला बंदिवासात टाकू शकेल असे ब्रिटीश कारागृह नाही असे " तो महान उपाध्याय आपल्या मृत्यूपूर्वी उद्गारला होता आणि आपले वचन खरे करण्यासाठी तो मेला. पण त्याचे शब्द मातृभूमीला स्वतंत्र करण्याची आकांक्षा बाळगणाऱ्या आपणा सर्वांसाठी आहेत मग आपण जिवंत राहून अथवा आपल्या मरणाने आपण खरे करू.. जेव्हा सुपुत्रानी आपणा स्वतःमध्ये स्वतंत्र होण्याचे ठरविले आहे, तुरुंगात स्वतंत्र, जे जोखड ते फेकून देऊ इच्छितात त्या जोखडाखाली स्वतंत्र, जीवनात स्वतंत्र, मृत्यूत स्वतंत्र, जेव्हा उपाध्यायाच्या वचनांना लोकांच्या प्रत्यक्ष कृतीचे तेजस्वी भाष्य प्राप्त होईल तेव्हा शृंखला आपण होऊन गळून पडतील आणि बाह्य वातावरणाला आमच्या आतील जीवनाचा कायदा पाळावा लागेल.

मग आपण स्वराज्य कसे जगायचे ? स्वची भावना त्यागून त्या ठिकाणी राष्ट्राची भावना प्रस्थापित करावयाची. ज्याप्रमाणे चैतन्यदेव निमाई पंडित असण्याचे विसरला आणि कृष्ण झाला, राधा झाला, बलराम झाला त्याप्रमाणे आपण आपले स्वतंत्र, व्यक्तिगत स्वतंत्र जीवन त्यागून राष्ट्राचे जीवन जगले पाहिजे. ज्याप्रमाणे मुमुक्षूंची मने मोक्षाच्या विचारात व्यग्र असतात, त्याप्रमाणे राष्ट्रीय उत्थानाच्या आशेने आपली मने व्यापून टाकली पाहिजेत. अनाम साधूप्रमाणे आपला त्याग परिपूर्ण असला पाहिजे. आपल्या स्वतंत्र आणि गौरवशाली आईचा चेहरा पाहण्याची आपली उत्कंठता, श्रीकृष्णाचे मुख पाहण्यासाठी वेडा झालेल्या चैतन्याप्रमाणे, वेड खायला उठली पाहिजे. गौरांगाचे संकीर्तन ऐकण्यासाठी राज्याचा अधिकार सोडणाऱ्या

जगाई आणि मधाई प्रमाणे राष्ट्रासाठीच आपला त्याग उत्साहपूर्ण आणि परिपूर्ण असला पाहिजे. कार्थेजियन मातापितरे ज्याप्रमाणे आपली मुले अग्नीमधून मोलोकला अर्पण करीत असत त्याप्रमाणे वेदीवरील आपल्या आहुती ह्या शोकरहित परिपूर्ण असल्या पाहिजेत. आपल्या स्वसमर्पणाच्या परिपूर्णतेला जर आपल्या आरक्षणाचा कलंक लागला, आपल्या क्षीणकृतीने जर आपल्या यज्ञाच्या संपूर्णतेला त्रूटी आली, आपल्या श्रद्धेच्या आणि उत्साहाच्या शक्तीला जर एकाद्या संशयी वृत्तीने कमीपणा आला, स्वार्थाच्या विचाराने आपल्या प्रेमाचे पावित्र्य दूषित झाले तर माता प्रसन्न होणार नाही आणि माता आपली अनुपस्थिती चालूच ठेवील. आपण तिला आवाहन करीत आहोत पण ते आवाहन आपल्या हृदयाच्या तळापासून अद्याप गेले नाही. आईचे चरण उंबरठ्यावर आहेत पण ती खऱ्या आक्रंदनासाठी थांबली आहे. तिने प्रवेश करण्यापूर्वी ते आक्रंदन हृदयापासून बाहेर घडविले पाहिजे. आपण अद्यापही स्वतः आणि देश ह्यामध्ये कांकू करीत आहोत ; आपण आईसाठी एक आणा देतो आणि बाकीचे पंधरा आणे आपणासाठी, आपल्या बायकांसाठी, आपल्या मुलांसाठी, आपल्या दौलतीसाठी, आपल्या कीर्ती आणि प्रसिद्धीसाठी, आपल्या संरक्षणासाठी आणि आपल्या सुखासाठी, राखून ठेवीत आहोत. आई स्वतःला तुम्हाला अर्पण करण्यापूर्वी तुमच्याकडून सर्वस्वाचे दान मागत आहे. सुराथ राजाने स्वतःच्या शिरातील रक्त दिल्याशिवाय आई त्याच्यासमोर उभी राहिली नाही आणि त्याला वर मागण्यास सांगितले नाही. शिवाजी राजाने स्वतःचे शीर भवानीमातेच्या चरणीं अर्पण करण्याची तयारी दाखविल्यानंतरच तिने साक्षात् उभे राहून त्याचा हात पकडला आणि आपल्या लोकांची मुक्ती करण्याची आज्ञा दिली.

ज्यानी राष्ट्रे स्वतंत्र केली त्याना त्यांच्या प्रयत्नावर यशाचा मुकुट चढण्यापूर्वी अशाच प्रकारच्या कठोर संन्यासवृत्तीच्या व्यथांमधून पार पडावे लागले आणि ज्यांना भारताला स्वतंत्र करण्याची आकांक्षा आहे त्याना आई मागेल ती किंमत द्यावीच लागेल. ज्या योजनांच्या द्वारे आपण राष्ट्र उभे करू इच्छितो, औद्योगिक पुनर्निर्मिती, शैक्षणिक पुनर्निर्मिती, स्वावलंबनाद्वारे राजकीय पुनर्निर्मिती, देश स्वतंत्र होण्यापूर्वी त्याला ज्या सखोल पुनर्निर्मितीमधून जावे लागते त्याच्या ह्या अंगभूत गोष्टी आहेत. आई आपणाला योजना, आराखडे आणि पद्धती तयार करावयास सांगत नाही. आपण करू त्यापेक्षा कितीतरी चांगल्या योजना, आराखडे आणि पद्धती स्वतःच तयार करून देईल. ती आपणाकडून हृदयाची, जीवनांची अपेक्षा करते, ह्यात काही कमी नाही, काही अधिक नाही. स्वदेशी, राष्ट्रीय शिक्षण, स्वराज्य संघटनेचा प्रयत्न ह्या केवळ तिच्या चरणी स्वात्मार्पणाच्या संधी आहेत. आपण स्वदेशीसाठी किती प्रयत्न केले, किती हुशारीने आपण स्वराज्याचा आराखडा तयार केला आहे आणि शिक्षणासाठी आपण किती यशस्वीपणे संघटना केली आहे ह्यांकडे ती पाहणार नाही तर आपण स्वतःला किती अर्पण केले आहे, आपल्या मालमत्तेचे किती दान केले आहे, आपण किती श्रम, स्वास्थ्य, संरक्षण आणि आपली जीवने अर्पण केली आहेत हे तिला हवे आहे.

पुनर्निर्मिती ह्याचा साहित्यिक अर्थ आहे पुनर्जन्म. आणि पुनर्जन्म बुद्धीने, द्रव्याच्या पूंजीने, धोरणाने किंवा यंत्रणा बदलल्याने मिळत नाही तर नवे हृदय मिळवल्याने, आपण जे काही होतो ते सर्व यज्ञाच्या अग्नीमध्ये आहुती म्हणून फेकून दिल्यानंतर आणि आईच्या उदरातून पुन्हा जन्म घेऊन मिळत असतो. स्वात्मार्पण ही एकच मागणी आपणाकडे केली आहे. ती आपणास विचारीत आहे, " माझ्यासाठी किती जिवंत राहतील ? माझ्यासाठी किती मरण पावतील ? " आणि ती उत्तरासाठी खोळंबली आहे.

**वंदे मातरम्, ११ एप्रिल, १९०८**

● ● ●

## २८ धर्म म्हणजे एक जीवन प्रणाली . . . . . . . . . . . ३०-५-१९०९

**एक वर्षाच्या कारावासातून मुक्तता झाल्यानंतर उत्तरपाडा येथे केलेल्या भाषणात श्रीअरविंद यांनी हिंदु धर्माचे विवेचन केले आहे. ते म्हणतात, हा सनातन धर्म म्हणजे एक जीवन प्रणालीच आहे. हा धर्म म्हणजे केवळ एक विश्वासाचा भाग नाही. प्रत्यक्ष जगण्याचा तो धर्म आहे. फार प्राचीन काळापासून हा धर्म मानवाच्या मुक्ततेसाठी, ह्या द्वीपखंडातील दऱ्याखोऱ्यांत आणि रानावनांत जोपासला गेला. हा धर्म जगाला देण्यासाठी म्हणूनच भारताचे आता उत्थान होत आहे. भारताचे अस्तित्व हे नेहमीच मानवतेच्या जोपासनेसाठी होते आणि आताही मानवतेसाठीच त्याला महान बनावयाचे आहे.**

आपल्या सभेच्या ह्या वार्षिक बैठकीत जेव्हा मला बोलण्यास सांगण्यात आले, तेव्हा आजच्या चर्चेसाठी निवडलेल्या विषयावर, म्हणजेच ' हिंदुधर्म ' या विषयावर काही विचार आपल्यापुढे मांडावेत असा माझा मानस होता. माझी ही मनीषा मी पूर्ण करू शकेन किंवा नाही, हे आताच मी सांगू शकत नाही. मी आपल्यापुढे असा बसलो असतानाच, माझ्या मनात अंतःप्रेरणेने एक असा विचार आला की, तो मी आपल्याला सांगितलाच पाहिजे. साऱ्या भारताला तो मी सांगितला पाहिजे. मी जेलमध्ये असतानाच मला ह्या प्रेरणेची जाणीव झाली आणि आता तो विचार माझ्या लोकांपुढे मांडण्याकरिता मी जेलबाहेर आलो आहे.

मी येथे आलो होतो त्या घटनेनंतर एक वर्षाहून अधिक काळ लोटला आहे. मी तेव्हा एकटा नव्हतो. राष्ट्रवादाचा एक महान उद्‌गाता त्यावेळी माझ्या जवळच बसला होता. आपल्या कोठडीच्या शांत एकांतात त्याला आपले शब्द ऐकू जावेत, म्हणून ईश्वराने त्याला एकांतवासात ठेवले होते. त्यातून तो बाहेर पडला होता. त्याच्याच स्वागतासाठी तुम्ही शेकडो लोक येथे एकत्रित झाला होता. आता तो हजारो मैल दूर अशा ठिकाणी गेला आहे. माझ्या बरोबरीने काम करीत होते ते आता येथे नाहीत. देशात येऊन गेलेल्या झंझावातामुळे ते सर्वदूर विखुरले गेले आहेत. यावेळी, एकांतवासात एक वर्ष घालवून परत आलो तो मी. आणि आता बाहेर आल्यावर पाहतो तो सारे काही बदलले आहे. ज्याचा माझ्या कामात नेहमीच सहभाग होता आणि माझ्या खांद्याला खांदा लावून जो माझ्यासोबत काम करायचा असा एकजण ब्रह्मदेशात कैद भोगतो आहे. दुसरा एकजण उत्तरेत सरकारच्या हिरासतीत खितपत पडला आहे. जेलबाहेर आल्यावर मी इकडे तिकडे पाहू लागलो. ज्यांच्याकडून मला प्रेरणा आणि मार्गदर्शन मिळत असे, ते कोठे दिसतात का, हे

शोधण्यासाठी माझे डोळे भिरभिर फिरत होते. मला ते दिसले नाहीत. आणखी काहीतरी वेगळे घडले होते. मी जेलमध्ये गेलो तेव्हा सारे राष्ट्र ' वंदे मातरम् ' च्या घोषाने निनादत होते. राष्ट्रीय आकांक्षा जागृत होती. लक्षावधी लोक आपल्या विपन्न दशेशी झगडून नव्याने उभे राहण्याच्या प्रयत्नात होते. मी जेलमधून बाहेर पडलो तेव्हा त्या चैतन्यदायी घोषणेचा कानोसा घेऊ लागलो. पण सारे काही शांत शांत होते. साऱ्या देशभर एक प्रकारची विचित्र निःस्तब्धता पसरली होती. लोक दिङ्मूढ झालेले दिसत होते. एकेकाळी, आमच्यासमोर भविष्याचे आलोकमय उज्वल चित्र उलगडत होते, त्याची जागा आता काळ्याकुट्ट मेघांनी घेतली होती. कोणत्याही क्षणी आता विजांचा कडकडाट आणि मेघांचा गडगडाट सुरू होईल असे वाटत होते. आता करावे काय, हाच प्रत्येकाच्या समोर प्रश्न होता. प्रत्येकजण विचारत होता, "आता पुढे आम्ही काय करावे ? कोणते काम हाती घ्यावे ? पुढचे पाऊल कोणत्या दिशेने टाकावे ? " काय सुरू करावे हे मलाही काही कळेनासे झाले होते. परंतु एक गोष्ट मी जाणून होतो. ज्या जगन्नियंत्याच्या शक्तीमुळे देशभर आमच्यात उत्साह संचरला होता आणि आम्ही जयघोष करीत होतो, त्याच शक्तीने ही आजची भयाण शांतता आणली होती. आमच्या उत्थानात आणि जयघोषात ज्याचा सहभाग होता, तोच ह्या स्तब्धतेत आणि भयाण शांततेतही आमच्या सोबत होता. त्यानेच हे घडवून आणले होते. हेतु हा की राष्ट्राने एक पाऊल मागे सरावे आणि थोडेसे अंतर्मुख होऊन ईश्वरी इच्छेचा कानोसा घ्यावा. या भयाण शांततेमुळे मी नाऊमेद झालो नाही. कारागृहात असताना शांततेचा अनुभव मी घेतला होता. एक वर्षाच्या प्रदीर्घ कारावासात मी हा स्तब्धतेचा आणि शांततेचा धडा शिकलो होतो. बिपिनचंद्र पाल जेव्हा जेलबाहेर आलेत तेव्हा त्यांनी एक संदेश दिला. हा एक दिव्य संदेश होता. त्यांनी याच ठिकाणी दिलेले भाषण मला चांगले आठवते. त्यांचे भाषण राजकीय स्वरुपाचे जितके होते त्याहून कितीतरी अधिक पटीने धर्मविचारांनी परिक्लुप्त होते. जेलमध्ये असताना त्यांना जाणवलेली आत्मानुभूती, आपल्या सर्वांच्या अंतर्यामी आणि राष्ट्र संकल्पनेत असलेले ईश्वराचे अधिष्ठान, यांबद्दल त्यांनी त्यावेळी सांगितले होते. त्यानंतरच्या त्यांच्या भाषणांतही या आंदोलनामागे असलेली इतर सामान्य शक्तीपेक्षा वेगळी अशी शक्ती आणि सर्वसामान्यापेक्षा वेगळे असे उद्दिष्ट, या सर्वांचा त्यांनी वारंवार उल्लेख केला होता. आता मीही आपल्याला पुनश्च भेटत आहे. मीही कारावासातून बाहेर पडलो आहे आणि माझे स्वागत, तुम्ही, उत्तरपाड्यातील लोक, एका राजकीय सभेत नाही, तर धर्मरक्षणासाठी घेण्यात आलेल्या या सभेमध्ये, सर्वप्रथम करीत आहात. बिपिनचंद्र पाल यांना बक्सार कारागृहात जो दैवी संदेश मिळाला, तो मला ईश्वरी कृपेने अलीपूर जेलमध्ये मिळाला. माझ्या बारा महिन्यांतील बंदिवासात, ईश्वराने दिवसांमागून दिवस मला हे दिव्यज्ञान दिले आणि आता तेथून बाहेर पडल्यावर तुम्हाला त्याबद्दल मी सांगावे, हीही त्याचीच प्रेरणा आहे.

मी सुटणार हे मला माहीत होते. बंदिवासाचे हे एक वर्ष म्हणजे एकांतवासाचे एक प्रशिक्षणच. ईश्वराच्या कार्यासाठी आवश्यक इतक्या कालावधीपेक्षा अधिक काळ मला

बंदिवासात कोणीही कसा ठेवू शकेल ? मी तुम्हाला सांगावा म्हणून ईश्वराने मला एक संदेश दिला आहे. मी करावे म्हणून एक काम दिले आहे. तो संदेश मी सांगेपर्यंत कोणतीही मानवी शक्ती माझा आवाज रुद्ध करू शकत नाही. ते कार्य मी पूर्ण करीपर्यंत कोणतीही मानवी शक्ती माझ्या आड येऊ शकत नाही. ईश्वराने एक साधन म्हणून निर्माण केलेली माझी ही कुडी, कितीही लहान असो, कितीही दुबळी असो. त्याचे कार्य केल्याशिवाय ती राहणार नाही. आता मी बाहेर पडल्यानंतर, गेल्या काही मिनिटांच्या कालावधीतही, एरव्ही माझी काही बोलण्याची इच्छा नसतानाही मला त्या शब्दांची सूचना मिळाली. माझ्या मनात असलेले विचार त्याने दूर भिरकावून दिले आहेत आणि आता जे मी काही बोलणार आहे, ते त्याचेच शब्द आहेत, ती त्याचीच उर्मी आहे आणि ते सारे आपल्याला मी सांगणे, मला भाग आहे.

मला जेव्हा अटक करण्यात आली आणि लाल बाजार हाजत (कच्ची कैद) कडे नेण्यात आले तेव्हा क्षणभर माझी श्रद्धा विचलित झाली. कारण भगवंताच्या मनात काय आहे याचा मी अंदाज घेऊ शकलो नाही. क्षणभर माझी चलबिचल झाली आणि मनातल्या मनात मी त्याला म्हणालो, " हा कोण प्रसंग माझ्यावर आला आहे ? माझ्या देशातील लोकांसाठी काही एक विशेष कार्य मला करावयाचे आहे. ते पूर्ण करीपर्यंत ईश्वर माझे सर्वतोपरी रक्षण करीलच, असा माझा विश्वास होता. मग मी येथे कसा ? आणि या अशा आरोपाखाली ? "

एक दिवस गेला, दुसरा दिवस, तिसरा दिवस गेला. आणि मला आतून साद आली. " धीर धर आणि पहा. " मग मी शांत झालो. प्रतीक्षा करू लागलो. लाल बाजाराहून मला अलीपूर कारागृहात नेण्यात आले. तेथे कोणत्याही माणसाचा संपर्क येणार नाही अशा एका निर्मनुष्य कोठडीत मला टाकण्यात आले. तेथे मी रात्रंदिवस माझ्या अंतरंगात ईश्वरी आदेश कधी निनादेल याची प्रतीक्षा करू लागलो. तो मला काय सांगणार आहे, माझ्याकडे कोणते कार्य देणार आहे याची मी वाट पाहू लागलो. ह्या एकांतवासात आत्मानुभूतीची पहिली झलक मला दिसून आली. मला आठवले की, माझ्या अटकेच्या एक दीड महिना अगोदर, ' मी माझे सर्व काम बाजूला ठेवावे आणि एकांतवासात जाऊन आत्मशोधन करावे ' म्हणजे मग मी परमेश्वराशी चांगला संवाद साधू शकेन, असा आंतरिक आदेश मला जाणवला होता. त्यावेळी माझ्या दौर्बल्यामुळे मी हा आदेश स्वीकारू शकलो नाही. माझे काम मला फार प्रिय होते आणि माझा अहंकार मला डिवचत होता आणि म्हणत होता, ' तुझ्याशिवाय कोण हे काम करू शकेल ? तू नसला तर ह्या कामाची वाताहात होईल आणि ते बंद पडेल. ' मला असे जाणवले की परमेश्वर मला पुन्हा म्हणाला, " जे बंध तुझ्या दुबळेपणामुळे तुला तोडता येत नव्हते, ते मी आता तुझ्यासाठी म्हणून तोडून टाकले आहेत. कारण ते तसेच असावेत असे मलाच पसंत नव्हते. ती माझी इच्छा नव्हती. तुझ्यासाठी माझी एक वेगळी योजना होती. तिच्या सिद्धीसाठी मी तुला येथे आणले आहे. तू आपण होऊन जे शिकला नसतास, ते शिकवण्यासाठी आणि माझ्या कार्यामध्ये तुला तयार करण्यासाठी तुला येथे आणले आहे. " त्यानंतर भगवंताने माझ्या

हाती गीता दिली. त्याची शक्ती माझ्यात संक्रमित झाली आणि मी गीतेनुसार साधना करू लागलो. गीता मला केवळ बुद्धिद्वारा समजून घ्यायची नव्हती. तर श्रीकृष्णाची अर्जुनाकडून काय अपेक्षा होती आणि ईश्वरी कार्य आपल्या हातून पार पडावे असे ज्यांना वाटते. त्यांच्याकडून श्रीकृष्ण कोणती अपेक्षा ठेवतात, हे सारे मला अनुभवायचे होते. आशा-निराशा, सुख-दुःख, वासना-उद्वेग ह्या साऱ्या द्वंद्वांपासून मला मुक्त व्हावयाचे होते. फलाशा न ठेवता त्याचे कार्य मला करता यावयास हवे होते. माझी स्वतःची कर्मेच्छा मला त्यागायची होती आणि भगवंताच्या हातातील मी एक खात्रीचे असे सक्रिय साधनमात्र व्हावे असे मला वाटत होते. उच्च-नीच, शत्रु-मित्र, यश-अपयश या सर्वांच्या बाबतीत माझ्या ठायी समत्वबुद्धी असावी असे मला वाटत होते ; आणि तरीही ईश्वरी कार्याबाबत माझ्या हातून कोणताही निष्काळजीपणा होऊ नये हीही माझी तीव्र इच्छा होती. आणि मग मला हिंदु धर्म कशाला म्हणतात ते कळावयास लागले. आपण हिंदु धर्म, सनातन धर्म हे शब्द घेऊन वाद घालतो. पण तो धर्म ही काय चीज आहे हे फारच थोड्या व्यक्तींना ठाऊक असते. अन्य धर्म हे, त्या धर्माविषयी दृढ विश्वास बाळगून, आपण त्या धर्माचे अनुयायी आहोत, हे प्रामुख्याने जाहीर करण्यापुरते असतात. पण हा सनातन धर्म म्हणजे समग्र जीवनप्रणालीच आहे. हा धर्म म्हणजे केवळ एक विश्वासाचा भाग नाही. प्रत्यक्ष जगण्याचा तो धर्म आहे. फार प्राचीन काळापासून हा धर्म मानवांच्या मुक्ततेसाठी, ह्या द्वीपखंडातील दऱ्याखोऱ्यांत आणि रानावनांत जोपासला गेला. हा धर्म जगाला देण्यासाठी म्हणूनच भारताचे आता उत्थान होत आहे. हे उत्थान, अन्य देशांप्रमाणे स्वतःपुरते नाही. किंवा आपण बलिष्ठ होऊन इतरांना पायाखाली तुडवण्यासाठीही नाही. ह्या अखंडपणे तेवत असलेल्या ज्ञानदीपाचा प्रकाश साऱ्या जगभर पसरावा म्हणून भारत प्रयत्नशील होत आहे. भारताचे अस्तित्व हे नेहमीच मानवतेच्या जोपासनेसाठी होते आणि आताही मानवतेसाठीच त्याला महान बनावयाचे आहे.

म्हणून मग ईश्वराने ही गोष्ट मला दाखवून दिली. हिंदु धर्मातील चिरंतन सत्याचा त्याने मला अनुभव दिला. त्याने माझ्याबद्दल कारागृहाच्या अधिकाऱ्यांमध्ये सहानुभूती निर्माण केली. ह्या अधिकाऱ्यांनी मुख्य इंग्रज अधिकाऱ्याला सांगितले, " हा कोठडीत एकटाच रात्रंदिवस पडून असतो. कोठडीच्या बाहेर पडून सकाळ संध्याकाळ अर्धा तास फिरायची त्याला मोकळीक देण्यास काय हरकत आहे ? " मग तशी व्यवस्था झाली. आणि अशाच फेरफटक्याचे वेळी पुन्हा त्या भगवंताची शक्ती माझ्यात प्रवेश करीत असल्याचे मला जाणवले. मी माझ्या कोठडीकडे पाहिले नि मला वाटले, ही कोठडी इतर माणसांपासून मला वेगळे पाडते. इतरांहून मला वेगळे पाडण्याचा प्रयास ह्या उंच भिंती करतात खरा, पण माझ्या भोवताली तर सर्वत्र हा वासुदेव कृष्णच आहे. माझ्या कोठडीबाहेरच्या झाडाखालून मी जात होतो. परंतु ते झाड नव्हते. तो वासुदेव होता. श्रीकृष्णच झाड बनून माझ्यावर सावली धरत होता. कोठडीच्या लोखंडी गजांच्या चौकटीकडे मी पाहिले. ही दाराची चौकट होती. पुन्हा मला नारायणाची आठवण झाली. नारायण त्या अचेतन दाराच्या रूपाने सचेत बनून माझ्यावर लक्ष ठेवून होता. मला जे जाडेभरडे घोंगडे

झोपायसाठी देण्यात आले होते, त्यावर अंग टाकले की मला वाटायचे, मी माझ्या कृष्णाच्या मिठीत आहे. कृष्ण–माझा मित्र. माझा प्रियतम. त्याने मला जी दृष्टी दिली तिचा मला हा असा पहिल्याने उपयोग झाला. माझ्या समोरच्या बंदिजनांना मी पाहत होतो. चोर, खुनी, दरोडेखोर उचले. मी त्यांच्याकडे पाहिले आणि मला त्यांच्यांत वासुदेवाचे दर्शन झाले. देहाचा दुरुपयोग करणाऱ्या ह्या क्रोधांध दुरात्म्यांमध्ये मला नारायण दिसू लागला. आपली सहानुभूती आणि दयाळूपणा दाखवून त्यांतील बऱ्याच जणांनी मलाही लाजवले. परिस्थिती अत्यंत प्रतिकूल असतानाही येथे माणुसकीने बाजी मारली होती. त्यांच्यापैकी एकाला दरोड्याच्या आळाखाली दहा वर्षांची सक्त मजुरीची शिक्षा झाली होती. माझ्या देशातील हा एक शेतकरी होता. लिहिता, वाचता न येणारा. परंतु वर्तन एखाद्या शुद्धचित्त साधूसारखे. आणि यांना आम्ही आमच्या उच्च प्रतिष्ठितपणाच्या तोऱ्यात म्हणतो, ' छोटोलोक '. पुन्हा एकदा त्या ईश्वराने मला स्मरण करून दिले. " पहा. तुला मी ज्यांच्या संगतीत राहायला पाठवले आहे, ती ही माणसे माझेच काम आपापल्या परीने करताहेत. पहा. ह्या राष्ट्राचे उत्थान मी असे करू पाहतो आहे. यासाठीच मी हे सारे करतो आहे. "

आमचे प्रकरण जेव्हा कनिष्ठ न्यायालयासमोर आले आणि मला मॅजिस्ट्रेटसमोर उभे करण्यात आले, तेव्हा मला ही अंतर्दृष्टी आलेली होती. ईश्वर मला म्हणत होता, " तुला जेव्हा जेलमध्ये टाकण्यात आलं होतं, तेव्हा तू धीर सोडला होता ना ? म्हणाला होता ना की, मी तुझा सांभाळ करीत नाही म्हणून. आता ह्या मॅजिस्ट्रेटकडे पाहा. खटला चालवणाऱ्या ह्या सरकारी वकिलाकडे पाहा. " मी पाहिले ; नि ज्याला पाहिले तो मॅजिस्ट्रेट नव्हता. तो होता वासुदेव. साक्षात नारायण तिथे न्यायासनावर बसला होता. मी ज्या सरकारी वकिलाकडे पाहत होतो, तो सरकारी वकील नव्हता. तो होता श्रीकृष्ण. माझा मित्र. माझा प्रियतम. तो तेथे बसला होता. त्याच्या मुद्रेवर स्मित होते. ईश्वर म्हणाला, " मी सर्वांमध्ये आहे. ह्या सर्वांच्या शब्दांवर आणि ते करीत असलेल्या कामावर माझी सत्ता आहे. तुझ्याविरुद्ध दाखल झालेले हे प्रकरण माझ्याकडे सोपव. तू त्याचा विचार करू नकोस. तुझ्याविरुद्ध खटला चालावा म्हणून मी तुला यात पाडलेलं नाही. मी दुसऱ्याच एका कारणाकरता तुला इथं आणलं आहे. हे प्रकरण म्हणजे माझ्या कार्यप्रणालीचा एक भाग आहे. दुसरं काही नाही. " त्यानंतर मग खटला जेव्हा सेशन कोर्टात सुरू झाला, तेव्हा मग मी माझ्या वकिलाकडे अनेक सूचना लिहून पाठवल्या. माझ्याविरुद्धच्या पुराव्यात काय खोटे आहे ते त्यांना सांगितले. कोणत्या मुद्यांबाबत साक्षीदारांची उलटतपासणी करता येईल हेही मी त्यांना सुचविले. त्यानंतर मग एक अनपेक्षित घटना घडली. माझ्या बचावासाठी करण्यात आलेल्या व्यवस्थेत एकदम बदल करण्यात आला. माझ्या बचावासाठी एक वेगळाच वकील कोर्टासमोर आला होता. माझा मित्रच होता तो. पण तो माझ्या बचावासाठी येणार आहे याची मला मुळीच कल्पना नव्हती. त्या व्यक्तीचे नाव तुम्ही ऐकले आहे. त्याने आपली कामे बाजूला सारलीत. भरपूर पैसे देणारा आपला व्यवसाय सोडून

दिला. माझ्या प्रकरणाशिवाय दुसरा कोणताच विचार मनात येऊ दिला नाही. दिवसानुदिवस. महिन्यांमागून महिने मध्यरात्रीपर्यंत जागत बसून आणि स्वतःच्या प्रकृतीकडे दुर्लक्ष्य करून माझ्यासाठी तो रात्रंदिवस राबत होता. होय. श्रीयुत चित्तरंजन दास. मी त्यांना पाहिले आणि मला बरे वाटले. परंतु अजूनही चिठ्ठ्या चपाट्या लिहून माझी बाजू त्यांच्या लक्षात आणून द्यावी असं मला वाटतंच होत. आणि मग ते सारं थांबलं. मला माझ्या अंतरंगातून संदेश आला, '' तुझे पाय जाळ्यात पकडून जखडून ठेवले आहेत. हा माणूस तुला त्यातून सोडवील. ते कागद बाजूला सार. तू त्याला सूचना देऊ नकोस. त्या मी देईन. '' त्या क्षणापासून मी माझ्या वकिलाशी एक शब्दही बोललो नाही. कोणती सूचनाही दिली नाही. जेव्हा केव्हा मला प्रश्न विचारला जाई, तेव्हा माझ्या उत्तराचाही प्रकरण सोडवायला काही उपयोग नसायचा. सारा भार मी त्यांच्यावरच टाकला होता आणि त्यांनीही तो स्वीकारला होता. परिणाम तुम्हाला माहीत आहेच. या सर्व कालावधीत माझा ईश्वरावरच पूर्ण भरवंसा होता. त्याचा आतून येणारा आवाज मी वारंवार ऐकत होतो. '' मी मार्ग दाखवत आहे. घाबरु नकोस. मी तुला जेलमध्ये ज्या कार्यासाठी आणलं आहे, त्याकडे लक्ष दे. जेव्हा जेलबाहेर पडशील तेव्हा लक्षात ठेव– कधीही घाबरायचे नाही. कधीही कच खायची नाही. हे सारं मी करत आहे. तू किंवा इतर कोणी काहीही करत नाहीत, हे ध्यानात असू दे. निराशेचे काळेकुट्ट मेघ आलेत, संकटे आलीत, कोणताही त्रास सोसावा लागला, कोणत्याही अडचणी आल्यात, तरी काहीही अशक्य नाही ; काहीही कठीण नाही, हे ध्यानात ठेव. मी ह्या राष्ट्राच्या कणाकणात आहे. ह्याच्या उत्थानाच्या मुळाशी आहे. मी नारायण आहे. मी वासुदेव आहे. माझ्या मनात असेल तेच होईल. दुसरे कोणी काहीही करू शकणार नाही. माझ्या इच्छेनुसार मी जे घडवणार आहे ते रोखण्याचे सामर्थ्य मानवी शक्तीत नाही. ''

दरम्यानच्या काळात त्याने मला एकांतवासातून बाहेर काढले आणि माझ्याबरोबरच ज्यांच्यावर आरोप करण्यात आले होते अशांच्या सहवासात मला ठेवले. आज आपण माझ्या देशभक्तीबद्दल आणि माझ्या स्वार्थत्यागाबद्दल बरेच काही बोललात. मी जेलमधून बाहेर पडल्यापासून सारखे तेच ऐकतो आहे आणि प्रत्येक वेळी मला ओशाळल्यासारखे होत आहे. माझे मन व्यथित होत आहे. कारण मला माझ्या उणिवा माहीत आहेत. माझ्यातील दोषांमुळे मी ठेचकाळतो आहे. आणि माझी घसरण होत आहे. हे माझे दोष मला आधीही माहीत होतेच आणि एकांतवासाच्या काळात त्यांनी उचल खाल्ल्यावर तर मला ते अधिक जाणवू लागले आहेत. तेव्हा मला कळले की, माझ्यात कितीतरी दोष एकवटले आहेत आणि ती उच्च शक्ती माझ्यात संचरित झाल्याशिवाय माझा काही उपयोग होण्यासारखा नाही. त्यानंतर मग मी लोकात आलो. त्यांच्यातील बऱ्याच जणांमध्ये अत्यंत उच्च कोटीचे धैर्य आणि स्वतःचे मीपण पुसून टाकण्याची शक्ती असल्याचे मला आढळून आले. त्यांच्या तुलनेत मी अगदीच नगण्य असा होतो. मला असे आढळून आले की, एक दोघेजण बळाच्या आणि चारित्र्याच्या बाबतीत माझ्याहून श्रेष्ठ तर होतेच, परंतु ज्या बुद्धीची मला एवढी घमेंड

होती ती बुद्धीही त्यांच्याकडे माझ्यापेक्षा कितीतरी पटीने अधिक होती. तो ईश्वर मला म्हणाला, " ही तरुण पिढी पहा. माझ्या आदेशानुसार हे बलवंत राष्ट्र आता जागे होत आहे. तुझ्यापेक्षाही ही मंडळी महान आहेत. तुला भय कसचे ? तू बाजूला झालास, किंवा झोपी गेलास, तरीही हे काम होणारच आहे. उद्या जर तू बाजूला फेकला गेलास, तरी ही मंडळी तुझी कामे हाती घेतील आणि तू करीत आलास त्यापेक्षा अधिक समर्थपणे करीत राहतील. ह्या राष्ट्राला सांगण्यासारखे काही शब्द मी तुझ्या ठायी पेरले आहेत. तुझ्याकडून ते शब्द ऐकून या देशाला जाग येईल व तो उभा राहील. " हे सारे मला त्या ईश्वराने सांगितले आहे.

त्यानंतर मग क्षणात अचानक काहीतरी झाले आणि मला पुन्हा एकांतवासात आणि कोठडीत टाकण्यात आले. त्या कालावधीत मला कोणकोणते अनुभव आलेत, ते मी सांगावेत असे मला वाटत नाही. एवढे मात्र खरे की, दिवसेंदिवस त्या ईश्वराने मला आश्चर्यजनक अशा नवनवीन गोष्टी दाखवल्या आणि हिंदुधर्मातील अंतिम सत्याचे त्याने मला दर्शन घडवले. या अगोदर माझ्या मनात अनेक शंका कुशंका होत्या. मी इंग्लडमध्ये परकीय वातावरणात आणि विदेशी संकल्पनांच्या विळख्यात वाढलो होतो. हिंदुधर्मातील बऱ्याच गोष्टी म्हणजे कल्पनेचा एक खेळ आहे, एक स्वप्नरंजन आहे, असेच समजण्याची माझी वृत्ती होती. ह्या साऱ्या गोष्टी म्हणजे चित्तविभ्रम किंवा माया आहे, असेच मला वाटत होते. परंतु आता दिवसांमागून दिवस, मी माझ्या मनात, माझ्या हृदयात, शरिराच्या कणाकणात हिंदुधर्मातील सत्यांचा अनुभव घेऊ लागलो होतो. हा सारा माझ्यासाठी एक जीवंत अनुभव होता. अशा काही गोष्टी माझ्या नजरेस येत होत्या की, ज्यांची भौतिक कारणमीमांसा करताच येत नव्हती. मी जेव्हा ईश्वराकडे प्रथम वळलो तेव्हा माझी भूमिका ना भक्ताची होती ना ज्ञान्याची. फार पूर्वी मी बडोद्याला असताना, म्हणजे स्वदेशी आंदोलनाच्या काही वर्षे अगोदर, मी ईश्वराकडे वळलो होतो आणि तेव्हाच मी सार्वजनिक क्षेत्रात आलो होतो.

जेव्हा मी ईश्वराकडे वळलो, तेव्हा त्याच्या ठिकाणी माझी जाज्वल्य श्रद्धा मुळीच नव्हती. मी तेव्हा अज्ञेयवादी होतो, निरीश्वरवादी होतो, शंकेखोर होतो आणि ईश्वराच्या अस्तित्वाची मला खात्री वाटत नव्हती. त्याचे अस्तित्व मला जाणवत नव्हते. तरीही कोणत्या तरी अज्ञात शक्तीमुळे मी वेदांतील चिरंतन सत्याकडे, गीतेतील सत्याकडे, हिंदुधर्मातील सत्याकडे आकृष्ट होत गेलो. योगामध्ये, वेदान्तावर आधारित असलेल्या या धर्मामध्ये काहीतरी महान सत्य दडलेले असावे असे मला वाटू लागले. तेव्हा मग मी योगाकडे वळलो. योगाभ्यास करण्याचा निश्चय केला. मला जे वाटते ते तसे खरेच आहे काय, हे जाणून घेण्यासाठी मी त्या ईश्वराजवळ अशी प्रार्थना केली, " तू जर खरोखर असशील, तर तुला माझ्या मनातले सर्वच कळत असणार. तुला माहीत आहे की, तुझ्याकडे मी मोक्ष मागत नाही. इतर लोक तुझ्याकडे ज्या गोष्टी मागतात त्या मी मागत नाही. माझे मागणे एकच आहे. ह्या देशाला उन्नत करण्याची ताकद मला दे. या देशातील लोकांवर माझे

प्रेम आहे. त्यांच्याकरिता मला माझे सारे आयुष्य देता येईल असे कर. '' योगसाधना पूर्ण करण्यासाठी मी बरेच श्रम घेतलेत आणि बऱ्याच अंशी ते सफलही झालेत. परंतु मला जे मिळावे असे वाटत होते ते मिळाल्याचे समाधान मला नव्हते. त्यानंतर मग जेलच्या त्या एकांतवासात, त्या निःसंग कोठडीत, मी त्याच्याकडे आणखी एक मागणे केले. '' मला तुझा आदेश हवा. मी कोणते काम करावे आणि ते कसे करावे, हे मला माहीत नाही. तुझा संदेश मला हवा. '' आणि त्या योगाभ्यासाच्या दरम्यान मला दोन संदेश मिळालेत. पहिला संदेश होता. '' मी तुझ्यावर एक काम अगोदरच सोपवले आहे. राष्ट्र उभारणीचे ते काम आहे. लवकरच तू या कारागृहातून बाहेर पडशील. यावेळी तुला शिक्षा व्हावी, किंवा देशासाठी इतर जसे खितपत पडतात तसे तू राहावे, अशी माझी इच्छा नाही. मी तुझ्यावर काम सोपवले आहे. तूच मला आदेश मागितला होता ना ? मग मी तुला आदेश देतो, '' माझे कार्य करीत तू पुढे जा. '' '' त्यानंतर दुसरा संदेश आला. '' या एकांतवासाच्या वर्षात तुला मी बरेच काही दाखवून दिले आहे. तुला ज्याबद्दल शंका होत्या, ती हिंदुधर्मातली सत्ये मी तुला दाखवून दिली आहेत. हा धर्म मला जगासमोर प्रतिष्ठित करावयाचा आहे. आतापर्यंत ऋषींद्वारा, साधूसंतांद्वारा आणि प्रत्यक्ष अवतार घेऊन मी ह्या धर्माचा विकास घडवून आणला आहे. त्याला परिपूर्णता आणली आहे. आणि आता हा धर्म राष्ट्राराष्ट्रांत माझे कार्य करीत राहणार आहे. ह्या देशाचे उत्थान मी त्यासाठीच करवीत आहे. माझा हा संदेश, माझे हे शब्द सर्वदूर पसरले पाहिजेत. सनातन धर्म म्हणतात तो हाच. हा चिरंतन आहे. या अगोदर तुला ह्या धर्माची काहीच माहिती नव्हती. मी तुला ह्या धर्माचे दर्शन घडवले. तुझ्यातल्या शंकेखोराला आणि अज्ञेयवाद्याला योग्य उत्तरे मी दिली आहेत. अंतरंगात जाणवतील व बाहेर दिसून येतील असे सर्व भौतिक आणि आत्मप्रत्ययी पुरावे मी तुला दाखवून दिले आहेत आणि तुझे समाधानही झाले आहे. तू जेव्हा बाहेर जाशील, तेव्हा तुझ्या ह्या राष्ट्राला हे सांग. साऱ्या लोकांना तू सांग की ह्या सनातन धर्मासाठीच त्यांचे उत्थान होत आहे. त्यांच्या स्वतःसाठी हे उत्थान नाही. ते साऱ्या जगासाठी आहे. त्यांनी जगाची सेवा करावी म्हणून मी त्यांना स्वतंत्र करीत आहे. भारत उभा होत आहे, असे जेव्हा म्हटले जाते, तेव्हा खरे तर, सनातन धर्म चैतन्ययुक्त होत असतो. भारत महान होणार आहे याचा अर्थ सनातन धर्म महान होणार आहे. भारत विशाल आणि विस्तृत होत आहे, असे जेव्हा म्हटले जाते, त्याचा अर्थ सनातन धर्म जगभर प्रसृत होत आहे. धर्मासाठी आणि धर्माद्वाराच भारताचे अस्तित्व सिद्ध होत आहे. धर्माचे बृहद्दर्शन म्हणजे देशाचे बृहद्दर्शन. मी सर्वांमध्ये, वस्तुमात्रात, प्राणिजातात, सर्वत्र आहे, हे मी तुला दाखवून दिले आहे. ह्या आंदोलनात आणि ह्या चळवळीतही मी आहे. देशासाठी जे काम करीत आहेत त्यांच्यात तर मी आहेच, पण त्यांना जे विरोध करतात आणि त्यांच्या आड येतात, त्यांच्यातही मी आहे, हे सारे मी तुला दाखवून दिले आहे. मी प्रत्येकात कार्यरत आहे. लोक जो काही विचार करतात आणि जे काही कार्य करतात, ते दुसरे तिसरे काहीच नसून माझेच उद्दिष्ट सिद्धीस नेण्यासाठी असते. ते सर्वजण माझे काही शत्रू नाहीत, तर माझ्या कार्यासाठी साधनभूत होऊन ते माझेच काम पुढे रेटतात. तू कोणत्या बाजूने जात

आहेस हे तुला कळत नसले तरी तू पुढेच जात आहेस. तू करायला जातोस एक, पण घडते दुसरेच. अपेक्षित परिणाम व्हावा म्हणून केलेले तुझे सर्व प्रयत्न दुसऱ्या कशास तरी कारणीभूत होतात. महाशक्ती आता सर्वांमध्ये अनुप्राणित झाली आहे. ह्या उठावासाठी बऱ्याच पूर्वीपासून माझे प्रयत्न सुरू होते. आता वेळ आली आहे आणि हे काम आता मीच पूर्णतेस नेणार आहे ''.

तेव्हा हे सारे मला आपल्याला सांगायचे होते. ' धर्मरक्षण सभा ' असे ह्या आपल्या सभेचे नाव आहे. होय. धर्मरक्षण. हिंदुधर्माचे रक्षण. हिंदुधर्माचे जगभर उत्थान. पण हिंदुधर्म म्हणजे काय ? ज्याला आपण सनातन वा चिरंतन म्हणतो तो हा धर्म कसा आहे ? तो हिंदुधर्म आहे, कारण तो हिंदु राष्ट्राने जोपासला आहे. एकीकडे समुद्रसहित महासागर आणि दुसरीकडे हिमालय असलेल्या या एकांतप्रिय बंदिस्त द्वीपखंडात तो निर्माण झाला आहे आणि वाढला आहे. ह्या प्राचीन आणि पावन भूमीमध्ये आर्यवंशीयांजवळ ही ठेव युगानुयुगे जतन करायला दिलेली होती. परंतु एका देशाच्या बंदिस्त सीमांमध्ये, जगाच्या एका सीमित भागामध्ये राहणारा हा धर्म नाही. ज्याला आपण हिंदुधर्म म्हणतो, तो प्रत्यक्षात चिरंतन धर्म आहे. वैश्विक धर्म आहे. सर्व धर्मांना सामावून घेणारा हा धर्म आहे. धर्म जर विश्वव्यापक नसेल, तर तो चिरंतन असणार नाही. संकुचित, सांप्रदायिक धर्म, अलगता दर्शवणारा व टाकून देणारा धर्म, हा सीमित काळापुरता आणि मर्यादित उद्दिष्टांपुरताच असू शकतो. वैज्ञानिक शोधांची पूर्व कल्पना करू शकणारा आणि तत्त्वज्ञानाच्या अनंत आकाशात ऊंच झेप घेणारा हा एकच असा धर्म आहे की, जो भौतिकवादावर विजय मिळवू शकतो. हा एकच असा धर्म आहे की, जो ईश्वराच्या निकट सान्निध्याची अखिल मानवजातीला खात्री देऊ शकतो आणि ईश्वराप्रत पोहोचण्याचे सर्व शक्य मार्ग आपल्या कक्षेत आणू शकतो. ईश्वर सर्व मानवांच्या ठायी आणि सर्व प्राणिमात्रात आणि वस्तुजातात ओतप्रोत भरून आहे आणि आपण व आपले सारे अस्तित्व त्याच्याच ठिकाणी एकीभूत झाले आहे असे प्रतिक्षणी ठामपणे सांगणाराही हाच एक धर्म आहे. ह्या सत्याची समज देणारा व त्यावर श्रद्धा ठेवावयास लावणारा हा धर्म आहे. एवढेच नाही तर ह्या सत्याची जाणीव आपल्या देहाच्या कणाकणाला पटवून देणारा हा धर्म आहे. जग कसे आहे, वासुदेवाची ही लीला काय आहे, याचे प्रत्यक्ष ज्ञान देणारा, त्या लीलेमध्ये आपला कोणता सहभाग आहे, त्या लीला जगताचे कोणते कायदे आहेत, कोणते नियम आहेत, हे सारे सांगणारा हाच एक धर्म आहे. कोणत्याही बारीक तपशिलात देखील धर्मापासून जीवनाची फारकत न करणारा, अमृतत्वाची जाण असणारा आणि मृत्यूपासून आपल्याला अभय देणारा हाच असा एक धर्म आहे.

आज आपल्यासमोर उघड करण्यासाठी हेच शब्द त्याने माझ्या मुखी घातले आहेत. मी जे काही बोलावयाचे योजले असेल ते बाजूलाच सारले गेले आहे आणि मला जे बोलायला त्याने सांगितले आहे त्यापलीकडे मला बोलायचेही नाही. त्याने जे शब्द माझ्या मुखी घातले

तेवढेच मी बोलणार. ते आता बोलून झाले आहेत. हे बळ माझ्या ठायी असताना मी मागे एकदा बोललो होतो की, हे आंदोलन राजकीय नाही. राष्ट्रवाद हे राजकारण नाही. राष्ट्रीय विचार हा धर्म आहे. आमची मूलभूत श्रद्धा आहे. तेच मी आज पुन्हा सांगतो. दुसऱ्या शब्दांत सांगतो. राष्ट्रवाद ही आमची मूलभूत श्रद्धा, धर्म नाही, तर आता आमच्यासाठी सनातन धर्म हाच आमचा राष्ट्रवाद आहे. हे हिंदुराष्ट्र सनातन धर्मासह उदयास आले, सनातन धर्मासह ते वाढले, सनातन धर्मासह ते संचार करू लागले. सनातन धर्म जर क्षीण होईल तर राष्ट्रही क्षीण होईल. आणि सनातन धर्म जर नष्ट होईल तर हे राष्ट्रही नष्ट होईल. पण असे होणार नाही. सनातन धर्म म्हणजेच येथील राष्ट्रवाद. एवढेच मला आपल्याला सांगायचे आहे.

● ● ●

## २९ माझ्या देशबांधवांना अनावृत पत्र

जुलै, १९०९

**देशबांधवांना लिहिलेल्या अनावृत्त पत्रात श्रीअरविंद लिहितात, स्वराज्य, परकीय नियंत्रण नसलेली संपूर्ण स्वायत्तता हे आमचे ध्येय आहे. प्रत्येक राष्ट्राने आपले राष्ट्रीय जीवन आपल्याच ध्येयधोरणांनुसार आपल्याच बळाने फुलवावे आणि हा त्याचाच हक्क आहे, असे आमचे म्हणणे आहे. परकीय राष्ट्रांनी आमच्या संस्कृतीपेक्षा हीन असलेली सभ्यता आमच्यावर लादावी आणि आम्हाला आमच्या वारशापासून वंचित करावे हे आम्हाला मान्य नाही.**

सार्वजनिक क्षेत्रात आपले कर्तव्य बजावणाऱ्या माणसाची आज भारतात मोठी कठीण स्थिती आहे. उद्याची त्याला खात्री देता येत नाही. देशासाठी मी काम करीत असताना मला गजाआड करण्यात आले. एक वर्षाच्या एकांतवासाच्या शिक्षेतून मी नुकताच सुटून आलो आहे. माझ्यावर करण्यात आलेल्या आरोपासाठी काडीचाही पुरावा नव्हता. माझी निर्दोष सुटका झाली असली तरी, माझ्यावर दुसरा एखादा आरोप केला जाणार नाही, असे नाही; किंवा मला तडीपार केले जाणार नाही, असेही नाही. तडीपार करण्याच्या कायद्यात, आरोप ठेवण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही ; किंवा पुरावा सादर करण्याचीही आवश्यकता राहत नाही. अँग्लो इंडियन वृत्तपत्रे आमच्याविरुद्ध सतत भुंकत असतात आणि शिकारी कुत्र्यांप्रमाणे आमच्या पायांचा लचका तोडण्याची संधी पाहत असतात. देशभक्तीमुळे आणि कर्तव्याच्या जाणिवेमुळे आपला आवाज उठवण्याचे धारिष्ट्य करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीविरुद्ध ही वृत्तपत्रे सरकारच्या कानाशी लागतात व त्याचा सत्यानाश करण्यास लावतात. त्याचे स्वातंत्र्य हे डळमळित तर असतेच, पण आणखी वाईट म्हणजे ते क्षणजीवी असते. कलकत्त्याच्या पोलिसांनी मला हद्दपार करण्याचा प्रस्ताव सरकारकडे पाठवला असण्याची वदंता आहे. देशात शांतता असली आणि आपण आपली कार्ये वैधपणेच करत असलो तरी सिमल्याच्या सल्लागारांची नैतिक बोचणी बोथट करणारा सरकारी हुकुमनामा, हे बलाढ्य सरकार काढणार नाही, असे नाही. अशा परिस्थितीत माझ्या देशबांधवांना, विशेषकरून राष्ट्रीय पक्षाच्या तत्त्वांचा उद्‌घोष करणाऱ्या देशबांधवांना, आजच्या आमच्या गरजा आणि उद्याचे आमचे धोरण यांबाबतीत हे पत्र लिहिण्याचे मी योजले आहे. मला जर हद्दपार करण्यात आलेच, तर काय करावे याबद्दल गोंधळ उडालेल्या व्यक्तींना ह्या पत्रामुळे मार्ग सापडेल. आणि समजा माझी या हद्दपारीतून सुटका झालीच नाही आणि मी परत आलोच नाही, तर माझ्या देशवासियांसाठी हे माझे अखेरचे मृत्युपत्र होते असे समजता येईल.

राष्ट्रीय पक्षाची स्थिती बिकट आहे हे खरे ; पण आता, काहीच करता येत नाही, अशी ही स्थिती नाही. पक्षाचे नेते गजाआड केले गेले आहेत वा हद्दपार केले गेले आहेत, म्हणून पक्ष नामशेष झाला आहे, अशी जर कोणाची समजूत असेल, तर ती चुकीची आहे. पक्ष आहे तिथेच आहे, अगोदर होता तितकाच प्रभावी आणि व्यापक आहे. परंतु त्याला निश्चित धोरणाची आणि नेत्यांची गरज आहे. धोरण, पक्ष तयार करू शकेल. परंतु दुसरी गोष्ट ईश्वरी कृपेशिवाय त्याला मिळेल, असे वाटत नाही. सर्व मोठी आंदोलने, ईश्वरप्रेरित नेतृत्वाचीच वाट पाहत असतात. हे नेतृत्व म्हणजे ईश्वरी बळासाठी एक माध्यम असते. असे नेतृत्व मिळाले की आन्दोलन यशस्वीपणे परिपूर्तीकडे वाटचाल करते. ह्या आन्दोलनाचे नेतृत्व आतापर्यंत ज्यांनी ज्यांनी केले, ती सर्व बुद्धिमान आणि बलदंड माणसे होती. कोणत्याही आन्दोलनाचे नेतृत्व करण्यास ती समर्थ अशी होती. परंतु तीदेखील ह्या जागतिक क्रान्तीचा प्रमुख प्रवाह पुढे नेण्यास पुरेशी नव्हती. म्हणून भविष्यातील संरक्षणाची जबाबदारी घेणाऱ्या ह्या राष्ट्रीय पक्षाला जरा धीराने घ्यावे लागेल. ईश्वरदत्त अशा नेतृत्वाची वाट पाहावी लागेल. हे नेतृत्व संकटातही धीरगंभीर असेल, पराभवातही आशावादी असेल, यथाकाळ मिळणाऱ्या यशाची त्याला खात्री असेल आणि केवळ भारताच्या पुढील पिढीच्याच नव्हेत, तर जगाच्या भवितव्याच्या जबाबदारीची जाणीव असणारे असेल.

दरम्यानच्या काळात आपल्या समोरील अडचणी हिशेबात घेता, आपल्याला फार काळजीपूर्वक पावले उचलावी लागतील. आमच्याजवळ भौतिक बळ नाही पण नैतिक बळ आहे. देशातील सारे भौतिक बळ हे प्रस्थापित राज्यकर्त्यांच्या ठिकाणी एकवटलेले आहे. आम्ही जर यशस्वी झालो, तर या बळाचा मागमूसदेखील राहणार नाही. हा बदल घडू नये म्हणून ते आपली पाशवी शक्ती पणाला लावतील. देशाचे सारे नैतिक बळ आमच्या पाठीशी आहे. निसर्ग आम्हास अनुकूल आहे. मानवी कायद्यापेक्षा ईश्वरी नियम श्रेष्ठ आहेत. आमची कृती त्या नियमांना धरून आहे. देशातील तरुणाई आमच्या बाजूने आहे. भवितव्य आमच्या हातात आहे. आमच्या अंतिम विजयासाठी आम्ही त्या नैतिक बळाचा आश्रय घेतला पाहिजे. हा आमचा मजबूत आधार सोडून अविवेकी अशा अधीर वृत्तीच्या अधीन होऊन जिथे आम्ही दुबळे ठरू, अशा अन्य भुसभुशीत भूमीवर येण्याचा मोह आम्हाला होता कामा नये. आमचा आदर्श एक असा आदर्श आहे की, कोणताही कायदा त्याला वाईट म्हणू शकत नाही. या आदर्शाकडे जाण्यासाठी आम्ही स्वीकारलेले मार्ग हे अवैध आहेत, असे कोणतेही सुसंस्कृत प्रशासन म्हणू शकणार नाही. हा आदर्श आणि हे मार्ग आम्ही कटाक्षाने जपले पाहिजेत. आमच्या अंतिम विजयासाठी आम्ही त्यांचाच आधार घेतला पाहिजे. कायद्याबद्दल आदर असणे हे राष्ट्रीय जीवनाच्या दृष्टीने फार महत्त्वाचे आहे. भारतीयांनी हा आदर सतत दाखवला आहे. म्हणून आपण कायद्याचे पालन कटाक्षाने केले पाहिजे. त्यांपासून मिळणाऱ्या संरक्षणाचा आम्ही फायदा तर घेतला पाहिजेच, पण जितपत शक्य असेल तितपत कायदा ताणून आम्ही आमचे कार्य आणि आमचा प्रचार पुढे रेटला पाहिजे. देशभरात ज्या काही हत्त्या झाल्या असतील, त्यांच्याशी आमचा संबंध

नाही. एकदा संबंध नाही असे सांगून झाल्यानंतर, आम्ही आता तिकडे ढुंकूनही पाहावयाचे नाही. ह्या घटना म्हणजे एका विषवृक्षाची फळे आहेत. हा विषवृक्ष ज्यांनी लावला आणि वाढवला, त्यांना आपली चूक जोपर्यंत कळून येत नाही, आणि ती दुरुस्त करायचा ते प्रयत्न करीत नाहीत ; तोपर्यंत हा वृक्ष अशीच विषारी फळे देत राहणार आहे. या बाबतीत आपण- ज्यांना येथील प्रशासनाचे नियम बनवण्यात मुळीच स्थान नाही ते-काहीच करू शकत नाहीत. शहाणपणाने आणि समर्थपणे जे राज्य करू शकत नाहीत, त्यांच्या दृष्टीने हद्दपारी आणि तशाच प्रकारचे फतवे, हीच राज्यकारभाराची आवडती साधने आहेत. अशा लोकांना तोंड द्यायचे म्हणजे, आम्हीच आमच्या उच्च ध्येयांचा आणि कायदेशीर धोरणांचा निर्भयपणे आणि जोमाने प्रचार केला पाहिजे आणि त्यानुरूप कृती केली पाहिजे.

स्वराज्य, परकीय नियंत्रण नसलेली संपूर्ण स्वायत्तता, हे आमचे ध्येय आहे. प्रत्येक राष्ट्राने आपले राष्ट्रीय जीवन आपल्याच ध्येयधोरणांनुसार आपल्याच बळाने फुलवावे आणि हा त्यांचाच हक्क आहे, असे आमचे म्हणणे आहे. परकीय राष्ट्रांनी आमच्या संस्कृतीपेक्षा हीन असलेली सभ्यता आमच्यावर लादावी आणि आम्हाला आमच्या वारशापासून वंचित करावे, हे आम्हाला मान्य नाही. प्रदीर्घ गुलामगिरीमुळे आमच्या क्षमतेवर आणि सामर्थ्यावर काही शिंतोडे उडून त्यांवर डाग पडले आहेत, हे आम्हाला मान्य असले तरी आम्हाला आमच्या क्षमतेची आणि सामर्थ्याची जाणीव होत आहे, हेही खरे आहे. शतकानुशतके आमच्यावर अरिष्टे आलीत, आम्हाला पराभव पत्करावे लागलेत, तरी आमचा राष्ट्रीय जोम कायम आहे. अगदी परवा परवा पर्यंत आमच्या पूर्वजांचे लढे सुरू होते. अशा परकीय अंमलाखाली अन्य कोणत्याही राष्ट्रात निर्माण झाले नाहीत, असे बुद्धिमान आणि चारित्र्यसंपन्न लोक आमच्या येथे निर्माण झालेत. अशी अभूतपूर्व जिद्द जोपासणाऱ्या राष्ट्राला तुम्ही केवळ अबोध बालकांचा आणि दुबळ्यांचा देश समजता ? आमच्या पूर्वजांपेक्षा कोणत्याही दृष्टीने आम्ही कमी नाही. आमच्याकडे बुद्धी आहे, धैर्य आहे. आमच्याकडे असीम अशी विविध प्रकारच्या राष्ट्रकार्याची क्षमता आहे. आम्हाला फक्त अवसर पाहिजे, संधी पाहिजे आणि आमची मर्दुमकी गाजवायला योग्य असे क्षेत्र पाहिजे. ते क्षेत्र आणि ती संधी आम्हाला आमचे राष्ट्रीय सरकार, आमचा मुक्त समाज आणि भारतीय संस्कृतीच देऊ शकेल. ह्या गोष्टी जोपर्यंत आम्हाला मिळणार नाहीत तोपर्यंत आम्ही त्या मिळवण्याकरिता आमच्या बुद्धीचा, धैर्याचा आणि क्षमतेचा वापर करू आणि त्यांसाठी अक्षुण्णपणे लढत राहू.

कोणत्याही अन्य राष्ट्राबद्दल किंवा या देशात आता कायद्याने प्रतिष्ठित झालेल्या प्रशासनाबद्दल दु:स्वास बाळगणे आमच्या स्वराज्याच्या ध्येयात बसत नाही. आम्हाला सर्वत्र नोकरशाही आढळते ; त्याऐवजी आम्हाला येथे लोकशाही हवी आहे. आम्हाला येथे परकीय सत्ता आढळते ; त्याऐवजी आम्हाला येथे देशी राज्य हवे आहे. आम्हाला येथे विदेशी नियंत्रण दिसते; ते आम्हाला भारतीय हवे आहे. या आकांक्षांपायी द्वेष व हिंसाचार निर्माण होतो असे म्हणणारे खोटारडे आहेत. प्रेम आणि भ्रातृभाव हा आमच्या देशप्रेमाचा आधार आहे. आमचे

देशप्रेम आमच्या राष्ट्रीय एकतेपलीकडे पसरले असून मानवतेची अंतिम एकता, हे आमचे ध्येय आहे. परंतु आमची एकता ही भावाभावांतील, समान पातळीवरील व्यक्ती व्यक्तींतील, स्वतंत्र मानवगणांतील एकता असेल. मालक व गुलाम, शोषक व शोषित यांच्यातील ही एकता नसेल. आम्ही एक वैशिष्ट्यपूर्ण राष्ट्र, एक वैशिष्ट्यपूर्ण वंश म्हणून आमचे सामूहिक अस्तित्व सिद्ध करू इच्छितो कारण, समग्र मानवातील अंतिम भ्रातृभाव साधण्याचा तो एकच मार्ग आहे. गैरसमज, द्वेष व मत्सर यांना कारणीभूत असलेले व एकतेमध्ये अडथळे निर्माण करणारे हे वरवरचे भेद पुसट करणे, हा काही खरा मार्ग नाही. जे अज्ञानाने आम्हाला आमच्या हक्कांपासून वंचित करतात त्यांचा द्वेष करणे, हे आमच्या हक्कांसाठी लढण्याच्या आमच्या तंत्रात बसत नाही. अपार कष्ट आणि अथक प्रयत्न, व्यक्तिनिरपेक्षपणे सत्याचा धैर्याने पुरस्कार, विहित अशा दबावतंत्राचा आणि नैतिक बळाचा सर्वतोपरी वापर, यांच्याच साहाय्याने आम्ही सुस्थापित होऊ इच्छितो आणि प्रगतीच्या विरोधात असणाऱ्यांना आम्हीं त्यांच्या जागेवरून उखडवू इच्छितो.

आमची कार्यपद्धती स्वावलंबनाची आहे. निःशस्त्र प्रतिकाराची आहे. आम्हाला आमचे उद्योगधंदे वाढवावयाचे आहेत. आपसातील मतभेद मिटवावयाचे आहेत. सार्वजनिक प्रसंग शांततेने आणि व्यवस्थितपणे पार पाडावयाचे आहेत. आमचे स्वच्छतेचे आणि आरोग्याचे प्रश्न सोडवावयाचे आहेत. रुग्णाईतांना आणि दुःखितांना साहाय्य करायचे आहे. दुष्काळपीडितांना दिलासा द्यावयाचा आहे. आमच्या बौद्धिक, शारीरिक आणि तांत्रिक शिक्षणाकडे लक्ष द्यावयाचे आहे. आम्हाला आमचे अंतर्गत प्रश्न, नोकरशाही शासन प्रणालीची वैध अधिकारिता प्रश्नास्पद न करता किंवा कायदा न मोडता, सोडवावयाचे आहेत. राष्ट्रीय पक्षाने अशा रीतीने आपले जाहीर धोरण ठरवले होते आणि स्पष्टपणे स्वीकारले होते. ह्या सर्व बाबी आम्ही कार्यक्षमतेने हाताळू शकतो, हे आम्ही बंगालमध्ये दाखवून दिले होते. लवकरच बंगाल हा एक सशक्त, एकीकृत आणि सुसंघटित प्रांत म्हणून नावारूपास येईल असे चित्र स्पष्ट झाले होते. सुरतेत आमच्यातील अंतर्गत मतभेद शिगेस पोहोचलेत आणि त्यानंतर मग स्वदेशी कार्यकर्त्यांवर आणि त्यांच्याशी सहानुभूती असणारांवर पक्षातील दुय्यम नेत्यांनी दबाव व दडपण आणण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे आमच्या प्रगतीला खीळ बसली आणि आमच्या आशा सफल होण्याऐवजी त्या आम्हास दुरावल्या. परंतु हा अटकाव तात्पुरता आहे. लोकांमध्ये धैर्य आणि विश्वास निर्माण होण्यासाठी आमच्या नेत्यांमध्येही धैर्य आणि निकोप मुत्सद्दीपणा यायला हवा. दमनकारी कायद्यांशी संघर्ष होणार नाही अशा संघटनात्मक नव्या पद्धती, आम्ही शोधून काढल्या पाहिजेत.

स्वावलंबनाला पूरक असे शासनावर दडपण आणण्याचे एक साधन म्हणून, निःशस्त्र प्रतिकाराचे शस्त्र आम्ही उगारले. ह्या धोरणाचे मुख्य सूत्र हे की, जोपर्यंत आमचा कायदे बनवण्याच्या क्षेत्रात, वित्तीय क्षेत्रात आणि प्रशासन क्षेत्रात पुरेसा सहभाग नसेल व त्यांवर आमचे कोणत्याच प्रकारचे नियंत्रण नसेल, तोपर्यंत आम्ही कोणत्याही प्रकारचे सहकार्य

करणार नाही. ज्याप्रमाणे अठराव्या शतकात अमेरिकन सांविधानिक चळवळीचा नारा होता की, ' प्रतिनिधित्व नाही तर कराधानही नाही ' त्याचप्रमाणे आजच्या विसाव्या शतकातील आमच्या कायदेशीर चळवळीचे –कारण आमचे संविधान नाही –घोषवाक्य असेल की, ' आमचे नियंत्रण राहणार नसेल तर आमचे सहकार्यही असणार नाही. ' आमचा हा सहकार्याचा नकार आम्ही '' बहिष्कार'' (बायकॉट) ह्या एका शब्दात स्पष्ट केला आहे. हा बहिष्कार, हा असहकार आमच्या देशाच्या औद्योगिक शोषणासंबंधात, शिक्षणासंबंधात, शासनासंबंधात न्यायिक प्रशासनाच्या संबंधात आणि कोणत्याही कार्यालयीन कामकाजाबाबत असेल. अर्थातच हा सहकार्याचा नकार आम्ही अजूनही पक्का केलेला नाही. अजूनही तडजोडीला वाव आहे. परंतु अशा प्रकारच्या नैतिक दबावाची गरज जसजशी वाढेल आणि ती तातडीची ठरेल, तसतसे हे तंत्र आम्ही अधिक व्यापक आणि रेटा देणारे करणार आहोत.हा आमच्या धोरणाचा पहिला भाग झाला. दुसरे म्हणजे स्वावलंबनाचे बाबतीत असलेले आमचे सुप्त ऊर्जास्त्रोत ह्या बहिष्कारांमुळे खुले होऊ लागतील. विदेशी मालावरील बहिष्कारामुळे अर्थातच आमच्या स्वदेशी मालाच्या उत्पादनाला प्रोत्साहन मिळेल, सरकारी शाळांवर बहिष्कार म्हणजेच आमच्या राष्ट्रीय शिक्षणाचा बहर, ब्रिटिश न्यायालयावरील बहिष्कार म्हणजे आपसातील तडजोडीला प्रोत्साहन. बहिष्काराची व्याप्ती कशी ठरवायची आणि त्यासाठी आवश्यक असलेली स्थिती कशी ओळखायची हा एकच प्रश्न आहे. परंतु ह्या गोष्टी प्रत्येक प्रकरणी वेगवेगळ्या असू शकतात. निःशस्त्र प्रतिकारासंबंधात प्रथम लोकजागृती आवश्यक आहे. त्यानंतर मग हा प्रतिकार सुसंघटित, विनियमित आणि सीमित करता येईल.

आमच्या उत्क्रान्तीतील पहिला मोठा अडथळा म्हणजे आमच्यातील अंतर्गत विवाद. ह्या अंतर्गत विवादामुळे काँग्रेस आतून खिळखिळी झाली आहे आणि बाहेरून मात्र राष्ट्रीय काँग्रेसचा डोलारा तेवढा दिसत आहे. अशा विपन्नावस्थेतील काँग्रेसचे मागच्या वर्षी मद्रास येथे अधिवेशन झाले आणि त्यावेळी तिला महत्त्वाच्या स्थानिक लोकांचा पाठिंबा मिळाला नाही. आता पुन्हा लाहोर येथे अधिवेशन होणार आहे. हे विवाद केवळ वैयक्तिक मतभेदांवरून आणि क्षुल्लक कारणांवरून निर्माण झालेत अशी समजूत करून घेण्यात आपण फार मोठी गल्लत करीत आहोत. अशा लोकमतांच्या लढतीमध्ये वैयक्तिक मतभेद आणि क्षुल्लक कारणे उपस्थित होतात आणि त्यामुळे वैमनस्य निर्माण होते. परंतु या वादविवादातील मुख्य प्रश्न म्हणजे या देशातील भविष्यकालीन स्वयंशासन कोणत्या तत्त्वांवर व कोणत्या स्वरुपाचे असावे, हाच होता. स्वयंशासनाची ही तत्त्वे आणि स्वयंशासनाचे हे स्वरूप लोकशाही पद्धतीचे असावे वा अल्पजनसत्तात्मक (ऑलिगॅरकिक) असावे ? ह्या शासनाची कार्यपद्धती ही संविधानात्मक असावी वा ती स्वेच्छानुसारी आणि वैयक्तिक आवडी निवडीची असावी ? ही चळवळ प्रागतिक व राष्ट्रीय स्वरुपाची असावी वा आपली उद्दिष्टे, धोरणे व तत्त्वे यांच्या बाबतीत संकुचित व पुराणमतवादी असावी ? हे मुख्य प्रश्न होते. राष्ट्रीय पक्ष हा लोकशाहीच्या, सांविधानिकतेच्या आणि प्रगतीच्या बाजूने होता. मवाळ पक्ष हा वृद्ध नेत्यांबद्दल आदर बाळगणारा होता. हे नेते एकेकाळी लोकप्रिय होते. परंतु

आता हे नेते अल्पजनसत्तावादी, स्वेच्छानुसारी कार्यवाहीचे समर्थक, आणि प्रतिगामी असे पुराणमतवादी झाले होते. आपण काय करीत आहोत हेही ह्या पक्षातील लोकांना समजत नव्हते. राष्ट्रीय पक्ष आणि मवाळ पक्ष यांच्या लढतीवर व्यक्तिगत पसंती नापसंती, प्रकृतिवैचित्र्य, विमुखता इत्यादींचे सावट होते. दोन्ही बाजूकडील नेते मंडळी मतभेदाच्या कोणत्याही मुद्यावर, मग तो खरा असो की खोटा, अटीतटीने आपली बाजू घेत आणि शस्त्र म्हणून त्याचा वापर करीत. पक्षान्तर्गत युद्धाच्या सर्व तऱ्हा येथे वापरून झाल्यात. काही मवाळ नेत्यांच्या अडेलतट्टू धोरणामुळे मतभेदाच्या काही महत्त्वाच्या मुद्यांवर चर्चा होऊ शकली नाही. त्यामुळे दोन्ही पक्षांतील तरुण रक्ताची मंडळी अतिशय संतापली आणि सुरत अधिवेशनात हाणामारी झाली. काँग्रेसमध्ये दुफळी निर्माण झाली. राष्ट्रीय प्रगतीच्या दृष्टिकोनातून जर हे प्रश्न सोडवावयाचे असतील तर वैयक्तिक आणि क्षुल्लक मतभेद दूर सारले पाहिजेत आणि खरे प्रश्न निःपक्षपणे आणि स्वच्छपणे विचारार्थ घेतले पाहिजेत.

स्वराज्याचा कोणता आदर्श आम्ही नजरेसमोर ठेवावा, ह्या प्रश्नावरच मुख्यतः मतभेद झालेत. निःशस्त्र प्रतिकाराचे धोरण आणि आणखी काही ठरावांचे स्वरूप हेही मतभेदाचे मुद्दे होते. शेवटच्या मुद्यावर काँग्रेसनेच निर्णय घ्यावयाचा आहे. त्या बाबतीत राष्ट्रीय पक्षाचे म्हणणे एवढेच आहे की, त्यावरील चर्चेला बगल देता कामा नये ; आणि राष्ट्रीय समितीपुढे आपले विचार मांडण्याचा घटनात्मक अधिकार ह्या जहाल मंडळींना बजावता यायला हवा. अन्य मुद्यांबाबत त्यांना आपली उद्दिष्टे आणि धोरणे अबाधित ठेवावयाची आहेत. परंतु त्यांचे म्हणणे असे की, असे हे मतभेद मुक्त चर्चा होत असलेल्या सभेमध्ये एकीभूत प्रगतीच्या आड येता कामा नयेत. ' वसाहतीच्या स्वराज्या ' ऐवजी पूर्ण ' स्वयंशासन ' स्वीकारून स्वराज्या बाबतच्या ठरावासंबंधीचा मतभेद दूर करता येईल. निःशस्त्र प्रतिकारासंबंधीचा मतभेद हा तूर्त जहालांच्या बहिष्काराच्या ठरावाशी निगडित आहे आणि बहिष्काराच्या ठरावाबाबत राष्ट्रीय पक्ष तडजोड करू इच्छित नाही. या बाबतीत त्यांना बहुतांश मवाळांचाही पाठिंबा आहे. येथेही ते तडजोडीला तयार होतील ; पण फक्त निवडून आलेल्या काँग्रेस प्रतिनिधींच्या सभेतच. मर्यादित अशा विषय नियामक समितीला हा अंतिम अधिकार आहे, असे मानायला ते तयार नाहीत. यावरून असे दिसून येईल की, खरा प्रश्न आहे तो घटनात्मकतेचाच. स्वतःला काँग्रेस समजणाऱ्या ह्या संघटनेने अशी काही घटना स्वीकारली आहे की, जी बंदिस्त, एकांगी. लोकशाहीविरुद्ध आहे आणि जी लोकप्रतिनिधींच्या मुक्त निवडणुकी सीमित करणारी आहे. लोकप्रतिनिधी म्हणून निवडणुकीद्वारे आपल्या स्थानावर येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला स्थानापन्न होण्या अगोदरच, ही घटना विशिष्ट ध्येयांना विशिष्ट शब्दांमध्ये बंदिस्त करून स्वीकारायला भाग पाडते. प्रतिनिधींची सरळ निवडणूक घेण्याऐवजी, ही घटना निवडक निकायांच्या आणि संघांच्या माध्यमातून प्रतिनिधींची निवड करते. निवडणुकीला तोंड न देता बऱ्याच जणांना ती महत्त्वाच्या जागी येण्यास प्रवृत्त करते आणि त्यांच्यावर सभेतील महत्त्वाच्या कार्यासंबंधीचे निर्णय सोपवते. ह्या आणि अशा प्रकारच्या तरतुदी कोणताही लोकशाहीवादी पक्ष स्वीकारणार नाही. राष्ट्रीय पक्ष वा मवाळ

पक्ष यांनी वाटल्यास, आपापल्या पक्षाची अशी घटना करावी; पण काँग्रेस ही राष्ट्रीय सभाच असली पाहिजे आणि मुक्त निवडणुकींद्वारे निवडून आलेल्या प्रतिनिधींना तेथे सर्वतोपरी मोकळीक असावयास हवी. सध्याच्या तरतुदींनुसार असलेल्या मर्यादित समितीने ही प्रतिगामी घटना मंजूर केल्यामुळे हे घटनात्मक दोष नष्ट होणारे नाहीत. जुन्या पद्धतीप्रमाणे निवडून आलेली काँग्रेसच आपल्या घटनेतील भावी तरतुदी आणि कार्यपद्धती निश्चित करू शकेल आणि त्याच सर्वत्र मान्य होऊ शकतील, हेच खरे.

काँग्रेसने किंवा ह्या महाधिवेशनाने काही थातुर मातुर उपाययोजना करून हा प्रश्न सुटणार नाही. आपल्या प्रांतीय नेत्यांनी एकत्रितपणे या प्रश्नावर समितीमध्ये विचार करावा व तोडगा काढावा, अशा प्रकारचे अधिकार, प्रांतीय परिषदा ह्या नेत्यांना देतील, तरच ह्या प्रश्नावर तोडगा निघू शकेल. असे केल्याने काँग्रेसमधील मतभेद दूर होतील आणि भविष्यामध्ये काँग्रेस आपले कामकाज सुरळीतपणे करू शकेल. अशा या प्रयत्नांना साथ न देण्याचा काही अल्पमतातील गटांचा विचार असेल, तर प्रांतीय स्तरावर हा विरोध मोडून काढण्याचा आणि बहुसंख्यांच्या इच्छेला मान देण्याचा न्याय्य अधिकार ह्या प्रांतीय परिषदांत बहुमत असणाऱ्या पुढाऱ्यांना असेल. एकदा कार्यप्रणाली ठरवण्यात आली की, मग ती मुक्तपणे निवडून आलेल्या प्रतिनिधींच्या काँग्रेसपुढे, स्वीकारण्याकरिता वा टाकून देण्याकरिता किंवा तीत फेरबदल करण्याकरिता ठेवता येईल. असे केल्याने काँग्रेस पुन्हा घटनात्मक रीत्या प्रतिष्ठापित होईल. तसे झाल्यावर भावनिक प्रक्षोभ आणि हेकटपणा, हे प्रश्नांची उकल करण्याआड कसे येतात याचा सुरत काँग्रेसमधील आपला अनुभव लक्षात घेऊन, पुढे योग्य पावले टाकता येतील.

संयुक्तपणे काम करण्यासाठी काँग्रेसपेक्षा बाहेर स्थिती जास्त अनुकूल आहे. कार्यवाहीच्या आड येतील किंवा त्यातील सुसंवाद बिघडवतील असे दोनच प्रश्न आहेत. पहिला हा की, सध्याच्या सुधारणा स्वीकाराव्यात की सोडून द्याव्यात ? कारण त्यात लोकमान्य अशा कोणत्याच नियंत्रणाला स्थान नाही. किंवा त्यात कोणतेही नवीन घटनात्मक तत्त्व अंगीकारलेले नाही. जे स्वीकारले आहे ते म्हणजे एकाच जातीतील प्रतिनिधींच्या विशेषाधिकाराचे अयोग्य तत्त्व. यामध्ये सहकाराचा मोठा प्रश्न गुंतलेला आहे. पूर्ण स्वराज्य मिळाल्याशिवाय राष्ट्रीय पक्ष असहकाराचे धोरण सोडणार नाही वा त्याबाबत कोणतीही तडजोड करणार नाही अशी एक सामान्यतः समजूत आहे. ही समजूत दूर व्हावी ह्या दृष्टीने राष्ट्रीय पक्षातील लोकप्रिय पुढाऱ्यांनी काहीही केलेले नाही. कारण आपला ठरविलेला आदर्श जनमानसात रुजावा आणि निःशस्त्र प्रतिकाराचे आणि स्वावलंबनाचे तत्त्व अधिकाधिक लोकप्रिय व्हावे असेच त्यांना वाटत होते. त्यामुळे व्यावहारिक राजकारणाचा भाग नसलेल्या ह्या समजुतीच्या प्रश्नावर चर्चा करणे त्यांना इष्ट वाटले नाही. एवढे मात्र खरे की, अशा प्रकारचा प्रस्ताव पुढे मांडणारा पक्ष, हा व्यवहाराचा विचार करणाऱ्या कार्यकर्त्यांचा नसेल. तो असेल ध्येयवादी आणि आदर्शवादी लोकांचा. 'आमचे नियंत्रण

नसेल, तर आमचे सहकार्य नाही ' हे राष्ट्रवाद्यांचे तत्त्व आहे. नियंत्रणविषयक सर्व हक्क नाकारलेले आहेत आणि ते नाकारलेले असतील तोपर्यंत राष्ट्रीय पक्ष असहकाराचाच पुरस्कार करील आणि हा असहकार परिपूर्ण कसा असेल तेच पाहील. उदाहरणादाखल, जर संरक्षक शुल्क आकारण्याचे अधिकार लोकनियुक्त निकायाला दिले गेलेत, तर मग कोणताही जाणता राजकीय पक्ष, व्यापारविषयक असहकार चालू ठेवील असे म्हणवत नाही. किंवा शासकीय नियंत्रणापासून शिक्षण मुक्त केले आणि ते लोकाभिमुख संस्थांकडे सोपवले– लॉर्ड रे यानी असा विचार एकदा मांडला होता– तर मग कोणताही सुजाण राजकीय नेता शिक्षणावर बहिष्कार टाकण्यास सांगणार नाही. किंवा न्यायालयात जर तुम्ही भारतीय न्यायाधीश नेमलेत आणि ते तुमच्या कार्यकारी शासनाऐवजी लोकप्रतिनिधी असलेल्या मंत्र्याला जबाबदार असलेत, तर लोक तडजोडी करायला तयार होतील आणि ते न्यायालयांना सहाय्यक ठरेल. त्याचप्रमाणे जेथे लोकाना आपले विचार मांडता येत नसतील, अशा शासनयंत्रणेशी असहकार म्हणजे लोकांचा महत्त्वपूर्ण सहभाग असलेल्या शासनयंत्रणेशीही त्यांचा असहकार असेल, असे म्हणता येणार नाही. स्वयंसत्ताधीशांची मेहेरबानी स्वीकारण्यास नकार म्हणजे लोकांच्या स्वयंसिद्ध हक्कांनाही नकार, असे म्हणता येणार नाही. उलट, आमच्या ' स्वावलंबन नि निःशस्त्र प्रतिकार आंदोलनाचे धोरण ' हे होते की, स्वराज्यविषयक विविध घटकांशी संबंधित असलेल्या सोयी, सवलती ह्या शांततापूर्ण असा नैतिक दबाव आणून मिळवणे आणि त्या जोपर्यंत मिळत नाहीत तोपर्यंत आमच्यातीलच काही संस्थांना अशा रीतीने उभारणे की, शेवटी त्या नोकरशाहीच्या तशा संस्थांना हुसकून लावून त्यांची जागा घेऊ शकतील. ह्या लोक-अधिकारांचा स्वीकार करणे याचा अर्थ आम्ही आमचे संपूर्ण स्वायत्ततेचे उद्दिष्ट सोडले आहे किंवा पुढे लोकांच्या अधिकारांमध्ये मन मानेल अशी लुडबुड कोणी केली तर आम्ही निःशस्त्र प्रतिकाराचे शस्त्र उगारणार नाही, असा होत नाही. त्याचा अर्थ एवढाच असेल की, संपूर्ण स्वराज्याच्या मार्गावरील ही एक पायरी आहे. फसव्या आणि क्षुल्लक सवलतींमुळे आम्ही आमच्या उद्दिष्टांपासून विचलित होत असू किंवा आम्हाला आमचे खरे हक्क मिळाले आहेत असा भास निर्माण करण्यात येत असेल, तर मात्र मवाळांच्या ह्या वजनदार गटापासून फारकत घेण्यात, आम्ही राष्ट्रवादी कोणतीही कसूर करणार नाही.

दुसरा प्रश्न आहे बहिष्काराची अंमलबजावणी व तीत पडणारी फूट. बंगालबद्दल म्हणाल, तर येथील काही लोक प्रतिगामी व भेकड वाटत असले आणि त्यांना ' बहिष्कार ' हा शब्दही वावडा वाटत असला, तरी एकंदरीत बहुतांश लोक एकमताने बहिष्काराच्या बाजूचे आहेत. परंतु, आता बहिष्काराचे योग्य ते नियमन करण्याची वेळ आली आहे. स्वदेशीच्या ठरावातील ' शक्य तेथवर ' ह्या शब्दांबद्दल राष्ट्रीयवादी लोक नेहमीच नाराजी दाखवत आले आहेत. कारण त्यामुळे काही कच्च्या लोकांची चांगली सोय होते आणि ते ह्या शब्दरचनेचाच फायदा घेऊन पळवाट शोधून काढतात. त्याऐवजी ' सर्वस्व पणास लावून ' अशी या ठरावात शब्दरचना पाहिजे. परंतु बहिष्कारामुळे निर्माण होणाऱ्या प्रश्नांना आपण कसे तोंड देणार याबद्दल विचार करण्याची वेळ आता आली आहे. स्वदेशी वस्तू मिळू शकतात तेथवर

आपण निर्धाराने त्याच वस्तू वापरल्या पाहिजेत. चैनीच्या वस्तू आपण टाळू शकतो. परंतु आपल्याला हेही ध्यानात घेतले पाहिजे की, अशा काही जीवनावश्यक आणि व्यवहारोपयोगी वस्तू आहेत की, ज्यांच्याकरता आपल्याला परक्या देशांवरच अवलंबून राहिले पाहिजे. या बाबतीत कोणत्या देशांतून त्या घ्याव्यात आणि कोणत्या देशांतून त्या घेण्याचे टाळावे यासंबंधीचे मार्गदर्शन लोकाना मिळावयास हवे. अर्थात जे देश भारताच्या इच्छा आकांक्षांबद्दल सहानुभूती बाळगतात त्यांच्याकडूनच अशा आपरिहार्य वस्तू लोकांनी घ्यावयास हव्यात आणि अन्य देशांना त्यांनी वगळावे. हा प्रश्न आपण योग्य तऱ्हेने न हाताळल्यामुळे आपले बहिष्काराचे राजकीय शस्त्र तितकेसे परिणामकारक झाले नाही. आणि परिणामी बंगालच्या फाळणीचा प्रस्ताव आपण हाणून पाडू शकलो नाही. आणखीही काही प्रश्न आहेत. उदाहरणार्थ ; काही व्यापारी व दुकानदार काही विदेशी वस्तू चक्क स्वदेशी म्हणून सांगण्याचा प्रयत्न करतात. चळवळीची पिछेहाट होऊ द्यावयाची नसेल, तर ह्याही प्रश्नाकडे त्वरित लक्ष पुरवले पाहिजे.

तरीही एक शेवटचा प्रश्न राहतोच– हे प्रश्न सोडवले तरी आपण ही चळवळ कोणत्या संघटनेद्वारे चालवणार आहोत ? पुनर्घटित काँग्रेसच्या आधाराने एक वैचारिक आणि कार्यकारी संघटना निर्माण करून तीद्वारे राष्ट्रीय कार्यक्रम राबवण्याची योजना होती. देश सुसंघटित करण्यासाठी हीच एक योजना व्यवहार्य असेल असे वाटते. राष्ट्रवादी व मवाळ पक्षांचे मीलन होऊन एक संयुक्त काँग्रेस जरी उभी राहिली नाही, तरी प्रांतांनी आपापली संघटना मजबूत करावी. कदाचित काँग्रेसला मुळापासून पुनः प्रतिष्ठित करण्यासाठी असे करणे इष्ट होईल. पुरेशा मनुष्यबळाशिवाय जिल्हा संघटना आपले कार्य परिणामकारकपणे करू शकणार नाहीत. यासाठी आम्ही तरुणांच्या सभा व समित्या यांची तरतूद केली होती आणि सुदैवाने बंगालभर अशा सभा समित्यांचे जाळेही लवकरच पसरले होते. परंतु प्रशासकीय आदेशामुळे त्या सभा समित्या निष्प्रभ करण्यात आल्या. आता ह्या संघटनांऐवजी आम्ही तरुणाचे काही खुले गट संघटित करू शकणार नाही का ? साचेबद्ध अशी संघटना नसली तरी हे गट परस्पर सहकार्याने काही समान उद्दिष्टांच्या परिपूर्तीसाठी काम करू शकणार नाहीत का ? ज्या प्रांतांत उभय पक्षातील ऐक्याला वाव असेल अशा प्रांतांतील कृतिशील व विवेकी नेत्यांपुढे मी ही सूचना विचारार्थ ठेवीत आहे.

तर माझ्या मते सद्य परिस्थिती ही अशी आहे. थोडक्यात, राष्ट्रीय पक्षाच्या विचारार्थ मी पुढील धोरणविषयक मुद्दे सुचवतो.–

१. निःशस्त्र प्रतिकाराचे आणि स्वावलंबनाचे शांततामय धोरण हे सर्वस्वी कायद्याला धरून आखणे.

२. ' आमचे नियंत्रण नसेल तर आमचे सहकार्यही नसेल ' या तत्त्वावर आमचे सरकारशी संबंध विनियमित करणे.

३. शक्य तेथवर मवाळ पक्षाशी जुळते घेणे आणि संयुक्त काँग्रेसची पुनःस्थापना करणे.

४. राजकीय आणि आर्थिक बहिष्कार अधिक परिणामकारक करण्यासाठी बहिष्काराच्या चळवळीचे नियमन करणे.

५. साऱ्या देशाची जरी नसली, तरी काही प्रांतांची आमच्या मूळ कार्यक्रमानुसार फेररचना करणे.

६. कायद्याची विरोधी नसणारी आणि तरीही कामगारांना स्वावलंबनाकडे, यशाकडे आणि राष्ट्रीय कार्यक्षमतेकडे नेणाऱ्या सहकारी पद्धतीचा अवंलब करणे. ही पूर्वी इतकी परिणामकारक होणार नसली तरी तिचा उत्साहाने पाठपुरावा करणे आणि कामगारांनी यशोमंदिराकडे वाटचाल करणे.

जुलै, १९०९ — **अरविंद घोष**

कलकत्ता.

## ३०. 'कर्मयोगिन्' चा आदर्श

**'' कर्मयोगिन् '' हे श्रीअरविंदांनी सुरू केलेल्या नियतकालिकाचे नाव. ' स्वतःला ओळखणे हे आमचे आद्य कर्तव्य आहे. . . आमच्या धर्माचे, समाजाचे, तत्त्वज्ञानाचे, राज्यव्यवस्थेचे, साहित्याचे, कलेचे, न्यायमीमांसेचे, विज्ञानाचे, विचारांचे, आमचे म्हणून जे काही आहे, त्या सर्वांचे मर्म जाणून घेणे हे ' कर्मयोगी ' चे ' उद्दिष्ट ' त्यांनी या लेखात विशद केले आहे.**

भारतात एक राष्ट्र साकार होत आहे आणि साऱ्या जगाचे डोळे तिकडे लागले आहेत. ही प्रक्रिया वेगाने होत आहे आणि ती सर्वांना स्पष्टपणे दिसत आहे. जे त्या निर्मितीकडे सहानुभूतीने पाहत आहेत व ज्यांना समज आहे त्यांना त्या निर्मितीमध्ये कोणत्या प्रेरणा आहेत, कोणती सामग्री वापरली जात आहे, हे स्पष्टपणे कळून येत आहे. हे ईश्वरी स्थापत्यकाम ते लक्षपूर्वक न्याहाळीत आहेत. हे राष्ट्र म्हणजे निसर्गाच्या कार्यशाळेतील एखादा नवा वंशवृक्ष नाही ; तसेच अलीकडील परिस्थितीमुळे ही निर्मिती आपसुख होत आहे, असेही नाही. ह्या पृथ्वीवरील एक प्राचीन वंश, एक सर्वोत्कृष्ट सभ्यता आणि संस्कृती येथे आहे. ही संस्कृती अत्यंत जीव्वट अशी असून, हिने वारंवार महानतेला जन्म दिला आहे. अत्यंत गभीर असा जीवनानुभव येथे आहे. ही संस्कृती विलक्षण प्रभावशाली आहे. अन्य मानवी सभ्यतांतील विविध बलस्त्रोत आणि अन्य मानवी वंशांतील विविध रक्तगट आत्मसात केल्यानंतर, ही संस्कृती आता एकात्मक जाणिवेसह राष्ट्र-उभारणीचा प्रयास करीत आहे. या अगोदर एक संस्कृती आणि एक जीवनधाटी असलेल्या संलग्न राष्ट्रांचा समुदाय, अंगभूत अशा एकात्मतेमुळे एकजीव होत असे आणि आपल्या अतिरिक्त प्रसवशीलतेमुळे नवनवीन वैविध्ये आणि विभिन्न विभाग निर्माण करीत असे. तरीही एका नवीन अशा खंडाची संघटना निर्माण करण्यात येणाऱ्या अडथळ्यांवर मात करणे शक्य होत नव्हते. ह्या अडथळ्यांवर मात करण्याची वेळ आता येऊन ठेपली आहे. आपल्या प्रदीर्घ इतिहासकाळात या दिशेने यत्नशील असलेला येथील मानववंश आता या अगदी नवीन परिस्थितीत पुन्हा प्रयत्न करणार आहे. हे प्रयत्न यशस्वी होतीलच अशी अटकळ कोणताही निष्णात निरीक्षक बांधू शकेल. कारण मार्गातील महत्त्वाचे सारे अडथळे दूर झाले आहेत वा त्यांना दूर सारण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. परंतु, आम्ही याच्याही पुढे जाऊन असे म्हणू इच्छितो की, या कामामध्ये निश्चितपणे यश मिळणारच आहे. कारण भारताचे स्वातंत्र्य, एकता आणि महानता ह्या साऱ्यांची जगाला आवश्यकता आहे. हा विश्वास मनी बाळगून ' कर्मयोगिन् ' आपल्या कामास हात घालणार आहे. या कामामध्ये कितीही मातब्बर अडचणी समोर आल्या, तरी ' कर्मयोगिन् ' आपल्या उद्दिष्टांपासून तसूभर देखील ढळणार नाही. ईश्वर आमच्या

बाजूने आहे अशी आमची श्रद्धा आहे. या श्रद्धेपोटी आम्ही निश्चितच विजयी होणार आहोत. जगाला आमची गरज आहे. मानवतेचे प्रेम आणि मानवांची, देशाची, वंशाची आणि धर्माची सेवा आणि ह्यांच्यावरील आमचे प्रेम आमची मने शुद्ध करील आणि या संघर्षात कार्यरत होण्याची आम्हाला प्रेरणा देईल.

आम्ही हाती घेतलेले काम हे यंत्रवत पार पाडण्यासारखे नाही. नैतिक आणि आध्यात्मिक स्वरुपाचे हे काम आहे. सरकार बदलणे एवढेच आमचे ध्येय नाही. आम्ही एक नवे राष्ट्र उभारू इच्छितो. राजकारण हा त्या कार्याचा एक भाग आहे, पण फक्त भागच. आम्ही फक्त राजकारणाकडेच लक्ष देऊ ; फक्त सामाजिक प्रश्न, ईश्वरवाद किंवा तत्त्वज्ञान, किंवा फक्त साहित्य व विज्ञान यांकडेच पाहू, असे नाही. ह्या साऱ्यांचा अंतर्भाव आम्ही एकाच गोष्टीत करतो आणि ती म्हणजे धर्म–आमचा राष्ट्रधर्म. आमचा राष्ट्रधर्म आम्ही वैश्विकच मानतो. निसर्गाचे एक मोठे तत्त्व आहे. मानवी उत्क्रांतीचे सार त्यात आहे. ते म्हणजे अध्यात्म ज्ञान. आध्यात्मिक अनुभूती. या ज्ञानाची जोपासना करणे आजपर्यंत भारताच्या वाट्याला आलेले आहे. नुसती जोपासना नाही तर त्या ज्ञानाचा आदर्श जगासमोर ठेवणे आणि त्याचा प्रसार करणे. यालाच सनातन धर्म, शाश्वत धर्म म्हणतात. परकीय प्रभावाच्या ताणाखाली या धर्मावरील आपली पकड भारताने सोडली, असे नाही. परंतु त्यातील जीवंत स्वत्वाचा त्याला विसर पडू लागला. कारण आचरणात नसेल तर भारताच्या त्या धर्मात काहीच अर्थ राहत नाही. आपल्या दैनंदिन आचरणात तो असायला पाहिजे. एवढेच नाही तर समग्र राष्ट्रीय जीवनातच तो असायला हवा. त्या धर्माचे मर्म आपल्या समाजात, राजकारणात, साहित्यात सर्वत्र व्यापलेले असले पाहिजे. आमचे विज्ञान, आमचे वैयक्तिक चारित्र्य हे सर्व धर्ममूलक असले पाहिजे. आमच्या भावभावना आणि आशा-आकांक्षा ह्या साऱ्यांमध्ये हा धर्म असला पाहिजे. ह्या धर्माचे मर्म समजून घेणे, एक जीवंत सत्य म्हणून त्याची अनुभूती होणे, त्यामुळे आमच्या उच्च भावभावनांना उधाण येणे आणि जीवनातील आमच्या कृतींमधून तो धर्म प्रगट होणे यालाच आम्ही कर्मयोग म्हणतो. मानवी जीवनापुढे या योगाचा आदर्श ठेवण्यासाठीच आज भारत जागा होत आहे. या योगामुळेच भारताला आपले स्वातंत्र्य मिळवण्याची शक्ती प्राप्त होणार आहे. भारत संघटित होणार आहे. महान बनणार आहे. या योगामुळेच हे सारे जोपासण्याचे सामर्थ्य भारताला मिळणार आहे. ही आध्यात्मिक क्रान्ती आम्हाला क्षितिजावर दिसू लागली आहे. अन्य भौतिक क्रान्त्या म्हणजे त्या आध्यात्मिक क्रान्तीचा केवळ आभास–तिची थोडीशी प्रतिक्रिया.

युरोपीय माणूस यंत्रणा निर्माण करून बरेच काही साधतो. शासनपद्धतीद्वारा आणि सामाजिक योजनांद्वारा मानवतेला उजाळा देण्याचा त्याचा प्रयत्न असतो. पार्लमेंटच्या कायद्याने समृद्धी येईल असे त्याला वाटत असते. यंत्रे आणि यंत्रवाद यांना फार महत्त्व आहे. परंतु ते एक अंतस्थ साधन म्हणून. बळ म्हणून. शक्ती म्हणून. एकोणविसाव्या शतकात भारताला राजकीय मुक्तता हवी होती, सामाजिक सुधारणा हव्या होत्या. धर्मजागृती

आणि पुनर्निर्माण हवे होते. परंतु अपयशच भारतीयांच्या पदरी पडले. कारण त्यांनी पाश्चात्यांचे हेतू मनी बाळगले होते. त्यांची कार्यपद्धती स्वीकारली होती. आपल्या वंशाचा इतिहास, आपल्या देशाची मनोभावना, आपल्या देशाचे भवितव्य यांच्याकडे दुर्लक्ष केले. युरोपीय शिक्षण, युरोपीय यंत्रसामग्री, युरोपीय संघटनापद्धती आणि युरोपीय जामानिमा स्वीकारला तर युरोपीय चैतन्य, तेथील प्रगती आणि भरभराट आपणही साधू शकू अशी येथील लोकांनी कल्पना करून घेतली. एकोणविसाव्या शतकातील इंग्रजाळलेल्या लोकांचा अनुभव विसाव्या शतकातल्या लोकांनी लक्षात घेतला आणि त्यांचे आदर्श, त्यांची उद्दिष्टे आणि कार्यपद्धती आम्ही कुचकामी ठरवली. आम्हाला वर्तमानाचाच बडेजाव नाही. आम्ही मागेही पाहतो आणि पुढेही. आमच्या वंशाला एक उज्वल असा फार मोठा इतिहास आहे. भविष्यातही आम्ही फार मोठा इतिहास निर्माण करू, असे आमचे भागधेय आहे.

कौन्सिलातील सदस्य संख्या वाढवून, निवडणुकांचे धोरण अंमलात आणून, वसाहतीचे स्वराज्य आणून किंवा यांसारख्या राज्यशास्त्राच्या एखाद्या युरोपीय तंत्राचा वापर करून आम्ही राजकीय मुक्ती साधू शकू यावर आमचा विश्वास नाही. ही सारी साधने आम्ही आमच्या राजकीय संघर्षामध्ये नाकारतो असे नाही, परंतु साधने म्हणून वा आदर्श म्हणून ती परिपूर्ण आहेत, असे आम्हाला वाटत नाही. आमचे उद्दिष्ट फार पलीकडचे आहे आणि ते गाठण्यासाठी या साधनांचा वापर नगण्य ठरतो. ब्रिटिश साम्राज्याचा एक दूरवरचा हिस्सा, किंवा युरोपीय सभ्यतेचा युरोपवरच अवलंबून असलेला एक भाग म्हणून, ही साधने कदाचित् पुरेशी ठरतील. भविष्यात असे होणार असेल तर तेवढ्यासाठीच आम्ही आमचे बलिदान करावयास तयार नसू. उलट आम्हाला विश्वास वाटतो की, भारत आपले स्वतःचे जीवन जगणार आहे ; स्वतःची संस्कृती फुलवणार आहे ; जगातील अन्य राष्ट्रांच्या आघाडीवर असणार आहे आणि जे राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि नैतिक प्रश्न सोडवण्यात युरोप अपयशी ठरला आहे ; ते सारे प्रश्न वारंवार विविध प्रयोग करून, विविध चुका करून सोडवण्याचे प्रयत्न भारत करीत आहे ; आणि त्याच्या दृष्टीने हीच प्रागतिकता आहे. आमची उद्दिष्टे जितकी महान आहेत तितकीच आमची साधनेही महान असतील आणि या उद्दिष्टपूर्तीसाठी जी साधने आम्हाला हवी असतील तीही आम्ही स्वबळावर आमच्या शाश्वत शक्तीच्या आधाराने शोधणार आहोत.

अनुकरणप्रिय माकडाप्रमाणे युरोपीयांचे अनुकरण करून, त्यांची यंत्रणा स्वीकारून आम्ही येथील समाजाची नवी रचना करू शकू यावर आमचा विश्वास नाही. विधवा पुनर्विवाह, जातींच्या ठिकाणी वर्गरचना, प्रौढविवाह, आंतरजातीय विवाह, सहभोजन आणि अशाच प्रकारचे, समाजसुधारक सुचवीत असलेले जुजबी उपाय केवळ यांत्रिक बदल घडवून आणू शकतात. या उपायांचे गुणदोष काहीही असोत, परंतु ते राष्ट्राचा आत्मा सचेत ठेवू शकत नाहीत किंवा राष्ट्राची अधोगती रोखू शकत नाहीत. हे आत्मचैतन्यच आपल्याला तारणार

आहे. आमचे मन आम्ही मुक्त आणि विशाल केल्याशिवाय आम्ही सामाजिक व राजकीय दृष्ट्या मुक्त व महान होऊ शकणार नाही, होणार नाही.

पाश्चात्यांपासून घेतलेल्या उसन्या, संकुचित आणि निम्न दर्जाच्या धार्मिक कल्पनांवर आधारलेल्या नव्या पंथांची संख्या वाढवून किंवा हिंदु धर्माचे कलेवर आणि त्याचे बाह्य आडंबर टिकवण्यासाठी उभ्या केलेल्या संघटनांमुळे आम्ही आमचे आध्यात्मिक स्वास्थ्य, ऊर्जस्वलता, आणि महानता परत मिळवू शकू, असे आम्हाला वाटत नाही. भौतिकवाद आणि मुक्त विचार यांच्या संधिकालाच्या बाहेर पडून नवीन धर्मविचार आणि धर्मानुभव यांच्या समन्वयाकडे जग वाटचाल करीत आहे. अंतिम एकतेवर दुर्दम्य अविचल श्रद्धा असल्यामुळे सर्व प्रकारांच्या धर्मविचारांचा स्वीकार करणारे, असहिष्णुतेपासून पूर्णतया मुक्त असे हे नवीन जागतिक धर्मजीवन असेल. विज्ञान आणि धर्म, विविध देवदेवता, ख्रिश्चन, मुस्लिम व बुद्ध हे धर्मपंथ, या सर्वांना व्यापणाऱ्या पण तरीही यां सर्वांपासून वेगळ्या अशा एका आध्यात्मिक विचाराकडे जग वाटचाल करीत आहे. आमचा धर्म अतिशय शंकेखोर पण तितकाच निष्ठावानही आहे. कारण या धर्मातच अंतिम सत्याबाबत असंख्य शंका घेतल्या गेल्या व सत्यान्वेषणाचे अधिकाधिक प्रयोग केले गेलेत. त्यामुळे हा धर्म शंकेखोर ठरतो. निष्ठावान यासाठी की, या धर्मात गभीर अनुभूती आणि विविध स्तरांवरील आध्यात्मिक ज्ञान निष्ठावंतांनी साठवून ठेवले आहे. असा हा विशाल हिंदुधर्म–एकच धर्ममत नसलेला किंवा अनेक धर्ममतांचे कडबोळे नसलेला, सामाजिक चौकट नसलेला परंतु भूत आणि भविष्यातील सामाजिक उत्क्रान्तीला चालना देणारा, कोणतीही गोष्ट आपल्या अनुभवाने पारखून घेणारा व मगच तिचा आत्मोन्नतीसाठी उपयोग करून घेणारा–अशा आमच्या हिंदुधर्मावर हा नवा जागतिक धर्म आधारलेला असेल. ह्या सनातन धर्माचे पवित्र ग्रंथ अनेक आहेत. वेद, वेदान्त, गीता, उपनिषदे, दर्शने, पुराणे, तंत्र हे तर आहेतच पण बायबल आणि कुराण देखील याला त्याज्य असणार नाहीत. परंतु खरे तर याचा आधारग्रंथ म्हणजे हृदयात सतत निवास करणारे असीम असे आत्मतत्त्व. या आपल्या अन्तर्मनातील आध्यात्मिक अनुभूतींमध्ये आम्हाला ह्या विश्वात्मक धर्मग्रंथाचा आधार मिळेल. ज्ञान, प्रेम आणि सदाचार यांचा उगम येथे असेल. कर्मयोगाचा आधार व त्याची प्रेरणा येथे असेल.

मानवतेच्या भल्यासाठी भारताची उभारणी करण्यात सहाय्यभूत होणे हे आमचे ध्येय असेल. राष्ट्रवादाची ही भावना आम्ही जाहीरपणे जोपासतो. आम्ही साऱ्या मानवतेला आवाहन करतो. म्हणतो, आता या भौतिकतेच्या बाहेर पडले पाहिजे. ज्या एका गभीर उच्च व विशाल जीवनाकडे मानवता वाटचाल करीत आहे त्या दिशेने आपली पाऊले वळली पाहिजेत. आपण तिकडे वेगाने झेप घेतली पाहिजे. मानवतेपुढे असलेल्या समस्या ह्या आपल्या सुखासाठी व चैनीसाठी बाह्य निसर्गावर मात करण्याने केवळ सुटणार नाहीत ; तर अंतरंगावर विजय मिळवून त्या सोडवाव्या लागतील. त्यासाठी बुद्धीवर ताबा मिळवला पाहिजे. आत्मशक्ती वश करायला पाहिजे. मनुष्य हा अन्तर्बाह्य स्वतंत्र आहे आणि

आपल्या आत्मशक्तीमुळे तो बाह्य निसर्गावर मात करू शकतो हे त्याने सिद्ध केले पाहिजे. यासाठी आशिया खंडाचे पुनरुत्थान आवश्यक आहे. हे पुनरुत्थान महान भारताच्या मुक्ततेशिवाय शक्य होणार नाही. भारत मुक्त होणे हे अखिल मानवतेच्या हिताचे आहे. इंग्लंडच्याही. म्हणून भारत आपल्या स्वातंत्र्याचा हक्क मांडत आहे.

आम्ही राष्ट्राला सांगू इच्छितो, " भारताने भारतासारखे असावे, युरोपसारखे नाही. ईश्वराची हीच इच्छा आहे. दुसऱ्याचे अवसान घेऊन आम्ही उभे राहू इच्छितो, हे चूक आहे. स्वतःमध्येच आम्ही पुनरुज्जीवनाचे स्त्रोत शोधले पाहिजेत. शक्ती मिळवली पाहिजे. आम्ही आमचा इतिहास जाणून घेतला पाहिजे. भविष्यासाठी त्यातून प्रेरणा घेतली पाहिजे. स्वतःला ओळखणे हे आमचे आद्य कर्तव्य आहे. आमच्या शाश्वत जीवनाचा नियम आम्हाला शोधून काढावयाचा आहे. आम्हाला आमचा स्वभाव ओळखावयाचा आहे. यासाठीच आमचे सारे प्रयत्न असतील. आमच्या धर्माचे, समाजाचे, तत्त्वज्ञानाचे, राज्यव्यवस्थेचे, साहित्याचे, कलेचे, न्यायमीमांसेचे, विज्ञानाचे, विचारांचे, आमचे म्हणून जे काही आहे, त्या सर्वांचे मर्म जाणून घेणे हे ' कर्मयोगिन् ' चे उद्दिष्ट असेल. हे जाणून घेतल्यावर आम्ही स्वतःला आणि देशाला सांगू शकू की, "हा आमचा धर्म आहे." केवळ भारतीय दृष्टिकोणातून आणि भारतीय ज्ञानपरंपरेतून आम्ही समग्र युरोपीय सभ्यतेचे पुनरीक्षण करू आणि आमच्यावर ज्या पाश्चात्य गोष्टींचा विपरीत प्रभाव पडला असेल, त्या साऱ्या आम्ही झुगारून देऊ. पाश्चात्यांकडून जे काही आम्हा भारतीयांना घ्यावेसे वाटते ते आम्ही भारतीय म्हणून घेऊ. आमच्या ह्या धर्माचा शोध घेतल्यावर आम्ही प्राणपणाने त्याचा अंगीकार करू, तो उघडपणे जगू. हा धर्म आमच्या जीवनाचा अविभाज्य भाग बनलेला असेल. आमच्या वैयक्तिक आचरणात, आमच्या सामाजिक जीवनात आणि आमच्या राजकीय प्रयत्नांमध्येही तो ओतप्रोत असेल.

आम्ही प्रत्येकाला सांगू, विशेषकरून जे भारताचे, नव्हे जगाचे आणि पर्यायाने ईश्वराचे कार्य करू इच्छितात अशा सर्व युवकांना सांगू की, आपण जर भौतिकवादी नजरेने पाहत असाल, आणि युरोपीय विचारांचा आपल्या मनावर पगडा असेल, तर आपण हे आदर्श मनात बाळगू शकणार नाही, मग त्यांची पूर्ती तर दूरच. भौतिकदृष्ट्या तुम्ही कंगाल आहात. आध्यात्मिक-दृष्ट्या तुम्ही राजे आहात. भारतीय व्यक्तीच सर्व गोष्टींवर श्रद्धा ठेवू शकते, सर्व संकटांना तोंड देऊ शकते, सर्व गोष्टींचा त्याग करू शकते. म्हणून अगोदर भारतीय बना. तुमच्या पूर्वजांचा वारसा मिळवा. आर्यांचे विचार, त्यांची शिस्त, त्यांचे चारित्र्य, त्यांचे जीवन आत्मसात करा. वेदान्त, गीता आणि योग अभ्यासा. केवळ बुध्दीने व भावनेने अभ्यासा असे मी म्हणत नाही, तर तुमच्या जीवनात ते आत्मसात करा. त्यांच्या आधाराने जगा आणि पहा तुम्ही किती बलशाली आणि महान बनता ते. तुम्ही निर्भय आणि अजिंक्य व्हाल. तुम्ही जीवनाला निर्भयपणे सामोरे जाल आणि मृत्यूचे देखील तुम्हाला भय वाटणार नाही. 'अडचण', 'संकट' 'अशक्य' असे शब्दही मग तुमच्या शब्दकोषात

आढळणार नाहीत. आत्मशक्तीमध्येच शाश्वत बळ असते. ती तुम्ही प्रथम मिळवली पाहिजे. हे अंतर्गत स्वराज्य तुम्ही प्रथम मिळवले पाहिजे. बाह्य जगतातील स्वराज्य हे त्यानंतरचे. तुम्हाला बलिष्ठ करण्यासाठी भारतमाता तुमच्या त्या उपासनेची वाट पाहत आहे. तिच्या ठिकाणी श्रध्दा ठेवा. तिची सेवा करा. तुमच्या सर्व आकांक्षा तिच्या पायाशी समर्पण करा. तुमचा स्वल्प अहं राष्ट्राच्या अहंतेत विसर्जित करा. तुमच्या वेगळ्या वैयक्तिक स्वार्थाची मानवतेच्या सेवेत आहुती द्या. स्वतःमध्ये सर्व शक्तींचा मूळ स्त्रोत अनुभवा. आणि पहा, साऱ्या गोष्टी, सामाजिक परिपूर्णता, बौद्धिक प्रकर्ष, राजकीय स्वातंत्र्य, मानवी विचारांवर प्रभुत्व आणि जगाचे नेतृत्व ह्या साऱ्या गोष्टी तुमच्याकडे चालत येतील.

● ● ●

## ३१. भारत जागा होत आहे

**भारताच्या नवजागरणाची स्पंदने बाबू अरविंदांनी या लेखात टिपली आहेत. ''आपल्यातील विकसनशील चैतन्य हे विविध प्रकारच्या क्रियाकलापांद्वारा आपल्यातील शक्ती व आनंद प्रकट करीत असते. राष्ट्रातील आंदोलनाच्या प्रत्येक पैलूवर तेथील जनतेच्या वैशिष्ट्यांचा विशेष प्रभाव पडत असेल; आणि प्रत्येक नवीन विकास कार्य हे आत्मप्रकटीकरणाचे माध्यम म्हणून, राष्ट्र जर स्वीकारत असेल, तर त्या राष्ट्रात प्रचंड चैतन्य सळसळू लागेल.' ही सळसळ अरविंदांना जाणवली आणि त्या भावनेचे प्रतिबिंब प्रस्तुत लेखात पडले आहे.**

कोणत्याही एका क्षेत्रात होणारे जागरण हे राष्ट्रीय पुनरुत्थानाच्या दृष्टीने चिरस्थायी नसते. राष्ट्राचा आत्मा जेव्हा जागा होतो, तेव्हाच खरे तर, राष्ट्र सर्वार्थाने चेतन बनते. आपल्यातील विकसनशील चैतन्य हे विविध प्रकारच्या क्रियाकलापांद्वारा आपल्यातील शक्ती आणि आनंद प्रकट करीत असते. आनंदासाठीच जग आहे. ह्या आनंदासाठीच परमात्मा हा वैश्विक खेळ सुरू करतो. विविध प्रकारच्या आत्मप्रकटीकरणातच त्या परमतत्त्वाला आनंदाची अनुभूती होते. दोन माणसे सारखी नसण्यामागे, दोन राष्ट्रे सारखी नसण्यामागे, हेच खरे कारण आहे. मानवतेच्या सर्वसाधारण स्वभावधर्माव्यतिरिक्त, प्रत्येकाचा व्यक्तिगत स्वभाव वेगळा असतो. सर्वसाधारण मानवी प्रेरणा आणि क्रियाकलाप यांच्या प्रतिपूर्तीसाठीच केवळ नव्हे तर आपल्या स्वतंत्र शक्तींचा आणि आपल्या स्वतंत्र अशा वैशिष्ट्यांचा विकास व्हावा, अशी प्रत्येक राष्ट्राची इच्छा असते. ही इच्छा पूर्ण झाली नाही आणि अशा रीतीने विकास झाला नाही, तर राष्ट्र कालौघात नष्ट होते. राष्ट्रीय आंदोलनाचा जोम जोखण्याचे दोन प्रकार आहेत. राष्ट्र जर केवळ अनुकरणशील असेल, केवळ परकीय गोष्टी यांत्रिकपणे स्वीकारीत असेल आणि राष्ट्राला तात्कालिक यश मिळत आहे असे दिसून येत असेल तरी, असे राष्ट्र स्वतःची सृजनशक्ती गमावून बसलेले असते आणि कालांतराने ते नष्ट होते. युरोपखंडातील प्राचीन राष्ट्रांनी जेव्हा रोमन संस्कृती आणि तेथील शांती आणि भरभराट, स्वतःची वैशिष्ट्ये सोडून स्वीकारण्याचा प्रयत्न केला, तेव्हा ती सारी राष्ट्रे नष्ट झालीत. उलट, राष्ट्रातील आंदोलनाच्या प्रत्येक पैलूवर तेथील जनतेच्या वैशिष्ट्यांचा विशेष प्रभाव पडत असेल, आणि प्रत्येक नवीन विकास कार्य हे आत्मप्रकटीकरणाचे माध्यम म्हणून जर ते राष्ट्र, ते स्वीकारत असेल, तर त्या राष्ट्रात प्रचंड चैतन्य सळूसळू लागेल. ते राष्ट्र वर्धिष्णु राहील. अशा राष्ट्रात होणाऱ्या वैचारिक, सामाजिक आणि राजकीय क्रान्त्या ह्या चिरजीवी ठरतील. ही राष्ट्रे टिकून राहतील आणि समृध्द होतील.

एकोणविसाव्या शतकातील भारत हा अनुकरणप्रिय, आत्मविभ्रमी आणि तकलादू होता. भारतात युरोपाची यशस्वी नक्कल करून दाखवणे, हेच त्याने आपले ध्येय ठरवले होते. हे ध्येय नजरेसमोर ठेवताना त्याला भगवान श्रीकृष्णाच्या गीतेतील 'स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः' या वचनाचे जणू विस्मरण झाले होते. स्वधर्मातील निधनामधून नवा जन्म मिळतो. परतु परकीयांचे अनुकरण यशस्वी झाले, तर त्यामुळे केवळ आत्मघातच साधतो. आपण स्वतःच्या युरोपीयीकरणात यशस्वी झालो असतो, तर आपण आपली अध्यात्मक्षमता, आपली बौद्धिक शक्ती, आपली राष्ट्रीय पुनःस्थापकता आणि स्वतःचा कायाकल्प करून घेण्याची ताकद गमावून बसलो असतो. अशा प्रकारचा आत्मघात आपण इतिहासकाळात करून घेतला होता. त्यात आणखी या नव्या वास्तवाची भर पडली असती. देशातील सर्व क्रियाकलाप हा परकीयानुसारी झाला असता, तर असा परिणाम अपरिहार्यपणे झालाच असता. परंतु याच काळातील बंगाल व पंजाबमधील धार्मिक आन्दोलने, महाराष्ट्रातील राजकीय ध्येयाकांक्षा आणि बंगालमधील साहित्यिक चळवळी यांमुळे देशातील प्राणशक्ती टिकून राहिली. येथेही परकीय विचारांच्या आणि रीतिभातींच्या दडपणाखाली भारताची एक विशिष्ट मानसिकता आणि जीवंतपणा एखाद्या झऱ्यासारखा स्त्रवत राहिला आणि ह्या जीवघेण्या स्पर्धेत यश आमच्या स्वधर्माच्या बाजूने झुकले आणि भारताच्या पुनरोद्धाराची खात्री वाटू लागली. हिंदुधर्मातील एका पुराणवादी घटकामुळे–हा घटक कितीही तमोगुणी,जड, ज्ञानविरोधी, निष्फळ असेना का–देश वाचला. नाही तर जी काही तोडफोड आणि कार्यहानी झाली, ती अधिक झाली असती आणि वेगाने झाली असती. परंतु दरम्यानच्या काळात आम्हाला उसंत मिळाली आणि राष्ट्रीय स्वत्व अंकुरले. आम्ही ते जोपासू शकलो. धर्माच्याच अनुषंगाने भारताचा आत्मा प्रथम जागा झाला आणि विजयाकडे त्याची वाटचाल सुरू झाली. या यशाची चाहूल आम्हाला लागली होती. काही सुचिन्हेही दिसू लागली होतीच. परंतु या घटनेची खरी सुरुवात तेव्हा झाली, जेव्हा कलकत्त्यातील एका सुशिक्षित तरुणाचे जीवनपुष्प, अशा एका निरक्षर, हिंदुधर्मी, आत्मज्ञ, परमेश्वरतुल्य व्यक्तीच्या चरणावर समर्पित झाले, तेव्हा. ह्या समाधिपूत व्यक्तीला पाश्चात्य शिक्षणाचा वा विचारांचा स्पर्शही झालेला नव्हता. पण ही राष्ट्राची जीवघेणी लढाई आम्ही त्या व्यक्तीच्याच बळावर जिंकू शकलो. सारे जग आपल्या हातात घेऊन त्याला बदलण्याची शक्ती त्या तरुणात असल्याचे, त्या महात्म्याने ओळखले होते. भारत जागा आहे, तो केवळ आपले अस्तित्वच टिकवून राहणार नाही, तर आपल्या आध्यात्मिक बळावर जग जिंकणार आहे, अशी सुचिन्हे त्या घटनेवरून दिसू लागली. हे जागरण पूर्ण झाल्यावर, राष्ट्रीय आन्दोलनातील एका घटकाने आपल्या कल्पनेनुसार ब्रिटिशपूर्व भारताच्या पुनर्रचनेचा घाट घातला. परंतु हे होणे नव्हते. जाड्य, कोणत्याही बदलाला व विकासाला नकार, ह्या गोष्टी आमच्या तत्त्वज्ञानानुसार तमोगुणाचा परिपाक आहेत. तमोगुणाचे आधिक्य झाले की विघटन आणि सर्वनाश सुरू होतो. स्वसंरक्षणासाठी आक्रमकपणाही आवश्यक आहे. जेव्हा विजिगीषा लोप पावते, तेव्हा जिजीविषा पण नष्ट होते. जे नेहमी एकाच ठिकाणी

स्वसंरक्षणाच्या चिंतेत राहते, जे निवृत्त होऊन आपल्याच कोटरात सुरक्षित राहू इच्छिते, त्याचा पराजय अटळ आहे. ते आक्रसेल आणि जगातील जीवंत वस्तूंमधून नामशेष होईल. बंद पडलेल्या 'संध्या' च्या अलीकडच्या अंकात हे स्पष्टपणे नमूद केलेले आहे. हिंदुधर्म हा नेहमीच परिवर्तनीय आणि विजिगीषु होता. त्याने आक्रमकांशी प्राणपणाने लढा दिला, त्यांची बलस्थाने जिंकलीत, त्यांचे विचारधन लुटले, जे काही मौल्यवान होते ते आपलेसे केले, जे काही मिळाले ते आत्मसात केले आणि जे काही निःसत्त्व होते ते बाहेर घालवले किंवा त्याचे अस्तित्व येथे अशक्य होईल अशी स्थिती त्या धर्माने निर्माण केली. परंतु जेव्हा जेव्हा त्याने स्वसंरक्षणाचा पवित्रा घेतला तेव्हा तेव्हा तो अधिक संकुचित होत गेला आणि त्याच्या तात्पुरत्या विघटनाची चिन्हे दृष्टिगोचर होत गेली.

राष्ट्राचा आत्मा एकदा धार्मिक अंगाने जागा झाल्यावर,मग संधी मिळताच आणि तशी वेळ येताच राष्ट्रीय अस्तित्वाच्या सर्वच बौध्दिक आणि आध्यात्मिक क्रियाकलापांमध्ये ही जागृती जाणवू लागली. बंगालच्या फाळणीच्या काळात युरोपीयांविरुद्धच्या उसळून आलेल्या भावनांना सुयोग्य संधी लवकरच मिळाली. क्रोध, प्रतिघाताची इच्छा आणि सूडघेऊपणा ह्या काही मुळात चांगल्या अनुकरणीय बाबी नाहीत. परंतु ईश्वर त्यांची योजनां आपल्या कार्यसिद्धीसाठी करतो. आणि मग वाईटातूनही चांगले निपजते. या भावनांमुळे औदासिन्य आणि किंकर्तव्यता कुठच्या कुठे पळून गेली. त्यांची जागा उत्साहाने आणि उर्जस्वल अशा भावभावनांनी घेतली. राष्ट्रीय अस्मितेने ह्या ओजस्वी भावभावना त्वरित स्वीकारल्या आणि भविष्यातील निर्मितीसाठी त्यांचा उपयोग केला. युरोपीयांविरुद्धचा सारा क्रोध त्यांच्या व्यापारावर व त्यांच्या निर्मित वस्तूंवर पाखडला गेला. युरोपीयांशी संबंधित अशा सर्वच गोष्टी नकोशा वाटू लागल्या. अगदी अलीकडेच तर या देशात भरपूर पाश्चात्त्यीकरण आम्ही घडू दिले होते. हा सारा इतिहास आम्ही दूर सारला. आमच्या आध्यात्मिक जीवनात उभारून आलेले चैतन्य आता राजरोसपणे आमच्या राजकारणात शिरले. परिणामी आम्हाला आमच्या भूतकाळाबद्दल अधिक आकर्षण वाटू लागले. आणि त्याहीपेक्षा अधिक महत्त्वाचे म्हणजे आम्हाला आमच्या उज्वल भविष्याविषयी खात्री वाटू लागली. या नव्या राष्ट्रीय भावनेने प्रत्यक्षात राजकारणाचे सर्वच क्षेत्र अद्याप व्यापलेले नाही, हे खरे आहे. परंतु ती राजकारणात यशस्वीपणे आलेली आहे. आता केवळ योग्य वेळ येण्याचीच वाट आहे. राजकारणात आज जे काही घडत आहे ते खरोखर या भावनेच्या समर्थ आविष्काराला पोषक असेच आहे. आता आम्हाला आमच्या भविष्याबद्दल खात्री देता येते. राष्ट्रीय अस्मितेची धर्म आणि राजकारण ही दोन अंगे आहेत. त्यांच्यामध्ये राष्ट्रीय चेतना आली की बाकी सारे आपोआप घडेल. आमच्या आध्यात्मिक आणि राजकीय जीवनाच्या आवश्यकता ह्या आमच्या राष्ट्रीय जीवनाच्या दृष्टीने फार महत्त्वाच्या ठरणार आहेत. ह्या आवश्यकतांनुसार आम्हाला आमची सामाजिक रचना करावी लागणार आहे. आमचे औद्योगिक आणि वाणिज्यिक जीवन ह्या धोरणांनुसार आम्हाला घडवावे

लागणार आहे. आम्हाला आमच्या कलेची, वाङ्मयाची, साहित्याची, विज्ञानाची व तत्त्वज्ञानाची नव्याने घडण करावी लागणार आहे. ही घडण सर्वस्वी भारतीय असेल. युरोपीय असणार नाही.

वंग साहित्य आणि कला यांमध्ये वरील जाणीव अगोदरच स्पंदित झाली आहे. राजकारणामध्ये राष्ट्रीय चैतन्य प्रकट व्हावे, ह्या जाणिवेमुळे वंग साहित्याला आपल्या सारभूत अशा शाश्वत स्वत्वाकडे वळावेसे वाटले. हे स्वत्व आपल्या राष्ट्रीय कवनांमध्ये प्रकट होत गेले. गेयता, सरळ, सोपी, शक्तिशाली स्वररचना, प्रभाव पाडणारी आणि गोडवा असलेली सशक्त व सान्द्र अशी प्रेममिश्रित भक्तिभावना, स्वयंप्रकाशी असे सार्द्र हृदय प्रतिबिंबित करणारे बुद्धिचातुर्य, भावनांचे गूढगुंजन आणि व्यावहारिक पातळीवर आढळून येणारी मूर्त अशी आध्यात्मिकता–ह्या साऱ्यांमधून वंगभूमीचा आत्मा प्रकट होत आहे. ह्या साऱ्यांमधून पोषण घेऊनच आमचे साहित्य फुलावयास हवे. भलेही त्यात विविधता असो पण या वरील भावनांचे त्यांचे भान सुटता कामा नये. मोगल साम्राज्य नष्ट झाल्यानंतर, प्रथमच बंगालमध्ये एका नवीन अशा राष्ट्रीय कलाशैलीचा आविष्कार होत आहे. ह्या आविष्काराचे जनक आहेत अवनीन्द्रनाथ टागोर. ही त्यांची स्वतःची अशी शैली आहे. ह्या शैलीचा प्रारंभ विदेशी–आशियातीलच का होईना, पण तरीही विदेशी–शैलीच्या प्रभावाखाली ह्या कलावंताने केला व हा परकेपणा काही काळ उघड उघड दिसून येत होता. परंतु शैलीच्या विकासाबरोबरच त्या तात्कालिक प्रभावापासून राष्ट्रीय जाणीव स्वतःला हळूहळू मुक्त करून घेऊ शकते. येथे देखील ह्या वंगीय स्वत्वाला आत्माविष्कारासाठी वाव आहे. जे अमूर्त आणि अमर्याद आहे त्याला मूर्त व सान्त करून आपल्या कवेत आणण्याचा प्रयत्न करणे, हे भारतीय कलेचे वैशिष्ट्य आहे. ग्रीकांनी आपले ध्येय इतके उच्च ठेवले नाही. सुसाध्य होईल असेच ध्येय त्यांनी ठेवले आणि या बाबतीत त्यांना घवघवीत यश मिळाले. बाह्य आकार जाणण्यासाठी आवश्यक असलेली मौलिक बुद्धी आमच्यापेक्षा त्यांच्याकडे अधिक होती. उलट अमूर्त असे मनोमय आकार आणि वर्ण जाणण्याबाबतीत आम्ही त्यांच्यापेक्षा वरचढ होतो. वस्तूंमध्ये आत्म्याचा आविष्कार घडवून आणण्याचा प्रश्न आमच्या भविष्यातील कलोपासनेने सोडवला पाहिजे. भारताचे हेच उद्दिष्ट आहे. परिपूर्ण असे अर्थान्वयी रूप आणि रंग यांचा यशस्वी मेळ आम्हाला घालता आला पाहिजे. आकारान्वेषी अशी बुद्धी वंगीय व्यक्ती व्यतिरिक्त क्वचितच आढळते. भारतीय वंशाच्या लोकांमध्ये वेदान्त ओतप्रोत भरून आहे. त्याशिवाय नज़ाकत, लालित्य आणि सौष्ठव यांचीही त्यांना मनोमन जाण आहे. कलेच्या या नवीन परंपरांनी सुरुवातीसच आपसूकपणे या गुणांशी मिळवणी केली आहे. जुन्या भारतीय कलेचे परिपूर्ण नमुने क्वचितच आढळत असल्यामुळे, ह्या नवीन कलोपासकांना ह्या गोष्टींसाठी जापानकडे वळावे लागले. कारण नज़ाकत आणि लालित्य तेथे भरपूर प्रमाणात आढळते. परंतु वस्तूमध्ये गंभीर आत्माविष्कार करण्याचे उद्दिष्ट जापानने कधीच नजरेसमोर ठेवले नव्हते. आणि वंगीय भावाविष्कार म्हणजे नज़ाकत, लालित्य आणि सौष्ठव यांच्या मिलाफापेक्षाही अधिक

काहीतरी आणखी वेगळे, असे म्हटले जाते. ह्यात गूढ असे वीणेच्या झंकारासारखे स्पंदन आहे. सुस्पष्टता आणि मूर्तिमंत भावाविष्कार यांकडे वंगीय प्रतिभेची धाव असते. जी गोष्ट वंगीय साहित्याची तीच वंगीय कलेची. सौंदर्य भावना, एक अनामिक गोडवा, आध्यात्मिकता आमच्या रेषांना आणि आकारांना व्यापून टाकतात. येथे देखील परकीय शृंखला बंधनातून आपल्याला मुक्त करण्याच्या प्रयत्नांचा शुभारंभ या राष्ट्रीय अस्मितेने केल्याचे जाणवू लागते.

पुनरुज्जीवनाच्या आणि पुनर्निर्माणाच्या ह्या प्रचंड ओघापासून आता आपल्या जीवनाचा कोणताही भाग अलिप्त राहू शकत नाही. भारतीय समाजाचे पुनर्निर्माण होणार आहे याबद्दल शंकाच नाही. हे पुनर्निर्माण म्हणजे एक मोठी क्रान्तीच असेल. परंतु हे पुनर्निर्माण म्हणजे आपले काही सुधारक समजतात तसे केवळ युरोपीयीकरण असणार नाही. परंतु या पुनर्निर्माणामुळे आपल्या समग्र समाजाला आपल्या राष्ट्रीय चेतनेचे पूर्ण भान आलेले असेल. व्यक्तिगत स्वार्थ वा परस्परांना नष्ट करणारी आपसातील भांडणे इतःपर नसतील. त्यांची जागा प्रेम आणि परस्परांमधील बंधुभाव यांनी घेतली असेल. यालाच मी राष्ट्रीय चेतना म्हणतो. एकेकाळी ही भावना आमच्या येथील संयुक्त कुटुंबव्यवस्थेत, आमच्या ग्रामीण जीवनातील आंशिक साम्यवादात, आमच्या जातिव्यवस्थेतील जन्मसिद्ध अशा सांघिक जीवनात आम्हाला आढळून येत असे. ही आत्मभावना भविष्यामध्ये आणखी दृढ आणि परिपूर्ण होईल. वाणिज्य क्षेत्रातही जोपर्यंत आपण युरोपीयांचा नमुना नजरेसमोर ठेवू आणि त्यांचा विचार ग्राह्य मानू, तोपर्यंत स्पर्धाळू असा व्यक्तिगत स्वार्थीपणा आपली पाठ सोडणार नाही. संयुक्त भांडवली कंपन्यांमध्ये आपल्याला तेवढ्यापुरताच रस असेल, अति धोकादायक वाढ होत जाईल ती फक्त सहकारी भांडवलशाहीची, विविध विश्वस्त संस्था आणि विविध गट हे एखाद्या प्रचंड अशा अष्टपादाप्रमाणे (ऑक्टोपसप्रमाणे) आपल्याला ग्रासून टाकतील. निरोगी असे औद्योगिक वातावरण निर्माण करण्यात आपल्याला अपयशच येत जाईल. ह्या गोष्टी भारतीयांना एकत्र जोडू शकत नाहीत. जगाच्या दृष्टीने अजूनही असाध्य अशा एका गंभीर व विशाल जीवनाकडे भारताची वाटचाल सुरू आहे. अशा जीवनातील क्रियाकलापांचे रहस्य जेव्हा भारताला गवसेल, तेव्हा मग येथील औद्योगिक व सामाजिक जीवन सतेज सुदृढ आणि विस्तृत होईल.

आतापर्यंत राष्ट्रीयत्व म्हणजे युरोपीय मुशीत स्वतःला टाकण्याच्या वृत्तीविरुद्धचे बंड, असेच समजले जात होते. परंतु सर्वच भारतीय गोष्टींना चिकटून बसण्याच्या प्रवृत्तीबाबतही आपण सावध असले पाहिजे. इतिहासकाळात हिंदुत्व हे अशा प्रकारचे नव्हते. भविष्यातही ते तसे असण्याची आवश्यकता नाही. आपल्या जीवनाचे तीन घटक असतात. स्थिर आणि शाश्वत असे चैतन्यतत्त्व, विकसनशील आणि सत्स्वरूपी आत्मतत्त्व आणि ठिसूळ आणि बदलणारा असा देह. चैतन्यतत्त्व आपण बदलू शकत नाही. फार तर आपण ते गमावू शकतो, वा ते अंधुक होऊ शकते. आत्मतत्त्वामध्ये धसमुसळेपणाने आपण कोणतीही ढवळाढवळ करू शकत नाही. त्याला कोणत्या विशिष्ट आकारात आपण कोंबू शकत नाही

वा त्याचा मुक्त विकास अवरुद्ध करू शकत नाही. आणि देहाचा तर एक साधन म्हणूनच आपल्याला उपयोग करावयाचा आहे. देह हा, एक देह म्हणूनच एक मौल्यवान वस्तू आहे, असा त्याचा बडेजाव नको. केवळ बदल करायचा म्हणून, आम्ही कोणतीही प्राचीन प्रथा टाकणार नाही. राष्ट्राच्या आत्मतत्त्वाचा खरा आणि चांगला आविष्कार करणारी एखादी रीत जुन्या रीतीच्या जागी आणणे आवश्यक आहे, असे राष्ट्रीय जाणिवेला वाटले, तर तसे करण्यासही आम्ही मागेपुढे पाहता कामा नये.

● ● ●

## ३२. एक नवा मंत्र

**एक साधना म्हणून कर्म करणे, ईश्वरार्पण बुद्धीने कोणतीही कृती करणे, प्रथम फलासक्ती न धरता आणि नंतर कार्याबद्दलही कोणती आसक्ती न ठेवता, ते सुरू ठेवणे, ह्या गोष्टी नितांत आवश्यक आहेत . . . . हे एक राष्ट्रीय आत्मसमर्पण आहे. आपण ते करावे ही प्रभूची इच्छा आहे. हे आत्मसमर्पण पूर्णांशाने असावयास हवे. मगच भगवंताने ' दिलेला दिलासा ' अहं त्वा सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुचः' सत्य ठरेल.**

आपण भारत मातेची ईश्वररूपाने पूजा केली आहे. हे ठीकच झाले. त्यामुळे आपण बरेच पुढे आलोत. परंतु तो एक टप्पा होता. युरोपीय संस्कृतीत डुंबलेल्या मनाला आध्यात्मिकतेकडे आणण्याचे ते एक साधन होते. आपल्या इष्ट देवतेची सगुण रूपातील ती एक उपासना होती. भगवंताच्या पूर्णत्वाच्या उपासनेचा तो एक मार्ग होता. या उपासनेत आपण ' वंदे मातरम् ' या मंत्राचा अगदी मनःपूर्वक जागर केला. जोपर्यंत आपण मोठ्या निष्ठेने या मंत्राचा उच्चार केला ; हा मंत्र आपल्याला सर्व संकटांतून तारेल या भावनेने आपण तो म्हणत राहिलो ; तोपर्यंत आपली उन्नतीच होत गेली. परंतु अगदी अकस्मात आपली श्रद्धा डळमळू लागली. आपले धैर्य खचू लागले. मंत्रोच्चार क्षीण होऊ लागला. आणि साऱ्या देशातील उत्साह ओसरू लागला. भगवंतानेच ही शक्ती ओसरू दिली. कारण आता मंत्राने आपले काम केले होते. ' वंदे मातरम् ' पेक्षाही अधिक प्रभावी व कार्यक्षम अशा मंत्राची आता अपेक्षा आहे. भारताच्या नवजागरणाचे बंकिम हेच काही एकमेव आणि अखेरचे उद्‌गाते नव्हते. त्यांनी फक्त सार्वजनीन उपासनेच्या शुभारंभाचे मंत्राक्षर दिले. आंतरिक अशा गुह्य उपासनेचे सूत्र आणि कृती त्यांनी सांगितली नाही. महान मंत्र हे अंतरंगातच सदा जपले जातात. द्रष्टे ऋषी आपल्या शिष्यांना हे मंत्र, स्वप्नात वा प्रत्यक्षात दर्शन देऊन, त्यांच्यात संक्रामित करतात. दोघा-तिघांनी जरी हा अखेरचा मंत्र जागवला की, ईश्वराचा वरदहस्त उलगडू लागेल. अनेकजण ह्या मंत्राची उपासना करू लागतील, तेव्हा भगवंताचे आशीर्वाद मुक्तपणे मिळू लागतील.

काही लोक आदेशाची वाट पाहत बसतात. आदेश मिळेपर्यंत ते हलायलाही तयार नसतात. अशांना आदेश कधीच मिळणार नाहीत. जे लोक उठून कामाला लागतात, त्यांनाच खरोखर अंतरंगात अभूतपूर्व असा एकांत जाणवतो. त्या एकांतात त्यांना प्रभूचे दर्शन होते आणि ते सत्याला सामोरे जातात. नीरव शांतता, चिंतनास वेळ ह्या गोष्टी आवश्यक आहेतच, परंतु त्या दुय्यम आणि पूरक अशाच आहेत. एक साधना म्हणून कर्म करणे ईश्वरार्पण बुद्धीने कोणतीही कृती करणे, प्रथम फलासक्ती न धरता व नंतर कार्याबद्दलही

कोणती आसक्ती न ठेवता, ते सुरू ठेवणे, ह्या गोष्टी नितांत आवश्यक आहेत. कोणतीही कृती ही सश्रद्ध असली पाहिजे, ती निष्ठेने शेवटास नेली पाहिजे. ती भगवंतासाठी तर असतेच व भगवंताकडूनच घडत असते, अशी धारणा हवी. चुका होतील. ठेचा खाव्या लागतील. परंतु हा एक वीरमार्ग आहे. शूराचा मार्ग आहे. यात कोणाचीही भीती बाळगण्याचे कारण नाही. चुकांची आणि ठेचकाळण्याची तर मुळीच तमा नसावी. कोणतेही काम करताना आपण केवळ आपल्याच ताकदीवर विसंबणार असू, तर शेवटपर्यंत आपण ठेचकाळणारच. भगवान आपल्याला हात धरून पुढे नेत आहेत, अशी श्रद्धा हवी. आपल्या साधनेचा सारा भार त्याने स्वतःवर घेतला आहे. चुका होतात, ठेचा लागतात, यातही त्याचीच योजना आहे. आपण शहाणे व्हावे, आपल्यात सहनशक्ती यावी, यासाठी हे सारे आहे. श्रीरामकृष्ण यालाच वकीलनामा म्हणत असत. देशही ठेचकाळत आहे. पण प्रगतीपथावर आहे. चुका संपुष्टात येत आहेत. वाईट कर्मांचा क्षय होत आहे. देशाने ही कर्मयोगाची साधना सुरू केल्यापासून दुःसंचित नष्ट होत आहे. संकटाचे आणि पराभूतीचे क्षण कमी कमी होत आहेत. मातेच्या नामोच्चाराने या कार्याला प्रारंभ झाल्यामुळे ही अनंतमयी माता आपल्याला अंतर देणार नाही. अकारण वा आकस्मिकपणे जरी नामोच्चार केला, तरी प्रभु रक्षण करतातच ना ? मग मनापासून नामस्मरण केले आणि नामोच्चारालाच आपल्या साधनेची आधारशिला बनवली, तर मग विचारावयासच नको.

हे एक राष्ट्रीय आत्मसमर्पण आहे. आपण ते करावे ही प्रभूची इच्छा आहे. हे आत्मसमर्पण पूर्णांशाने असावयास हवे. ' सर्वधर्मान् परित्यज्य मामेकं शरणं व्रज ' मगच भगवंताने दिलेला ' अहं त्वा सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुचः ' हा दिलासा सत्य ठरेल. ' खंत करू नकोस, मी तुझी सर्व दुःखांतून सुटका करीन. '

● ● ●

## ३३. बाळ गंगाधर टिळक —१९१८

**श्री. बाळ गंगाधर टिळक ही व्यक्ती, त्यांचे कार्य भारतीय राजकारणातील त्यांचे स्थान हे एक स्वंयसिद्ध सत्य आहे आणि ज्यांच्या दृष्टीने त्यांचे नावही अप्रिय ठरते आणि त्यांचा वाढता प्रभाव भयसूचक ठरतो त्या ब्रिटिशांनाही हे सत्य नाकारता येत नाही. श्री. टिळक हे भारतीय जनतेच्या दृष्टीने राष्ट्रीय संघर्षाचे प्रतीक आणि राष्ट्राच्या आकांक्षेसाठी नेतृत्व देणारे ईश्वरदत्त सेनानी आहेत. या देशासाठी स्वतःला अर्पण करणाऱ्या या सुपुत्राबद्दल या राष्ट्राच्या स्वातंत्र्याकांक्षेने म्हटले आहे– '' ही व्यक्ती आणि त्यांचे जीवन हे माझ्या हृदयाचे आणि आकांक्षेचे प्रकट रूप आहे. ''– [ ' बाळ गंगाधर टिळक : लेखन आणि व्याख्याने ' या १९१८ मधील ग्रंथास श्रीअरविंदांनी लिहिलेली ही प्रस्तावना. ]**

' श्री. टिळक अथवा त्यांची भाषणे यांना कोठल्या सादरीकरणाची किंवा प्रस्तावनेची खरोखरच आवश्यकता नाही. लक्षवेधी चेहरा नसलेल्या ब्राह्मणासारखी त्यांची व्याख्याने स्वयंप्रकाशी आहेत. स्पष्ट, सुबोध आणि मुद्यापासून जराही न ढळणारी किंवा अलंकृत शब्दफुलोऱ्याचे आवरण नसलेली त्यांची भाषणे एखाद्या स्वयंसिद्ध प्रकटीकरणाची मालिका वाटू लागतात. आणि स्वतः श्री. टिळक, त्यांचे कार्य, भारतीय राजकारणातील त्यांचे स्थान देखिल एक स्वयंसिद्ध विधान (सत्य) आहे. ज्यांच्या दृष्टीने त्यांचे नावही अप्रिय ठरते आणि त्यांचा वाढता प्रभाव भयसूचक ठरतो, त्यांनाही हे सत्य नाकारता येत नाही, टिळकांचे हे स्थान त्यांना बुचकळ्यातही पाडते आणि कमालीचे खचवितेही. भारतातील एकूण परिस्थिती लक्षांत घेता, राजकीय प्रयत्नांसाठी एखादे उद्दिष्ट एखाद्या मार्गाने व जिद्दीने साध्य करावयाचे तर टिळक ही व्यक्ती या देशात होणे हे क्रमप्राप्तच होते आणि एकदा ते या क्षेत्रात आल्यानंतर त्यांनी अग्रभागी यावे हेही साहजिकच होते. भारतीय जनतेच्या दोन अथवा तीन सर्वोच्च नेत्यांपैकी एक बनून ज्या स्थानावर ते आता आहेत, ते स्थान त्यांना मिळणारच होते हे उघड होते. भारतीय जनतेच्या दृष्टीने असे नेते राष्ट्रीय प्रयत्नांचे प्रतीक आणि राष्ट्राच्या आकांक्षेसाठी नेतृत्व देणारे ईश्वरदत्त सेनानी आहेत. स्वराज्य, स्वयंशासन अथवा होमरुल अशी कोठलीही संज्ञा भारतीय जनतेचे स्वातंत्र्य अगर भारतीय जनतेच्या स्वयं निर्णय या आपल्या वर्तमान उद्दिष्टासाठी वापरली तरी या उद्दिष्टांसाठी टिळकांनी आपल्या भाषणात केलेल्या अत्यंत प्रभावी युक्तिवादांपेक्षाही त्यांचे जीवन, त्यांचे चारित्र्य, त्यांचे कार्य आणि त्यांची सहनशक्ती (त्यांनी झेललेली संकटे) तथा जनतेच्या हृदयात त्यांना मिळालेले स्थान हे अधिकच प्रभावशाली ठरते. युक्तिवाद आणि भाषणे देशाला स्वांतत्र्य मिळवून देत नसतात. पण जेव्हा राष्ट्राच्या ठायी स्वातंत्र्याचे ध्येय असते आणि आपल्या जीवनातील प्रत्येक कृतीत

त्या ध्येयाला मूर्त रूप देणारा, कोठल्याही अडचणींशी, दुःखाशी झगडूनही आपले आयुष्य या ध्येयपूर्तीसाठी वाहून टाकणारा मानव त्या राष्ट्रास लाभतो, तेव्हा भवितव्याचे चिन्ह निश्चितपणे दिसू लागते आणि त्याबाबत कोणाचाही भ्रम होण्याचे कारणच नाही. अशा (अलौकिक) माणसाबद्दल या राष्ट्राच्या आशेने एकदा म्हटले आहे,– " ही व्यक्ती आणि त्याचे जीवन हे माझ्या हृदयाचे आणि आकांक्षेचे प्रकट रूप आहे. "

ही दुर्दम्य इच्छाशक्ती आणि ही अढळ निष्ठा हे श्री. टिळक यांच्या जीवनाचे संपूर्ण सार आहे; जनमानसावरील त्यांच्या प्रचंड प्रभावाचेही तेच कारण आहे. भारतात राजकीय नेतृत्वामागे बहुतांशी संपत्ती आणि महत्त्वाचे सामाजिक स्थान किंवा व्यावसायिक यश आणि सरकार दरबारी मान्यता, कळकळीचे वक्तृत्व अगर अस्खलित, जिंकणारी भाषणशैली हे जमेचे घटक असतात. टिळकांना लाभलेले अग्रस्थान या कारणांनी मिळालेले नव्हतेच, कारण त्यांच्या सहाय्यास हे घटक कधी नव्हतेच. त्यांचे स्थान हे त्यांनी स्वतः मिळविलेले आहे आणि तेही त्यांनी आपले उभे आयुष्य तन-मन-आत्म्यानिशी वाहून घेतल्याने त्यांना लाभले आहे. स्वतःसाठी अथवा अन्य कोठल्याही हेतूसाठी त्यांनी काहीही राखून ठेवलेले नाही, उलट देशासाठी त्यांनी स्वतःलाच अर्पण केले आहे.

तरीही, टिळक हे विविध आणि असाधारण गुण एकवटलेले व्यक्तिमत्त्व आहे आणि त्यांना आज मिळालेले स्थान व शाश्वत कीर्ती जीवनातील अनेक बाबतीत मिळविणे सहज शक्य होते. त्यांनी कधी व्यवसाय केला नाही, पण त्यांना कायद्याचे सूक्ष्म ज्ञान आहे आणि कायद्याची उत्कृष्ट समजही आहे व त्याचा त्यांनी अत्यल्प प्रमाणातही संपत्ती व लौकिक स्थान मिळविण्यासाठी वापर केला असता तर ते वकिली पेशांत अग्रभागी राहिले असते. ते थोर संस्कृत पंडित आहेत, प्रभावी लेखक आहेत आणि बलशाली, सूक्ष्म, स्पष्ट असे विचारवंतही आहेत. समकालीन आशियाई विद्वतेच्या क्षेत्रात फार मोठे स्थान ग्रहण करणे त्यांना सहज शक्य होते. या क्षणालाही त्यांच्या ' ओरायन ' आणि ' आर्क्टिक होम ' या रचनांनी अल्प काळातच जागतिक मान्यता संपादन केली आहे, तसेच पौर्वात्य संशोधन क्षेत्राच्या अशाश्वत प्रांतात स्वतःची शाश्वत मुद्रा उमटविली आहे. गीतेवरील त्यांची रचना– जी केवळ भाष्य नसून मूलभूत टीका आणि नैतिक सत्याचे प्रस्तुतिकरण आहे– ही रचना, हे चिरंतन स्वरूपाचे कार्य आहे, गुण आणि महत्व यांच्या निकषावर ती मराठी भाषेतील प्रथम श्रेणीची पहिली गद्य रचना ठरते आणि अभिजात वाङ्‌मयात तिचा समावेश होऊ शकेल. या रचनेतील त्यांची सूक्ष्म आणि सर्वंकष विचारप्रक्रिया पाहाता, त्याची उच्च दर्जाची परिपूर्णता आणि शैलीतील संतोषदायी प्रेरणा पाहाता श्री. टिळक यांनी या दिशेने आपली कुवत वाहून घेतली असती तर मराठी साहित्याच्या इतिहासात आणि तत्त्वज्ञानाच्या इतिहासात त्यांनी सहजपणे प्रशस्त दालन व्यापले असते, हे या एका ग्रंथावरूनही (गीतारहस्य) पुरेसे स्पष्ट होते. पण परमेश्वराने विवक्षित जीवन ध्येयासाठी त्यांची निवड केलेली असल्याने त्या व्यतिरिक्त इतर कार्यकृतींसाठी अधिक प्रमाणात आपली शक्ती वेचणे श्री. टिळक यांना मानसिकदृष्ट्या

अशक्यप्राय होते. त्यांचा प्रभावी साहित्यिक गुण पत्रकारितेच्या कार्यासाठी कामी आला. पत्रकारितेतील कार्य कितीही श्रेष्ठ असले तरी क्षणभंगुर असते, परंतु त्यांची पत्रकारिता सातत्याने तेजस्वी, जोमदार, कित्येक दशके राजकीयदृष्ट्या शिकवण देणारी होती आणि सहसा त्याची गुणवत्तेत कोणी बरोबरी करू शकले नाही, त्यांच्यावर कुरघोडी तर निश्चितच करता आली नाही. त्यांचे विद्वत्तापूर्ण, संशोधनपर लेखन हे बहुतांशी नेहमीच विरंगुळा म्हणून केलेले आहे. राजकारणी आणि देशभक्त म्हणून त्यांना मिळालेल्या कीर्तीच्या व्यतिरिक्त त्यांना ज्या कार्यासाठी लौकिक प्राप्त झाला, ते सर्व (लेखन-संशोधन) कार्य त्यांच्या अंगिकृत जीवन-ध्येयापासून झालेल्या सक्तीच्या दुराव्याच्या काळात पूर्ण केलेले आहे, ही बाब लक्षात घ्यायला हवी– देशासाठी अविश्रांत खपणाऱ्या या सेवकाला फक्त कारावासाच्या शिक्षेच्या काळातच फुरसत मिळत असे आणि त्याच काळात त्यांच्या सर्व लेखनाची योजना आणि संपूर्ण नसले तरी बरेचसे लेखन कारागृहात झालेले आहे. अर्थात त्यांच्या प्रतिभेच्या या अशा जोडनिर्मितीलाही त्यांच्या जीवनातील एका जिव्हाळ्याच्या विषयाचा संदर्भ आहेच– तो म्हणजे या राष्ट्राच्या महान भूतकाळाला खुजे बनवील असे महान भवितव्य जर घडविता येत नसेल तर किमान त्या महान भूतकाळाचे पुनरुज्जीवन करणे. त्यांच्या वैदिक संशोधनात त्यांनी इतिहासकालपूर्व वेदांचा आरंभ निश्चित करण्याचा प्रयत्न केला; भारतीय परमार्थ निष्ठेतील सर्वाधिक बलशाली आणि सर्वाधिक सर्वंकष अशी निर्मिती असलेल्या गीता या धर्मग्रंथास त्यांनी 'गीतारहस्य' मध्ये हाताळले असून त्यांतील अधिकारवाणीने आदिम संदेश, जीवनाच्या महत्त्वपूर्णतेची जाणीव, कर्मकृतार्थी, मानवी अस्तित्वाची, मानवाच्या व मानवाकरीता केलेल्या श्रमाची जाण करून देऊन त्या परमार्थनिष्ठेचे 'गीतारहस्य' समर्थन करते. ही परमार्थनिष्ठा नवयुगाच्या आदर्शवादासाठी अनिवार्य ठरते.

श्री. टिळक यांच्या आयुष्यातील कलाटणी देणाऱ्या घटना या त्यांचा प्रदेश व आपल्या देशाच्या इतिहासातही कलाटणी देणाऱ्या घटना ठरतात. त्यांनी उचललेल्या पहिल्याच महत्त्वाच्या पावलामुळे एका मूलभूत संस्थापन कार्याशी ते निगडित झाले. नवीन परिस्थितीत नव्या जीवनाकरीता सिद्ध होण्यासाठी जनतेस शिक्षण देणे हे या कार्याचे उद्दिष्ट होते, हे कार्य एका दिशेने शुद्ध शैक्षणिक चळवळ होती आणि त्यामुळे देशात नवजागृतीचा पाया घातला गेला आणि त्यामुळे स्वार्थत्यागातील सहकार्य ही चेतना बनली. फर्ग्युसन कॉलेज हे त्याचेच फळ होय. तर दुसऱ्या दिशेने 'केसरी' या वृत्तपत्राची स्थापना त्यांनी केली, हे वृत्तपत्र महाराष्ट्रातील राजकीय मत व मनाचे वैशिष्ट्यपूर्ण आणि प्रभावी प्रकटीकरण म्हणून स्थापनेपासूनच नावारुपाला येऊ लागले. श्री. टिळक यांचे कार्य तीन कालखंडात विभागले गेले असून त्यातील प्रत्येक कालखंडाची परिणती कारावासात झालेली आहे. कोल्हापूर प्रकरणातील त्यांचा कारावास हा त्यांच्या कार्यातील पहिला टप्पा आहे आणि राष्ट्राच्या भवितव्यासाठी नव्या कल्पना व नव्या कार्यासाठी मराठी मुलुखास प्रगत करणे आणि स्वतःचीही प्रगती करण्याकामी हा पहिला टप्पा उपयोगात आला.

दुसऱ्या टप्प्यात अधिक व्यापक योजना आणि अधिक गांभीर्यपूर्वक प्रयत्न दिसून येतात. कारण या काळात केवळ राजकीय मताचेच नव्हे तर जनतेचेही भवितव्य आणि भूतकाळाची सांगड घालून जनतेच्या अंतरात्म्याचे नवजागरण करावयाचे होते; या टप्प्यात अधिक जिकीरीचे आणि लोकांना प्रिय वाटेल अशा प्रचाराचे कार्य होते आणि शिवजयंती व गणेशोत्सवांच्या आयोजनाने या कार्याने कमालीची उंची गाठली. सामाजिक सुधारणांचे अग्रणी गोपाळ गणेश आगरकर यांच्याशी निर्माण झालेल्या त्यांच्या दुराव्याने लोकशाहीवादी राजकारणाच्या मार्गातील पुराणमतवादी व धर्मनिष्ठ भारताचा विश्वासू आणि अधिकृत नेता अशी एक आगळी भूमिका त्यांच्याकडे आली आणि ती त्यांनी निभावली आहे. नव्या राजकीय चेतनेची परंपरेशी आणि ऐतिहासिक भूतकाळाच्या ठायी असलेल्या भावनांशी सांगड घालण्याकामी आणि या दोहोंचा लोकांच्या अविनाशी धार्मिक भावनांशी समन्वय घडविण्याकामी ही भूमिका त्यांना उपयुक्त ठरली. लोकांच्या धार्मिक भावनांचेच प्रतीक म्हणजे हे दोन उत्सव होते. काँग्रेस चळवळ ही दीर्घ कालापर्यंत मत-विचार, स्वरूप आणे पद्धती यांबाबत शुद्ध पाश्चात्य राहिली होती, इंग्लंडचा इतिहास आणि युरोपियन आदर्श यांच्या संदर्भात अभ्यासलेले राजकीय आणि जनतेचे अधिकार यांच्यावर आधारलेली तथापि, या देशाच्या भूतकाळाचा कसलाही मूलाधार नसलेली किंवा या देशाच्या अंतर्मनाची कल्पनाही नसलेली काँग्रेस चळवळ यांमुळेच इंग्रजी शिक्षण प्राप्त केलेल्या मूठभर व्यक्तींपुरतीच मर्यादित राहिली होती. काँग्रेसच्या काहीशा पढिक पद्धतीच्या चाकोरीतून बाहेर पडणारे, वर्तमान आणि भूतकाळ यातील दरी मिटविणारे आणि या राष्ट्राच्या राजकीय जीवनास सातत्य बहाल करणारे श्री. टिळक हेच पहिले राजकीय नेते होते. त्यांनी भाषा आणि चेतना आत्मसात केली आणि अशी पद्धती वापरली की, ज्यामुळे या चळवळीचे भारतीयीकरण झाले व जनसामान्यांचा या चळवळीत प्रवेश झाला. महाराष्ट्रातील खऱ्या अर्थाने जागृत, बलवान आणि तत्परतेने गठित झालेल्या या चळवळीने अनेक संकटे व संघर्षात आपली शक्ती आणि प्रामाणिकपणा प्रकट केलेला आहे. आणि त्याचे श्रेय श्री. टिळक यांच्या या कालखंडातील कार्यास द्यायला हवे. आपल्या जनतेच्या मनाचा आणि जिद्दीचा व तिच्या गरजू परिस्थितीचा अचूक अंदाज घेण्याच्या आणि योग्य क्षणी जनशक्तीला उपयोगात आणण्याच्या त्यांच्या (श्री. टिळक) कुवतीने श्री. टिळक यांच्यातील अलौकिक राजकीय गुण प्रकर्षाने सिद्ध झाले; नव्याने वेध घेण्याच्या आणि सर्व काही नव्याने उभारण्याच्या या कसोटीच्या, कठिण काळात आपले नेतृत्व करण्यासाठी नियतीने हा एक पुरुष आधीच नियुक्त केला असल्याच्या विश्वासाने जनतेने त्यांची निवड केली. त्या काळात महाराष्ट्रात श्री. टिळक यांनी जे केले, त्याची संपूर्ण भारतात स्वदेशी चळवळीने मुहूर्तमेढ झाली. देशातील बहुजनांना एकत्र आणणे, भूतकाळाच्या महत्तेवर भवितव्याच्या महत्तेचा पाया घालणे आणि भारतीय राजकारणाची भारतीय धार्मिक निष्ठा व परमार्थनिष्ठेशी सांगड घालणे हे भारतातील प्रचंड व शक्तिशाली राजकीय जागरणासाठी अत्यावश्यक कार्य होते. लेखक, विचारवंत, अध्यात्मिक नेते व इतरांनी हे सत्य जाणले होते. मात्र व्यवहारी राजकारणाच्या प्रत्यक्ष कृतिक्षेत्रात त्याचा वापर करणारे

श्री. टिळक हेच पहिले होत. देशासाठी घेतलेल्या परिश्रमांच्या या दुसऱ्या टप्प्याची परिणती अधिक दीर्घ आणि अधिक खडतर कारावासात झाली. ही जणू दैवाने त्यांच्या कार्यावर उठवलेली मुद्राच होती कारण ध्येयासाठी दुःख सोसणे यापेक्षा अधिक दिव्य काय असू शकते ?

तिसरा टप्पा स्वदेशी चळवळीचा ठरतो आणि या टप्प्यात श्री. टिळक हे प्रकर्षाने अखिल भारतीय नेता म्हणून अग्रभागी आले; त्या टप्प्याने त्यांना अधिक विस्तृत क्षेत्रात अखेरीस आणले, अधिक प्रेरक शक्ती बहाल केली, आपले जीवित-कार्य शीघ्र गतीने आघाडीवर आणण्यासाठी लागणारे मोठे उत्थान दिले आणि केवळ महाराष्ट्रापुरते हे कार्य सीमित न राहाता देशभर त्याचा प्रसार होत राहिला. या कालखंडातील घटनांचे स्मरण करून देण्याची गरज नाही, इतक्या त्या ताज्या आहेत. बहिष्काराच्या आरंभापासून सुरतच्या दुर्घटनेपर्यंत आणि त्याचाच परिपाक ठरलेल्या त्यांच्या प्रदीर्घ व अंतिम कारावासापर्यंत श्री. टिळक यांचे नाव व कार्य हे भारतीय इतिहासाचे अविभाज्य घटक बनले आहेत. हे तीन कारावास म्हणजे त्यांच्या कारकीर्दीवरील तीन मुद्राच होत–कसोटीच्या क्षणी आणि संकटे झेलताना या अलौकिक माणसाच्या ठायी असलेले नैतिक बळ व त्यांचे गुण या तीन कारावासांनी प्रकर्षाने प्रकट केले. पहिल्या कारावासाच्या वेळी एका छोट्या पातळीवरच्या संस्थापक कार्यकर्त्यांपैकी एक म्हणून त्यांचे दर्शन झाले; याच वेळी बलशाली आणि कणखर जनतेचा समर्थ व निग्रही नेता म्हणून श्री. टिळकांवर शिक्का उमटला. तर दुसऱ्या कारावासात ऐतिहासिक मराठा सामर्थ्याच्या महान पुनरुज्जीवनामागची स्फूर्तिदायी प्रेरणा म्हणून त्यांची निवड झाली; जणू दक्षिण हिंदुस्तानचे ते अनभिषिक्त नृप ठरले आणि संपूर्ण भारतभर त्यांची कीर्ती दुमदुमू लागली– ही कीर्ती हा आजच्या त्यांच्या परिणामकारकतेचा पाया बनला. त्यांच्या अखेरच्या कारावासाने त्यांना अखिल भारतीय पक्षाचे नेतृत्त्व, देशव्यापी राष्ट्रवादाचे प्रमुख व प्रतिनिधी हे स्थान दिले; संपूर्ण देशाने आदर बाळगावा व अनुकरण करावे अशा सर्वश्रेष्ठ दोन वा तीन भारतीयांमधील ते एक बनले. देशासाठी जन्मभर काढलेल्या कष्टांच्या शेवटच्या पर्वात आज ते उभे आहेत. जे ध्येय एके काळी विफल ठरण्याची चिन्हे दिसत होती आणि जे ध्येय साधले गेलेच तर त्याकरीता किमान शतकभराचे श्रम, संघर्ष आणि हाल सोसावे लागतील असेच वाटत होते, ते त्यांचे ध्येय पूर्ण होण्याच्या आशेची किमान किरणे आज या टप्प्यात दृष्टिपथात येत आहेत आणि यशाची आशा वाटू लागली आहे.

त्यांना सहाय्यभूत ठरलेले आणि आत्यंतिक परिश्रमांती त्यांना यश देणारे त्यांच्या अंगचे गुण आज तुलनेने भारतीय राजकारणात अभावानेच आढळतात. ज्या राष्ट्राचे ते सुपुत्र आहेत, त्यांचे जन्मजात नेता होण्यासाठी आवश्यक असलेले संपूर्ण प्रातिनिधिक चारित्र्य हा त्यांचा पहिला महत्त्वाचा गुण. हिंदुस्तान म्हणजे विविधतेतून एकात्मता साधलेला देश आहे आणि त्याची शक्ती तशीच त्याची दुर्बलताही या विविधतेच्या ठायी एकवटल्या आहेत; त्याच्या प्रादेशिक जीवनात जोम असेल तरच त्याच्या राष्ट्रीय जीवनात जोम राहू शकतो. त्यामुळेच राजकारणातही एखाद्या नेत्यास आपल्या जीवन कार्यासाठी घट्ट पाया घालायचा असेल तर

आपल्या प्रांतात व आपल्या उप-समाजात केलेल्या कार्यावर व परिणामावर त्या पायाची रचना करायला हवी, असे कार्य करण्यास श्री. टिळकांपेक्षा अधिक योग्य कोणी नव्हते. मराठा वृत्ती, मराठ्याचे गुण, मराठ्याचा त्वेष याचे ते मूर्तिमंत प्रतीक व अवतार ठरावेत, त्याशिवाय त्यांच्या अंगची एकसंधता, गुणांतील श्रेष्ठत्व आणि आत्मिक चैतन्य यांच्या बळावरच, थोर विभूती आपल्या जनतेचे सहजपणे प्रतिनिधी बनतात. मराठा वंशास त्यांची भूमी आणि त्यांचा इतिहास यांनी सामर्थ्यशाली, कणखर आणि काटक जसे बनविले आहे तसेच त्यांच्या अंगांगात लोकशाहीवाद, बुद्धिमत्ता आणि व्यवहारी शहाणपणा रूजविला आहे; कल्पना, काव्य, तत्त्वज्ञान, धर्म, जीवन आणि कृतीमागील प्रेरणा, सामाजिक अभिसरणाची कुवत, भावना व उत्साह यांची देणगी इतर भारतीय जनतेप्रमाणे त्यांना मिळाली असली तरी ही प्रजा भावनाशील आदर्शवादी नसून त्यांच्या विचार व उक्तीत शक्ती, तारतम्य, अचूकता, स्पष्टपणा आणि चेतना आहे तर शिक्षणाबाबत त्यांच्यांत चिकाटी, कष्टांची तयारी, काळजीपूर्वकता आहे, ते सखोल ज्ञानासाठी झटतील, साधे, कष्टाळू आणि काटकसरीचे जीवन स्वीकारणारे आणि वृत्तीने धैर्यशील, लढाऊ, दमदार आहेत आणि तरीही त्यांच्या ठायी विपरित परिस्थितीशी झगडण्याची हातोटी, अडथळ्यांना दूर सारण्याची क्षमता आहे, ते चतुर व तरीही आक्रमक मुत्सद्दी व जन्मजात राजकारणी आणि जन्मजात लढवय्ये आहेत. हे सर्व गुण श्री. टिळक यांच्या ठायी लक्षणीय व श्रेष्ठरीत्या मोठ्या प्रमाणावर एकवटले आहेत व त्यात प्रतिभावंतांचा स्वच्छ साधेपणा, एक गूढ आवेग, प्रबळ इच्छाशक्ती, अतिरिक्त प्रेरणेसाठी आवश्यक ती चित्ताची एकाग्रता यांची भर पडली आहे. एखाद्या सामान्य दिसणाऱ्या म्यानांत दडवलेले लखलखीत, धारदार, उत्कृष्ट पाणी दिलेल्या पात्याचे खड्ग त्यांच्या गुणांकडे पाहून कोणालाही सहजपणे आठवावे. जसजसा राजकीय क्षितिजावर त्याचा उदय होत गेला तसतसे त्यांच्या जनतेला त्यांच्यात आपले प्रतिनिधित्व अधिक स्पष्टपणे जाणवत राहिले, त्यांच्यात लोक स्वतःला विस्तारित रूपात पाहात राहिले. त्यांच्या इतिहासांतील थोर विभूतींचा आत्मा आणि पिंड यांतूनच श्री. टिळकांची घडण झाल्याचा विश्वास या जनतेला वाटू लागला आणि अशा थोर विभूतींपैकी एखादा आपले जुने कार्य नव्या प्रकारे व नव्या परिस्थितीत तडीस नेण्यासाठी अवतार घेऊन आला आहे, अशीच या लोकांची श्रद्धा बनली. महाराष्ट्राचे चैतन्य या एका थोर व्यक्तीच्या ठायी पुनश्च एकवार प्रकट झाल्याचा जणू त्याना साक्षात्कार झाला. त्यांच्या प्रांतात त्यांना जे स्थान दिले गेले आहे ते संपूर्ण हिंदुस्थानांत कोणालाही आजवर मिळालेले नाही.

सर्वदूर राष्ट्रीय पातळीवरही श्री. टिळक यांच्या ठायी असे आगळे गुण आहेत ज्यायोगे ते या समयास व या कार्यासाठी सुयोग्य व्यक्ती ठरले आहेत. त्यांच्या शत्रूंनी त्याना जनतेस बहकाविणारा लोकनायक असे म्हटले आहे–जे ते मुळातच नाही; त्यांच्यात लवचिकपणा नाही– आणि फर्डे वक्तृत्वही नाही, लोकांचे पुढारीपण मिळवण्यासाठी लागणारा चेहरा त्यांच्यापाशी नाही, त्यांची भाषणे निखळ आणि सरळ विचारांनी परिपूर्ण असतात, ते स्वतःच मुळात अत्यंत गंभीर आणि व्यवहार्य कृती करणारे आहेत. भावनांवर भर देणारी, ओतप्रोत शब्द जंजाळ,

लोकांना भावणारी आणि जनतेला जिंकण्यावर भर देणारी भाषणे हा त्यांचा प्रांत नव्हे. असे प्रकार ते सहन करतात कारण जनतेचा उत्साह नेहमीच अशा प्रकारे व्यक्त होत असतो, हे ते जाणतात पण अशा गोष्टींनी ते अस्वस्थ होतात कारण अशा गोष्टीत मोलाची शक्ती, इच्छा, बळ वाया जाते आणि असा व्यर्थ जाणारा समय व शक्ती एकवटून परिणामकारक कार्याला जुंपणे उचित ठरेल, असेच त्यांना वाटते. तथापि, ते पूर्णपणे लोकशाहीवादी राजकारणी आहेत आणि आमच्या नेत्यांमध्ये अशी जनता-जनार्दनाचा आत्मा जागविणारीही आणि त्यांच्या मनास प्रतिसाद देणारी, त्यांना नेतृत्व देऊ शकणारी पण त्याच वेळी जनतेच्या वरचढ अशा आकांशा, इच्छा आणि भावना याना कोठल्या दिशेने न्यायचे ते जाणणारी माणसे विरळाच आहेत. आपल्या अनुयायामध्ये ते पूर्ण समानतेने त्यांच्यापैकी एक होऊन वावरतात, त्यांच्याबरोबर साधे, सरळ स्वभानुरुपच वागतात, खुलेपणा,साधी, थेट वागणूक असलेल्या श्री. टिळकांच्या भाषणात खूप मतितार्थ राखण्याची हातोटी असूनही गरज पडेल तेव्हा ते या जनतेस आपल्या योजनांत, कल्पनांत सहभागी करून घेतात, धोरणे व कृती याबाबत आपली मते जनतेवर लादण्याची पराकाष्ठा आपल्या इच्छा शक्तीच्या आधारे करूनही जनतेचा जणू आपण सल्ला घेतो आहोत अशी त्यांची पद्धत आहे. त्यांच्या ठायी विराट जनतेच्या चैतन्याशी जवळीक करण्याची क्षमता आहे, त्यांच्यापाशी अभिनिवेशहीन संपर्क साधण्याची हातोटी आहे, साध्या-सरळ भाषेत जनतेच्या भावनांना प्रकट करण्याची आणि मनांत येणाऱ्या भावनांना विचाररूप कसे द्यावे ते जनतेला दाखविण्याची शक्ती आहे व हे गुण निश्चितच प्रामुख्याने लोकशाहीवादी आहेत. याच कारणामुळे सर्व वर्गातील लोकांना आपल्यामागे एकत्रितपणे आणणे, केवळ सुशिक्षितांचेच नव्हे तर सर्व जनतेचे व्यापारी, उद्योजक, खेडूत, किसान सर्वांचेच नेत्रा बनणे त्यांना जमू शकते. ते जेव्हा बोलतात वा लिहितात तेव्हा संपूर्ण महाराष्ट्रात त्याचे आकलन होते; ते जेव्हा एखादी कृती करतात तेव्हा संपूर्ण महाराष्ट्र त्यांचे अनुसरण करण्यास सिद्ध होतो. त्यांच्या अधिक विशाल क्षेत्रात स्वदेशीच्या संकटमयकाळात त्यानी हेच लोकशाहीवादी नेतृत्वाचे गुण आणि हीच शक्ती प्रकट केली होती.

श्री. टिळक हे स्वभावतःच क्रांतिकारी नेता आहेत, असे म्हणणे चूक आहे; तशी त्यांची धारणाही नाही आणि राजकीय वृत्तीही नाही, भावनाशील आणि कल्पनावादी बंगालचा संभाव्य अपवाद वगळता साधारणतः भारतीय माणसांमध्ये क्रांतिकारी वृत्ती मुळीच नसते किंवा असलीच तर नगण्यच असते; त्यांना फार तर जगातील इतर लोकांप्रमाणे क्रांतीकरीता उद्युक्त करता येते पण त्यांच्यात क्रांतीसाठी लागणारी नैसर्गिक प्रवृत्ती नाही. भव्य कल्पना आणि कळकळीचा उत्साह बाळगण्याची क्षमता भारतीयांत आहे, ते भावनाशील आहेत आणि उत्कट उद्रेकाचे ते प्रसंगी दर्शन घडवितात पण किंचित समन्वयाच्या सूचनेनेही ते उद्रेक थंडावतात; तथापि निसर्गतः ही जनता वृत्तीने परंपरावादी आणि कृतीत सावध आहे. श्री. टिळक यांच्यापाशी प्रबळ इच्छाशक्ती असली आणि वृत्तीने ते झुंझार असले तरी त्यांच्या प्रवृत्तीत सामान्य भारतीय स्वभावधर्म आहे आणि प्रागतिक कल्पना स्वीकारणाऱ्या उदार मनाने ते आपल्या जनतेच्या परंपरावादी प्रवृत्तीची व जनतेच्या जाणीवेची सांगड घालतात. स्वतंत्र

भारतात कदाचित त्यांची प्रतिमा राष्ट्रीय प्रगती आणि विस्तार यांच्यासाठी उत्सुक असलेला पण पावलोपावली सावध, निश्चयी आणि प्रत्येक बदलात राष्ट्राच्या परंपरावादी वृत्तीची कास धरून चालणारा प्रागतिक उदारमतवादी राजकारणी अशी झाली असती. त्याशिवाय ते जन्मजात सांसद आहेत, मग जरी जनमताचा निरंतर स्त्रोत म्हणून ते समाजाशी सतत संपर्क ठेवणारे आणि मतभेदाच्या क्षणी मध्यस्थी करणारे धुरीण असले तरीही ते जन्मजात विधिमंडळाचे नेते आहेत. नेहमी पाळता येईल आणि त्यांतील बारकाव्यांचाही वापर करता येतील अशी सुबोध व आखीव कार्यपद्धती त्याना मनापासून आवडे– अशा पद्धतीचे सिद्धांत आणि व्यावहारिक उपयोग जणू त्यांना मुखोद्‌गत असतात– मग त्यांतील बारकाव्यांचा पक्षांतील झगड्यांमध्ये व्यावहारिक फायदा करून घेण्यासाठी उपयोग करू शकतात. याच कारणासाठी त्यांनी काँग्रेसला उच्च मूल्ये घालून दिली; त्याच्याकडे त्यांनी मध्यवर्ती संस्था म्हणूनच पाहिले; एक लोकमान्य विधिसभेची अद्याप आकार न मिळालेली पहिलीच कल्पना सिद्धीस नेणारे साधन म्हणून त्यांनी काँग्रेसकडे पाहिले. सुरतच्या घटनेनंतर बऱ्याच जणांनी काँग्रेसला हेतुतः फोडणारा माणूस म्हणून त्यांच्यावर टीका केली परंतु या घटनेचा सर्वाधिक आघात श्री. टिळकांच्या एवढा अन्य कोणालाही बसला नसेल. त्या सभेची निष्क्रीयता त्यांना निश्चित मानवली नाही, पण एक मोठे राष्ट्रीय सत्य आणि त्यांतील न आजमाविलेल्या शक्यता यांसाठी त्यांनी तिचे महत्त्व ओळखले होते आणि व्यवहार्य कार्यासाठी तिची मध्यवर्ती संघटना बनविण्याची त्यांची इच्छा होती. अस्तित्वात असलेली, उपयुक्त संस्था उद्‌ध्वस्त करणे हे त्यांच्या वृत्तीशी विसंगत होते आणि त्यांच्या कल्पनेतही त्यांनी ते अपेक्षिले नसेल.

शिवाय, त्यांच्या स्वतःच्या काही कल्पना असल्या तरीही ते वृत्तीने स्वप्नवादी नाहीतच, त्यांच्या दृष्टीने एकदा ध्येय निश्चित झाले की, बाकी सर्व व्यवहार्य कृती असते– मग त्यांतील अडचणींचा मुकाबला करणे, मार्गात आलेल्या अडथळ्यांवर मात करणे, त्यासाठी कठोर आणि परिणामकारक उपाययोजना आत्यंतिक काळजीपूर्वकरीत्या आणि विचारपूर्वकरीत्या प्राधान्याने जेवढ्या शीघ्र परिणामकारकतेने राबविता येईल तेवढी अंमलात आणणे ही व्यवहार्य कृती ठरते; एखाद्या कार्यकृतीची आवश्यकता किंवा एखाद्या तत्त्वांची अत्यावश्यक मान्यता त्यांना मनोमन पटली की, जरी ते हट्टी आणि पोलादी मनाचे वाटले तरी कार्य तडीस नेण्यासाठी प्रसंगी तडजोडीला ते तयार असतात आणि वेळ पडल्यास 'हाती काहीच साध्य लागण्याची चिन्हे नसतील तर किमान अर्धे यश प्राप्त करण्याची तडजोडही ते स्वीकारतात; मात्र योग्य वेळ येताच पूर्ण यश हासील करण्याचा इरादा ते कायम राखतात. मात्र पूर्ण यशाच्या बदल्यात तडजोड म्हणूनही अगदीच नगण्य, निकृष्ट फळ ते स्वीकारणार नाहीत. त्याचबरोबर शक्यतेच्या परिसीमा ओलांडायला ते मान्यता देत नाहीत, आणि याबाबतीत कित्येक वेळा त्यांनी इतकी सावधगिरी दाखविली आहे की, त्यामुळे त्यांच्या अनुयायांमधील काही उतावीळ मंडळी बरीच अस्वस्थ झाली. पण एखाद्या जन्मजात मध्यममार्गी नेत्याप्रमाणे त्या त्या क्षणाच्या आत्यंतिक शक्यतेच्या घडीस कमीत कमी प्रयत्न आणि किमान तात्कालिक ध्येय यांची गल्लत ते करणार नाहीत. असा माणूस विसर्गतः क्रांतिकारी नसतो, उलट वृत्तीने घटना तज्ज्ञ

असतो, बहुधा असा माणूस प्रगत पक्षाचा वा घटकाचा नेता असतो. इच्छित बदलासाठी मार्ग मोकळा करण्याकरीता अस्तित्वात असलेल्या संस्था मोडण्यांत क्रांतिकारी वृत्तीला स्वाभाविक आनंद मिळत असतो. श्री. टिळक हे या वृत्तीचे नव्हेत. त्यांना वस्तुतः अशी संस्था मोडण्यापेक्षा वापरता येण्यासारखे, प्रसंगी दुरुस्त करता येईल असे आणि विस्तारितही करता यावे असे स्वच्छ, सुबोध संविधान अधिक सुयोग्य ठरले असते.

सामाजिक सुधारणांबाबतची श्री. टिळक यांची भूमिका त्यांच्या या मनोधारणेवरून स्पष्ट होते, ते दुराग्रही प्रतिक्रियावादी नाहीत. कठोर सनातनवादाचे किंवा जहाल नास्तिक प्रवृत्तीचेही अविवेकी अथवा तर्कशुद्ध निराकरण मराठी माणसे करू शकत नाहीत, हे दोन्ही दोष भारतात इतरत्र एकाच वेळी असू शकतात, बऱ्याच वेळा ही परस्परविरोधी भूमिका मनाच्या एकाच प्रवृत्तीची दोन टोके असतात. आपली घट्ट सामाजिक वीण आपल्या भूमीशी धरून राहाण्याची येथील माणसांची व्यवस्था त्यास कारणीभूत आहेत, पण तरीही लोकांनी प्रत्यक्ष गरजेप्रमाणे तडजोड करण्याची, काही प्रमाणात शिथिल बनण्याची, सामावून नेण्याची तयारी नेहमी दाखविली आहे. आपल्या समाजातील ही सर्वसाधारण प्रवृत्ती आणि कल श्री. टिळक यांच्यातही आहे. पण तीव्र राजकीय जाणिवेतून निर्देशित झालेली इतर कारणेही आहेतच; त्यातील पहिले कारण हे की, सामाजिक सुधारणांच्या प्रश्नाची राजकारणाशी अकालीच सांगड घातल्यास ही राजकीय चळवळ या राष्ट्राच्या अफाट जनतेपासून दुरावण्याचा अथवा एकमेकांशी संघर्ष करणाऱ्या अनेक गटांत ती विभागली जाण्याचा धोका परवडणारा नाही, हे त्यांनी स्पष्टपणे ओळखले होते. देशाला जेव्हा स्वतंत्र विधिमंडळ असेल आणि ते स्वतःचे विधिमंडळ अशा गरजांचा ऊहापोह करू शकेल व जनमताची पूर्णता करील तेव्हाच त्यासाठी योग्य समय असेल, असे राजकारण्यास साहजिकच वाटत असते. त्याशिवाय भारतीय जनतेसाठी राजकीय स्वातंत्र ही सर्वात प्राथमिक गरज आहे आणि त्याच्याशी प्रत्यक्ष संबंधित नसलेल्या सर्व बाबी या दुय्यम ठरतात, असे त्यांना तीव्रपणे वाटते; त्यांच्या व्यक्तिगत जीवनाचे तेच तत्त्व आहे आणि सध्याच्या काळात राष्ट्रीय जीवनाचेही तेच तत्त्व असावे, हे त्यांनी प्रतिपादिले आहे. आपण आधी स्वातंत्र्य मिळवू या आणि राष्ट्राच्या जीवनाचे सुनियोजित नियंत्रण प्राप्त करू या आणि तद्नंतर सामाजिक संदर्भात त्याचा कसा वापर करता येईल, ते पाहू या; दरम्यान जेवढे प्रत्यक्ष आवश्यक व व्यवहार्य आहे आणि लोकात जेवढे पुढे जाण्याची तयारी आहे. तेवढे मार्गक्रमण आपण शांतपणे व न झगडता करू या. हे तत्त्व कदाचित योग्य अथवा चुकीचेही असू शकते; पण श्री. टिळक जसे आहेत आणि आपला देश ज्या परिस्थितीत आहे, ते पाहाता ते अन्य मार्ग पत्करू शकत नाहीत.

श्री. टिळक आयुष्यभर जर राजकारणात समूळ बदल करण्याची भूमिका उचलून धरीत आले आहेत आणि तरीही आंदोलनाच्या वेळी अतिरेकी म्हणावे अशा पक्षाचे नेतृत्व त्यांनी केले आहे याचे कारण हेच की, सर्वाधिक निकडीच्या बाबीला त्वरित हात घालून मुळीच न ढळता अथवा विचलित न होता एकमेव मार्ग धरून ठेवण्याचा राजकीय नेत्याला आवश्यक असलेला

व्यावहारिक दृष्टिकोन त्यांच्यापाशी आहे. राजकीय भूमिकेत नेहमी दोन तट दिसून येतात; एक तट केवळ स्वतःच्या सोयीसाठी बारीक सारीक तपशीलाचा बाऊ करीत असतो. हा गट त्या काळातल्या अगदी मामुली बाबींमध्ये रस घेत राहतो आणि महान तत्त्वे तथा महत्त्वाच्या गरजाकडे दुर्लक्ष करतो. दुसरा गट उलटपक्षी या महत्त्वाच्या निकडीच्या बाबी आणि तत्त्वांकडे सर्वात आधी लक्ष पुरवितो आणि त्यांच्या संदर्भातच तपशील काढतो. पहिला गट उद्दिष्ट मिळो न मिळो, चाकोरीतच फिरत राहतो; झाडांच्या तपशीलात शिरून एखाद्याने अरण्याकडे लक्षच देऊ नये आणि त्यांतून बाहेर पडताना केवळ अपघातानेच त्याने अडखळावे अशी या गटाची स्थिती असते. त्याऐवजी दुसरा गट आपल्या उद्दिष्टाचे आणि सर्व दिशांचे विहंगमावलोकन करतो आणि या प्रदेशातील बाह्यमार्ग, रोखल्या जाणाऱ्या वाटा तथा आडवळणे यांचा अंदाज मनाच्या होकायंत्रात पक्का बसवितो; मात्र त्यांतून शक्य तेवढी कमी मार्गक्रमणा कशी काढता येईल, याकडे लक्ष पुरवितो. हा पहिला गट आपल्या काळात गैरवाजवी हक्कातून एखाद्या मुत्सद्यावर अधिकार सांगतो; पण भवितव्य मात्र दुसऱ्या गटाचा अधिकार मान्य करते आणि महान चळवळींचे असली नेते याच गटातून मिळत असतात. सर्व थोर राजकारणी प्रज्ञावंतांप्रमाणेच श्री. टिळक हे या अधिक व्यापक, श्रेष्ठतर विचाराच्या दुसऱ्या गटातील नेता आहेत.

भारतात राजकीय कार्य आणि प्रत्यक्ष शासन व देशाचे प्रशासन यांच्यात भेद असल्याने आपल्या राजकारण हाताळणीत तात्त्विक विचारधारणा प्रकर्षाने आढळते, परंतु श्री. टिळक हे कधीच पढिक राजकारणी तथा राजकारणाशी खेळणारे ' राज्यशास्त्राचे विद्यार्थी ' नव्हतेच; त्यांचा भर प्रत्यक्ष परिस्थिती अवलोकून त्यानुरूप पुढे जाण्यावर आहे. एकोणिसाव्या शतकातील चालू भारतीय राजकारणाची वास्तव स्थिती आणि गरजा यांचे शुद्ध, शांत, अध्यात्मिक जाणिवेच्या अंधुक धार्मिक प्रकाशांत आणि मॅग्ना कार्टा व गेल्या सात शतकांतील इंग्लंडच्या घटनात्मक इतिहासाच्या संदर्भात परिशीलन करणे त्यांना शक्य नव्हते; अथवा स्वातंत्र्यासाठी धीम्या गतीने तयारी करण्याचे पढिक तत्त्व मान्य करणे, वा अधून मधून उद्भवणाऱ्या तसेच निरंतर राहिलेल्या समस्यांवर केवळ चर्चा करणे आणि १९०५ पर्यंत काँग्रेसच्या राजकारणात प्रचलित असलेल्या पद्धतीनुरूप ओजस्वी भाषणे व ठराव करीत राहून सरकारच्या वृत्तीत फरक पडण्यासाठी, त्यांस नवी जाणीव करून देण्यासाठी प्रयत्न करणेही शक्य नव्हते. काँग्रेसची चळवळ जिवंत करून तिला सातत्याची प्रेरणा बनविण्यासाठी देशांत राष्ट्रीय पातळीवरील आंदोलन खडे करणे, हे श्री. टिळक यांचे कायम ध्येय होते, आणि जेव्हा काँग्रेस हे करू धजत नव्हती तेव्हा देशाच्या एका कोपऱ्यातील मूठभर उत्साही माणसांचा हा अद्याप एकाकी राहिलेला नेता स्वतःच्या ताकदीवर, स्वतःच्या बळाने तो मार्ग अनुसरायला सिद्ध झाला. सुरुवातीपासूनच त्यांनी निश्चित केले की, आपल्यासारख्या परिस्थितीतील लोकांसाठी एकमेव राजकीय प्रश्न आणि एकच ध्येय आवश्यक आहे; सध्याच्या प्रशासनांत धीम्या गतीने सुधारणा होऊन ते मूलतः बदलून आता आहे त्याच्या नेमके विरोधी करण्याचे हे ध्येय नव्हे तर भारताच्या घडामोडींचे नियंत्रण इंग्रज व नोकरशाहीच्या हातून भारतीय व

राष्ट्रीय पातळीवर यावे, हे ते उद्दिष्ट होय; स्वातंत्र्याने शीघ्र प्रगतीचा हा मार्ग खुला होत असतो. स्वातंत्र्याच्या पूर्व तयारीसाठी जी प्रगती साधायला हवी, ती म्हणजे राष्ट्रीय चेतना जागविणे आणि स्वतंत्र व्हावे यासाठी ऊर्मी निर्माण करणे व स्वातंत्र्याकरिता आवश्यक मार्ग पत्करण्याची इच्छाशक्ती पालविणे, आवश्यक त्याग करण्याची तयारी ठेवणे. श्री. टिळक यांचे राजकीय कर्तृत्व याच निःसंदिग्ध दृष्टिकोनांतून निर्देशित झाले आहे.

त्यामुळे त्यांच्या राजकीय जीवनाचा पहिला अध्याय हा महाराष्ट्राच्या राष्ट्रीय जीवनाला नवजागृती देण्यासाठी व ऐक्यासाठी जोरदार आणि जिवंत प्रचार करण्याकामी खर्ची झाला. आणि म्हणूनच, स्वदेशी आंदोलनामुळे त्याच भूमिकेतून संपूर्ण हिंदुस्थानभरच्या व्यापक चळवळीची पहिली संधी उपलब्ध होताच त्यांनी आतुरतेने तो क्षण हाती घेतला; महाराष्ट्रातील त्यांचे पूर्वीचे कार्य, जुन्या काँग्रेसच्या राजकारणातील एका छोट्या प्रगत गटाचे नेता म्हणून त्यांचे असलेले स्थान, त्यांचे चारित्र्य, त्याग आणि त्यांनी सोसलेली संकटे या सर्व घटकांनी नव्या पक्षाचे जणू नियतीने निवडलेले नेता म्हणून त्यांची योजना केली. बंगाल चळवळीतून उगम पावलेल्या स्वराज्य, स्वदेशी, राष्ट्रीय शिक्षण आणि बहिष्कार या चतुःसूत्रीस हाती घेऊन त्यांतून निश्चित कार्यक्रम तयार करण्याची संधी याच कल्पकतेतून त्यांनी मिळविली आणि काँग्रेसच्या कलकत्ता अधिवेशनांतील ठरावांत या कार्यक्रमांचा समावेश करण्यांत त्यांना यश मिळाले–– हा मवाळ राष्ट्रीय पक्ष उपयुक्त पण शांत, धीम्या गतीचा, उदात्त प्रक्रियेची कास धरणारा अशी प्रतिमा राखून होता आणि श्री. टिळकांच्या या ठराव व कार्यक्रमाने त्याच्या एकसाची नाकर्तेपणावर घणाघातच बसला. या अज्ञात धक्क्याच्या जालीम इलाजामुळे कसे हादरे बसले, ते आपण सर्व जाणतोच; तथापि दरवर्षी हा असा जालीम उपाय करण्याचा श्री. टिळक यांनी का आग्रह धरला असावा, ते आपण पाहणे आवश्यक आहे. काँग्रेसला तिच्या मंद, कूर्मगतीतून खडबडून वेग देणे आणि तिचे रूपांतर जिवंत व कृतिशील संस्थेत करणे या उद्दिष्टातील पहिले पाऊल म्हणजे हे चार ठराव होते.

स्वराज्य तथा संपूर्ण आणि शीघ्र स्वयं-शासन कोठल्याही रूपातील असले तरी श्री. टिळकांच्या दृष्टीने ते राष्ट्रीय ध्येय साधण्याच्या दिशेने निश्चित उपयुक्त आणि आवश्यक होते, ते एक महत्त्वाचे साध्यही होते आणि इतर परिवर्तनांना समाविष्ट करून घेणारा तो एक महत्त्वाचा बदल होता. जे ध्येय पुढच्या अनेक शतकांच्या धूसरतेत दिसेनासे झाले आहे, त्या दूरस्थ ध्येयासाठी कोठल्याही राष्ट्रात चेतना जागविता येत नाही आणि कोठलेही राष्ट्र त्याकरीता महान कृती व महान त्याग स्वीकारीत नसते; राष्ट्रासमोर ते ध्येय निकट आणि स्वच्छपणे दिसण्याची, वर्तमान आशेने ते वृद्धिंगत होण्याची तथा नजरेच्या टप्प्यात असण्याची आणि जीवनकालातच ते प्रत्यक्षात उतरण्याची खात्री असावी लागते आणि सातत्याच्या भगीरथ प्रामाणिक प्रयत्नांतूनच ते ध्येय लवकर साकारता येते. त्यांच्या मते राष्ट्रीय शिक्षण हे नव्या पिढीला स्वातंत्र्याचे शिल्पकार बनविण्याच्या उद्दिष्टाने नवीन राष्ट्रीय भावनेतून दिले जाणारे प्रशिक्षण आहे, व स्वातंत्र्याची प्रक्रिया जर लांबली तर भावी नव्या भारताचे नागरिक बनण्याचे

प्रशिक्षण आहे. स्वदेशी म्हणजे राष्ट्राच्या स्वत्वाची जाणीव व राष्ट्राची आकांक्षा वास्तवात उतरविणे आणि जनजीवनात स्थान मिळविण्यासाठी त्याग करण्यासाठी तत्पर राहाणे. बहिष्कार हे तर अवज्ञेतून केलेल्या विरोधास असलेला लोकप्रिय प्रति शब्दच— या बहिष्कारात श्री. टिळकांनी संघर्षाच्या दोन कल्पनांना जोमदार स्वरूप देण्याचे सामर्थ्य पाहिले; नोकरशाहीचे नियंत्रण व राष्ट्रीय नियंत्रण या दोन कल्पनांना बहिष्कार बळ देईल, परिणामकारक शस्त्र देईल आणि कृतीचे प्रभावी तंत्र देईल, असे त्यांना वाटले, ते स्वतः संघटन आणि कृतीवर भरवसा ठेवत असल्याने केवळ विचार आणि भाषणांपेक्षा कृतीद्वारेच लोकांची आकांक्षा अधिक तेजस्वी, शिस्तबद्ध, कणखर आणि शाश्वत बनवता येईल. या चार दिशांनी सातत्याने प्रयत्न करण्यासाठी कॉंग्रेसकडून सातत्याने अधिकार प्राप्त करणे हे त्यांना आत्यंतिक महत्त्वाचे वाटले; कार्यक्रमाच्या अस्तित्वास धोका निर्माण झाल्याचे त्यांना वाटल्याने पराकोटीच्या निग्रहाने ही चतुःसूत्री बदल न करता समाविष्ट करण्याच्या त्यांच्या हट्टामागे हे कारण होते.

तरीही, ते स्वतः व्यवहारी आणि कृतिशील असल्याने, महत्त्वाचे घटक कायम राखून, काळाच्या गरजेनुरुप नाव-तंत्र तथा कार्यक्रमातील कोठलाही बदल स्वीकारण्यास नेहमी तयार असतात. उदाहरण द्यायचे तर १९०५–१० या काळातल्या चळवळीत या स्वदेशी नेत्याने आणि स्वदेशी पक्षाने भारतातील आंदोलनाचा आग्रह धरला आणि इंग्लंडमधील चळवळीवर विसंबून राहाण्यापासून परावृत्त केले, याचे कारण हिंदुस्थानात स्वयंपूर्ण राष्ट्रीय चेतना आणि इच्छाशक्ती जागविणे व स्थिर करणे हे कार्य त्या समयी अत्यावश्यक होते आणि भारताच्या या राष्ट्रीय अधिकाराबाबत ऐकून घेणारा एकही पक्ष अथवा संस्था इंग्लडमध्ये नव्हती— इंग्लीश राजकारणाचे किमान ज्ञान असलेला कोणीही सांगेल की, असा अधिकार अचूकपणे आणि आग्रहपूर्वक करीपर्यंत आणि या राष्ट्राच्या अचल आकांक्षेने त्याचे समर्थन करीपर्यंत असा पक्ष इंग्लंडमध्ये आजही होणे नाही. होम रुलचे नेता आणि आजचा होम रुल पक्ष यांनी तर उलटपक्षी इंग्लंडमध्ये दमदार, गतिमान आंदोलनाची मागणी केली आहे; होम रुल पक्ष म्हणजे खरे तर नव्या नावानिशी व नवे रूप व नवे अनुयायी असलेला जुनाच पक्ष आहे; भारताच्या दाव्याबाबत व इच्छेबाबत पूर्ण परिचय नसल्याने आणि भारताचे ध्येय, उद्दिष्ट हे आपल्या स्वतःच्या कार्यक्रमाचा भाग बनवायला तयार असलेला हा ब्रिटीश पक्ष आज वाढत आहे. त्यांनी स्वराज्याची मागणी केली आणि प्रशासनातील ढिसाळपणा तुच्छतेने धुडकावून लावला, कारण तेव्हा कोठे खऱ्या प्रश्नाचे राष्ट्राला महत्त्व पटविणे शक्य आहे; आता कोठे बरीचशी प्रगत पण तरीही अर्धीमुर्धी योजना ते तत्परतेने स्वीकारावयाला तयार आहेत; पण अर्थातच लोकमान्य तत्त्वाला पुरेसे मूर्त स्वरूप दिले जाण्याची आणि पूर्ण ध्येय हे नजीकचे उद्दिष्ट म्हणून स्वीकारले जावे, भविष्यातील दूरस्थ हेतू म्हणून त्याकडे पाहिले जाऊ नये, ही अट त्यांनी घातली आहेच. युद्ध आणि राजकारणातील माणसांचा नेता नेहमीच क्षुल्लक आणि प्रासंगिक लाभ अविश्वसनीय मानत असतो कारण असे लाभ खोटी आशा वाढवितात आणि प्रत्यक्षांत ते नगण्य तर असतातच, शिवाय ते मूळ हेतूला बाध आणतात, बगलही देतात त्यामुळे युद्ध व राजकारणी

नेते निर्णायक यश निश्चितपणे जवळ आणू शकतील असे लाभ मात्र नेहमीच हाती घेतात. केवळ शुद्ध आदर्शवादी व्यक्ती नित्य पूर्ण यश अथवा काहीही नको असा आग्रह धरतात– अर्थात अशा आदर्शवाद्यांचाही खूप उपयोग आहे व त्यालाही पर्याय नाही. श्री. टिळक यांच्या राजकीय जीवनांतील सार क्रांतिकारी मार्ग हे नव्हे अथवा क्रांतिकारी आदर्शवाद हे देखील नव्हे, तर आवश्यक बाबीवर भर देण्याची आणि ती प्राप्त करण्यास्तव त्या दिशेने सरळ जाण्याची देशभक्त राजकीय नेत्याची स्वच्छ दृष्टी, थेट प्रचार आणि कृती हे टिळकांच्या राजकीय जीवनाचे सार आहे.

प्रस्तुत पुस्तकातील भाषणे स्वदेशी आणि होम रुल या दोन्ही कालखंडातील आहेत – विशेषतः होम रुलच्या काळातील आहेत. आज देशात सर्वत्र जी आकांक्षा आणि राजकीय विचार प्रकर्षाने आढळतो आणि ज्याच्या निर्मितीसाठी श्री. टिळक यांनी सिंहाचा वाटा दिलेला आहे त्या आकांक्षा व राजकीय विचारासाठी लागणारे मन, धोरण आणि प्रकट आवाज टिळकांच्या या भाषणांतून स्पष्ट दिसतो. श्री. टिळक यांच्यापाठी वक्त्याला लागणाऱ्या देणग्या नाहीत पण त्यांच्या विचारांची शक्ती आणि व्यक्तिमत्त्व यांनी त्यांना एक वेगळाच समर्थ व्याख्याता बनविले आहे. इंग्रजीपेक्षा त्यांची मातृभाषा मराठीमध्ये त्याचे वक्तृत्व अधिक बहरते; कारण मराठीत त्यांना चपखल व समर्पक शब्दप्रयोग हाताशी असतात, त्याचा सुयोग्य उपयोग आणि त्यांची दमदार शैली जनतेला जिंकून घेते. पण अर्थात त्यांच्या दोन्ही भाषांची शक्ती समान आहे, त्यांचे शब्द थेट असतात आणि त्यात प्रेरणा असते–– त्याहून अधिक प्रेरक गोष्ट मिळणार नाही— दृष्टीच्या टप्प्यातील उद्दिष्टाकडे त्वरित नेणाऱ्या, मोजके घण घालून खिळा ठोकणाऱ्या हातोड्याप्रमाणे नेमका मुद्दा आग्रहीपणे व कमीत कमी शब्दात श्रोत्यांच्या मनावर ठसविणाऱ्या प्रामाणिक व समर्थ चित्तांतून निघालेले हे प्रेरक शब्द असतात. मात्र त्यांची ही भाषणे त्यांचे जीवन, त्यांचे चारित्र्य, त्यांचे आयुष्यभराचे ध्येय या बाबींना पार्श्वभूमी म्हणून राखून वाचणे आवश्यक आहे, म्हणूनच मी त्यातील महत्त्वाच्या मुद्यांवर भर दिला आहे–– वस्तुतः मी जे जे काही म्हटले आहे ते सर्व परिचित आहे, तथापि, ज्ञात सत्य जेव्हा महत्त्वाचे आणि आत्यंतिक वैशिष्ट्यपूर्ण असते, तेव्हा त्याच्या पुनरुक्तीचाही उपयोग असतो.

त्यांचे जीवन आणि चारित्र्य यांजसंबंधीच्या दोन घटकांचा या देशाच्या दृष्टीने विशेष महत्त्वपूर्ण उल्लेख करायला हवा कारण या घटकांतूनच या देशाच्या राजकीय जीवनातील दीर्घकालीन उणीवा प्रकट होतात, आजही त्या त्रुटी भरलेल्या नाहीत. पहिली बाब म्हणजे या देशभक्ताची अढळ निग्रही इच्छाशक्ती, प्रामाणिक मन आणि पद्धतशीर कृतीवर भर देणाऱ्या या नेत्याच्या चारित्र्याचे केंद्रच ही दुर्दम्य इच्छाशक्ती आहे; महत्वाकांक्षा, भावना, उत्साह या सर्व गोष्टी अशा इच्छाशक्तीविना फोल असतात; इच्छाशक्ती ही एकच बाब प्रेरक आणि टिकाऊ असते, इच्छा आणि आकांक्षा या समान गोष्टी नाहीत, त्यात मोठा भेद आहे; पहिली म्हणजे इच्छा ही आपणा सर्वांना ठाऊक असते, आपल्या अनुभवाची ही बाब सामान्य, थंड, धीमी आणि अकार्यक्षम आहे आणि खूप उत्साही स्थितीत सुद्धा या इच्छेवर सहजपणे विरजण पडून आपल्या

निहित ध्येयापासून ती हटू शकते; त्या उलट आकांक्षा ही साध्य करण्याकामी, चिवटपणे झुंजण्याकामी प्रचंड शक्तिदायी ठरते. दुसरा घटक आहे तो त्यागासाठी त्यांची असलेली तत्परता आणि हाल सोसण्याची तयारी. हा त्याग आणि अपेष्टा विनाकारण अथवा फुकाचे शौर्य म्हणून सोसायचे नसून जेव्हा वेळ येते तेव्हा धीरोदात्तपणे त्यांना सामोरे जायचे, त्या सहन करायच्या, त्यांच्यावर मात करायची आणि जणू काही विपरित घडलेच नाही इतक्या शांतपणे त्या हालअपेष्टांचे व्रण बाळगूनच नव्याने कामाला लागायचे. भारताच्या कोठल्याही प्रसिद्ध पुरुषाने त्यांच्याएवढ्या हालअपेष्टा या देशासाठी सोसलेल्या नाहीत; अन्य कोणीही त्याग व हाल त्यांच्यासारखे शांतपणे एक अटळ भाग म्हणून झेललेले नाहीत.

श्री. टिळक यांच्या जीवन कार्याचा पहिला टप्पा यशस्वी झाला आहे. दोन महान संधींमुळे त्यांच्या यशाला गती मिळाली आणि या संधींचा त्यांनी पूर्ण लाभ घेतला. जणू तप्त लाव्हा रसासारख्या उसळणाऱ्या स्वदेशी चळवळीने या भूमीला खतपाणी घातले आणि सहा सामान्य दशकांत जे काम साधले जाणार नाही, ते फक्त सहा वर्षात झाले; त्यामुळे स्वातंत्र्याचे ध्येय लोकांच्या मनावर बिंबवले गेले. आपल्या अलौकिक गुणांसह श्रीमती बेझंट यांचा या क्षेत्रात एकाएकी झालेला उदय–– त्यांची निरलस कार्यशक्ती, अदम्य उत्साह, त्यांचे प्रभावी, जिंकणारे व्यक्तिमत्व, त्यांचे अध्यात्मिक चैतन्य – या गुणांनी व त्यांच्या उदयाने एखाद्या गतिमान भोवऱ्यासारखा वास्तवाच्या पटावर आदर्श अवतरला आणि यशातील हा दुसरा घटक ठरला. खरोखरच श्री. टिळक, श्रीमती बेझंट आणि श्री. गांधी या तीन व्यक्तिमत्त्वांची सध्याच्या चळवळीला नेतृत्व व हृदयस्थानी उपस्थिती लाभावी, यातच यशाची ग्वाही मिळालेली आहे. आज या राष्ट्राने श्री. टिळक यांच्या महान ध्येयाची पूर्तता हे आपले उद्दिष्ट म्हणून स्वीकारले आहे, हे उद्दिष्ट हाच आदर्श ठरला आहे; भारत सरकार व ब्रिटिश राष्ट्राने भारतीय प्रशासनात संपूर्ण स्वयं-शासन हे आपले अंतिम ध्येय म्हणून स्वीकृत केले आहे; इंग्लंडमधील अतिशय उज्ज्वल भवितव्य असलेल्या बलवान पक्षाने हे उद्दिष्ट त्वरेने आणि पूर्णतः प्राप्त व्हावे असे प्रतिपादन केले आहे. वर्तमान स्थितीत केवळ क्षुल्लक लाभ पाहाणारे मतभेद असलेले मूठभर लोक आणि शतकांच्या अंधःकारात राहाणारे इतर या देशात असतीलच पण हा नगण्य अपवाद वगळता भारतातील सर्व प्रांत-प्रदेश आणि समाज-जाती एका आवाजात, एकमताने बोलत आहेत. श्री. टिळक यांची कार्यतत्त्वे स्वीकृत झाली आहेत; ज्या कल्पना राबविण्यासाठी त्यांना एवढा त्रास झाला त्या कल्पना आज सर्वसामान्य आणि आपल्या राजकीय विचारांचे स्वयंसिद्ध चिरपरिचित सत्य बनल्या आहेत. आता एकच प्रश्न उरला आहे आणि तो म्हणजे आता अटळ बनलेल्या उत्क्रांतीच्या गतीचा आणि याच आशेसाठी श्री. टिळक हे आजही अखिल भारताचे नेता आहेत. ते जेव्हा साध्य होईल तेव्हाच त्यांचे जीवित-कार्य पूर्ण होईल; तोवर आपल्या हयातीत त्यांना विश्रांती मिळणे शक्य नाही, मग जरी वार्धक्य आणि व्याधी यांची पीडा झाली तरीही विसावा शक्य नाही – कारण त्यांची हिंमत, चेतना नेहमीच सतेज व शक्तिदायी राहील,– नदीचे पाणी आपले ध्येय गाठेपर्यंत, सागराला मिळेपर्यंत कधी थांबू शकते ? पण ते अंतिम टोक–– आपल्या नवीन राष्ट्रीय जीवनाचा

पहिला टप्पा, स्वयं-पूर्तीसाठी आणि मानवतेच्या सेवेसाठी अधिक महान भारताच्या पुनर्जन्माचा आरंभ— उद्या गाठले जाईल अगर त्यास थोडा विलंब होईल, तथापि ते प्राप्त होणार हे निश्चित आहे, आणि श्री. टिळक यांचे नाव इतिहासात आताच राष्ट्राची उभारणी करणारे म्हणून नमूद झाले आहे, श्रेष्ठतम राजकीय व्यक्तिमत्त्वातील एक, संस्मरणीय व्यक्तींतील एक प्रमुख आणि भारताच्या दैवातील अत्यंत कठिण काळातील प्रतिनिधी म्हणून हे नाव आजच नोंदले गेले आहे— जोवर या देशाला आपल्या भूतकाळाचा अभिमान राहील आणि भविष्यकाळाची आशा तेवत राहील तोवर हे नाव कृतज्ञतापूर्वक स्मरले जाईल.

(बाळ गंगाधर टिळक : लेखन आणि व्याख्याने, १९१८.)

● ● ●

## ३४. उत्तुंग व्यक्तिमत्व आणि दुर्दम्य आकांक्षा . . . . . . ५-८-१९२०

**' उत्तुंग आकांक्षेचे उदात्त व्यक्तिमत्व असलेले लोकाग्रणी लोकमान्य टिळक यांचे निधन पोकळी निर्माण करणारे असले तरीही त्यांचे जीवनकार्य, ध्येयनिष्ठा आणि त्यांनी साध्य केलेले यश हे भारतीयांना पुढील संघर्षासाठी नित्य बळ देत राहील '. असे विचार श्रीअरविंद यांनी दि. ५ ऑगस्ट १९२० रोजी ' दि इंडिपेंडंट ' या पत्रात लोकमान्यांवरील मृत्युलेखात व्यक्त केले आहेत.**

ज्या क्षेत्रासाठी सर्वस्व वाहिले, यश मिळविले त्या क्षेत्रास पोरके करून एक लोकाग्रणी नेता, थोर उदात्त व्यक्तिमत्व आणि उत्तुंग आकांक्षा आपल्यातून निघून गेली आहे. या देशाच्या दृष्टीने लोकमान्य टिळक हे याहूनही अधिक होते, कारण या देशाशी ते सर्व दृष्टींनी एकरूप झाले होते आणि या देशाने पूर्वी केलेल्या संघर्षाचे ते प्रतीक होते व स्वतंत्र व उदात्त जीवनासाठी देशाच्या चालू असलेल्या संघर्षाचे ते नेता होते. त्यांचे महत्कृत्य आणि व्यक्तिमत्व यामुळे त्यांना ऐतिहासिक व सार्थ नायकांच्या अग्रभागी स्थान मिळाले आहे. या माणसाने शून्यातून संघर्ष उभा केला आणि काही हाताशी नसताना महान कार्य उभे केले. नवीन, बलशाली, स्वयंसिद्ध राष्ट्रीय तेज, नवजागृती दिलेले राजकीय विचार आणि नव्याने जागी झालेली जनता, स्वातंत्र्य व कृतीची आकांक्षा आणि महान राष्ट्रीय उद्दिष्ट एवढे प्रचंड कार्य त्यांनी मागे ठेवले आहे. आपल्या कार्यास त्यांनी अलौकिक गुण बहाल केले, शांत-स्थिर-न डळमळणारे धैर्य दिले, दोलायमान न होणारे उद्दिष्ट दिले, लवचिक धोरण, प्रगतीकडे नेणाऱ्या शक्यतांचे आकलन होणारा द्रष्टेपणा, प्रसंगानुरूप वागण्याचे ध्यान, वास्तवाचे भान, लोकशाही नेतृत्वाची कुवत, ध्येयाकडे दुर्लक्ष न करण्याची मुत्सद्देगिरी ही वैशिष्ट्ये बहाल केली आणि चळवळीच्या आत्यंतिक कमजोर परिस्थितीतही आपले उद्दिष्ट कायम राखले ; सर्वांना मार्गदर्शन केले ; त्यांच्यातील एकमार्गी देशभक्ताने सत्ता आणि प्रभाव यांचा वापरही केवळ मातृभूमीच्या सेवेसाठी आणि तिच्या मुक्तीच्या कार्यातील एक साधन म्हणूनच केला. त्यांचे संपूर्ण जीवन मातृभूमीच्या वेदीवर कायम चढविले होते आणि अविरत सेवा व देशासाठी श्रम वेचतानाच त्यांना मृत्यू आला आहे.

ह्या थोर व्यक्तिमत्वाच्या निधनाने एक खूप मोठी पोकळी त्वरित निर्माण झाली असून ती काही काळ तीव्रतेने जाणवत राहील. तथापि, त्यांनी स्वतःच करून ठेवलेल्या कार्यामुळे ती पोकळी लवकरच नवी माणसे व नव्या प्रेरणांनी भरून निघेलच. त्यांनी देशभरात प्रामाणिक, खरे आणि फलदायी चैतन्य निर्माण केले, जे कधी थंडावणार नाही आणि अपयशीही ठरणार

नाही ; उलट विचारशक्ती आणि आवाका यांना ते अधिक वाढवीत राहील आणि त्यामुळे त्यांचे उद्दिष्ट निश्चित फलद्रूप होईल. पुढे कदाचित त्यांच्या तोडीचा नेता निघाला नाही तरीही हे चैतन्य त्यांच्या पठडीतील इतरांना उभे करू शकेल आणि त्यायोगे त्यांच्या आवश्यकता, मागण्या आणि सामर्थ्य व धैर्य यांची जोपासना होईलच. ते स्वतः केवळ पडद्याआड गेले आहेत कारण जीवन हे भ्रम नसून मृत्यू हेच भ्रम आहे. त्यांच्या ठायी असलेले समर्थ चैतन्य आता मानवी आणि शारीरिक मर्यादा ओलांडून मुक्त झाले आहे आणि तरीही आज कार्यरत असलेल्या व नव्याने येऊ घातलेल्या माणसांना व आपल्याला ते चैतन्य अधिक सूक्ष्म, भरपूर आणि न रोखता येणाऱ्या प्रभावाचे शिंपण करीत राहणार आहे ; आणि कदाचित असे नसते तरीही त्यांच्या परिणामकारी जीवनाचा एक भाग आजही आपल्यापाशीच आहे. त्यांची अदम्य आकांक्षा अनेकांच्या मनात वास करीत आहेच, ज्यायोगे त्यांनी निर्मिलेली राष्ट्रीय आकांक्षा अधिक बलवान व निर्भय होणार आहे ; ही वाढती आकांक्षा आपल्या राष्ट्रीय संघर्षास यशदायी परिस्थिती निर्माण करण्यासाठी लागणारी शक्ती व एकत्रित बळ देईल. देशवासियांच्या उत्थानासाठी आणि त्यांचे मनोबल वाढविण्यासाठी त्यांनी मागे ठेवलेले अमाप धैर्य कामी येईल; त्यांचा त्याग आणि संकटातील त्यांचा धीरोदात्तपणा आपल्याकडे राहिला आहे आणि तो त्यांच्या जीवनकाळात होता त्याहीपेक्षा वाढता राहणार आहे व त्यामुळे जनतेसमोर असलेल्या कठिण परिस्थितीला तोंड देण्यासाठी आधीच तीक्ष्ण, बलशाली झालेल्या जनमानसाला अधिकच सामर्थ्यशाली बनता येईल. आपल्या देशासाठी या गोष्टींचा वारसा त्यांनी मागे ठेवला आहे, लोकमान्यांचे जीवन सार्थ ठरावे आणि त्यांचे उतराई व्हावे यासाठी नागरिक त्यांचा अर्थ जाणून त्यांची कदर करण्यास्तव तयार होतील.

कार्यपद्धती आणि धोरणे कदाचित पुढे बदलतील पण लोकमान्य टिळकांचे स्थान आणि त्यांनी जे कार्य केले त्याची प्रेरणा आजही कायम आहे आणि भविष्यातही तिची आवश्यकता वाटत राहीलच कारण त्यांच्या स्वतःच्या आयुष्यांतील उदात्त आणि एकमेव उद्दिष्ट साध्य करण्यास्तव लोकांना हीच प्रेरणा शक्ती देत राहील. थोर कार्यकर्ता आणि कार्याचा पाया घालणारा यांचे परिशीलन केवळ त्यांनी स्वतः काय केले, त्यावरून केले जात नसते ; तर अधिक महान कार्याची त्यांनी जी शक्यता निर्माण केलेली असते, त्यावरूनही त्यांची महत्ता ठरते. आपल्यातून गेलेल्या या नेत्याच्या यशामुळे आपले राष्ट्र एका विवक्षित बिंदूपाशी येऊन ठेपले आहे. या बिंदूपासून पुढे निघणे आणि पुढची मजल गाठणे, नवीन परिस्थितीस तोंड देणे, त्याच्या भविष्यातील होणाऱ्या अधिक कष्टदायी आणि महत्त्वाच्या मागण्या पुऱ्या करण्यासाठी झटणे यासाठी राष्ट्रापाशी असलेली ताकद ही लोकमान्यांच्या परिश्रमांना मिळालेली सर्वांत मोठी पावती आहे. त्यांच्या निधनाच्याच क्षणी राष्ट्रीय चळवळीला या कसोटीस उतरावे लागत आहे.

देश आत्यंतिक कठिण आणि तीव्र काळातून जात असताना लोकमान्य टिळकांचे देहावसान आपल्याला सहावे लागत आहे. अतिशय चिंताजनक काळात हा मृत्यू झाला आहे, आत्यंतिक

निर्णायक क्षणाला ही घटना घडली आहे ; कारण याच क्षणी दैवाने आपल्या देशाला महत्त्वाचे प्रश्न पुसले आहेत. या प्रश्नांना राष्ट्र काय उत्तरे देते त्यावर देशाच्या भावी काळातील शक्ती, गुण आणि अर्थ अवलंबून आहे. आपल्यापुढे उभ्या ठाकणाऱ्या प्रत्येक घटनेला एक दैवी अर्थ असतो, अशा महान नेत्याचे अशा काळात निधन व्हावे ही घटना लोकांना अधिक गंभीर हादरा देणारी ठरत आहे, या राष्ट्राच्या प्रत्येक माणसावर त्यामुळे खूप मोठी–जवळ जवळ धार्मिक जबाबदारी येऊन पडली आहे, असे म्हणावेसे वाटते.

या क्षणी याबाबतीत काही न जाणता निवाडा देणे मला योग्य वाटत नाही ; पण या संकटास प्रत्येकाने आपले ज्ञान आणि विवेक यानुसार सामोरे गेले पाहिजे. या देशाच्या प्रत्येक नागरिकाने भावी काळातील निर्णय घेतांना आपल्या मनाचे दौर्बल्य, भित्रेपणा आणि त्याग करण्यातील नाखुषी या बाबी पूर्ण वगळून टाकाव्या अशी किमान अपेक्षा करायला हवी, कारण भारतभूमी आणि तिचा हा दिवंगत सुपुत्र यांचा वारसा सांगण्याची योग्यता त्यामुळेच प्राप्त होईल. प्रत्येक नागरिक त्या निस्वार्थी महामानवाचे स्मरण करो, हीच शिकवण आपल्या महान धर्मग्रंथाने–वेदांनी दिलेली आहे, दैवी इच्छा आणि आपल्या जगन्मातेला जाणून घेण्याचा तोच एक मार्ग आहे. या मातेसाठी भारताने दोन मागण्या केल्या आहेत ; आत्म्याची मुक्ती आणि आदिमाता मानव जातीसाठी जे जे करणार आहे, त्या त्या कार्यार्थ आवश्यक जीवन आणि कृती या त्या दोन मागण्या आहेत ; भावी भारत हा खरोखरच भारत असावा, म्हणून कार्य आणि तिचा वास्तव आत्मा यांना तिच्या लेकरांनी समजून घ्यायला हवे. पहिली मागणी अजूनही आजच्या घडीला महत्त्वाची ठरते, पण दुसरी मागणी यातच अंतर्भूत असली तरी तो अधिक व्यापक विषय आहे. आपल्या आजच्या आणि पुढील काही वर्षातील निर्णयांच्या आल्यावर आपल्या भावी राष्ट्रीय अस्तित्वाचे वास्तव, शाश्वती आणि महत्ता निर्धारित आहे. केवळ बाह्यांगीच नव्हे तर आध्यात्मिक महान आत्मतेजाच्या ओळखीचा हा प्रारंभ आहे. या दोन विचारांनी आपल्या कार्यकृतीला दिशा दिली पाहिजे. तरच लोकमान्य टिळकांनी केलेले कार्य आणि त्यांचे ध्येय खऱ्या अर्थाने निरंतर राहील.

**दि इंडिपेंडंट, ५-८-१९२०**

## ३५. श्रीअरविंद यांचे डॉ. मुंजे यांस पत्र . . . . . . ३०-८-१९२०

**लोकमान्य टिळक यांच्या निधनानंतर डॉ. बा. शि. मुंजे व डॉ. के. ब. हेडगेवार यांनी पांडिचेरीस जाऊन श्रीअरविंद यांची भेट घेतली. त्यांना नागपूर येथे होणाऱ्या राष्ट्रीय सभेचे अध्यक्षपद स्विकारण्याची विनंती केली. श्रीअरविंद यांनी डॉ. मुंजे यांना पाठविलेल्या पत्रात काँग्रेसचे अध्यक्षपद स्वीकारणे त्यांना का शक्य नाही याचे विवेचन केले आहे.**

प्रिय डॉ. मुंजे,

काँग्रेसच्या नागपूर अधिवेशनाचे अध्यक्षपद स्विकारण्याची माझी असमर्थता याआधी मी आपणास तारेने कळविली आहेच. वास्तविक आजच्या राजकीय क्षेत्रातच माझ्या या नकारांची कारणे अंतर्भूत आहेत. त्यांचे पहिले कारण असे की, काँग्रेसच्या सिद्धांतावर माझी काडिमात्र श्रद्धा नाही. अर्थातच तो माझाच सिद्धांत आहे, अशा अर्थाच्या प्रतिज्ञापत्रावर सही करणे मी मुळीच पसंत करणार नाही. शिवाय ब्रिटिश हिंदुस्थान सोडल्यापासून त्यावेळचे माझे विचार व दृष्टिकोन यांत आता खूपच बदल घडून आला आहे. आजचे माझे विचार हे प्रचलित राजकीय वस्तुस्थितीशी व कार्यप्रणालीशी मेळ साधणारे नाहीत. म्हणूनच आजच्या काँग्रेसपुढे माझे विचार मांडणे हे मला मोठंच अडचणीचे वाटेल. देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी आजचे सर्वच राजकीय पक्ष जे जे काही करीत आहेत, त्याबद्दल मला सहानुभूती आहे हे खरं. परंतु त्यापैकी एखाद्या पक्षाच्या कार्यक्रमाशी माझी संपूर्ण बांधिलकी साधणे मला आता केवळ अशक्य आहे. काँग्रेसचा अध्यक्ष हा नेहमी काँग्रेसचा प्रवक्ताच असतो. अशा स्थितीत त्या पक्षाच्या व्यासपीठावरून मी काँग्रेसच्या ध्येय-धोरणापासून शेकडो कोस दूर असलेले माझे विचार मांडू लागलो तर ती घोर आत्मवंचनाच ठरेल. आखिल भारतीय काँग्रेस कमिटीची व त्या वर्षातील काँग्रेसपुढील ध्येय-धोरणाची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी अध्यक्षावर असते. शिवाय अन्य आकस्मिक उद्भवणाऱ्या घटनांकडेही त्याला दुर्लक्ष करता येत नाही. काँग्रेस पक्षांशी असलेल्या माझ्या वैचारिक विरोधामुळे या जबाबदाऱ्या मी पार पाडू शकणार नाही, हे एक कारण आहेच. परंतु काँग्रेस अध्यक्षपदाची धुरा मी माझ्या शिरावर घेऊ शकणार नाही, याला आणखी एक कारण असे की, मी आधीच आयोजिलेले माझे कार्य, एकदम अर्धवट टाकून ब्रिटिश इंडियांत पुन्हा नव्याने स्थिर स्थावर होणे मला कठीणच आहे.

या सर्वांपेक्षाही त्याला एक दुसरे अत्यंत महत्त्वाचे कारण आहे. मी राजकारणाचा आता सर्वस्वी त्याग केला आहे. मला त्यात आता काहीच रस उरलेला नाही. अलिकडे मी संपूर्णपणे वेगळ्या स्वरूपाचे कार्य हाती घेतले आहे. ते प्रामुख्याने आध्यात्मिक आहे. त्यात

-आर्थिक व सांस्कृतिक पुनर्रचना अंतर्भूत आहे. म्हणूनच ते अमूलाग्र क्रांतिकारक स्वरूपाचे कार्य आहे. त्यासंबंधात एखाद्या प्रयोग शाळेत त्याचे मला प्रत्यक्ष प्रयोगच करावे लागणार आहेत ; किंवा मला त्यावर देखरेख तरी करावी लागेल. अर्थात त्यावरच माझ्या सर्व शक्ती व वेळ केंद्रिभूत करणे मला भाग आहे. अशा परिस्थितीत अन्य कोणत्याही स्वरूपाचे राजकीय काम अंगावर घेणे मला केवळ अशक्य आहे. मी अंगिकारलेले नवीन आध्यात्मिक कार्य हे आता मी माझे जीवीत कार्यच ठरविले आहे ! त्यामुळेच तुमच्या आवाहनाला मी प्रतिसाद देऊ शकत नाही, याबद्दल दिलगिर आहे.

मी टिळकांचे स्थान घेऊ शकेन असे जर तुम्हाला वाटत असेल तर तुमची निवड साफ चुकली असे मला स्पष्टच म्हणावयाचे आहे. मी तर सोडाच, पण त्यांची जागा घेऊ शकेल अशी कोणतीच व्यक्ती मला तरी दिसत नाही. मी हाडाचा ध्येयवादी माणूस आहे. जिथे संघर्ष आहे किंवा ज्या कार्याचे स्वरूप क्रांतीकारक आहे–क्रांतिकारक म्हणजे हिंसात्मक नव्हे–अशा ठिकाणी माझ्यासारख्या माणसाचा उपयोग होऊ शकेल ; किंवा एखाद्या उदात्त उद्दिष्टासाठी एखादे आंदोलन उभारावयाचे आहे ; किंवा त्यासाठी एखादी संघटना बांधावयाची आहे, किंवा जिथे कार्यकर्त्यांना उत्साहित व प्रेरित करावयाचे आहे अशा ठिकाणी मी काहीतरी भूमिका बजावू शकेन. प्रतियोगी सहकारिता हे लोकमान्य टिळकांच्या राजकीय धोरणाचे सूत्र होते. आवश्यक तेथे आंदोलन व विरोध आणि त्याचबरोबर शांततामय असहकार अशा दोन्ही गोष्टी त्यांत अंतर्भूत होत्या. परंतु असे आंदोलन यशस्वी व्हावयाचे असेल तर त्याचे नेतृत्व लवचिकपणा, कौशल्य व ठामपणा अशा गुणांनी युक्त असलेल्या व्यक्तीकडेच सोपवावे लागते. यापैकी पहिल्या दोन गुणांचा तर माझ्याकडे अभावच आहे. फार तर एखादे धोरण मी स्विकारलेच तर त्याला चिकटून राहण्याचे काम मी करूं शकेन. पण मुळांत कौन्सिल प्रवेशाचे धोरणच मला कदापी मान्य होण्यासारखे नाही. शिवाय पंजाबातील कांही सरकारी अधिकाऱ्यांना अद्दल घडवण्यासाठी प्रचंड आंदोलन उभारणे किंवा अस्तंगत तुर्कमान साम्राज्य पुनः प्रस्थापित करण्यासाठी एखादी व्यापक चळवळ उभारणे, हे माझ्या सामान्य बुद्धीच्या आवाक्याच्या पलीकडचे आहे. त्यांचा हेतू सरकारला प्रथम अडचणीत आणून लगेच इजिप्त आयर्लंडप्रमाणे स्वातंत्र्यासाठी सर्वंकष आंदोलन हातात घेण्याचा असेल, तर ते मला एकवेळ मान्य झाले असते. अर्थात मला इथे सशस्त्र आंदोलन अभिप्रेत नाही. या बाबतीत मला फक्त एवढेच म्हणावयाचे आहे की कॉंग्रेसने आपले ध्येय-धोरण, आपला सैद्धांतिक विचार, आपली कार्यपध्दती व संघटनात्मक ढाचा या सर्व गोष्टीत अमूलाग्र बदल केला असता आणि असा बदल केवळ आपल्या आंदोलनात्मक धोरणाचा नव्हे तर संपूर्ण राष्ट्राच्या सर्वंकष पुनर्रचनेचाच केंद्रबिंदू बनवला असता, तर राजकारणांत पुन्हा प्रवेश करण्याचा विचार मी कदाचित केलाही असता, परंतु कॉंग्रेसची राजकीय विचारसरणी व त्यांतून तयार झालेली कार्यप्रणाली दोन्हीही व्यवहार्य नाहींत असे माझे स्पष्ट मत आहे. माझे विचार इतक्या दुसऱ्या टोकाचे असल्याकारणाने त्या पक्षात प्रवेश करणे मला कसे शक्य आहे? अशा पक्षाचे अध्यक्ष पद मी स्विकारणे संयुक्तिक ठरेल काय?

या बाबतीत माझा आणखीही एक विचार आहे. काँग्रसचे यश हे कोणा एका व्यक्तीवर कधीच अवलंबून नसते. शिवाय माझ्यासारखा एका कोपऱ्यांत पडलेला माणूस तिचे कांही भले करू शकेल असे मला मुळीच वाटत नाही. मी नागपूर काँग्रसचे अध्यक्षपद स्विकारल्याशिवाय तिच्यांत जान येणेच शक्य नाही, असे जेव्हा मला भेटायला येणारे लोक मोठ्या आत्मविश्वासाने सांगतात तेव्हां मला त्यांचे आश्चर्य वाटते. तो त्यांचा केवळ भ्रम आहे. वास्तविकता अशी आहे की, आजच्या या कसोटीच्या काळात राष्ट्रीय चळवळीची अंगभूत शक्तीच तिच्यात सामर्थ्य आणि जोष उत्पन्न करील. माझ्या नकारामुळे आपली निराशा होईल हे मी जाणतो. पण त्यामागची परिस्थती व कारणे मी या आरंभीच स्पष्ट केली आहेत. त्यांचे निराकरण होईल असे मला दिसत नाही.

आपला स्नेहांकित,

**अरविंद घोष**

## ३६. गूढवादाचा सिद्धांत

**श्रीअरविंद सांगतात, गूढवादाचा सिद्धांत, सर्व वस्तूंच्या मागे आणि सर्वोपरी असलेल्या आणि मतांच्या अभ्यासपूर्ण प्रयत्नाने अमेय अशा एका अज्ञेय, काळातीत आणि असंज्ञेय तत्त्वाला मान्यता देतो. आपल्या व्यक्तिनिष्ठ प्रयत्नांमधून सर्व वस्तूमात्रात गूढ असलेला देव आपणाला प्रतीत होतो. तो नामरहित असला तरी त्याला अनेक नावे आहेत. नाव आणि ज्ञान यानी वर्णिलेल्या सर्व गोष्टी त्याच्या ठायी असल्या तरी तो अमेय व अवर्ण्य आहे. त्याच्यात वस्तू, शक्ती आणि क्रिया या सर्व परिमाणांचा समावेश आहे.**

**वेदातील काही संकल्पना स्पष्ट करुन श्रीअरविंद म्हणतात ऋग्वेद म्हणजे संदिग्ध, गोंधळलेल्या आणि रानटी स्तवनांचा भरताड अशी कल्पना होण्याचे संपले. वेद ही मानवतेच्या उच्च उन्नयनाची गाथा होय. त्यातील स्तोत्रे आत्म्याच्या चिरंतन उन्नयनाच्या स्त्रोत्रमय महाकाव्यातील घटना ठरतात.**

उपनिषदातील उच्च आध्यात्मिक ज्ञान वेदांमध्ये आहे परंतु त्याची शब्दयोजना नाही. ते उत्स्फूर्त ज्ञान आहे. पण त्यामध्ये बौद्धिक आणि दार्शनिक संज्ञांची वाण आहे. आपणास कवीवाणी आढळते आणि ज्याना सर्व अनुभव वास्तव, विविध, संयुक्तिक आणि प्रत्यक्ष वाटतो त्याना ती प्रकाश पाडू शकेल पण ज्याना मनाच्या आणि आत्म्याच्या प्रत्यक्षानुभूती ह्या स्वतंत्र विचारणा आहेत अशा विचारवंताना आणि शास्त्ररचनाकाराना तिचा उपयोग नाही. परंतु तेथे प्रणाली आहे, सिद्धांत आहे, परंतु त्याची रचना अतिशय सूक्ष्म आहे. तिच्या संज्ञा प्रत्यक्ष आहेत. तिच्या विचारांची मांडणी अत्यंत व्यवहारिक आणि प्रयोगसिद्ध आहे. परंतु एकाद्या प्राचीन आणि अनुभवसिद्ध खात्रीलायक आणि परिपूर्ण सिद्धांताप्रमाणे ते आहे. घटनावस्थेत असलेल्या अनिश्चित आणि ठोकळ विधानाप्रमाणे नाही. आपणाला ह्या ठिकाणी प्राचीन मानसशास्त्र आणि आध्यात्मिक जीवनकला ह्यांतून निष्पन्न आणि विकसित झालेली दार्शनिक उपनिषदे आहेत आणि बुद्धिवादाधिष्ठित व तर्कशुद्ध सिद्धांताने युक्त अशी वेदान्त, सांख्य, योग अशी दर्शने आहेत. तरीपण सर्व जीवनाप्रमाणे आणि सर्व विज्ञानाप्रमाणे तेही महत्त्वाचे आहे. तर्कवादी बुद्धिच्या कठोर चिलखतापासून ते मुक्त आहे. प्रतिष्ठित प्रतीके आणि पवित्र सूत्रे असूनसुद्धा ते विशाल, मुक्त, लवचिक, प्रवाही, चंचल आणि सूक्ष्म आहे. त्याला जीवनाची गती आहे आणि आत्म्याचा प्रदीर्घ श्वास आहे. उत्तरकालीन दर्शने हे ज्ञानग्रंथ आहेत आणि मुक्ती हे सर्वश्रेष्ठ उत्तम आहे असे समजतात तर वेद हे कर्मकांड आहे आणि शाश्वतची बंधने आणि क्षुद्रता ह्यांचा ज्या आशेपायी तिरस्कार करतात ती पूर्णता, स्वयंसाधना आणि अमृतता आहे.

गूढवादाचा सिद्धांत सर्व वस्तूंच्या मागे आणि सर्वोपरी असलेल्या आणि मनाच्या अभ्यासपूर्ण प्रयत्नानेपण अमेय अशा एक अज्ञेय, कालातीत आणि असंज्ञेय तत्त्वाला मान्यता देतो. व्यक्ति निरपेक्षतया ते 'ते एक सत्' आहे. आपल्या व्यक्तिनिष्ठ प्रयत्नांमधून सर्व वस्तुमात्रात गूढ असलेला देव आपणाला प्रतीत होतो. तो नामरहित असला तरी त्याला अनेक नावे आहेत, नाव आणि ज्ञान ह्यानी वर्णिलेल्या सर्व गोष्टी त्याच्या ठायी असल्या तरी तो अमेय आणि अवर्ण्य आहे. त्याच्यात वस्तु, शक्ति आणि क्रिया ह्यांच्या सर्व परिमाणांचा समावेश आहे.

देव म्हणजे मूलकारण आणि अंतिम फलित असा द्विविध आहे. दैवी अस्तित्व,-विश्वांचा निर्माता, वस्तूंचा उत्पत्तिकर्ता आणि प्रभू, पुरुष आणि स्त्री, सत् आणि चित्, ह्या जगांचा आणि त्यातील रहिवाशांचा माता आणि पिता, तो त्याचा आणि आपला पुत्र पण आहे. प्राणिमात्रांच्या वृद्धीमधून प्रतीत होणारे ते ह्या जगतांचे दैवी बालक आहे. तो रुद्र आणि विष्णु, प्रजापती आणि हिरण्यगर्भ, सूर्य, अग्नि, इंद्र, वायु, सोम, बृहस्पती– वरुण आणि मित्र, आणि भग आणि आर्यमा, सर्व देव आहे. आपल्या कर्मामधून आणि यज्ञांमधून तो ज्ञानी, प्रबल आणि मुक्तिदाता पुत्र आहे, आपल्या संग्रामातील नेता आहे आणि आपल्या ज्ञानाचा द्रष्टा आहे. ऊर्ध्व सागराकडे दौड करणारा तो आपणासमोरील शुभ्र वाजी आहे.

मानवाचा आत्मा एकाद्या पक्ष्याप्रमाणे, हंसाप्रमाणे शारीरिक आणि मानसिक जाणिवेच्या चकाकत्या अवकाशापलिकडे भरारी मारीत असतो. सत्याच्या मार्गावर आरुढ होऊन शरीररूपी भूमी आणि मनरूपी स्वर्ग ह्यांच्या पलिकडे एकाद्या प्रवाशाप्रमाणे आणि योध्याप्रमाणे ते वर चढत असतो. अत्युच्च श्रेष्टतेच्या गूढतेतून आपणासाठी थांबून असणाऱ्या आणि आपणासाठी वाकलेल्या अशा त्रिविध दैवी तत्त्वाच्या रूपात बसलेल्या आणि मुक्तीचा स्रोत असलेल्या अशा त्या देवाचा शोध घ्यावा हा त्याचा हेतू असतो. देव, आकर्षक आणि उदात्त, इह वा अमुत्र नेहमीच आपणाला अन्य श्रेष्ठ देवांच्या स्वरूपात साह्यकर्ता असतो. तो मानवांचा सुहृद आणि प्रेमी आहे. अनंताच्या तेजस्वी गाईंच्या सडातून निघालेले मधूर दूध आणि तूप देणारा (गाईंच्या) कळपांचा गोपाल स्वामी आहे. दैवी आनंदाच्या अमृतमय मधाचा तो स्रोत आणि वितरक आहे. अस्तित्वाच्या पर्वतावरील तेजस्वी वृक्षापासून पिळून काढलेल्या किंवा जीवनाच्या सहस्त्र जलधारांमधून काढलेले ते (मद्य) आपण पीत असतो आणि त्याहर्षामुळे उद्युक्त होऊन आपण अमर होत असतो.

पूर्वीच्या गूढवादी स्वप्नातील काही प्रतिमा ह्या अशा आहेत. व्यक्तिनिष्ठतेने जाणवणारी आणि वस्तुनिष्ठतेने ज्ञात होणार असे आतील आणि बाहेरील जगांचे हे विश्व त्या परमेश्वराने संमिश्र बनविले आहे. ते जगतांच्या आणि स्वर्गांच्या ऊर्ध्व निःश्रेणीने बनविले आहे; ते विविध जलांचा प्रवाह आहे; ते सात किंवा आठ किंवा नऊ किंवा दहा रश्मींचा प्रकाश आहे. अनेक पठारांची ते टेकडी आहे. त्या द्रष्ट्याना अनेकदा ते विश्व त्रयीमाला रूप प्रतिमा आढळते, म्हणजे तेथे तीन जगत आणि तीन स्वर्ग आहेत. शिवाय एक विविध जग

खाली आहे. स्वर्ग, पृथिवी आणि मध्ये असणारे अंतराल, त्यामध्ये पुन्हा एक जगत्मयी म्हणजे सूर्याचा तेजस्वी स्वर्ग आणि त्यावर एक जगमयी म्हणजे परमेश्वराची सर्वश्रेष्ठ आणि आनंदमय निवासस्थाने.

ह्या जगतांची मालिका अधिक संमिश्र बनवणारी अनेक तत्वे त्यांमध्ये उपस्थित आहेत. ही तत्वे मानसशास्त्रीय आहेत. कारण ज्याअर्थी हे सर्व सर्जन (ही सर्व सृष्टी) ही चैतन्याची निर्मिती आहे त्याअर्थी त्यामधील बाह्य जगतांच्या प्रत्येक प्रणालीमध्ये प्रत्येक पातळीवर कुठल्यातरी शक्तीशी वास्तविक सुसंवाद असला पाहिजे किंवा तीमध्ये (त्या चैतन्याचे) वस्तुनिष्ठ प्रतीक असलेली जाणीवेची चढती श्रेणी तसेच तीमध्ये अनेकविध वस्तूंची काही आंतरिक नियमबद्धता संग्रहीत केली असली पाहिजे. वेदाना समजून घेण्यासाठी वेदातील समांतर योजना आपण पकडली पाहिजे आणि ज्या वैश्विक पातळींवर ती घेऊन जाते त्यामधील भेद स्पष्ट केला पाहिजे. उत्तरकालीन पौराणिक प्रतीकांमागे तीच प्रणाली आपणास पुन्हा आढळते आणि त्यावरून आपण सुलभतेने आणि स्पष्टतेने कोष्टकबद्ध मालिका काढू शकतो. कारण तेथे जीवनाची सात तत्त्वे सांगितली असून पुरेशा काटेकोरपणाने पौराणिक सात जगते अनुरूपतेने आढळतात. पहा :–

| | तत्त्व | जगत् |
|---|---|---|
| १. | शुद्ध अस्तित्व–सत् | अस्तित्वाचे परमसत्य जग (सत्यलोक) |
| २. | शुद्ध जाणीव-चित् | अनंत इच्छाशक्ती किंवा शुद्धशक्ती असणारे जग (तपोलोक) |
| ३. | शुद्ध आनंद-आनंद | अस्तित्वाच्या निर्मितीचा आनंद असणारे जग (जनलोक) |
| ४. | ज्ञान किंवा सत्य-विज्ञान | विशालतेचे जग (महर्लोक) |
| ५. | मन | प्रकाशमय जग (स्वर्) |
| ६ | जीवन(चैतन्ययुक्त जीवन) | अनेक उत्पत्तींचे जग (भुवर्) |
| ७. | जड पदार्थ | जड जगत् (भूर्) |

तर पुराणामध्ये पुरेशी सोपी असणारी ही प्रणाली वेदांमध्ये बरीचशी गुंतागुंतीची बनली आहे. तेथे परमोच्च तीन जगते ही दैवी तत्त्वमयी म्हणून वर्गीकृत दिलेली आहे, कारण ती नेहमीच त्रयी स्वरुपाने एकत्र नांदतात ; अनंत ही त्यांची व्याप्ती आणि आनंद ही त्यांची प्रतिष्ठा. इंद्रप्रदेश, (म्हणजे) तीन स्वर्गीय प्रकाशमय जगतांचा स्वर्लोक, तेथील आपल्या मानसिकतेवर जेथून दैवी प्रकाश झिरपतो अशा सत्याच्या विशाल प्रदेशाचा त्याला आधार आहे. आणि जेथे आपण राहतो त्या त्रिप्रणालीचे जग त्याखाली आहे.

पुराणातील तेच वैश्विक स्तर आपणाकडेपण आहेत परंतु त्याची गटवारी भिन्न आहे. तत्त्वतः सात लोक, व्यावहारिकतः पाच लोक आणि गटवारीने तीन लोक. ते असे :–

| | | |
|---|---|---|
| १. | परमोच्च सत्-चित्-आनंद | तीन दैवी जगत |
| २. | जोड जग-पर मन | स्वर्लोकातील व्यक्त सत्य, समुचित, विशाल, त्यांच्या तीन प्रकाशमय स्वर्गासह |
| ३. | अधस्तात् लोकमयी– शुद्धमन, जीवनशक्ती, जडपदार्थ | मनःप्रदेश (अंतरीक्ष) पृथिवी (तीन पृथिवी) |

ह्यापैकी प्रत्येक तत्त्वात त्यामध्ये असलेल्या गौण व्यक्तींमुळे फेरबदल करावे लागतील कारण प्रत्येक जग त्यातील विविध रचनांमुळे आणि जाणिवेच्या निर्मितिक्षम प्रकाशाच्या स्वयशासनामुळे विभाजता येणे शक्य आहे. आता शत्रूंच्या म्हणजे विभाजनाच्या आणि अमंगलाच्या धनी असलेल्यांच्या ताब्यात असलेल्या त्या शंभर नगरापर्यंत पसरलेल्या राष्ट्राच्या सूक्ष्म दृष्टीच्या आणि सुपीक कल्पनाशक्तीच्या सर्व गुंतागुंतीना आपण ह्या चौकटीतच बसवले पाहिजे. परंतु देव त्यांचा (नगरांचा) भंग करतील आणि त्यांच्या, कार्यभक्तांच्या स्वतंत्र ताब्यामध्ये ती नगरे देतील.

पण ही जगते आहेत तरी कुठे आणि त्यांची उत्पत्ती कुठून झाली ? आपणाला ह्या ठिकाणी वैदिक ऋषींच्या अतिउत्तुंग कल्पना आढळून येतात. मानव ह्या भूमीमातेच्या वक्षस्थळावर राहतो आणि त्याला ह्या मर्त्य जगाचीच मात्र जाणीव आहे. परंतु अतिचैतन्याच्या उंचीपलीकडे दैवी जगते तेजोमय बुडते खाली वसलेली आहेत. त्याच्या जागृत संस्काराच्या पातळीखाली उपचेतन किंवा अचेतन आहे आणि त्या सगर्भ रात्रीतून तो जी जगते पाहतो ती जन्माला येतात. वर तेजस्वी आणि खाली अंधूक सागरामध्ये ही अन्य जगते आहेत ? ती येथेच आहेत. मानव त्याच्या जीवनविश्वामधून त्याचे मुख्य अस्तित्व जागृत करतो आणि मनोविश्वामधून मानसविश्व खेचून घेतो. तो सतत गुप्तपणे त्यांच्याशी संपर्क साधून असतो. तो जाणीवपूर्वक त्यांच्यात प्रवेश करू शकतो आणि इच्छा असली तर तो त्यांच्यात जन्मपण घेऊ शकतो. तो सत्याच्या सौर जगतापर्यंत उंच जाऊ शकतो अति चैतन्याच्या महाद्वारात प्रवेश करू शकतो आणि परमतत्त्वाचा उंबरठा पण ओलांडू शकतो. त्याच्या वर्धमान आत्म्याला दैवी द्वारे विशाल उघडली जातील.

मानव त्याच्या बहिर्दृष्टिने जे बाह्य पाहतो ते प्रत्येकाच्या स्वतःच्या अंतर्यामी तो धारण करतो. त्यामुळे मानवाला हे आरोहण शक्य आहे. बाह्य वैश्विक प्रणालीत असलेल्या सर्व श्रेणींशी आणि स्तरांशी समांतर असणाऱ्या अशा व्यक्तीनिष्ठ शक्ती आपणात गुप्त आहेत आणि त्याच आपल्या जीवनात शक्य असलेल्या अनेक पातळ्या होत. मानवाला संपूर्णतः शक्य असलेल्या अनुभूतिपेक्षा, हे जड जीवन आणि भौतिक जगताची संकुचित मर्यादित जाणीव कितीतरी दूर आहे. मग तो सहस्त्रपट भूमीपुत्र असला तरी. जरी माता भूमीने त्याला

जन्म दिला असला आणि आपल्या कुशीत त्याला आसरा दिला असला तरी स्वर्गपण त्याच्या माता-पितरांपैकी एक आहे आणि त्याचा मानवाच्या अस्तित्वावर अधिकार आहे. अंतर्यामी असलेल्या सघन खोलीशी आणि उच्चतर उत्तुंगतेशी जागृत होऊन नाते जोडणे त्याला शक्य आहे आणि अशी जागृती ही त्याची अपेक्षित प्रगती आहे. तो जसजसा स्वतःच्या वरच्या स्तरावर आणि अधिक उंच स्तरावर जाईल तसतशी नवीन जगते त्याच्या जीवनात आणि त्याच्या दृष्टिला दृग्गोचर होतात आणि त्याच्या अनुभूतिचे विषय बनतात आणि त्याच्या चैतन्याचे धाम बनतात. तो त्यांच्या शक्तींशी आणि देवस्वरुपाशी संपर्कात आणि सहयोगात राहतो आणि स्वतःला त्यांच्या प्रतिमानुरूप पुर्नघटित करीत असतो. प्रत्येक आरोहण हा आत्म्याचा एक नवा जन्म असतो आणि वेद अशा नवीन जगतांना " जन्म " म्हणून संबोधितो आणि त्याना आसन व निवास म्हणून गौरवितो.

ज्याप्रमाणे देवानी वैश्विक जगतांची मालिका निर्माण केली आहे त्याचप्रमाणे त्यानी मानवाच्या मर्त्य अवस्थेमधून सर्वश्रेष्ठ अशा अमरत्वापर्यंत चढण्यासाठी त्याच्या विवेक शक्तीमध्ये क्रमवार अवस्थांची मालिका आणि तीही चढत्या श्रेणीने इच्छांचे कष्ट घेतले आहेत. ज्यामध्ये केवळ नीचतम मानवता संतुष्ट राहते अशा अस्तित्वाच्या जड आणि मर्यादित अवस्थेतून देव त्याचे उन्नयन करतात आणि विभाजन प्रभूच्या मर्यादेत राहून त्याला समृद्ध विपुल जीवनाचा अनुभव देतात. त्यामध्ये अनेक आणि शीघ्र धक्के आणि आवेग असतात. ते जीवनाच्या आणि इच्छांच्या चैतन्यमय जगातून येत असतात. त्या ठिकाणी देव दानवांशी युद्ध करीत असतात, तेथे देव उत्सन्न धावपळीतून, अनेक तीव्रतेतून उच्च मानसिक जीवनाच्या शाश्वत शुद्धतेमध्ये आणि स्पष्टतेमध्ये त्याला नेत असतात. कारण विशुद्ध विचार आणि भावना हे मानवाचे गगन आहे, त्याचा स्वर्ग आहे, इच्छा ही ज्याचा केंद्रबिंदू आहे अशा प्रेम, वासना आणि भावना ह्यानी युक्त असलेले संपूर्ण चैतन्यमय जीव हे त्याचे अंतराळ आहे आणि हे शरीर व भौतिक आयुष्य हा त्याचा इहलोक आहे.

परंतु विशुध्द विचार आणि विशुध्द मानसिक अवस्था ह्या मानवी आरोहणाच्या उच्चतम उच्चावस्था नाहीत. मनाच्या पलिकडील सौर वैभवामध्ये असणारे परमसत्य हे देवांचे निवासस्थान आहे. तेथे आरुढ होणारा मानव विचारवंत म्हणून प्रयत्न करीत नाही तर तो विजयी द्रष्टा असतो. तो ह्यापुढे मनाचा बांधलेला प्राणी नसतो, परंतु एक दैवी व्यक्ती असतो. त्याची इच्छा, जीवन, विचार, भावना, जाणीव आणि क्रिया ह्या सर्वांचे सर्वसमावेशक सत्याच्या मूल्यांमध्ये परिवर्तन झालेले असते आणि सत्यासत्यतेच्या मिसळीतील संभ्रमित आणि असहाय गुंतागुंतीमध्ये ते कधीही अडकून पडत नाही. तो आपल्या अरुंद आणि असंतुष्ट मर्यादांमध्ये ह्यापुढे पांगळ्याप्रमाणे फिरत नाही तर अनिर्बंधित आवारामध्ये उड्डाण घेत असतो. ह्या व्यक्ततेमध्ये कष्ट आणि आडवळणे कधीही येत नाहीत ; तर शिघ्र आणि विजेत्या सरळमार्गाचा तो अवलंब करतो, मोडक्या तुकड्यांवर तो आपली भूक भागवीत नाही तर

अनंताच्या पयोधरातून त्याला पोषण मिळते. त्यासाठी त्याला धरा आणि स्वर्ग ह्यांच्या अवकाशातून भेद करून पलिकडे जाऊन सौर विश्वाचा भक्कम ताबा जिंकून आपल्या परमोच्च उंचीवर प्रवेश करून अमृतत्वाच्या विविध तत्त्वावर कसे रहावयाचे ह्याचे अध्ययन करावे लागेल.

ज्या मर्त्यत्वावर आपण जगतो आणि अमृतत्वावर जाण्याची आपली आकांक्षा आहे त्यामधील विरोध हीच वैदिक विचार आणि आचार ह्याची गुरुकिल्ली आहे. मानवाच्या अमृतत्वाचे वेद हे आदितम वेदवाक्य आहे आणि प्राचीन काव्यात त्याच्या द्रष्ट्या शोधकाचे मूलतंम मार्गदर्शन दडलेले आहे.

जीवनातील सार, विवेकाचा प्रकाश, चैतन्ययुक्त बल आणि धारण करणारा आनंद ही जीवनाची घटक तत्वे आहेत. परंतु त्यांचा आपणामधील समन्वय कदाचित् मर्यादित, विभाजित, दुखावलेला, भग्न किंवा अस्पष्ट असावा किंवा अमर्याद, प्रबुद्ध, विशाल, संपूर्ण आणि इजा न झालेला असावा. मर्यादित आणि विभाजित अस्तित्त्व म्हणजे अल्प ; ते अंधारमय आणि दुबळे आहे, ते म्हणजे शोक आणि दुःख आहे. जे भूमा (विशाल, सर्वव्यापी) जे एकभूत तत्त्व अनंत त्यात आपण आपल्या जिवनाचे अपेक्षित वैभव म्हणजे तत्त्व, प्रकाश, बल आणि आनंद शोधला पाहिजे. मर्यादा म्हणजे मृत्यू, अमृतत्त्व आपणाकडे अनंतातील परिपूर्ण आत्मस्व म्हणून येते व त्याचबरोबर दृढ विशालतेमध्ये राहण्याचे आणि फिरण्याचे सामर्थ्यपण येते. त्यामुळे आपल्या अस्तित्त्वाचे सार तो ज्या प्रमाणात विशाल करील त्या प्रमाणात आणि तो सतत वाढवील त्या अटीवर ते अवलंबून असते. आपल्या इच्छेची उसळणारी ज्योत तो जितकी तेजस्वी करील आणि ज्ञानाचा प्रकाश जितका विशाल होईल, आपल्या विवेकाची मर्यादा जितकी विस्तृत होईल, किती अंशानी वाढवील, आपल्या शक्तीची, ताकदीची आणि बलाची परिसीमा जितकी वाढेल तितकी आनंदाच्या सघन मुक्तीची दृढता होते आणि जेथे मनुष्य अमृतत्वाला पात्र होतो अशा अपार शांतीमध्ये तो आपल्याला मोकळा सोडतो.

विस्तृत करणे म्हणजे नवा जन्म प्राप्त होणे होय. उचंबळणारा भौतिक जीव गाळीव चैतन्यशील मानव बनतो. तेथे तो पुन्हा स्वतःला मानसिक आणि सूक्ष्म आध्यात्मिक व्यक्तीमध्ये परिवर्तन करून घेतो. हा सूक्ष्म विचारवंत विशाल, नैकविध आणि वैश्विक मनुष्य म्हणून वृध्दिंगत होतो. तेथून त्याला सत्याच्या स्वतः भोवतालच्या सर्व बाजू आणि सत्याचे आत शिरणारे नैकविध प्रवाह मोकळे होतात. वैश्विक आत्मा अधिक उंच ध्येय प्राप्तीसाठी चैतन्यमय माणूस म्हणून उच्चतर शांती, आनंद आणि सुसंवाद ह्यासाठी प्रयत्नशील राहतो. हे आर्य पद्धतीचे पाच प्रकार आहेत. ह्यापैकी प्रत्येक ठिकाणी संपूर्ण मनुष्य स्वभावाच्या अवस्था, क्षेत्र व्यापणाऱ्या महान व्यक्ती आहेत. तरीही ह्या सर्व अवस्थांना जिंकून त्यापलिकडे जाऊन ह्या सर्वांचा चिरंतन सुसंवाद अनुभवणारा एक परमोच्च आर्य आहेच.

ह्या आंतरिक आकांक्षेतराला कारणीभूत असणारे एक अतिमानसिक सत्य आहे. ते मानसिक अवस्था तेजस्वी दृष्टीने आणि देवांच्या डोळ्याने पुनःस्थापित करते, तर मर्त्यजीवन अनंत अस्तित्वाच्या श्वासाने आणि सामर्थ्याने आणि अस्पष्ट व मृत्यूग्रही वस्तूंना स्वतंत्र आणि अमर्त्य चेतनाशक्तीने परावर्तित करते. म्हणून माणसाने प्रथमतः आपली प्रगती अशा रीतीने केली पाहिजे की ज्यायोगे तो स्वतःची स्वच्छ मानसिक आणि आध्यात्मिक शुध्दता तसेच अनुभवांची आणि कृतींची कंपने सहन करण्यास समर्थ होईल अशी सुदृढ चैतन्यशक्ती स्वतःत विकसित केली पाहिजे व दुसरे म्हणजे मानवी प्रकाश आणि सामर्थ्य अतिरिक्त वाढून त्याचे परिवर्तन अनंत सत्य आणि अमर्त्य इच्छाशक्तीमध्ये झाले पाहिजे.

आपले सर्वसामान्य जीवन आणि विवेक म्हणजे अंधारच, फार झाले तर तारका प्रकाशयुक्त रात्र असते. त्या उच्चतर सत्याच्या सूर्योदयाने प्रभात होते आणि उषःकालाबरोबरच प्रभावशाली यश अवतीर्ण होतो. त्या यशाच्या योगाने पूर्णाच्या अंधकारमय गुहातून, मुक्त केलेल्या तेजस्वी गोधनातून आणि परतणाऱ्या रात्रीतून उषःकालाला आणि हरवलेल्या सूर्याला जिंकले जाते. यशामुळे स्वर्गीय वैपुल्याचा पाऊस आपणावर वर्षतो आणि उच्चतर अस्तित्त्वाच्या सप्तजलधारा वेगाने आपल्या पृथ्वीवर अवतरतात कारण सर्वावरणकारी आणि सर्वप्रतिबंधक अशा त्या कृत्याच्या त्या अस्पष्ट अजगराच्या कुंडल्या देवमनाच्या तळपणाऱ्या चपलानी उध्वस्त करून टाकल्या आहेत. यज्ञात सोमसुरा गाळली आहे आणि ती स्वतःच्या अमरत्वदानी आनंदाच्या प्रवाहावरून आपणाला परमोच्च स्वर्गाकडे उचलून नेणार आहे.

आपला यज्ञ म्हणजे आपल्या एकूण लाभाची आणि कर्तृत्वाची त्या परमशक्तीच्या सामर्थ्याला दिलेली आहुती आहे. हे संपूर्ण जग म्हणजे एक मूक आणि असहाय यज्ञ असून त्या अदृश्य देवाना स्वसमर्पित बळी म्हणून आपला आत्मा तेथे बांधून ठेवला आहे. मुक्तीदायी शब्द शोधलाच पाहिजे. प्रकाशदायी सूक्त मानवाच्या ह्दयात आणि मनात रचले गेले पाहिजे आणि मानवाचे आयुष्य हे बुध्दिपुरस्सर आणि स्वसमर्पित आहुती बनले पाहिजे, मात्र त्यात आत्मा हा कधीच बळी नसणार, परंतु तो यज्ञाधिपती असेल. समुचित यज्ञाद्वारे आणि देवाना अर्पिलेल्या उदात्त सूक्ताच्या अभीरातून उत्पन्न झालेल्या सर्व-समुत्पादक आणि सर्वाभिवाचक शब्दाद्वारे मनुष्य सर्व काही मिळवू शकतो. तो स्वतःचे परिपूर्णत्व प्राप्त करून घेऊ शकतो. निसर्ग त्याच्याकडे स्वेच्छायुक्त आणि अभिलाषापूर्ण वधू म्हणून येईल आणि तो तिचा द्रष्टा बनून तिचा राजा म्हणून तिच्यावर शासन करील.

प्रार्थनायुक्त आणि देवांना आकर्षण करणाऱ्या सूक्तांच्याद्वारे, स्तुतींच्या देव-दृढतेच्या सूक्ताने, देवप्राप्तीच्या आणि स्व-अभिव्यक्तीच्या सूक्ताने मनुष्य स्वतःमध्ये देवाना निवास देतो, त्याच्या अस्तित्वाच्या क्षारयुक्त घरामध्ये त्याच्या देवतांच्या चैतन्यमय मूर्ती रचू शकतो. दैवी जन्मामध्ये वाढू शकतो आणि स्वतःच्या आत्म्याला निवास करता येईल असे विशाल आणि तेजोमय जग तो आपल्या स्वतःमध्ये निर्माण करू शकतो. सत्याच्या शब्दामुळे सर्वोत्पादक सूर्य निर्मिती करतो त्याच्या तालाने ब्रह्मणस्पती सरातीतले जागृत करतो आणि त्वष्टा त्याना

आकार देतो. सर्वसामर्थ्यकारी शब्द आपल्या प्रेरणादायी अंतःकरणात असल्याचे आढळल्याने हा मानवी विचारवंत, एक मर्त्य प्राणी, आपल्या इच्छेनुरूप सर्व आकार, सर्व अवस्था आणि परिस्थिती निर्माण करू शकतो आणि त्या प्राप्त करून शिवाय स्वतःसाठी अस्तित्व, प्रकाश, सामर्थ्य आणि उपभोगाचे ऐश्वर्य जिंकू शकतो. त्याचे सुसंघटीत अस्तित्व तो रचतो आणि आपल्या देवाना दुष्ट सैन्यांचा नाश करण्यास साह्य करतो. ज्यानी त्याची प्रकृती विभागली, भंगली आणि दुखावली त्या त्याच्या आध्यात्मिक शत्रूंचा नाश झाला आहे.

त्याच्या यज्ञाची प्रतिमा कधीकधी एकाद्या प्रवासाची किंवा जलयात्रेची असते. कारण तो प्रवास करतो, आरोहण करतो, त्याला एक ध्येय आहे ते म्हणजे भूमा (विशालता), सत्यजीवन, प्रकाश आणि आनंद-आणि त्याच्यावर ध्येयाकडे जाणारा सरल आणि प्रसन्न मार्ग शोधून काढून तो सुखद ठेवण्याचे उत्तरदायित्व सोपवले आहे--कष्टप्रद असला तरी सत्याकडे जाणारा प्रसन्न मार्ग. दैवी इच्छाशक्तीच्या उज्ज्वल शक्तीने मार्गदर्शन केलेल्या त्याला चढावे लागते एकाद्या पर्वतावरील पठारावरून दुसऱ्या पठाराकडे. एकाद्या नावेतून त्याला जीवनाच्या जलामधून पार व्हावे लागते, नद्या ओलांडाव्या लागतात, त्यांचे सखोल डोह आणि वेगवान प्रवाह पार करावे लागतात. दूरवरच्या प्रकाश-सागराच्या आणि अनंताच्या पैलतीरावर पोहोचणे हे त्याचे ध्येय असते.

आणि ही काही सुलभ किंवा शांततामय यात्रा नव्हे. अनेक ऋतूपर्यंत चालणारे हे भयानक आणि अविरल युद्ध आहे. सतत आर्य मानवाला कष्ट करावे लागतात, युद्ध करावे आणि जिंकावे लागते. तो अथक परिश्रमी आणि प्रवासी आणि करारी योद्धा असावा लागतो. त्याने धडक देऊन शहरामागून शहर उधडले पाहिजे त्यावर हल्ला केला पाहिजे आणि ते ताब्यात घेतले पाहिजे. राज्यामागून राज्य जिंकले पाहिजे, आणि शत्रूमागून शत्रू उलथवून त्याला क्रूरपणे पायदळी चिरडले पाहिजे. त्याची सर्व प्रगती म्हणजे देव आणि दानव, देव आणि राक्षस, इन्द्र आणि अजगर, आर्य आणि दस्यू ह्यामधील युद्ध होय. त्याला मोकळ्या मैदानावर आर्यांच्या प्रतिपक्ष्याशी समोरासमोर तोंड द्यावे लागेल ; कारण जुने मित्र आणि सहकारी शत्रू बनतात आर्य राज्यांच्या अधिपतीना पण त्याला जिंकावे लागेल. ते उलट फिरून दस्यूना सामील होतील आणि त्याच्या स्वतंत्र आणि सर्वस्वी प्रगतीला आळा घालण्यासाठी त्यांच्याशी कट करतील.

परंतु दस्यू हे निसर्गवैरी आहेत. हे विभाजक, लुटारू, पीडादायक शक्ती, हे दानव, विभागिनी मातेचे पुत्र, त्यांचा ऋषीने अनेक नावाने उल्लेख केला आहे. हे राक्षस आहेत; ते भक्षक आणि गिळंकारी आहेत. ते लांडगे आणि विदारक आहेत. ते पीडाकारक आणि द्वेष्टे आहेत ते द्वन्दवादी आणि ते परिरोधक आणि निंदक आहेत. पण आपणाला अनेक विशिष्ट नावेपण ज्ञात आहेत. वृत्र, अहि हा प्रधान प्रतिपक्षी आहे कारण तो आपल्या अंधाऱ्या कुंडल्यानी सर्व दैवी अस्तित्वाला आणि दैवी क्रियाना प्रतिरोध करतो, आणि जेव्हा वृत्राला प्रकाशाद्वारे ठार मारले जाते तेव्हा त्याच्यामधून अधिक विक्राळ शत्रू उत्पन्न

होतात. नमुची माणसाचा दुबळेपणा पाहून युद्ध करतो आणि अन्यपण आपापल्या विशिष्ट दुष्टपणाने हल्ला करतात. आणि तेथेच वल आणि पणीपण आहेत. ऐन्द्रिय जीवनात कंजूष, व्यवहारी, चोर आणि दडपणारे; ते उच्चप्रकाश आणि त्याचे तेज लपवतात पण त्याचा ते अंधार आणि दुरुपयोग करतात. आपल्या भांडाराचे मारेकरी असणारे ते अधार्मिक टोळीवाले देवाप्रीत्यर्थ यज्ञ आचरीत नाहीत. आपल्या अज्ञान, दृष्कृत्य, दुबळेपणा, आणि अन्य अनेक मर्यादांचे हे आणि अन्य व्यक्ती–त्या मानवीकरणापेक्षाही अधिक आहेत–मानवाशी सतत युद्ध करीत असतात. ते जवळ येऊन त्याला घेराव घालतात, किंवा ते दुरून त्याच्यावर शर वेध करतात किंवा त्याच्या द्वारमय सदनात प्रवेश करून देवांच्या जागांवर निवास करतात आणि त्यांच्या आकारहीन तोतऱ्या तोंडातून आणि त्याच्या अपूर्ण श्वासातून त्याच्या अभिव्यक्तीला अडथळा आणतात. प्रबळ आणि साह्यकारी देवतांच्या मदतीने त्याना हाकलले पाहिजे, त्यांच्यावर अतिक्रमण केले पाहिजे, त्याना ठार केले पाहिजे आणि अधोलोकातील अंधारात ढकलून दिले पाहिजे.

वैदिक देवता ह्या वैश्विक देवमूर्तींची नावे, सामर्थ्य आणि व्यक्तीमत्वे आहेत आणि त्या दैवी अस्तित्वाच्या काही आवश्यक शकींचे प्रतिनिधित्व करतात. त्या विश्वाची अभिव्यक्ती करतात आणि त्यात अभिव्यक्त होतात. प्रकाशाची ही बालके, अनंतत्वाचे सुपुत्र ते मानवी आत्म्याला भाऊ आणि मित्र मानतात आणि ते त्याला साह्य करून त्याची वृद्धी करण्याची आपण होऊन इच्छा बाळगतात. ते त्यांच्या जगतात त्यांचा प्रकाश, शक्ती आणि सौंदर्य ह्याची भर घालून त्याला वाढवतात. देव मानवाला दैवी सख्यत्वासाठी आणि सहवासासाठी आमंत्रण करतात. त्याला ते आकर्षित करतात आणि त्यांच्या तेजस्वी बंधुतेकडे त्याला उचलून नेतात. त्याला ते साह्य देतात आणि त्याच्याकडून साह्य घेतात ते केवळ अंधःकाराच्या आणि विभाजनाच्या पुत्रांना रोखण्यासाठीच. परतफेड म्हणून माणूस देवाला आपल्या यज्ञात आवाहन करतो, त्याचे चातुर्य आणि ताकद त्याना देतो आपला प्रसाद आणि माधुरी त्याना अर्पण करतो. तळपत्या गाईचे दूध आणि नवनीत, आनंदवल्लीचा पाविनरस, यज्ञीय अश्व, अपूप आणि सुरा देवमनाच्या तेजस्वी पक्वान्नातील अन्न-धान्ये वगैरे, तो त्यांचे स्वतःमध्येच स्वागत करतो आणि त्यांच्या प्रसादाना जीवनात स्थान देतो. स्तुतीसूक्तांच्या आणि सुरेच्या परिपूर्ण माध्यमातून तो त्यांची अभिवृद्धी करतो. वेद म्हणतो, लोहार ज्याप्रमाणे लोखंडाला आकार देतो त्याप्रमाणे त्यांच्या महान आणि तेजस्वी देवमूर्तींना वाढवतो.

ही वैदिक प्रतिमासृष्टी एकदा त्याची किल्ली मिळाली की समजायला अगदी सोपी आहे. पण ती केवळ प्रतिमासृष्टी आहे असे चुकीने समजू नये देव म्हणजे केवळ अमूर्त कल्पनांचे किंवा निसर्गाच्या भौतिक आणि मानसिक कार्याचे काव्यमय मानवीकरण नव्हे. वैदिक द्रष्ट्याना ती जिवंत तथ्ये दिसतात, केवळ तत्त्व आणि प्रवृत्ती ह्यामधीलच नव्हे, वैश्विक शक्ती ज्या त्याना आधार देतात आणि सामावून घेतात त्यांच्यातील वैश्विक संघर्षाचे प्रतीक म्हणजे मानवी आत्म्याची स्थित्यंतरे होत. हेच देव आणि दानव होत. जगन्मंचावर आणि वैयक्तिक आत्म्यामध्ये त्याच पात्रांसह तेच नाट्य सतत प्रयोगात उतरत असते.

कोणत्या देवांप्रित्यर्थ आपण यज्ञ समर्पण करावा ? मानवी अस्तित्वात ही अभिवृद्ध होणारी देवमूर्ती व्यक्त व्हावी आणि सुरक्षित राहावी म्हणून कोणाला आवाहन करावे ?

प्रथमतः अग्नी, कारण त्याच्याशिवाय आत्म्याच्या यज्ञवेदीवर यज्ञीय ज्वाला प्रज्वलीत होणार नाही. अग्नीची ही ज्वाला म्हणजे ज्ञानासह दैवी शक्तीच्या प्रवृत्तीचे इच्छाशक्तीचे सप्तजिव्हात्मक सामर्थ्य आहे. ही जाणीवयुक्त प्रभावशाली इच्छाशक्ती म्हणजे आपल्या मर्त्य जीवनातील अमर्त्य अतिथी आहे. तो शुद्ध पुरोहित आणि दैवी सेवक आहे, तो धरा आणि स्वर्ग ह्यामधील दूत आहे. आपण जे हवन करतो ते तो उच्च शक्तींकडे घेऊन जातो आणि त्यांचे सामर्थ्य, आणि प्रकाश आणि आनंद आपल्या मानवतेमध्ये परत घेऊन येतो.

पुढची महाशक्तीशाली देवता म्हणजे इन्द्र. दैवी मन म्हणून स्वयं प्रकाशित झालेला तो शुद्ध अस्तित्वाचे सामर्थ्य आहे. अग्नी ज्ञानासह शक्तीप्रवृत्तीचे एक टोक जे खालून पृथ्वीवरून स्वर्गाकडे प्रवाह वाहवते तर इन्द्र हे ज्ञानासह तेजप्रवृत्तीचे दुसरे टोक जे स्वर्गातून पृथ्वीवर अवतरते. तो आपल्या तळपत्या घोड्यांसह नायक म्हणून आपल्या पृथ्वीवर येतो, आपल्या तळपत्या विजानी अंधार आणि विभाजन ह्यांचा नाश करतो, जीवनदायी स्वर्गीय जलधारांचा बर्षाव करतो, पुत्र आणि प्रेरणा लुप्त वा गुप्त प्रकाश ह्यांचा माग काढतो, आणि आपल्या मनोस्वर्गावर सत्यसूर्याला उंच चढवतो. सूर्य हा परमोच्च सत्याचा स्वामी आहे–जीवनाचे सत्य, ज्ञानाचे सत्य, पद्धती, कर्म, हालचाल आणि कार्यप्रणाली ह्यांचे सत्य. म्हणून तो सर्व वस्तूंचा निर्माता, खरे तर अभिव्यक्ता आहे. कारण निर्मिती म्हणजे सत्य आणि इच्छा ह्यांच्या माध्यमातून बाहेर काढणे, व्यक्त करणे. आणि तो आपल्या आत्म्यांचा पिता, रक्षणकर्ता आणि प्रबोधयिता आहे. आपणाला जो प्रकाश हवा असतो तो ह्या सूर्याचे सैन्य आहे. तो दैवी उषेच्या मार्गाने आपणाकडे येतो आणि अत्युच्च मुक्तीपर्यंत आपल्यात दडून राहिलेल्या जगापाठोपाठ जग ह्या रीतीने सर्व मोकळे आणि स्पष्ट करतो.

त्या मुक्तीचा सोम हा प्रतिनिधीदेव आहे. त्याच्या परमानंदाची सुरा ही उभ्दिजांमध्ये, जीवनाच्या जलामध्ये लपलेली आहे, आपल्या जड देहात त्याचे अमृतत्वदायी रस आहेत ते गाळून देवाना अर्पिले पाहिजेत म्हणजे त्यांची वृध्दी होईल आणि विजय प्राप्त करतील.

ह्या प्रत्येक प्राथमिक देवतेबरोबर त्याचे सहकारी असून ते त्याची कार्ये पार पाडतात. आपल्या मर्त्य प्रकृतीत जर सूर्याचे सत्य दृढ प्रस्थापित करावयाचे असेल तर काही अनुप्रेक्षणीय पूर्व अटी पार पाडाव्याच लागतील. सर्व पापांचा आणि सक्त खोटेपणाचा नाश करणारी विपुल शुध्दता आणि स्वच्छ विशालता हवीच आणि ते करणार वरुण. आपले विचार, कर्म आणि आवेग ह्यांत सुसंगतता यावी म्हणून तिकडे नेणारी प्रेमाची आणि जाणीवेची तेजस्वी शक्ती म्हणजे मित्र. प्रयत्न, आकांक्षा, स्वच्छविवेक ह्यांची अमर्त्य शक्ती म्हणजे अर्चना. पाप, स्खलन आणि यातना ह्यांना दूर सारून सर्व वस्तूंचा उत्स्फूर्त आनंदाने समुचित उपभोग म्हणजे भग. ह्या सूर्याच्या सत्याच्या चार शक्ती आहेत.

आपल्या प्रकृतीत सोमाचा संपूर्ण परमानंद परिपूर्णतेने सुस्थापित होण्यासाठी मन, उत्साह आणि शरीर ह्यांची सुखी, प्रबुध्द आणि अदुर्बल अवस्था आवश्यक आहे. ही अवस्था आपणास जुळे आश्वनीकुमार प्रदान करतात. तेजकन्येशी विवाहबद्ध झालेले, मधुर, संरचास्पद, व्यंग आणि रोग परिहारक असे ते उभयता अंशतः आपले ज्ञान आणि अंशतः आपले कर्म व्यापून राहतात आणि आपल्या सुखमय आणि यशस्वी आरोहणासाठी आपली मानसिक, उत्साहविषयक आणि शारीरिक भूमी तयार करतात.

मनाला आकार देणारा, दैवी मन असलेला इन्द्र मानवी शक्तीच्या ऋभूंना कर्मचाऱ्याना साह्याला घेतो. त्यानी त्यांच्या यज्ञकर्माद्वारे आणि सूर्याच्या उंच निवासस्थानावरील अद्भूत आरोहणामुळे अमरत्व प्राप्त केले आहे आणि त्यांचे उद्दिष्ट मानवानी प्राप्त करावे म्हणून त्याना साह्य करतात. ते त्यांच्या मनाने इंद्राच्या घोड्याना आकार देतात, आणि अश्विनीकुमारांचा रथ बनवतात, देवांची शस्त्रे तयार करतात आणि प्रवासाची तसेच लढाईची सामग्री निर्माण करतात. पण सत्यप्रकाशदाता आणि कृतघ्न इन्द्राला मदत करतात मरुद्गण. ते इच्छेची आणि उर्जेची किंवा जीवसामर्थ्याची शक्ती असून त्यानी विचारप्रकाश आणि स्व-अभिव्यक्तीचा ध्वनी प्राप्त केला आहे. सर्व विचार आणि वाणी ह्यांच्या पाठीमागे त्याची प्रेरणा असून परमश्रेष्ठ प्रकाश, सत्य आणि आनंद ह्यांकडे जाण्यासाठी संघर्ष करीत असतात.

नारी ऊर्जापण अस्तित्वात आहेत, कारण देव हे नर आणि नारी असून, देव हे एकतर प्रकृतीपर आत्मे किंवा निवृत्तीपर कार्यकर्ते आणि पद्धतशीर काम उरकणाऱ्या ऊर्जा असतात. अदिति, देवांची अनंत माता हिचे स्थान प्रथम. शिवाय सत्यज्ञानाच्या आणखी पाच शक्ती आहेत ; मही किंवा भारती म्हणजे अमर्याद शब्द, जो आपणाकडे दैवी उद्गमापासून सर्व वस्तू आणतो, इळा, सत्याचा आद्य प्रभावशाली शब्द, त्यामुळे आपणाला प्रवृत्तिपर दृष्टी मिळते, सरस्वती तिचा वेगवान प्रवाह आणि स्फूर्तिदायक शब्द; सरमा, प्रेरणाशक्ती, मनाच्या अबोध गुहेमध्ये उतरून तेथील गुप्त प्रकाश शोधून देणारी देवशुनी, दक्षिणा, समुचित विवेक हे तिचे कार्य, ती कर्म आणि आहुती ह्यांची व्यवस्था लावते आणि प्रज्ञात देवमुर्तीला तिचा धराभाग वाटून देते, प्रत्येक देवाची एक नारी उर्जा आहेच.

ह्या सर्व कृती, संघर्ष आणि आरोहण ह्याना स्वर्ग, आपला पिता, आणि धरा, आपली माता, देवमूर्तींची पितरे ह्याचा आधार आहे. ते अनुक्रमे शुद्ध मानसिक आणि आत्मिक तसेच शारीरिक विवेक धारण करतात. त्यांची विशाल आणि स्वतंत्र प्राप्ती हीच आपल्या ध्येयाची अवस्था आहे. जीवनस्वामी वायू अंतराळाद्वारे म्हणजे ऊर्जाशक्तीच्या क्षेत्राद्वारे जोडतो. आणि अन्य देवता पर्जन्य, स्वर्गीय पर्जन्याचा दाता, दधिक्रावा, दैवी युद्धबाजी, अशांची शक्ती ; मांडणीचा गूढ अजगर, तृप्त आप्त जो आपल्या विविध अस्तित्वाशी, अस्तित्वाच्या तिसऱ्या पातळीवर संयुक्त होतो आणि शिवाय अन्य.

ह्या सर्व देवमूर्तीची आपल्या संपूर्णतेसाठी आवश्यकता आहे. आणि ती संपूर्णता आपल्या सर्व स्तरांवर मिळवली पाहिजे ; पृथ्वीच्या विशालतेमध्ये आपल्या शारीरिक अस्तित्व आणि जाणीवेमध्ये ; आपल्या सर्व प्रयत्नाना धारण करण्यासाठी ज्याना पुढे आणले पाहिजे अशा घोड्याच्या रूपाने सूचीत केलेल्या आपल्या ऊर्जात्मक वेग आणि क्रिया आणि उपभोग ह्यांच्या संपूर्ण सामर्थ्यामध्ये, आपल्या बैद्धिक आणि मानसिक आस्तित्वामधून व्यक्त होणारी उत्कृष्ट ऊब आणि मनाची स्पष्टता ह्यांच्यावर भावनिक हृदयाच्या परिपूर्ण आनंदामध्ये; आपल्या संपूर्ण जीवनाला परिवर्तित करणाऱ्या अतिमानसिक प्रकाश, उषःकाल, सविता आणि कळपाची तेजस्वी माता ह्यांच्या आगमनामध्ये, कारण त्यामुळे आपणाला सत्याचे स्वामित्व मिळते, सत्यामुळे प्रशंसनीय आनंदाचा उद्रेक आणि आनंदाद्वारे परमोच्च तत्त्वाच्या अनंत प्रबोधनाची प्राप्ती होणार आहे.

पुराणातील त्रिमूर्तीचा आधार असणारे तीन महान् देव, महान् शक्तीशाली परमश्रेष्ठ देवमूर्ती हा विकास आणि ऊर्ध्वगती उत्क्रांती घडवून आणतात. ते ह्या विश्वाच्या गुंतागुंतीमध्ये उत्कृष्ट पद्धती आणि मूलभूत शक्तीचा आधार देतात. ब्रह्मणस्पती हा निर्माता आहे. तो आपल्या शब्दानी आपल्या आवाहनाद्वारे उत्पत्ति करतो. म्हणजे तो ते व्यक्त करतो आणि अबोध अंधःकारातून तो हे सर्व अस्तित्त्व आणि सुबोध ज्ञान आणि जीवनाची चळवळ आणि तदनुषंगीक आकार निर्माण करतो. महाशक्तिशाली, उग्र आणि दयाळू रुद्र हा जीवनसंघर्षाचा अध्यक्ष आहे आणि तो दृढ करतो. तो देवांची शस्त्रधारी, क्रोधयुक्त आणि दयाशील शक्ती असून तो सर्व सृष्टीला जबरदस्तीने वर उचलतो, विरोधकांचा धुव्वा उडवतो, चुकणाऱ्याना आणि विरोधकाना फटकारतो आणि जे जखमी झाले आहेत, दुःख भोगतात, तक्रार करतात आणि शरण येतात त्याना बरे करतो. विस्तृत व्यापकगतीचा विष्णु ह्या सर्व जगताना आपल्या तीन पावलानी धरून ठेवतो. आपल्या मर्यादित नखरतेत तो इंद्राच्या कार्यासाठी विशाल क्षेत्र निर्माण करतो. त्याच्यामुळे आणि त्याच्यासह आपण ह्याच्या अत्युच्च पदावर उन्नत होतो आणि तेथे आपणाला आपणासाठी तिष्ठत असलेले मित्र, प्रेमळ आणि परमानंददायक देवमूर्ती आढळते.

अस्तितत्त्वाच्या अबुद्ध काव्यसागरातून ह्या आपल्या पृथ्वीला आकार मिळाला आहे ती आपली उच्च रचना आणि निमुळती शिखरे स्वर्गाकडे उभारते ; मनाच्या स्वर्गाला स्वतःच्या रचना असतात. आपल्या विजा पुढे सरकावणारे आणि जीवनजल देणारे ढग असतात. स्पष्टतेचे प्रवाह आणि मध, अधोभागातील संबुद्ध सागरातून रस उसळत असतात आणि उर्ध्वभागातील प्रबुद्ध सागराला शोधतात ; आणि वरून तो सागर खाली आपल्या शारीरिक जीवनामध्ये प्रकाशाच्या, सत्याच्या आणि आनंदाच्या नद्या पाठवीत असतो. अशा रीतीने भौतिक निसर्गाच्या प्रतिमांमध्ये वैदिक ऋषी आपल्या आध्यात्मिक उन्नयनाची स्तोत्रे गातात.

मानव पूर्वजानी, प्राचीनानी हे उन्नयन केव्हाच साधले आहे. आणि ह्या महान पूर्वजांचे आत्मे अद्यापहि त्यांच्या वंशजाना मदत करतात. कारण नवी उषा पूर्वीचे पुनरावर्तन करते

आणि भविष्यकालीन उषेसाठी प्रकाशानी पुढे झुकते. मानव अनुभूतीनी ज्यांचे सदोदित पुनःस्मरण करावे अशा आध्यात्मिक विषयाचे कण्व, कुत्स, अत्रि, कक्षिवान्, गौतम, शुनःशेप हे काही नमुने आहेत. सप्तर्षी, अगिरस हे अद्यापहि तिष्ठत आहेत आणि तेच शाब्दिक साम गाण्यासाठी, गुहा फोडण्यासाठी, नष्ट गोधन शोधण्यासाठी, आणि लुप्त झालेला सूर्य पुन्हा मिळवण्यासाठी अद्यापही सिद्ध आहेत. अशा रीतीने आत्मा हे सहायक आणि पीडक, मित्र आणि शत्रू ह्यांचे युद्धक्षेत्र आहे. हे सर्व जिवंत आहे. विपुल आहे, वैयक्तिक आहे, जाणीवपूर्ण आहे आणि कार्यशील आहे. यज्ञाच्या आणि स्तोत्रांच्याद्वारे आपण तेजस्वी द्रष्टे आपणासाठी लढणारे योद्धे आणि आपल्या कार्याची अपत्ये निर्माण करीत आहोत. देव आणि ऋषी आपल्यासाठी आपले तेजाळ कळप शोधीत आहेत, आणि प्रभू त्याच्या मनाने देवांचे रथ घोडे आणि आयुधे तयार करून आपले जीवन हा एक खिंचाळणारा आणि उड्या घेणारा घोडा असून तो आपणाला पुढे पुढे आणि उंचावर नेत आहे. शीघ्र खुरांचे वास हे त्याचे सामर्थ्य आहे. मनाच्या मुक्त शक्ती ह्या विशाल पंखांचे पक्षी आहेत. हे मानसिक अस्तित्व किंवा आत्मा हा हंस किंवा गरुड असून तो शतशत लोहमीतीना फोडून बाहेर येतो आणि त्या आनंदमय सोमसुरेच्या मत्सरी रक्षकांशी मल्लयुद्ध करतो. अंतःकरणाच्या सखोल गुप्त दरीतून उठणारा प्रत्येक देवात्म विचार हा पुरोहित आणि निर्माता असून तो तेजस्वी सिद्धीची आणि सामर्थ्यशाली परिपूर्णतेची दैवी स्तुतिस्तोत्रे गात असतो. सत्याच्या चकाकत्या सुवर्णाच्या शोधात आपण असतो, आपण स्वर्गीय भांडाराची वासना बाळगतो.

माणसाचा आत्मा हा अनेक अस्तित्त्वपूर्ण जग आहे ; परमोच्च विजय प्राप्तीसाठी किंवा नाशासाठी लढणाऱ्या सैनिकांचे राज्य आहे, जेथे देव आपले अतिथी आहेत असे आपले घर असून तेथे ताबा घेण्याचा दैत्य प्रयास करतात ; त्यातील ऊर्जाची पूर्णता आणि अस्तित्त्वाची विशालता, स्वर्गीय सत्रासाठी यज्ञवेदीचे आसन रचून ते शुद्ध करीत असतात.

वेदातील काही महत्त्वाच्या प्रतिमा ह्या अशा आहेत आणि पूर्वजांच्या शिकवणुकी अत्यंत त्रोटक आणि अपुरा असा हा आराखडा आहे अशी समजूत पटली म्हणजे ऋग्वेद संदिग्ध, गोंधळलेल्या आणि रानटी स्तवनांचा भरताड अशी कल्पना होण्याचे संपेल, मानवतेच्या उच्च उन्नयनाची ती गाथा ठरते आणि त्यातील स्तोत्रे म्हणजे आत्म्याच्या चिरंतन उन्नयनाच्या स्तोत्रमय महाकाव्यातील घटना ठरतात.

हे किमान कथन आहे, ह्यापेक्षाही अधिक, वेदांमध्ये प्राचीन विज्ञान, लुप्त ज्ञान आणि प्राचीन मनो-कायिक परंपरा काय आहे हे अद्यापही शोधून काढावयाचे आहे.

• • •

## ३७ १५ ऑगस्ट १९४७.

**१९४७ च्या पंधरा ऑगस्ट ह्या दिवशी भारत ब्रिटिश अंमलातून मुक्त झाला. बाबू अरविंदांचा जन्मही १५ ऑगस्टचाच. ते म्हणतात '' हा एक निव्वळ योगायोग आहे असे मी समजत नाही. माझा हात धरून ध्येयपथावर मला पुढे नेणाऱ्या दैवी शक्तीनेच माझ्या कार्याला आपली मंजुरी देऊन तीवर शिक्कामोर्तब केले आहे, असे मी समजतो. माझ्या जीवनकाळात जी जागतिक आन्दोलने पूर्ण होतील असे मला वाटत होते, परंतु एखाद्या स्वप्नाप्रमाणे ज्यांची अवस्था होती, तीच आन्दोलने आता सफल होण्याच्या, यशस्वी होण्याच्या बेतात आहेत, असे मला दिसून येत आहे. ''**

स्वतंत्र भारताचा १५ ऑगस्ट हा जन्मदिवस. एका जुन्या युगाचा ह्या दिवशी अंत होत आहे आणि नव्या युगाची सुरुवात होत आहे. हा दिवस आपल्याच दृष्टीने वैशिष्ट्यपूर्ण आहे असे नाही; तर तो आशिया खंडाकरिता आणि जगासाठीही वैशिष्ट्यपूर्ण आहे. कारण, राष्ट्रकुलामध्ये आज एका नव्या आणि प्रचंड असे सुप्त सामर्थ्य असलेल्या, तसेच मानवतेचे राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक आणि आध्यात्मिक भवितव्य घडविण्याची शक्ती असलेल्या राष्ट्राचा प्रवेश होत आहे. जो दिवस आतापर्यंत केवळ माझा जन्मदिवस असल्यामुळे, आणि माझा आणि माझ्या जीवनविषयक विचारप्रणालीचा ज्यांनी स्वीकार केला आहे ते तो दरवर्षी साजरा करीत असल्यामुळे, माझ्या लक्षात राहत असे, त्या दिवसाला आजपासून फार मोठा अर्थ आला आहे. हा एक निव्वळ योगायोग आहे, असे मी समजत नाही. माझा हात धरून ध्येयपथावर मला पुढे नेणाऱ्या दैवी शक्तीनेच माझ्या कार्याला आपली मंजुरी देऊन तीवर शिक्कामोर्तब केले आहे, असे मी समजतो. माझ्या जीवनकाळात जी जागतिक आन्दोलने पूर्ण होतील असे मला वाटत होते, परंतु एखाद्या स्वप्नाप्रमाणे ज्यांची अवस्था होती; तीच आन्दोलने आता सफल होण्याच्या, यशस्वी होण्याच्या बेतात आहेत असे मला दिसून येत आहे.

या महान आणि चिरस्मरणीय प्रसंगी मी काही संदेश द्यावा, असे मला सांगण्यात आले आहे. पण असा कोणताही संदेश देण्याच्या स्थितीत मी नाही. मी फक्त एवढेच करू शकतो की, माझ्या लहानपणी आणि तारुण्यात जी ध्येये आणि उद्दिष्टे मी बाळगली होती आणि जी आता नुकतीच सफल होऊ घातली आहेत ; त्यांच्याविषयी माझे वैयक्तिक मत मी जाहीर

करू शकतो. ही ध्येये आणि उद्दिष्टे भावी भारताशी संबद्ध अशी असून त्यांच्या प्रतिपूर्तीमध्ये भारत सतत आघाडीवरच राहणार आहे. भारत जागा होत आहे असे मी नेहमीच म्हणत आलो आहे, जागा होऊन भारत केवळ आपलेच भौतिक हितसंबंध–म्हणजे भौगोलिक विस्तार, सत्ता स्थापना आणि भरभराट साधणार नाही–अर्थात त्याकडे दुर्लक्षही करणार नाही ; पण केवळ अन्य देशांप्रमाणे भारत लोकांना पायदळीही तुडवणार नाही; तर जगातील अन्य लोकांना तो सहाय्यभूत होऊन साऱ्या मानवतेचे नेतृत्व करणार आहे. ह्या ध्येयांचा आणि उद्दिष्टांचा नैसर्गिक क्रम असा ; भारताचे स्वातंत्र्य आणि एकात्मता साध्य करणारी क्रान्ती. मानवी सभ्यता आणि प्रगती यांच्या बाबतीत महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या आशिया खंडाची मुक्तता आणि त्याचे पुनरुज्जीवन. मानवांसाठी एक उच्चतर आणि महान असे नव्याने फुलणारे जीवन –जे बाह्यतः आंतरराष्ट्रीय एकीकरणाच्या स्वरुपाचे असेल–परंतु ठिकठिकाणच्या देशांतील राष्ट्रीय जीवनधाराही अक्षुण्ण राखील आणि त्या सर्वांमध्ये सूत्रात्मक एकता साधेल. समग्र मानव वंशाला अध्यात्माधारित जीवन प्रणालीचे भारतीय विद्येचे दान. आणि सरतेशेवटी, जेव्हापासून मानव वैयक्तिक परिपूर्णता आणि परिपूर्ण समाजाची कल्पना करू लागला तेव्हापासून अस्तित्वविषयक उद्‌भवलेले प्रश्न सोडवण्यासाठी आवश्यक असणाऱ्या चैतन्याचे उन्नयन करणारी उत्क्रान्तिसोपानाची एक वरची पायरी गाठणे.

भारत स्वतंत्र झाला आहे. परंतु एकता गमावून बसला आहे. हे स्वातंत्र्य खंडित आहे. एकदा असेही वाटले होते की, ब्रिटिश राजवटीपूर्वीचा वेगवेगळ्या संस्थानांचा गोंधळ आता सुरू होतो काय ? परंतु सुदैवाने आता अशी परिस्थिती आहे की, अशा प्रकारची गोंधळाची स्थिती पुन्हा उद्‌भवणार नाही, हे स्पष्ट झाले आहे. घटना समितीने जे एक शहाणपणाचे समर्थ पाऊल उचलले आहे. त्यामुळे आता दलित वर्गांचे प्रश्न कोणतेही नवीन ताणतणाव न उद्‌भवता सोडवले जातील. परंतु हिंदु मुसलमानातील जातीय तेढ आता इतकी वाढली आहे की, ही भारतातील राजकीय शकले आता कायमची राहतील की काय अशी शंका वाटू लागली आहे. हा एक तात्पुरता इलाज म्हणून आम्ही स्वीकारला. ही शकले तशीच राहतील, अशी कॉंग्रेसची आणि राष्ट्राची पक्की भावना होऊ नये अशी आशा बाळगणे इष्ट होईल. कारण देशभंजनाची ही स्थिती तशीच राहिली तर, त्यामुळे भारत निःसत्त्व बनेल, पांगळा बनेल. येथे दंगेधोपे नेहमीच उद्‌भवतील, कदाचित राष्ट्रावर परचक्र येऊ शकेल आणि भारत पुन्हा परतंत्र होईल. त्यामुळे हे विभाजन नष्ट झालेच पाहिजे, हा तणाव कमी झालाच पाहिजे. शांतता आणि सामंजस्य यांची गरज हळूहळू सर्वांना पटली पाहिजे. त्यासाठी सर्वांनीच एकजुटीने प्रयत्न केले पाहिजेत. त्यासाठी तसा कायदाही केंद्राने केला पाहिजे. अशा रीतीने कोणत्याही स्वरुपात का होईना, एकता प्रस्थापित व्हायला हवी. ही एकता सोय म्हणून महत्त्वाची आहे. तसे तिला सैद्धान्तिक महत्त्व नाही. पण कोणत्याही उपायाने हे विभाजन नष्ट व्हायला हवे आणि ते होईलच. कारण तसे झाले नाही तर, भारताचे भवितव्य धोक्यात असेल. त्याचा अवसानघात होईल. असे होता कामा नये.

आशिया जागा होत आहे. येथील बरेचशे देश स्वतंत्र झाले आहेत आणि होत आहेत. काही देश अजूनही स्वातंत्र्यासाठी लढत आहेत. आता थोडेसेच काहीतरी करावयाचे आहे. यात भारताचा सहभाग आवश्यक आहे. भारताने आपले कार्य या दिशेने सुरू केले आहे. राष्ट्रांच्या या संकुलामध्ये भारत आपले रास्त स्थान घेण्याच्या तयारीत आहे.

अखिल मानवजातीच्या एकीकरणाची प्रक्रिया सुरू झाली आहे. सुरवातीची ही प्रक्रिया परिपूर्ण नसेल. ती संघटित असली तरी तिला अनेक अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. परंतु या प्रक्रियेला चालना मिळाली आहे. इतिहासातील अनुभवांचा मागोवा घेतल्यास ही गती आता वाढतच राहील. सर्व काही पादाक्रांत करूनच ती थांबेल. तेथे देखील भारताने आपली महत्त्वाची भूमिका बजावण्यास सुरुवात केली आहे. सद्यःस्थिती आणि नजिकच्या काळातील शक्यता यांच्या सीमारेषांनी कुंठित न होता, भारताने आपले बृहन्नेतृत्व प्रस्थापित करावयास हवे. त्यानंतरच मग कासवाच्या गतीने भीत भीत करण्यात येणारा विकास आणि आत्मविश्वासपूर्ण असा घडवून आणलेला विकास, यांतील फरक स्पष्ट होईल. कदाचित एखादे भयानक संकट मध्येच उद्भवेल आणि जे काही केले जात आहे ते समस्त नष्ट होईल. तरी पण अंतिम परिणामाची आपण खात्री देऊ शकतो. कारण एकीकरण होत जाणे हा निसर्गाचा अनिवार्य असा नियमच आहे. ते तसे होणारच हे आपण निश्चितच अगोदर सांगू शकतो. राष्ट्रांसाठी ते किती आवश्यक आहे हे स्पष्टच आहे. कारण त्याशिवाय ह्यानंतर अल्पजन समाजाचे स्वातंत्र्य सुरक्षित राहू शकणार नाही. मोठी आणि शक्तिशाली राष्ट्रेही खऱ्या अर्थाने सुरक्षित राहू शकणार नाहीत. भारत जर विभाजित असाच राहिला तर त्यालाही आपल्या सुरक्षिततेची खात्री देता देणार नाही. म्हणून पुनश्च एक होणे, हे सर्वांच्याच हिताचे आहे. वेडगळपणा आणि स्वार्थी मूर्खपणा ह्याच गोष्टी ह्या एकीकरणाच्या आड येतील. या उलट असे म्हणता येईल की ईश्वरी इच्छेने निसर्गक्रमे जे घडणार असेल त्याला देवदेवता देखील रोखू शकणार नाहीत. तोपर्यंत राष्ट्रीयत्वाचे उद्दिष्ट पूर्ण झाले असेल. एक आंतरराष्ट्रीय चेतना निर्माण व्हायला हवी. आंतरराष्ट्रीय दृष्टिकोन तयार व्हायला हवा. आंतरराष्ट्रीय स्वरुपाच्या संस्था निर्माण व्हायला हव्या. यांतूनच पुढे द्विविध किंवा बहुविध नागरिकत्वही संमत होईल. या बदलांना अनुसरून विभिन्न संस्कृतींचा मिलाफ पण होईल. राष्ट्रवादातील ताठरपणा हळूहळू निघून जाईल आणि हे नवे बदल पचनी पडत जातील. दृष्टिकोन व्यापक होत जाईल. साऱ्या मानववंशाला एकात्मता जाणवू लागेल.

जगाला आध्यात्मिक ज्ञान देण्याचे भारताचे कार्य अगोदरच सुरू झाले आहे. भारतातील अध्यात्मविद्या आता युरोप आणि अमेरिकेत अधिकाधिक वेगाने पसरत आहे. हा प्रवाह असाच वाढत जाणार आहे. काळाचे हे आघात होत असतानाच सारे जग भारताकडे मोठ्या आशेने पाहत आहे. भारताच्या आध्यात्मिक शिकवणी बरोबरच येथील मनोविकासाची आणि आत्मानुसंधानाची तंत्रे लोक स्वीकारीत आहेत.

मनी मानसी अजून ब-याच आशा आकांक्षा आहेत. भारतातील आणि पाश्चिमात्य देशांतील अग्रगामी विचारवंतांच्या मनामध्ये ह्या आकांक्षा आणि ध्येये फुलत आहेत. कोणत्याही ध्येयमार्गावर अडीअडचणींचे डोंगर असतात. त्याच्यावर मात करण्यासाठीच ते असतात आणि सर्वश्रेष्ठ शक्तीची तशी इच्छा असेल तर त्यांवर आम्ही मात करूच. येथे देखील अशी उत्क्रान्ती होणार असेल आणि ती अध्यात्म आणि अंतर्गत चैतन्यशक्तीच्या विकासानेच होणार असेल तर तिचीही सुरुवात भारतापासूनच होईल. तिची व्याप्ती वैश्विक असली तरी तिचे प्रचालन भारतापासूनच होईल.

भारताच्या मुक्तिदिनाचा हा आशय मला अभिप्रेत आहे. तो कितपत, कसा आणि किती लवकर पूर्णपणे प्रकट करता येईल, हेही ह्या नूतन, मुक्त भारतावरच अवलंबून आहे.

● ● ●

शामुना–एन-२३६–समरासासंमंमुं–८-९७–१,१३० प्रती.–पीए५*

परिशिष्ट

## या ग्रंथातील लेखांचे संदर्भ

Sri Aurobindo Birth Centerary Library, 1972 SABCL.
Haridas Mukherjee and Uma Mukherjee. Sri Aurobindo and The New Thought in Indian Politics, 1964 SANTIP

| | | | | Pages |
|---|---|---|---|---|
| 1 | SABCL. | Bande Mataram, Early Political Writings—1 | | 4—9 |
| 2 | " | " | | 15—19 |
| 3 | " | " | | 67—74 |
| 4 | SABCL. | Writings in Bengali | Vol. 4 | 317—320 |
| 5 | SABCL. | | Vol. 1 | 259—262 |
| 6 | " | | | 286—292 |
| 7 | " | | | 300—303 |
| 8 | " | | | 304—308 |
| 9 | " | | | 308—311 |
| 10 | " | | | 314—318 |
| 11 | " | | | 426—428 |
| 12 | SANTIP | | | 128—130 |
| 13 | SABCL | | Vol. 1 | 505—507 |
| 14 | " | | | 515—517 |
| 15 | " | | | 533—535 |
| 16 | " | | | 542—546 |
| 17 | SANTIP | | | 218—220 |
| 18 | SABCL | | Vol. 1 | 595—600 |
| 19 | SANTIP | | | 236—238 |
| 20 | SABCL | | Vol. 1 | 124—128 |
| 21 | Supplement | | Vol. 27 | 62—66 |
| 22 | SABCL | | Vol. 1 | 906—910 |
| 23 | " | | | 652—665 |
| 24 | " | | Vol.1 | 736—739 |
| 25 | " | | Vol. 1 | 764—766 |
| 26 | " | | Vol. 1 | 798—801 |
| 27 | " | | Vol. 1 | 852—855 |

| | | | | Pages |
|---|---|---|---|---|
| 28 | SABCL | Karmayogin Early Political Writings—2. | Vol. 2 | 1—10 |
| 29 | " | | Vol. 2 | 124—133 |
| 30 | " | | Vol. 2 | 16—21 |
| 31 | " | | Vol. 2 | 35—41 |
| 32 | " | | Vol. 2 | 431—432 |
| 33 | SABCL | The Hour of God and Other Writings. | Vol. 17 | 348—363 |
| 34 | " | | Vol. 17 | 364—366 |
| 35 | SABCL | On Himself | Vol. 26 | 270—273 |
| 36 | SABCL | The Doctrine of Mystics | Vol. 11 | 1—20 |
| 37 | SABCL | On Himself | Vol. 26 | 432—434. |

शासकीय मुद्रणालय, नागपूर.

'' या देशाचे श्रेष्ठत्व आणि विचारवैभव जगात प्रस्थापित करण्याची आकांक्षाच समाजात प्रचंड पराक्रम करण्याची ईर्षा निर्माण करू शकेल. केवळ भौतिक समृद्धीची अभिलाषा नव्हे. म्हणूनच फक्त लाभासाठीच आम्ही तुम्हाला उद्युक्त करू इच्छीत नाही. आपण एक थोर व वैभवशाली राष्ट्र होतो ह्याची आपणाला प्रथम जाणीव झाली पाहिजे आणि त्याबद्दल आपणाला सार्थ अभिमान असला पाहिजे! आतापर्यंत आपल्या स्वाभिमानशून्य व शरणांगत वृत्तीचा लाभ उठवूनच अन्य राष्ट्रांनी आपणाला विनाशाच्या गर्तेत फेकून दिले आहे. केवळ भौतिकतेच्या आकांक्षा राष्ट्रनिर्मितीचे काम कधीच करू शकणार नाहीत. पण जेव्हा राष्ट्रीय स्वाभिमान जागृत होतो. तेव्हाच अधःपतित व विस्कळीत राष्ट्र पुन्हा एकजीव होते. त्यात कल्पनातीत शक्तीची नैतिक ऊर्जा निर्माण होते. ''

'' भारत स्वतंत्र झाला आहे पण एकता गमावून बसला आहे. हे स्वातंत्र्य खंडीत आहे. . . . . . . . .देशभंजनाची स्थिती तशीच राहिली तर त्यामुळे भारत निःसत्त्व, पांगळा बनेल. येथे दंगेधोपे नेहमीच उद्भवतील. कदाचित राष्ट्रावर परचक्र येऊ शकेल आणि भारत पुन्हा परतंत्र होईल. त्यामुळे हे विभाजन नष्ट झालेच पाहिजे. . . . . . . . . कोणत्याही उपायाने हे विभाजन नष्ट व्हायला हवे आणि ते होईलच.

जगाला आध्यात्मिक ज्ञान देण्याचे भारताचे कार्य अगोदरच सुरू झाले आहे. भारतातील आध्यात्मविद्या आता युरोप व अमेरिकेत अधिकाधिक वेगाने पसरत आहे. हा प्रवाह असाच वाढत जाणार आहे. काळाचे हे आव्हान होत असताना सारे जग भारताकडे मोठ्या आशेने पहात आहे. भारताच्या आध्यात्मिक शिकवणीबरोबरच येथील विकासाची आणि आत्मानुसंधानाची तंत्रे लोक स्वीकारीत आहेत.

कोणत्याही ध्येयमार्गावर अडीअडचणीचे डोंगर असतात. त्यांच्यावर मात करण्यासाठीच ते असतात आणि सर्वश्रेष्ठ शक्तीची इच्छा असेल तर आपण त्यांच्यावर मात करूच. येथे देखील अशी उत्क्रांती होणार असेल आणि ती अध्यात्म आणि अंतर्गत चैतन्यशक्तीच्या विकासानेच होणार असेल तर तिचीही सुरवात भारतापासूनच होईल. तिची व्याप्ती वैश्विक असली तरी तिचे प्रचलन भारतापासूनच होईल. ''

श्रीअरविंद